म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र.
१९३२

# श्रीदत्त-भजन-गाथा

( श्रीयुत:-विनायक वासुदेव साठे विरचित )

REFBK-0004724
REFBK-0004724 न सवा रुपया.

१९३२

।। श्रीदत्त ।।



# श्रीदत्त-भजन-गाथा

श्रीयुत विनायक वासुदेव साठे
यांजकडून रचली गेलेली

REFBK-0004724
REFBK-0004724

प्रकाशक

भिकाजी बाळकृष्ण नाटेकर
परशुराम रामचंद्र वरेरकर

( शके १८५४ )

आवृत्ति पहिली


किंमत १। रुपया

( सर्व हक्क स्वाधीन )

मुद्रकः—**एस्. व्ही. परुळेकर**, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँडहर्स्टरोड, गिरगांव—मुंबई

प्रकाशकः—**भिकाजी बाळकृष्ण नाटेकर**, रत्नागिरी.
**परशुराम रामचंद्र वरेरकर**, पेन्शनर पी. डब्ल्यू. डी.
खालची आळी, रत्नागिरी.

श्री. साठे यांजकडील देवस्थानचा फोटो



प्रभव उदित व्हावा वासुदेवा त्वदीय । दिवसमणि जसा कीं पूर्ण उद्दीप्त होय ॥
दहन करित पापी दुष्ट आचारहीन । प्रगट सतत स्थानीं या असो प्रज्वळोन ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...
... नोंद दि: ...

# प्रकाशकांचे दोन शब्द

ही '**श्रीदत्त-भजन-गाथा**' श्रीयुत **विनायक वासुदेव साठे** यांजकडून रचली गेलेली आहे. त्यांचा असा नियम आहे कीं गुरुवारीं किंवा उत्सव प्रसंगीं किंवा केव्हांही भजन करणें झाल्यास तें जसें तोंडानें स्वयंस्फूर्तीनें येईल तसें म्हणत जावयाचें; त्यांत गद्यपद्य दोन्हीही येत असतात. कांहीं लोकांस या प्रबंधांचें कौतुक वाटतें. कांहींना यांत ईश्वरी प्रसाद वाटतो. यामुळें कांहींनीं सदर भजन चालत असतां तें लिहून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळेंच सदर पुस्तक आम्हांस छापवितां येत आहे.

श्रीयुत **सावाजी रामचंद्र भिसे** हे दापोलीस कॉलेजला सुटी पडली असतां आपले वडीलांकडे येत असत. त्यांस ही भजन-गाथा बरी वाटल्यामुळें त्यांनीं ती उतरून घेण्याचा प्रयत्न केला व तो त्यांचे मनाप्रमाणें त्यांस साधला. सदर काम अव्याहत चालावें म्हणून त्यांनीं आपण दापोलीस नसतेवेळीं आपले बंधूंवर ही कामगिरी सोंपविली, व उतरून कसें घ्यावयाचें तीही खुबी त्यांस सांगितली. त्यामुळें या त्रिवर्ग-बंधूंनीं श्री. साठे दापोलीस असेपर्यंतची गाथा शक्य तितकी उतरून घेतली आहे, व प्रकाशनासाठीं आमचेकडे दिली आहे.

ऱ्याच मंडळींचें मत सदर गाथा छापून काढावी असें असल्यामुळें आम्हीं हें काम हातीं घेतलेलें आहे फक्त अभंगाचे चालीवर जितके प्रबंध म्हणतां येण्यासारखे आहेत तितकेच येथें आम्हीं घेतले आहेत. ज्या ज्या वेळीं हे प्रबंध रचिले गेले त्या त्या तारखा आम्हीं प्रबंधांवर दिल्या आहेत. सदर पुस्तकास लोकाश्रय मिळाल्यास व खर्चवेंच जाऊन कांहीं फायदा राहिल्यास तो श्री. साठे यांचे दुसरे प्रबंध छापून काढण्यांत खर्च करणेंचा आमचा मनोदय आहे. पदें, ओंव्या, श्लोक वगैरे बरेच प्रकारचें श्रीयुत साठे यांचें गद्यपद्यमय भजन लिहून तयार आहे. ईश्वरी कृपाप्रसादानें तेंही छापून काढण्याचा सुयोग येईल असा आमचा भरंवसा आहे.

सदरहू पुस्तक श्री. **विनायक वासुदेव साठे** यांचे परवानगीनें आम्हीं छापीत आहोंत. पुस्तकासंबंधीं सर्व हक्क त्यांचे आहेत.

सदर पुस्तक छापण्याचा योग ज्यांचें प्रयत्नानें आला म्हणजे ज्या मुलांनीं उत्सुकतेनें व तत्परतेनें प्रबंध उतरून घेऊन पुस्तक छापणेंपर्यंतची सर्व कामगिरी करून दिली, त्यांचे म्हणजे श्री. **सावाजी रामचंद्र भिसे** बी. ए., श्री. **बाबुराव रामचंद्र भिसे** व श्री. **महादेव रामचंद्र भिसे** यांचे आम्हीं फार आभारी आहोंत.

त्याचप्रमाणें हें पुस्तक छापण्याच्या कामीं '**नवाकाळ**' पत्राचे संपादक आणि एक बहुश्रुत विद्वान श्री. **न. र. फाटक** बी. ए. यांनीं आम्हांला हरएक प्रकारची मदत केली. व श्री. **ग. का. रायकर** यांनीं मोठ्या उत्साहानें प्रुफें तपासलीं, याबद्दल आम्हीं त्या दोघांचेही मनःपूर्वक आभार मानतों.

विजयादशमीच्या सुमुहूर्तावर "गाथा" प्रसिद्ध करण्याचा संकल्प सिद्धीस नेण्याचा प्रकाशकांचा मनोदय असल्यामुळें, प्रबंधसूचींतील कांहीं अशुद्धें कालाभावीं शुद्ध करावयाचीं राहून गेलीं आहेत. भाविक वाचक त्याबद्दल उदारपणें क्षमा करतील असा भरंवसा आहे.

शेवटीं हें भजन ज्या प्रभूचें आहे त्याचे चरणीं सदरहू पुस्तक आम्हीं अर्पण करून त्याचे चरणीं आम्हीं आपलीं मस्तकें ठेवितों.

रत्नागिरी, आश्विन
शु. १० शके १८५४

**भिकाजी बाळकृष्ण नाटेकर**
**परशुराम रामचंद्र वेरेकर**

श्रीदत्त

# विषयवार अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| १ गुरुवार | १ |
| २ गणेश जयंती | १२७ |
| ३ शिवरात्र | १३५ |
| ४ राम नवमी | १४९ |
| ५ हनुमान् जयन्ती | १५७ |
| ६ नृसिंह जयन्ती | १६३ |
| ७ वासुदेव जयंती | १७१ |
| ८ कृष्ण जयंती | १७५ |
| ९ वराह जयंती | १८९ |
| १० वामन जयंती | १९३ |
| ११ देवी चरित्र | १९७ |
| १२ गुरुद्वादशी | २०७ |
| १३ भाऊबीज | २१७ |
| १४ सप्ताह अनुष्ठान | २२१ |
| १५ उत्सवाची मागणी | २६७ |
| १६ अंगाऱ्याचा उत्सव | २८९ |
| १७ चंपाषष्ठी | ३२७ |
| १८ दत्त जयन्ती | ३६७ |

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

# विषय-सूचि


प्रबंध नं.

**अ**

अतुल्य सामर्थ्यासाठीं प्रार्थना २८६
अदितीची गर्भधारणा २२३
अनन्य भक्ती हीच खरी भक्ती (तुलसीदास चरित) ४१०
अन्न १३७,१३८
अन्नोपासनेची महती १३९,१४०,१४२
अनसूयेचा आनंद ४७३
अनसूयेचा पाळणा ४६१,४७५,४७६
अनुष्ठानपूर्तिसाठीं प्रार्थना ३११
अवतार भक्तासाठीं ४१५
अवतार समाप्ति २७३
अहित दलनासाठीं प्रार्थना ३१०
अहंता विष ३०८
अहं दत्तोऽस्मि ४,१७७
अहं दत्तोऽस्मि मंत्र कां जपविला ८३
अज्ञानानें ईश्वरावर दोषारोप ३२३,४०९

**आ**

आध्यात्मिक-कर्मयोग ४०६
आनुकूल्य मागणी ३७९,३५६
आनंद निर्भरता २६५,२३०,२३१
आमुच्या मनासम होय ३६३
आशीर्वचन मागणी ४२५,४५३

प्रबंध नं.

आँशीर्वाद मागणी ४६७
आज्ञा मागणी ४५६,४५७,४६०,४६८,४७१,३८४,३८७,३८९,३९१,३९२,३९६,३९७,४०५

**ई**

ईश–कृपेसाठीं प्रार्थना ४३५
ईश–चरित सुधा ४११
ईश–प्रसाद लक्षणें ६
ईश सेवनासक्ती १२७
ईश सेवन माहात्म्य ४३२
ईश्वराची अतर्क्य लीला ३२०
ईश्वर आणि भक्त ५४,५५,५६
ईश्वरावर निस्सीम निष्ठा ३७
ईश्वराची भक्तांशीं ऐक्यता ६०
ईश्वरास लाज राखण्याबद्दल प्रार्थना ६१,६२
ईश्वराचें विनायकास सहाय्य ४६

**उ**

उत्तर गति १५,१६
उत्पत्ति स्थिति लय कर्ता परमेश्वर १६८,१६९
उत्सवाची मागणी ४३९
उपासना महती १४४,१५०

प्रबंध नं.

ए

एकोरसः करुण एव ९७,९८

ऋ

ऋष्यशृंगास आणण्याची मसलत २१३

क

कथा आरंभिण्यास आज्ञा
मागणी ४५९,२३३
कधीं ? ७२
कधीं न सोडावें देवालागीं ३१३,३१५
३१७,३१८,३१९
कनवाळू देव ७०
कनवाळू देव—दृष्टांत ७१
कर्मानें मोक्ष मिळत नाहीं १४५,१४७
करूणदेवास विनंती ३७०
कायावाचामन यांचें निगडन
वहुत कठीण १५३
कार्य करवून घेतल्याबद्दल कृतज्ञता—
वचन २११
कुलेशस्तवन ४६२
कोजागरी १७
कंसाचे अत्याचार २३४
क्रीडन लालसा ९
कृतज्ञतावचन १९४,२८,४३,४४,४५,
३०३,४०८,४७७
कृष्ण-जन्म २४१
कृष्ण-जन्म कथा २३२
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ३१४
कृपाळू वासुदेव १२१,१२२

प्रबंध नं

ग

गजेन्द्रमोक्ष ३५
गणपतिचा त्रिगुणात्मक भाव १९३
गणपतिचा धांवा १९५,१९६
गणपतिचें ध्यान १९४
गणांची तल्लीनता २०७
गणांची बेभानता २०४
गणांचें भजन २०६
गणेशावतार १९१
गणेशस्तवन ४६२
गिरिजेची प्रार्थना १८९
गुरुकार्यासाठीं स्वार्थ-त्याग ४७,४८
गुरुजन स्तवन ४६६
गुरुमाऊली ११६
गुरुमाऊलीचा-कृपाभाव ११७
गुरुमाऊलीचा लटिका कोप ११८,११९
गुरुःसाक्षात्परब्रह्म ३९५,३९८
गोकुळांत आगमन २४२
गंगावतरण ‘व्यासंगोहत पतित
निस्तारणविधौ’ ९३,९४,९६

च

चाण्डाळीची कथा १९९
चित्तस्थैर्यासाठीं प्रार्थना १२३

ज

जगत्पिता १३३,१३४
जिव्हाळ्याचा देव २७६

त

तमाशा ५२,५३

प्रबंध नं.

द

दत्ताधीनता २९९,३०१
दत्तचरणांस शरण गेल्यानें काय होतें ४१७
दत्तजन्म ४७२
दत्तछंद कां ध्यावा ४४९,४५०
दत्ततादात्म्य ८५
दत्तदासांची महती ४०४
दत्तनामें भूतें भीति ४४१
दत्तभजनामृत ४१४
दत्तभक्तांची स्थिती ११
दत्तभार्गव भेट ८४
दत्तमय त्रिभुवन ४९,५०,५१
दत्तदासांची श्रीमंती १०
दर्शनलालसा ८,३८
दर्शन–सुख २१
दशरथाचा यज्ञाविषयीं विचार २१२
दक्ष मी राहिलों तुझीये कार्यात, २८०
दाशार्ह कथा १९८
दुःख १११,११२
दुःख हरण्यासाठीं प्रार्थना ४२८
देवकार्यासाठीं धैर्य पाहिजे ६६,६७
देवकीगर्भांत भगवत्संचार २४०
देवकार्यासाठीं नयज्ञेतेची जरूरी व मारुती दृष्टांत ६८
देव मज करा २८५,२८६,२८७
देव व भक्त यांचा रंग ८६,८७
देवलीलांचें अगम्यत्व १०३,१०४

प्रबंध नं.

देवांची प्रवास-तयारी करण्यासाठीं आज्ञा ४४६
देवांची भगवंतास विनंती २२५
देवांचा वसंत महोत्सव ९०
देवाविण गति नाहीं आम्हांप्रति ३१२
देवांचा विचार २७०
देवांची विष्णूस प्रार्थना २३६
देवास शरण जाण्याची महती ४३१ ४३३
देवीचें सांगणें २५८
देह–प्रमाद १५४
देहीं अनासक्ती व ईश्वरीं अनुरक्ती ८८
दैत्यांचा दृष्टांत १४६

ध

धर्मग्लानि २९२
धर्मविस्तारार्थ प्रार्थना २९३
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे १२३
धांवा ३४,४२,६९,७३,७४,९९, १००,१०१;१०२,१०५ १०९,११०,१२०,१२५ १२६,१२८,१२९,१३० १३१,१३२,१५५,१५६ १५७,१५८,१५९,१६० १६१,१६२,१६३,१६४ १६५,१६६,१६७,२७७ २७८,२८२,२९१,२९८ ३०९,३२६,३२८,३२९ ३३०,३३१,३४२ ते ३४९ ४२४,४३६ ते४३८,४४०

| | प्रबंध नं. |
|---|---|
| ध्यान योग | ४०३ |

**न**

| | |
|---|---|
| नरकासुर वध | १९ |
| नाम मंत्र व त्याचा प्रभाव | ३३२,३३३ ३३४,३४१ |
| निराशेचे बोल | २९७ |

**प**

| | |
|---|---|
| पतिव्रतेस दत्त दर्शन | २६८ |
| पतिव्रतेस वरदान | २६९ |
| परमेश्वराची शब्दातीतता | ७६ |
| पायस-प्राप्ति | २१६ |
| पितृत्वाचें कारण | १३५,१३६ |
| पूर्वचरित कथन व क्षमा याचना | ३०६,३०७ |
| पृथ्वीची देवांस प्रार्थना | २३५ |
| प्रभु यशः श्रवण माहात्म्य | २६४ |
| प्रभु वात्सल्य | ७५ |
| प्रभु वात्सल्यवर्णन व क्षमा याचना | ३२५ |
| प्रल्हादजन्म व चरित्र | २२६ |
| प्रल्हादाचा पंथ | २२७ |
| प्रसाद ग्रहणार्थ आज्ञा मागणी | २२,३०४ |
| प्रसाद याचना | ३९० |
| प्रस्थानकाळीं आज्ञा मागणी | १८६, १८७,१८८ |
| प्रार्थना | २९ |
| प्रेम आणि देव यांचा सदा ऐक्य भाव | ७७,७९,८० |

| | प्रबंध नं. |
|---|---|

**ब**

| | |
|---|---|
| बळ समृद्धि व दुःसंग नाशाची मागणी | ३५९ |
| बापाचा कोप | २२८ |
| बालक असलेमुळें अपराध पोटीं घालण्याबद्दल प्रार्थना | ४२९,४३० |
| बालदत्ताचे विलास | ४७४ |
| बालभावाची मागणी | ३६६ |
| बालस्वरूपवर्णन | १७८ |
| बेहोशतेची पराकाष्ठा | २०५ |
| ब्रह्मदेवाचें असत्य कथन | २५१,२५२ |

**भ**

| | |
|---|---|
| भगवंतास स्वार्पण | १७०,१७१ |
| भजनछंद | ४१२,२२,३३,४५५ |
| भजन माहात्म्य | ४१६,४३४,४४२, ४४३,४४४,४४५,४५४ |
| भजन यज्ञ रक्षणार्थ विनंति | ६५ |
| भक्ताभिमानी देव | ५८ |
| भक्तकीर्तीसाठीं याचना | २८३ |
| भक्तकीर्तीनें देवयशाचा विस्तार | १८४ |
| भक्त त्राता परमेश्वर | १७२,१७३,१७४ १७५,१७६ |
| भक्त आणि देव यांची एकरूपता | १७९ |
| भक्तीप्रेमाचा परिपाक | ४१९ |
| भक्तीभाव उपजविण्यासाठीं प्रार्थना | २९६ |
| भक्तीभावाचा भुकेला | ४४७,४५२ |
| भक्तीमाहात्म्य | ४४९,४५१ |
| भक्ताची लाज राखण्याबद्दल विनंति | २७९ |

| | प्रबंध नं. |
|---|---|
| भस्मावशेषं मदनं चकार | २१० |
| भावनामय प्रेम, प्रियरूप देव | ७८ |
| भाऊबिजेची फलश्रुति | २७५ |
| भाव व भक्तीची भाऊबीज | २७४ |
| भास्कर ब्राह्मणाची कथा | ३९१ |
| भिल्लिणी–आख्यान | ४१ |
| भिक्षा समारंभ | ३८५ |
| भीष्म–प्रतिज्ञा | ५९ |
| भूत अंगीं संचरलें, दत्तरूप माझ्या भलें | ३००,३०२ |
| भ्रूणहत्या | २३९ |
| भोळ्या भावाचा भुकेला | ३१६ |
| भ्याडपण भरें अज्ञानानें | ३२२ |

**म**

| | |
|---|---|
| मधुकैटभवध–भगवती प्रादुर्भाव | २५३ |
| मन हें ओढाळ गुरु | १५२ |
| मनोदय कथन | ४२७ |
| मसलतीची अंमलबजावणी | २१९ |
| महिषाशीं युद्ध | २५७ |
| महिषास वरप्राप्ति | २५६ |
| मारुती चरित्र सार | २२० |
| मारुती प्रशंसा | २१८ |
| मारुतीची रामनिष्ठा | २२१ |
| मारुतीची राममयता | २१९ |

**य**

| | |
|---|---|
| ये यथा मां प्रपद्यंते | ३६,८१ |
| योगाभ्यास | २३,२४ |
| योग माहात्म्य | ४०२ |
| योगाचा दुरुपयोग | १४४, १४६ |
| योग्याची लक्षणें | १८ |
| योगश्चित्तवृत्तिनिरोधः | २० |

**र**

| | |
|---|---|
| रजकाची कथा | २७२ |
| रमामाधव योग | ९१,९२ |
| रामजन्म | २१७ |
| रंभकरंभ कथा | २५४,२५९,२६० |
| रंभ वध | २५५ |

**व**

| | |
|---|---|
| वराहावतार-हिरण्याक्षवध | २४३ |
| वसुदेव देवकीचा विवाह व आकाशवाणी | २३८ |
| वसंत–श्री | ८९ |
| वामनदर्शनानें बुद्धि मोचन | २४६ |
| वामन बुद्धि प्रवेश व उपनिषद्भाव | २४७ |
| वाल्मीकि चरित | ३३७,३३८, ३३९,३४० |
| वासुदेव–चरित्र सार | १,१२,१०७, ३८३,४०१ |
| वासुदेवाचा धांवा | १३ |
| वासुदेवाचा निरोप | ३८६ |
| वासुदेव पुण्यतिथीच्या दिवशीं काय करणें तें | ३९९ |
| वासुदेवमयतेची अपूर्वता व आनंद | २३० |

*

| | प्रबंध नं. |
|---|---|
| वासुदेव लीला स्मरण व भिक्षा समारंभासाठीं आज्ञा | ४०० |
| वासुदेव समाधिस्थ झाले | ३८८ |
| विघ्नासुर कथा | १९२ |
| विघ्ननाशाची मागणी | ३६८ |
| विजय याचना | ४६९ |
| विधिरहो बलवान् | ४४६ |
| विनायकाचा अनुभव | १८१ |
| विनायकाचा उद्धार | २०९ |
| विनायकाचें कोडें | १०८ |
| विनायकाची गुरुमयता | १८२ |
| विनायकाठायीं दत्त संचार | २८९,२९० |
| विनायकाचा निर्धार | ४२६ |
| विनायकाचें मागणें | २०८ |
| विनायक वासुदेव ऐक्य भाव | २३१ |
| विनायकाचें वंदन | १८५ |
| विनायकाचा संकल्प | ५७ |
| विभूतिपूजनासाठीं आज्ञा | ४०७ |
| विरक्तीची व्याख्या | २७ |
| विश्वामित्र-मख-रक्षण | ६३,६४ |
| विष्णुचें आश्वासन | २३७ |
| विष्णुप्रबोध | २५ |
| वैश्यनृपास देवीचा वर | २६२ |
| व्यासपूजा | १०६ |
| व्हावें रामराज्य | २९४,२९५ |

**श**

| | |
|---|---|
| शबरी आख्यान | ८२ |
| शारदास्तवन | ४६३ |

| | प्रबंध नं. |
|---|---|
| शिव-दातृत्व | २०० |
| शिव-नर्तन | २०३ |
| शिव-स्वरूप वर्णन | २०१ |
| शिवहृदयीं गणपति भावोद्भव | १९० |
| श्राद्धविधि | १४ |
| श्रीगुरुंचा आशीर्वाद | १८३ |
| श्रीगुरुंचा निरोप | १८४ |
| श्रीपादांचा अवतार | २७१ |
| श्रीपाद–चरित्र–सार | २६३,२६७ |
| श्रीपाद–प्रयाण | ४० |
| श्रीपाद पुण्यतिथि व सप्ताह समाप्ति | ३५० |
| श्रीपाद पूर्वचरित | २६७ |
| शुंभ निशुंभ कथा | १४८,१४९ |
| शुंभ निशुंभ वध | २६१ |
| शंकरांनीं गंगा कां डोक्यावर घेतली | ९५ |

**स**

| | |
|---|---|
| स्खलनशीलता | १५१ |
| ‘ सदा वस देवा ठायीं ’ | २२ |
| समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी | ३२७ |
| सत्यापरता नाहीं धर्म | ३९ |
| स्थान स्थापनेचा इतिहास | ४०९ |
| सद्गुरुंची विनायकास आज्ञा | ४२०,४२१,४२२,४२३ |
| सत्त्व प्रकाशनानें वासना दमन | २४८,२४९ |
| सप्ताहसिध्यर्थ याचना | २८१ |

प्रबंध नं.

स्वधर्मे निधनं श्रेयः । परधर्मो
भयावहः ११३,११४,११५
स्वभावास औषध नाममंत्र ३३५,३३६
स्वरूप वर्णन ७,२१,३०,३१
सह्यवनश्री व देवांचा विलास २६
सुदाम कथा ३२१
सुरथ राजाची कथा २५०
सुरेश स्तवन ४६५
सूत निवेदन २१५
सेवा स्वीकारण्याबद्दल विनंति १९७
संकटाचे नाशासाठीं प्रार्थना २८८

प्रबंध नं.

संसारांत पारमार्थिक दृष्टीचें वर्णन ४१३

ह

हिरण्यकशिपुची उन्मत्तता २२४
हिरण्यकशिपुच्या चरित्रापासून बोध २२२
हिरण्यकशिपूचा वध २२९
हृदिस्थ वामन २९५

क्ष

क्षमा याचना ३०५

ज्ञ

ज्ञानादेव तु कैवल्यम् २४४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ......१६८४८...... नोंद दि: ........

# गुरुवार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
संदर्भ शाखा (स्थलप्रत)

# विषय

| | प्रबंध नं |
|---|---|
| वासुदेव चरित्र सार | १,१२,१०७ |
| दर्शनसुख | २,३ |
| अहंदत्तोऽस्मि | ४,१७७ |
| ईश प्रसाद लक्षणें | ६ |
| स्वरूपवर्णन | ७,२१,१०,३१ |
| दर्शन लालसा | ८,३८ |
| क्रीडन लालसा | ९ |
| दत्तदासांची श्रीमंती | १० |
| दत्तभक्तांची स्थिती | ११ |
| वासुदेवाचा धांवा | १३ |
| श्राद्धविधि | १४ |
| उत्तर गति | १५,१६ |
| कोजागरी | १७ |
| योग्याचीं लक्षणें | १८ |
| नरकासुर वध | १९ |
| योगचित्तवृत्ति निरोध | २० |
| सदा वस देवाठायीं | २२ |
| योगाभ्यास | २३,२४ |
| विष्णुप्रबोध | २५ |
| सह्यवनश्री व देवांचा विलास | २६ |
| विरक्तीची व्याख्या | २७ |
| कृतज्ञता वचन | २८ |
| प्रार्थना | २९ |
| भजन छंद | ३२,३३ |

| | प्रबंध नं. |
| --- | --- |
| धांवा | ३४,४२, ६९, ७३, ७४, ९९, १००, १०१,१०२,१०५,१०९,११०,११०, १२५,१२६,१२८,१२९,१३०,१३१, १३२,१५५,१५६,१५७,१५८,१५९, १६०,१६१,१६२,१६३,१६४,१६५, १६६,१६७ |
| गजेंद्रमोक्ष | ३५ |
| ये यथा मां प्रपद्यंते | ३६,८१ |
| ईश्वरावर निस्सीम निष्ठा | ३७ |
| सत्यापरता नाहीं धर्म | ३९ |
| श्रीपादप्रयाण | ४० |
| भिल्लीणी आख्यान | ४१ |
| कृतज्ञतावचन | ४३,४४,४५ |
| ईश्वराचें विनायकास सहाय्य | ४६ |
| गुरुकार्यासाठीं स्वार्थत्याग | ४७,४८ |
| दत्तमय त्रिभुवन | ४९,५०,५१ |
| तमाशा | ५२,५३ |
| ईश्वर आणि भक्त | ५४,५५,५६ |
| विनायकाचा संकल्प | ५७ |
| भक्ताभिमानी देव | ५८ |
| भीष्मप्रतिज्ञा | ५९ |
| ईश्वराची भक्ताशीं ऐक्यता | ६० |
| ईश्वरास लाज राखण्याबद्दल प्रार्थना | ६१,६२ |
| विश्वामित्र मख-रक्षण | ६३,६४ |
| भजन यज्ञ रक्षणार्थ विनंति | ६५ |
| देवकार्यासाठीं धैर्य पाहिजे | ६६,६७ |
| देवकार्यासाठीं नयज्ञतेची जरूरी | ६८ |
| कनवाळू देव | ७० |

| | प्रबंध नं. |
|---|---|
| कनवाळू देव-दृष्टांत | ७१ |
| कधीं ? | ७२ |
| प्रभुवात्सल्य | ७५ |
| परमेश्वराची शब्दातीतता | ७६ |
| प्रेम आणि देव, यांचा सदा ऐक्यभाव | ७७,७९,८० |
| भावनामय प्रेम, प्रियरूपदेव | ७८ |
| शबरी आख्यान | ८१ |
| 'अहंदत्तोऽस्मि' मंत्र कां जपविला | ८३ |
| दत्तभार्गव भेट | ८४ |
| दत्त तादात्म्य | ८५ |
| देव आणि भक्त यांचा रंग | ८६,८७ |
| देहीं अनासक्ति व ईश्वरीं अनुरक्ति | ८८ |
| वसंतश्री | ८९ |
| देवांचा वसंत महोत्सव | ९० |
| रमामाधव योग | ९१,९२ |
| गंगावतरण | ९३,९४,९६ |
| शंकरांनीं गंगा कां डोक्यावर घेतली | ९५ |
| एको रसः करुण एव | ९७,९८ |
| देवलीलांचे अगम्यत्व | १०३,१०४ |
| व्यास पूजा | १०६ |
| विनायकाचें कोडें | १०८ |
| दुःख | १११,११२ |
| स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः | ११३,११४,११५ |
| गुरुमाउली | ११६ |
| गुरुमाउलीचा कृपाभाव | ११७ |
| गुरुमाउलीचा लटिका कोप | ११८,११९ |
| कृपाळू वासुदेव | १२१,१२२ |
| धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे | १२३ |

| | प्रबंध नं. |
|---|---|
| ईशसेवनासक्ति | १२७ |
| जगत्पिता | १३३,१३४ |
| पितृत्वाचें कारण | १३५,१३६ |
| अन्न | १३७,१३८ |
| अन्नोपासनेची महती | १३९,१४०,१४२ |
| उपासना महती | १४३,१५० |
| योगाचा दुरुपयोग | १४४ |
| कर्मानें मोक्ष मिळत नाहीं | १४५,१४७ |
| दैत्यांचा दृष्टांत | १४६ |
| शुंभनिशुंभ कथा | १४८,१४९ |
| स्खलनशीलता | १५१ |
| मन हें ओढाळ गुरूं | १५२ |
| कायावाचामन त्यांचे निगडन बहुत कठीण | १५३ |
| देहप्रमाद | १५४ |
| उत्पत्ति स्थिती लय कर्ता परमेश्वर | १६८,१६९ |
| भगवंतास स्वार्पण | १७०,१७१ |
| भक्तत्राता परमेश्वर | १७१,१७३,१७४,१७५,१७६ |
| बालस्वरूप वर्णन | १७८ |
| भक्त आणि देव यांची एकरूपता | १७९ |
| देवांची प्रवासाची तयारी करण्यासाठीं आज्ञा | १८० |
| विनायकाचा अनुभव | १८१ |
| विनायकाची गुरुमयता | १८२ |
| श्रीगुरुचा आशीर्वाद | १८३ |
| श्रीगुरुंचा निरोप | १८४ |
| विनायकाचें वंदन | १८५ |
| प्रस्थानकाळीं आज्ञामागणी | १८६,१८७,१८८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# श्रीदत्त.

श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजकी जय.

श्रीपूर्णानंदसरस्वती स्वामी महाराजकी जय.

## श्रीगुरुदेवदत्त.



( १ )

## वासुदेव चरित्रसार

गुरुवार ता० २०।६।२९

उत्सवाचेसाठीं मागें साक्षात्कार । प्रसादहि थोर वासुदेवा ॥ १ ॥
आम्हांसाठीं नर-जन्म तुझा असे । जगदुद्धारा असे मनुजरूप ॥ २ ॥
ब्राह्मण-वंशालागीं धन्य करायासीं । सकळां दावायासीं आचार कीं ॥३॥
वर्णाश्रम-धर्म सकळ आचरूनी । प्रगट त्रिभुवनीं केले तुवां ॥ ४ ॥
कलियुगीं वर्ण धर्म पाळुं येती । मनाची निश्चिती पाहिजे कीं ॥ ५ ॥
निर्धार जयासीं आचरूं शके तो । तया न बाधतो कलिकाळ ॥ ६ ॥
सनातन धर्म ऐसा उभारिला । न जुमानी तयाला कदापिही ॥ ७ ॥
कृत त्रेता किंवा द्वापार कलि असो । स्वधर्मी राजा असो किंवा म्लेंच्छ ८
धर्मनिष्ठालागीं सकल वंदिती । साहायते होती दुष्ट शिष्ट ॥ ९ ॥
हेंच तत्व आम्हां दावायाकारण । केलें आचरण वर्ण-धर्म ॥ १० ॥
याही युगीं होती सिद्ध वेदमंत्र । दाविल्या विचित्र सिद्धि लीळा ॥११॥
आम्हांसाठीं जन्म आम्हांसाठीं धर्म । आश्रम पालन आम्हांसाठीं ॥१२॥

लेखन ग्रंथांचें केलें आम्हांसाठीं । तुवां जगजेठी वासुदेवा ॥ १३ ॥
भजनमार्ग आम्हां तुम्हीं शिकविला । भक्तीचा दाविला आम्हां पंथ॥१४॥
स्वयें योगी ज्ञानी वेष तो संन्यासी । परि भजनासीं नित्य केलें ॥ १५॥
दत्तसेवनाचा पुरस्कार केला । स्वयें उपासनेला चालविलें ॥ १६ ॥
उपासना-मार्ग जगीं स्थापियेला । गरुडेश्वरीं केला निजवास ॥ १७ ॥
तेथें निजरूपीं प्रभो लीन झालां । आषाढ प्रतिपदेला आनंदानें ॥ १८॥
मध्यरात्रीचे कीं समयीं लीन झालां । स्वरूपीं मिसळलां वासुदेवा १९
तेंच उत्सवकार्य पातलें हें थोर । म्हणुनी साक्षात्कार करावा कीं॥२०॥
विनायक म्हणे श्रीगुरुवासुदेवा । वैभव प्रगटवा आपुलें गा ॥ २१ ॥

## ( २ )

## दर्शनसुख

गुरुवार ता० २७।६।२९

माझी वस्तु मज सांपडेना कैशी । कैशा मी भ्रमासीं पडलोंसें ॥ १ ॥
माझे ठायीं देव शोधितों बाहेर । तंव तो दिसे दूर अज्ञानाला ॥ २ ॥
दुराहूनी दूर अत्यंत जवळी । आहे वनमाळी जैसा भाव ॥ ३ ॥
आपणा पैं दुजा पहात तयासीं । दावीत भावासीं दुजीयास ॥ ४ ॥
परी अपुल्याठायीं पहातां तयासीं । स्मित वदनासीं दावी जरा ॥ ५ ॥
अर्धमिलित डोळे स्मित विकसोन । वदन प्रसन्न दावितसे ॥ ६ ॥
वांकुडा पहातो डोळे मिचकीतो । विस्मय दावितो मुखावरी ॥ ७ ॥
सस्मित आनंद हळुच दावितो । आपण डोलतो माझ्यापरी ॥ ८ ॥
सुखाचा हा गाभा अमृतसागर । नयन-मनोहर चारु मूर्ति ॥ ९ ॥
पहातां पहातां स्मित आनंदाचें । पारणें नेत्रांचें फिटतसे ॥ १० ॥
किती मधुरता अमृत सांडतें । मति हे विरते स्मितामाजी ॥ ११ ॥
मधुरमंद हास्य वेडावूनी सोडी । उपाधितें तोडी जगताच्या ॥ १२ ॥
डुलावें नाचावें रंगोनियां जावें । घट्ट तें धरावें मधुरस्मित ॥ १३ ॥
आकण्ठ हे तृप्ति सर्व इंद्रियांसीं । येथील सुखासीं वर्णवेना ॥ १४ ॥

लाचावलें मन स्वरूपीं मोहून । अमृताचें पान तुच्छ वाटे ॥ १५ ॥
गेलों वेडावुनि भान विसरलों । दत्तरूप झालों पहातां पहातां ॥ १६ ॥
मायेचें विन्दान गेलें हारपून । भ्रम हा दारुण तिच्यायोगें ॥ १७ ॥
गूढ पाहतां दत्ता गूढसा वाटतो । कधीं न सांपडतो दुरी जातां ॥ १८ ॥
अंतरांत त्यासीं नित्य पाही योगी । शांतिसुख भोगी तोचि एक ॥ १९ ॥
विनायक म्हणे अनुभव खुण । बोलवी आपण दत्तात्रेय ॥ २० ॥

( ३ )

## दर्शनसुख

किती शांति माझ्या जीवा । पाहतां या दत्तदेवा ॥ १ ॥
किती जाऊं मी रंगून । ठेवीं ऐसा गुंगवून ॥ २ ॥
अनुपम किती सुख । पहातां हें तव मुख ॥ ३ ॥
ऐसाच राहा माझे पुढें । पाहूं तूतें वाडें कोडें ॥ ४ ॥
पुरवीं जीवाचें कोड । नको माझ्या मना मोड ॥ ५ ॥
सुखाचें हें लेणें मज । कोण सांडिल सहज ॥ ६ ॥
कोण ठेवी देहभान । कशाला तो अभिमान ॥ ७ ॥
सुवास तो वैजयंतीचा । मोहवीतो मज साचा ॥ ८ ॥
अमृताचें हें अमृत । शब्दसृष्टि न चलत ॥ ९ ॥
तृप्तिचीही तृप्ति असे । समाधान आकारलेंसें ॥ १० ॥
विनायक दत्त झाला । दत्ताठायीं तो विरला ॥ ११ ॥

( ४ )

## अहं दत्तोऽस्मि

गुरुवार ता. ४।७।१९२९

माझेवरी करी अमृत–सिंचन । माझा दयाघन दत्तनाथ ॥ १ ॥
त्याच्या सम तोच प्रेमाचा सागर । तोच करुणाकर एक जाण ॥ २ ॥

काय सांगूं त्याचें वात्सल्य मी वाचे । भरुनि येई साचें हृदय माझें ॥३॥
कण्ठ सद्गदित नयनिं बाष्प येत । अंग पुलकांकित होय माझें ॥ ४ ॥
काय देवा तुज म्हणुं आतां सांग । माझें अंतरंग भरलेंसें ॥ ५ ॥
मी तो काय माझा काय बडिवार । सांग गुरुवर मजलागीं ॥ ६ ॥
तुझा महिमा थोर तुलाच साजतो । तुज शोभा देतो परमाचि ॥ ७ ॥
धन्य तुझें नाम धन्य तूझी कीर्ति । त्रिभुवनपति तूंच धन्य ॥ ८ ॥
आनंदें डुलतों किती सुखावतों । एकरूपहोतों तुझे ठायीं ॥ ९ ॥
भरलासी माझ्या अंगिं दत्तदेवा । मज सौख्य ठेवा झाला सिद्ध ॥१०॥
जेवलों मी तृप्त झालों दत्तराया । अमृताची धाया मज येत ॥ ११ ॥
अमृताचें स्नान अमृताचें पान । अमृत भोजन मज झालें ॥ १२ ॥
आनंदाचा मद मजला माजवी । निजठायीं रमवी किती तरी ॥ १३ ॥
रसीं रस झालों बनलों रसरूप । झालों मीं निष्पाप निरहंकृति ॥ १४ ॥
मजजवळि तें न पाप आतां राहे । शुद्धताच पाहे मजपाशीं ॥ १५ ॥
मी तो पुण्याईचा असें कीं सागर । माझें भाग्य थोर त्रिभुवनीं ॥ १६ ॥
सकळांसीं पूज्य मज बनविलें । मज पूजार्ह केलें गुरुनाथें ॥ १७ ॥
मज धन्य केलें मज अनुग्रहीलें । माझे ठायीं केलें अधिवेशन ॥ १८ ॥
दत्तरूप सदा जगीं मी वर्तेन । मुक्त मी असेन अनिर्बंध ॥ १९ ॥
माझ्या दर्शनानें पातकी पुनीत । होतील निश्चित जाणावें कीं ॥ २० ॥
धन्यवाद माझा मीच गात असें । माझा बोलतसे गुरुनाथ ॥ २१ ॥
सकलांचे काम पुरविन समर्थ । सुलभ परमार्थ करीन मीं ॥ २२ ॥
परमार्थाची वाट दाविन जनांलागीं । तारीन मी अंगीं पतिताला ॥२३॥
माझें हें वैभव माझा हा प्रभाव । बोले दत्तदेव निजवाचे ॥ २४ ॥
विनायक बोले मीच दत्तात्रेय । जाणा निःसंशय शंका नाहीं ॥ २५ ॥

## ( ५ )

### गुरुवार ता. ११।७।२९

पातक कैसें माझें नाथा । तुझें नाम घेतां समर्था ॥ १ ॥
अग्नि न जाळी कापसाला । आज देखिलें नवलाला ॥ २ ॥
काजव्यानीं सूर्यालागीं । भक्षिलें वाटे आज जगीं ॥ ३ ॥

तुझें नाम अपयश । पावलें कीं जगदीश ॥ ४ ॥
टिटवीनें सागराला । केलें शुष्क वाटे मजला ॥ ५ ॥
तुझ्या नामाचें वैभव । धरी कैसें अस्तभाव ॥ ६ ॥
प्रभावशाली तुझें नाम । विजयाचें पूर्ण धाम ॥ ७ ॥
तेजोराशि जें परम । केवळ अमृताचें धाम ॥ ८ ॥
आज काय झालें त्यासीं । न कळे मम मनासीं ॥ ९ ॥
विनायक विनवीतो । चरणिं शिर हें ठेवितो ॥ १० ॥

( ६ )

## ईशप्रसाद लक्षणें

गुरुवार ता० १८।७।१९२९

प्रसादाचें असे लक्षण बरवें । आपुल्या वैभवें प्रकाशावें ॥ १ ॥
आपणाठायींच निमग्न असावें । आपण रमवावें सर्व कांहीं ॥ २ ॥
डुलत असावें आपणाठायींच । सकळ तृप्तिच उपभोगाया ॥ ३ ॥
आपणें आपणां पहात रहावें । एकरूप व्हावें पहातां पहातां ॥ ४ ॥
पहाणें पण पहाणें सकळ जगाचें । सकळ-दृष्टीचें पारणें कीं ॥ ५ ॥
मनामाजी मन मुरोनि रहात । सकळ प्रसादत वृत्ति त्याची ॥ ६ ॥
त्रिभुवनामाजी होय मिसळण । प्रसादाची खूण हीच जाणा ॥ ७ ॥
सुखदुःख तेणें मिळोनियां जातें । शांतीचें पडतें आवरण ॥ ८ ॥
त्रिविधतापाचें येथें नाम नाहीं । संतोषचि पाहीं अवघा तो ॥ ९ ॥
विनायक म्हणे मजसीं प्रसाद । करित वरद वासुदेव ॥ १० ॥

( ७ )

## स्वरूपवर्णन

गुरुवार ता० २५।७।१९२९

दंड कमंडलु शूळ करीं शोभे । चंद्राचे प्रतिभेसम मूर्ती ॥ १ ॥
सुहास्य-वदन सुधापूर्ण नेत्र । दर्शन परत्र गति-दाई ॥ २ ॥

मृदुल हे तनु किती सुमधुर । अमृताचें सार एकवटलें ॥ ३ ॥
मधुर हे कांति मधुर हें स्मित । तेज हें फांकत सौम्यतेचें ॥ ४ ॥
तेजाचा हा गाभा तेजेंचि बनला । आनंद तो मला देत किती ॥ ५ ॥
पिऊं काय खाऊं चाटुं हे सुमूर्ति । मनामाजी तृप्ति समायेना ॥ ६ ॥
सुकुमार किती नाजुक साजुक । मजसीं रूपक सुचेनाचि ॥ ७ ॥
आनंदाचा भर अजुनि माझ्या मना । पारणें नयना आज झालें ॥ ८ ॥
तोषलों बहुत तृप्ति मी पावलों । सुखानें जाहलों बेहोष कीं ॥ ९ ॥
विनायक म्हणे मति विकासली । कळी हे फुलली हृदयाची ॥ १० ॥

(८)

## दर्शनलालसा

गुरुवार ता० ८।८।२९

ये ये ये ये माझ्या स्वामी दत्तात्रेया । छंद मम हृदया लागलासे ॥ १ ॥
कधीं मी पाहिन सुंदर वदन । सुधावलोकन अनुभवीन ॥ २ ॥
सुकुमार काया कधीं आलिंगीन । दृष्टि भिडवीन त्वद्दृष्टीसीं ॥ ३ ॥
तुझे वक्षस्थळीं ठेविन मी गाल । बाळ लडिवाळ शोभेन मी ॥ ४ ॥
निजकरीं तुझा कर मी धरीन । तयासीं खेळेन आवडीनें ॥ ५ ॥
कधीं माझी आळी हेतु पुरवीसी । मज जवळि येसी कधीं देवा ॥ ६ ॥
कधीं मजसवें हांससी खेळसी । गुज तूं बोलसी कधीं सांग ॥ ७ ॥
लहानासम सांग कधीं तूं बनसी । मजसवें क्रीडसी कधीं सांग ॥ ८ ॥
उतावीळ झालों तुजसि भेटाया । वाट दत्तात्रेया किती पाहूं ॥ ९ ॥
नटवा मज म्हण कांहीं मज म्हण । तूं प्रगटपण येथें धर ॥ १० ॥
माझे साठीं येईं लेंकुरा जशी आई । मज झाली घाई किती सांगूं ॥ ११ ॥

(९)

## क्रीडन लालसा

प्रेमरंग खेळूं या कीं । मज देवा भेट दे कीं ॥ १ ॥
तुज बाळ मुकुंदाला । बोलावितों खेळायाला ॥ २ ॥

हमामा हुंबरु घालूं । मातीमध्यें प्रेमें लोळूं ॥ ३ ॥
एकमेकां कुस्ती घेऊं । नदीतीरालागीं जाऊं ॥ ४ ॥
जलावगाहनातें करूं । वाळू माजी देह भरूं ॥ ५ ॥
चढूं या कीं वृक्षावरी । झोंके घेऊं फांदीवरी ॥ ६ ॥
प्रेमें मुखें ओंव्या गाऊं । आंगालागीं आंग लावूं ॥ ७ ॥
स्वातंत्र्येंसीं खेळूं रमूं । आनंद हा अनुपमुं ॥ ८ ॥
विनायका खेळगडी । तूंच प्रेमाचा सोंगडी ॥ ९ ॥

( १० )

# दत्तदासांची श्रीमंती

गुरुवार ता. १५।८।१९२९

आम्हीं तृप्त सदा दत्तजीचे दास । पुरविली आस दत्तदेवें ॥ १ ॥
आशेचा हा गांव ओस असे झाला । आमुच्या दृष्टीला भेद नाहीं ॥२॥
राव रंक सम एकचि स्वरूप । सर्व मायबाप दत्तात्रेय ॥ ३ ॥
मिळायाचें सर्व मजला मिळालें । नाहींच उरलें आतां कांहीं ॥ ४ ॥
तृप्तिचे ढेंकर वाचेचे उच्चार । बोलती अंतर जैसें माझें ॥ ५ ॥
आमुचिया भाग्या सीमा नसे जगीं । आमुची सलगी दत्तात्रेया ॥ ६ ॥
ब्रह्माण्ड हें झालें आम्हां दत्तात्रेय । होय आम्हां सोय दत्तात्रेय ॥ ७ ॥
जिकडे पहावें तिकडे आनंद । वासुदेवानंद गुरुनाथ ॥ ८ ॥
जन्मोजन्मींचा तो सखा हो आमुचा । अनुबंध त्याचा सदा आम्हां ॥९॥
अशनीं शयनीं आमुचा सोंगडी । सखा एक गडी आमुचा तो ॥ १० ॥
स्मरण करितां प्रगटे गुरुदत्त । वेष अवधूत दिगंबर ॥ ११ ॥
कृपारूपी मूर्ति दयेची कीं मूस । स्रवत कृपेस आम्हांवरी ॥ १२ ॥
महानद जणुं दयेचा नटला । सुकाळ आम्हांला दयेचा कीं ॥ १३ ॥
आतां काय उणें आम्हां लाडक्यांसीं । प्रभुचे दासांसीं जगीं सांगा ॥१४॥
आम्हीं प्रिय त्याला जैसे त्याचे प्राण । आम्हां काय वाण उरे मग ॥१५॥
प्राणांहुनी प्रिय अधिक तो मानी । ये लगबगोनी आम्हांसाठीं ॥ १६ ॥

किती कळवळा आमुचा तयासीं । काय वचनासीं बोलावें म्यां ॥१७॥
भारियेलें मज तया दत्तदेवें । त्याच्या वैभवें शोभलों मी ॥ १८ ॥
विनायक म्हणे आशा माझी पूर्ण । केली नारायण प्रेमानें त्वां ॥ १९ ॥

( ११ )

## दत्तभक्ताची स्थिति

शांतिसुखें अनुभवी । प्रीति ज्याची दत्तदेवीं ॥ १ ॥
निर्विकार मन होय । वृत्ति त्याची पावे लय ॥ २ ॥
आपणाठायींच रमे । भूक तहान त्याची शमे ॥ ३ ॥
न जेवितां जेविला । उपभोगित तृप्तिला ॥ ४ ॥
सकळ लाभत्यासीं झाले । मिळायाचें नाहीं उरलें ॥ ५ ॥
अंकुर सारे मावळले । प्रत्यय विरोनियां गेले ॥ ६ ॥
दत्तात्मक विश्व झालें । दत्तरूप प्रगटलें ॥ ७ ॥
आनंदासीं सीमा नाहीं । निवृत्त होई लवलाहीं ॥ ८ ॥
विनायक म्हणे कृपा । थोर केली मायबापा ॥ ९ ॥

( १२ )

## वासुदेव-चरित्र-सार

गुरुवार ता० २२।८।२९

वैराग्याचा निधि स्वामि वासुदेव । आला दत्तदेव प्रत्यक्ष तो ॥ १ ॥
आम्हां उद्धाराया मार्गासीं लावाया। धर्म संस्थापाया जगीं आला ॥२॥
कलियुगीं थोर अधर्म प्रवृत्ति । कराया निवृत्ति आला असे ॥ ३ ॥
आम्हांसाठीं तेणें घोर तप केलें । देहा कष्टाविलें आपुलीया ॥ ४ ॥
सदा पायीं चाले वाहन न सेवी । नासाग्र दृष्टि ठेवी यतीश्वर ॥ ५ ॥
नाहीं केला कांहीं संसार जगतीं । बनला तो यति संन्यासी कीं ॥ ६ ॥
धर्मदंड हातीं मुखीं असे श्रुति । श्रवणीं असे स्तुति दत्ताचीच ॥ ७ ॥

नयनांत मूर्ति अत्रितनयाची । स्थिति हृदयाची विनिर्मुक्त ॥ ८ ॥
विद्येचा सागर करुणेचें घर । सदा सर्वेश्वर स्वरूपांत ॥ ९ ॥
हास्य असे मुखीं भाव त्या कृपेचा । ठेवा आनंदाचा जणुं जाणा ॥१०॥
टेंबे कुळीचीही श्रीमंत संतति । ब्राह्मणाची द्युति मूर्त जाणा ॥ ११ ॥
आश्रमाचें स्थान व्रताचा विश्राम । पुण्याईचें धाम जगद्गुरु ॥ १२ ॥
पूर्णमुक्त जाणा प्रभूत्तम माधव । विरक्ति वैभव अनुपम ॥ १३ ॥
सूर्यासम तेज अग्निसम कांति । सकळ जणुं दीप्ति एकवटली ॥ १४ ॥
सत्यमूर्ति जाणा केवळ ज्ञानरूप । जैसीं आईबाप दयावंत ॥ १५ ॥
कोण वानी यश तया सद्गुरुचें । कोणाच्या कीं वाचे बळ असे ॥ १६ ॥
विनायक झाला तल्लीन चरणीं । स्वामी मोक्षदानी वासुदेव ॥ १७ ॥

( १३ )

## वासुदेवाचा धांवा

वासुदेवा येईं येईं । माझी अससि तूं आई ॥ १ ॥
करीं कृपेची पाखर । बोधामृतीं सोडीं धार ॥ २ ॥
तृप्त करीं मज पाजोनी । बोधसुधा तूं येवोनीं ॥ ३ ॥
मजवरि करीं साउली । कृपेची तूं आई भली ॥ ४ ॥
निजअंकीं मज घेईं । झांकीं मजलागीं आई ॥ ५ ॥
बोधामृत धार आतां । श्रवणीं सोड भगवंता ॥ ६ ॥
प्रबुद्ध करीं मजलागीं । येईं आतां लगबगीं ॥ ७ ॥
जन्म दिन तुझा पातला । उत्सवाचा असे भला ॥ ८ ॥
धरीतों मी तुझे पाय । कृपावंत होईं माय ॥ ९ ॥
जन्मादिन तुझा पातला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १० ॥
म्हणुनि आतां प्रगटावें । मजठायीं संचरावें ॥ ११ ॥
चित्त माझें आनंदावें । तुझ्या ठायीं रमवावें ॥ १२ ॥
असें करीं माझे आई । वासुदेव गुरुमाई ॥ १३ ॥
विनायक तुझा बाळ । परम असे लडिवाळ ॥ १४ ॥

## ( १४ )

# श्राद्धविधि

गुरुवार ता० १९।९।१९२९

पितर तूं जाण सर्व जगताचा । विस्तार वंशाचा करिसी तूं ॥ १ ॥
श्रद्धा धरोनियां यजन करितां । तुज समर्पितां भक्तीभाव ॥ २ ॥
पितृस्वरूपी तूं जनार्दन देव । धरिसी तृप्तभाव श्रद्धेनेंच ॥ ३ ॥
आईबाप आजा पणजा निश्चिती । सपिंड जगतीं तूंच सारा ॥ ४ ॥
सकळ सृष्टीचा पालक पोषक । वंश विस्तारक तूंच एक ॥ ५ ॥
तूंच अन्नदाता तूंच विभवदाता । सकळांचा दाता तूंच एक ॥ ६ ॥
अंतरिक्ष स्वर्ग भूमीसी राहसी । इच्छित पुरवीसी तूंच नाथा ॥ ७ ॥
तुझ्या कृपें सर्व अभ्युदय होय । सिद्धीलागीं जाय मनोरथ ॥ ८ ॥
म्हणुनि श्रद्धेनें श्राद्ध समर्पितां । अन्नाचा करितां त्याग श्राद्धीं ॥ ९ ॥
ब्राह्मणांसीं प्रिय भोजन घालितां । सुवर्णातें देतां विप्रांलागीं ॥ १० ॥
पूजन ब्राह्मणांचें प्रिय श्रीविष्णुला। करितां श्राद्धाला ऐशा योगें ॥११॥
आदित्य वसु रुद्र पितर तृप्त होती । तेणें परम तृप्ति जनार्दना ॥ १२ ॥
वेदवेत्ता द्विज देवता निश्चिती । तीर्थें पायांप्रति सर्व त्याच्या ॥ १३ ॥
देवतमाय भला श्राद्धीय ब्राह्मण । धरावे चरण श्राद्धीं त्याचे ॥ १४ ॥
ऐसें श्रद्धायुक्त श्राद्ध समर्पितां । तोष भगवंता थोर होई ॥ १५ ॥
अपराण्हकाळ येथें पितरांचा । मध्यान्हीसीं साचा सूर्य येतां ॥ १६ ॥
पूजोनि ब्राह्मणां भोजन घालावें । सुग्रास अन्न द्यावें विप्रांलागीं ॥१७॥
पितर तृप्त होती आशीर्वाद देती । वाढत संतती थोर त्यांची ॥ १८ ॥
निजांगें रक्षिती भगवान त्यांसीं । जेका ब्राह्मणांसीं अन्न देती ॥ १९ ॥
दक्षणेनें युक्त घृत पायसाचें । भोजन घालीं साचें ब्राह्मणांसीं ॥ २० ॥
क्षीर घृत मधु ब्राह्मणां वाढितां । पूजोनी तत्वतां आदरानें ॥ २१ ॥
श्राद्ध पूर्ण होतां संतुष्टत देव । कल्याणाचा भाव प्राप्त होय ॥ २२ ॥
तोय जरी दिलें श्रद्धेनें श्राद्धांत । तरी तृप्त होत जनार्दन ॥ २३ ॥
बाप आजा आणि तसा तो पणजा । करूनियां गाजा बोलवावें ॥२४॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

पितृनामाचा कीं उच्चार करावा । श्रद्धायुक्त असावा श्राद्धकर्ता ॥ २५॥
अग्नौकरण करितां पिंड समर्पीतां । पितर तृप्तता पावताती ॥ २६ ॥
कृतज्ञतेसाठीं श्राद्ध सांगितलें । पाहिजे आचरिलें गृहस्थानें ॥ २७ ॥
विनायक म्हणे दत्तभक्ती कर । तृप्त होती पितर भजनानें ॥ २८ ॥

## ( १५ )

# उत्तरगति

गुरुवार ता. २६।९।१९२९

देह प्रेत होतां पुढें काय होत । जीव कोठें जात कोठें राहत ॥ १ ॥
कोणत्या लोकांत गमन करितो । किंवा काय पाहतो भलतेंच ॥ २ ॥
याचाच विचार करणें असे आज । पितृपक्ष काज जाणावें कीं ॥ ३ ॥
महालय श्राद्ध दिन पितरांचे । काव्य काय त्यांचें वदावें कीं ॥ ४ ॥
पितृस्वरुपी हा असे जनार्दन । तयासीं नमन करावें कीं ॥ ५ ॥
पितृलोक कोठें वसतसे जाणा । विचार अंतःकरणा यावा हाच ॥ ६ ॥
पितर म्हणोनियां काय सृष्टि आहे । कोणता जीव पावे पितृपद ॥ ७ ॥
पितृलोक कोणा जीवास मिळतो । स्वर्गाप्रति जातो कोण जीव ॥ ८ ॥
कोण ब्रह्मलोकीं स्थितीतें पावती । कोण मोक्षा जाती विचारावें ॥ ९ ॥
लोकाचा विचार देहाचा विचार । विहार-विचार करावा कीं ॥ १० ॥
कोण देवयान कोण अनुष्ठान । सकळ वर्तन विचारावें ॥ ११ ॥
पितरांचें श्राद्ध कर्तव्य कां असे । पितृपक्ष वसे कोणे ठायीं ॥ १२ ॥
श्राद्धीं अन्नत्याग कोणास पावतो । कोण तृप्त होतो पिंड देतां ॥ १३ ॥
बाप आजा आणि तैसा तो पणजा । त्यांचे नांवें गाजा करायाचा ॥१४॥
काय त्यांस अन्न श्राद्धीय लाभत । कैसें काय होत विचारावें ॥ १५ ॥
व्याघ्रादिक योनी जयां प्राप्त होती । कैसें ते पावती श्राद्धान्नाला ॥१६॥
पितृलोकीं वस्ती सकळांची काय । अन्य जग होय किंवा नाहीं ॥१७॥
अन्य देहप्राप्ती जरी तयां होय । मग कोठें जाय श्राद्धान्न तें ॥ १८ ॥
महत्त्व तें काय असे श्राद्धालागीं । विचार अतरंगीं करायाचा ॥ १९ ॥
सकळ विचार करणें सांगोपांग । श्रद्धेचें तें अंग जाणावें कीं ॥ २० ॥

म्हणोनि श्रद्धेनेंच श्राद्धातें करावें । ब्राह्मणांतें घालावें प्रिय अन्न ॥२१॥
जें जें कांहीं प्रिय आपणातें जाणा। तें तें तुम्हीं ब्राह्मणां घालावें कीं॥२२॥
ब्राह्मणांचे मुखें पितर तृप्त होती । ग्रास जे का घेती मुखीं द्विज ॥२३॥
तया ग्रासमात्रें पितरांची तृप्ति । श्राद्धाची पद्धती ऐसी असे ॥ २४ ॥
तोंच कीं विचार करणें आम्हां आज। पितृश्राद्ध काज श्रद्धेलागीं॥२५॥
विनायक म्हणे श्राद्ध पितरांचें । हेतु अभ्युदयाचें जाणावे कीं ॥ २६ ॥

( १६ )

## उत्तरगति

गुरुवार ता. ३।१०।१९२९

देह त्यागितां जें पुढील गमन । तयाचें चिंतन करावें कीं ॥ १ ॥
शास्त्र काय सांगे श्रुति काय बोले । मनामाजी भलें विचारावें ॥ २ ॥
प्रेतरूप होतां जीवाचे सांगाती । कोण ते निश्चिती शोधावे कीं ॥ ३ ॥
काय घेउनियां जीव हा निघतो । गमन करीतो कोण स्थानीं ॥ ४ ॥
पाथेय काय त्याचें कोण त्याचा वेष । विचार विशेष करावा कीं ॥५॥
आपुलें कर्तव्य देहांत वसतां । काय तें तत्वतां चिंतावें कीं ॥ ६ ॥
सुकरगमन पुढें कैसें होय । काय रूप होय प्राप्त जीवा ॥ ७ ॥
पुण्यपापासम होय जीवा गति । तेथील ते स्थिती जाणावी कीं ॥ ८ ॥
सुटतां मर्त्य लोक पुढें कोण लोक । याचाच आलोक करावा कीं॥ ९ ॥
पुढील जाणोनि तैसेंच वर्तन । रहावें करून नियमानें ॥ १० ॥
याही जन्मीं होय थोर तो प्रमोद । पुढेंही आनंद भरलासे ॥ ११ ॥
मनुष्य गंधर्व आणि देवगंधर्व । पितरांचा ठाव जाणावा कीं ॥ १२ ॥
आजान देव तैसे पुढें कर्मदेव । स्वर्गींचे ते देव पुढें जाणा ॥ १३ ॥
तयांचा तो पति जाणा इंद्रदेव । तया श्रेष्ठभाव जाणावा कीं ॥ १४ ॥
तेहतीस कोटी देव त्यांचा स्वर्ग लोक। इंद्र तो पालक स्वामि त्यांचा१५
बृहस्पतीदेव प्रजापती देव। हिरण्यगर्भ भाव येथेंच कीं ॥ १६ ॥
ब्रह्मभाव जधिं तधीं परमानंद । इतर आनंद क्षुद्र जाणा ॥ १७ ॥
आनंदाची सीमा तेशी पराकाष्ठा । लाभत ब्रह्मिष्ठा ब्रह्मभावें ॥ १८ ॥

इतरांसी होय पुनरागमन । फलातें भोगून परलोकीं ॥ १९ ॥
द्युआकाश धरा पुरुष आणि नारी । अग्निच हे तरी पांच जाणा ॥ २० ॥
श्रद्धा सोम वृष्टी अन्न आणि रेत । हवन घडत आहुतींचें ॥ २१ ॥
पांच आहुती या पांच अग्निमाजी । हवनें होती गाजी पुरुषरूप ॥ २२ ॥
ऐसा जन्म आहे मानवाचा जाणा । संसार तरणा नौकारूप ॥ २३ ॥
म्हणोनियां कांहीं हित आचरावें । पुण्यातें करावें सदाकाळ ॥ २४ ॥
पुण्याईच्या योगें सुष्टु लोक प्राप्ती । पाप्यां अधोगति प्राप्त होय ॥ २५ ॥
पापाचीया योगें संयमन-पुर । पावतसे नर पापात्मा जो ॥ २६ ॥
बहु कष्ट भोगी नरकांत पात । पाप्यालागीं होत प्राप्त जाणा ॥ २७ ॥
तेथुनी मग त्यासीं मर्त्यलोकांतरीं । ढकलुनि तरी देती जाणा ॥ २८ ॥
कृमिकीटकांचा जन्म तया होय । पापानें अपाय सर्वस्वासीं ॥ २९ ॥
याचसाठीं जोडा पुण्य स्वल्प तरी । मग देहांतरीं गति होय ॥ ३१ ॥
जोंवरी अज्ञान तोंवरी न मोक्ष । तरी पुण्यपक्ष जोडावा कीं ॥ ३१ ॥
पुण्याचिया योगें चित्तशुद्धी होय । हाच सदुपाय आचरावा ॥ ३२ ॥
तेणें ज्ञान होय मग ब्रह्मभाव । नसे पुनर्भव मग त्यासीं ॥ ३३ ॥
ब्रह्मप्रतिष्ठेतें पावतसे नर । चुके येरझार ज्ञान होतां ॥ ३४ ॥
म्हणोनि क्षणोक्षणीं विचार करावा । सन्मार्ग धरावा शास्त्रशुद्ध ॥ ३५ ॥
शास्त्रविहित कर्मे शुभ आचरावीं । ईश्वरीं ठेवावी निजमति ॥ ३६ ॥
भजन पूजन करावें देवाचें । अखंड नाम वाचे वदावें कीं ॥ ३७ ॥
ईशभजनानें सर्व सिद्धि होय । सेवा गुरुपाय निष्ठा पूर्ण ॥ ३८ ॥
ईश्वरकृपेनें तराल सागर । भव हा दुस्तर पार होय ॥ ३९ ॥
विनायक म्हणे भजनीं सादर । व्हावें निरंतर हाच मार्ग ॥ ४० ॥

( १७ )

# कोजागरी.

गुरुवार ता० १७।१०।१९२९

कौमुदी हे आज पौर्णिमा लक्ष्मीची । आज्ञा हे शास्त्राची क्रीडा करा ॥ १ ॥

घेवोनीयां फांसे आजचीये रातीं । क्रीडतां ये गति आनंदाची ॥ २ ॥
अंगासि उटणीं लावोनि सुगंधी । वस्त्रें परमानंदीं लेवावीं कीं ॥ ३ ॥
अक्षक्रीडेलागीं करिल त्या नरा । लक्ष्मी शुभवरा देत असे ॥ ४ ॥
वित्तं प्रयच्छामि अक्ष क्रीडणाऱ्या । रात्रीं जागणाऱ्या नरालागीं ॥५॥
निशीथ कालीं वरदा लक्ष्मी बघत । भूवर जागत कोण असे ॥ ६ ॥
देईन धन त्यासीं करीन समर्थ । पुरवीन अर्थ सकळ त्याचे ॥ ७ ॥
अंभृण ऋषीची दुहिता हे ज्ञानी । संचरे त्रिभुवनीं विमुक्त जी ॥ ८ ॥
समुद्रांतूनी येत क्रीडत बाहेरी । बोलत वैखरी अनुपम ॥ ९ ॥
रुद्रवसु आदित्य यांसह चरामि । सकळ धारयामि माझे ठायीं ॥१०॥
इंद्राग्निवरुण आश्विनौ ते देव । सर्व माझा भाव जाणत कीं ॥ ११ ॥
सकळ जग मजठायीं हें जाणावें । ब्रह्मरूप पहावें सदा मज ॥ १२ ॥
उत्तम हवनीं तैशा सोमरसें । यज्ञ यजीतसे यजमान ॥ १३ ॥
त्याची फलदात्री मजला जाणावी । मजला गणावी याज्याहुती ॥१४॥
यज्ञ देवांमध्यें मींच श्रेष्ठ असें । विश्व पूजीतसे मजलागीं ॥ १५ ॥
जें जें कांहीं देव कर्म आचारिती । कर्तृत्व निश्चिती माझें सारें ॥ १६ ॥
माझे मनीं काम भक्तांसीं रक्षावें । कर्तृत्व ऐकावें माझें तेव्हां ॥ १७ ॥
सामर्थ्यवान त्यांसीं तेव्हां मीं करितें । नित्य संरक्षितें प्रियदासां ॥१८॥
ब्रह्मदेव त्यांसीं करोनि ठेवितें । सकळ त्यांसि देतें सामर्थ्याला ॥ १९ ॥
विष्णु शिव ब्रह्मा सकळ करितें । तयां बैसवीतें ब्रह्मपदीं ॥ २० ॥
माझें महात्म्य हें जो नर न जाणे । त्याची हानि होणें सर्वस्वाची ॥२१॥
म्हणोनियां मीच मुखें हें सांगतें । ब्रह्मज्ञान कथितें तुम्हांलागीं ॥ २२ ॥
श्रद्धेनें हें तुम्हीं ब्रह्म परिसावें । तेणें धन्य व्हावें म्हणे देवी ॥ २३ ॥
स्वतंत्र मी देवी विश्वाचें कारण । करीत निर्माण त्रैलोक्यासीं ॥ २४ ॥
असंग मी आहें तटस्थ मी आहें । चैतन्य रूप आहे मजलागीं ॥२५॥
सकळ करोनी उदासीन आहें । ज्ञान कथिताहें ऐसें जाणा ॥ २६ ॥
विनायक म्हणे संतुष्टेल रमा । सेवितां परमा वरदा जी ॥ २७ ॥

## ( १८ )

# योग्याचीं लक्षणें

गुरुवार ता. २४।१०।१९२९

समाहित चित्त तोचि जाणा योगी । शोभतो वैरागी संसारीं तो ॥ १ ॥
असुनी प्रापंचीं विरक्ति तो भोगी । शान्ती अंतरंगीं खुलावत ॥ २ ॥
निजस्वरूपांत लीन चित्तवृत्ति । आनंद-संपत्ति निर्भर ती ॥ ३ ॥
चित्तवृत्ति स्थिर स्तब्ध तें स्फुरण । सत्व आवरण तयावरी ॥ ४ ॥
रजस्तमोवृत्ति निःशेष हरती । वृत्ति प्रकाशती सत्वरूपीं ॥ ५ ॥
शुभ्रस्फटिकमय चित्त हें होतसे । ब्रह्म प्रकाशतसे तयालागीं ॥ ६ ॥
परब्रह्मरूप चित्त त्याचें होय । होतां वृत्तिलय परात्परीं ॥ ७ ॥
मनःसमाधान हेंच कीं कैवल्य । वैराग्य जाज्वल्य विकासतें ॥ ८ ॥
हरीचिया भक्ता योग हा साधत । जीवन्मुक्त होत हरिदास ॥ ९ ॥
विनायक म्हणे साधन परम । भक्ति अनुपम दत्तजीची ॥ १० ॥

## ( १९ )

# नरकासुर वध

गुरुवार ता. ३१।१०।१९२९

ऐरावतस्थित इन्द्र कृष्णापाशीं । आपुल्या दुःखासीं निवेदित ॥ १ ॥
प्राग्जोतिष पुरीं भौमासुर थोर । मत्त दैत्यवर जाहलासे ॥ २ ॥
आक्रमिली भूमि आक्रमिलें स्वर्गा । थोर उपसर्गा देत आम्हां ॥ ३ ॥
विश्वकर्म्याची जे प्रेयसी दुहिता । बलात्कारें हर्ता तिचा होई ॥ ४ ॥
बलात्कारें भोगी दुर्वृत्त दानव । त्रिलोकीं वैभव विस्तारिलें ॥ ५ ॥
किती दिव्य कन्या तैशा मानुषीही । ठेवी कारागृहीं किती नारी ॥ ६ ॥
अवतार तुझा दैत्यांसीं माराया । भूभार हराया कृष्णनाथा ॥ ७ ॥
आम्हां सोडवाया तरी धांव घेईं । करुणापूर्ण होईं आम्हांवरी ॥ ८ ॥

कुंडलें आदितीचीं तेणें पळविलीं । थोर हानि केली असे नाथा ॥ ९ ॥
मणि-पर्वतासीं हरोनि ठेविलें । संकट ओढवलें देवांलागीं ॥ १० ॥
ऐसें विनवितां श्रीकृष्ण उठिले । इंद्रा आश्वासिलें प्रेमभरें ॥ ११ ॥
मारीतों असुर निर्भय असावें । स्वर्गाप्रती जावें इंद्रा म्हणे ॥ १२ ॥
ध्याईत गरुडा तंव तो सिद्ध असे । हात जोडितसे देवापुढें ॥ १३ ॥
काय आज्ञा ऐसें म्हणतां कृष्णनाथ । आरूढे समर्थ तयावरी ॥ १४ ॥
तंव सत्यभामा लाडकी भामिनी । पदर धरोनी हट्ट धरी ॥ १५ ॥
सवें तीस घेत गरुडवाहन । क्षणांत गगन गांठीयेलें ॥ १६ ॥
येतां पुरापाशीं मरु दैत्य थोर । महा धुरंधर प्रतिकारी ॥ १७ ॥
पाश्यास्त्र शस्त्रांनीं रक्षितसे वीर । तयिं यदुवीर झगटला ॥ १८ ॥
सुदर्शन चक्रें शस्त्रें शमविलीं । दैत्यें निवटिलीं असंख्यातें ॥ १९ ॥
मरु आदिसर्व दैत्य संहारिले । नरका गांठिलें कृष्णनाथें ॥ २० ॥
घनघोर युद्ध तयापाशीं केलें । असुर तोडिले कृष्णनाथें ॥ २१ ॥
तयाचे तुकडे करी देवराव । हर्षताती देव स्वर्गामाजीं ॥ २२ ॥
तंव वसुंधरा तेथ प्रगटली । कुंडलें दिधलीं आणवोनी ॥ २३ ॥
वाराहावतारीं तुझिया स्पर्शानें । गर्भ जो धारणें प्राप्त झाला ॥ २४ ॥
तुझाच हा सुत तुवां मारियेला । भूभार हरीला कृष्णनाथा ॥ २५ ॥
कृष्णचतुर्दशी कार्तिक महिना । असुर हनना केलें देवा ॥ २६ ॥
अरुणोदयासिं मारिला असुर । तया देत वर कृष्णनाथ ॥ २७ ॥
नीरांजन तेव्हां भव्य प्रज्वाळीलें । अभ्यंग घातलें कृष्णालागीं ॥ २८ ॥
तेव्हां पासोनियां तैलाभ्यंग स्नान । करिताती जन सौभाग्यार्थ ॥ २९ ॥
लक्ष्मी प्राप्त होत वैभव बहुत । अलक्ष्मी नासत अभ्यंगानें ॥ ३० ॥
अमावास्या दिनीं प्रदोष पूजन । सौभाग्यवर्धन लक्ष्मीप्रिय ॥ ३१ ॥
अपमृत्युजाय यम न बाधत । दीप प्रज्वाळीत करावे ते ॥ ३२ ॥
आनंद उत्सव क्रीडन करावें । जीवा रमवावें परोपरी ॥ ३३ ॥
विनायक म्हणे सण दीपावली । कृष्ण वनमाली ध्यावा सदा ॥ ३४ ॥

( २० )

## योगश्चित्तवृत्तिनिरोधः

गुरुवार ता. ७।११।१९२९

आवरावी सदा ऊर्मि हृदयाची । घडी दक्षतेची ठेवावी ती ॥ १ ॥
सैरावैरा मन जाऊं नच द्यावें । नित्य तें ठेवावें दृढत्वानें ॥ २ ॥
अंतःकरणाची वृत्ति न उठावी । दृढता असावी निश्चयाची ॥ ३ ॥
शपथ जेविं आम्हीं घेवोनि वागतों । कधीं न मोडीतों प्राण गेल्या ॥४॥
तैशी येथें घ्यावी शपथ निश्चयीं । दृढता हृदयीं असावी ती ॥ ५ ॥
स्पंदन हृदयाचें प्रत्यय बुद्धिचे । स्तब्धतेनें साचे शोभवावे ॥ ६ ॥
घट्टमनें असा नित्य या अभ्यासीं । भजतां देवासीं चळूं नका ॥ ७ ॥
देह दुःख कांहीं मुळिं न मानावें । वेगळें रहावें देहातुनीं ॥ ८ ॥
इंद्रियें मारावीं मनही मारावें । दृढ ठाणें द्यावें अंतरांत ॥ ९ ॥
मारावें देहासीं प्रेतरूप व्हावें । देवीं मिसळावें ऐक्यरूपें ॥ १० ॥

( २१ )

## स्वरूपवर्णन

सुहास्य वदन चतुर्भुज देव । सदा कृपाभाव दृष्टीमधीं ॥ १ ॥
अमृत स्रवतो कृपेचे दृष्टीनें । कृपेचेंच लेणें सदा त्याचें ॥ २ ॥
पीतांबरधारी वनमाळा गळां । वैजयंती माळा शोभा देत ॥ ३ ॥
किती कोमल हा किती हा सुखाचा । निधी अमृताचा सुधामय ॥ ४॥
सुधाच केवळ मूर्तत्वें नटली । देवकाया भली तैशी वाटे ॥ ५ ॥
मधुर पाहणें मधुर हांसणें । मधुर क्रीडणें दत्तजीचें ॥ ६ ॥

## (२२)

## ' सदा वस देवा ठायीं '

सदा वस देवाठायीं । प्रेम ठेव त्याचे पायीं ॥ १ ॥
भजनाची धरीं कांस । आवरीं अपुली आस ॥ २ ॥
स्वरूपांत मग्न होई । परततां उडी घेई ॥ ३ ॥
गंगाजलाचें हें स्नान । किंवा अमृताचें पान ॥ ४ ॥
किंवा जोत्स्नामय होणें । तैशा वृत्तीस ठेवणें ॥ ५ ॥
येथें संकल्प फळती । सर्व काम पूर्ण होती ॥ ६ ॥
पूर्ण होतसे आशा ती । तैशी जाण प्रतीक्षा ती ॥ ७ ॥
परम होय समाधान । मन जातसे बुडोन ॥ ८ ॥
आनंदी आनंद । जगीं येत पूर्णानंद ॥ ९ ॥

## (२३)

## योगाभ्यास.

नित्य आनंदाचा साधावा हा योग । ध्यावा रमारंग हृदयांत ॥ १ ॥
सुंदर ती मूर्ति नेत्र मनोहर । हृदयांत स्थिर करावी ती ॥ २ ॥
जाऊं न द्यावें मन मुळींच बाहेरी । चरणां माझारीं ठेवीं सदा ॥ ३ ॥
मृदुल चरणें निजशिरीं घेई । समरस होई तयांमधीं ॥ ४ ॥
हृदयकमळीं ध्याईं तूं तीं भलीं । जडवावी भली चित्तवृत्ति ॥ ५ ॥
जैशी घोरपड तटा चिकटत । कधीं न सुटत कांहीं केल्या ॥ ६ ॥
तैशी चित्तवृत्ति जडवी हरीपायीं । दृढ ती उपायीं करीं नित्य ॥ ७ ॥
विनायक म्हणे हाच योगाभ्यास । धरा निरोधास वृत्तिमाजीं ॥ ८ ॥

## ( २४ )

# योगाभ्यास

पान भोजन हें जाणा अमृताचें । गुणवाद साचे देवाजीचे ॥ १ ॥
देवाचें स्वरूप देवाचें सुयश । सदा अहर्निश ठेवीं मनीं ॥ २ ॥
अन्य सर्व लाभ तूज नावडावे । देवातें स्मरावें जीवें भावें ॥ ३ ॥
देवासीं बोलावें देवासीं सांगावें । देवासीं पूजावें सर्वकाळ ॥ ४ ॥
अशन शयन सदा देवापाशीं । गुज देवापाशीं असावें कीं ॥ ५ ॥
देवापाशीं गोष्टी हांसणें खेळणें । आनंदें नाचणें देवापाशीं ॥ ६ ॥
लोळणें देवावरी देवासीं हुंगणें । देवासीं सांगणें सर्वकांहीं ॥ ७ ॥
देवा बिलगणें देवा न सोडणें । वांकुल्या दावणें देवालागीं ॥ ८ ॥
विनायक म्हणे योग सलगीचा । नित्य असे साचा ऐसाच कीं ॥ ९ ॥

## ( २५ )

# विष्णुप्रबोध

गुरुवार ता० १४।११।१९२९

जागें व्हावें आतां श्रीगुरुमाधवा । निजमुख दावा आम्हांलागीं ॥ १ ॥
आम्ही दर्शनासीं बहुत उत्सुक । त्रैलोक्य पालक दावा मुख ॥ २ ॥
प्रबोधोत्सव मंगल पातला । आनंद सर्वांला थोर झाला ॥ ३ ॥
नियमव्रतादिकें भक्तांनीं मांडिलीं । आतां पूर्ण केलीं पाहिजेत ॥ ४ ॥
चातुर्मासाचा हा शेवट लाभला । पुण्याईनें भला आम्हांलागीं ॥ ५ ॥
तरी कृतकृत्य आम्हांसीं करावें । कृपेनें पहावें आम्हांकडे ॥ ६ ॥
लक्ष्मीचे पति वैकुंठींचे राजे । वात्सल्यत्वें गाजे कीर्ति साची ॥ ७ ॥
शेषासीं शयन वास सागरासीं । आनंद वसनेसीं झळकत ॥ ८ ॥
पदतळीं रमा नाभींतूनी ब्रह्मा । प्रभा बहु श्यामा आनंदाची ॥ ९ ॥
घनःश्याम प्रभु तेजोधाम पूर्ण । कुंडलांनीं कर्ण शोभताती ॥ १० ॥

मुकुट शिरीं शोभे कंठीं वनमाळा । वैजयंती गळां शोभा देत ॥ ११ ॥
तडित् तें झालें वसन देवाचें । वैभव मी वाचे काय बोलूं ॥ १२ ॥
कुटाळ जगाचा नारद प्रसिद्ध । सदा असे सिद्ध यश गाया ॥ १३ ॥
मूर्तिमंत जो कां चढेल विख्यात । चढेलांसीं देत उपमा ज्याची ॥१४॥
वाहन तो तुझा सेवेसीं सादर । वाही स्कंधावर तूजलागीं ॥ १५ ॥
दर्पाची जे मूर्ति मूर्त अहंकार । जयाचा फूत्कार जग जाणे ॥ १६ ॥
सहस्रफणी झाला देवाचें शयन । काय मी वर्णन करावें कीं ॥ १७ ॥
छिनाळ जे नारी परम चंचळ । सोडीना पदतळ स्थिरावली ॥ १८ ॥
चुरी पदयुग्म झाली पददासी । कोण महिम्यासीं गाईल कीं ॥ १९ ॥
सनकादि झाले भाट ज्या देवाचे । वर्णन मद्वाचे केवीं होय ॥ २० ॥
वैकुंठ धामीं आज होवोनियां जागा । करीं कृपापांगा आम्हांवरी २१
आम्ही दीन हीन शरण पदासीं । मागत अभयासीं तूजपाशीं ॥ २२ ॥
वैरीयानीं आम्हां गांजीयेलें थोर । तयांचा संहार करा नाथा ॥ २३ ॥
विष्णुभक्तीचा कीं उत्कर्ष कराया । ब्रीद जागवाया कलियुगीं ॥ २४ ॥
रावण कुंभकर्ण दैत्य हे मारावे । आम्हांसीं करावें निर्भय गा ॥ २५ ॥
हिरण्याक्ष हिरण्यकशिपुदानव । मारावे माधव आम्हांसाठीं ॥ २६ ॥
कंस चाणूर हे परम उन्मत्त । मारावे समस्त देवराया ॥ २७ ॥
बौद्धरूप आतां टाकुनी नटावें । कलंकी त्वां व्हावें धर्मासाठीं ॥ २८ ॥
आम्हासाठीं नाथा शस्त्र उचलावें । प्रसज्ज करावें निजहातीं ॥ २९ ॥
गरुडवाहना त्वरित पावावें । वैऱ्यांतें मारावें आमुचीया ॥ ३० ॥
धर्मद्वेषक जे द्वेषक स्थानाचे । द्वेषी भजनाचे पापी जे कां ॥ ३१ ॥
साधुसंतासीं जे धरिताती वैर । तयांचा संहार करावा कीं ॥ ३२ ॥
छळण करीति वृथा जे आमुचें। नर पाखंडाचे पुतळे जे ॥ ३३ ॥
परम हिंसक पापी दुराचार । जयांसीं विचार नाहीं मुळीं ॥ ३४ ॥
अविवेकी ऐसे स्वार्थाचे जे दास । जे का परस्वास हरिताती ॥ ३५ ॥
साधु सज्जनांसीं ज्यांचा वृथा द्रोह । पाडिती संदेह भक्तांलागीं ॥ ३६ ॥
ऐसे जे कां नाथा उन्मत्त पामर । तयांचा संहार करीं वेगें ॥ ३७ ॥
बहुत पीडलों बहुत गांजलों । म्हणुनीयां आलों शरण तूज ॥ ३८ ॥
तरी रक्षीं रक्षीं रक्षीं चक्रपाणी । दीन-विनवणी साच करीं ॥ ३९ ॥

नको अंत पाहूं उशिर नको लावूं । तुजला विनवूं किती सांग ॥ ४० ॥
आज प्रबोधन संत म्हणताती । तुजला श्रीपती आळवीती ॥ ४१ ॥
द्वादशी प्रिय परम असे माधवाला । उपमा इजला दुजी नाहीं ॥ ४२ ॥
तरी विश्वंभरा आतां कृपा करीं । वैरी सर्व मारीं आमुचे ते ॥ ४३ ॥
निवटोनी दैत्य निर्भय आम्हां करीं । श्रीगुरु श्रीहरी रमाधवा ॥ ४४ ॥
कळकळीची माझी देवा विनवणी । व्यथा अंतःकरणीं बाधे फार ॥४५॥
म्हणुनी पुन्हां पुन्हां तुजला प्रार्थितों । पदर पसरीतों तुझेपुढें ॥ ४६ ॥
भक्तीकार्यासाठीं उपासनेसाठीं । निजब्रीदासाठीं परंधामा ॥ ४७ ॥
निजस्थानासाठीं निजयशासाठीं । सद्धर्माचेसाठीं प्रभुराया ॥ ४८ ॥
आम्हां भक्तांसाठीं स्वीय जनासाठीं । भजनमार्गासाठीं प्रार्थितसें ॥४९॥
वैरी निवटावे आमुचे समस्त । जय भगवंत कृपानिधे ॥ ५० ॥
विनायक म्हणे वदविलें स्तोत्र । जें इहपरत्र शुभदायी ॥ ५१ ॥

( २६ )

## सह्यवनश्री व देवांचा विलास

गुरुवार ता. २८।११।१९२९

सह्यागिरीवास तुजलागीं रुचे । महात्म्य तेथींचें अत्यद्भुत ॥ १ ॥
रम्य उपवनीं रम्य वृक्षशोभा । तुज पद्मनाभा आवडत ॥ २ ॥
घेवोनी तुषार संगें वायुदेव । निज सेवा भाव प्रगटीत ॥ ३ ॥
वन्य पुष्पें जीं का परम सुवासाचीं । परम आमोदाचीं गिरीवरी ॥४॥
तयांचा सुगंध घेवोनियां संगें । तुजला बिलगे शांतवायु ॥ ५ ॥
झुळझुळ वाहे तोय तुज धाया । औदुंबर छाया तुजवरी ॥ ६ ॥
सकळ सांडोनी थोर थोर वृक्ष । तुझें बहु लक्ष औदुंबरीं ॥ ७ ॥
औदुंबर रुचे कधीं न सोडीसी । तेथेंच वससी दयाळा तूं ॥ ८ ॥
स्फटिक शिळा रम्य कल्पिसी आसन । समाधि लावून बैससी तेथें॥९॥
तुझे शिरावरी शेष फणा करी । रत्न त्याच्या शिरीं प्रकाशत ॥ १० ॥
हजार मुखांचा हजार नेत्रांचा । सहस्र रत्नांचा अनंत तो ॥ ११ ॥
सहस्र फणा धरी तुझे शिरावरी । अलौकिक तरी शोभा येत ॥ १२ ॥

३८८०९ १४।८।६४

वनदेवता ही तुजला सेवाया । श्रीसद्गुरुराया सिद्ध असती ॥ १३ ॥
कण्ठीं वनमाळा तुझ्या त्या घालिती । पुष्पांनीं पूजिती तुजलागीं॥१४॥
गंधर्व किन्नर होवोनी शकुनि । तुजला गायनीं रिझविती ॥ १५ ॥
कूजन पक्ष्यांचें अति रमणीय । देखावा तो होय रम्य किती ॥ १६ ॥
लता कुंजामार्जी बैससी आवडी । वनश्रीची गोडी तुज बहु ॥ १७ ॥
तुजसाठीं थाटे वनश्री परम । जगीं अनुपम सौंदर्याची ॥ १८ ॥
लता कुसुमरेणु तुजवरी वर्षती । मकरंद ओतिती अंगावरी ॥ १९ ॥
हाच पुष्पगंध उटी तुज होत । वास दरवळत सर्वांगाला ॥ २० ॥
कल्पतरुची जे साल सुमृदुल । तेंच तूं वल्कल सेवीतोसी ॥ २१ ॥
नानारूपधारी तुजला ओळखिती । तुजला सेविती मुनिवर ॥ २२ ॥
शुकसनकादिक ब्रह्मनिष्ट थोर । होती पक्षीवर तव स्थानीं ॥ २३ ॥
लक्ष्मी नटे दासी बैसे अंकावरी । तुझीया श्रीहरी दत्तनाथा ॥ २४ ॥
पुष्ट तुझी तनु दृष्टी सामर्थ्याची । जवानमर्द साची मूर्ती तुझी ॥ २५ ॥
तरुण बाविसाचा गाभा सौंदर्याचा । जैसा मदनाचा अवतार ॥ २६ ॥
भूषणें पुष्पांचीं शोभती तनुवरी । तुळसींचे हारीं शोभे वक्ष ॥ २७ ॥
पिवळा पीतांबर विजुचा नेसला । आयुधें शोभला सर्वेश्वर ॥ २८ ॥
शंखचक्र माळा डमरू कमंडलु । धरी करीं शूलु भक्तांसाठीं ॥ २९ ॥
पीवर बाहु असती जाणा भगवंताचे । काय पुष्टतेचें करूं वर्णन ॥३०॥
तुष्ट पुष्ट देव सुरापान करी । अंकींची ते नारी पीत मधु ॥ ३१ ॥
अशन मांसाचें पान मदिरेचें । करिताती साचें दोघेंजण ॥ ३२ ॥
नानाफळें अर्पी वनश्री देवासीं । पार आनंदासीं नाहीं मुळीं ॥ ३३ ॥
सह्यगिरीवरचा राणा हा सुभट । काय त्याचा थाट वानावा कीं ॥३४॥
विनायक म्हणे ऐसा देव ध्यावा । परम विसावा तेणें मना ॥ ३५ ॥

( २७ )

## विरक्तीची व्याख्या

गुरुवार ता० ५।१२।२९

विरक्त असावें नित्य या संसारीं । मनें निरंतरीं सावधान ॥ १ ॥
चळूं न यावें मन विषय त्यागावे । मुळीं न मोहावें मायाजाळीं ॥ २ ॥

प्रापंच लटिका जैसें मृगजळ । विवेकाचें बळ असों द्यावें ॥ ३ ॥
क्षोभ इंद्रियांचा क्षोभ या चित्ताचा । शमवावा साचा शांतिरसें ॥ ४ ॥
कोठें न गुंतावें स्वतंत्र असावें । चित्त हें ठेवावें दत्त पायीं ॥ ५ ॥
पुत्रमित्र बन्धु भार्या जीं प्रेमाचीं । अवघीं दत्ताचीं कल्पावीं तीं ॥ ६ ॥
गृहधन सारें कल्पावें दत्ताचें । आसक्त न व्हावें कोठेंही त्वां ॥ ७ ॥
मन हें जिंकावें अंतरीं विरावें । समरस व्हावें दत्तरूपीं ॥ ८ ॥
दत्तासी भजावें दत्तासीं स्मरावें । सेवापर व्हावें दत्ताठायीं ॥ ९ ॥
जिव्हेवरी जप ठेवावा दत्ताचा । करावा नामाचा जयजयकार ॥ १० ॥
दत्तचारित्र गावें प्रेमें परिसावें । रंगोनियां जावें रसामृतीं ॥ ११ ॥
दत्तरूप व्हावें भान विसरावें । दुजेपण जावें लटिकें जें ॥ १२ ॥
ठेवूं नये मुळीं देहाचाहि लोभ । अनसूयागर्भ आश्रयावा ॥ १३ ॥
भजनपूजन कीर्तन तयाचें । याच व्यासंगाचें दास व्हावें ॥ १४ ॥
नको छंद तुज मना रे दुसरा । होई निलाजरा भजनांत ॥ १५ ॥
गात रहा सदा कथानुसंधान । अखंड भजन करित जा ॥ १६ ॥
विनायक म्हणे हाच उपदेश । जोडी जगदीश याच मार्गें ॥ १७ ॥

( २८ )

## कृतज्ञता वचन

गुरुवार ता० १९।१२।१९२९

कार्य निज तुवां करवोनि घेतलें । आम्हां यश दिलें कृपावंता ॥ १ ॥
आमुचीयासाठीं येथें प्रगटोनि । कार्य करवोनि घेतलें त्वां ॥ २ ॥
आम्हां नाचविलें आम्हां हर्षवीलें । भजनीं रंगवीलें कृपासिन्धू ॥ ३ ॥
रंग केला बहु तुम्हीं आम्हांसाठीं । प्रेम असे पोटीं तुमचीया ॥ ४ ॥
क्षणभरी येथें वैकुंठ आणिलें । आम्हांसीं दिधलें दर्शनास ॥ ५ ॥
निज साक्षात्कार दाविला आम्हांसीं । त्या उपकारासीं काय बोलूं ॥६॥
हृदयींचा सखा जीविंचा तूं जीव । मूर्त प्रेमभाव दत्तात्रेया ॥ ७ ॥
कृपामूर्ति परम तूंच एक नाथा । तुज मीं समर्था काय वानूं ॥ ८ ॥

कृतज्ञतेनें मी भरोनियां आलों । उभा मी राहिलों तुजपुढें ॥ ९ ॥
घेईं आतां मज स्वामि पदरांत । चरण वंदित प्रेमभावें ॥ १० ॥
धन्य केलें मज धन्य केलें स्थान । धन्य केले जन भजले जे ॥ ११ ॥
प्रामाणिकपणें ज्यांहीं तुझी सेवा । केली दत्तदेवा धन्य तेच ॥ १२ ॥
धन्यवाद ऐसा तुवां प्रगटाविला । उपकार केला किती सांगुं ॥ १३ ॥
किती पुण्य आम्हां जोडलें न मिती । कृपेनें श्रीपती तुझीयाच ॥ १४ ॥
अनंतपुण्य आम्हां लाभलें भजनें । तुझीया कृपेनें दत्तदेवा ॥ १५ ॥
अहोरात्र तुझ्या सेवेमाजि गेलें । धन्य भाग्य भलें आमुचें गा ॥ १६ ॥
ज्यांहीं ज्यांहीं तूज सेविलें अनंता । त्यांची कामपूर्तता करावी कीं १७
कल्पवृक्ष म्हणुनि तुजपाशीं आले । कामनेनें भले जे का जन ॥ १८ ॥
तयांचे तूं अर्थ पूर्ण करी नाथा । श्रीगुरु समर्था दत्तनाथा ॥ १९ ॥
देह मन वाणी अमुचीं शुद्ध झालीं । भजनीं मिसळलीं त्रिकरणें ॥२०॥
धन्य तीं इंद्रियें धन्य माझा देह । यांत न संदेह तिळमात्र ॥ २१ ॥
माझ्याठायीं दत्त सदा स्थित आहे । ध्यानांत मीं पाहें तयालागीं ॥२२॥
ऐसा प्रभु माझे ठायीं करी वास । माझीया देहास वागवी तो ॥ २३ ॥
त्याचे इच्छे माझा देह वागतसे । गुणदोष नसे मज कांहीं ॥ २४ ॥
गुणाचा न धनी न मी तो दोषांचा । मज दोषसाचा नाहीं नाहीं ॥२५॥
देह माझा अग्नि प्राण हिरण्यगर्भ । दत्ताचा संदर्भ माझे ठायीं ॥ २६ ॥
परब्रह्म तेंच माझा आत्माराम । दत्तपूर्ण काम माझे ठायीं ॥ २७ ॥
जिवलग सखा माझा पाठीराखा । मज देत तोखा किती सांगुं ॥ २८ ॥
विनायक म्हणे वर्णन दत्ताचें । त्याचे कृपें वाचे होत असे ॥ २९ ॥

( २९ )

## प्रार्थना

आतां माझी हे प्रार्थना । तुजलागीं दयाघना ॥ १ ॥
जागृत ठेवीं तुझें स्थान । दुष्टां व्हावें येथें दंडन ॥ २ ॥
भजनाची ही भूमिका । तुवां दिली आम्हां भजकां ॥ ३ ॥
आपुली ती प्रतिपाळावी । विघ्नें येथील नासावीं ॥ ४ ॥

दुष्ट दुर्मदांसीं शिक्षा । साधु जनालागीं दीक्षा ॥ ५ ॥
करीं धर्म संरक्षण । अधर्माचें निर्मूलन ॥ ६ ॥
प्रगट करीं तव स्थान । जेणें रंगे तव भजन ॥ ७ ॥
साक्षात्कारें दर्शन द्यावें । आम्हालागीं अनुग्रहावें ॥ ८ ॥
आमुच्या इच्छा व्हाव्या पूर्ण । तव कृपें नारायण ॥ ९ ॥
इह पर सद्गतीतें । आम्हां द्यावें तुवां निगुतें ॥ १० ॥
याचसाठीं मी प्रार्थितों । तुझा प्रसाद मागतों ॥ ११ ॥
जनकार्यासाठीं देवा । प्रसाद मजलागीं व्हावा ॥ १२ ॥
सिद्ध करीं मजलागीं । प्रगटवीं महिमा जगीं ॥ १३ ॥
दत्तात्रेय कृपासिंधू । दिनाचा तूं जैसा बंधु ॥ १४ ॥
तुझ्या पायांसीं शरण । घालीतसें लोटांगण ॥ १५ ॥
उपकार व्हावा नाथा । मजवरी श्रीसमर्था ॥ १६ ॥
याचसाठीं मीं मागतों । चरणीं शिर मीं ठेवितों ॥ १७ ॥
काम-कल्पद्रुम नाम । साच करीं परंधाम ॥ १८ ॥
विनायकाचा कैवारी । पाव आतां तूं सत्वरीं ॥ १९ ॥

## ( ३० )

# स्वरूपवर्णन.

गुरुवार ता० २६।१२।१९२९

मधुर किती हांसे वृत्तीतें मोहवी । जीवातें रंगवी निजठायीं ॥ १ ॥
मधुर आनन अमल कान्ती किती । स्पर्शसुखा मिती नाहीं नाहीं ॥ २ ॥
किती कोमल हा किती हा सुखाचा । सुगंध अंगींचा बहुमोल ॥ ३ ॥
किती रंगवीतो भान विसरवीतो । किती आनन्दवीतो दत्तात्रेय ॥ ४ ॥
आनंदसागर मूस आनंदाची । मूर्ति मंगळाची वानूं कैसी ॥ ५ ॥
जीवाचा हा जीव प्राणाचा हा प्राण । कारण-कारण आत्माराम ॥ ६ ॥
मूर्त सुख वाटे जणूं एकवटलें । शमन हें भलें विकारांचें ॥ ७ ॥
मनन मनाचें वाचन वाचेचें । हृदय हृदयाचें प्रगटलें ॥ ८ ॥

सच्चित् सुख भेट आम्हातें घडत । भजन रंगत त्याचे नांवें ॥ ९ ॥
अमल पाहाणें अमल हांसणें । अमल असे लेणें सदा त्याचें ॥ १० ॥
अमल हा प्रभु विमल तद्यश । ईशाचा हा ईश जगत्प्रभु ॥ ११ ॥
ईश्वर हा जाणा सकळ कारण । यासीं आवरण नाहीं नाहीं ॥ १२ ॥
शुद्धबुद्ध आहे परम चैतन्य । याचे सम अन्य नाहीं कोण ॥ १३ ॥
वदान्य हा प्रभु धीराचा हा धीर । वीराचा हा वीर दत्तनाथ ॥ १४ ॥
विनायक झाला लीन स्वरूपांत । गुरु अवधूत तारी त्याला ॥ १५ ॥

( प्रवचनांत केलेले अभंग )

( ३१ )

## स्वरूपवर्णन

येईं येईं माझ्या दत्ता । तूझी सर्व हे बा सत्ता ॥ १ ॥
देव माझा हा शहाणा । किती दिसतो देखणा ॥ २ ॥
माझ्या फार आवडीचा । माझा असे सलगीचा ॥ ३ ॥
माझ्या जीवींचा हा जीव । माझा आनंदाचा भाव ॥ ४ ॥

( ३२ )

## भजनछंद

गुरुवार ता० २।१।१९३०

दांभिकपण ऐसें मजठायीं वसो । मज भीति नसो कोणाचीही ॥ १ ॥
होवोनियां नाच्या नाचेन प्रेमानें । चंचाल ढंगानें तुजपुढें ॥ २ ॥
नानावेषीं नाथा नटेन रंगानें । कवन मुखानें गात तुझें ॥ ३ ॥
होवोनि निर्लज्ज चाळे मी करीन । उन्मत्त वागेन भजनांत ॥ ४ ॥
पतिव्रता नारी संभोग समयीं । निर्लज्ज हृदयीं होत जैसी ॥ ५ ॥
पतिसवें रमतां वेश्येसम वागे । सेवित निजांगें भर्त्यालागीं ॥ ६ ॥
तैसा भजनरंगीं नाचेन उडेन । तुज रिझवीन भजनानें ॥ ७ ॥

आनंदें डुलेन गीत मी गाईन । तुज मी ध्याईन हृदयांत ॥ ८ ॥
सोंग ढोंग ऐसें नित्य आचरेन । प्रिय मी होईन तुजलागीं ॥ ९ ॥
तुझा दास जगीं म्हणवीन जनीं । माझिया भजनीं प्रगट तूं ॥ १० ॥
स्वयें प्रगटतां तूं श्री दत्तनाथा । मोठेपण समर्था मज येई ॥ ११ ॥
म्हणोनि प्रगटावें महत्व मज द्यावें । सिद्ध मज करावें कृपावंता ॥१२॥
विनायक म्हणे धरिली तूझी कांस । माझी आतां आस पुरवावी ॥१३॥

( ३३ )

## भजनछंद

छंद मज लागलासे । नाचण्याचा भक्ती मिसें ॥ १ ॥
ढोंग माझें हें चालवी । आशा माझी हे पुरवी ॥ २ ॥
मजसंगें नाच देवा । पूर्ण कर माझा हेवा ॥ ३ ॥
अंगीं भरो माझ्या वारें । माझे ठायीं तूं संचरे ॥ ४ ॥
येथें राज्य प्रेमाचेंच । सुकाळ येथें प्रेमाचाच ॥ ५ ॥
देह ओंवाळुनी टाकूं । सुख प्रकाम विलोकूं ॥ ६ ॥
तनुसीं तनु भिडवोनि । सादरत्वें आलिंगोनि ॥ ७ ॥
एकजीव होउनि जाऊं । समरस आम्हीं होऊं ॥ ८ ॥
भजनाचें सुख किती । स्वर्गीं सुर लाळ घोटिती ॥ ९ ॥
उपमा नाहीं नाहीं याला । सदा सेवूं भजनाला ॥ १० ॥
ढोंगी होउनि लाज सांडूं । लौकिकासीं आम्हीं मांडूं ॥ ११ ॥
लाचावलें मन भारी । चटावली वृत्ति खरी ॥ १२ ॥
कांहीं केल्या सुटेनाच । भजन हें होय साच ॥ १३ ॥
श्रीमंत कोण आम्हांसम । झालों आम्हीं अनुपम ॥ १४ ॥
वैकुंठ येथें आम्हासाठीं । येथें येतो जगजेठी ॥ १५ ॥
किमया मज सांपडली । दत्तरूप काया झाली ॥ १६ ॥
आला जो का अंगीं स्वेद । काय सांगूं तो आनंद ॥ १७ ॥
मी तो नाच्या जन्माचाच । किती केले आजवरी नाच ॥ १८ ॥

लांडगा झालों वाघ झालों। कृमि कीटक बनलों ॥ १९ ॥
पुरुष झालों नारी झालों। नपुंसक मी बनलों ॥ २० ॥
किती झाले माझे नाच। आतां हाच धरिला नाच ॥ २१ ॥
विनायक दत्तमय। भजनानें खास होय ॥ २२ ॥

( ३४ )

## धांवा

गुरुवार ता. ९।१।१९३०

आतां मज तारी करुणा तुज यावी। परीक्षा पहावी माझी न आतां ॥१॥
सत्वास उरेल कैसा तुझा दास। शक्ति कैंची यास दत्तात्रेया ॥ २ ॥
आतां उडी घाली मज दीनासाठीं। स्वामि जगजेठी कृपावंता ॥ ३ ॥
तुजवीण आहें असहाय देवा। माझा असे केवा कोणालागीं ॥ ४ ॥
कोण कळवळे कोण धांव घेई। वत्सा जैशी आई तैसा धांवे ॥ ५ ॥
आईसम तुझें नातें आम्हांपाशीं। आतां दयाराशि धांव घेई ॥ ६ ॥
कोंडलों मी बहू कष्ट किती साहूं। साहायार्थ पाहूं कोणाकडे ॥ ७ ॥
कैवारी या कोण कोण माझा वाली। दया येई भली जयालागीं ॥८॥
हांक मारितांच हांकेस धांवेल। मजला पावेल कोण ऐसा ॥ ९ ॥
तुजविण गति मज अन्य नाहीं। शरण आलों पाहीं तुझे पायां ॥१०॥
करूं नको मज आतां तूं उदास। पुरवीं माझी आस दत्तात्रेया ॥ ११ ॥
भयभीत तुझ्या पाठीसीं लपलों। बहु विश्वासलों तुझेवरी ॥ १२ ॥
आतां माझे आई करुणेतें करीं। धांव तूं सत्वरीं धांव घेई ॥ १३ ॥
वाट किती पाहूं जागा किती राहूं। केव्हां सांग लाहूं दर्शनाला ॥१४॥
धांव आतां भेटे उताविळ झालों। कासावीस झालों हृदयांत ॥ १५ ॥
थरथर माझें हृदय कांपतें। अढळ न राहते दृष्टी माझी ॥ १६ ॥
काय करूं देवा बहुत दुखावलों। किती तळमळलों हृदयांत ॥ १७ ॥
जळावीण मासा जेवीं तडफडे। तैसेंच हें घडे मजलागीं ॥ १८ ॥
कोठें जाऊं सांग कोणालागीं सांगूं। कोणापाशीं मागूं सांग आतां १९
बाळपणापासोनी तुजला सेविलें। तुजवरी ठेविलें मन नित्य ॥ २० ॥

प्रामाणिकपणें सेविलें तुजसीं । धरोनी श्रद्धेसीं दृढतर ॥ २१ ॥
तरी आतां पाव मज गुरुराया । विश्रांति हृदया देई देई ॥ २२ ॥
धांव धांव आतां अत्रिच्यानंदना । त्रैलोक्यवंदना धांव आतां ॥ २३ ॥
तुजसम नाहीं कारुण्याचा सिंधू । कोणी न दीनबंधू पावे आतां ॥२४॥
धांव पाव आतां कैलासाधिपते । मज अनाथातें तारीं तारीं ॥ २५ ॥
तारीं तारीं आतां संकटांतूनी या । मज धांवोनियां वांचवावें ॥ २६ ॥
वांचवावें आतां मजला तारावें । मज नच द्यावें वैऱ्याहातीं ॥ २७ ॥
मज न मारावें कृपेनें पहावें । मजसीं करावे क्षमादोष ॥ २८ ॥
चुकतों मीं बहु आचरितों दोष । धरूं नका रोष स्वामिराया ॥ २९ ॥
काय माता मानी बाळकाचा दोष । काय करी रोष सांग दत्ता ॥३०॥
प्रामाणिक बुद्धि माझी तुज ठावी । तरी धांव घ्यावी माझ्यासाठीं ३१
माझ्यासाठीं आतां प्रगट या स्थानीं । जैसा स्तंभातूनी प्रल्हादार्थ ॥३२॥
प्रगट आतां येथें दावीं साक्षात्कार । लीला चमत्कार दावीं दावीं ॥३३॥
करूं नको आतां मजला निराश । तुज जगदीश प्रार्थू किती ॥ ३४ ॥
किती परि तुज देवा मीं आळवूं । किती मीं विनवूं दयेसाठीं ॥ ३५ ॥
लोळतों तुज पुढें घेतों लोटांगण । तरी नारायण कृपा करीं ॥ ३६ ॥
गडबड माझी बहु झाली देवा । तरी आतां दावा निजमुख ॥ ३७ ॥
निजरूपीं उभा येथें त्वां ठाकावें । मजलागीं द्यावें दर्शनाला ॥ ३८ ॥
सायुध प्रगट मजसाठीं दत्ता । प्रगट निजसत्ता येथें करीं ॥ ३९ ॥
बोलण्याची झाली आतां माझी सीमा । तरी पुरुषोत्तमा धांव घेईं ॥४०॥
उशीर बहु झाला मज झाली घाई । प्रगटोनि येईं सत्वरेंसीं ॥ ४१ ॥
उडी घाल आतां स्वामि जनार्दना । श्रीगुरु दयाघना उडी घाल ॥४२॥
संकट जाणसी माझ्या हृदयींचें । काय आतां वाचे बोलावें म्यां ॥४३॥
जाणसी हृदय जाणसी तूं मन । सर्वज्ञाची खुण कोण जाणे ॥ ४४ ॥
सर्वज्ञ तूं देव पाहूं नको अंत । आतां तूं त्वरित उडी घाल ॥ ४५ ॥
शरिरांतूनी माझे प्राण हे निघती । बाहेर पडती ऐसें वाटे ॥ ४६ ॥
घाबरलों देवा बहु श्रांत झालों । तुज शरण आलों काकुळती ॥ ४७ ॥
माझ्या विश्वासाचा माझ्या तूं धैर्याचा । जिवलग साचा तूंच माझा ॥४८॥

जिव्हाळ्याचा जीव तूंच सदाशिवा। आतां करूं धांवा किती सांग ॥४९॥
धांव धांव धांव धांव चक्रपाणी । धांव शूलपाणी माझ्यासाठीं ॥ ५० ॥
धांव त्रैमूर्ती सद्गुरुदत्तनाथा । चरणांवरि माथा ठेवितों मी ॥ ५१ ॥
हिडीस देखिलें हिडीस ऐकिलें । हिडीस अनुभाविलें किती सांगूं ॥५२॥
असत्याचा जय सत्याचा पराजय । ऐसा हा अन्याय पाहूं किती ॥५३॥
अधर्माचा होय थोर पुरस्कार । धर्म तिरस्कार किती होत ॥ ५४ ॥
सज्जनाचा छळ दुष्टासी बक्षीस । ऐसें किती खास पाहूं सांग ॥ ५५ ॥
इहपर गति दाता भगवंत । ऐसें मी ऐकत निजकर्णी ॥ ५६ ॥
तरी आतां धांव दत्तदेवनाथा । निजसत्ता समर्था प्रगटवीं ॥ ५७ ॥
संकटीं सांपडलों उपाय नाहीं कांहीं। उरला मज पाहीं कृपावंत ॥५८॥
सर्वत्रचीं भय भरोनी राहिलें । मन उबगलें किती सांगूं ॥ ५९ ॥
उठ आतां दत्ता जागा होईं दत्ता । कृपेनें तूं दत्ता मज पाहें ॥ ६० ॥
विनायक आला तुज काकुळती । तरी दत्तयति कृपा करीं ॥ ६१ ॥

( ३५ )

( प्रवचनांत केलेले )

# गजेंद्र मोक्ष

हांक कानीं ऐशी देवाच्या पडतां । किती आली द्रवता वर्णूं काय ॥१ ॥
कळवळे देव तांतडीं निघाले । सोडवाया भले गजेंद्रासीं ॥ २ ॥
गरुड तोही मागें ठेविला देवांनीं । आपण धांवोनी स्वयें आले ॥ ३ ।
उडीच घातली तेव्हां तया स्थानीं । देव प्रगटपणीं प्राप्त झाले ॥ ४ ॥
शंख चक्र गदा पद्म असे हातीं । प्रगट श्रीपति झाले तेथें ॥ ५ ॥
प्रेरोनियां चक्र फाडिला मकर । ऐसा करिवर सोडविला ॥ ६ ॥
विनायक म्हणे नाहींच उपमा । तया पुरुषोत्तमा ब्रह्मांडांत ॥ ७ ॥

( ३६ )

# ये यथा मां प्रपद्यन्ते

गुरुवार ता० १६।१।१९३०

ज्याचेपाशीं प्रेमा भेटे त्यासीं देव । येथें शुद्ध भाव पाहिजे कीं ॥ १ ॥
भावनेसम देव, सगुण भावनेचें । रूप असे साचें तया देवा ॥ २ ॥
प्रेममय पाहे तया प्रेमरूप । हरितसे ताप कृपादृष्टीं ॥ ३ ॥
भयस्थान पाहे जो का देवापाशीं । भयंकर त्यासीं देव आहे ॥ ४ ॥
शत्रुभावें पाहे शत्रु त्यासीं देव । नास्तिकां अभाव दिसे त्याचा ॥ ५ ॥
जैसी जैसी ज्याची भावना होतसे । देव नटतसे तैसा तैसा ॥ ६ ॥
होई सुत कोणा होई पिता कोणा । होय माता कोणा जगद्वन्द्य ॥ ७ ॥
होय कोणा भाऊ कोणाची भगिनी । कोणाची कामिनी होत देव॥८॥
होत जार कोणा कोणासीं सौंगडी । कोणा वीर गडी माधव हा ॥ ९ ॥
कोणाचा चाकर कोणा यजमान । होत भगवान स्वयें जाणा ॥ १० ॥
कोणाची तो वेश्या कोणा खाद्यपेय । देव स्वयें होय कृपाळुत्वें ॥ ११ ॥
देव होय राजा पृथवीचा पति । होय सुरपति विश्वंभर ॥ १२ ॥
देवासम देव त्याचा सदा भाव । जैसा भक्तीभाव तैसा असे ॥ १३ ॥
म्हणुनीयां भजा भजा सर्वेश्वर । अर्पोनि अंतर तयालागीं ॥ १४ ॥
विनायक म्हणे देव हा भावाचा । देव हा भल्याचा भला देव ॥ १५ ॥

( ३७ )

# ईश्वरावर निस्सीम निष्ठा

रात्रंदिन देव-सेवा । जन तुम्हीं करित जावा ॥ १ ॥
देव मनीं नित्य ठेवा । त्यासीं अर्पा प्रेमभावा ॥ २ ॥
अंतरांत देव ध्यावा । देव सदा प्रेमें गावा ॥ ३ ॥
हृदयांत आदरावा । सुमनें तेथें पूजावा ॥ ४ ॥

अंतःकरणीं चिंतावा । निजठायीं तो पहावा ॥ ५ ॥
देहमन इंद्रियांत । ठेवा देव सदोदित ॥ ६ ॥
देव चिंता देव गावा । वर्णा त्याचीया वैभवा ॥ ७ ॥
देवासाठीं व्यवहार । करित रहा निरंतर ॥ ८ ॥
देवासाठीं सर्व कांहीं । करावें तुम्ही निःसंदेहीं ॥ ९ ॥
अशन पान देवासाठीं । स्नान दान देवासाठीं ॥ १० ॥
निजणें बसणें त्याचेसाठीं । जागें असणें त्याचेसाठीं ॥ ११ ॥
विहार जे का सर्व तुमचे । त्याचेसाठीं व्हावे साचे ॥ १२ ॥
विकार जे का तुम्हां होती । असावा त्यांत श्रीपति ॥ १३ ॥
विचारांत देव असो । उच्चारांत देव वसो ॥ १४ ॥
आचारांत देव राहो । विसर त्याचा कधीं न हो ॥ १५ ॥
इंद्रियांत देव ठेवा । रस त्याचा सदा सेवा ॥ १६ ॥
देव पहा देव ऐका । देव हुंगा देव चाखा ॥ १७ ॥
देव भोगा, अनुभवा । देवाठायीं घ्या विसावा ॥ १८ ॥
देवाठायीं रंगा डोळा । देवाठायीं जीव मिसळा ॥ १९ ॥
विनायक म्हणे देव । पहावा त्याचा विश्वभाव ॥ २० ॥

( ३८ )

# दर्शन लालसा

गुरुवार ता. २३।१।१९३०

दर्शनाचा योग कधीं घडणार । इच्छा पुरणार कधीं माझी ॥ १ ॥
कधीं तुझें मुख नयनीं पाहीन । वेडा मी होईन कधीं सांग ॥ २ ॥
वेडावेल मन कधीं माझें दत्ता । संसारासीं लत्ता हाणील तें ॥ ३ ॥
कधीं तूझे ठायीं मद्वृत्ति रंगेल । संगती घडेल कधीं तूझी ॥ ४ ॥
कधीं तूजला मी जिव्हेनें चाटीन । नयनीं प्राशीन रूपामृत ॥ ५ ॥
मधुरवाणी तुझी कानानीं ऐकेन । तुज आलिंगीन कधीं देहें ॥ ६ ॥
कधीं तूझे रूपीं सांग मिसळेन । कधीं मी पावेन तुझा भाव ॥ ७ ॥

कधीं प्रकाशसी माझे अंतरांत । कधीं अवधूत पाहीन मी ॥ ८ ॥
कधीं सुखावेन शांतितें पावेन । कधीं शमवीन ताप सारा ॥ ९ ॥
कधीं तुझी भेट कधीं त्वद्दर्शन । कधीं दयाघन योग ऐसा ॥ १० ॥
कधीं माझेसवें देवा बोलशील । स्मित करिशील मधुर तूं ॥ ११ ॥
कधीं दिव्यप्रभा मज दाविसील । कधीं पहासील कृपेनें तूं ॥ १२ ॥
कधीं माझे पाठीवरी तुझा कर । फिरेल उदार कधीं सांग ॥ १३ ॥
कधीं मी पाहिन स्वरूप मोहन । अंतरीं भरेन कधीं सांग ॥ १४ ॥
विस्मय पावेन पहात राहीन । राहे झगटोन चित्त दत्ता ॥ १५ ॥
खिळवीन दृष्टी कधीं तुझे ठायीं । प्रेमा माझे हृदयीं उचंबळे ॥ १६ ॥
कधीं तल्लीनता मनीं प्राप्त होई । विरोनियां जाई मनोवृत्ति ॥ १७ ॥
मधुर हास्य तुझें पाहतां पाहतां । कधीं देहातीतता प्राप्त होई ॥ १८ ॥
कधीं दर्शनासीं देसी भगवंता । कधीं मनिंची आर्ता पुरवीसी ॥ १९ ॥
विनायक म्हणे आतुर मी झालों । दर्शना भुकेलों तुझ्या नाथा ॥ २० ॥

( ३९ )

## सत्यापरता नाहीं धर्म

गुरुवार ता० ६।२।१९३०

सत्यासाठीं प्राण त्यागावा हें व्रत । जरी सर्व घात पातला कीं ॥ १ ॥
असत्याचा कधीं अवलंब न करीं । धैर्यातें अंतरीं धरावें कीं ॥ २ ॥
दिलें वचन जें कधीं न टाळावें । सत्यप्रतिज्ञ व्हावें जगीं सदा ॥ ३ ॥
थोर धर्मनिष्ठा थोर ईशप्रेम । निग्रह परम चित्तामाजी ॥ ४ ॥
इंद्रियें ताब्यांत मन सदा वश । मळाचा न लेश बुद्धिमाजी ॥ ५ ॥
अतुल सामर्थ्य धीरोदात्त मूर्ति । हृदयीं श्रीपति ध्याई सदा ॥ ६ ॥
ऐश्वर्याची नाहीं मुळींच वासना । जाळीली कामना मुळींहुनी ॥ ७ ॥
निश्चयाचा धड कधीं न ज्यासीं पड। भक्तीची आवड मोठी जया ॥ ८ ॥
मानसांत पूजी श्रीहरिची मूर्ति। चित्तीं ज्ञान ज्योती प्रकाशित ॥ ९ ॥
सुरवरां पूज्य पूज्य मानवांसीं। पूज्य जगतासीं जो का सदा ॥ १० ॥

शत्रुमित्रांलागीं वंद्य जो का नित्य। जयासि असत्य ठावें नाहीं ॥११॥
धैर्यशौर्याचा जो सागर केवळ। करील कवळ त्रैलोक्याचा ॥ १२ ॥
ज्याचा धाक असे सर्व चराचरीं। महात्मा भूवरी प्रसिद्ध कीं ॥ १३ ॥
कुरु-पांडवांचा पितामह श्रेष्ठ। महिमा वरिष्ट जगत्रयीं ॥ १४ ॥
गंगेचा नंदन शंतनुचा पुत्र। ज्याचें सत्यसत्र प्रख्यात कीं ॥ १५ ॥
त्याचे सम व्हावें नित्य दृढव्रत। महा पुण्यवंत बनावें कीं ॥ १६ ॥
ज्याचीया स्मरणें बहु पुण्य जोडे। सुनिश्चय जडे आठवितां ॥ १७ ॥
जेणें पित्यासाठीं केला भोग त्याग। वचनाचा भंग केला नाहीं ॥ १८ ॥
गृह सुत दारा राज्य ऐश्वर्याचा। त्याग केला साचा पित्यासाठीं ॥१९॥
पित्याच्या सुखासीं आड न जो आला। त्याचा पुरविला जेणें काम ॥२०॥
भीष्मव्रत घ्यावें भीष्मासीं स्मरावें। भीष्मरूप व्हावें त्याचे कृपें ॥२१॥
विनायक म्हणे भीष्मासम व्हावें। धैर्यानें बनावें मेरुसम ॥ २२ ॥

(४०)

# नृसिंहसरस्वती प्रयाण

गुरुवार ता० १३।२।१९३०

लोकसंग्रह कीं झालासे बहुत। सम्मर्द लोटत जन लोकांचा ॥ १ ॥
वाढलीसे कीर्ति गाजला महिमा। पावताती कामा भक्त जन ॥ २ ॥
जे जे शरण येती पूर्ण काम होती। अपरंपार ख्याती जाहलीसे ॥ ३ ॥
सुजन दुर्जन भाविक अभाविक। दर्शना अनेक येती जन ॥ ४ ॥
धरूनी कामना लोटती स्थानासीं। लेशही भक्तीसीं धरिती ना ॥ ५ ॥
नाहीं भक्तीभाव शुद्ध अंतरंग। विषयांत दंग जे का सदा ॥ ६ ॥
भोग-प्राप्तीसाठीं ऐसे येती जन। कदा नोहे मन शुद्ध त्यांचें ॥ ७ ॥
म्हणोनि मनांत विचार आणिला। करूं प्रयाणाला येथोनीयां ॥ ८ ॥
बहु दिन येथें घडलासे वास। लाविले मार्गास बहु जन ॥ ९ ॥
भजनपूजनासीं लावियेले लोक। आतां आवश्यक आम्हां जाणें ॥१०॥
पाचारिती तेव्हां स्वामि ग्रामस्थांसीं। कर्दळी वनासीं जाणें आम्हां ॥११॥
पुष्पांचें आसन करोनि आणावें। आम्ही आतां जावें शैल यात्रे ॥१२॥

ऐकतां हे मात जन भयभीत । स्वामिसीं प्रार्थित नका जाऊं ॥ १३ ॥
शैलयात्रा मिसें येथोनी जाणार । अदृश्य होणार निश्चय हा ॥ १४ ॥
जाऊं नका स्वामी चरण धरीतों । चरणीं लोटतों दीन हीन ॥ १५ ॥
जाऊं नका स्वामी आम्हांसीं टाकोनी । संसार गहनीं ठेवोनियां ॥१६॥
जाऊं नका स्वामी वासरां गाऊली। लेंकरां माऊली तुम्हीं आम्हां॥१७॥
जाऊं नका स्वामी आमुचें कृपाछत्र । इहही परत्र तुम्हींच कीं ॥१८॥
जाऊं नका स्वामी आम्हांसीं टाकोनी। अनाथ करोनी जाऊं नका॥१९॥
जाऊं नका स्वामी येतों काकुळती । द्रव तुम्हांप्रति येवो नाथा॥२०॥
जाऊं नका स्वामी आई बाप धनी। तुम्हीं त्रिभुवनीं आम्हां लागीं॥२१॥
जाऊं नका स्वामी भाऊ बहिण तुम्हीं। कोणाकडे आम्ही पाहूं सांगा॥२२॥
जाऊं नका स्वामी तुम्हीं पंचप्राण । उरलें न त्राण तुम्हाविणें ॥ २३ ॥
जाऊं नका स्वामी चैतन्य देहींचें। तुम्ही आम्हां साचें जाऊं नका॥२४॥
जाऊं नका स्वामी तुम्हीं अन्नपाणी। नेत्रीं येत पाणी आमुचीया॥२५॥
जाऊं नका स्वामी आम्हांसीं प्रकाश। तुम्हीं असा ईश जाणावें कीं॥२६॥
जाऊं नका स्वामी आमुचा जिव्हाळा। तुम्हींच स्नेहाळा जगतीं या॥२७॥
जाऊं नका स्वामी शरीरांत रक्त । तैसे तुम्हीं युक्त उपमाया ॥ २८ ॥
जाऊं नका स्वामी खचित सांगतों । धरणें धरतों तुम्हांपाशीं ॥ २९ ॥
जाऊं नका नका पदर धरीतों । आडवें पडतों मार्गावरी ॥ ३० ॥
गाणगापूरवासी जन प्रार्थिताती । नृसिंहसरस्वती जाऊं नका ॥ ३१ ॥
भक्तानुकंपी देव तुमचें महिमान । सदा भक्ताधीन ऐशी कीर्ति ॥ ३२ ॥
ऐसें परोपरी विनवितां त्यांसीं । देव निश्चयासीं सांगताती ॥ ३३ ॥
आम्हीं येथें असों सदा तुम्हांपाशीं। लौकिक मतासीं जातों आम्हीं॥३४॥
कलिकाळास्तव अदृश्य राहणें । आम्हां असे जाणें शैलयात्रे ॥ ३५ ॥
तुम्हां याची साक्ष निश्चयें येईल । तुम्हीं अनुभवाल माझी कृपा ॥३६॥
जो का कोणी माझें चरित्र गाईल । प्रबंध रचिल कवित्वाचे ॥ ३७ ॥
जाणोनियां ताल राग जो गाईल। यश माझें वदेल जो का जाणा॥३८॥
त्याचेपाशीं आहें सदा, हेच भाक। तुम्हां जन लोक देत असें ॥ ३९ ॥
ऐसें म्हणोनियां आसन घातलें। पुष्पासन भलें गंगेवरी ॥ ४० ॥
बैसोनियां जातां जन दुःखी होती। नावेकरी येती सांगताती ॥ ४१ ॥

स्वामिची आम्हीं डोळां देखियेली मूर्ति। तुम्हांवरी प्रीति सांगितली ॥४२
तंव प्रसादपुष्पें पावलीं तीरासीं। परम भावेसीं घेती जन ॥ ४३ ॥
परतोनि जातां मठांत देखती। दंडधारी यति स्वामिराज ॥ ४४ ॥
आम्हीं येथें असों दुःख नका करूं। धरा हा निर्धारू सांगताती ॥४५॥
असित पक्षमाघमास प्रतिपदा। गमन वरदा घडलें कीं ॥ ४६ ॥
तोच पुण्य दिन पुण्य स्मरणाचा। वदे माझी वाचा महिमान ॥ ४७ ॥
विनायक म्हणे माझेपाशीं देव। सदा त्याचा भाव आहे जाणा ॥४८॥

( ४१ )

# भिल्लीणी आख्यान

गुरुवार ता. २०।२।१९३०

देणें शंकराचें त्यासीं न उपमा। दातृत्वाची सीमा तेथें होई ॥ १ ॥
ऐसा नाहीं दाता कोणी त्रिभुवनीं। सर्वस्व देवोनी जो का टाकी ॥ २ ॥
दिधली निजकांता तया रावणासीं। तरी या देण्यासीं म्हणों काय ॥३॥
इतुकेंच नोहे दिधलें आत्मलिंग। घेत स्वयें जोग सदाशिव ॥ ४ ॥
राख फांसी आंगा सदा दिगंबर। करित संचार गिरिकंदरीं ॥ ५ ॥
मागे जें जें कांहीं कोणीहि तयासीं। देतो अविचारेंसीं सदाशिव ॥६॥
भस्मासुरा देई शंभु दिव्यवर। ठेवितां शिरीं कर भस्म होई ॥ ७ ॥
द्वेषबुद्धिनें तूं ठेविसील जरी। भस्म एकसरीं वैरी होई ॥ ८ ॥
जगताचेसाठीं स्वयें विष प्याला। नीलकण्ठ भला शोभतसे ॥ ९ ॥
भगीरथ आणि गंगा अवनीवरी। घेत निजशिरीं सदाशिव ॥ १० ॥
भोळा देव त्याचें अमित भोळेपण। सुलभकोप जाण सदाशिव ॥ ११ ॥
खेळतां उमेसीं विनोद घडला। सहज कोपला हार येतां ॥ १२ ॥
चिडोनियां जाई गिरीकंदरासीं। चिंता गिरिजेसीं प्राप्त झाली ॥ १३ ॥
लावोनी समाधि तपासि बैसला। उघडिना भला निजनेत्र ॥ १४ ॥
भिल्लीणीचा वेष घेवोनि पार्वती। सखीयां सांगाती तेथें जाई ॥ १५ ॥
परम वेल्हाळ नटली गिरिजा। शृंगाराच्या चोजा कोण वर्णी ॥ १६ ॥

नटुनी शृंगारें तेथें नृत्य करी । गातसे कुसरीं उमादेवी ॥ १७ ॥
भुलविला शंभु चळविलें ध्यान । भुलविलें मन बैराग्याचें ॥ १८ ॥
पाठीलागे मग दाढी मिशावाला । दीनवाणा झाला आसक्त तो ॥१९॥
आंगालागीं असे राख फांसीयेली । उडी घेत भली तिच्या पदीं ॥२०॥
तों तीं नेत्र मोडी कटाक्षानें विन्धी। मन्मथाचा व्याधि बाधे थोर॥२१॥
फसवोनि ऐसा कैलासीं आणिला । स्थानीं बैसविला सदाशिव ॥ २२ ॥
भिल्लीणीचें रूप टाकोनियां सती । निजरूपाप्रति दावित ती ॥ २३ ॥
देखतां पार्वती परम लाजला । भोळेपणा भला अनिवार ॥ २४ ॥
अमर्याद भोळा सहज फसतो । सर्वस्व हरतो सदा शंभु ॥ २५ ॥
अल्पही जरी सेवा घडली तयाची । बहुत मोलाची होत असे ॥ २६ ॥
अनिवार फळ देत सदाशिव । त्याचा भोळा भाव भक्तांपाशीं ॥ २७ ॥
विनायक म्हणे भजावा तो शिव । मग होई शिव सर्वदाही ॥ २८ ॥

## ( ४२ )

# धांवा

गुरुवार ता० २७।२।१९३०

क्षमा व्हावी नाथा माझे अपराधां । मज पापबाधा होवों नेदी ॥ १ ॥
मज न बाधावें दुरित वा कांहीं । कृपें लवलाहीं निवारावें ॥ २ ॥
याचसाठीं नाथा धरिले चरण । तुज लोटांगण घालीतसें ॥ ३ ॥
आश्रय मी केला तुझा गुरुराया । शरण होवोनियां तुझे पायां ॥ ४ ॥
लपवीं, पाठीसीं मजलागीं घाल । अज्ञान मी बाल तूझा असें ॥ ५ ॥
तूजपाशीं दया तूं तो करुणामूर्ति । क्षमा तूं श्रीपति मज करीं ॥ ६ ॥
तुवां अव्हेरितां मग म्यां कोठें जावें । कोणा आश्रयावें सांग दत्ता॥७॥
विश्वास धरोनि धरिली तुझी कांस। माझी आतां आस पुरवीं दत्ता॥८॥
मज क्षमा करीं मज पाठीं घाली । मजला अघालि बाधों नेदी ॥ ९ ॥
तूझीया कृपेनें होईल अघनाश । ऐसा जगदीश भाव माझा ॥ १० ॥
माझ्या हृदयांत तुझा असे प्रकाश।मी तो सावकाश अनुभवीतों ॥११॥
सुखाची तूं मूर्ति मूर्त तूं आनंद । सन्मुख वरद मज सदा ॥ १२ ॥

कूर्म दृष्टीसम करिसी तूं देवा । सुख माझ्या जीवा सदा देसी ॥ १३ ॥
अमृताचें स्नान अमृताचें पान । मज दयाघन तुझी दृष्टी ॥ १४ ॥
परम कृपेची परम सुखाची । परम आनंदाची तुझी दृष्टी ॥ १५ ॥

( ४३ )

## कृतज्ञता वचन

( प्रवचनांत केलेले अभंग )

कोण बाबाचे बोलेल वर्णन । अशक्य दयाघन मज वाटे ॥ १ ॥
कृपेचा अनुभव मुखें बोलवेना । तुज दयाघना सांगूं काय ॥ २ ॥
भरोनियां आलें माझें हें हृदय । तुझे शिरीं पाय धरितों मी ॥ ३ ॥
मनानें लोळतों तुझे पायावरी । सुख तें अंतरीं किती सांगूं ॥ ४ ॥
वाचेचा तो नोहे नोहे बा विषय । जाणील हृदय अनुभावें ॥ ५ ॥
विनायक म्हणे कृतज्ञ मी देवा । तुज वासुदेवा शरण आहें ॥ ६ ॥

( ४४ )

## कृतज्ञता वचन

लडिवाळपणें देवा मी बोलतों । भाव कळवितों माझा तुज ॥ १ ॥
जननीहुनी थोर नातें तुझें देवा । त्या प्रेमानुभवा काय बोलूं ॥ २ ॥
सांपडला ठाव आधार मिळाला । मज अनाथाला वासुदेवा ॥ ३ ॥
विनायक म्हणे केला त्वां बनाव । माझें मी वैभव काय बोलूं ॥ ४ ॥

( ४५ )

## कृतज्ञता वचन

पुन्हां पुन्हां किती बोलूं अनुभव । हृदयींचा भाव उचंबळे ॥ १ ॥
अमृताचा करीं वर्षाव हृदयीं । सुखस्पर्श होई हृदयाला ॥ २ ॥

सुखमय होत दृष्टीचा विषय । विचारांसीं होय प्राप्तदिशा ॥ ३ ॥
सुखाचा विचार सुखाचा तरंग । होतसे अभंग हृदयांत ॥ ४ ॥
सुखाची जे सोय मज प्राप्त झाली । बोलावी ती भली काय आतां ॥५॥
विनायक म्हणे कृतज्ञ बनोनी । चरण तुझे दोन्ही शिरीं घेत ॥ ६ ॥

## ( ४६ )

## ईश्वराचें विनायकास सहाय्य

सांगावें हें नाथा कोणी कृत्य केलें । तुजवीण भलें वासुदेवा ॥ १ ॥
कोणी माझा देह निरामय केला । कोणी प्रसन्नतेला मज दिलें ॥ २ ॥
कोणी दिली मज सद्गुरूची काठी । धैर्यवृत्ति गोमटी कोणी दिली ॥३॥
कोणी मज केलें बेहोष कार्यांत । कोणी मज निश्चिंत ठेवियेलें ॥ ४ ॥
अहोरात्र सेवा कोणी करविली । साधनें जमविलीं कोणी सांग ॥ ५ ॥
कोणी शिजविलें अन्न या कार्यांत । कोण राहिलें गात आनंदानें ॥ ६ ॥
कोणी वाजविलें कोणी वा गाईलें । पुष्पातें आणिलें कोणी सांग ॥ ७ ॥
कोणी बिल्वपत्र येथें वा आणिलें । कोणी सांग केलें सिद्धतेला ॥ ८ ॥
कोणी सांग येथें चंदन उगाळिलें । शिरासि वाहिलें पाणी कोणी ॥ ९ ॥
कोण सांग येथें कार्यांत खपलें । शिरावरी घेतलें कोणी सांग ॥ १० ॥
कोणी याची चिंता वाहिली ती सांग । कोणी केला रंग कार्यांत या ११
तूंच सर्व केलें मनानें घेतलें । मजला पटलें पुरुषोत्तमा ॥ १२ ॥
विनायक म्हणे माझें हें वैभव । श्रीगुरुवासुदेव नित्य राख ॥ १३ ॥

## ( ४७ )

## गुरुकार्यासाठीं स्वार्थत्याग

गुरुवार ता. ६।३।१९३०

देव कार्यासाठीं तन मन धन । सदैव अर्पून झटावें कीं ॥ १ ॥
अशक्य शक्यांचा विचार नसावा । विश्वास धरावा गुरुपदीं ॥ २ ॥

बळें उडी घाला संकट पातल्या । जीविता आपल्या भिऊं नका ॥ ३ ॥
देह पडो राहो गुरुकार्य साधा । परिकर बांधा दृढ सुज्ञ ॥ ४ ॥
अग्निवरोनियां चालणें जरी आलें । पाहिजे चाललें गुरुकार्यीं ॥ ५ ॥
समुद्रांत उडी घ्यावया धजावें । परी कार्य साधावें गुरुजीचें ॥ ६ ॥
ममता देहाची पुत्रदारादींची । धरूं नये साची गुरुकार्यीं ॥ ७ ॥
क्षण हें जीवित भंगुर संसार । लोभातें साचार धरूं नका ॥ ८ ॥
धैर्यशाली वीर होवोनि झुंजावें । मागें न राहावें प्राण गेल्या ॥ ९ ॥
गुरुकार्यो कधीं विन्मुख न व्हावें । शौर्यपटु व्हावें तेथें सदा ॥ १० ॥
विनायक म्हणे उत्साह धरावा । कधीं न भंगावा प्राणांतींही ॥ ११ ॥

( ४८ )

## गुरुकार्यासाठीं स्वार्थत्याग

गृहसुतदारा पशुधन यांची । सांड करीं साची गुरुकार्यीं ॥ १ ॥
देहावरी ठेवीं धैर्यें तुलसीपत्र । तेणें इहपरत्र गति तूज ॥ २ ॥
सकळ इंद्रियांचा न्यास गुरुकार्यीं । धैर्य तूं हृदयीं धरुनी करीं ॥ ३ ॥
क्षुधा तृषा सर्व विसरोनि जाईं । द्वन्द्वमुक्त होईं गुरुकार्यीं ॥ ४ ॥
मन कर सारें गुरुकार्यमय । बुद्धि गुरुमय करीं बारे ॥ ५ ॥
विनायक म्हणे सद्गुरूचा दास । न भिये कोणास कल्पान्तींही ॥ ६ ॥

( ४९ )

## दत्तमयत्रिभुवन

गुरुमय संसार हा । करुनी तूं सुखें रहा ॥ १ ॥
क्षुधा तृषा गुरुमय । काम भोग गुरुमय ॥ २ ॥
आहार विहार कीं सारे । गुरुमय करीं बारे ॥ ३ ॥
जगणें तूझें गुरुसाठीं । नोहे विषयभोगासाठीं ॥ ४ ॥
विश्रांति तुज गुरुपाशीं । करिं त्याच्या चिन्तनासीं ॥ ५ ॥

जीविंचा तो तुझा देव । विसावा तो गुरुदेव ॥ ६ ॥
प्राणाचा तो प्राण असे । तूजठायीं वसतसे ॥ ७ ॥
त्रिभुवनीं तोच आहे । विवेकानें त्यास पाहे ॥ ८ ॥
विनायक म्हणे भरला । ब्रह्माण्डांत देव भला ॥ ९ ॥

( ५० )

## दत्तमय त्रिभुवन

प्रेमें करीं कीर्तनाला । गाईं त्याच्या चरित्राला ॥ १ ॥
अनुबंध तेथें धरीं । वर्णनातें रस भरीं ॥ २ ॥
यश गाईं सदा त्याचें । भाजन तें अमृताचें ॥ ३ ॥
तन्मय होवोनियां राहीं । निजहृदयीं त्यास पाहीं ॥ ४ ॥
विनायक म्हणे रंग । करुनि होईं त्यांत दंग ॥ ५ ॥

( ५१ )

## दत्तमय त्रिभुवन

दत्त दत्त ऐसें बोला । दत्तनामें नित्य डोला ॥ १ ॥
हृदयांत दत्तनाम । करुनी वसो नित्य धाम ॥ २ ॥
वसो नित्य श्रवणांत । वसो नित्य रसनेंत ॥ ३ ॥
नित्य वसो अंतःकरणीं । नित्य वदो तेंच वाणी ॥ ४ ॥
दत्तनामाचा कीं छंद । त्यांत होवो तुज आनंद ॥ ५ ॥
दत्तनामें पूर्णकाम । तृप्ति येतसे परम ॥ ६ ॥
दत्त झगटे अंगासीं । दत्त स्फुरे हृदयासीं ॥ ७ ॥
दत्तमय होय काया । शुद्ध नाहीं मग तया ॥ ८ ॥
अंतर्बाह्य दत्त होतो । दत्ताठायीं प्रकाशतो ॥ ९ ॥
दत्तमय त्रिभुवन । ऐक्य जातसे होऊन ॥ १० ॥
विनायक दत्तमय । स्मरतां झाला त्याचे पाय ॥ ११ ॥

( ५२ )

# तमाशा

गुरुवार ता० १३।३।१९३०

तमाशा हा आहे मांडिला वैऱ्यांनीं । ओळख तूं मनीं सुज्ञ मना ॥ १ ॥
मायेचे हे बाळ जगताचे काळ । मांडियेला खेळ भुलवाया ॥ २ ॥
काम सजविला नारी वेषधारी । हाव भाव तरी करी फार ॥ ३ ॥
सकल शृंगार करुनि चवचाल । नटला बेताल मदन हा ॥ ४ ॥
वांकुड्या भ्रुकुटी नेत्रांतें मोडितो । संकेत दावितो सुरताचा ॥ ५ ॥
खुलावट मोठी हृदय विंधीतो । कानांत भरितो मृदु नाद ॥ ६ ॥
पदर सांवरी नर्तनातें करी । अंगुली अधरीं धरीतसे ॥ ७ ॥
पदरानें झांकी निजमुख क्षणें । मुरका मारी क्षणें खेळ करी ॥ ८ ॥
सजोनियां आला सर्व सोपस्कार । प्रेरित प्रखर दृष्टिबाण ॥ ९ ॥
मोह मृदुंगातें मृदुल वाजवी । डफ फडाडवी क्रोध बळें ॥ १० ॥
छुमछुम ध्वनि लोभ काढितसे । मनें मोहितसे प्राणीयांचीं ॥ ११ ॥
तात्या बापु जाणा मदमत्सर हे । तमाशा हा पाहे रंगतसे ॥ १२ ॥
तमाशांत रंगे जो का मूर्ख नर । रंगामाजी भर येवोनियां ॥ १३ ॥
सर्वस्वाचा नाश होई मग त्याचा । होतां तैसा साचा बोंबा मारी ॥ १४ ॥
ठोकितो आरोळी सर्वस्व पेटतां । करित पूर्तता शिव्याशापें ॥ १५ ॥
मग बीभत्साचा रस उदया येतो । अश्लील वदतो बहुपरी ॥ १६ ॥
ऐसा हा शिमगा मूर्त बीभत्साचा । प्रतीक कीं साचा उभारत ॥ १७ ॥
म्हणुनीयां मना विवेकातें धरीं । ओळख अंतरीं तमाशातें ॥ १८ ॥
नारीनो हे आहे लबाडी ही सारी । लोभ तूं अंतरीं धरूं नको ॥ १९ ॥
आहे हा पुरुष तुज फसावितो । फजिती करितो ओळखरे ॥ २० ॥
फसावित तुज रुधिर प्राशीत । राक्षस केवळ भयानक ॥ २१ ॥
मोहक रूपासीं भुलूं नको जीवा । आपुल्या स्वभावा प्रगटील ॥ २२ ॥
पिउनियां रक्त शुष्क तो करिल । मग तो हाणील लत्ता शिरीं ॥ २३ ॥
अवघे हे खेळी कामाचे सांगाती । शरीर भक्षिती तुझें नरा ॥ २४ ॥

गिधाडें हीं शुद्ध मांस भक्षक हे। दैत्य ओळख हे काकदृष्टी ॥ २५ ॥
नादीं भरूं नको नको हा तमाशा। सोडीं हे दुराशा कामस्त्रीची ॥ २६ ॥
तम म्हणिजे तें अज्ञान जाणिजे। कशाला सेविजे तदाशेतें ॥ २७ ॥
अज्ञानाची आशा सोडुनीयां देईं। जागा तूं रे होईं सोडीं निद्रा ॥ २८ ॥
मोहाला तूं बळी नको पडूं नरा। विवेक दृष्टी जरा उघडी तूं ॥ २९ ॥
भौतिक हे नेत्र सगुणीं भुलती। सृष्टींत रमती देखणेपणीं ॥ ३० ॥
परी शिवाचा जो तृतीय नयन। विवेक जो ज्ञानरूप आहे ॥ ३१ ॥
तोच उघडुनी जरी पहाशील। भस्म करशील मदनातें ॥ ३२ ॥
जळेल तो डफ जळेल मृदुंग। होय रसभंग खेळीयांचा ॥ ३३ ॥
पळतील सारे होय विटंबना। मदनदहना साधितांची ॥ ३४ ॥
हरपेल क्रोध लोभ तो गळत। मोह शुष्क होत एकसरें ॥ ३५ ॥
मदमत्सर हे पळोनी निघती। पळोनियां जाती दूरवरी ॥ ३६ ॥
ऐसा करी नरा शिमगा तयांचा। तमाशा दावी साचा जनालागीं ॥ ३७ ॥
विवेक दृष्टीचें सामर्थ्य दावावें। तुवां प्रगटवावें सक्रिय कीं ॥ ३८ ॥
विनायक म्हणे बोंबाबोंब करा। मदनासीं थारा देऊं नका ॥ ३९ ॥

( ५३ )

## तमाशा

खेळ शिमग्याचा पहा। सावध अंतरांत रहा ॥ १ ॥
रंगु नको त्या खेळांत। पडूं नको त्या मोहांत ॥ २ ॥
जागेपणीं खेळ पहा। ओळख अनर्थ हा महा ॥ ३ ॥
कैशापरी सजतसे। तुजपुढें जाचतसे ॥ ४ ॥
हावभाव कैसे दावी। कैसें तुजला फसवी ॥ ५ ॥
खोटा करूनि हा खेळ। मूर्त राक्षस केवळ ॥ ६ ॥
आला भक्षाया तुजसीं। ओळखावें तरी त्यासीं ॥ ७ ॥
अवघे त्याचे हे सोंगडी। घालती पहा कैसी फुगडी ॥ ८ ॥
तूज धराया पातले। तूज भक्षाया टपले ॥ ९ ॥
मान तूझी मोडतील। मांस तूझें भक्षितील ॥ १० ॥

राहूनी जागा तूं मानवा । पेटवी रे तूं वणवा ॥ ११ ॥
तृतीय नेत्र तूं उघडी । अग्निस्फुलिंगांतें पाडी ॥ १२ ॥
एकसरें भस्म होती । कैसे पहा तडफडती ॥ १३ ॥
पेटवीं रे होमकुंड । जाळीं जाळीं जाळीं भंड ॥ १४ ॥
ऐसा करीं तूं तमाशा । त्यांचाच कीं तूं जीवेशा ॥ १५ ॥
विनायक म्हणे मेख । विवेकाची तूं रे देख ॥ १६ ॥

( ५४ )

## ईश्वर आणि भक्त

गुरुवार ता. २०।३।१९३०

प्राणाहुनी प्रिय भक्त ईश्वरासीं । निजांगें कार्यासी साधीतसे ॥ १ ॥
कौतुक तयांचें तयाला बहुत । काया श्रमवित त्यांचेसाठीं ॥ २ ॥
भक्त भजनातें करिती प्रेमानें । आपण तोखानें नाचतसे ॥ ३ ॥
रंग भरवित स्तुति वदवीत । प्रेम स्फुरवीत मूर्तरूपें ॥ ४ ॥
कौतुक तयाला स्तुति गायकांचें । आपुलीया वाचे वदतसे ॥ ५ ॥
ताल धरीतसे साथ करीतसे । चोज मांडितसे कवित्वाचें ॥ ६ ॥
वाहवा म्हणतसे स्वयें रंगतसे । पाठीं उभा असे भक्ताचीया ॥ ७ ॥
विनायक म्हणे भक्तापाशीं वास । पसंत तयास बहु वाटे ॥ ८ ॥

( ५५ )

## ईश्वर आणि भक्त

भक्त पूजा करीत या ईश्वराची । पूर्ती साधनांची तोच करी ॥ १ ॥
पत्र पुष्प फळ आपण आणीतो । स्वयें उगाळीतो चंदनासीं ॥ २ ॥
आपुली आपण पूजा करवोन । घेत दयाघन भक्ता हातीं ॥ ३ ॥
आपण शृंगार सुंदर करवी । भक्तासीं रंजवी दयाळु तो ॥ ४ ॥
जैसें भक्तमन तैसा तो नटतो । बहु संतोषतो भक्तासवें ॥ ५ ॥

भक्त सेवा करी प्रेमानें देवाची । देव करी त्याची अहर्निश ॥ ६ ॥
साउलीसम उभा तयाचे पाठीसीं । भक्ताचे सेवेसीं सादर तो ॥ ७ ॥
पाणी भरीतसे उष्टीं काढीतसे । अन्न शिजवीतसे जगत्प्रभु ॥ ८ ॥
खेळवी मुलेंबाळें काढीत वेटाळीं । भक्ता कदाकाळीं विसंबेना ॥ ९ ॥
रोगभोग होतां शुश्रूषेतें करी । अकृत्यही सारी कृत्य देव ॥ १० ॥
मलिन वस्त्रें त्याचीं स्वयें धुवीतसे । भोग काढीतसे त्याचा स्वयें ॥११॥
तया भरवीतो औषधें पाजितो । आरोग्यातें देतो स्वयें देव ॥ १२ ॥
वाटेल ती सेवा करितो आपण । परि गुप्तपण राखीतसे ॥ १३ ॥
समजुं न देतां भक्तासीं सेवितो । आपण काढितो कष्ट त्याचे ॥ १४ ॥
विनायक म्हणे कृपाळू तो देव । अपुलें वैभव विसरतो ॥ १५ ॥

(५६)

## ईश्वर आणि भक्त

आम्हांपाशीं देव आम्हीं देवापाशीं । कधीं वियोगासीं पडों नेदी ॥ १ ॥
जेथें तेथें आहे उभा नारायण । त्याचें सिद्धपण सर्वदाचें ॥ २ ॥
कदा विसंबेना दूर तो होईना । दृष्टि आड करिना कधीं भक्तां ॥ ३ ॥
जैसें चित्त निज बालकीं मातेचें । त्याहूनीयां साचें त्याचें असे ॥ ४ ॥
लाड पुरवाया सदा तो सादर । त्याचा चमत्कार वदूं काय ॥ ५ ॥
आम्हीं लडिवाळ त्याच्या जिव्हाळ्याचे । परम प्रेमाचे आम्हीं त्यासीं ॥६
आम्हांवरी कृपा दया क्षमा थोर । कोप आम्हांवर कदा नसे ॥ ७ ॥
चुकलों आम्हीं जरी करीतसे चोज । तया नाहीं लाज प्रेमास्तव ॥८॥
आमुचा विकला गुलाम बनला । आमुच्या हौसेला पूर्ण करी ॥ ९ ॥
जें जें मनीं येतें तें तें पुरवीतो । आम्हांसीं पोषितो सर्वपरी ॥ १० ॥
विनायक म्हणे देव जिवलग । त्याची लगबग आम्हांसाठीं ॥ ११ ॥

( ५७ )

## विनायकाचा संकल्प

रंग देवा भरवावा । आम्हां द्यावा प्रेममेवा ॥ १ ॥
बहुजन्माचे भुकेलों । भजनासीं आर्त झालों ॥ २ ॥
प्रेमामृत लाभलें न । आजवरी दयाघन ॥ ३ ॥
बहुजन्म वायां गेले । नाहीं सौख्य हें मिळालें ॥ ४ ॥
अमृताचा नाहीं झाला । लाभ कधीं या जीवाला ॥ ५ ॥
प्रेमासाठीं भुकेलोंसें । भजन तूझें मागतसें ॥ ६ ॥
आवडीनें गाईन मी । देहभाव सांडीन मी ॥ ७ ॥
रंगीं रंग भरीन मी । रंगोनियां जाईन मी ॥ ८ ॥
स्वर्ग करीन हा ठाव । आणिन वैकुंठ-वैभव ॥ ९ ॥
नाचवीन येथें देव । ऐसा माझा मनोभाव ॥ १० ॥
परब्रह्म लुटीन मी । पावेनचि सर्वस्वा मी ॥ ११ ॥
गांठिन वैभव शिखर । होउन राहीन ईश्वर ॥ १२ ॥
ऐसें आहे माझें ध्येय । म्हणुन धरीयेले पाय ॥ १३ ॥
पराकाष्ठा माझी ऐसी । लुटवीन अमृतासीं ॥ १४ ॥
प्रेममय होईन मी । रंगवीन जनांसीं मी ॥ १५ ॥
देइन प्रेमानुभवासीं । प्रेममय करिन त्यांसीं ॥ १६ ॥
करिन हेंच वैकुंठ । माझी इच्छा अविकुण्ठ ॥ १७ ॥
संकल्प विनायकाचा । सिद्ध करिल देव साचा ॥ १८ ॥

( ५८ )

## भक्ताभिमानी देव

गुरुवार ता. २७।३।१९३०

अभिमान कोणा तुजविण दत्ता । कोणा असे सत्ता त्रैलोक्यांत ॥ १ ॥
कोण आतुर्बळी सांग तुजवीण । करिल रक्षण कोण ऐसा ॥ २ ॥

यमाचे छातींत कोण लत्ता मारी । काळातें संहारी कोण सांग ॥ ३ ॥
कोण भक्तालागीं पाठीसीं । कोण कळवळेल तुजवीण ॥ ४ ॥
भक्तासाठीं कोण होईल घाबरा । तुजाविण उदारा सांग मज ॥ ५ ॥
द्रौपदीची निरी स्पर्शतां दुष्टानें । उतावेिळ मनें कोण झाला ॥ ६ ॥
कोण झाला वस्त्रें जडरूपसांग । झांकियेलें अंग कोणें तेव्हां ॥ ७ ॥
पाण्डव वधास्तव दुर्वासा पातला । मध्यरात्रीं भला कारणिक ॥ ८ ॥
दुर्योधनें केली होती शिकवण । कोपिष्ट दारुण पातला तो ॥ ९ ॥
शापें भस्म करायासीं पाण्डवासीं । सत्व हरायासिं मुनि आला ॥१०॥
तेव्हां कोण सांग कळवळला देव । अन्नाचा वर्षाव कोणी केला ॥११॥
कोण अन्नरूप बनला तेधवां । प्रेमाच्या वैभवा प्रसवला ॥ १२ ॥
विनायक म्हणे कैवारी भक्तांचा । तुजविण साचा कोण जगीं ॥ १३ ॥

( ५९ )

# भीष्म प्रतिज्ञा

भारती युद्धांत भीष्म प्रतिज्ञा करी । पाण्डवां साचारीं मारीन मी ॥ १ ॥
अपुल्या शिबिरांत बोले पितामह । कोणासीं सन्देह तेव्हां पडे ॥ २ ॥
दूतमुखें वार्ता ऐकतां श्रवणीं । कोणा अंतःकरणीं पीडा झाली ॥ ३ ॥
कोण गडबडला पाण्डवांचे साठीं । सांग जगजेठी तुजवीण ॥ ४ ॥
कोणें द्रौपदीसीं भीष्मपदांवरी । नेउनी शिबिरीं घातलें बा ॥ ५ ॥
विचारितां तयें गडी द्रौपदीचा । कोण अशि वाचा बोलियेला ॥ ६ ॥
सांडुनियां लाज झालासि चाकर । भक्तांचा साचार दत्तात्रेया ॥ ७ ॥
विनायक म्हणे माझा अभिमान । कोण दयाघन तुजवीण ॥ ८ ॥

( ६० )

# ईश्वराची भक्तांशीं ऐक्यता

म्हणतोसी सदा भक्त मजप्रिय । वाहिलें हृदय भक्तांलागीं ॥ १ ॥
भक्तांवीण माझा जीव कासाविस । पाहतां भक्तांस हर्ष मज ॥ २ ॥

जेथें माझे भक्त तेथें मीं वसतों । ताटांत जेवितों त्यांच्याच मी ॥ ३ ॥
त्यांचे पुढें निद्रा करितों प्रेमानें । आसनें शयनें आम्हीं एक ॥ ४ ॥
भक्तांपाशीं नाहीं मज दुजाभाव । सदा एकभाव मज भक्तां ॥ ५ ॥
भक्तांच्या मुखानें बोलतों जेवितों । श्रवण करितों त्यांच्या कानें ॥ ६ ॥
भक्तनयनानीं जग हें पाहतों । भक्तरूप होतों समरस ॥ ७ ॥
भक्तइंद्रियांत माझा असे वास । त्यांचिया चित्तास बंध माझा ॥ ८ ॥
बुद्धि मन आणि इंद्रियें भक्तांचीं । तींच माझीं साचीं जाणावीं कीं॥९॥
जो का अहंकार माझिये भक्तांचा। तोच असे साचा माझा जाणा॥१०॥
नाहीं आम्हां कधीं भिन्नत्व जाणावें । ऐक्यचि स्वभावें देवा-भक्तां॥११॥
माझा मज नाहीं मुळिं अभिमान । सकळ स्वाधीन भक्तांच्याच ॥१२॥
रक्षीन भक्तांसीं प्रतिज्ञा साचार । असत्य निर्धार कधीं नोहे ॥ १३ ॥
माझें सुखदुःख भक्तांचे आधीन । गेलों मीं गोंवून भक्तांमाजि ॥ १४ ॥
विनायक म्हणे देवा तुझे बोल । न करीं हे फोल कृपाळुवा ॥ १५ ॥

( ६१ )

# ईश्वरास लाज राखण्याबद्दल प्रार्थना

तळमळ माझी कोणबा हरील । उडी बा घेईल कोण आतां ॥ १ ॥
तरी आतां देवा धांव झडकरी । लाज माझी तरी राख आतां ॥ २ ॥
ग्वाही केली आहे तुझ्या वैभवाची । कितीतरी साची आजवरी ॥ ३ ॥
किती तरी तुझें सामर्थ्य गाईलें । लोकां सांगितलें तुझें वर्म ॥ ४ ॥
उपदेश केला आहे आजवरी । तुझ्या नामें तरी जगदीशा ॥ ५ ॥
विश्वास ठेवितां दृढ देवावरी । मग तो न मारी कदाकाळीं ॥ ६ ॥
रोग भोग दुःख सकळ निवारी । निजांगें मुरारी सांगितलें ॥ ७ ॥
दृष्टांत कथिले आण भाक केली । तुझ्या नामें भली जगन्नाथा॥ ८ ॥
विश्वासोनी दृढ नाथा तुझ्या ठायीं । बोलिलों उपायीं तुझें यश ॥ ९ ॥
सांगितलें यश भक्ती बोधियेली । कांस धरा भली ईश्वराची ॥ १० ॥
म्हणोनि कथन केलें मी लोकांत । तेणें कीर्ति ख्यात तुझी नाथा ॥११॥
बट्टा नको लावूं माझीया बोलासीं । वाणी असत्यासीं आणूं नको ॥१२॥

माझी नोहे वाणी वाणी ही तुझीच । बोलली तुझेंच यश देवा ॥ १३ ॥
तरी सत्य करीं संकल्प आपुला । मजला दयाळा रक्षीं रक्षीं ॥ १४ ॥
भावडा मी बहु बोलोनियां गेलों। तुझे पायीं आलों आतां देवा ॥ १५ ॥
सत्य करीं माझें वचन गुरुनाथा। पायीं मी समर्था शरण आहें ॥ १६ ॥
मिठी मारीतसें तुझे कमरेसीं । वांचवी दीनासीं जगत्प्रभु ॥ १७ ॥
महासंकट हें पातलें दारुण । आतां नारायण वांचवावें ॥ १८ ॥
फजिती होईल माझी या जगांत। जाईल नाथा पत माझी आतां ॥ १९ ॥
फजितखोर नको करूं मजलागीं । तुझें यश जगीं विस्तरीं तूं ॥ २० ॥
फोल नको करूं देवा माझे बोल । आतां तूं दयाळ उडी घालीं ॥ २१ ॥
घाबरलों बहु उरला न आसरा । आतां न दुसरा कोण त्राता ॥ २२ ॥
भयें तुझ्या पाठीं रिघालों मी नाथा। तरी तूं समर्था कृपा करीं ॥ २३ ॥
चुकलों मी जरी आतां तूं सांभाळ। दीनाचा दयाळ म्हणती तूज ॥ २४ ॥
तुझ्या नामें केली बहु मी गर्जना। दिधलें वचना तुझ्या नामें ॥ २५ ॥
तुझी पत देवा लाविली पणासीं। वांचवि दीनासीं दत्तात्रेया ॥ २६ ॥
अनुपम आहे संकट हें नाथा। श्रीगुरु समर्था वांचवावें ॥ २७ ॥
लाज राख माझी राख अभिमान। आतां कृपाघन गुरुराया ॥ २८ ॥
गडबडां तुझे पायांसीं लोळतों। मुखासी पाहतों केविलवाणें ॥ २९ ॥
द्रवो हें हृदय जैसें नवनीत । मृदुल असे ख्यात जगत्रयीं ॥ ३० ॥
विनायक झाला दीन हा दुबळा। आतां तूं स्नेहाळा वांचवीं या ॥ ३१ ॥

(६२)

# ईश्वरास लाज राखण्याबद्दल प्रार्थना

लाज राख या स्थानाची । तैशी तुझ्या उपासनेची ॥ १ ॥
राख राख निजकीर्ति । निजयश जगत्पति ॥ २ ॥
संकट महा ओढवलें । मन माझें घाबरलें ॥ ३ ॥
तुजवीण मज ठाव । कोठें नाहीं वासुदेव ॥ ४ ॥
मज पाठीसीं घातलें । तुवां असे देवा भलें ॥ ५ ॥

तरी आतां राख लाज । वाढवावें माझें चोज ॥ ६ ॥
तुझ्या पाठीसीं रिघालों । भयभीत असें झालों ॥ ७ ॥
गळला माझा अहंकार । झालों असें निरहंकार ॥ ८ ॥
तरी आतां वाचवावें । मजसाठीं धावूनि यावें ॥ ९ ॥
उडी घाल स्थानासाठीं । उडी घाल भक्तांसाठीं ॥ १० ॥
उडी घाल यशासाठीं । उडी घाल कीर्तिसाठीं ॥ ११ ॥
उडी घाल ब्रीदासाठीं । उडी घाल वचनासाठीं ॥ १२ ॥
उडी घाल धर्मासाठीं । तैशी तुझ्या उपासनेसाठीं ॥ १३ ॥
उडी घाल भजनासाठीं । उडी घाल प्रेमासाठीं ॥ १४ ॥
वात्सल्याचे साठीं देवा । उडी घाल वासुदेवा ॥ १५ ॥
सत्यासाठीं उडी घाल । पुण्यासाठीं उडी घाल ॥ १६ ॥
भक्तीसाठीं उडी घाल । मजसाठीं उडी घाल ॥ १७ ॥
घाबरा मीं बहु झालों । तुज शरण असें आलों ॥ १८ ॥
तरी आतां कृपा करणें । मजसाठीं नाथ धांवणें ॥ १९ ॥
माझ्या विश्वासाचें तारूं । तूंच एक जगद्गुरु ॥ २० ॥
माझे हृदयींचा आधार । तूंच एक अवनीवर ॥ २१ ॥
तरी आतां धांव येईं । मजसाठीं गुरुमाई ॥ २२ ॥
धांव आतां लवलाहीं । माझ्यासाठीं माझे आई ॥ २३ ॥
करीं आतां साक्षात्कार । दावीं येथें चमत्कार ॥ २४ ॥
विनायक उतावीळ । याचा करावा सांभाळ ॥ २५ ॥

( ६३ )

# विश्वामित्र-मख-रक्षण

गुरुवार ता. ३।४।१९३०

सिद्धाश्रम पद-वैभवासीं देवा । येथें प्रगटवा दयानिधे ॥ १ ॥
लोकसंग्रहार्थ धर्मस्थापनार्थ । प्रगट अत्यर्थ स्थान ठेवा ॥ २ ॥
कलियुगीं घोर पातकीं प्रवृत्ति । बहुत आपत्ति ओढवती ॥ ३ ॥

उपासनामख रक्षाया कारण । करीं चापबाण घ्यावें नाथा ॥ ४ ॥
ताटका हे माया ईचे पुत्रबळी । माजविती कळी थोर येथें ॥ ५ ॥
मारीच सुबाहु मदमत्सर हे । आम्हांसीं विग्रहें पीडा देती ॥ ६ ॥
अनुष्टान सिद्ध न व्हाया कारण । विघ्नातें दारुण आणिताती ॥ ७ ॥
विध्वंसिती यज्ञ मायेचे कुमार । साहवेना मार यांचा आम्हां ॥ ८ ॥
नसतीच कळ पाठीसीं लाविती । चिंतेंत ठेविती सदा आम्हां ॥ ९ ॥
प्रेम विभांडीती भजन मोडीती । सेवा करूं न देती तूझी देवा ॥ १० ॥
महामाया घोर राक्षसी ताटका । तुझीये भजकां भेडसाविते ॥ ११ ॥
पुलस्तिं वंशभूत विश्रवसाचा सुत । वैश्रवण-भ्रात रावण जो ॥ १२ ॥
सहोदर त्याचा नामें कुंभकर्ण । राक्षस दारुण काम क्रोध ॥ १३ ॥
आम्हां बाधताती आम्हीं निरुपाय । धरियेले पाय तुझे दत्ता ॥ १४ ॥
विनायक म्हणे उपासना धर्म । रक्षीं पुरुषोत्तम कृपा करीं ॥ १५ ॥

## ( ६४ )

## विश्वामित्र-मख-रक्षण.

मखरक्षणासीं गाधिचा तनय । शरण तुम्हां होय जगद्वंद्य ॥ १ ॥
तुमचा अवतार दशरथवंशीं । वार्ता ऐके ऐशी कौशिक तो ॥ २ ॥
अयोध्येसीं जाय भेटे दशरथा । आपुलिया अर्था सांगतसे ॥ ३ ॥
तुझा पुत्र राम मखरक्षणासीं । आलों मागायासीं म्हणे विप्र ॥ ४ ॥
अवतार आहे विष्णुचा हा राम । आला पूर्णकाम धर्मासाठीं ॥ ५ ॥
यज्ञ याग कर्म रक्षण कराया । धर्मातें स्थापाया देव आला ॥ ६ ॥
म्हणोनि मागणी घालितों रामासीं । मख रक्षायासीं देईं नृपा ॥ ७ ॥
ऐसे मागोनियां रामलक्ष्मण । यज्ञाचे कारण नेत असे ॥ ८ ॥
ताटिकेचा वध साधाया कारण । शिरत आपण तिचे वनीं ॥ ९ ॥
राम हस्तें केला वध त्या दुष्टेचा । कार्यभाग साचा साधियेला ॥ १० ॥
सिद्धाश्रमीं नेत रामलक्ष्मण । हातीं चाप बाण देत त्यांच्या ॥ ११ ॥
सहा दिवसांचें मांडी अनुष्ठान । धरोनियां मौन कौशिक तो ॥ १२ ॥

रामलक्ष्मण करिती पहारा । सिद्ध निशाचरां वधावया ॥ १३ ॥
सहावे दिवशीं जेव्हां अग्नि प्रज्वाळीले । राक्षस लोटिले एकसरें ॥ १४ ॥
रुधिराचि वृष्टी यज्ञांत करिती । शिळा फेंकिताती घाणवस्तु ॥ १५ ॥
मानवास्त्रें राम मारीचा उडवी । समुद्रीं बुडवी तयालागीं ॥ १६ ॥
अग्न्यस्त्रानें जाळी सुबाहु राक्षस । वायवीयास्त्रास प्रेरी तरीं ॥ १७ ॥
निःशेष तेव्हां केले घोर निशाचर । अनुष्टान थोर सिद्ध झालें ॥ १८ ॥
विश्वामित्र मख रक्षणाकारण । सिद्ध देवा आपण झालां जैसे ॥ १९ ॥
याही स्थानासाठीं तैसें सिद्ध व्हावें । भजन करावें सिद्ध येथें ॥ २० ॥
विनायक म्हणे करा सिद्धस्थान । आपण प्रगटून येथें देवा ॥ २१ ॥

( ६५ )

# भजनयज्ञ-रक्षणार्थ विनंती

प्रगटता येथें धरा । गुरुराया आत्रिकुमरा ॥ १ ॥
विघ्नां आमुच्या निवारा । वैरी आमुचे संहारा ॥ २ ॥
अनुष्टान भजनाचें । सिद्ध करवावें साचें ॥ ३ ॥
नाम संकीर्तन यज्ञ । श्रेष्ठ म्हणताती तज्ज्ञ ॥ ४ ॥
कलियुगीं हेंच सार । हेंच पुण्य असे थोर ॥ ५ ॥
ऐसा आहे अभिप्राय । सकलांचा दत्तात्रेय ॥ ६ ॥
भजन यज्ञ सिद्ध करा । निज कृपें येथें उदारा ॥ ७ ॥
चापबाण घ्यावें हातीं । यज्ञासाठीं रमापती ॥ ८ ॥
रक्षण करा या स्थानाचें । रक्षण करा नाम यज्ञाचें ॥ ९ ॥
म्हणुनि पाय मी वंदितों पुन्हां पुन्हां मी प्रार्थितों ॥ १० ॥
नाथ प्रगट खचित व्हावें । निर्भय स्थान हें करावें ॥ ११ ॥
वैरी सर्व निवटावे । विघ्नांलागीं मुळीं नासावें ॥ १२ ॥
भय मृत्यु निवारावीं । क्षेमशान्ती आम्हां असावी ॥ १३ ॥
निरामयता आम्हां दासां । सदा असो हृन्निवासा ॥ १४ ॥
विनायक भरंवसा । तुमचाच जगन्निवासा ॥ १५ ॥

( ६६ )

## देवकार्यासाठीं धैर्य पाहिजे

गुरुवार ता० १०।४।१९३०

देवकार्य ज्यासीं करणें नेटानें । खंबीर मनानें तेणें व्हावें ॥ १ ॥
विघ्नालागीं तोंड द्यावयासिं लागे । बहु झटें मार्गें लागताती ॥ २ ॥
कोणी परीक्षार्थ कोणी शत्रुत्वानें । कोणी मोठेपणें झुंजों येती ॥ ३ ॥
दृढ निश्चयाची धरोनियां कांस । वाहुनी कार्यास घ्यावें लागे ॥ ४ ॥
ममता देहाची किंवा संपत्तिची । न ठेववे साची त्यासीं सदा ॥ ५ ॥
कधीं उपवासी कधीं अविश्रांत । क्रमावा लागत मार्ग तया ॥ ६ ॥
गिरिवनें येती आडवी तयासीं । झुंज सागरासी घडे त्याची ॥ ७ ॥
विनायक म्हणे जो कां धैर्यवन्त । सिद्धीला पावत तोच जगीं ॥ ८ ॥

( ६७ )

## देवकार्यासाठीं धैर्य पाहिजे

स्वामिकार्यासाठीं प्राणही अर्पण । करायासीं जाण सिद्ध जो का ॥ १ ॥
सुखदुःखाचा कीं जयासी विसर । पाणी स्वार्थावर सोडियेलें ॥ २ ॥
तनुमन धन सर्व ईशार्पण । करूनीयां जाण झटणारा ॥ ३ ॥
तोच कार्य साधी तोच धन्य होई । धैर्यें उडी घेई संकटांत ॥ ४ ॥
अग्निवरुनी चाले चढे पर्वतासीं । गोष्पद सिन्धूसीं जो कां करी ॥ ५ ॥
शिरे विवरांत उडे आकाशांत । धैर्यें झुंज घेत राक्षसांसीं ॥ ६ ॥
भूत पिशाच्चांसीं अंगावरी घेतो । शस्त्रांसीं न भितो जो कां जाणा ॥ ७ ॥
निश्चयानें जो का पूर्ण वज्रदेही । मन न संदेहीं कधीं ज्याचें ॥ ८ ॥
विनायक म्हणे तोच भाग्यवंत । निश्चयें साधित देवकार्य ॥ ९ ॥

(६८)

## देवं कार्यासाठीं नयज्ञतेची जरूरी–मारुतीचा दृष्टांत

बुद्धिबल तैसा थोर पराक्रम । याचें जें का धाम असे सदा ॥ १ ॥
देश काल आणि निमित्तां जाणता । ज्याची नयज्ञता अपूर्वची ॥ २ ॥
चतुर व्यवहारी पूर्ण जो शहाणा । ज्याचा दृढपणा अलौकिक ॥ ३ ॥
तोच कार्यकर्ता सिद्धीतें पावतो । तोच धन्य होतो जगत्रयीं ॥ ४ ॥
सीता शोधनार्थ एकला समर्थ । जाहला सिद्धार्थ वायुपुत्र ॥ ५ ॥
तनमनधन जेणें रामपायीं । अर्पोनी तत्कार्यीं झटला जो ॥ ६ ॥
दृष्टान्तासीं त्याचें योजुनी चरित । कार्य आचरित रहावें कीं ॥ ७ ॥
विनायक म्हणे तेणें सिद्ध कार्य । होईल निश्चय हा जाणावा ॥ ८ ॥

(६९)

## धांवा

गुरुवार ता० १७।४।१९३०

नाहींच का दया येणार तुम्हांला । नैष्ठुर्य मनाला शिवेल का ॥ १ ॥
काय होय अग्नि जलासम शीत । शर्करेचें जात मधुरपण ॥ २ ॥
जाळील काय पाणी काय त्याचा धर्म । मजलागीं वर्म कळेनाच ॥ ३ ॥
काय मृदुल पुष्पें शस्त्रांसम होतीं । अमृतें बनती विषासम ॥ ४ ॥
पवनाची गति काय बा कुंठेल । जड तो होईल काय सांग ॥ ५ ॥
काय नवनीत दगड बनेल । कपिला स्रवेल विष काय ॥ ६ ॥
काय अंधःकार झांकिल सूर्याला । उष्णता चंद्राला काय येई ॥ ७ ॥
काय जळचरें आकाशी उड्डाण । करतील जाण प्रभु दत्ता ॥ ८ ॥
नाहीं कधीं ऐसें ऐकियेलें कानीं । धर्म जात गळुनी धर्मीयांचा ॥ ९ ॥
ज्याचा जैसा धर्म तैसाच वागत । उणेंपण येत कधीं न तया ॥ १० ॥
कधीं न भिन्नता धर्मासीं घडत । स्वभाव प्रगटत कांहीं झाल्या ॥ ११ ॥
विनायक म्हणे काय दयाघना । शिवे तूझ्या मना कठोरपण ॥ १२ ॥

## ( ७० )

# कनवाळू देव

हृदय तुझें देवा जैसें नवनीत । भक्तांसीं द्रवत सर्वकाळीं ॥ १ ॥
भक्तां ताप होतां विरघळे मन । जासी कळवळोन कृपामूर्ति ॥ २ ॥
अंतःकरण तूझें दयेची कीं मूस । मूर्त दयारस सांठला कीं ॥ ३ ॥
हृदयकमळांत दया मकरंद । करीत निष्यन्द भक्तांसाठीं ॥ ४ ॥
आर्तरव कानीं पडतां तूझिया । आंच तव हृदया लागतसे ॥ ५ ॥
हृदयासीं धग लागतां गळत । बाहेर निघत दयारस ॥ ६ ॥
केवळ तूं दया प्रतिमा दयेची । दयाच कीं साची मूर्तिमंत ॥ ७ ॥
स्वभावधर्म दया दयेचि प्रतिभा । दयेचाच गाभा प्रगट कीं ॥ ८ ॥
तुज आठवितां दया मनीं येत । दया उभारत तुझ्यारूपीं ॥ ९ ॥
हांक मारितां तूज दयाच ओ देत। दया उभी रहात साक्षात्कारें ॥ १० ॥
तुझे गुण गातां दया प्रगटत । अभिमुखी होत दया नाथा ॥ ११ ॥
यश कीर्ति तुझी दयाच केवळ । दयाच विमल कांति तूझी ॥ १२ ॥
अधिष्ठान तूझें शुद्ध एक दया । तुजला सदया काय वानूं ॥ १३ ॥
विनायक म्हणे निर्दयता गुण । तुज नारायण जडे कैसा ॥ १४ ॥

## ( ७१ )

# कनवाळू देव-दृष्टांत

मारियेले दैत्य वैकुण्ठ्य स्थापिलें । महिमान भलें ख्यात लोकीं ॥ १ ॥
मूठभर पोहे सुदामा ब्राह्मण । करितां अर्पण काय केलें ॥ २ ॥
द्वारावती सम सुवर्ण नगरी । दिधली श्रीहरी निजकृपें ॥ ३ ॥
भिल्लीणीचीं बोरें उच्छिष्ट भक्षिसी । तिजलागीं नेसी निजधामीं ॥ ४ ॥
पद-रज तूझा अहिल्ये स्पर्शतां । शापविमुक्तता प्राप्त झाली ॥ ५ ॥
वैरियाचा भ्राता शरणागत होतां । तया अंगिकृतता केली तुवां ॥ ६ ॥

पांच वरुषाचें बालक वेल्हाळ। अंतरीं विव्हळ अपमानें ॥ ७ ॥
तया अढळपद देउनि अनुग्रहिलें। माहात्म्य थोर भलें ऐसें तुझें ॥ ८ ॥
भोळया गवळणीविद्ध काम-बाणीं। तुवां चक्रपाणी शांत केल्या ॥ ९ ॥
गवळ्यांचे पोर केला अंगिकार। त्यांचा बडिवार वाढवीला ॥ १० ॥
कुब्जादासी एक वांकुडि आठांठायीं। संभोग हृदयीं इच्छितसे ॥ ११ ॥
तिचा काम तुवां पुरविला देवा। तुझा काय गावा महिमा सांग ॥ १२ ॥
पाण्डवांचें दास्य केलें रात्रंदिन। संकटिं घालून स्वयें वेसी ॥ १३ ॥
लाभ हानि मृत्यु जो निजदासांचा। निज शिरीं साचा घेतोसी तूं ॥ १४ ॥
विनायक म्हणे तुज उपमा न। नाहीं दयाघन त्रैलोक्यांत ॥ १५ ॥

## ( ७२ )

## कधीं ?

दया कधीं करणार। उडी कधीं घालणार ॥ १ ॥
संकटांत तारणार। माझी पाठ राखणार ॥ २ ॥
अभिमान धरणार। मजलागीं तारणार ॥ ३ ॥
मजसाठीं कळवळणार। कधीं धांव तूं घेणार ॥ ४ ॥
हांकेसीं तूं हांक देणार। कधीं माझा तूं होणार ॥ ५ ॥
कधीं अमृत देणार। चिंता दूर करणार ॥ ६ ॥
प्रसन्न मज राखणार। चित्त कधीं विकसवणार ॥ ७ ॥
मज धैर्यासीं देणार। पत माझी राखणार ॥ ८ ॥
शब्द सत्य करणार। इच्छा माझी पुरविणार ॥ ९ ॥
भय माझें हरणार। विघ्ननाश करणार ॥ १० ॥
कधीं प्रसन्न होणार। कधीं मज पावणार ॥ ११ ॥
विनायका करणार। निर्भय कधीं परमोदार ॥ १२ ॥

## ( ७३ )

# धांवा

जोडोनियां दोन्ही हात । तुजलागीं मी प्रार्थित ॥ १ ॥
अपराध क्षमा करीं । घेईं आतां मज पदरीं ॥ २ ॥
तुझ्या पायींचा मी दास । तुझी धरिलीसे कांस ॥ ३ ॥
धरोनियां पोटीं आस । करीतसें भजनास ॥ ४ ॥
अंत नको पाहूं आतां । कृपा करीं भगवंता ॥ ५ ॥
बापुडा मी दीन शरण । तुझे धरिले चरण ॥ ६ ॥
अंगिकारीं मायबापा । शमविं आतां माझ्या तापा ॥ ७ ॥
लोटांगणें मी घालीतों । परोपरीं आळवीतों ॥ ८ ॥
तुझा धांवा मी करितों । तुझी वाट बहु पाहतों ॥ ९ ॥
उताविळ झालों फार । उडी घेईं कृपाकर ॥ १० ॥
अनाथाचा तूंच नाथ । दीनाचा तूं धनी समर्थ ॥ ११ ॥
तरी आतां प्रगट होईं । मजलागीं झाली घाई ॥ १२ ॥
मज धीर मुळिं निघेना । करुं काय अत्रिनंदना ॥ १३ ॥
तुझ्या सेवेमाजि जन्म । घातला मी पूर्णकाम ॥ १४ ॥
ग्वाही केली तुझ्या कीर्तिची । घोषणा कीं तव नामाची ॥ १५ ॥
तूझें यश मी गाईलें । हृदयांत तुज पूजिलें ॥ १६ ॥
अहोरात्र तुझें स्मरण । वाहिलें तुज अंतःकरण ॥ १७ ॥
अशनि शयनीं आणि पानीं । स्मरलों मी तूज मनीं ॥ १८ ॥
विसर नाहीं कधीं तुझा । प्राणचि तूं जैसा माझा ॥ १९ ॥
प्राणाचाही तूंच प्राण । आत्माराम नारायण ॥ २० ॥
तरी आतां प्रगट नाथा । उडी घाल श्रीसमर्था ॥ २१ ॥
विनायक करी प्रार्थना । धांव घ्यावी दयाघना ॥ २२ ॥

( ७४ )

## धांवा

( प्रवचनांत झालेले )

व्यर्थ माझा देवा जन्म । व्यर्थ झालें माझें कर्म ॥ १ ॥
व्यर्थ झाली उपासना । तैशी भक्तीची भावना ॥ २ ॥
व्यर्थ झाला माझा निश्चय । किती करूं हायहाय ॥ ३ ॥
आशाभंग माझा झाला । सर्वस्वाचा घात भला ॥ ४ ॥
व्यर्थ झालें तूझें नाम । जे कां जपलों पूर्णकाम ॥ ५ ॥
देवा घाल आतां उडी । संकटांत या तांतडीं ॥ ६ ॥
वांचवीणें तुझ्या हातीं । यश देणें त्वां श्रीपति ॥ ७ ॥
विनायक म्हणे देवा । मज आतां त्वरित पावा ॥ ८ ॥

( ७५ )

## प्रभुवात्सल्य

गुरुवार ता० २४।४।१९३०

मंत्र मज दिला व्याधि निरसना । तुवां दयाघना कृपाळुत्वें ॥ १ ॥
तेणें झालें व्याधि शमन तात्काळ । किती तूं स्नेहाळ मजवरी ॥ २ ॥
मायेसम माझ्या पुढती तूं उभा । अगा पद्मनाभा राहिलासी ॥ ३ ॥
सांगितलें मज व्याधि-परित्राण । कृपेचें वीक्षण करोनी त्वां ॥ ४ ॥
किती तरी देवा कळवळलासी । तुझीया प्रेमासीं सीमा नाहीं ॥ ५ ॥
कोठोनी आलासी कळलें न मज । कैसा माझे काज प्रगटलासी ॥ ६ ॥
केला साक्षात्कार मनु मज दिला । दास अनुग्रहिला ऐसा तुवां ॥ ७ ॥
केवढें हें प्रेम केवढें वात्सल्य । सर्व आनुकूल्य तुझें भक्तां ॥ ८ ॥
तुजसम तूंच उपमा तुज नाहीं । दया-मूर्ति पाहीं केवळ तूं ॥ ९ ॥
विनायक काय अधिक बोलेल । देवा तूं अतुल जगत्रयीं ॥ १० ॥

(७६)

# परमेश्वराची शब्दातीतता

तूझी कृपा वर्णायासीं । दीना मज मति कैसी ॥ १ ॥
तूजसम तूंच जगीं । उपमा तुझी तुजलागीं ॥ २ ॥
अनुपम कळवळा । वात्सल्याचा तुज उमाळा ॥ ३ ॥
जिव्हाळ्याचा तूं जिव्हाळा । वर्णूं काय तुज स्नेहाळा ॥ ४ ॥
तुझे-ठायीं शब्द-गति । कुंठित होय रमापति ॥ ५ ॥
वाचेहुनी पर असशी । वाचेलागीं न गवससी ॥ ६ ॥
स्पर्शेनाच तुज वाचा । विषय नव्हेस वाचेचा ॥ ७ ॥
शब्दशब्दां झुंजताती । झुंजतां ते मावळती ॥ ८ ॥
तुजपाशीं न पोंचती । मध्येंच ते अदृश्य होती ॥ ९ ॥
शब्दें कैसें गौरवावें । अलंकृत कैसें करावें ॥ १० ॥
मध्येंच ते लोपताती । ऐशी होय त्यांची गति ॥ ११ ॥
शब्दांचाही शब्द तूंच । स्वरूपभूत तूंच साच ॥ १२ ॥
किरण जैसे सूर्यांतूनी । विस्फुलिंगें अग्नितूनीं ॥ १३ ॥
तेंवि शब्दां शब्दपणें । तुझे पासुनी प्रसवणें ॥ १४ ॥
इतर विषयीं प्रकाशाला । समर्थ शब्द आहे भला ॥ १५ ॥
परी तुझ्या प्रकाशना । व्यर्थ आहे शब्द-वल्गना ॥ १६ ॥
परी कृतज्ञता भाव । प्रगट होय शब्दांपासाव ॥ १७ ॥
म्हणुनी शब्द बोलत मी । शब्दें तूज वर्णितों मी ॥ १८ ॥
आळवीतों तुजला मी । धन्य म्हणतों गुरुस्वामि ॥ १९ ॥
कृपाछत्र माझे शिरीं । तुझें आहे निरंतरीं ॥ २० ॥
विनायका साहायभूत । सदा होसी अवधूत ॥ २१ ॥

( ७७ )

## ' प्रेम आणि देव । यांचा सदा ऐक्यभाव '

जगामाजीं जें का प्रेम । रूप तुझें तें परम ॥ १ ॥
प्रेममय वसतोसी । प्रेमें जग हें धारिसी ॥ २ ॥
प्रेमस्पर्श तुझा सदा । आहे जगा या वरदा ॥ ३ ॥
तूंच प्रेम उपजवीसी । प्रेमें जग हें भारिसी ॥ ४ ॥
सुवासिक पुष्प जैसें । गन्धें भरीतसें तैसें ॥ ५ ॥
जग प्रेमें भरीतोसी । प्रेमचि तूं व्यवहारीसी ॥ ६ ॥
नानारूपें नाना कळा । देसी प्रेमासीं स्नेहाळा ॥ ७ ॥
एकरूप भिन्न वाटे । प्रियपण अंगीं दाटे ॥ ८ ॥
सगुणरूप प्रेमा येतो । तुजसम सगुण होतो ॥ ९ ॥
जैसे तुझे भक्त देवा । नानारुचि रमाधवा ॥ १० ॥
नानारूपें बनवीती । तूझीं देवा निजप्रीतीं ॥ ११ ॥
तैशीं प्रेमाचीं रुपडीं । भिन्न बनती तांतडीं ॥ १२ ॥
भिन्नरूपें प्रेम होय । भिन्न अनुभव होय ॥ १३ ॥
जैशी तूझी लीला देवा । तैशी प्रेमाची केशवा ॥ १४ ॥
विनायक म्हणे प्रेम । दत्तरूप तें परम ॥ १५ ॥

( ७८ )

## ' भावनामय प्रेम । प्रियरूप देव '

प्रेम माउलीचें प्रेम पितयाचें । प्रेम भागिनीचें भावाचेंही ॥ १ ॥
प्रेम बाईलीचें प्रेम सोयरीचें । भिन्नची तें साचें भिन्नरूप ॥ २ ॥
प्रेम तनयाचें प्रेम दुहितेचें । प्रेम अर्भकाचें भिन्नरूप ॥ ३ ॥
प्रेम संपत्तीचें प्रेम विषयांचें । प्रेम जें स्वार्थाचें भिन्नरूप ॥ ४ ॥
प्रेम ममत्वाचें प्रेम अभिमानाचें । प्रेम जें दंभाचें भिन्नरूप ॥ ५ ॥

भावनेचा देव जैसा या जगतीं । प्रेम ही निश्चिती भावनेचें ॥ ६ ॥
भावनामय प्रेम प्रियरूप देव । जैसा ज्याचा भाव तैसा पावे ॥ ७ ॥
विनायक म्हणे जें का शुद्ध प्रेम । रूप तें परम दत्तजीचें ॥ ८ ॥

( ७९ )

# प्रेम आणि देव । यांचा सदा ऐक्यभाव

प्रेमासम दत्त नटोनी येईल । भेटीसीं देईल जैसें प्रेम ॥ १ ॥
जे का आरोपिती पितरांचें प्रेम । आईबाप परम तयां होतो ॥ २ ॥
ज्या ज्या भावनेचें जैसें जैसें प्रेम । तैसा प्रेमधाम नटतसे ॥ ३ ॥
भावनेसम देतो अनुभव जीवा । म्हणुनि शुद्धभावा आरोपावें ॥ ४ ॥
शुद्धभावें भजा तया प्रेमळासीं । प्रिय अनुभवासीं अनुभवा ॥ ५ ॥
विनायक म्हणे प्रेम आणि देव । यांचा ऐक्यभाव सदा असे ॥ ६ ॥

( ८० )

# प्रेम आणि देव । यांचा सदा ऐक्यभाव

नामेंरूपें भिन्न गमती । भिन्नजगा जाणवती ॥ १ ॥
परि ते एकरूप असती । प्रेम आणि देव निश्चिती ॥ २ ॥
म्हणुनि प्रियरूप आत्मा । बनलासे जगदात्मा ॥ ३ ॥
प्रियपण अनुभवा । सदा येत असे जीवा ॥ ४ ॥
जीवाशिवां सख्य मोठें । नाहीं अंतर तें कोठें ॥ ५ ॥
एकमेकां सांभाळीती । कधीं न कोणा विसंबिति ॥ ६ ॥
अशनीं शयनीं सर्वांठायीं । कधिं न त्यांची तुटी होई ॥ ७ ॥
प्रेम ऐसें विलक्षण । जीवाशिवां असे जाण ॥ ८ ॥
एक विषय भोगितो । एक निराहार राहतो ॥ ९ ॥
परी दुज्यासाठीं जपतो । त्याचा अर्थ पूरवीतो ॥ १० ॥
ऐसें नातें देवापाशीं । आम्हां आहे सविशेषीं ॥ ११ ॥

जड भारी आम्हां होतां । स्वयें धरी प्रगटता ॥ १२ ॥
निवारण करी आपण । प्रेममय नारायण ॥ १३ ॥
निमित्त दुजें पुढें करी । निराळा राहे निरंतरीं ॥ १४ ॥
कर्तृत्व परी सर्व त्याचें । तया जाणावें देवाचें ॥ १५ ॥
जाणोनियां प्रेम-पूर्ण । होवोनि धरावे चरण ॥ १६ ॥
गहिंवरुनी कंठ यावा । पुलक अंगीं उभारावा ॥ १७ ॥
नयनिं बाष्पपूर लोटावा । शब्द तुमचा पालटावा ॥ १८ ॥
कृतज्ञता भरुनि यावी । तनु तुमची कांपावी ॥ १९ ॥
प्रियपणें प्रियरूप । सांठवावें हृदीं रूप ॥ २० ॥
विनायक म्हणे सुख । प्रेमापाशीं सदा हरिख ॥ २१ ॥

( ८१ )

## ये यथा मां प्रपद्यन्ते

( प्रवचनांत केलेले अभंग )

भावनेचा देव तैसा प्रगटतो । अनुभव देतो तैशापरी ॥ १ ॥
शुद्ध भावनेसीं भुकेला ईश्वर । मग सारासार न पाहतो ॥ २ ॥
जेथें नाहीं शुद्ध भावना प्रमाण । तेथें नारायण तैसा होतो ॥ ३ ॥
अशुद्धां अशुद्ध शुद्धांसीं तो शुद्ध । भावनेनें बद्ध परमेश्वर ॥ ४ ॥
भावनेच्यासम घडे साक्षात्कार । तरी हा विचार विचारावा ॥ ५ ॥
विनायक म्हणे माझा दत्तदेव । धरि प्रियभाव मजवरी ॥ ६ ॥

( ८२ )

## शबरी आख्यान

भिल्लिणीचा भाव पाहिला रामानीं । अंतर भरोनी प्रेमें आलें ॥ १ ॥
भावनेचा राम तिचेपुढें उभा । भावनेची प्रतिभा मूर्तिमंत ॥ २ ॥
तिचा प्रियभाव रामरूप झाला । पुढें प्रगटला रामरूपें ॥ ३ ॥

उद्धराया तीस काय राम करी । भक्षण तीं करी फळें सारीं ॥ ४ ॥
पत्र पुष्प फल तोयही प्रेमानें । अर्पितां मनानें देव तुष्ट ॥ ५ ॥
निषिद्ध न म्हणे करितो स्वीकार । देतसे ढेंकर तृप्तिचे तो ॥ ६ ॥
रामरायें फळें भक्षिलीं रुचिनें । बोलिले प्रेमानें शबरीसीं ॥ ७ ॥
माझें ध्यान करीं भजन माझें करीं । ज्ञान तव अंतरीं उपजेल ॥ ८ ॥
ज्ञान होतां तूज मुक्त तूं होशील । कैवल्य पावशील बोले राम ॥ ९ ॥
विनायक म्हणे शबरी मुक्त झाली । भावनाद्वारें भली भाविक ती ॥ १० ॥

(८३)

# ' अहं दत्तोऽस्मि ' मंत्र कां जपविला

अक्षय ३ गुरुवार ता. १।५।१९३०

हेतु विशद केला निजमंत्राचा त्वां । माझीया ममत्वा जाणवाया ॥ १ ॥
देहासक्ती जावी शांति प्राप्त व्हावी । निरोगता व्हावी मजलागीं ॥ २ ॥
अहं दत्तोऽस्मीति मज जपविलें । मज ओळखविलें निजरूप ॥ ३ ॥
चार महावाक्यें त्यांचा अनुभव । वैराग्य वैभव जाणविलें ॥ ४ ॥
तत्त्वमस्यादि जें लक्ष्यत्व वर्णिलें । अवधूतीं भलें व्याख्यायिलें ॥ ५ ॥
निजस्वरूप तें मज जाणविलें । मज साक्षात्कारिलें ब्रह्मज्ञान ॥ ६ ॥
"देहव्यथेनें तूं त्रस्त कैसा होसी । कां न विसरसी देहानिष्ठा ॥ ७ ॥
माझे पूजेमधीं स्मरण देहाचें । कैसें तुज साचें रहातसे ॥ ८ ॥
परि-पक्वपण तुजला यावया । चांचल्य जावया स्वभावाचें ॥ ९ ॥
अहं दत्तोऽस्मीति स्मरणी दिधली । दत्तोहमिति भली जाणवाया ॥ १० ॥
मन्त्रनिरूपण मज कळविलें । आशयें सांगितलें वैराग्याच्या ॥ ११ ॥
"अर्धाकच्चा कैसा राहिलासी मुला । माझा नाद भला लागल्याही ॥ १२ ॥
पक्वपण यावें न कोणा भ्यावें । दत्तात्मा असावें सर्वकाळ ॥ १३ ॥
विनायक म्हणे उपदेश केला । गुरुराया भला कळलें मज ॥ १४ ॥

( ८४ )

# दत्त भार्गव भेट

रेणुकेनें नेलें जधीं भार्गवरामा । दत्ता पूर्णकामा भेटावया ॥ १ ॥
सह्याद्रि शिखरीं प्रथमभेट होतां । निज अभद्रता कथीयेली ॥ २ ॥
मीं तो व्रात्य असें संस्कार मज नाहीं। पापात्मा मी पाहीं अवन्यमी ॥ ३॥
माझ्या दर्शनानें निरय प्राप्त होय । परतोनी जाय सांगताती ॥ ४ ॥
राम स्तब्ध झाले मति गोंधळली । तेव्हां पुढें झाली श्रीरेणुका ॥ ५ ॥
तुम्हीं परब्रह्म तुम्हीं शिवमूर्ति । तुम्ही परंज्योति परमात्मा ॥ ६ ॥
फसवितां माझ्या कांहो तनयासीं । म्यांच दर्शनासीं आणियेला ॥ ७ ॥
परिसोनी शब्द तया रेणुकेचा । संभ्रमदेवाचा काय वानूं ॥ ८ ॥
उठोनियां पुढें लगबग गेले । बहु प्रशंसीलें तिजलागीं ॥ ९ ॥
वियास्वरूपिणी उमा तूं प्रत्यक्ष । सकळांसीं साक्ष तुझी सदा ॥ १० ॥
शिवासह वास तुज निरन्तर । शिवसाक्षात्कार तुझ्यायोगें ॥ ११ ॥
जें का शिवरूप सकल ब्रह्माण्डांत । प्रत्यक्ष तें होत तुझ्या कृपें ॥ १२ ॥
जगाचि तूं माय दयेचि तूं खनि । तुज विश्वजननी कोण जाणे ॥ १३॥
ऐशीं एकमेकां खुणेचीं बोलणीं । काय माझी वाणी बोलेल कीं ॥ १४ ॥
मग पुसताती ऐशी कांहे दशा । सांगे ती त्र्यधीशा सर्ववृत्त ॥ १५ ॥
क्रुद्ध झाले देव वदले शापवाणी । उन्मत्त नृप झणीं भस्म व्हावे ॥१६॥
तंव पुढें झाले मग भार्गवराम । कथिला निजकाम प्रतिज्ञेचा ॥ १७ ॥
त्रिःसप्त पृथिवी निःक्षत्र करीन । ऐसें मी वचन बोलिलोंसे ॥ १८ ॥
साच करा देवा पाय मी धरीतों । विजय मागतों दत्तात्रेय ॥ १९ ॥
मग आशीर्वाद दिधला विजयाचा । सद्गुरुनीं साचा रामालागीं ॥ २० ॥
आचार्यत्व केलें स्वयें दत्तजीनीं । जातां सहगमनीं रेणुका ती ॥ २१ ॥
दत्तनिरोपानें भार्गवें जिंकीली । त्रिःसप्त वेळां भली अवनी हे ॥ २२ ॥
सोमयाग केला आचार्य दत्त झाले । कश्यपातें दिलें महीदान ॥ २३ ॥
विनायक म्हणे माहात्म्य दत्ताचें। काय माझ्या वाचे बोलावें म्यां ॥२४॥

( ८५ )

## दत्त तादात्म्य

दत्त आहे माझ्या ठायीं । मी तों आहें दत्ताठायीं ॥ १ ॥
दत्त माझा आत्माराम । दत्त माझें परंधाम ॥ २ ॥
शिवरूप माझे ठायीं । दत्त वसे माझे हृदयीं ॥ ३ ॥
माझें जें का स्वरूप जाणा । तेंच दत्तात्रेय माना ॥ ४ ॥
स्वरूपभूत माझा दत्त । मज ठेवी अप्रमत्त ॥ ५ ॥
ज्ञान मज उपजवीतो । बोध मज प्रकाशितो ॥ ६ ॥
सर्वाठायीं दत्त आहे । दत्तात्मक जग पाहें ॥ ७ ॥
दत्त हाच विश्वंभर । सकळांचा कीं आधार ॥ ८ ॥
दत्ताहुनी अन्य कांहीं । भिन्न नसे नसे पाहीं ॥ ९ ॥
एकचि दत्त पूर्ण असे । सर्व संवित्तिच वसे ॥ १० ॥
विनायकीं परमात्मा । दत्त तोच प्रत्यगात्मा ॥ ११ ॥

( ८६ )

## देव आणि भक्त यांचा रंग

गुरुवार ता. ८।५।१९३०

कौतुक मुलाचें कोण करणार । मायेवीण साचार जगतीं या ॥ १ ॥
पितर शिकविती शब्द बोलायासीं । प्रेमें उच्चारासीं ऐकताती ॥ २ ॥
बोबड्या शब्दांचें नवल करिती । प्रीति पावताती निजठायीं ॥ ३ ॥
तयांचें तें सुख तयांसींच ठावें । इतरां काय व्हावें त्याचें ज्ञान ॥ ४ ॥
पितरीं चोजवितां बालक सुखावे । काय अनुभवावें इतरांनीं ॥ ५ ॥
तैसें माझे अंगीं गुण उपजवीले । कौतुक तें भलें सांग कोणा ॥ ६ ॥
मजसीं जे दिली संपन्नता तुवां । जाणसि माधवा तूंच एक ॥ ७ ॥

ही
क्रम ३८८०१
नं. ३८८०


तेणें सुखावसी कौतुक करिसी । मज चोजविसी परोपरीं ॥ ८ ॥
परस्परां ऐसा जो सुखानुभव । तयाचें वैभव कोण जाणे ॥ ९ ॥
सापत्न भावानें जग हें पाहत । पहाणें विकृत तयाचें कीं ॥ १० ॥
तया जगापुढें कशास बोलावें । कशास दावावें संपन्नत्व ॥ ११ ॥
तुजवीण नाहीं कौतुक करणारा । मजसीं दुसरा दत्तात्रेया ॥ १२ ॥
म्हणुनि जे का गुण तुवां मज दिले । सेवेसीं ते भले लावणें कीं ॥१३॥
तुझ्या सेवेसाठीं गुणांचा आश्रय । करणें दत्तात्रेय मजलागीं ॥ १४ ॥
कशासि पहावें इतरांच्या मुखा । तेणें काय हरिखा देखेन मी ॥ १५ ॥
भजन तूझें गातां तूजासि आनंद । डोलसी मुकुंद ऐकतांच ॥ १६ ॥
भजनाचा रंग तूंच भरावसी । येथें नाचविसी रंगासीं तूं ॥ १७ ॥
रंग होत आम्हां तुझिया कृपेनें । रंगसी तोकानें मजपाशीं ॥ १८ ॥
अंगीं अंगीं माझ्या प्रेमें संचरसी । डुलत रहासी कौतुकानें ॥ १९ ॥
मजपुढें उभा राहोनि गोविंदा । रंगातें वरदा करितोसी ॥ २० ॥
रंगामध्यें दंग करोनि अभंग । माझें अंतरंग खुलविसी ॥ २१ ॥
माझ्या पुण्याईतें तेंवि अधिकारातें । माझीया सिद्धीतें चोजवीसी ॥२२॥
येत प्रेमभर तुज पुरुषोत्तमा । हृदय-विश्रामा अवधूता ॥ २३ ॥
विनायक म्हणे रंग हा दोघांचा । येथें इतरांचा संबंध न ॥ २४ ॥

( ८७ )

# देव आणि भक्त यांचा रंग

आम्हीं दोघे रंग करूं । भजनाचा फेर धरूं ॥ १ ॥
करूं नामाचा उच्चार । करूं तैसा जयजयकार ॥ २ ॥
करूं कथा निरूपण । करूं रस-विवरण ॥ ३ ॥
करूं भक्तिची मीमांसा । उपजवूं प्रेमरसा ॥ ४ ॥
मूर्त नाचवूं प्रेमातें । माधुरी लावूं डोलायातें ॥ ५ ॥
संसारींचीं जीं जीं प्रेमें । भारुनि टाकूं तुझ्या कामें ॥ ६ ॥
ममत्वाचा अनुबंध । त्याचा तुज लावूं बंध ॥ ७ ॥

एकमेकांतें गौरवूं । परस्परांतें सुखवूं ॥ ८ ॥
बहिरा आंधळा जगासीं । डोळस श्रोता परि तुजसीं ॥ ९ ॥
ऐसा भाव धरोनियां । भजनांत रंग करूं या ॥ १० ॥
करूं अन्योन्य कौतुक । इतरांसीं पाडूं ठक ॥ ११ ॥
विनायकाचा विवेक । देव आणि आपण एक ॥ १२ ॥

( ८८ )

## देहीं अनासक्ति व ईश्वरीं अनुरक्ति

कधींतरी देह असे पडणार । तयीं प्रेमभर देवों नये ॥ १ ॥
देहाचा गौरव किंवा विटंबना । आणूं नये मना कदापिही ॥ २ ॥
देह हा देवाचा विचार करावा । ईश्वरीं योजावा त्याचा त्यासीं ॥ ३ ॥
कोणी पूजा करो कोणी त्यासीं दंडो । तेथें नये भांडों वेड्यासम ॥ ४ ॥
जी का तूझे ठायीं असे संपन्नता । त्याची रसिकता देवालागीं ॥ ५ ॥
देव करिल तुझें चोज हें समज । विवेकें उमज मनामधीं ॥ ६ ॥
सापत्न मातेची जे का विषमता । तेणें तूं विद्धता मानूं नको ॥ ७ ॥
जगा सांग काय तुझें बा कौतुक । तो जननी जनक करूं जाणे ॥ ८ ॥
तुझीया गुणांचें करील तो चीज । तया आहे चोज तुझें सदा ॥ ९ ॥
तुज चोजविता देव निरंतर । ठेवीं मनीं सार हेंच सदा ॥ १० ॥
मग देवापाशीं ऐक्य तूं साधोनी । जाय बा रंगोनी भजनांत ॥ ११ ॥
विसर देहासीं विसर गुणांसीं । विसर गौरवासीं सर्व कांहीं ॥ १२ ॥
विसरोनि आपणा देवचि तूं होईं । गोठोनी तूं जाई देवामध्यें ॥ १३ ॥
समरस होईं मग त्या रसा गाईं । देवत्वा तूं जाईं सदेहचि ॥ १४ ॥
होवोनियां देव देवपणें राहे । देवत्वातें लाहें देवकृपें ॥ १५ ॥
विनायक म्हणे देव प्रगटेल । अनुभव येईल निश्चयेंसीं ॥ १६ ॥

गुरुवार ता० २२।५।१९३०

( ८९ )

# वसंतश्री

सह्यगिरीवरी रम्यशिळेवरी । बैसले मुरारी निजानन्दें ॥ १ ॥
मन्दमन्द वारा वाहे झुळझुळ । बहुत शीतळ सिन्धुजळें ॥ २ ॥
औदुंबरवृक्ष वरी करी छाया । देवातें सेवाया विनयानें ॥ ३ ॥
पुष्पलता पुष्पें वरोनि वर्षती । कुहुकुहू गाती परभृत ॥ ४ ॥
वनमाळा कंठीं प्रेमानें घालिती । अमर युवती आनंदानें ॥ ५ ॥
चंदनादि वृक्ष गंध पसरिती । पक्षीगण गाती वृक्षावरी ॥ ६ ॥
पुष्प-रस वृक्ष देवावरी गाळिती । मधुर अर्पिती फळें देवा ॥ ७ ॥
वसंतानें असे बहर मांडिला । गिरी गजबजला फळें पुष्पें ॥ ८ ॥
पश्चिम सागर गर्जे हल्लहल्ल । वीचि-फेन-धवल प्रसन्न तो ॥ ९ ॥
शीतल तुषार स्पर्शवी देवासीं । करित सेवेसीं पश्चिमाब्धि ॥ १० ॥
शेष धरी फणा देवाचिये शिरीं । नेत्र चमकवी रत्नांसम ॥ ११ ॥
सहस्रमणि शिरीं तेजें तळपती । शोभा तरी किती वर्णावी ती ॥ १२ ॥
विनायक म्हणे वसंत समय । अत्रिचा तनय शोभवीतो ॥ १३ ॥

( ९० )

# देवांचा वसंत महोत्सव

शिखी केका गाती पिसारा करिती। औत्कण्ठ्यें नाचती रसभरें ॥ १ ॥
हरिणशावकें कौतुकें क्रीडती । नेत्र विस्तारिती प्रमोदित ॥ २ ॥
कस्तूरीच्या वासें मोहित वन्यमृग । डुलताती दंग होवोनियां ॥ ३ ॥
सांडिती कस्तूरी सुवासें भरिती । वनश्री ती अति तयाकाळीं ॥ ४ ॥
वनदेवतांचा नटोनियां मेळा । वसंत सोहळा आरंभिती ॥ ५ ॥

पुष्पांचीं वसनें साजही पुष्पांचे । टोप सुमनांचे सेविताती ॥ ६ ॥
पुष्पांनीं नटोनी थटोनी फुलोनी । देवाचे सेवनीं रत होती ॥ ७ ॥
कुसुम-संभार वरोनि वर्षती । देवासीं स्नपिती पुष्पजलें ॥ ८ ॥
पुष्पांचें आसन शय्या ही पुष्पांची । वसनें पुष्पांचीं अर्पिताती ॥ ९ ॥
पुष्पें भूषविती देवाचें शरीर । पुष्पमधुसार पाजिताती ॥ १० ॥
घालिती प्रदक्षिणा देव यश गाती । चरण चुरिती मृदुकरें ॥ ११ ॥
देवाचिये अंगीं उटी कुसुमांची । कौशल्यें लाविती सुकुमारा ॥ १२ ॥
कोणी घेती पंखा विणला पुष्पांचा । घालिताती साचा मंदवारा ॥ १३ ॥
विनायक म्हणे वसंत महोत्सव । सेवितसे देव निज इच्छे ॥ १४ ॥

( ९१ )

## रमामाधव योग

रतिसह येत मदन सेवेसीं । खुलवि रूपासीं प्रभुजीच्या ॥ १ ॥
भाळींचा हिमांशु अमृत स्रवत । करी ओली शीत देव तनु ॥ २ ॥
शीतळ भुजंग भूषण बनती । चमके अंगकांति शोभिवंत ॥ ३ ॥
गंधर्व आलापिती अप्सरा नाचती । किन्नर ते गाती सुमधुर ॥ ४ ॥
राग उपराग रागिणी घेवोनी । देवसेवेप्रती वोळंगती ॥ ५ ॥
नारद तुंबरु चरित वर्णिती । देवी ओवाळिती पंचारती ॥ ६ ॥
मदभरें गज स्व-रसें डुलती । जल उडविती सोंडेतूनी ॥ ७ ॥
विनायक म्हणे रमामाधवांचा । योग होत साचा गिरिवरी ॥ ८ ॥

( ९२ )

## रमामाधव योग

सोळा वरुषाचें वय । ऐशी पद्मा तेव्हां होय ॥ १ ॥
लावण्याची शुद्ध मूस । नाहीं वस्तु उपमेस ॥ २ ॥

सौकुमार्याची कीं खनि । चारु हास शोभे वदनीं ॥ ३ ॥
ज्योत्स्नेसही लाजवित । अमृतासीं धिक्कारित ॥ ४ ॥
सुगंधाची जणुं बनली । एकवटुनि हे बाहुली ॥ ५ ॥
चेतन मूर्त कीं चित्ताचें । भाजनाचि कामरसाचें ॥ ६ ॥
कंदुक क्रीडनांत रत । अल्लड स्वभावेंसीं येत ॥ ७ ॥
लक्षुनि देवाजीचा अंक । पावतसे बहु तोक ॥ ८ ॥
झेंपावत तये स्थानीं । बैसतसे उडी घालोनी ॥ ९ ॥
जोडा रमामाधवांचा । अद्वितीय जगीं साचा ॥ १० ॥
विनायक म्हणे रंग । देव झाले बहु दंग ॥ ११ ॥

## ( ९३ )

# गंगावतरण ‘ अथायं व्यासंगो हतपतितनिस्तारणविधौ ’

गुरुवार ता. २९।५।१९३०

भागीरथी माता जगातें ताराया । दुरित शोधाया जगताचें ॥ १ ॥
विष्णुपदापासोनी अवतीर्ण झाली । शिवानें धरिली जटेमाजी ॥ २ ॥
स्वर्गातून ठाव काढित पातली । त्रिपथगा भली कीर्ति तीची ॥ ३ ॥
माय जैशी धांवे लेंकुराचे काज । पुरवाया चोज वात्सल्यानें ॥ ४ ॥
उडी घेत आली तैशि महीवरी । प्रेमातें अंतरीं धरोनियां ॥ ५ ॥
घोर मृत्युलोक उग्र कर्म-भूमि । जन आपद्धर्मीं युक्त सदा ॥ ६ ॥
तयांच्या कैवारें माउली हे आली । बहुत पोळली जन-दुःखें ॥ ७ ॥
पावन कराया अघ प्रक्षाळाया । जीवाचें चुकवाया जनि–मरण॥ ८ ॥
ताप शमवाया श्रम परिहराया । अर्थ पुरवाया जगताचे ॥ ९ ॥
जननी हे जाणा सर्व जीवमात्रां । गति इहपरत्रा मूर्तिमंत ॥ १० ॥
स्मरणेंच तारी पातकी उद्धरी । कूर्म–दृष्टि परी करीतसे ॥ ११ ॥
स्पर्शनें दर्शनें मुक्त करी स्नानें । उच्चार मात्रानें तारीतसे ॥ १२ ॥

गंगे गंगे ऐशा तारी संबोधनें । काय महिमानें बोलूं तिचीं ॥ १३ ॥
विनायक म्हणे मातेच्या स्मरणें । भवातें तरणें सोपा मार्ग ॥ १४ ॥

( ९४ )

## गंगावतरण

पाहुनीयां ताप सकल जगाचा । उद्रेक प्रेमाचा होवोनियां ॥ १ ॥
वत्सल ती माता उडी घेऊं पाहे । कोण वेग साहे धाक जगा ॥ २ ॥
प्रार्थित शंकरा भयभीत विश्व । साधा आतां शिव जगताचें ॥ ३ ॥
पितृत्वाचें नातें आहे तुम्हांपाशीं । जग रक्षायासीं सहाय व्हा ॥ ४ ॥
प्रेमें वेडावली माता उडी घाली । पाहिजे धरिली मध्यंतरीं ॥ ५ ॥
वात्सल्य गंगेचें पाहोनी तोषले । सदाशिव भले कौतुकानें ॥ ६ ॥
अनुपमेय मातृ-प्रेमातें पाहोनी । शिर तुकावोनी सन्मानित ॥ ७ ॥
अर्धनारी नटेश्वर उमापति । निज शिराप्रति पुढें करी ॥ ८
उत्तमांगीं तिज आसन दिधलें । जटेंत ठेविलें आदरानें ॥ ९ ॥
लोकहितासाठीं जो का उडी घेतो । संकटीं पाडितो आपणासीं ॥ १० ॥
तया जगत्प्रभु ऐसा सन्मानीतो । भरोनियां येतो गहिंवरें ॥ ११ ॥
ज्यासीं देव पूजी त्याचा अधिकार । करणें विचार निजबुद्धि ॥ १२ ॥
विनायक म्हणे मातेचा गौरव । प्रकाशावा भाव इंगितज्ञीं ॥ १३ ॥

( ९५ )

## शंकरांनीं गंगा कां डोक्यावर घेतली ?

काया वाचा मनें परार्थ साधितो । आपणा विसरतो परकार्यीं ॥ १ ॥
आपणांसीं श्रेष्ठ देव तया मानी । स्वयें यश वानी त्याचें देव ॥ २ ॥
किती प्रेमा सांगूं तया सदाशिवा । जटेंत दे ठावा गंगेलागीं ॥ ३ ॥
सोडीना तेथोनी प्रेमा आवरेना । मांडीत नर्तना शिरीं घेवोनी ॥ ४ ॥

वाट पहाती जन मातोश्री येईना । दृष्टीस पडेना गुप्त झाली ॥ ५ ॥
तल्लीन शंकर नाचत राहिले । गिरिजे भासलें अनुपम ॥ ६ ॥
दूर होय उमा पाही शिवाकडे । तंव दृष्टी जडे जटेपाशीं ॥ ७ ॥
जटेंत चमक दिसत स्त्रियेची । छटा मत्सराची आली तिज ॥ ८ ॥
माते माते गंगे येई लवकरीं । विश्व हांका मारी आर्तस्वरें ॥ ९ ॥
हांक पडत ती उमेचिया कानीं । येई समजोनी तिजलागीं ॥ १० ॥
भावाची हे कन्या पतिसीं प्रिय झाली । मस्तकीं घेतली समजलें ॥११॥
खिन्न होत उमा नातें जाणवित । गंगेसीं बोधित निजबुद्धी ॥ १२ ॥
गंगेलागीं घाई अवतरण्याची । मर्यादा जटेची सांपडेना ॥ १३ ॥
आर्तरव कानीं पडती जनांचे । कळवळलें साचें मन तीचें ॥ १४ ॥
शंकराचा प्रेम-भर ओसरला । मार्ग गवसला गंगेलागीं ॥ १५ ॥
उमेसीं प्रार्थित विश्वाच्या कारणा । माझ्या अवतरणा साधीं माते॥१६॥
परिसोनी गंगा-वच ते लाजली । गिरिजा खोंचली हृदयांत ॥ १७ ॥
उमजली मनीं समजे योग्यता । आपणां श्रेष्ठता गंगेचीच ॥ १८ ॥
दोघीही प्रार्थना करिती शंकराची । आपुलिया वाचीं आळवीत ॥१९॥
जागे सदाशिव मनीं घाबरले । उमेसाठीं भले गिरिपती ॥ २० ॥
मग वाट देती गंगेसीं काढोनी । उतरे स्वर्गांतूनी महीवरी ॥ २१ ॥
विनायक म्हणे करा गंगोत्सव । तेणें सदाशिव तुष्ट होय ॥ २२ ॥

( ९६ )

## गंगावतरण

आली आली गंगा आली । पावन ती करित भली ॥ १ ॥
सहस्र मार्गीं येत आहे । प्रेमें उडी घालिताहे ॥ २ ॥
आम्हांसाठीं आली आली । स्वर्गांतूनी उतरली ॥ ३ ॥
परम उताविळ झाली । आम्हांसाठीं कळवळली ॥ ४ ॥
आम्हांलागीं तारायातें । जन्म मृत्यु हरायातें ॥ ५ ॥
पाप आमुचें नासायासीं । स्वच्छ आम्हां करायासीं ॥ ६ ॥

आलि आलि माउली हे । कृपेनें भरली आहे ॥ ७ ॥
आम्हां स्नान घालायासीं । दर्शन आम्हां द्यावयासीं ॥ ८ ॥
स्पर्श आम्हां करायासीं । कृपादृष्टीं पहायासीं ॥ ९ ॥
पाप ताप दैन्य सारें । हरायातें अवतरे ॥ १० ॥
आम्हांसाठीं हरिपद । त्यजुनि येत ती वरद ॥ ११ ॥
लघु करी कैलासातें । न लोभे शिव प्रेमातें ॥ १२ ॥
जटावास त्यागोनियां । स्वर्ग तुच्छ करोनियां ॥ १३ ॥
देवलोक ती त्यजोनी । आम्हांसाठीं ये धांवोनी ॥ १४ ॥
आलि आलि माता आली । सकल पुण्यें प्रगटलीं ॥ १५ ॥
मृत्युलोकीं घुसतसे । आम्हांलागीं शोधितसे ॥ १६ ॥
जीव जंतु खडे धोंडे । पावन करीतसे गाढें ॥ १७ ॥
मृत्युलोक उद्धरीत । येथें असे ही वर्तत ॥ १८ ॥
पाताळीं ही उडी घेई । जीवमात्रांची हे आई ॥ १९ ॥
स्वर्ग मृत्यु पाताळांत । असे जाणा संचरत ॥ २० ॥
देव नर तिर्यंचांसीं । सकळां शुद्ध करायासीं ॥ २१ ॥
झटतसे रात्रंदिन । करी पाप-प्रक्षालन ॥ २२ ॥
हतपतित तारणासीं । केलें बद्ध परिकरासीं ॥ २३ ॥
विनायक म्हणे स्मरा । मातोश्रीलागीं आदरा ॥ २४ ॥

(९७)

## एको रसः करुण एव

गुरुवार ता० १२।६।१९३०

करुणरस श्रेष्ठ सर्व रसांमाजी । श्रेष्ठता त्यांत जी वर्णवेना ॥ १ ॥
करुणेची मूर्ति मूर्त विश्वंभर । करुण रस थोर मूर्तिमंत ॥ २ ॥
करुणरस जेव्हां दाटे हृदयांत । तेव्हां परिस्फुरत जगदात्मा ॥ ३ ॥
करुणेपाशीं देव देव करुणेचा । देव कारुण्याचा जलनिधि ॥ ४ ॥
करुणरसें शांत जो का वावरत । उपमा निश्चित त्यास नाहीं ॥ ५ ॥

सकळ इंद्रियांत करुणा भरत । दिसोनियां येत तिची छटा ॥ ६ ॥
कळी उमलत हृदय विकसत । प्रेम उचंबळत किती सांगूं ॥ ७ ॥
शुद्ध सात्विकाचा बनाव बनत । रंग उधळत सत्वपूर्ण ॥ ८ ॥
करुणा नेत्रांत करुणा श्रवणीं । तैशी अंतःकरणीं स्पष्ट दिसे ॥ ९ ॥
अंतर्बाह्य येतो तिचा अनुभव । लीनतेचा भाव साकारतो ॥ १० ॥
शुद्ध प्रेम आहे करुणेच्या पाशीं । अन्य विकारांसीं ठाव नाहीं ॥११॥
करुणेनें देव प्रेमें आळवावा । सर्वत्र पहावा त्याच रसें ॥ १२ ॥
करुणेनें पाहीं तूं या विश्वाकडे । तुज दृष्टी पडे करुणत्व ॥ १३ ॥
कारुण्यानें आहे भरला विश्वांत । तुजला जोडत कारुण्यानें ॥ १४ ॥
विनायक म्हणे करुणामय होईं । मग तूं सदा घेईं दर्शनाला ॥ १५ ॥

## ( ९८ )

# एको रसः करुण एव

करुणेनें बोला करुणेनें चाला । सदा कारुण्याला चित्तीं धरा ॥ १ ॥
इंद्रियांत तेंवि देहांतही ठेवा । नित्य करुणाभावा कारुण्यानें ॥ २ ॥
मन बुद्धि चित्त तैसा अहंकार । कारुण्यप्रसर तेथें ठेवा ॥ ३ ॥
करुणा पाहणें करुणा ऐकणें । करुणा चिंतणें करुणेंत ॥ ४ ॥
करुणेचा स्पर्श रस करुणेचा । शब्द करुणेचा आदरावा ॥ ५ ॥
भाव करुणेचा कारुण्य भावना । संस्कार हा मना सदा द्यावा ॥ ६ ॥
हृदय करुण स्फुरण करुण । रस उचंबळून यावा तोच ॥ ७ ॥
भरोनियां जाईं करुणरसानें । देवमय होणें तुझें तेणें ॥ ८ ॥
करुणेनें मूर्त देव बनशील । मुक्ति चाखशील देहींच तूं ॥ ९ ॥
प्रेमळपणा मूर्त आहे करुणेपाशीं । लाभ इतरांसीं नाहीं त्याचा ॥१०॥
देव प्रेमळाचा भुकेला भक्तीचा । जणुं करुणेचा बनलासे ॥ ११ ॥
करुणेहुनी नाहीं भक्ति ती निराळी । केवळ बनली करुणेची ॥ १२ ॥
भक्तीचें स्वरूप जाणावी करुणा । शुद्ध-प्रेम-खुणा करुणाच ॥ १३ ॥
जेथें आहे जाणा करुणेचा वास । तेथेंच प्रेमास उद्भव कीं ॥ १४ ॥

करुणा अधिष्ठान भक्तीचें प्रेमाचें। आर्द्रपण साचें करुणेचें ॥ १५ ॥
अमृताचा रस जाणावी करुणा। काय मी वल्गना करूं अन्य ॥ १६ ॥
दृष्टांतासीं नाहीं कांहीं वस्तुजात। सर्व करुणेंत झांकलें कीं ॥ १७ ॥
ब्रह्माण्डांत हीच आदिशक्ती जाणा। म्हणुनि करुणा आदरावी ॥ १८ ॥
विनायक म्हणे मज करुणामय। करा दत्तात्रेय निजकृपें ॥ १९ ॥

(९९)

# धांवा

गुरुवार ता० १९।६।१९३०

दया मजवरी व्हावी भगवंता। म्हणोनियां ताता शरण मीं ॥ १ ॥
दुबळा पामर काय करणार। अहो करुणाकर गुरुनाथा ॥ २ ॥
कधीं नाहीं यश कोणत्या कार्यांत। पापचि भोगीत जैसा असें ॥ ३ ॥
किती शत्रु मज किती विघ्नें मज। तुज महाराज विदित कीं ॥ ४ ॥
तुज सर्व ठावें आहे कृपावन्ता। तुज गुरुदत्ता काय सांगूं ॥ ५ ॥
मज नियोजिलें आपुल्या कार्यासीं। अपात्र तयासीं मीं तों आहें ॥६॥
मजवरी नाहीं देवा तुमची कृपा। ऐसें मायबापा वाटतसे ॥ ७ ॥
आजवरी केली जे का कांहीं सेवा। तुज वासुदेवा रुचली न ॥ ८ ॥
करवोनी जैसें तुवां बा घेतलें। तैसेंच वाहिलें तव पदीं ॥ ९ ॥
मजवरी कोप एवढा कां केला। श्रीगुरुदयाळा सांगावें कीं ॥ १० ॥
आम्हीं चुकणार निश्चित हा अर्थ। आम्हां परमार्थ दूर आहे ॥ ११ ॥
आम्हीं मोक्ष नेणों मुक्ति नच जाणों। कोणी कांहीं म्हणो आम्हांलागीं १२
आमुचा हा स्वार्थ तुझिये प्राप्तीचा। तेच नित्य वाचा वदतसे ॥ १३ ॥
तुझी सेवा देवा करणें अहर्निश। तूज जगदीश तोषविणें ॥ १४ ॥
हाच आहे ठावा आम्हां परमार्थ। याहूनीयां अर्थ ठावा नाहीं ॥१५॥
आम्हां असे दैव उणें दत्तनाथा। तुजला समर्था सर्व ठावें ॥ १६ ॥
पूर्वजन्मकर्म नाहींच चांगलें। भोगावि तें भलें दुःख मज ॥ १७ ॥
आजवरी दुःख बहुत भोगिलें। बहुत साहिलें तुझ्या कृपें ॥ १८ ॥

परी अजूनियां पाप न तें सरे । म्हणोनी उदारें कृपा कीजे ॥ १९ ॥
विनायक आला तुज काकुळती । तरि तूं दत्तयति कृपा करीं ॥ २० ॥

( १०० )

# धांवा

तुवांच मज नाथ सेवेंत गोंविलें । मजला घातलें भजनांत ॥ १ ॥
अधिकार माझा मुळींच नसतां । तुवां भगवंता केलें ऐसें ॥ २ ॥
मजसिं पात्रता कोठलि बा नाथा । नाहीं जाणा स्वार्था जिंकीयेलें ॥ ३ ॥
स्वार्थीं बहु प्रीति ओंगळ मनिंचा । ऐसा असे साचा पामर मी ॥ ४ ॥
विषयप्रीति वसे सदा हृदयांत । पाप तें सांठत थोर हृदीं ॥ ५ ॥
आश्चर्य हें वाटे अद्भुत ही गोष्ट । कैसा पापी नष्ट जन्मलों मी ॥ ६ ॥
कळी तुवां दया केली तुवां कृपा । माझ्या नाथा तापा शमवाया ॥ ७ ॥
परी सर्व वायां झालें दत्तात्रेया । जरी तुझ्या पायां शरण मी ॥ ८ ॥
अहोरात्र तुझी सेवाच मी केली । तुजला वाहिलीं सर्व सुखें ॥ ९ ॥
नाहीं केला कधीं देहाचा विचार । नाहींच विकार अन्य मज ॥ १० ॥
आवडीनें नाथा तूज मी सेविलें । नाम मी घेतलें तुझें दत्ता ॥ ११ ॥
तुझ्या प्रतापाची ग्वाही म्यां दिधली । सकलां सांगितली खूण गोष्ट ॥ १२ ॥
तुझी सेवा कधीं विफळ न होत । प्रत्ययास येत सदा जाणा ॥ १३ ॥
ऐसें जें मी आजवरी आचरलों । देवा मी वागलों तुझ्यापाशीं ॥ १४ ॥
सकळ वायां झालें देवा वेडावलों । तुझ्या पायां आलों शरण मी ॥ १५ ॥
विनायकालागीं तुमचा आधार । दुसरा विचार कांहीं नाहीं ॥ १६ ॥

( १०१ )

# धांवा

कैसें माझ्या देहीं पातक राहिलें । मुळीं न जळालें सांग दत्ता ॥ १ ॥
काय जिव्हेनें जें नाम बा घेतलें । फुकट जाहलें तुझें सांग ॥ २ ॥

अहोरात्र तुझें चिंतन जें केलें। नाथा कोठें गेलें सांगावें कीं ॥ ३ ॥
माझिया इंद्रियांत माझिया चित्तांत। माझ्या अंतःकरणांत वसलासी॥४॥
काय व्यर्थ झाला देवा सहवास। माझीये पापास धुणी नाहीं ॥ ५ ॥
कोठें गेली सेवा कोठें गेली भक्ती। कोठें ती विरक्ती माझी दत्ता॥६॥
कोठें गेली नीति पुण्य आचरण। शुद्ध अंतःकरण कोठें गेलें ॥ ७ ॥
कोठं गेला माझा सात्त्विक अहंकार। कैशी मज हार पातलीसे ॥ ८ ॥
हारलों मी देवा खचित हारलों। तुज शरण झालों परोपरीं ॥ ९ ॥
आतां कोठें दुजा मजला आसरा। तुजवीण ईश्वरा सांग मज ॥१०॥
उदासीन झालों मनांत खोंचलों। बहुत लाजलों दयाळा रे ॥ ११ ॥
माझिया तोंडासीं काळें कीं लागलें। सकळ सोपलें माझें नाथा ॥१२॥
निर्मळ मी नाहीं मनानें कायेनें। तैसा मी वाचेनें शुद्ध नाहीं॥ १३ ॥
आचार उच्चार तैसा तो विचार। माझा असे फार गलिच्छ कीं ॥ १४ ॥
ऐशा पातक्यासीं सेवेतें लाविलें। कल्याणार्थ भलें माझीयाच ॥ १५ ॥
परी मी अकल्याण जोडिलें बहुत। ऐसेंच वाटत गुरुनाथा ॥ १६ ॥
नाहीं स्वार्थ नाहीं देवा तुझी कृपा। कांहीं मायबापा साधियेलें ॥ १७ ॥
विठ्ठल हृदयीं तुजला शरण। मज नारायण कृपा करीं ॥ १८ ॥
कल्याणाची गोष्ट तुवां आरंभिली। परी व्यर्थ झाली मजपाशीं ॥१९॥
अपात्र मीं खरा हेंच गा निश्चित। म्हणोनि भोगित विपत्तीतें ॥ २० ॥
साधुसंतांनीं जें सांगोनि ठेविलें। ब्रीदवाक्य भलें तुझें दत्ता ॥ २१ ॥
अनुभवा मज जोंवरि न आलें। तोंवरि ठरलें अपात्रत्व ॥ २२ ॥
मज अमंगळा केलेंस जवळी। तेणें वनमाळी तुज दोष ॥ २३ ॥
अमंगळपण माझें जें का नाथा। तुजला समर्था डसों पाहे ॥ २४ ॥
परी तूं दयाळ मज प्रक्षाळिसी। मजला शोधिसी परोपरीं ॥ २५ ॥
जैसें कावळ्यासीं घालितां पयस्नान। तया पांढरेपण येईनाच ॥ २६ ॥
हृदयांत तुझा सदा असे वास। जिव्हेवरी नामास ठेवियेलें ॥ २७ ॥
ऐशी तुझी जरी संगति मजला। तरि न पापाला हानि माझ्या ॥२८॥
माझिया नेत्रांत माझिया कानांत। माझे शरीरांत भरलासी ॥ २९ ॥
रात्रंदिन माझ्या ठायीं तव वास। असशी जाण खास मजपाशीं ॥३०॥

मजला सोडुनी कधीं न तूं जासी । मज वियोगासीं न देसी तूं ॥ ३१ ॥
ऐसें असोनियां पाप न जळत । दैव न सोडीत मजलागीं ॥ ३२ ॥
म्हणुनियां वाटे पापात्मा प्रबळ । मीच एक खळ जन्मलों कीं ॥ ३३ ॥
मागील चरित तव बा ऐकतां । ऐसी नाहीं वार्ता ऐकियेली ॥ ३४ ॥
कोठें नाहीं ऐशी मात पुकारली । कोणी न सांगितली आजवरी ॥३५॥
आशा धरियेली तुझीये कृपेची । विफळ ती साची झाली दत्ता ॥३६॥
आशा धरिली होती तव साक्षात्कारीं। विश्वास अंतरीं धरिला होता ॥३७॥
वाटोळें कीं झालें माझ्या विश्वासाचें । तैसें सदाशेचें कृपावन्ता ॥ ३८ ॥
तूझें नाम नाहीं ठरलें सामर्थ्याचें । माझ्या ठायीं साचें गुणवन्ता ॥३९॥
माझेमुळें तुज उणेपण आलें । मन हें खोंचलें तेणें बहु ॥ ४० ॥
परी मज नाहीं तुजवीण गति । म्हणोनि श्रीपति बोलतों मी ॥ ४१ ॥
बोलावें कोणासीं देवा म्यां सांगावें । उघड करावें अंतःकरण॥ ४२ ॥
कोणापाशीं दुःखावेग उघडावा । तुजविण ठावा कोणी नाहीं ॥ ४३ ॥
बहुतां दिसांची तुझीच संगति । म्हणुनि तुजप्रति बोलतों मी ॥ ४४ ॥
विनायक आहे बहु दुःखावला । तुजला प्रेमळा दया येवो ॥ ४५ ॥

( १०२ )

## धांवा

आई बाप भाऊ बहीण सर्व नातें। तुज श्रीगुरुतें लावोनीयां॥ १ ॥
मित्र तूंच माझा तूंच माझा धनी । सदा गृहीं वनीं सोबती तूं ॥ २ ॥
माझी जे का छाया किंवा जो का प्राण । तैसें नारायण तुझें नातें ॥३॥
माझा आत्माराम तूंच दत्तात्रेय । होते धरिले पाय म्हणोनियां ॥ ४ ॥
कोठें गेला माझा भाव हा सांगावा । श्रीगुरु दत्तदेवा मजलागीं ॥ ५ ॥
नाहीं कीं उल्हास माझीये मनासीं । धैर्य हृदयासीं नुरलें कीं ॥ ६ ॥
भयभीत भ्याड होवोनी राहिलों । निराश मी झालों असें देवा ॥ ७ ॥
पुढें कांहीं मज दिसेना प्रकाश । स्वामि जगदीश गुरुराया ॥ ८ ॥
टाकल्यासम मज आतां नका करूं। कोणा हांका मारूं सांगा मातें॥९॥

निर्वाणीचा सखा तूंच दत्तनाथ। पुरवावे अर्थ माझे आतां ॥ १० ॥
मी तों जाणतसें माझी जी योग्यता। माझी बा बहुता अजाणता ॥ ११॥
सकळ तुझें असे करणें वासुदेवा। याच जाण भावा भावितों मी ॥१२॥
विनायक लोळे तुझीये चरणीं। श्रीगुरुचक्रपाणी कृपा करा ॥ १३ ॥

(१०३)

# देवलीलांचें अगम्यत्व

गुरुवार ता० ३।७।१९३०

लीला तुझी देवा आम्हां न समजे। मति न उपजे कांहीं जाणे ॥ १ ॥
कितीतरी वेळां आम्हां वांचाविसी। आश्चर्य दाविसी परोपरी ॥ २ ॥
कितीतरी वेळां संकटांत उडी। घालिसी तांतडी जगन्नाथा ॥ ३ ॥
न घडणारें जें का, तेंच घडवीसी। आपुला दाविसी साक्षात्कार ॥४॥
ऐसें महिमान दाविसी कांहीं वेळां। विपरीत स्नेहाळा कधीं दाविसी॥५॥
किती जरी आम्हीं रडलों तुजपुढें। सांगितलें गाढें मनोगत ॥ ६ ॥
किती जरी देवा लोळण घेतली। किती स्तुति केली तुझी जरी ॥ ७ ॥
तरी कांहीं वेळां मुळीं न हालसी। कठोरता दाविसी आम्हांलागीं ॥८॥
होसी तेव्हां देवा वज्राहुनी कठीण। तुझें अंतःकरण द्रवेनाच॥ ९ ॥
ऐसें किती वेळां तरी तूं दाविसी। या तव लीलांसीं कोण जाणे ॥१०॥
कांहींच कळेना तुझिया मनिंचें। तेथें आम्हीं साचे बापुडे कीं॥ ११ ॥
आम्हीं तुज प्रिय अथवा अप्रिय। यांतील गुरुराय कांहीं न कळे ॥१२॥
अप्रिय म्हणावें उडी घालितोसी। दुःखें निवारीसी दयाघना॥ १३ ॥
प्रिय जरी तुज आपणां गणावें। विपरीत यावें अनुभवा ॥ १४ ॥
नसतींच येती संकटें आम्हांसीं। न केलींच आंगासीं पापें येती॥१५॥
काय म्हणों तरी समजेना कांहीं। गोंधळलों पाहीं गुरुनाथा॥ १६ ॥
मज पामरास काय समजेल। कायसें जाणेल बुद्धि माझी॥ १७॥
नोहे विषय हा मानव बुद्धिचा। येथें अभिमानाचा पाड काय ॥१८॥

उचंबळोनियां येतें हें हृदय । तुझे धरिले पाय कृपावंता ॥ १९ ॥
तुझीया मनींचें कोणा जाणवेल । प्रवेश घडेल तेथें कोणा ॥ २० ॥
मन वाणी जेथें पावती न गति । तेथें मी श्रीपति जाणूं काय ॥ २१ ॥
तुज कळविला हृदयींचा भाव । सर्वज्ञ तूं देव तार मज ॥ २२ ॥
विनायक झाला असे गर्भगळित । अहंकार गळत त्याचा दत्ता॥ २३ ॥

## ( १०४ )

# देवलीलांचें अगम्यत्व

वाचीयेले ग्रंथ संतांचीया वाणी । त्यांसीं अंतःकरणीं संग्रहीलें ॥ १ ॥
विचार तेथें केला कांहीं समजेना । कांहीं गवसेना माझ्या मना ॥२॥
शहाणपणाची केली मी शिकस्त । बुद्धि मी समस्त खर्चीयेली ॥ ३ ॥
परि कांहीं हातां नाहीं सांपडलें । वर्म न उमगलें मजलागीं ॥ ४ ॥
कोण जाणे नाथा तुझिया इच्छेसीं । तुझीया लीलांसीं कोण जाणे ॥५॥
ऐसा कोण आहे येथें महीवर । सर्वज्ञ जो थोर तुज जाणे ॥ ६ ॥
माझा काय पाड काय मी पामर । काय बोलणार तुझ्यापुढें ॥ ७ ॥
अनुभव आला बहु आजवरी । प्रकाश अंतरीं तेणें माझ्या ॥ ८ ॥
गेला अहंकार गळला अभिमान । कैंचें सुबुद्धिपण पामराला ॥ ९ ॥
तप ज्यासीं नाहीं कांहीं करितां येत। तो काय सांगत शास्त्रांलागीं ॥१०॥
शास्त्र फार दूर विद्या त्याहूनी दूर । त्याहुनी ईश्वर दूर असे ॥ ११ ॥
मग आम्हां गति कैंची या मूढांसीं । बडबड कैसी करीतसों ॥ १२ ॥
कोठें श्रुति कोठें स्मृति तीं पुराणें । कोण तयां जाणे समग्रत्वें ॥ १३ ॥
कोणाचा विषय कोणाचें सामर्थ्य । कोण याथातथ्य जाणताती ॥१४॥
सकळहि दूर पल्ला गांठवेना । कांहींच कळेना मतिलागीं ॥ १५ ॥
विनायक म्हणे बहु गोंधळलों । अप्रबुद्ध झालों बहुताचि ॥ १६ ॥

( १०५ )

## धांवा

तरी आतां सांग गुह्य तुझें तूंच । जें का मज साच पटेल कीं ॥ १ ॥
बिंबेल माझ्या मनीं ठसेल हृदयीं । ऐसें तूं उपायीं कथीं मज ॥ २ ॥
बुद्धिप्रकाशन जयाचीया योगें । ज्ञान होय जागें जयें देवा ॥ ३ ॥
ऐसें कांहीं सांग या तव दीनासीं । किती करुणेसीं भाकूं आतां ॥ ४ ॥
घाबरलें मन झालों उतावीळ । अधीर केवळ जन्माचा मी ॥ ५ ॥
परि तुवां केला माझा कीं संग्रह । मदीय संदेह फेडावा कीं ॥ ६ ॥
जेणें मनःशुद्धी बुद्धि प्रकाशत । हृदय विकासत ऐसें करीं ॥ ७ ॥
कळेना वळेना केली विचारणा । काय नारायणा बोलूं आतां ॥ ८ ॥
धरिले तुझे पाय आतां तूं उपाय । करोनी अपाय हरीं माझे ॥ ९ ॥
सन्मुख मज होई मज ज्ञान देईं । अज्ञान माझें जाई ऐसें करीं ॥ १० ॥
अनुग्रहीं मज मज कृपा करीं । श्रीगुरु नरहरी वासुदेवा ॥ ११ ॥
बोलवेना कांहीं सांगवेना कांहीं । कळवेना कांहीं भावार्थातें ॥ १२ ॥
तरी आतां नाथा कृपाचि करावी । माझी न पहावी धैर्यवृत्ति ॥ १३ ॥
मजपाशीं नाहीं धैर्य कीं निश्चय । म्हणोनियां पाय धरिले मी ॥ १४ ॥
भयभीत माझें हृदय सदाचें । तें मी काय वाचे बोलावें कीं ॥ १५ ॥
विनायकाचें तूं करीं संरक्षण । दुष्ट निर्दाळन सार्थी नाथा ॥ १६ ॥

( १०६ )

## व्यासपूजा ( गुरुपौर्णिमा )

गुरुपौर्णिमा गुरुवार ता. १०।७।१९३०

गुरुपूजनाचा दिवस मंगल । सेवन प्रेमळ स्वयें घेती ॥ १ ॥
आज साक्षात्कारें प्रगटोनी गुरु । पूजनसंभारु स्वयें घेती ॥ २ ॥
शिष्यां हातीं पूजा घेवोनियां आज । कृपा महाराज करिताती ॥ ३ ॥

अनुग्रह देती थोर आशीर्वाद । होवोनी वरद निज शिष्यां ॥ ४ ॥
आज दिवसाचें महत्त्व अनिवार । उपमा साचार नाहीं नाहीं ॥ ५ ॥
पर्वणी हे थोर थोर कल्याणाची । पर्वणी पुण्याची पातली हे ॥ ६ ॥
प्रगटपणें सेवा घेती गुरुराज । तुष्ट महाराज आज जाणा ॥ ७ ॥
आज व्यासपूजा संन्यासी करिती । चातुर्मास राहती एक्याठायीं॥ ८॥
आज शिष्य प्रेमें करिती गुरुपूजा । प्रसादाचे काजा ज्ञानासाठीं ॥ ९॥
गुरुप्रसादानें ज्ञानप्राप्ति होत । क्लेश निवारत अविद्येचे ॥ १० ॥
धन्य पुण्य दिन आजिचा उत्तम । जे का ज्ञानकाम, साधिती ते ॥११॥
विनायक म्हणे गुरु वासुदेव । त्यांच्या पदीं भाव समर्पिला ॥ १२ ॥

( १०७ )

## वासुदेव-चरित्र-सार

गुरु माझे यतिवर । वासुदेव नामें थोर ॥ १ ॥
त्यांच्या करीतों स्मरणा । आठवितों मी चरणां ॥ २ ॥
दंड कमंडलु करीं । छाटी भगवी पांघरी ॥ ३ ॥
भस्म असे सर्वांगासीं । असे आश्रम संन्यासी ॥ ४ ॥
पायीं शोभती खडावा । भिक्षुवेष असे बरवा ॥ ५ ॥
वैराग्याचा मूर्त निधि । ज्ञानाचा तो महोदधि ॥ ६ ॥
तपश्चर्येची कीं मूस । तेज असे ज्या विशेष ॥ ७ ॥
तृप्तिचें हें प्रतीक कीं । मूर्ति शमाची हे लोकीं ॥ ८ ॥
शांत दांत मुनि ऐसा । वर्णवेल वाचे कैसा ॥ ९ ॥
नित्य स्मित मुखावरी । प्रसन्न मुद्रा निरंतरीं ॥ १० ॥
विकार नाहीं नाहीं मुळीं । सामर्थ्यानें आतुर्बळी ॥ ११ ॥
जन-पापांचा संहर्ता । भाविकांचा दीक्षाकर्ता ॥ १२ ॥
जगद्गुरु ज्ञानदाता । कृपादृष्टीं सर्वां पाहता ॥ १३ ॥
क्षुधा तृषा नाहीं ज्याला । श्रम नाहींच देहाला ॥ १४ ॥
चिंता नाहींच चित्ताला । चांचल्य तें न मनाला ॥ १५ ॥

धैर्याचा जो पूर्ण मेरु । भक्तिचा जो क्षीरसागरु ॥ १६ ॥
गांभिर्याचा जो सागर । उत्कृष्ट पुण्याईचें सार ॥ १७ ॥
ऐसा माझा गुरुवर । वासुदेव यति थोर ॥ १८ ॥
त्यासीं अर्पितों अंतर । हेंच माझें पूजा-सार ॥ १९ ॥
स्मृति त्यांच्या पादुकांची । वृत्ति भक्ति-भावनेची ॥ २० ॥
हेंच माझी सेवा आज । अर्पियेली पूजा काज ॥ २१ ॥
तुष्ट व्हावें गुरुवर । द्यावा मज इष्टवर ॥ २२ ॥
ज्ञानप्राप्ती मज व्हावी । माझी अविद्या नासावी ॥ २३ ॥
पूर्ण काम जगीं व्हावें । स्वातंत्र्येसीं विचरावें ॥ २४ ॥
प्रतिबंध मजलागीं । नसो कोठेंच या जगीं ॥ २५ ॥
वासुदेवें आपुला भाव । मज द्यावा अभिनव ॥ २६ ॥
वासुदेव मीं बनावें । इतरांसीं ही करावें ॥ २७ ॥
येइल जो जो माझ्यापाशीं । साधावें मी तत्कार्यासीं ॥ २८ ॥
अभीष्ट त्याचें पुरवावें । वासुदेव बनवावें ॥ २९ ॥
सकळांसीं वासुदेव । करावें म्यां हाच भाव ॥ ३० ॥
हेंच माझें मागणें कीं । मुख्य एकचि अनेकीं ॥ ३१ ॥
विनायक वासुदेव । दोघांचाही एक भाव ॥ ३२ ॥

( १०८ )

# विनायकाचें कोडें

गुरुवार ता० १७।७।१९३०

सेवियेला जरी गुरु कल्पतरु । मन्मनींचा भारु कां न हरी ॥ १ ॥
जडत्व मनाचें कां तें हरपेना । विषण्णता जाईना अजुनि कां ॥ २ ॥
कां न होय माझें प्रसन्न हें मन । राहत कां खिन्न सर्वदा तें ॥ ३ ॥
जरी गुण गातें गुरुपदां ध्यातें । गुरुला भजतें विश्वासानें ॥ ४ ॥
जरी सार्वकाळ रत गुरुपदीं । पडे कां विपदीं चिंतेच्या तें ॥ ५ ॥
चिंता कां तयासीं अजुनी बाधते । अपूर्ण राहते मनोवांच्छा ॥ ६ ॥

कैसें पूर्ण होय न तें मनोगत । कां न अवधूत कृपा करी ॥ ७ ॥
आतुर्बळी जो कां सर्वदा समर्थ । पुरवी तो अर्थ स्वकीयांचे ॥ ८ ॥
कां न मजला तो पावे दत्तात्रेय । प्रसन्न न होय अजुनी कां ॥ ९ ॥
विनायक म्हणे कोडें हें मजला । श्रीगुरु दयाळा सोडवावें ॥ १० ॥

( १०९ )

## धांवा

धरियेला विश्वास बांधियेली गांठ । फिरवीली पाठ जगतासी ॥ १ ॥
धरियेले पाय सेवीत राहिलों । बहु विश्वासलों गुरुवरी ॥ २ ॥
तारक ही माय तारील मजला । तिचीया कृपेला सीमा नाहीं ॥ ३ ॥
कधिं न करील त्याग ही माउली । पाखर कीं ओली तिची सदा ॥४॥
करुणेनें आर्द्र परम कोमल । दयाच केवळ गुरुमाता ॥ ५ ॥
ऐसीया बुद्धिनें आश्रय मी केला । इतर सांडीला व्यवसाय ॥ ६ ॥
निर्धारानें झालों पदीं शरणांगत । येईल धांवत माय माझी ॥ ७ ॥
अपेक्षा करीत राहिलों आजवरी । कां न येई तरी अजुनीयां ॥ ८ ॥
किती वाट पाहूं वेळ फार झाला । तळमळ जीवाला थोर झाली ॥ ९ ॥
आशेची तूं करूं नको गे निराशा । भक्तां तूं सुवशा कीर्ति तुझी ॥१०॥
तरी लगबग करीं तूं ग माये । करुणा-हृदये धांव आतां ॥ ११ ॥
नैराश्यांत नको मजलागीं लोटूं । किती मी झगडूं नैराश्यासीं ॥ १२ ॥
विनायक आतां अनुग्रहीं माये । कृपा न समाये तुझे ठायीं ॥ १३ ॥

( ११० )

## धांवा

येईं येईं आतां लवकरीं येईं । मजसाठीं घेईं उडी माये ॥ १ ॥
किती आशा धरूं किती वाट पाहूं । किती वेग साहूं नैराश्याचे ॥ २ ॥
करपलें माझें हृदय निराशेनें । किती मी इच्छेनें पाहूं वाट ॥ ३ ॥

इच्छा हे पोळली जणुं दग्ध झाली । अजुनी न भली करुणा ये ॥ ४ ॥
ऐकियेली श्रुति ऐकियेली स्मृति । संताचिया उक्ती ऐकियेल्या ॥ ५ ॥
ऐकिलीं पुराणें ऐकिले इतिहास । किती दंतकथांस ऐकियेलें ॥ ६ ॥
विश्वास ठेवोनी दृढ मी राहिलों । फजीत पावलों आतां वाटे ॥ ७ ॥
कितीतरी ग्वाही केली त्वयशाची । विफल ती साची जणुं झाली ॥८॥
गेली माझी पत लाज हरपली । लाज मज झाली किती सांगूं ॥ ९ ॥
माझ्या विश्वासाचें होय कीं मातेरें । ऐसें गुरुवरें काय केलें ॥ १० ॥
काय आलें मना सांगा गुरुनाथा । पदांवरी माथा ठेवियेला ॥ ११ ॥
बोला बोला बोला बोला गुरुराज । आतां महाराज सांगा कांहीं ॥ १२ ॥
काय मेळविलें तुमच्या सेवेनें । वर्णावें तोकानें काय सांगा ॥ १३ ॥
कृतज्ञता भाव धरावा कशाचा । पुरला न साचा मनोरथ ॥ १४ ॥
देह श्रमविला धरोनियां आस । पावशील खास कृपावंता ॥ १५ ॥
गुरुसेवा कधीं मुळीं न व्यर्थ होय । सिद्धीस कीं जाय मनोरथ ॥ १६ ॥
परि अनुभव विपरीत आला । दोहींसी फसला तुझा दास ॥ १७ ॥
नाहीं स्वार्थ नाहीं परमार्थ साधला । पात्र नाहीं झाला त्वत्कृपेला ॥ १८ ॥
ऐशी कैशी हानि आली या मजसीं । सांगावें कृपेसीं गुरुनाथा ॥ १९ ॥
चित्त घाबरलें हृदय पीडलें । कांहीं न सुचे भलें मज आतां ॥ २० ॥
तुझें तूंच पाहे सकळ गुरुनाथा । कळविलें अर्था हृदयींच्या ॥ २१ ॥
तुझा तुज असो देवा अभिमान । ब्रीदाचें अवन करीं आतां ॥ २२ ॥
विनायक म्हणे सर्व सोंपवीतों । तुझे ठायीं ठेवितों निजमन ॥ २३ ॥

## ( १११ )

## दुःख

गुरुवार ता. २४।७।१९३०

दुःख हें अमृत दुःख हाचि स्वर्ग । दुःख अपवर्ग मुख्य जाणा ॥ १ ॥
करुणेची योनि भक्तीचा उगम । वैराग्य परम दुःखमूळ ॥ २ ॥
दुःख भेटवीत जाणा परमात्म्यासीं । दुःख शोधनासीं करीतसे ॥ ३ ॥

दुःखासम नाहीं भवासीं औषधि । तुटवी उपाधि दुःख जाणा ॥ ४ ॥
दुःख करीतसे नरा धैर्यवंत । होय भाग्यवंत दुःखयोगें ॥ ५ ॥
परम ऐश्वर्याचें दुःख हेंचि मूळ । पुण्याईचें फळ दुःख जाणा ॥ ६ ॥
दुःख हाचि मित्र सखा कीं सोयरा । दुःख हा आसरा सज्जनांचा ॥७॥
इहपर दुःख देतसे सद्गति । दुःखासीं श्रीपति संलग्न कीं ॥ ८ ॥
दुःख झगटतां देवस्पर्श लाभे । यावें पद्मनाभें दुःख सदा ॥ ९ ॥
दुःख हे जननी जाणा परमार्थाची । सोयरीक साची घडे ब्रह्मीं ॥ १० ॥
विनायक म्हणे दुःखचि मागावें । सदा प्रेम भावें देवापाशीं ॥ ११ ॥

(११२)

## दुःख

आंच लागत दुःखाची । स्मरणी होत ईश्वराची ॥ १ ॥
जैसें जैसें हृदय उले । तों तों भक्तिरसें खुले ॥ २ ॥
तों तों आळवित देवा । पावतसे भक्तिभावा ॥ ३ ॥
कवित्वाची होत स्फूर्ति । करुणेचे शब्द निघती ॥ ४ ॥
भजन घडत नियमानें । करी सेवन तोखानें ॥ ५ ॥
नास्तिकपण लया जाई । श्रद्धा उद्भूत कीं होई ॥ ६ ॥
दुःख नेत देवापाशीं । घडवी त्याच्या दर्शनासीं ॥ ७ ॥
देव पुढें उभा करी । दुःख जाणा निरंतरीं ॥ ८ ॥
हंसवी खेळवी बोलवी । देवापुढें दुःख नाचवी ॥ ९ ॥
हृदयांत प्रकाशवी । देवमूर्ति जाणा बरवी ॥ १० ॥
देव दुःखें हाता येतो । दर्शनाचा लाभ होतो ॥ ११ ॥
मोक्षद गुरु परमात्मा । दुःख दावी जगदात्मा ॥ १२ ॥
खरा खरा दुखावला । तोच देवासीं भेटला ॥ १३ ॥
दुःख हेंच कामधेनू । काय यश त्याचें वानूं ॥ १४ ॥
पश्चात्ताप होतां चित्ता । संसारासीं मारी लत्ता ॥ १५ ॥
भीति जाई मुळींहुनी । धीट राहत होवोनी ॥ १६ ॥
विनायक म्हणे देवा । मज दुःखी सदा ठेवा ॥ १७ ॥

(११३)

## स्वधर्में निधनं श्रेयः। परधर्मो भयावहः

गुरुवार ता. ३१।७।१९३०

नेमुनियां दिली जीविका सर्वांसीं। चारही वर्णांसीं ईश्वरानें ॥ १ ॥
जैसा ज्याचा असे अधिकार तैसें। साधन भरंवसें योजावें कीं ॥ २ ॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रादिकां। जी उपजीविका नेमीयेली ॥ ३ ॥
त्याच धर्में तेणें करावें आचारा। तैसें व्यवहारा संपादावें ॥ ४ ॥
दुजीयाचा धर्म सुलभ जरी तो। घातक होय तो आचरीतां ॥ ५ ॥
विगुणही धर्म जो असे आपुला। तोच आपुल्याला हितकर ॥ ६ ॥
पारक्यधर्मांचा जरी शुभाचार। नव्हे सदाचार आपुल्याला ॥ ७ ॥
आपुला जो धर्म आपणां तो श्रेष्ठ। तोच बहु प्रेष्ठ मानावा कीं ॥ ८ ॥
मरण जरी आलें स्वधर्मांचे ठायीं। तरी तो उपायीं मुक्त करी ॥ ९ ॥
स्वधर्मानें साधे जैसा परमार्थ। तैसा नोहे अर्थ इतरांनीं ॥ १० ॥
परधर्म आहे पूर्ण भयावह। जाणा निःसंदेह अनर्थद ॥ ११ ॥
म्हणुनि स्वधर्में साधावी जीविका। अनर्थकारिका परधर्में ॥ १२ ॥
परधर्में होत स्वीय-जाति-च्युत। गति न पावत कोठलीच ॥ १३ ॥
विनायक म्हणे स्वधर्मा भजावें। कधीं न सेवावें परधर्मा ॥ १४ ॥

(११४)

## स्वधर्में निधनं श्रेयः। परधर्मो भयावहः

परमार्थ हेंच मनुजासीं ध्येय। कथिला उपाय त्याचेसाठीं ॥ १ ॥
श्रुतिस्मृतिशास्त्रें यानीं नेमियेला। शुभाचार भला सकळांसीं ॥ २ ॥
जैशी ज्याची योनि तैसा अधिकार। तैसाच आचार नेमीयेला ॥ ३ ॥
तया सदाचारें वागतां नरासीं। हानि भरंवसीं येईनाच ॥ ४ ॥
म्हणोनि व्युत्क्रम कधिं न करावा। जातिधर्म पाळावा सकळांनीं ॥ ५ ॥

स्वधर्मे जीविका नर जो चालवी । तयाची थोरवी बहुताचि ॥ ६ ॥
तयाचें जें धन तेंच न्यायार्जित । तेणेंच विहित धर्माचार ॥ ७ ॥
श्रुति सांगे करा सदा दानधर्म । जयांचा धनागम न्यायार्जित ॥ ८ ॥
न्यायार्जित धन योग्य तें दानासीं । तैसें इष्टापूर्तीसीं योग्य जाणा ॥ ९ ॥
न्यायार्जित नोहे जें का जाणा धन । न धर्मसाधन श्रुति बोले ॥ १० ॥
म्हणुनियां सदा स्वधर्मे चालावें । पारक्या सेवावें कधीं नच ॥ ११ ॥
विनायक म्हणे धर्म जो आपुला । तोच आपुल्याला श्रेष्ठ असे ॥ १२ ॥

(११५)

## स्वधर्मे निधनं श्रेयः । परधर्मो भयावहः

वरिष्ठ कनिष्ठां वृत्ति योजीयेली । उदरपूर्ति भली तेणें करा ॥ १ ॥
दुसऱ्याच्या धर्मे कधीं न वागावें । न व्यभिचारावें प्राण गेल्या ॥ २ ॥
व्यभिचार होतो प्राणासीं घातक । जवळि नरक तयें होतो ॥ ३ ॥
म्हणोनि रहावें स्वीय धर्मनिष्ठ । त्यापासोनी भ्रष्ट होऊं नये ॥ ४ ॥
अधमानें कधीं उत्तम-जाति-कर्म । करूं नये वर्म हेंच जाणा ॥ ५ ॥
श्रुतिनें दण्डक ठरविला त्यासीं । त्याचीये धनासीं नृपें घ्यावें ॥ ६ ॥
निर्धन करोनी तया देशपार । राजयें साचार घालवावें ॥ ७ ॥
वरिष्टें करितां परधर्माचार । पातित्य साचार येतें त्याला ॥ ८ ॥
दण्डक हे जाणा पाळावे स्मृतिचे । चळूं नये साचें कधीं कोणी ॥ ९ ॥
विनायक म्हणे स्वधर्मानें हित । होईल खचित निश्चय हा ॥ १० ॥

( ११६ )

## गुरु माउली

गुरुवार ता० ७।८।१९३०

गुरुवांचोनियां कोठें नाहीं थारा । म्हणोनी निर्धारा अर्पावें त्या ॥ १ ॥
क्षमावान गुरु कधीं न कोपती । दयाच करिती निजदासां ॥ २ ॥

कृपेची ती मूर्ति सद्गुरु माउली । तिची असे ओली पाखर कीं ॥ ३ ॥
प्रेमामृत आहे सदा तिजपाशीं । तिस उपमेसीं वस्तु नाहीं ॥ ४ ॥
रक्षित भक्तांसीं शासित दुष्टांसीं । वाढवी भक्तीसीं भजनास ॥ ५ ॥
कृपेनें द्रवत उडीच घालित । भक्तांसीं तारित गुरुमाता ॥ ६ ॥
तिचा आहे मज पूर्ण आशीर्वाद । मजसीं वरद शुभदा ती ॥ ७ ॥
विनायकासीं ती कधीं न पाठमोरी । सन्मुख साचारी कृपापूर्ण ॥ ८ ॥

( ११७)

## गुरुमाउलीचा कृपा-भाव

कितीतरी प्रेम भरिलें हृदयांत । कृपा पहा सांडत अनिवार ॥ १ ॥
कृपेनें भरली कृपेची बनली । कृपामूर्ति भली गुरुमाय ॥ २ ॥
माता काय निज लाथाडील बाळा । काय कळवळा तिज नाहीं ॥ ३ ॥
काय होईल ती कठीण माउली । ऐशी माता भली बोलूं कैशी ॥ ४ ॥
जरी मी बोलिलों कठोर ही माता । मज सहृदयता नसे काय ॥ ५ ॥
कृतघ्न मी काय निंदूं या मातेला । माझीया पापाला जोड कोठें ॥ ६ ॥
जिनें आजवरी मजसीं तारिलें । मजसाठीं केलें धांवण्यातें ॥ ७ ॥
तिस काय म्हणूं निष्ठुर कठोर । पागल अंतर काय माझें ॥ ८ ॥
माझ्या पाठीमागें कृपेनें ती उभी । मेघ जेंविं नभीं ओळली ते ॥ ९ ॥
मजवरी वर्षी कृपामृतधारा । कृपेचा पहारा तिचा असे ॥ १० ॥
शत्रु माझे सर्व दूर करी माता । मज निर्विघ्नता सदा ठेवी ॥ ११ ॥
जेथें जाईन मी तेथें मज संगें । येत अनुरागें प्रेमाचीया ॥ १२ ॥
रुसलों मी जरी मज समजावीत । मज चुचकारीत माझी माता ॥ १३ ॥
अनुभव मज ऐसा हा दासाचा । किती माझी वाचा सांगेल कीं ॥ १४ ॥
मज विसंबेना क्षण एक माय । सांद्र तिचें हृदय प्रेममय ॥ १५ ॥
विनायक म्हणे तिज काय वानूं । थोडकें वर्णनू पडे सारें ॥ १६ ॥

( ११८ )

## गुरुमाउलीचा लटिका कोप

अल्प धैर्य पाहे सत्वर धांवताहे । मज प्रगटताहे लवलाहीं ॥ १ ॥
क्षण एक दावी मज जडभारी । कष्ट जों अंतरीं होती माझ्या ॥ २ ॥
तंव ती उडी घाली संकट निवारी । काय प्रेमा सरी तिचीया हो॥३ ॥
धन्य गुरुमाता धन्य तिची ममता । सर्वांचि धन्यता तिचेपाशीं ॥ ४ ॥
वधोनियां दुष्ट वारोनी संकट । उभी राहे निकट निमूट ती ॥ ५ ॥
समजुं न देतां पहात गंमत । जों जों आळवित दीनवाणा ॥ ६ ॥
क्षणभरी ऐसें वाटायासीं देई । माय ही न येई धांवोनियां ॥ ७ ॥
निष्ठुर हे झाली मजसीं पावेना । वाटवीत मना किंचित्काल ॥ ८ ॥
तंव कळोनियां येत मग मात । अहित उध्वस्त जाहलें कीं ॥ ९ ॥
दूरच्या दूर तीं संकटें पळालीं । दावीत माउली चमत्कार ॥ १० ॥
ऐसा मज किती अनुभव आला। मज सांगण्याला शक्ति कैंची ॥११॥
विनायक झाला बहु सद्गदित । चरण धरीत लीनपणें ॥ १२ ॥

( ११९ )

## गुरुमाउलीचा लटिका कोप

खोटाच कीं कोप दावी क्षणभरी । भिववी अंतरीं आम्हांलागीं ॥ १ ॥
क्षणभरी वाटे आधार तुटला । मज गरिबाला कोण रक्षी ॥ २ ॥
कोण माझा वाली आतां या जगतीं । ऐसें मनाप्रति वाटूं लागे ॥ ३ ॥
कौतुक मायेचें काय मी बोलावें । अनुभवा यावें दयाळुत्वें ॥ ४ ॥
क्षणांत तो कोप मावळोनि गेला । सिद्ध उचलायाला क्षणामाजी ॥५॥
पसरोनी पट घेत कीं झांकोनी । बहु कुरवाळोनी मृदु बोले ॥ ६ ॥
तुझें झालें कार्य भिऊं नको आतां । ईडा पीडा अहितां प्राप्त होय ॥७॥

तुझे वैऱ्यांवरी कोप मी प्रेरिला । त्यांच्या दहनाला करील तो ॥ ८ ॥
तुझी हानि मृत्यु तुझिया वैऱ्यांसीं । माझीया कोपेंसीं प्राप्त होय ॥ ९ ॥
ऐसें सांगे माता बहु कुरवाळी । पूर्ण आतुर्बळी समर्थ जी ॥ १० ॥
मज अनुभव असे वारंवार । तोच मी साचार बोलतसें ॥ ११ ॥
माझा आहे थोर विश्वास मायेसीं । रक्षील मजसीं वात्सल्यानें ॥ १२ ॥
तिचीया पायांसीं मिठी मी घातली । तिजला अर्पिली चित्तवृत्ती ॥ १३ ॥
येवढेंच माझें कार्य असे जाणा । तिचीये चरणा नम्र होणें ॥ १४ ॥
विनायक म्हणे वत्स माउलीचा । पदर धरी तिचा कृपेसाठीं ॥ १५ ॥

( १२० )

# धांवा

आतां कृपा करीं संकट निवारीं । वैरीयां संहारीं माउली गे ॥ १ ॥
टपत बसले जे कां माझे वैरी । तयांसीं तूं मारीं जननी गे ॥ २ ॥
जन्मापासोनियां देवा एक केलें । तुझें भजन भलें प्रेमभरें ॥ ३ ॥
तेंच आतां येवो मजसीं फळाला । माझे रक्षणाला करो नाथा ॥ ४ ॥
जो का तुझा कोप योजी तो वैऱ्यांसीं । माझ्या आमेष्टांसीं सुखी करीं ५
अभिमान राखीं आपुल्या वत्साचा । आपुल्या स्थानाचा राखीं माये ६
आपुल्या भक्तीचा आपुल्या सेवेचा । अभिमान साचा राखीं माये॥७॥
अभिमान राख कृपानुग्रहाचा । जो का केला साचा मजवरी ॥ ८ ॥
जें का वदविलें तुवां माझ्या मुखें । अभिमान राखें तयाचा तूं ॥ ९ ॥
निर्वाणीचें माझें असें हें बोलणें । देवा पुरविणें इच्छा माझी ॥ १० ॥
आम्ही कोठें जावें कोणासीं सांगावें । कोणा विनवावें दीनवाणें ॥११॥
असोनियां तुझे आम्हीं कां इतरां । सहाय उदारा मागावें कीं ॥ १२ ॥
आम्हीं तुझे दास प्रार्थूं कां इतरां । सामर्थ्य उदारा न का तुज ॥ १३ ॥
विनायक म्हणे मजसीं तारावें । मजसीं पावावें गुरुनाथा ॥ १४ ॥

## ( १२१ )

# कृपाळू वासुदेव

गुरुवार ता० १४।८।१९३०

वासुदेवावरी माझा पूर्ण भाव। माझा गुरुदेव तोच सखा ॥ १ ॥
विसावा तो माझा आनंद मनींचा। सुखधाम साचा मजलागीं ॥ २ ॥
त्याचेसम नाहीं कोणीही प्रेमाचा। दुजा मज साचा जाणा कोणी ॥३॥
माझ्या निश्चयाचा दृढ भावनेचा। वासुदेव साचा जाणा एक ॥ ४ ॥
विनायकाचा तो पूर्ण कैवारी या। तया गुरुराया दया त्याची ॥ ५ ॥

## ( १२२ )

# कृपाळू वासुदेव

देव माझा वासुदेव। त्याचेवरी माझा भाव ॥ १ ॥
धरिले मी दोन्ही पाय। हाच मजसीं उपाय ॥ २ ॥
तारक तो मजलागीं। कृपा थोर त्याजलागीं ॥ ३ ॥
कृपाळू तो परमेश्वर। माझे जीविंचा आधार ॥ ४ ॥
मज सौख्याचा सागर। वासुदेव विश्वंभर ॥ ५ ॥
विनायका त्याचा ळळा। भजतसे त्या स्नेहाळा ॥ ६ ॥

## ( १२३ )

# “धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे”

गुरुवार ता० २१।८।१९३०

अवतार होतो जगाच्या कारण। धर्म संरक्षण करायास ॥ १ ॥
अधर्माचा जेव्हां उदय घडतो। तेव्हां प्रभु घेतो अवतार ॥ २ ॥

धर्माचा हा वाली सज्जनांचा त्राता । भक्तां सुखदाता जगत्प्रभु ॥ ३ ॥
आपुल्यासीं सुख द्यावया कारण । दुष्ट निर्दाळण करावया ॥ ४ ॥
भूभार हराया दुःखी सोडवाया । जगातें ताराया येतो देव ॥ ५ ॥
बहुरूपी देव नानारूपें धरी । नाना लीलावतारी देव जाणा ॥ ६ ॥
पशुपक्षी योनी त्यांतही हा येतो । अवतार घेतो जनार्दन ॥ ७ ॥
होतो मनुज हा होतो कधीं देव । योग्य जो का भाव आदरीतो ॥ ८ ॥
उपेंद्रवामन देवामध्यें झाला । रामकृष्ण भला मनुष्यांत ॥ ९ ॥
मत्स्य कूर्मादिक जे का अवतार । झाले अवनीवर देवाजीचे ॥ १० ॥
नाना योनीमध्यें प्रगटीतो भाव । देव वासुदेव लीलाकर्ता ॥ ११ ॥
विनायक नमी तया वासुदेवा । धरुनी प्रेमभावा त्याचे ठायीं ॥ १२ ॥

## (१२४)

देवा सेवूं देवा भजूं । जगीं प्रेमाचीया काजू ॥ १ ॥
देवनाम प्रेमें घेऊं । देवालागीं चित्तीं ध्याऊं ॥ २ ॥
गुण गाऊं देवाजीचे । प्रेमभरें निजवाचे ॥ ३ ॥
कथा ऐकूंया श्रवणीं । प्रेम लोटे अंतःकरणीं ॥ ४ ॥
पाहूं देवाजीचें मुख । अनुपम तो हरिख ॥ ५ ॥
भरूं मूर्ति हृदयांत । सुख राहूं अनुभवीत ॥ ६ ॥
विनायक म्हणे योग । जोडूं वाहुनि अंतरंग ॥ ७ ॥

## (१२५)

# धांवा

तुजविण कोण तारील मजसीं । सांग या दीनासीं कृपासिंधू ॥ १ ॥
विश्वासानें तुझे धरिले मी पाय । हाच सदुपाय माझ्या मतें ॥ २ ॥
तुजवीण माझा कोणी नसे वाली । दया येवो भली दत्तनाथा ॥ ३ ॥
करुणेचा सिंधू प्रेमाचा सागर । धांव तूं सत्वर दयावंता ॥ ४ ॥

उडी घाल आतां देवा माझेसाठीं । स्वामि जगजेठी कृपावंता ॥ ५ ॥
तुजवीण कोणा माझी दया येईल । धांवत येईल कोण सांग ॥ ६ ॥
विनायक तुझा झालासे घाबरा । तरी करीं त्वरा वासुदेवा ॥ ७ ॥

( १२६ )

## धांवा

तुझीये पाडसासीं पडतां जड भारी । कोण गे सत्वरीं उडी घाली ॥ १ ॥
माउलीचेवीण कोणा कळवळा । लेंकुराचा लळा कोणालागीं ॥ २ ॥
लेकुरानें वाट पहावी कोणाची । माऊलीवीण साची सांग दत्ता ॥ ३ ॥
तुजकडे नातें असे माऊलीचें । आम्हां पाडसाचें असे माये ॥ ४ ॥
तरी तूं आतां धांव संकट पडलें । निवारील भलें कोण सांग ॥ ५ ॥
विनायक तुझ्या चरणींचा दास । पुरवीं याची आस गुरुमाये ॥ ६ ॥

( १२७ )

## ईशसेवनासक्ती

प्रेमा भजनाचा कथा कीर्तनाचा । तुझीये पूजेचा मजलागीं ॥ १ ॥
तुजलागीं गावें तुजला वर्णावें । तुजला सेवावें परोपरी ॥ २ ॥
रात्रंदिन काळ सेवेंत घालावा । देह जागवावा कीर्तनांत ॥ ३ ॥
मन तुझ्या गुणीं मन तुझ्या रूपीं । मन गुणालापीं रमवावें ॥ ४ ॥
ऐशी मज आहे आवड प्रेमाची । पुरवील साची कोण सांग ॥ ५ ॥
अष्टौप्रहर तुझ्या सेवेंत वागावें । सर्वस्व अर्पावें तुझ्या ठायीं ॥ ६ ॥
तन मन धन तुझेंच करावें । आसक्त न व्हावें कोठें मनें ॥ ७ ॥
महदासक्ती एक तुझ्या सेवनाची । याहुनीयां साची नको दुजी ॥ ८ ॥
विनायक म्हणे तुज कळविलें । अंतरींचें भलें सांगितलें ॥ ९ ॥

## ( १२८ )

# धांवा

घेवोनियां सेवा नाथ आजवरी । आतांच कां तरी उपेक्षितां ॥ १ ॥
कोणा हीनपणा येईल तो सांगा । सांगा रमारंगा सांगा मज ॥ २ ॥
उणेपणा तुम्हां तुमचीया स्थाना । येई दयाघना मज वाटे ॥ ३ ॥
आपुला अभिमान आपण राखावा । दास न लोटावा दूर देवा ॥ ४ ॥
दुःखाची कहाणी तुजवीण कोणा । सांगुं नारायणा सांग मज ॥ ५ ॥
ज्याचेवरी आजपर्यंत भाळलों । बहु विश्वासलों ज्याचेवरी ॥ ६ ॥
तयाहुनी अन्या कोणा मी चिंतावें । रक्षण मागावें कोणापाशीं ॥ ७ ॥
बाळाभ्यासी देवा तुझीये सेवेचा । तुज ठावा साचा गुरुनाथ ॥ ८ ॥
शक्ती जैसी माझी तैसें मी साहीलें । द्वंदालागीं भलें तुझ्यासाठीं ॥ ९ ॥
नको लोटूं दूर पामर अभागी । कोण याचा जगीं आधार बा ॥ १० ॥
विनायक म्हणे करुणा माझी यावी । वृत्ति तुझी द्रवावी वासुदेवा ॥ ११ ॥

## ( १२९ )

# धांवा

कठोर नको होऊं मायाळू स्वभाव । तुझा वासुदेव नित्याचा कीं ॥ १ ॥
नित्य स्वभावासीं सोडूं नको देवा । माझ्या वासुदेवा जिवलगा ॥ २ ॥
माझ्या अंतरींच्या प्राणाच्या सखया । जीवाच्या विसांवीया वासुदेवा ३
किती तुज स्तवूं तुजला आळवूं । किती मी विनवूं परोपरी ॥ ४ ॥
किती आळवणी करुनीयां घेणें । अंत किती पाहणें सांग देवा ॥ ५ ॥
करुणेचा तुझा नित्याचा स्वभाव । तोच आतां भाव प्रगटावा ॥ ६ ॥
नको चोरूं पान्हा माझे गे माउली । पाखर तुझी ओली सदा असे ॥ ७ ॥

परकें वत्स नोहे तुझेंच गे माये । परतोनी जाये कोणीकडे ॥ ८ ॥
आजवरी मज पाखर दिधली । क्षुधा शमविली माझी माये ॥ ९ ॥
मज तान्हुल्यासीं उपाशी कां माये । मारतेस सये माउलीगे ॥ १० ॥
निष्ठुरपण कैसें कोठूनियां आलें । मज न समजलें कृपावंता ॥ ११ ॥
विनायक आला तुज काकुळती । लोळे पायावरतीं तुझ्या माये ॥ १२ ॥

( १३० )

# धांवा

दुष्टांसींही दया आणी करुणावाणी । तुज चक्रपाणि कां न येत ॥ १ ॥
पाषाण ही देवा द्रवेल वाटतो । कां न उडी घेतो माझा दत्त ॥ २ ॥
कोठें गुंतला तो सखा माझा नाथ । धनी माझा समर्थ कोठें आहे ॥ ३ ॥
अनाथ मी काय नाथ मज असतां । सांग अवधूता सांग आतां ॥ ४ ॥
काय माझी वाणी तुझीया श्रवणीं । नाहींच चक्रपाणि पडली का ॥ ५ ॥
काय तूं निर्धार केलासीं समर्था । क्षमा मज नाथा करणें नाहीं ॥ ६ ॥
परी तुझा निर्धार मजसीं ठाउका । आहे विश्वपालका पदोपदीं ॥ ७ ॥
घातलीस उडी मजसीं तारिलें । संकट निवारिलें देवा माझें ॥ ८ ॥
तोच का तूं देव निष्ठुर झालासीं । निर्धार केलासीं तूंच काय ॥ ९ ॥
परी तुझा देवा निर्धार चालेना । तुज कठिणपणा नाहीं नाहीं ॥ १० ॥
निर्धाराचा नाहीं देवा तुझा स्वभाव । भलताच भाव धरीतोस ॥ ११ ॥
ज्याचा नोहे धर्म तेणें तो न करावा । भलता आदरावा योग्य नोहे ॥ १२ ॥
परधर्म आहे वहु भयावह । त्यांत तो संदेह मुळीं नाहीं ॥ १३ ॥
पारक्य धर्माचा नको अंगिकार । करूं तूं निर्धार दत्तात्रेया ॥ १४ ॥
दया हाच धर्म दया हा स्वभाव । तुझा कृपाभाव सर्वकाळीं ॥ १५ ॥
विनायक आहे तुझा पददास । तुझा सहवास घडलासे ॥ १६ ॥

## (१३१)

## धांवा

तुझ्या सहवासें पूर्ण मी जाणतों । स्वभाव ओळखितों तूझा दत्ता ॥ १ ॥
जरी साह्यागिरीवरी तूं असती । टेंभा मिरविसी व्रात्यत्वाचा ॥ २ ॥
तरी लगबग देवा धांवसील । उचलोनी घेसील मजलागीं ॥ ३ ॥
निर्लज्ज तूं देवा तुज लाज नाहीं । धांवशील पाहीं मजलागीं ॥ ४ ॥
निर्धार मी तुझा चालूं न देईन । तुजला आणीन धांवताचि ॥ ५ ॥
ऐसा आहे माझा दृढ आत्मविश्वास । जाणतों मी खास तुजलागीं ॥ ६ ॥
मजलागीं नोहे नोहे तूं बा नवा । तुज दत्तदेवा जाणतों मी ॥ ७ ॥
आजवरी मज तुझा सहवास । कधीं वियोगास घडलें न ॥ ८ ॥
आसनीं शयनीं विलास समयीं । कोणत्याही समयीं माझेपाशीं ॥ ९ ॥
नित्य दत्ता तुझा वास जाण आहे । मी तों जाणताहें तुजलागीं ॥ १० ॥
तुझें वर्म आहे मजलागीं ठावें । ओढोनी न आणावें आतां दत्ता ॥ ११ ॥
काय मी पाहुणा परका असें आलों । योगातें पावलों नाहीं काय ॥ १२ ॥
तुझा माझा योग बहुत जन्माचा । नोहे नवा साचा आज दत्ता ॥ १३ ॥
तुजलागीं जाणें तूं मजसीं जाणसी । आम्हीं उभयतांसीं जाणतोंच ॥ १४ ॥
परस्परां आहे खूणगांठ ठावी । तरी उडी घ्यावी आतां दत्ता ॥ १५ ॥
विनायकें किती तुजसीं प्रार्थावें । किती विनवावें दयावंता ॥ १६ ॥

## (१३२)

## धांवा

धांव धांव आतां देवा । धरूनीयां कृपाभावा ॥ १ ॥
अपराध क्षमा करीं । धांव घेईं तूं सत्वरीं ॥ २ ॥
किती आतां वाट पाहूं । देवा कष्ट किती साहूं ॥ ३ ॥
कोण चिंता निवारीता । कोण मज भयत्राता ॥ ४ ॥
संकटांत कोण वाली । कोणा दया येई भली ॥ ५ ॥

कोण घालील वा उडी । मजसाठीं नाथ तांतडी ॥ ६ ॥
तरी आतां पुरुषोत्तमा । पूर्ण करा माझ्या कामा ॥ ७ ॥
उडी घालोनियां येईं । बाळासाठीं जैशी आई ॥ ८ ॥
तुजपुढें किती रडूं । किती सांग कीं आरडूं ॥ ९ ॥
आक्रोश माझा पाहोनियां । सौख्य काय तव हृदया ॥ १० ॥
कितीं आक्रोश करावा । किती अंत त्वां पहावा ॥ ११ ॥
तरी आतां उडी घाल । तुजसम तूं दयाळ ॥ १२ ॥
विनायकें दोन्ही चरण । धरिले तुझे नारायण ॥ १३ ॥

( १३३ )

## जगत्पिता

गुरुवार ता० ११।९।१९३०

जगाचा तूं बाप परम स्नेहाळ । प्रेमाचि केवळ मूर्तिमंत ॥ १ ॥
पिता तूंच जाण सकळ सृष्टीचा । चराचर विश्वाचा जनक तूं ॥ २ ॥
तूंच एक जाण सृष्टी-प्रतिपाळीता । अवन-पूर्तता तुझेपाशीं ॥ ३ ॥
जें जें कांहीं होत अवन जगांत । सकळ करीत तूंच नाथा ॥ ४ ॥
लालन पालन सकळ जगाचें । करिशी तूंच साचें विश्वंभरा ॥ ५ ॥
तूंच मेघ होसी जल तूं वर्षिसी । तूंच पिकविसी धान्य सारें ॥ ६ ॥
तूंच धान्यरूपें देहातें पोषिसी । तूंच एक होसी पिता देहा ॥ ७ ॥
तूंच इंद्र होसी मेघांचा शासिता । तूंच अन्नदाता सकलांचा ॥ ८ ॥
तुझेपासोनियां पोषण जगाचें । साधन स्थितिचें तूंच नाथा ॥ ९ ॥
विनायक म्हणे मूर्तिमंत स्थिति । तूंच गा श्रीपती जगत्रयीं ॥ १० ॥

( १३४ )

## जगत्पिता

सूर्यकिरणांत वसोनी रक्षिसी । प्राणांतें पोषिसी विश्वाच्या तूं ॥ १ ॥
प्राणांचा तूं पिता तूंच स्थितिकर्ता । तूंच जगद्भर्ता सूर्यरूप ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



सूर्यरूपें जरी गगनीं राहासी । जग हें व्यापिसी किरणांनीं ॥ ३ ॥
तोच अनुग्रह थोर जगा होत । चैतन्य प्रकाशत त्याच्या योगें ॥ ४ ॥
विनायक म्हणे सूर्य-देव पिता । सकळां रक्षिता आदित्य तो ॥ ५ ॥

## ( १३५ )

# पितृत्वाचें कारण

अनंत तुझ्या मूर्ति जगांत वसती । नानाकार स्थिति वर्तताती ॥ १ ॥
संरक्षण हाच मुख्य असे धर्म । पालन हें कर्म असे सदा ॥ २ ॥
तूंच अन्नमय तूंच जलमय । तूंच वायुमय दत्तनाथा ॥ ३ ॥
धारण जगताचें सकल तुझेनी । काय मी वाचेनी बोलूं सांग ॥ ४ ॥
तूंच बीजप्रद असशी बा पिता । सर्व दुःखहर्ता तूंच जाण ॥ ५ ॥
औषधिरूपानें तूंच गा वर्तसी । सकळां पोषिसी तूंच दत्ता ॥ ६ ॥
देहसौकुमार्य तुझ्याच कृपेनें । प्राप्त होय जाणे सकलांसीं ॥ ७ ॥
आमुचा तारक तूंच एक नाथा । पुरविसी अर्था तूंच जाण ॥ ८ ॥
पाठिसीं तूं उभा कोणत्याही रूपें । तुझिया प्रतापें सदवन ॥ ९ ॥
जें जें कांहीं जाण सृष्टींत पोषक । तुझेंच रूपक सर्व दत्ता ॥ १० ॥
जे जे कांहीं भोग सकल तूंच नाथा । म्हणोनी समर्था पिताजी तूं ॥ ११ ॥
तूंच विद्यादाता संस्काराचा कर्ता । तूंच होसी देता सर्व कांहीं ॥ १२ ॥
विनायक म्हणे नातें पिताजीचें । तुझे ठायीं साचें असे जाण ॥ १३ ॥

## ( १३६ )

# पितृत्वाचें कारण

ब्रह्मदेवा ज्ञान प्रथम तुवां दिलें । तेंच पसरीलें जगत्रयीं ॥ १ ॥
आमुच्या चित्तांत ज्ञान जें स्फुरत । तूंच जाणा देत आम्हांलागीं ॥ २ ॥
जो कां मंत्र स्फुरे आमुच्या चित्तांत । आचरण होत ज्याच्यापरी ॥ ३ ॥
तूंच मंत्रदाता तूंच जगद्गुरु । तूंच साक्षात्कारु पिताजी कीं ॥ ४ ॥

आम्हुच्या देहाची जतना जे झाली । तारक शक्ति भली तुझीच कीं ॥५॥
तूंच जाण नाथा आम्हुच्या देहाचा । उपजविता साचा जनक तूं ॥ ६ ॥
विनायक म्हणे पिता पालयिता । तूंच जाण धाता विश्वगुरु ॥ ७ ॥

(१३७)

## अन्न

गुरुवारं तां. १८।९।१९३०

अन्न हाचि देव अन्न हेंच ब्रह्म । अन्न परंधाम परमात्मा ॥ १ ॥
अन्नमय सर्व विश्व हें जाणावें । अन्नासीं पुजावें प्रियभावें ॥ २ ॥
कधींही अन्नाला ठेवूं नये नांव । तेणें होतो देव रुष्ट जाणा ॥ ३ ॥
अन्नमय देह अन्नमय प्राण । अन्न नारायण जाणावा कीं ॥ ४ ॥
अन्न हेंच जाणा सकल महत्त्व । अन्न हें जीवित्व सकळांचें ॥ ५ ॥
अन्नालागीं नाहीं कोठेंही उपमा । तया पुरुषोत्तमा भजावें कीं ॥ ६ ॥
विनायक म्हणे अन्न परब्रह्म । करी पूर्णकाम सेवी त्यासीं ॥ ७ ॥

(१३८)

## अन्न

जें जें कांहीं मूर्त अमूर्त जगांत । अन्नचि वर्तत जाणावें कीं ॥ १ ॥
सकळ शरीरें अन्नाचीं बनलीं । अन्नेंच पोसलीं अन्नमय ॥ २ ॥
एक होतो अन्न जया दुजीयाचें । अन्नत्व त्या साचें तिसऱ्याचें ॥ ३ ॥
अन्न अन्नाद हे सकळ जगांत । ब्रह्म हें वर्तत ह्याच रूपें ॥ ४ ॥
अन्नापासोनियां सकळ भूतसृष्टी । होत असे तुष्टि अन्नयोगें ॥ ५ ॥
उत्पत्ति स्थिति लय सकळ अन्नांत । अन्नचि बनत सर्व कांहीं ॥ ६ ॥
म्हणोनियां भजा भजा त्या अन्नासीं । सदा सन्मानासीं द्यावें त्यासीं ॥ ७ ॥
प्रथम उपासना जाणा या अन्नाची । प्रसन्नता साची तेणें देवा ॥ ८ ॥
सगुण साक्षात्कारा अन्नचि कारण । अन्न नारायण जाणावें हें ॥ ९ ॥

म्हणोनियां अन्नद्वेष न करावा । अन्नाचा न व्हावा निंदायोग ॥ १० ॥
अहोरात्र करा पूजन अन्नाचें । भजन अन्नाचें सदोदित ॥ ११ ॥
प्रथम उपासना करितां अन्नाची । वाट परब्रह्माची सांपडते ॥ १२ ॥
विनायक म्हणे अन्नाचा संग्रह । करा निःसंदेह विश्वासानें ॥ १३ ॥

( १३९ )

## अन्नोपासनेची महती.

कोणासींही अन्न कधीं न नाकारावें । प्रयत्नानें द्यावें सत्कारेंसीं ॥ १ ॥
बहुमानपुरःसर अन्न द्यावें । सकळां करावें तृप्त अन्नें ॥ २ ॥
अन्न मेळवावें अन्न सांठवावें । सकळां वांटावें प्रेमभरें ॥ ३ ॥
जो जो कोणी येई अतिथ घरासीं । अन्न हें तयासीं द्यावें मानें ॥ ४ ॥
सन्मानोनी अन्न द्यावें कोणासींही । प्रसन्न होत पाहीं देव तुज ॥ ४ ॥
जो का अन्नदाता तया मृत्यु येतां । परब्रह्मसत्ता पावत तो ॥ ६ ॥
विनायक म्हणे अन्न उपासना । तुज भोग नाना देत असे ॥ ७ ॥

( १४० )

## अन्नोपासनेची महती

अन्नदानें तुज सर्व काम सिद्धि । होत परमर्द्धि तुज प्राप्त ॥ १ ॥
अन्नाचीयायोगें विश्वसंतर्पण । करितां नारायण दूर नोहे ॥ २ ॥
अन्नरुपी आहे जाणा जनार्दन । अन्नेंच पूजन करा त्याचें ॥ ३ ॥
समृद्ध अन्नानें आपण बनावें । सर्वांभूतीं द्यावें अन्न जाणा ॥ ४ ॥
कृमिकीटकादि पिपीलिका जीव । तयां तृप्ति भाव अन्नें द्यावा ॥ ५ ॥
अन्नें आराधन करावें विश्वाचें । तेणें ब्रह्म साचें संपादत ॥ ६ ॥
सकळांचा ऐसा जो का अन्नदाता । तोच परमात्मा बनसी तूं ॥ ७ ॥
विनायक म्हणे अन्नमहिमान । करील वर्णन कोण त्याचें ॥ ८ ॥

( १४१ )

अन्नअन्नादांसीं विचारें जाणावें । तयां ओळखावें सर्वांठायीं ॥ १ ॥
शरीरांमध्यें प्राण प्राण शरीरांत । दोघे अन्न होत अन्नादही ॥ २ ॥
सलिलांत अग्नी अग्नींत सलिल । दोहोंची मिसळ ऐशी असे ॥ ३ ॥
अन्न अन्नाद ते दोघेही बनती । ऐशी चमत्कृति विश्वाठायीं ॥ ४ ॥
पृथ्वी आकाशांत पृथिवींत नभ । विचार सुलभ ऐसा आहे ॥ ५ ॥
अन्न अन्नाद हे एकचि असती । अनुभवा येती एकरूप ॥ ६ ॥
अन्वयव्यतिरेकीं ब्रह्मचि उरत । सर्व मावळत साकार जें ॥ ७ ॥
म्हणोनियां म्हणे विनायक सेवा । मार्ग हा बरवा अन्नोपास्ति ॥ ८ ॥

( १४२ )

## अन्नोपासनेची महती

पितरांच्या नांवें करा अन्नत्याग । तेंच यथासांग सेवन कीं ॥ १ ॥
बहु सत्कारोनी अन्न भूतमात्रां । घालितां परामात्रा सांपडत ॥ २ ॥
तृप्त होतां जीव होय समाधान । तेणें अंतर्ज्ञान प्रगटत ॥ ३ ॥
म्हणोनी पहिली हेच उपासना । श्रुती सर्व जनां लावीतसे ॥ ४ ॥
सगुण साक्षात्कार प्रथम जो होय । तोच अन्नमय जाणावा कीं ॥ ५ ॥
म्हणोनियां यज्ञ श्रुतिनें कल्पियेले । तृप्त करणें भलें सकळांसीं ॥ ६ ॥
विनायक म्हणे अतिथिसत्कार । हेंच सर्व सार अन्नयोगें ॥ ७ ॥

( १४३ )

## उपासनामहती

गुरुवार ता. २।१०।१९३०

उपासनेवीण समर्थ साधन । नसे जाण आन जगत्रयीं ॥ १ ॥
योग याग जरी किती सिद्ध झाले । थोकडे ते भले परमार्थी ॥ २ ॥
मनःशुद्धिवीण परमार्थी गति । नोहे कोणाप्रति निश्चित हें ॥ ३ ॥

मनोविकासन उपासना योगें । बद्ध अनुरागें होतां देवीं ॥ ४ ॥
जेव्हां देवमय होवोनी रहात । मन हें पाहत देवालागीं ॥ ५ ॥
आपणांसीं जेव्हां करी देवमय । होवोनी प्रेममय सानुबंधें ॥ ६ ॥
तेव्हांच शुद्धि होत मन विकासत । ज्ञान निर्धारत मग तेथें ॥ ७ ॥
निश्चयाची प्राप्ति मनाच्या शोधनें । प्रकाशत ज्ञानें मन मग ॥ ८ ॥
विनायक म्हणे म्हणोनि सगुणा । भज नारायणा सर्वकाळ ॥ ९ ॥

( १४४ )

## योगाचा दुरुपयोग

योगाच्चिया योगें बळ इंद्रियांचें । वाढवितां साचें काय होय ॥ १ ॥
भोगाचि लालसा अधिक वाटत । शम न पावत चित्त कांहीं ॥ २ ॥
भोग-सामर्थ्याला वाढवीतो योग । भोगाचाच योग घडे मग ॥ ३ ॥
अणिमादि सिद्धी सकळ प्राप्त होती । ऐश्वर्यें प्राप्त होती संपूर्णत्वें ॥ ४ ॥
म्हणोनियां योग ज्ञानालागीं आड । लावित कवाड जणूं कांहीं ॥ ५ ॥
जरी न भक्तीयोग उपासना कांहीं । भोग व्यर्थ पाहीं होत असे ॥ ६ ॥
सिद्धीयोगें सिद्ध होतां होतो मत्त । सर्वदा अतृप्त अशांत तो ॥ ७ ॥
मग ज्ञान कैंचें कैंचा प्रेमरंग । सदा अंतरंग अविवेकी ॥ ८ ॥
सिद्धींचीया बळें मर्यादा उल्लंघी । पडतसे अघीं दारुणीं तो ॥ ९ ॥
मग दैत्यत्वचि तयालागीं येत । कैसा मुक्त होत योगें सांगा ॥ १० ॥
म्हणोनियां नित्य देवाचें भजन । करा गर्हिवरून प्रेमरंगें ॥ ११ ॥
विनायक म्हणे नित्य उपासना । याच एक साधना आश्रयावें ॥ १२ ॥

( १४५ )

## कर्मानें मोक्ष मिळत नाहीं

जरी कर्में मोक्ष म्हणाल प्राप्त होत । तरी तो दुरावत जडत्वानें ॥ १ ॥
कर्माचीया योगें जडत्व येतसे । बद्धता होतसे जीवालागीं ॥ २ ॥
फलाभिसंधितें धरोनियां कर्म । करित परम मानव हो ॥ ३ ॥

अविवेकी मन इंद्रियें सरस । वश वासनेस असे सदा ॥ ४ ॥
तेणें याचें मन इंद्रियें हीं तैशीं । बद्ध विषयांसीं अनुबंधें ॥ ५ ॥
मग चित्तशुद्धी कैशी प्राप्त होत । ज्ञान प्रकाशत कैसें याला ॥ ६ ॥
भृत्य वासनेचा कैसा मुक्त होय । जोंवरि हृदय शुद्ध नाहीं ॥ ७ ॥
तेणें मंत्रसिद्धी यास होत नाहीं । देव बद्ध पाहीं याचे सदा ॥ ८ ॥
मंत्र वायां होती देव न पावती । मग कैंची गति प्राप्त याला ॥ ९ ॥
देवांचाही यास न घडे साक्षात्कार । मग ज्ञान विस्तार दूर जाणा ॥ १० ॥
ज्ञानापासोनीयां दूर हा राहतो । मुक्ती न पावतो कर्मयोगें ॥ ११ ॥
विनायक म्हणे उपासना हेंच । साधन असे साच जाणावें कीं ॥ १२ ॥

( १४६ )

## दैत्यांचा दृष्टांत.

योग सिद्ध झाला जयां दैत्यांलागीं । प्रमत्त ते जगीं थोर झाले ॥ १ ॥
ऐसा इतिहास नित्याचा सांगतो । सामर्थ्य वर्णितो दैत्याचें कीं ॥ २ ॥
सामर्थ्य हें नोहे मोक्षासीं कारण । परमार्थ जाण दुरावतो ॥ ३ ॥
जेव्हां सामर्थ्याचा होय दुरुपयोग । तेव्हां अपवर्ग साधेनाच ॥ ४ ॥
त्रैलोक्यांत जरी दैत्य राजे झाले । तरी सर्व मेले इतिहास ॥ ५ ॥
कोणी न तरला योगसिद्धिबळें । विवेकानें वळे परमार्थ ॥ ६ ॥
ज्ञानप्रकाशन जेव्हां होत जाणा । होय विचारणा परमार्थीं ॥ ७ ॥
तेव्हांच परमार्थीं गति प्राप्त होत । तेव्हां नर होत मुक्त जाणा ॥ ८ ॥
शुंभनिशुंभांचा घडला वृत्तांत । हेंच शिकवीत सर्वांलागीं ॥ ९ ॥
विनायक म्हणे भजा भगवंता । तरी मुक्ती हाता येईल कीं ॥ १० ॥

( १४७ )

## कर्मानें मोक्ष मिळत नाहीं

मर्त्यलोकीं शुभ कर्मांतें करिती । देवपणा पावती देवलोकीं ॥ १ ॥

परि तेही मग संकटीं पडती । सामर्थ्यें राहतीं कर्माचीं कीं ॥ २ ॥
जेव्हां योगसिद्ध पुरुषा गांठीं पडे । सिद्धी त्याची नडे देवांलागीं ॥३॥
स्थानभ्रष्ट होती विपत्ती भोगिती । कर्मफळें होती अस्तंगत ॥ ४ ॥
जेव्हां भगवंता शरण ते जाती । तेव्हांच सद्गती प्राप्त तयां ॥ ५ ॥
हाच इतिहास आम्हां बोध करित । जाणा विचारवंत विचारानें ॥ ६ ॥
विनायक म्हणे कर्म व्यर्थ आहे । विघ्नांलागीं लाहे फळकाळीं ॥ ७ ॥

( १४८ )

## शुंभ-निशुंभ कथा

शुंभ-निशुंभानीं देवां पराभवितां । गुरुसीं तत्वतां शरण आले ॥ १ ॥
गुरु सांगताती न दिसे उपाय । बहु प्रत्यवाय दिसताती ॥ २ ॥
यज्ञयाग जरी कांहीं आचरावे । मंत्रांनीं आणावे देव जरी ॥ ३ ॥
हविर्भाग जे का देव सेविताती । त्यांसी अधोगती प्राप्त आज ॥ ४ ॥
तुम्हीं इंद्र चंद्र हविचे अधिकारी । निर्बळ झालां तरी असे आज ॥५॥
मग यज्ञयाग कैसा पावणार । कैसें सिद्ध होणार कर्म मग ॥ ६ ॥
विफळ हें कर्म असे आतां जाणा । दैवची प्रमाणा मानावें कीं ॥ ७ ॥
कोणी म्हणताती दैवची प्रमाण । उद्योग अप्रमाण म्हणताती ॥ ८ ॥
कोणी उद्योगासीं प्राधान्यातें देती । दोहोंसीं म्हणती कोणी सेवा ॥ ९ ॥
उद्यम आणि दैव दोनीही प्रमाण । असें सप्रमाण बोलताती ॥ १० ॥
याच कारणें कांहीं उद्योग करणें । प्रशस्त शाहणे म्हणताती ॥ ११ ॥
तरी तुम्हांलागीं उपाय कथितों । मज जो सुचतो आतां जाणा ॥ १२ ॥
विनायक म्हणे सांगे उपासना । देवीच्या भजना बृहस्पती ॥ १३ ॥

( १४९ )

## शुंभ-निशुंभ कथा

पूर्वीं तुम्हां होती प्रसन्न जे झाली । भगवती भली जगदंबिका ॥ १ ॥
तिनें तुम्हां आहे दिधलें वचन । कराल स्तवन जेव्हां माझें ॥ २ ॥

तेव्हां मी पावेन शत्रु निर्दाळीन । तुम्हांसीं देईन क्षेम जाणा ॥ ३ ॥
तरी तीच देवी तुम्हीं उपासावी । प्रसन्न करावी सांगे गुरु ॥ ४ ॥
विनायक म्हणे याच उपायानें । देव निजस्थानें पावले ते ॥ ५ ॥

( १५० )

म्हणोनी निष्कर्ष ऐसाच निघतो । उपाय सिद्ध होतो उपासना ॥ १ ॥
उपासक जो का तोच मुक्त होय । त्याचे अंतराय नष्ट होती ॥ २ ॥
चित्तशुद्धिद्वारें ज्ञान प्रकाशन । होतसे गहन देवकृपें ॥ ३ ॥
म्हणोनियां करा नित्य उपासना । देवाच्या भजना रात्रंदिन ॥ ४ ॥
तेणें इहपर सद्गती लाभाल । मोक्षातें जोडाल निश्चयानें ॥ ५ ॥
विनायक म्हणे हाच मथितार्थ । स्वार्थ परमार्थ साधताती ॥ ६ ॥

( १५१ )

## स्खलनशीलता

गुरुवार ता. ९।१०।१९३०

चुकतों आम्हीं किती नाहीं तया मिती । होईना गणती अपराधां ॥ १ ॥
पाउलोपाउलीं दोषार्ह वर्तन । येतसे घडोन किती सांगूं ॥ २ ॥
जरी देह नीट ठेविला जपोनी । मन अडमडोनी दोष करी ॥ ३ ॥
देह आणि मन जरी सांभाळीलीं । वाणी मस्ती भली करीतसे ॥ ४ ॥
देह वाणी मन यांसीं सांभाळितां । कष्ट अवधूता अगणित ॥ ५ ॥
किती अवधान ठेवावें जरी तरी । भूल अवसरीं पडतसे ॥ ६ ॥
कोठें तरी जातें संधान आपुलें । उपाय न चले येथ कांहीं ॥ ७ ॥
विनायक म्हणे ठक कैशी पडे । निदान न सांपडे कोणालाही ॥ ८ ॥

( १५२ )

## मन हें ओढाळ गुरूं

प्रांजळपणानें विचार करावा । अपुला पहावा इतिहास ॥ १ ॥
जन्मल्यापासोनी चरित स्मरावें । बहु आठवावें स्वीयवृत्त ॥ २ ॥

विचार करितां सर्व आठवेल । उमगोनी येईल सर्व कांहीं ॥ ३ ॥
ज्ञात आणि तैसे अज्ञात कीं दोष । विशेष अविशेष किती झाले ॥ ४ ॥
सूक्ष्म नजरेनें पाहतां दिसेल । स्पष्टचि होईल आपणासीं ॥ ५ ॥
ठायीं ठायीं मन किती हें लाजेल । खंती किती पावेल मिती नाहीं ॥ ६ ॥
किती दोष सहज घडोनियां येती । मुळीं न समजती आपणांसीं ॥ ७ ॥
सगळ्यांत मन आहे महाठक । धरीना विवेक कांहीं केल्या ॥ ८ ॥
केव्हांच ठकवी केव्हांच उधळे । कैसे याचे चाळे शमवावे ॥ ९ ॥
विनायक म्हणे मनाचीया पायीं । नर ये उपायीं पदोपदीं ॥ १० ॥

( १५३ )

## कायावाचामन । यांचें निगडन । बहुत कठीण ॥

कायावाचामन यांचें निगडन । बहुत कठीण योग्यालागीं ॥ १ ॥
हातोहात कैसें आम्हां ठकविती । अजब त्यांची क्लृप्ति जाणावी कीं ॥ २ ॥
किती जरी वाचा स्वाधीन ठेविली । फजितखोर भली फसवीत ॥ ३ ॥
किती तरी करा नियम वाचेसीं । पाडिल केव्हां फसीं कळेनाच ॥ ४ ॥
भलतेंच जाई उच्चारोनी वाणी । मग आणीबाणी तपस्येला ॥ ५ ॥
थोर थोर योगी वाणीचीया योगें । फसले न तगे धैर्य त्यांचें ॥ ६ ॥
परम शांत जरी वसिष्ठ ते मुनि । प्रसिद्ध त्रिभुवनीं शांतिरूप ॥ ७ ॥
तयांसींही जाणा वाणीनें ठकविलें । हानिला आणिलें तपस्येसीं ॥ ८ ॥
विनायक म्हणे करितां विचार । दिसतो संचार किती जातो ॥ ९ ॥

( १५४ )

## देहप्रमाद

किंती जरी देह आम्हीं आराधिला । करी प्रमादाला सहजची ॥ १ ॥
ठायीं ठायीं घडे प्रमाद आम्हांसीं । देहसंबंधेंसीं अनिवार ॥ २ ॥

किती जपणूक ठेवावी देहाची । साधितसे साची निज लहरी ॥ ३ ॥
ऐन वेळीं दंगा करित हा देह । किती तरी संदेह पाडीतसे ॥ ४ ॥
आहार विहार योग्य ठेवीयेला । देव बनाविला देह जरी ॥ ५ ॥
मूळचा सैतान प्रगटी स्वभाव । प्रकाशित भाव अज्ञानाचा ॥ ६ ॥
उपाय न चले हटतट केले । जरि गोंजारिलें देहालागीं ॥ ७ ॥
विनायक म्हणे सर्व परस्वाधीन । येथें नियम न मुळीं चाले ॥ ८ ॥

( १५५ )

## धांवा

म्हणोनियां देवा शरण पायांसीं । मजला क्षमेसीं करा नाथा ॥ १ ॥
कितीतरी क्षमा मागूं मी तुम्हांसीं । मज निर्लज्जासीं लाज नाहीं ॥ २ ॥
असहाय दीन हीन मी अज्ञान । करावें अवन देवा याचें ॥ ३ ॥
कायावाचामन यांहीं जें पातक । घडे प्रात्यहिक क्षमा करा ॥ ४ ॥
क्षमा करा मज क्षमा करा मज । राखा माझी लाज कृपावंता ॥ ५ ॥
बहु निर्बुजलों शरण पातलों । हृदयीं खोंचलों परमची ॥ ६ ॥
कोण सोडविल क्षमेतें करील । मजला देईल क्षेम थोर ॥ ७ ॥
चरणांवरी नाथा लोळतों अमूप । तरी माझें पाप दग्ध करा ॥ ८ ॥
जेथोनियां मज स्मरण होतसे । सर्व आठवतसे वृत्त मज ॥ ९ ॥
भडभडोनियां नाथ मज येत । मन हें लज्जित होत असे ॥ १० ॥
काय काय दोष अभ्यासानें केले । आठवती भले मजलागीं ॥ ११ ॥
स्वस्थ मन होइनाच नारायणा । आठव अंतःकरणा पीडा देत ॥ १२ ॥
भेदतें हृदय खिन्न अंतःकरण । होत दयाघन किती सांगूं ॥ १३ ॥
तरी क्षमा करा करा या दासाला। करा या दीनाला क्षमा नाथा ॥१४॥
किती म्हणूं नाथा मजला क्षमस्व । आतां माझें सर्वस्व तूंच दत्ता ॥१५॥
विनायक म्हणे हीन दीन पंगु । मज अनुरागु तुझ्या पायीं ॥ १६ ॥

( १५६ )

## धांवा

क्षमस्व म्हणतों नाथ मी वाणीनें । विनीत वचनें आळवीतों ॥ १ ॥
तेणें वाणीदोष माझे क्षमा व्हावे । मजला करावें कृपापात्र ॥ २ ॥
तुम्हांसीं अर्पितों माझी नम्रवाचा । अनुबंध क्षमेचा धरा नाथा ॥ ३ ॥
अर्पितों हें मन करोनी सुमन । तरी दयाघन स्वीकारीजे ॥ ४ ॥
विवेकानें मन शोधोनियां नाथा । तुम्हांसीं समर्था समर्पीतों ॥ ५ ॥
करोनी विचार आठवोनी दोष । विशेष अविशेष जे का त्यांचे ॥ ६ ॥
तेणें लाजवोनी आपुल्या मनासीं । विनीत करोनी अर्पितसें ॥ ७ ॥
तरी अंगिकारा मज क्षमा करा । श्रीगुरु उदारा प्रार्थिताहें ॥ ८ ॥
विनायक म्हणे काया वाचा मन । यांचें संशोधन दत्ता करा ॥ ९ ॥

( १५७ )

## धांवा

तळमळ दूर करीं । दत्ता माझी आतां सारी ॥ १ ॥
काया वाचा आणि मन । केलीं तुझीये स्वाधीन ॥ २ ॥
सांडीयेला अहंकार । लोळतसें पायांवर ॥ ३ ॥
दुःखमुक्त मज करीं । कृपा उपजो अंतरीं ॥ ४ ॥
कष्ट किती आजवरी । साहिले मी देवा तरी ॥ ५ ॥
सकळ जाणीतोसी नाथा । कृपा करीं श्रीसमर्था ॥ ६ ॥
विनायक विनवीत । कृपा करा अवधूत ॥ ७ ॥

( १५८ )

## धांवा

किती साहूं कष्ट देवा । आतां तरी मज वांचवा ॥ १ ॥
जन्म गेला यांत नाथ । दिन काढिले चिंतेत ॥ २ ॥

स्वस्थता न कधीं मज । जाणतोसी मम गुज ॥ ३ ॥
हाय हाय किती झाली । जाणसीं तूं मज भली ॥ ४ ॥
म्हणुनि धरीले चरण । विश्वासानें नारायण ॥ ५ ॥
तरी आतां कृपा करीं । अपराध क्षमा करीं ॥ ६ ॥
मजसाठीं उडी घेईं । बाळकासीं जैसी आई ॥ ७ ॥
वांचवी मज आतां देवा । गुरुराया वासुदेवा ॥ ८ ॥
विनायक तुझा दास । उद्धरावें नाथा खास ॥ ९ ॥

( १५९ )

## धांवा

काकुळती बहु येतों । तुझे पाय मी धरीतों ॥ १ ॥
कितीतरी विनवीतों । शब्द किती उच्चारीतों ॥ २ ॥
मनोभाव विसरतों । तुजपुढें गुज गातों ॥ ३ ॥
तरी आतां प्रगटावें । दुःखमुक्त मज करावें ॥ ४ ॥
चिंता माझी शमवावी । विजयश्री मज द्यावी ॥ ५ ॥
तुझा आहें मी तो दास । देईं मज विजयास ॥ ६ ॥
कृपाछत्र शिरीं धरीं । कृपाकवच शरीरीं ॥ ७ ॥
अजिंक्य करीं मजलागीं । विजयी करीं मज जगीं ॥ ८ ॥
तुझ्या आशीर्वादें नाथा । विजयी होईन समर्था ॥ ९ ॥
म्हणोनि मागतों प्रसाद । जेणें जाईल विषाद ॥ १० ॥
अनुग्रह मज करा । दत्तात्रेया गुरुवरा ॥ ११ ॥
किती आतां विनवावें । काय पामरें बोलावें ॥ १२ ॥
किती आतां मी सांगावें । हृदय उघडें करावें ॥ १३ ॥
नका पाहूं माझा अंत । प्रगट व्हावें तरी त्वरित ॥ १४ ॥
माझे पुढें उभें रहावें । मजलागीं आश्वासावें ॥ १५ ॥
माझें दुःख परिहरावें । मज आनंदी करावें ॥ १६ ॥
चिंताशोक सर्व हरा । माझा आतां अत्रिकुमरा ॥ १७ ॥
विनायकाची प्रार्थना । सिद्ध करा दयाघना ॥ १८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम (१६०) ३६९०४ वि: आ. द.
१६६० नों. दि. ७।४।१९८५

# धांवा

गुरुवार ता० ३०।१०।१९३०

माझी लाज राखणारा । संकटांत तारणारा ॥ १ ॥
मजसाठीं धांवणारा । ममत्वें कळवळणारा ॥ २ ॥
कृपादृष्टीं पहाणारा । पाठीं उभा राहणारा ॥ ३ ॥
साउलीसम वर्तणारा । कधीं न विसंबणारा ॥ ४ ॥
हेतु पूर्ण करणारा । क्षुधा तृषा हरणारा ॥ ५ ॥
शीतोष्णांतें वारणारा । द्वन्द्वजांसीं नासणारा ॥ ६ ॥
हृदयांत राहणारा । देहीं परिस्फुरणारा ॥ ७ ॥
इंद्रियें प्रवर्तविणारा । मनालागीं भारणारा ॥ ८ ॥
बुद्धि प्रकाशविणारा । चैतन्या अनुग्रहणारा ॥ ९ ॥
पाठी पुढें असणारा । वरी खालीं पसरणारा ॥ १० ॥
सर्वत्र प्रादुर्भवणारा । जिकडे तिकडे संचरणारा ॥ ११ ॥
शिरीं छत्र धरणारा । खांद्यावरी मज घेणारा ॥ १२ ॥
कौतुक माझें करणारा । लाड माझे पुरविणारा ॥ १३ ॥
विघ्नें माझीं नासणारा । वैरी माझे निवटणारा ॥ १४ ॥
सदा क्षेम मज देणारा । कृपादृष्टिं पाहणारा ॥ १५ ॥
माझ्या जीवा सुखविणारा । दुःख माझें लया नेणारा ॥ १६ ॥
दत्त एक भगवान । त्याचेवीण नसे आन ॥ १७ ॥
नम्रवाचा त्या बोलतों । विनवणी मी करितों ॥ १८ ॥
अपराध क्षमा करीं । दत्तात्रेया नरहरी ॥ १९ ॥
याहुनि काय करणार । कैसा तुज वळविणार ॥ २० ॥
म्हणोनियां कृपा करीं । मज आतां तारीं तारीं ॥ २१ ॥
विनायक काकुळती । आला असे तुम्हांप्रति ॥ २२ ॥

( १६१ )

## धांवा

काय विटंबना व्हावी माझी जगीं । ऐसें अंतरंगीं आणी देव ॥ १ ॥
कठोर मानस कैसें तुवां केलें । समजेना भलें मजलागीं ॥ २ ॥
गूढ वाटे मज तुझी हे करणी । बोध अंतःकरणीं उमटेना ॥ ३ ॥
काय तुझा हेतु कांहींच कळेना । मज आकळेना कांहीं केल्या ॥ ४ ॥
विचार मी केला बहु अंतरांत । परि न उमगत मज कांहीं ॥ ५ ॥
किती जरी दोष घडले मजला । क्रुद्धता तुजला आली नाहीं ॥ ६ ॥
मज ठावें आहे कधीं न कोपशील । मज न टाकीशिल दयावंता ॥७॥
मजलागीं ठावा आहे हा निर्धार । अनुभव साचार दत्तात्रेया ॥ ८ ॥
मग कां ऐसा आज हा चमत्कार । नवल हें थोर मजलागीं ॥ ९ ॥
विनायक म्हणे देवा गोंधळलों । तुझे पायीं झालों नत नाथा ॥ १० ॥

( १६२ )

## धांवा

सांग सांग आतां काय मनीं आणिलें । कठोर कां केलें निजमना ॥१॥
नवनीताहूनि मृदुल जें नाथा । कठोर समर्था केलेंस कीं ॥ २ ॥
नित्य द्रवणार तुझें हें हृदय । धरीत नैष्ठुर्य कैसें सांग ॥ ३ ॥
पाषाणाहुनीही कठीण बनत । ऐशी कैशी मात घडे सांग ॥ ४ ॥
रुसलासी काय देवा माझेवरी । सांग मज तरी दत्तात्रेया ॥ ५ ॥
परी बाळलीला यांत कोप नाहीं । कठीणता कांहीं नाहीं नाहीं ॥ ६ ॥
रुसणें फुगणें प्रकार क्रीडेचा । अंश तो सत्याचा त्यांत नाहीं ॥ ७ ॥
काय म्हणूं सांग काय ओळखूं मी । खिन्न हृदयीं मी झालों असें ॥८॥
विनायक आहे बहु पस्तावला । अंगिकार केला पाहिजेच ॥ ९ ॥

( १६३ )

## धांवा

अभिमान कोणा माझा तूजवीण । कोण माझा शीण वाहतसे ॥ १ ॥
माझ्या दुःखें कोण सांग दुखावत । सुखें सुखावत कोण माझ्या ॥ २ ॥
कोण माझे ठायीं संलग्न बनतो । ममत्व ठेवीतो माझेवरी ॥ ३ ॥
माझ्या जीवालागीं जीजी असे आर्ता । कोण पुरविता सांग दत्ता ॥४॥
माझें सुखदुःख ओढोनियां घेसी । आपुलियावरी दत्तात्रेया ॥ ५ ॥
माझा अंगिकार सर्वस्वानें केला । तुवां असे भला गुरुराया ॥ ६ ॥
ऐसें असोनियां काय हें वर्तन । समजेल मन काय माझें ॥ ७ ॥
माझिये मनानें कायसें जाणावें । कैसें ओळखावें तूझें चित्त ॥ ८ ॥
विनायक आला असे निर्वाणीसीं । तरी हृषिकेशी कृपा करा ॥ ९ ॥

( १६४ )

## धांवा

भयभीत झालों असें अंतरांत । शरीर कांपत माझें दत्ता ॥ १ ॥
चिंता हे जाळीत देह पोळवीत । मनातें भाजीत गुरुनाथा ॥ २ ॥
केव्हां येई मना करुणा सांगावी । श्रीगुरुराया व्हावी थोर कृपा ॥३॥
नका पाहूं अंत झालों मी विस्मित । दत्त अवधूत कृपा करा ॥ ४ ॥
घाबरेपणा मज बहुत जडला । शांति या जीवाला नाहीं नाहीं ॥ ५ ॥
भीतिग्रस्त सुस्त तुजसीं विश्वस्त । आशा माझी निरस्त होऊं पाहे ॥६॥
तरी आतां नाथा प्रगट माझ्यासाठीं । स्वामि जगजेठी भगवंता ॥ ७ ॥
माझीये विघ्नांचा करोनि संहार । सर्व शिरावर घेई माझें ॥ ८ ॥
हेतु माझे कर पूर्ण जगन्नाथा । तुझे पदीं माथा ठेविलासे ॥ ९ ॥
विनायकाचे हे करुणेचे बोल । करूं नको फोल दयावंता ॥ १० ॥

( १६५ )

## धांवा

शिक्षेला ते युक्त तुझें न ऐकती । आज्ञा उल्लंघिती तूझी जे का ॥ १ ॥
धर्मसेतुंचा जे करिती अनादर । बर्तन स्वैराचार करीती जे ॥ २ ॥
तुज स्मरती ना तुज भजती ना । तुज मानिती ना जे का दुष्ट ॥ ३ ॥
तिरस्कार तुझा करिती पामर । उन्मत्त साचार जे का खळ ॥ ४ ॥
ऐशिया पापीयांसीं शासन करणें । उचित तुजकारणें गुरुदत्ता ॥ ५ ॥
आम्हां पददासां दंडिसी कां वृथा । आम्हांवरी अनर्था लोटिसी कां ॥६॥
काय यांत नाम तुझें बा होईल । कायसी वाढेल कीर्ति तुझी ॥ ७ ॥
समजत नाहीं मज अज्ञानाला । म्हणुनी चरणांला शरण मी ॥ ८ ॥
विनायक म्हणे हृदयाधिवासा । मज जगन्निवासा सोडवावें ॥ ९ ॥

( १६६ )

## धांवा

काया वाचा मनें शरण तुज आलों । बहु पस्तावलों हृदयांत ॥ १ ॥
भयभीत मन वपुही कांपत । हृदय थरारत माझें दत्ता ॥ २ ॥
भ्याड मी पूर्वींचा स्वभावाचा भ्याड । प्रसंगानें भ्याड मूर्त झालों ॥३॥
मज भयभीता कोण वांचवील । करुणा येईल कोणा सांग ॥ ४ ॥
कोण माझी आशा सांग पुरवील । मजसीं धांवेल कोण सांग ॥ ५ ॥
कायसें बोलावें कायसें सांगावें । सर्वज्ञासीं ठावें तुज असे ॥ ६ ॥
नको आतां मज भ्रमवूं उदारा । करीं साक्षात्कारा अविलंबें ॥ ७ ॥
तुझीया दासांचें मरण टळावें । यश विस्तारावें तुझें नाथा ॥ ८ ॥
ऐशी चमत्कृती करूनीयां दावी । नाथ निवारावीं संकटें कीं ॥ ९ ॥
माझी दृढ श्रद्धा तारसील मज । राखसील लाज माझी दत्ता ॥ १० ॥
माझा हा निर्धार मज न त्यागिसी । जरी दाखविसी कोपभावा ॥११॥
माझ्या संकटांसी खास हरसील । आनंद करिसील माझा दत्ता ॥१२॥

माझा हा विश्वास कोप हा लटिका । तुझा असे निका दाविसी जो ॥१३॥
कोप नोहे दया तूझी दत्ता असे । मन हें घेतसे माझें ऐसें ॥ १४ ॥
सकळ हे माया मज भिववाया । गंमत पहाया लेंकुराची ॥ १५ ॥
चोज हें माझें नाथा तुवां आरंभिलें । वाटतसे भलें मजलागीं ॥ १६ ॥
मज भिववीणें कौतुकें पहाणें । खेळ हा खेळणें तुझें दत्ता ॥ १७ ॥
मज अज्ञानाची थट्टा त्वां मांडिली । बरी हे योजिली विटंबना ॥१८॥
परी यांत आहे प्रेमाचा आशय । जाणत हृदय माझें दत्ता ॥ १९ ॥
तरी आतां नाथ प्रगट लवलाहीं । मजला संदेहीं ठेविलें त्वां ॥ २० ॥
भीति माझी दूर करोनी माधवा । मजसीं केशवा तारीं त्वरें ॥ २१ ॥
विनायक म्हणे माझा बडिवार । वाढवा साचार त्रिभुवनीं ॥ २२ ॥

( १६७ )

## धांवा

करूं नका आतां देवा फजितीला । करित प्रार्थनेला कृपाकरा ॥ १ ॥
माझीया वैरीयांसी माझी विटंबना । देवा दयाघना दावूं नका ॥ २ ॥
तुझ्या भक्तिस्तव झाले माझे वैरी । त्रिभुवनामाझारीं जे का दत्ता ॥३॥
तयां नको दावूं माझें हीनपण । अंतरासीं शीण थोर होतो ॥ ४ ॥
दिमाखानें आहें वदलों जगांत । माझेवरी प्रीत तूझी अति ॥ ५ ॥
दत्तकृपेचा मी बालक बोलीलों । तैसा मी वर्तलों मानोनीयां ॥ ६ ॥
नको करूं आतां मजलागीं हीन । झालों असें दीन तुझ्यापुढें ॥ ७ ॥
माये तुझें वत्स फोडी हंबरडा । नको गांवगुंडां ओपूं मज ॥ ८ ॥
आणोनियां पाणी दोन्हीं नयनांत । तुज विनवीत कृपावंता ॥ ९ ॥
लाज राख माझी राख अभिमान । आतां दयाघन दत्तात्रेया ॥ १० ॥
तुझा मी म्हणोनि मुखें सांगितलें । देवा आहे भलें किती वेळां ॥ ११ ॥
जरी आतां मज कठोर होशील । अब्रू माझी जाईल हातोहात ॥१२॥
अपकीर्ति होईल वैरी हांसतिल । टाळी पिटितील महानंदें ॥ १३ ॥
तरी येवो आतां कळवळा तुज । स्वामी योगिराज अवधूत ॥ १४ ॥
विनायका नका अपकीर्तिचा डाग । लावूं रमारंग वांचवा त्या ॥ १५ ॥

## (१६८)

# उत्पत्ति-स्थिति-लय-कर्ता परमेश्वर

गुरुवार ता० ६।११।१९३०

उत्पत्तिस्थितिलय जे का जगताचे । तुझेनि ते साचे घडताती ॥ १ ॥
कारण उत्पत्तिचें कारण स्थितीचें । कारण लयाचें तूंच एक ॥ २ ॥
दृश्याऽदृश्य जें का असे त्रिभुवनीं । सकळ तुझेनी विश्वमूर्ते ॥ ३ ॥
कारणही तूंच कार्य तरी तूंच । सकल तुझेंच अधिष्ठान ॥ ४ ॥
आधार तुझाच सकल विश्वाला । सेवित तुजला विश्व सारें ॥ ५ ॥
विदित असो कीं असो अविदीत । सकल भजत तुझी सत्ता ॥ ६ ॥
विनायक म्हणे त्रिभुवनपति । तुजला भजती विश्वेदेव ॥ ७ ॥

## (१६९)

# उत्पत्ति-स्थिति-लय-कर्ता परमेश्वर

जें जें कांहीं असे उपजलें येथें । तुवांच तें नाथें निर्मीयेलें ॥ १ ॥
सकल भूतांची उत्पत्ति तुझेनी । सकलां जननी तूंच नाथा ॥ २ ॥
तुझेंच हें असे त्रैलोक्य संतान । तुझाच कीं स्तन पीत असे ॥ ३ ॥
पोषण विश्वाचें होतसे तुझेनी । दक्ष तूं पालनीं सदा दत्ता ॥ ४ ॥
जननीजनक तूं तुज नमस्कार । वाहोनी अंतर करीतों मी ॥ ५ ॥
तूंच बुद्धिदाता तूंच सर्व दाता । अशुभांचा हर्ता तूंच एक ॥ ६ ॥
त्या तुझे चरणीं घेतों लोटांगण । माझें संरक्षण दत्ता करीं ॥ ७ ॥
प्रार्थना हे माझी तुज समर्पिली । पाहिजेच केली कृपा मज ॥ ८ ॥
कायावाचामनें शरण चरणीं । तरी चक्रपाणी कृपा कीजे ॥ ९ ॥
विनायक म्हणे धरोनी लीनता । तुज भगवंता नमितों मी ॥ १० ॥

## ( १७० )

# भगवंतास स्वार्पण

एवढेंच मज करितां येईल । सेवन घडेल येवढेंच ॥ १ ॥
दोन हात आणि शिर समर्पिणें । तुझ्या पायीं होणें नम्र लीन ॥ २ ॥
याहुनि मजला कांहीं न साधवे । मानोनियां घ्यावें सेवन हें ॥ ३ ॥
जोडिले मी हात शिर नम्र केलें । देहा लोळविलें तुझ्यापायीं ॥ ४ ॥
याहूनियां काय सांग अपेक्षिसी । अशक्य मजसी अन्य कांहीं ॥ ५ ॥
कर्तव्य हें माझें शरण तुज होणें । देहा समर्पिणें तुझ्यापायीं ॥ ६ ॥
तेंच केलें असे श्रीगुरु अनन्ता । काया भगवंता तुज अर्पिली ॥ ७ ॥
विनायक म्हणे जे कां ममत्वाचें । अर्पियेलें साचें तूजला कीं ॥ ८ ॥

## ( १७१ )

# भगवंतास स्वार्पण

हृदयांत ठाव तुजला दिधला । देह समर्पिला तुजलागीं ॥ १ ॥
मन तुझ्याठायीं बांधोनी घातलें । सर्वस्वातें केलें त्वदर्पण ॥ २ ॥
इतुकेंच माझें माझ्या ममत्वाचें । तुझे ठायीं साचें समर्पिलें ॥ ३ ॥
विनायक म्हणे अंगिकारीं आतां । दत्त भगवंता सर्व तुझें ॥ ४ ॥

## ( १७२ )

# भक्तत्राता परमेश्वर

गुरुवार ता० १३।११।१९३०

किती तुझी कृपा असे मजवरी । त्रैलोक्यांत सरी नाहीं नाहीं ॥ १ ॥
तु जसम तूंच जगतीं कृपाळु । दीनां कनवाळु तूंच एक ॥ २ ॥

दीन हीन तुज शरण जे जन । त्यांचें सदवन करितोसी ॥ ३ ॥
कोठें असो तुझा भक्त कृपावंता । होसी त्यासीं त्राता सर्वदाही ॥ ४ ॥
भूत भविष्य आणि वर्तमान तुज । सकळ महाराज विदित कीं ॥ ५ ॥
पुढील जाणोनि योजिसी उपाय । हारिसी अपाय स्वकीयांचे ॥ ६ ॥
तहानेला किंवा भुकेलासे दास । झळ हृदयास तुझ्या लागे ॥ ७ ॥
परोपरी किती भक्तां सांभाळीसी । किती अनुभवेंसीं बोलेन मी ॥ ८ ॥
विनायक म्हणे उपमा तुझीच । तुजलागीं साच शोभतसे ॥ ९ ॥

( १७३ )

## भक्तत्राता परमेश्वर

मातेहुनि तुझें कोमल हृदय । किती तूं सदय अनुपम ॥ १ ॥
कोणता दृष्टांत कोणती मी वाणी । योजूं चक्रपाणी तुज गाया ॥ २ ॥
तुजसम तूंच याहुनि अधिक । काय बोलूं निक भगवंता ॥ ३ ॥
आम्हांसाठीं सदा रहासी तूं जागा । तुज जिवलगा काय बोलूं ॥ ४ ॥
उन्ह निवाराया कृपेच्या छत्रासीं । शिरावरी धरिसी आमुच्या तूं ॥५॥
जें जें कांहीं आम्हां कष्टप्रद जगीं । आपुल्याच अंगीं घेसी नाथा ॥६॥
आमुचा भार तूं निज शिरावरी । वाहसी निरंतरीं ओझेंलीं तूं ॥ ७ ॥
ठायीं ठायीं करितोसी सुखसोई । सार्थ गुरुमाई नाम तुझें ॥ ८ ॥
कृतज्ञ हा झाला विनायक बाळ । तुझा लडिवाळ स्वीकारीं तूं ॥ ९ ॥

( १७४ )

## भक्तत्राता परमेश्वर

चालतां मी चालतोसी । बसतां मी बसतोसी ॥ १ ॥
हंसतां मी हंसतोसी । रडतां मी रडतोसी ॥ २ ॥
गोष्टी करितां गोष्टी करिसी । मजसवें तूं क्रीडसी ॥ ३ ॥

पाठी पुढें उभा असती । कधीं न मज तूं सोडिसी ॥ ४ ॥
झोंपतां मीं जागा राहासी । मजलागीं संरक्षिसी ॥ ५ ॥
जड भारी पडतां मज । निवारीसी तूं सहज ॥ ६ ॥
उणें पडों भुळिं न देसी । काय बोलूं मीं तुजसीं ॥ ७ ॥
भरुनि आलें माझें हृदय । तुझे धरीतसें पाय ॥ ८ ॥
अंतर्बाह्य सांठविली । तुझी मूर्ति दत्ता भली ॥ ९ ॥
माझा होसी अनुचर । माझा सांगाती तूं थोर ॥ १० ॥
प्रवासांत तूं प्रवासी । घरीं असतां गृहवासी ॥ ११ ॥
ऊन्ह तहान सेवीतोसी । मजलागीं सुखी ठेविसी ॥ १२ ॥
काय बोलावें मी जाण । तुझें नाथ दयाघन ॥ १३ ॥
विनायक चरणीं लोळे । कृपाघन तूं त्या वळें ॥ १४ ॥

( १७५ )

## भक्तत्राता परमेश्वर

मजसंगें जेवितोसी । मजसंगें निजतोसी ॥ १ ॥
माझ्या मुखें जलपान । तुज नित्य दयाघन ॥ २ ॥
जें जें कांहीं मज सेवन । तें तें तुज अनुसेवन ॥ ३ ॥
ऐशी आहे तुझी करणी । अपूर्व कीं चक्रपाणी ॥ ४ ॥
भुकेलों मी तूं भुकेला । तृषार्त मी तूं तान्हेला ॥ ५ ॥
ऐसें तुझें अनुकरण । मजसंगें नारायण ॥ ६ ॥
माझ्या ठायीं मिसळोनी । एकरूप तूं होवोनी ॥ ७ ॥
राहतोसी माझ्यासंगें । रक्षितोसी मज निजांगें ॥ ८ ॥
किती बोलूं अनुभव । माझेवरी कृपाभाव ॥ ९ ॥
विनायक निजदास । करी यासीं तूं कृपेस ॥ १० ॥

( १७६ )

## भक्तत्राता परमेश्वर

मजलागीं तुझें सहाय दत्तदेवा । माझीया वैभवा तोड नाहीं ॥ १ ॥
माझा जो जो कांहीं संकल्प मनींचा । पुरविसी साचा दत्तात्रेया ॥ २ ॥
प्राक्तनसंबंधीं संकटें पडतां । मज उद्धरीता नित्य तूंच ॥ ३ ॥
तुज सर्व ठावें पुढें काय होणार । उपाय साचार योजीतोसी ॥ ४ ॥
पूर्वींच उपाय योजोनि ठेवीसी । मज संरक्षिसी सदोदित ॥ ५ ॥
विनायक किती बोलणार जाण । भरुनी अंतःकरण येत असे ॥ ६ ॥

( १७७ )

## 'अहं दत्तोऽस्मि'

गुरुवार ता. २०।११।१९३०

माझ्या मुखें बोले माझ्या दृष्टि पाहे । अंतरीं स्फुरताहे माझ्या सदा ॥१॥
संकल्प तयाचा करणी तयाची । सिद्धता ही साची त्याची असे ॥ २ ॥
पूर्ण संचरला असे माझ्याठायीं । माझीया हृदयीं अधिवसे ॥ ३ ॥
लोकांपुढें दृश्य ठेवाया कारण । सकळ आपण पुरवीतो ॥ ४ ॥
येथें काय माझें सकळ देवाचें । अधिष्ठान त्याचें सर्व कांहीं ॥ ५ ॥
विनायक म्हणे मी तो वासुदेव । माझ्या ठायीं भाव असे त्याचा ॥६॥

( १७८ )

## बालस्वरूप वर्णन

क्रीडा करण्यासीं प्रगट दत्तदेव । धरोनियां भाव सुकुमार ॥ १ ॥
नाचती खेळती हांसती आम्हांसवें । वर्तती बाळभावें आम्हांपाशीं ॥ २ ॥
बाळस्वरूप हें येथील दत्ताचें । अधिष्ठान साचें बाळरूप ॥ ३ ॥

भजन करणें पूजन करणें । आनंदें नाचणें प्रेमभरें ॥ ४ ॥
कीर्तन करणें यश विस्तारणें । डुलत राहणें आम्हांपाशीं ॥ ५ ॥
मधुर हांसणें मधुर पाहाणें । मधुर तें गाणें यश सदा ॥ ६ ॥
मधुर बोलणें माधुरी ओतणें । मधुर करणें सर्व कांहीं ॥ ७ ॥
ऐसा आहे हेतु श्रीगुरुदत्ताचा । तोच सिद्ध साचा होणार कीं ॥ ८ ॥
बाळस्वरूप या स्थानीं मूर्तिमंत । राहत क्रीडत निजानंदें ॥ ९ ॥
विनायकाठायीं करी बाळलीला । दत्तघन सांवळा अलौकिक ॥ १० ॥

( १७९ )

## भक्त आणि देव यांची एकरूपता

भक्त आणि देव यांत भेद नाहीं । पाहूं नये कांहीं भेद मुळीं ॥ १ ॥
पाहिल जो भेद तयासींच भेद । घडेल अभेद जाणावें हें ॥ २ ॥
देवाठायीं भक्त भक्ताठायीं देव । त्रिभुवन भाव भगवद्भाव ॥ ३ ॥
भजतां देवासीं ऐक्यत्व पावत । भगवद्भाव येत लगटोनी ॥ ४ ॥
विनायका आहे अमृतानुभव । सदा वसे देव त्याच्यापाशीं ॥ ५ ॥

( १८० )

## देवांची प्रवासाची तयारी करण्यासाठीं आज्ञा

गुरुवार ता० १८।१२।१९३०

आज्ञापिती देव आइती करावी । वाहनें करावीं सिद्ध आतां ॥ १ ॥
येथोनियां आम्हीं आतां निघणार । इतरत्र संचार करणार ॥ २ ॥
उपासना धर्म विस्तृत कराया । भजनीं लावाया जनलोकां ॥ ३ ॥
आम्हां येथोनियां आतां असे जाणें । प्रगट होईणें इतरत्र ॥ ४ ॥
धर्मसंस्थापना आमुचें बीरुद । भक्त-वर-प्रद आम्हीं सदा ॥ ५ ॥
नित्य भक्तांपाशीं आम्हीं वसतसों । सदा रक्षितसों निजदासां ॥ ६ ॥

मराठी
अनुक्रम ३८८०४ श्रीदत्त-भजन-गाथा. ग्रं. २११
नों. दि. १९४१



भक्तहृदयधामीं आम्हां सदा वास । भक्ताचे काजास धांवतसों ॥ ७ ॥
तरी सज्जनानीं करूं नये खंती । तयांसीं सुगति नित्य प्राप्त ॥ ८ ॥
दुर्जना दुर्गति सुजना सद्गति । हेंच एक रीति जगत्रयीं ॥ ९ ॥
यास्तव सुजनीं करूं नये शोक । धरावा विवेक चित्तामाजी ॥ १० ॥
लोकोपकारासाठीं आम्हां असे जाणें । क्वचित् गुप्त होणें प्रगटोनी ॥११॥
विनायक म्हणे सिद्धता करणें । प्रस्थान ठेवणें सुमुहूर्तीं ॥ १२ ॥

## ( १८१ )

## विनायकाचा अनुभव

निघताती गुरु घेवोनी सांगाती । आम्हां शिष्यांप्रति निजकार्या ॥ १ ॥
आपुलिया कार्यीं आम्हांसी योजाया । निज सांप्रदाया वाढवाया ॥२॥
भजनमार्गातें प्रसृत कराया । निज वाढवाया उपासना ॥ ३ ॥
आम्हांसवें घेती निज परिवार । आमुचा बडिवार कार्यासाठीं ॥ ४ ॥
आमुच्या देहांत नित्य त्यांची वसती । सकळ करविती निजकार्य ॥५॥
जेथें गुरु तेथें आहे कल्पतरु । लक्ष्मी साक्षात्कारु वसे तेथें ॥ ६ ॥
तेथें आनुकूल्य समृद्धि साकार । प्रसादाचें बळ थोर तेथें ॥ ७ ॥
आम्हां नित्य वास गुरुपदापाशीं । तेणें स्वानुभवासीं बोलतसों ॥ ८ ॥
विनायक म्हणे आम्हीं गुरुमय । तेणें आम्हां श्रेष्ठ्य जगीं असे ॥ ९ ॥

## ( १८२ )

## विनायकाची गुरुमयता

गुरुसंगें आम्हां जाणें । नित्य गुरुसीं सेवणें ॥ १ ॥
गुरुसेवा हाच धर्म । गुरुसेवा हेंच कर्म ॥ २ ॥
गुरुसेवा उपासना । हेच व्रताचार नाना ॥ ३ ॥
गुरुसेवा सर्व कांहीं । आम्हांलागीं असे पाहीं ॥ ४ ॥
तन्मय होणें गुरुपायीं । लोळण घेणें गुरुपायीं ॥ ५ ॥

गुरुपायांची विभूति । तीच आम्हां सर्व भूति ॥ ६ ॥
गुरुचरणींचें तीर्थ । तोच आम्हां परमार्थ ॥ ७ ॥
भजनाचा सांप्रदाय । तोच आम्हां मोक्ष होय ॥ ८ ॥
गुरुकीर्तन करणें । गुरुकथा प्रेमें गाणें ॥ ९ ॥
गुणानुवादासीं वर्णणें । गुरुनाम मुखीं घेणें ॥ १० ॥
गुरुध्यानीं मग्न होणें । गुरुमय होवोनी रहाणें ॥ ११ ॥
हाच आम्हां असे धंदा । कोणी वंदा किंवा निंदा ॥ १२ ॥
गुरु पुढें आम्हीं पाठीं । जातों गुरुकार्यासाठीं ॥ १३ ॥
दुजा नाहीं आम्हां हेतु । गुरुभजनीं हुतुतू ॥ १४ ॥
देव नेती आम्हां संगें । वदूं कृपा अनुरागें ॥ १५ ॥
पुढें पाठीं देव सदा । काय म्हणावें वरदा ॥ १६ ॥
पुढें आहे मागें आहे । कृपादृष्टीं आम्हां पाहे ॥ १७ ॥
देव प्रेमाचा सागर । देव सुखाचें आगर ॥ १८ ॥
आम्हीं जातों देवसंगें । भरलों आम्हीं अनुरागें ॥ १९ ॥
अवघाच देव आम्हां । आम्हीं न जाणों अन्य कामा ॥ २० ॥
विनायक गुरुमय । तया जग गुरु होय ॥ २१ ॥

( १८३ )

# श्रीगुरुंचा आशीर्वाद

गुरुवार ता. २५।१२।१९३०

शुभ आशीर्वाद सकळां सेवकां । पूजकां भजकां कल्याणाचा ॥ १ ॥
ज्यांनीं ज्यांनीं केली भक्तीभावें सेवा । मज मनोभावा अर्पोनीयां ॥ २ ॥
मान अपमान मनासी नाणिले । संशय धरिले नाहीं ज्यांनीं ॥ ३ ॥
कर्तव्य म्हणोनी सेविलें मजला । धरोनी प्रेमाला दृढ मनीं ॥ ४ ॥
ज्यांनीं माझेवरी विश्वास ठेविला । नाहींच दाविला अनादर ॥ ५ ॥
पत्र पुष्प फल मजला अर्पिलें । साह्य ज्यांनीं केलें माझ्या कार्या ॥ ६ ॥
त्यांचे मनोरथ होती खास पूर्ण । त्यासीं नारायण सहाय मी ॥ ७ ॥

जेव्हां जेव्हां कांहीं पडेल जड भारी । स्मरतां अंतरीं प्रगटेन ॥ ८ ॥
रक्षिन भक्तांसीं राखीन मी ब्रीद । सदा मी वरद निज दासां ॥ ९ ॥
स्मरण माझें ठेवा मज भजा पूजा । साधीन मी काजा तुमचीया ॥१०॥
संशय मनांत नका कांहीं धरूं । नका अविचारू करूं कांहीं ॥ ११ ॥
मी तो वर्ततसें सदा भक्तांपाशीं । माझीया वचनासीं सत्य माना ॥१२॥
अखंड स्मरण भजन पूजन । लावोनियां मन सदा करा ॥ १३ ॥
करा गुरुवार उपवास जाग्रण । माझें नामस्मरण प्रेमभरें ॥१४॥
जो का कार्यक्रम स्थानीं या चालत । तोच आचरत रहा सदा ॥१५॥
तेणें कार्यसिद्धि पुरेल वासना । हरतील नाना आपदा ज्या ॥ १६ ॥
माझ्या भक्तांलागीं सुखी मी ठेवीन । कधीं न विसंबेन क्षणमात्र ॥१७॥
विनायक म्हणे ऐसा आशीर्वाद । देती गुरु वरद उपासकां ॥ १८ ॥

( १८४ )

## श्रीगुरूंचा निरोप

आतां लोभ ठेवा आम्हीं आतां येतों । प्रसाद करितों तुम्हांवरी ॥ १ ॥
आपुलालें हित साधाया भजन । करा अनुदिन आज्ञा ऐसी ॥ २ ॥
भजनें पूजनें साधेलची हित । यास्तव नेमस्त वचन हें ॥ ३ ॥
हेंच आमुचें कीं सांगणें तुम्हांला । निज कल्याणाला साधा तुम्हीं ॥४॥
जैसें जैसें जो जो आचरील हित । तैशी कृपा होत आमुची त्या ॥५॥
विनायक म्हणे श्रीगुरुनिरोप । तुम्हां मायबाप कथिला मी ॥ ६ ॥

( १८५ )

## विनायकाचें वंदन

तुम्हां सकळांसीं माझा नमस्कार । तुम्हीं परमेश्वर गुरुभक्त ॥ १ ॥
थोर आजवरी तुम्हीं कृपा केली । मजवरी भली प्रेमभरें ॥ २ ॥
साह्य मज केलें भजन चालविलें । अन्याय घातले पोटीं माझे ॥ ३ ॥

उत्कर्ष व्रताचा येथें तुम्हीं केला । श्रीगुरुकार्याला संपादिलें ॥ ४ ॥
तुम्हीं आईबाप तुम्हीं बहिणभाऊ । उपमा काय देऊं तुम्हांलागीं ॥५॥
तुम्हीं माझे जाणा सखे कीं सोयरे । कृपाच उदारें तुम्हीं केली ॥ ६ ॥
म्हणोनीच झाला भजन समारंभ। येथें पद्मनाभ प्रगटला ॥ ७ ॥
म्हणोनी चरणीं मस्तक ठेवितों । निरोप मागतों तुम्हांपाशीं ॥ ८ ॥
गुरु मज नेती आपुल्या कार्याला । माझीये भाग्याला वाढवाया ॥९॥
गुरुकृपेचा मी असें कीं बालक । जननीजनक गुरु माझे ॥ १० ॥
तयांसवें जातों तुम्हांसीं वंदितों । क्षमा मी मागतों तुमची कीं ॥ ११ ॥
विनायक म्हणे तुमचा लडिवाळ । असे जाणा बाळ लाडका मी ॥१२॥

( १८६ )

# प्रस्थानकाळीं आज्ञा मागणी

प्रस्थानकाळींची वेळा हे वर्तत । म्हणोनी मागत आज्ञेलागीं ॥ १ ॥
तरी यावी आज्ञा सिद्धता कराया । आम्हां गुरुराया निजकृपें ॥ २ ॥
विजयार्थ जाणें येथोनी आम्हांला । उपासना धर्माला वाढवाया ॥३॥
सांप्रदाय दृढमूल बनवाया । विस्तृत कराया जनलोकीं ॥ ४ ॥
येथोनियां जाणें निश्चय जो झाला । प्रस्थानकाळाला नेमियेलें ॥ ५ ॥
तोच काल आतां असे प्राप्त झाला। तरी आम्हां आज्ञेला करा आतां ॥६॥
पीठ हालवाया वाहनीं बैसावया। आम्हां गुरुराया आज्ञा यावी ॥ ७ ॥
प्रस्थाना उचित ऐशी जी सिद्धता। तीच भगवंता करायासीं ॥ ८ ॥
आज्ञा यावी आतां चरण नमितों । प्रसाद मागतों कृपावंता ॥ ९ ॥
आशीर्वाद यावा नाथा विजयाचा । वर मंगलाचा यावा आम्हां ॥१०॥
वाहनीं तुम्हांसी नाथा बैसविणें । मार्ग आक्रमिणें आतां नाथा ॥११॥
तरी हालवाया आपुलें हें पीठ । आम्हां जें का श्रेष्ठ परमची ॥ १२ ॥
वंद्य आम्हांलागीं भाविकां जनासीं । पद सेवकांसीं दत्तनाथा ॥ १३ ॥
तेंच हालवाया आम्हां आज्ञा यावी। थोर कृपा व्हावी आम्हांलागीं ॥१४॥
चारुवेष तुम्हां प्रस्थानकालोचित। घालाया अवधूत आज्ञा यावी ॥१५॥
विनायक म्हणे आम्हां अनुग्रह । आतां निःसंदेह करावा कीं ॥ १६ ॥

## ( १८७ )

# प्रस्थानकाळीं आज्ञामागणी

निघण्याची आतां सिद्धता जाहली । श्रीगुरुमाउली तुमच्या कृपें ॥ १ ॥
तरी आतां द्यावी आज्ञा आम्हांलागीं । सिद्ध करायालागीं वाहनातें ॥२॥
लोकोपकारासाठीं तुमचें हें निघणें । सर्व शीण घेणें जगदुद्धारा ॥ ३ ॥
उपासनाधर्म वाढावयासाठीं । तुम्हीं जगजेठी निघालांत ॥ ४ ॥
आम्हां भाविकांचेसाठीं निघालांत । श्रीगुरु अवधूत दयानिधे ॥ ५ ॥
म्हणोनी करितों प्रार्थना तुम्हांसीं । आम्हां आशीर्वादासीं द्यावें आतां ॥६॥
सांष्टांग नमन आम्हीं करितसों । श्रीफळ ठेवितसों तुम्हांपुढें ॥ ७ ॥
आम्हां आशीर्वाद द्यावा मंगलाचा । आम्हां विजयाचा आशीर्वाद ॥८॥

## ( १८८ )

# प्रस्थानकाळीं आज्ञा मागणी

चला चला महाराज । तुम्हीं आपुलीये काज ॥ १ ॥
सिद्धता सर्व झाली असे । मंगळवेला वर्ततसे ॥ २ ॥
शुभ लग्न शुभ वेळ । शुभ ग्रह हे सकळ ॥ ३ ॥
शुभ मुहूर्त वर्तती । जय शब्द आतां होतो ॥ ४ ॥
मंगलार्थ आतां निघणें । सकळ मंगल करणें ॥ ५ ॥
जयध्वनि हा उठत । जयजयकार सुचवित ॥ ६ ॥
ध्वनि असे विजयाचा । वायु असे प्रसादाचा ॥ ७ ॥
भाव असे मंगलाचा । हेतु तरी विजयाचा ॥ ८ ॥
तरी आतां स्वामी उठणें । वाहनांत आरोहणें ॥ ९ ॥
वाहनापाशीं न्यावयासीं । तेथें तुम्हां स्थापायासीं ॥ १० ॥
तरी आतां आज्ञा व्हावी । कृपादृष्टी आम्हां असावी ॥ ११ ॥
विनायक नमी चरण । करणें यासी आज्ञापन ॥ १२ ॥

# गणेशजयंती.

# विषय.


| | प्रबंध नं० |
|---|---|
| गिरिजेची प्रार्थना | १८९ |
| शिवहृदयीं गणपतिभावोद्भव | १९० |
| गणेशावतार | १९१ |
| विघ्नासुर कथा | १९२ |
| गणपतिचा त्रिगुणात्मक भाव | १९३ |
| गणपतिचें ध्यान | १९४ |
| गणपतिचा धांवा | १९५,१९६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ३६८०५

( १८९ )

# गिरिजेची प्रार्थना

गुरुवार ता. ३०।१।१९३०

गिरिजा प्रार्थितसे जय मधुसूदना । आतां करुणाघना धांव घेईं ॥ १ ॥
संकटीं पडली तुझी ही बहिण । तरी नारायण धांव घेईं ॥ २ ॥
वैऱ्याहातीं आज तुझी हे भगिनी । सांपडली झणीं सोडवावी ॥ ३ ॥
घोर विटंबना दैवास हे आली । आतां उडी घाली कृपासिंधु ॥ ४ ॥
किती वाट पाहूं घात असे झाला । उडी हे दयाळा घेईं घेईं ॥ ५ ॥
प्रसंग दारुण पडला असे घाला । हांक मी स्नेहाळा किती मारूं ॥६॥
क्षण हा मोलाचा पुन्हां ये न साचा । वीर तूं न काचा कदाकाळीं ॥७॥
भव पराभूत आतां कोण तारी । असहाय नारी रुद्राची हे ॥ ८ ॥
जेथें रुद्रगति खुंटोनि राहिली । तेथें कोणा भली गति असे ॥ ९ ॥
ब्रह्मदेव भ्याड, भ्याड तो इंद्रही । शिवासि सन्देहीं पाडीयेलें ॥ १० ॥
सकळ लपाले गण तेही भ्याले । कोणी न उरलें मज रक्षाया ॥ ११ ॥
कैलास-पतिची राणी हे हरोनी । स्कंधासीं वाहोनी नेत दैत्य ॥ १२ ॥
हाहाःकार झाला सकळ जगतांत । नेत्रांसीं झांकित विश्वसारें ॥ १३ ॥
पालक तूं विष्णु सर्व त्रैलोक्याचा । देवाधिदेव साचा मा-पति तूं ॥१४॥
व्यापनाद्विष्णुत्व तुज प्राप्त झालें । रक्षितोसी भलें त्रैलोक्य हें ॥ १५ ॥
तुम्हीं शिव विष्णु भक्त परस्पर । तरी आतां अंतर देऊं नको ॥ १६ ॥
तुजवीण कोणा सांग हांका मारूं । दुःखांबुधिपारू नेईं नेईं ॥ १७ ॥
माझा पाठीराखा बंधू तूंच सखा । आतां माझ्या दुःखा वेगें हरीं ॥१८॥
विसंबिसी कैसा वैरियाचे करीं । कठीण अंतरीं कैसा होसी ॥ १९ ॥
दीन हीन गाय हंबरडा फोडी । विश्वास न तोडीं रमाधवा ॥ २० ॥

कसायाचे हातीं मान सांपडली । पाहिजे सोडविली रमाकांता ॥ २१ ॥
आणोनियां अश्रू नेत्रांत ही गाय । मोकलीत धाय तुजपुढें ॥ २२ ॥
थरथर कांपे हंबरडा फोडी । करित वांकुडी आपुली मान ॥ २३ ॥
घाल उडी आतां संकटांत नाथा । सोडवीं अनाथा भगिनी हे ॥ २४ ॥
काकुळती ऐशी करित रुद्रकांता । कृपा भगवंता उपजली ॥ २५ ॥
द्विजरूपें आला धावोनि कैवारी । दैत्यांसीं संगरीं योजी पुन्हां ॥२६॥
दोघेही झुंजतां फरश मारीतसे । दैत्या पाडीतसे मूर्छित कीं ॥ २७ ॥
पळविला दैत्य सोडविली गौरी । प्रगटरूप धरी विश्वात्मा तो ॥ २८ ॥
तोच गजानन अवतारी झाला । प्रसिद्ध जो भला जगीं असे ॥ २९ ॥
अवतार ऐसा जाणा श्रीविष्णूचा । बालक गौरिचा झाला असे ॥ ३० ॥
संहारीला दैत्य नामें जो सिंदूर । तोच श्रेष्ठ वीर प्रार्थितों मी ॥ ३१ ॥
विनायक म्हणे वैरी संहारावे । निर्भय करावें मजलागीं ॥ ३२ ॥

( १९० )

## शिवहृदयीं गणपतिभावोद्भव

गुरुवार ता० २८।८।१९३०

समाधि-निर्भर असतां शिवासीं । ब्रह्म हृदयासीं झगटलें ॥ १ ॥
ब्रह्मानुभावें शिव आनंदांत डोले । हृदयांत खेळे सगुणरूप ॥ २ ॥
गणपती भाव हृदयीं उदेला । करी बाळलीला हृदयांत ॥ ३ ॥
कौतुकानें पाहे सदाशिव देव । सुकुमार भाव बालकाचा ॥ ४ ॥
अपेक्षा चित्तासीं प्रत्यक्ष हा सुत । रहावा खेळत होवोनियां ॥ ५ ॥
मग प्रार्थितसे प्रणव-रूपासीं । तया गणेशासीं सदाशिव ॥ ६ ॥
पुत्रत्वाचें नातें तुझें मजपाशीं । तेंच सत्यत्वासीं आणावें कीं ॥ ७ ॥
विनायक म्हणे ब्रह्म साकारलें । बाळरूप झालें गणेशात्मक ॥ ८ ॥

( १९१ )

## गणेशावतार

दैत्यें पीडितां ती गिरिजा भवानी । करी विनवणी गणेशाची ॥ १ ॥
येई सोडवाया दैत्यातें माराया । गणपतीराया लवकरीं ॥ २ ॥
ओंकाररूपानें तेव्हां प्रगटले । प्रणवरूप भले गणपती ॥ ३ ॥
मारियेला दैत्य ख्याति थोर केली । गणरायें भली मातेसाठीं ॥ ४ ॥
विनायक म्हणे तोच गणपती । तारो आम्हांप्रती कृपाळुत्वें ॥ ५ ॥

( १९२ )

## विघ्नासुरकथा

नृप एक होता नामें अभिनंदन । इंद्राचें पूजन करीना तो ॥ १ ॥
हविर्भाग इंद्रा यज्ञांत देईना । तया आवाहीना नृपवर ॥ २ ॥
म्हणोनियां इंद्रें कालासीं प्रार्थिलें । शासनार्थ भलें नृपतिच्या ॥ ३ ॥
तोच विघ्नासुर दैत्य प्रगटला । नृप तो मारीला तया दैत्यें ॥ ४ ॥
पुण्यकर्माचा तो उच्छेद करीत । कांहीं न चालूं देत यज्ञयाग ॥ ५ ॥
सकळ राहिलें कर्म भूमिवरी । हाहाःकार तरी थोर झाला ॥ ६ ॥
ब्रम्हयासीं सर्व शरण मग गेले । तया निवेदिलें वृत्त त्याचें ॥ ७ ॥
गणेशस्तवन कराया सांगत । सकळ प्रार्थित गणपासीं ॥ ८ ॥
प्रगटले तेव्हां स्वयें गणपती । दैत्यासीं झुंजती आतुर्बळी ॥ ९ ॥
विघ्नासुर केला पराभूत देवें । प्रार्थी नम्रभावें दैत्य देवा ॥ १० ॥
तेव्हां त्यास दिला जवळीक वास । आत्मवश त्यास केलें देवें ॥ ११ ॥
जेथें गणपतीपूजन न प्रथम । न घडे तें कर्म विध्वंसी तो ॥ १२ ॥
ऐसा गणेशाचा भक्त विघ्नासुर । प्रताप प्रखर तयाचा कीं ॥ १३ ॥
विनायक म्हणे आम्हां विघ्नासुर । न बाधो साचार गणराजा ॥ १४ ॥

( १९३ )

## गणपतीचा त्रिगुणात्मक भाव

सकळांचा गुरु प्रत्यक्ष परब्रह्म । असे परंधाम गजानन ॥ १ ॥
प्रत्यगात्मा तैसा असे परमात्मा । स्वयं ज्योति आत्मा गणपती ॥ २ ॥
ज्ञानरूप आहे विश्व नटलासे । सूत्र हालावितसे आपणची ॥ ३ ॥
गणपती हाच सर्व देवाधिदेव । त्याचा श्रेष्ठ भाव जगत्रयीं ॥ ४ ॥
सच्चिदानंदरूप चैतन्य केवळ । सर्वांत प्रबळ सामर्थ्याचा ॥ ५ ॥
अकार उकार आणि तो मकार । मिळोनी ओंकार रूप जाण ॥ ६ ॥
तेंच रूप आहे जाण गणेशाचें । परब्रह्म साचें नटलें हें ॥ ७ ॥
गजाचें तें मुख प्रणव सदृश । तेंच जगदीश धरीतसे ॥ ८ ॥
मध्यें नारायण बाजूसी विधिशिव । त्रिगुणात्मक भाव ऐसा जाणा ॥९॥
ब्रह्माविष्णुशिवमय गणपती । सद्गुरु निश्चिती सकळांचा ॥ १० ॥
विनायक म्हणे त्रिगुणात्मक देव । ब्रह्मा विष्णु शिव एकवटलें ॥११॥

( १९४ )

## गणपतीचें ध्यान

मायाधर देव सगुण जाणावा । ध्यानांत धरावा तोच सदा ॥ १ ॥
ऐक्य भाव त्यासीं जोडोनियां यावा । चित्ताचा करावा तेथें न्यास ॥२॥
चित्त-चिंतामणि गणपति जाण । दाविल सगुण रूपासीं तो ॥ ३ ॥
आवडीचें रूप चित्तांत बिंबेल । तन्मय होईल चित्त सारें ॥ ४ ॥
शुद्ध स्फटिकसम चित्तासीं ग्रहण । स्वरूप सगुण जोडेल कीं ॥ ५ ॥
चित्त गणपती होवोनी राहिल । अनुभवा येईल ध्यानामाजी ॥ ६ ॥
विनायक म्हणे नित्य करा ध्यान । तो गौरीनंदन चित्तीं ठेवा ॥ ७ ॥

श्रीदत्तभक्तिज्ञानग्रंथसंग्रहालय, ठाणे १३३
अनुक्रम ...... १८६० ... मं. दि.

(१९५)

# गणपतीचा धांवा

कृपा कधीं करणार । उडी कधीं घालणार ॥ १ ॥
दुःख माझें हरणार । मजलागीं तारणार ॥ २ ॥
कधीं सांग देवराया । शरण आहें तुझे पायां ॥ ३ ॥
माझी आतां दया यावी । उपेक्षा ती न करावी ॥ ४ ॥
विघ्नें माझीं निवारावीं । संकटें दूर करावीं ॥ ५ ॥
आदिदेव गणपती । सकळांचे अधिपती ॥ ६ ॥
सर्व श्रुति-मंत्र जे का । अधिपती तूंच निका ॥ ७ ॥
म्हणोनियां ब्रह्मणस्पती । तुजलागीं म्हणताती ॥ ८ ॥
मंत्रसामर्थ्य प्रगटीं । गणपते माझेसाठीं ॥ ९ ॥
तुझे चरण धरीले । शिर तुजला वाहीलें ॥ १० ॥
आणिक काय करूं सांग । दिधलें आहे अंतरंग ॥ ११ ॥
काय देणार तुजसीं । काय आहे माझेपाशीं ॥ १२ ॥
सकळ ऐश्वर्याचा पति । तूंच एक गणपती ॥ १३ ॥
विनायक करी नमन । येईं आतां तूं धावोन ॥ १४ ॥

(१९६)

# गणपतीचा धांवा

दत्त माझा गणपती । सकळ सामर्थ्याचा पति ॥ १ ॥
सकळ समूहाचा राजा । धांवो आतां माझे काजा ॥ २ ॥
अन्नमय प्राणमय । सकळ तूंच गणराय ॥ ३ ॥
तरी आतां माझेसाठीं । धांव घेईं जगजेठी ॥ ४ ॥
उडी घाल जगन्नाथा । प्रार्थितों मी तुज समर्था ॥ ५ ॥
लाज राख माझी आतां । शरण तुज भगवंता ॥ ६ ॥
विनायक पददास । याची पुरवावी आस ॥ ७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३८८०५.. वि: ...धा. २१५
क्रमांक ....१६६०.... नों: दि: ७।४।१९६५



# शिवरात्र.

# विषय.

प्रबंध नं


| | |
|---|---|
| सेवा स्वीकारण्याबद्दल विनंति | १९७ |
| दाशार्ह कथा | १९८ |
| चांडाळीची कथा | १९९ |
| शिवदातृत्व | २०० |
| शिवस्वरूप वर्णन | २०१ |
| मित्रसह राजाची कथा | २०२ |
| शिवनर्तन | २०३ |
| गणांची बेभानता | २०४ |
| बेभानतेची पराकाष्ठा | २०५ |
| गणाचें भजन | २०६ |
| गणांची तल्लीनता | २०७ |
| विनायकाचें मागणें | २०८ |
| विनायकाचा उद्धार | २०९ |
| ‘ भस्मावशेषं मदनं चकार ’ | २१० |
| कार्य करवून घेतल्याबद्दल कृतज्ञतावचन | २११ |

(१९७)

# सेवा स्वीकारण्याबद्दल विनंति

बुधवार ता० २६।२।१९३०

पर्वणीचा दिन आज प्राप्त झाला । वार्षिक हा भला गुरुराया ॥ १ ॥
उपासना घ्यावी करवोनी दत्ता । प्रगटवा सत्ता येथें नाथ ॥ २ ॥
आमुच्या उद्धारासीं स्वामी प्रगटावें । करवोनी घ्यावें सेवनाला ॥३॥
आम्हां पातक्यांचा झडवावया मळ । श्रीगुरुदयाळ सेवा घ्यावी ॥४॥
सेवेमध्यें जें का पडतें अंतर । त्यासाठीं उदार सेवन घ्यावें ॥ ५ ॥
सोवळें ओवळें घडत कळतां न । आज्ञेचें उल्लंघन जे कां होत ॥ ६ ॥
त्याचसाठीं आज सेवा सांगितली । करवोनी घेतली आजवरी ॥ ७ ॥
तप करवोनी दोषांचें क्षालन । ऐसें दयाघन करावें कीं ॥ ८ ॥
तोच आज आला सांप्रदाय दिन । तरी घ्यावें पूजन अष्टौप्रहरीं ॥९॥
सर्व दिन आज सेवेमध्यें जावा । विसावा नसावा आम्हांलागीं ॥१०॥
दुर्धर हें तप पापक्षालनासीं । करवा कृपेसीं दयाघन ॥ ११ ॥
आमुचा उद्धार करावयासाठीं । तुम्हीं जगजेठी येथें आलां ॥ १२ ॥
नर्मदेचें तीर येथें तुम्हीं केलें । भीमेतें आणिलें येथें तुम्हीं ॥ १३ ॥
अमरजा संगम येथें तुम्हीं केला । येथेंच स्थापिला महिमा थोर ॥१४॥
सकळ तीर्थें क्षेत्रें येथेंच आणिलीं। पुण्यभूमि केली आम्हांसाठीं ॥ १५ ॥
जें जें पुण्य येथें आम्हां घडणार । अनंत होणार फळ त्याचें ॥ १६ ॥
अनंत फळाचें सेवन होणार । पुण्य घडणार अंनतची ॥ १७ ॥
जन्ममरणाची जी कां येरझार । आमुची चुकणार आज दिनीं ॥१८॥
दत्तरूप आम्हीं आज बनणार । सामर्थ्य येणार अतुल्यची ॥ १९ ॥
सर्वसिद्धी आम्हां माळ घालणार । विघ्न हरणार सकळची ॥ २० ॥

अमंगळ सारें आज हरपणार । सोहाळा होणार थोर येथें ॥ २१ ॥
सुकाळ आनंदाचा सुकाळ सिद्धीचा । सुकाळ प्रेमाचा होय आजी ॥२२॥
सुकाळ दर्शनाचा रंग आनंदाचा । होणार कीं साचा तुझ्या कृपें ॥२३॥
दुष्ट दैत्य सारे निस्तेज होणार । बळ हटणार त्यांचें नाथा ॥ २४ ॥
आमुचे वैऱ्यांचा समूळ निःपात । होय भगवंत तुझे कृपें ॥ २५ ॥
तुझीया कोपासीं आम्ही प्रसादिलें । तयासीं घातलें वैऱ्यावरी ॥ २६ ॥
प्रळयकाळींचा प्रचंड जो कोप । जाळो तो उमोप आमुच्या वैऱ्यां॥२७॥
ऐसा हा सुयोग आज घडवावा । भाव कीं धरावा प्रसन्नतेचा ॥ २८ ॥
आम्हांवरी शांत आम्हांसीं उदार । आम्हां हितकर व्हावें नाथा ॥२९॥
विनायक आहे चरणीं शरण । घाली लोटांगण सिद्ध करा ॥ ३० ॥

( १९८ )

# दाशार्ह कथा

### प्रथम पूजनोत्तर

प्रथम प्रहरींची पूजा हे घेतली । कृपा थोर केली आम्हांवरी ॥ १ ॥
भजन पूजनांत आम्हां रत केलें । चित्त लावविलें निजपदीं ॥ २ ॥
शिवशिव नाम परम कल्याणाचें । येतांच तें वाचे पाप जळे ॥ ३ ॥
धन्य शिवार्चन शिवाचें दर्शन । शिवाचें स्मरण पुण्याईचें ॥ ४ ॥
महापातकांचा नाश होत असे । पुनीत होत असे चांडाळही ॥ ५ ॥
सहस्रावधि पापें जळोनियां जाती । पुण्यात्मे ते होती शिवभक्त ॥ ६ ॥
दाशार्हासीं आला ऐसा अनुभव । नामाचें वैभव कळलें त्या ॥ ७ ॥
कलावतीसंगें अंगीं दाह झाला । राव घाबरला फार मनीं ॥ ८ ॥
सांगे कलावती शिवाचा महिमा । गात जावें नामा ऐसें सांगे ॥ ९ ॥
गर्गापाशीं जात उपदेश घेत । मन्त्रासि जपत नमःशिवाय ॥ १० ॥
काकरूपें पापें निघाली अंगातूनीं । गेलीं तीं जळोनि मंत्रतेजें ॥ ११ ॥
विनायक म्हणे तोच नाममन्त्र । मज ठायीं गिरित्र सिद्ध करीं ॥१२॥

( १९९ )

# चांडाळीची कथा

दुर्लभ पूजन शिवरात्रदिनीं । पुण्याचे गणनीं मान नसे ॥ १ ॥
अमर्याद पुण्य शिवपूजनाचें । माहात्म्य पर्वणीचें थोर असे ॥ २ ॥
आज मृत्युलोकीं वसति कैलासाची। फेरी सदाशिवाची मृत्युलोकीं॥३॥
बैलावरी बैसे उमा घेत संगें । पहात कोण जागे निजभजनीं ॥ ४ ॥
आज जेथें त्यासीं सेवन आढळेल । तेथें संतोषेल अपार तो ॥ ५ ॥
भोळा प्रभु सांब सर्वस्व देईल । स्वाधीन करील आपणांस ॥ ६ ॥
एक बिल्वदळ वाहिल्या शिवासीं। पापाचिया राशी जळुनी जाती॥७॥
चाण्डाळीचें पुण्य ध्यानांत आणावें । भवासीं तरावें शिवकृपें ॥ ८ ॥
पूर्वींची पातकी जारकर्मी नारी । परम दुराचारी ब्राह्मण स्त्री ॥ ९ ॥
शूद्रजार तीसीं बहुत मानला । पापाचार केला त्याचे संगें ॥ १० ॥
पानासक्त सदा मांसाशन करी । वांसरांसीं मारी गाईच्या ती ॥ ११ ॥
मेष म्हणोनियां वासरूं मारलें । शिवाशिव म्हाणितलें तयेवेळीं ॥ १२ ॥
तया पुण्यें नारी मानवजन्मा आली। पापासीं ती भली भोगितसे॥१३॥
सर्वांगासी कुष्ठ परम व्याधिग्रस्त । चांडाळी पतित जन्मा आली ॥१४॥
आपण विधवा दुःखाचें आगर । फिरे दारोदार अन्नासाठीं ॥ १५ ॥
शिवरात्रदिनीं आली गोकर्णासीं । कोण न तियेसीं अन्न घाली ॥१६॥
उपवास घडे रात्रीं जागरण । अंगीं म्हातारपण आलें असे ॥ १७ ॥
शिवशिवशिव नामाचा उच्चार । कानांत गजर पडतसे ॥ १८ ॥
कोणी तिचे हातीं घातलें बिल्वपत्र । फेकितां गिरित्र पूजा मानीं॥१९॥
अरुणोदय काळीं विमान तीस आलें। सदाशिवें धाडिलें न्यावयासीं॥२०॥
दिव्यदेह पावे कैलासास जाये । किर्ति न समाये त्रैलोक्यांत ॥ २१ ॥
विनायक म्हणे पतित पावना । मज दयाघना मुक्त करीं ॥ २२ ॥

## ( २०० )

# शिवदातृत्व

### तृतीय पूजनोत्तर

तिसरे प्रहरींची पूजा त्वां घेतली । सिद्धता बनाविली परमार्थासीं ॥१॥
परमार्थ आम्हां तुवां जवळि केला । मार्ग दाखविला सुलभ जो ॥ २ ॥
जया मार्गामध्यें सकळ सुखसोई । कल्याणचि होई जातां जेणें ॥ ३ ॥
ऐसा सुलभ मार्ग आम्हां उघडिला । आम्हांसीं मार्गाला लावियेलें ॥४॥
दृष्टीच्या टप्यांत आणिला परमार्थ । आमुचा अनर्थ चुकवीला ॥ ५ ॥
परमार्थाचा ठेवा गुरुकिल्ली त्याची । दिधली तुवां साची आमुचे करीं॥६॥
कपाट कैसें मुक्त करायाचें आम्हां । दाविलें पूर्णकामा कृपाळुत्वें ॥ ७ ॥
लावुनीयां किल्ली उघडूं आतां द्वार । परमार्थ दूर नाहीं आम्हां ॥ ८ ॥
ब्रह्मादिकां नाहीं गवसला ठेवा । आम्हांसी तो देवा दावियेला ॥ ९ ॥
स्वाधीन केला निधि दातृत्व तुझें ऐसें । नाहीं भरंवसें उपमान ॥ १० ॥
अनुपम देणें तुज शंकराचें । वदावें काय वाचे मानवानें ॥ ११ ॥
रावणासिं आत्मलिंग तुवां दिलें । मागें पुढें पाहिलें नाहीं तुवां ॥१२॥
त्याचिया भजनें भुललासी देवा । आत्मलिंग शिवा दिधलेंसीं ॥ १३ ॥
दिली निजभार्या सर्वस्व ओपिलें । दातृत्व हें भलें अनुपम ॥ १४ ॥
विनायक म्हणे तुजसम दाता । नाहीं उमाकांता त्रैलोक्यांत ॥ १५ ॥

## ( २०१ )

# शिवस्वरूप वर्णन

### चतुर्थ पुजनोत्तर

आयुर्वर्धनार्थ करिती शिवसेवा । अपमृत्यु जीवां बाधेनाची ॥ १ ॥
शिवाविण नाहीं यम-भय त्राता । कोणी कालहर्ता नाहीं नाहीं ॥ २ ॥
रुद्र-मंत्र जप करितां यमासीं । भय उपजे त्यासीं बाधेनाच ॥ ३ ॥

काय तो मशक करिल बापुडा । पडत थोकडा शिवापुढें ॥ ४ ॥
मस्तकासिं गंगा, भाळीं तो चंद्रमा ।अंकीं असे उमा ज्याच्या सदा ॥५॥
नंदीवरी बैसे भक्तां पावतसे । सदा रक्षितसे निजदास ॥ ६ ॥
भक्त रक्षणासीं शक्ति तोच देतो । भक्तांसीं रक्षितो सदाशिव ॥ ७ ॥
ध्यानीं मनी जनीं सदा सदाशिव । भक्तांवरी भाव त्याचा असे ॥ ८ ॥
इतरां तो आहे प्रचण्ड कोपन । आहे विध्वंसन पापीयांसी ॥ ९ ॥
नररुण्डमाळा गळां शोभताती । आंगासि विभूति चिताभस्म ॥ १० ॥
कटीं व्याघ्रचर्म सदा त्याच्या असे । यम लपतसे त्याच्या मागें ॥ ११ ॥

( २०२ )

# मित्रसह राजाची कथा

पंचम पूजनोत्तर

ब्रह्महत्यादि दोष जाती शिवार्चनें । पर्वणी निमित्तानें घडे पुण्य ॥ १ ॥
जरि पाठी उभी ब्रह्महत्या असे । कृपेनें हरतसे शंकराच्या ॥ २ ॥
भोळा देव शिव स्वयें प्रगटत । ब्रह्महत्या करित दुरी जाणा ॥ ३ ॥
एक बिल्वपत्र किंवा ध्यानें मन । अर्पितां दयाघन संतुष्टत ॥ ४ ॥
पत्र पुष्प तोय अर्पिलीं भक्तीनें । घेत आनंदानें कृपाळु तो ॥ ५ ॥
कोणत्याही मिसें सेवन पडतां । होय मान्य करिता सदाशिव ॥ ६ ॥
मित्रसह राजा त्यासीं अनुभव । हरी सदाशिव ब्रह्महत्या ॥ ७ ॥
विनायक म्हणे पापात्मा दारुण । मी तुज शरण मुक्त करीं ॥ ८ ॥

( २०३ )

# शिवनर्तन

नृत्यकाळीं

कैलासासीं शिव उमेसह बैसले । निजानन्दें भले योगिराज ॥ १ ॥
शिवरात्र दिन बहु आनंदाचा । समय मध्यरात्रिचा मंगल कीं ॥ २ ॥

आज उपवास सकळ गणांसीं । करिती भजनासीं शंकराच्या ॥ ३ ॥
ज्ञानवल्ली प्याले सकळही गण । शंकर आपण प्याले बहु ॥ ४ ॥
सकळांसीं आला कैफ त्या वल्लीचा । देहावरी साचा कोणी नसे ॥५॥
गणपति मृदुंग वाजवी धरी ताल । गण ते सकळ भजन करिती ॥ ६ ॥
शिव अंकावरी बैसली पार्वती । जागृत एकटी कैलासांत ॥ ७ ॥
कैफ येवोनियां सकळ झाले दंग । चढलासे रंग नृत्यालागीं ॥ ८ ॥
शिवाभोंवती फेर धरिताती गण । नाहीं जागेपण कोणासींही ॥ ९ ॥
ऐसा आनंदाचा समय कैलासींचा । अनुभव साचा येथ आला ॥१०॥
म्हणुनि भजन करूं, नाचूं, लाज सोडूं । शिवासंगें बागडूं आनंदानें ॥११॥
गण म्हणति भजन शिवहर ऐसें । तेंच घेऊं पिसें नाचावया ॥ १२ ॥
विनायक म्हणे रंगीं रंगोनियां । तन्मयता हृदया जोडूं आतां ॥ १३ ॥

( २०४ )

## गणांची बेभानता

भजतां भजतां बेभान ते झाले । द्वैत विसरले मुळीं आधीं ॥ १ ॥
आपण शिवरूप, ऐसेंच मानिती । तैसेच वागती गण जाणा ॥ २ ॥
आनंदाचा खेळ मांडिला कैलासीं । खेळ निज छंदेसीं खेळताती ॥ ३ ॥
शिवरूप झाले आनंदमूर्ति भले । शिवीं मिसळले पूर्णत्वानें ॥ ४ ॥
जणूं जीवशिव ऐक्यरूप झाले । क्षणभरी गमलें तैसें तेव्हां ॥ ५ ॥
सकलही शिव आपणां म्हणती । प्रेमानें नाचती शिवरूपें ॥ ६ ॥
विनायक म्हणे तोच येथें खेळ । खेळवो स्नेहाळ आम्हांलागीं ॥ ७ ॥

( २०५ )

## बेभानतेची पराकाष्ठा.

नाचतां नाचतां वसनें गळालीं । पार्वती लाजली, परती होई ॥ १ ॥
अंकावरूनि गिरिजा, उतरतां शिव । झाले एकभाव गणांमाजी ॥ २ ॥

गणीं मिसळले नाचाया लागले । रंगोनियां गेले सदाशिव ॥ ३ ॥
त्यांचेंही वसन गळोनियां गेलें । क्रीडा-निर्भर झाले सदाशिव ॥ ४ ॥
अवघे दिगंबर नाचती खेळती । लज्जित पार्वती थोर होय ॥ ५ ॥
दुरुनी जाणवी वसन घ्यावया । त्यांचीये हृदया कांहीं नसे ॥ ६ ॥
कांहीं न समजतां तैसेच नाचती । सुचवी पार्वती पुनः पुन्हां ॥ ७ ॥
विनायक म्हणे अवघे दिगंबर । शिव दिगंबर गाती जाणा ॥ ८ ॥

( २०६ )

## गणांचें भजन.

गिरिजेचें नांव जोडुनि शंकरा । गाताती साचारा गण तेव्हां ॥ १ ॥
गिरिजेचें नांव ऐकतां ऐकतां । शिवा जाणीवता प्राप्त झाली ॥ २ ॥
अंकींची पार्वती उठोनियां गेली । ऐशी स्मृति आली शंकराला ॥३॥
म्हणोनि कडीये उचलोनी घेती । नाचाया लागती घेवोनियां ॥ ४ ॥
करूं लागे धांवा, घाबरत बाळा । जागा रे स्नेहाळा होशी कदा ॥ ५ ॥
भलतेंच काय आज आरंभिलें । आक्रन्दन भलें करीतसे ॥ ६ ॥
सकळ गणांसी हांक ती मारीत । दोघांसीं पाहात गण तेव्हां ॥ ७ ॥
मातांपितरांसीं पाहतां समवेत । तेंच कीं गर्जत भजन जाणा ॥ ८ ॥
विनायक म्हणे आईबापधनी । जोडिले भजनीं गणानीं कीं ॥ ९ ॥

( २०७ )

## गणांची तल्लीनता

ऐसें तें भजन रंगांत कीं आलें । कोणी न ऐके भलें पार्वतीचें ॥ १ ॥
कडीये घेवोनी शिव नाचताती । केंस मोकळे होती तेव्हां तीचे ॥ २ ॥
अस्ताव्यस्त झाला सकळ परिवेष । परि बहु आवेश नाचण्याचा ॥३॥
कोणि नाहीं जागा सकळ तल्लीन । आनंदाचा घन मिसळतां ॥ ४ ॥

मराठा ग्रंथ
अनुक्रम १४४.३६०३


शिवसंगें नाचतां समाधिनिर्भर । आनंदासी भर थोर आला ॥ ५ ॥
आनंदसागरीं बुडोनि राहिले । प्रमत्त बनले आनंदानें ॥ ६ ॥
आनंदाचा कैफ आला आंगावरी । आनंद अंतरीं समावेना ॥ ७ ॥
उन्मत्त बनले बहुत नाचती । आनंदाची स्थिति वर्णवेना ॥ ८ ॥
कधीं न अनुभविलें ऐसें प्राप्त झालें । मन मरुनी गेलें तेव्हां त्यांचें ॥ ९ ॥
मन तें मरतां प्रकाश पडला । ऐक्याच्या रूपाला अनुभविती ॥ १० ॥
विनायक म्हणे ऐक्य ते पावोनी। शिवालागीं ध्यानीं अनुभवीती ॥११॥

( २०८ )

## विनायकाचें मागणें

ऐसा भर आला आनंदीं बहुत । शिवरुपीं वर्तत गण तेव्हां ॥ १ ॥
तया आनंदाचें स्मरण करोनी । हात मी जोडोनी प्रार्थितसें ॥ २ ॥
तोच आम्हां द्यावा नाथा परमानंद । व्हावें कीं वरद मजलागीं ॥ ३ ।
विनायक म्हणे आज शिवरूप । आम्हीं आपोआप बनलों कीं ॥ ४ ॥

(२०९)

## विनायकाचा उद्धार

षष्ट पूजनोत्तर

बहु पुण्याईचा योग हा आजचा । सांपडला साचा तुझ्या कृपें ॥ १ ॥
पदरांत आमुच्या पडली ही सेवा । तुझ्या कृपें देवा दत्तात्रेया ॥ २ ॥
कृतज्ञ होवोनी घालूं लोटांगण । धरूं तुझे चरण कृपाळू बा ॥ ३ ॥
अष्टौ प्रहराची सेवा ऐशी घ्यावी । प्रसन्नता व्हावी आम्हांवरी ॥ ४ ॥
आम्हां पामरांच्या दैवीं काय योग । होता काय रंग ऐसा देवा ॥ ५ ॥
पातकी मी दुष्ट परम दुर्दैवाचा । परि केला दैवाचा तुवां देवा ॥ ६ ॥
परीसा लागतां लोहाचें सुवर्ण । तैसें झालें जाण माझें दत्ता ॥ ७ ॥
शेणाची कस्तूरी कांचेचा कीं हिरा । बनविलें उदारा तुवां मज ॥ ८ ॥

मातीचें सुवर्ण तुवां बनविलें । मोला चढविलें मजलागीं ॥ ९ ॥
मज खापराचा परीस तुवां केला । नरकाचा झाला स्वर्ग जणूं ॥ १० ॥
तैसें पापीयासीं मज बनविलें । दत्तरूप भलें तुवां आज ॥ ११ ॥
पुण्याईचा योग योग तव सेवेचा । घडविला साचा मजलागीं ॥ १२ ॥
मनुष्याचा देव याच देहीं केला । अपूर्व हा भला चमत्कार ॥ १३ ॥
बनलों शिवरूप बनलों दत्तात्रेय । धन्यता माझी होय तव कृपें॥ १४ ॥
विनायक म्हणे माझा तूं उद्धार । केला सद्गुरुवर आज साच ॥ १५ ॥

## ( २१० )

# 'भस्मावशेषं मदनं चकार'

सप्तमपूजनोत्तर.

भट ऐसा नाहीं दुजा या जगतीं । अनुपम कीर्ति ज्याची असे ॥ १ ॥
त्याचीच उपमा त्याजला साजते । थोकडी पडते इतर जे का ॥ २ ॥
त्यासीं प्रतिभट ब्रह्माण्डांत नाहीं । एकलाच पाहीं विजय पावे ॥ ३ ॥
कोणी न कधीं केलें तेंच यानें केलें । महिमान भलें अनुपम ॥ ४ ॥
अचिन्त्य कृत्यांचा एकची हा कर्ता । यासम परता कोणी नाहीं ॥५॥
दुर्जय सकळां अवश हा मोठा । धैर्याचा कीं सांठा मूर्तिमंत ॥ ६ ॥
सकल दुनियेतें जेणें वश केलें । दास बनविले ब्रह्मा विष्णु ॥ ७ ॥
इंद्र चंद्र वंश थोर थोर मुनि । सकल जिंकोनी ठेविले कीं ॥ ८ ॥
ज्याचा बाण कधीं माघार न घेई । प्रतिपक्षाचा घेई, बळी, जो का॥९॥
ऐसा महायोद्धा प्रेरिला देवांनीं । सकल देवोनी साह्य त्यासीं ॥ १० ॥
अकालीं वसंत अप्सरांच्या संगें । जात असे मागें सहायार्थ ॥ ११ ॥
ऐसा पुष्पधन्वा वश करण्यासीं । सवें पार्वतीसीं देवोनीयां ॥ १२ ॥
पाठविती देव गिरि-कंदरासीं । भूल बैरागियासीं पाडावया ॥ १३ ॥
आम्रमंजरींचा बघुनीयां भर । आकर्ण ओढी मार धनु निज ॥ १४ ॥
अप्सरा नाचती कोकिला आलापिती । वनदेवता वर्षती पुष्पभार॥१५॥
पार्वती करोनी सकल शृंगार । उभी राहे समोर बैराग्याच्या ॥ १६ ॥

अंगालागीं भस्म वेष दिगंबर। समाधि–निर्भर योगिराज ॥ १७ ॥
त्यासीं जिंकावया भूल पाडावया। साधावया देवकार्या पाठवीती॥१८॥
करितां टणत्कार निज धनुष्याचा। उघडिला साचा तृतीयनेत्र ॥ १९ ॥
वह्नि प्रगटला काम भस्म झाला। ढीग तेथें पडला भस्माचा कीं ॥२०॥
तेव्हां पासोनियां कंदर्प–प्रतिभट। नाम हें सुभट पडलें कीं ॥ २१ ॥
तया शरण जातां कामबाधा नोहे। न छळी तो पाहे शिवभक्तां ॥२२॥
विनायक म्हणे कृपा संपादावी। मात्रा न चालावी कामाची कीं ॥२३॥

## ( २११ )

# कार्य करवून घेतल्याबद्दल कृतज्ञतावचन

### अष्टमपूजनोत्तर

कृतकृत्यता कीं आमुची त्वां केली। कृपेची माउली आम्हांसीं तूं॥१॥
वार्षिक हें कार्य तुवां करविलें। आम्हां बळ दिलें तुवां नाथा ॥ २ ॥
निरामय आम्हां प्रसन्न ठेविलें। साधनात दिलें मेळवूनी ॥ ३ ॥
सर्व अनुकूलता तुवां स्वयें केली। आमुची पुरविली मनीषा कीं ॥ ४॥
सहाय्य थोर केले स्वयें प्रगटोनी। कार्य संपादोनी स्वयें तुवां ॥ ५ ॥
टिटवीनें केला सागराचा शोष। तैसें हें विशेष कार्य झालें ॥ ६ ॥
पुण्याईचे नर आम्ही ते नव्हत। आम्हांपाशीं दुरित बहु भलें ॥ ७ ॥
आम्हीं सुदैवाचे नव्हत कीं जन। प्रारब्ध गहन आमुचें कीं ॥ ८ ॥
आमुचे ललाटीं, यासम पुण्याई। घडोनियां येई, ऐसें नाहीं ॥ ९ ॥
ब्रह्मदेवें नाहीं केली ही योजना। तूझें दयाघना कृत्य सारें ॥ १० ॥
आमुची दया आली तुजसीं माधवा। तुज सदाशिवा दया आली ॥११॥
क्षणभरी तुवां प्रारब्ध दूर केलें। प्रियपण राखिलें निजभृत्यीं ॥ १२ ॥
क्षणभरी माझें दैव फिरवील। मध्यस्थीतें केलें ब्रह्मयासीं ॥ १३ ॥
आला होता यम घेऊनीयां पाश। तुवां जगदीश फिरवीला ॥ १४ ॥
आयुष्य वर्धन माझें नाथा केलें। माझेकडे दिलें भजनकृत्य ॥ १५ ॥
तुजला भजावें रात्रंदिन गावें। यशातें वानावें अहोरात्र ॥ १६ ॥

सिद्धी वचनासीं तुवां असे दिली। विजयश्रीनें घातली कण्ठीं माळा १७
अनुग्रह केला अंगिकार केला । माझा त्वां दयाळा पूर्णकृपें ॥ १८ ॥
सिद्ध बनविलें मज धन्य केलें । काय मागूं भलें आणिक मी ॥ १९ ॥
मागण्याचें नाहीं कांहींच उरलें । ऐक्यरूप झालें तुज मज ॥ २० ॥
तृप्तिचे ढेंकर मजलागीं आले । आनंदाचे भले वासुदेवा ॥ २१ ॥
विनायक म्हणे मौनची धरीतों । निजठायीं राहतों संतुष्ट मी ॥ २२ ॥

# राम नवमी.

# विषय.


| | प्रबंध नं० |
|---|---|
| दशरथाचा यज्ञाविषयीं विचार | २१२ |
| ऋष्यशृंगास आणण्याची मसलत | २१३ |
| मसलतीची अंमलबजावणी | २१४ |
| सूतनिवेदन | २१५ |
| पायसप्राप्ति | २१६ |
| रामजन्म | २१७ |

## ( २१२ )

# दशरथाचा यज्ञाविषयीं विचार

सोमवार ता. ७।४।१९३०

अयोध्येसीं राजा दशरथ ख्यात । असतां वर्तत काय झालें ॥ १ ॥
सर्व सुखें त्यासीं, परी न संतति । चिंता झाली चित्तीं बहु त्याच्या ॥२॥
तंव आलें मनीं अश्वमेध यज्ञ । करुनी ब्रह्मज्ञ तोषवावा ॥ ३ ॥
बोलावी पुरोहित सकळ प्रधान । सकळ विद्वान बोलावीत ॥ ४ ॥
तपोधन सारे बोलावित राजा । यज्ञ, पुत्रकाजा, करणें म्हणुनी ॥ ५ ॥
अश्वमेध यज्ञें तोषवावा हरी । म्हणोनि अंतरीं येत माझ्या ॥ ६ ॥
तुमचा विचार मज कळवावा । आशीर्वाद द्यावा महंत हो ॥ ७ ॥
सकळांनीं तेव्हां अनुमोदियेलें । अनुज्ञेतें दिलें संतोषानें ॥ ८ ॥
सकळ राण्यांसीं भेटतसे नृप । व्रतस्थ साक्षेप रहावित ॥ ९ ॥
यज्ञदीक्षा घेणें मनांत आणिलें । प्रजेसाठीं भलें म्हणे राजा ॥ १० ॥
सकळ राण्यांसीं हर्ष थोर झाला । विचार पटला सकलांसीं ॥ ११ ॥
मग सुमंत्रांसीं सांगे नृपवर । सिद्धता साचार करावी हें ॥ १२ ॥
विनायक म्हणे पुढिल अनुसंधान । लावोनियां मन ऐकावें कीं ॥१३॥

## ( २१३ )

# ऋष्यशृंगास आणण्याची मसलत

सूत सांगे, राजा, मुनींनीं ऐकिलें । वृत्त जें कां भलें, ऐक आतां ॥ १ ॥
एकान्तांत तूज करीन कथन । जरी आज्ञापन देसी मातें ॥ २ ॥
अवश्य म्हणे राजा सूत सांगतसे । ऐकियेलें जैसें तेणें पूर्वी ॥ ३ ॥

ऋषिसंघामाजी सनत्कुमारमुनि । गेले जें सांगोनि, सांगत मी ॥ ४ ॥
पुढील कार्यास्तव जें नियोजन । सांगत आख्यान तेंच सूत ॥ ५ ॥
कश्यपाचा पुत्र विभाण्डकमुनि । ख्यात त्रिभुवनीं असे जो का ॥ ६ ॥
हरिणीचे ठायीं गर्भ ठेवितसे । पुत्र तो होतसे श्रेष्ठ मुनी ॥ ७ ॥
ऋष्यशृंग नामें तया अभिधान । ब्रह्मचर्य जाण थोर त्याचें ॥ ८ ॥
पित्यानें पोषिलें, आणिकाचा स्पर्श । नाहीं लवलेश तयालागीं ॥ ९ ॥
पित्यावांचोनीयां कोणा न देखिलें । ऐसे त्याचे गेले दिन फार ॥ १० ॥
नाहीं नराकृती अन्य तयें देखिली । विचित्रलीला भली दैवाची हे ॥११॥
परम चतुर तपस्वी ब्राह्मण । पुण्याईची खाण मूर्तिमंत ॥ १२ ॥
ऐसें वर्ततां, काय झाला इतिहास । लावोनी चित्तास ऐकावें कीं ॥१३॥
अंगदेशीं मोठें अवर्षण झालें । दुर्लभ अन्न झालें प्रजेलागीं ॥ १४ ॥
राजा देशींचा त्या रोमपाद नाम । वात्सल्याचें धाम प्रजेसाठीं ॥ १५ ॥
पाचारुनी सूज्ञां विचारी विचार । उपाय साचार कांहीं सांगा ॥ १६ ॥
कोण्या यज्ञें होय वृष्टी येथें थोर । हाच कीं विचार सांगा म्हणे ॥१७॥
विनायक बोले, मुनि सांगताती । ऋष्यशृंगाप्रति येथें आण ॥ १८ ॥

( २१४ )

## मसलतीची अंमलबजावणी

राजा हात जोडी, कोठें ऋष्यशृंग, । वृत्तांत तो सांग, सांगा मज ॥१॥
मुनि सांगताती ऋष्यशृंग कथा । जरी त्या समर्था आणशील ॥ २ ॥
पुत्रासाठीं येथें येई विभाण्डक । करील यज्ञमख तोची तूझा ॥ ३ ॥
परि त्या आणणें बहुत कठीण । कैसें प्रलोभन करशील ॥ ४ ॥
विषयाचें नाहीं तयासी दर्शन । कैसें तूं मोहन साधशील ॥ ५ ॥
परि नैसर्गिकी ओढ जे मनाची । विषयाची साची प्राणिमात्रां ॥ ६ ॥
तयायोगें कार्य सुलभ होईल । उपाय साधेल तूजलागीं ॥ ७ ॥
सुंदर गणिका शृंगारोनी धाडी । भुरळ कीं पाडीं त्याच्या मना ॥ ८ ॥
अवश्य म्हणे राजा, बोलावि गणिका । षोडश वार्षिका तरुणी ज्या ॥९॥
नृत्यगायनांत निपुण चतुर । करुनी शृंगार धाडीतसे ॥ १० ॥

कामाचें हें शस्त्र अमोघ जगतीं । पाठवी नृपति अरण्यासीं ॥ ११ ॥
जावोनि वनांत पाहती सुंदरी । ऋष्यशृंग तरी कोठें वसे ॥ १२ ॥
आश्रम शोधिला तया गणिकांनीं । सावध राहोनि योजिताती ॥ १३ ॥
जवळचि केला एक निजाश्रम । मोहाया अकाम मुनिपुत्र ॥ १४ ॥
पिता नाहीं ऐशी संधी साधोनियां । तया भुलवाया जाती वेश्या ॥१५॥
दुरुनि साश्चर्य पाहे ऋषिसुत । येतसे धांवत त्यांच्यापाशीं ॥ १६ ॥
कवण तुम्हीं मुनि कवण धाम सांगा। प्रेरिती अपांगा गणिका त्या॥१७॥
नकळतची कीं मोहिला बालक । बनत पूजक त्या स्त्रियांचा ॥ १८ ॥
अर्घ्य पाद्य देई, देई फलाहार । नारी त्या चतूर कामशास्त्रीं ॥ १९ ॥
हाव भाव दाविती तया भुलविती । तयालागीं देती खायें कांहीं ॥२०॥
देताति मोदक आमुचीं हीं फळें। मिष्टान्नातें बळें देती तया ॥ २१ ॥
ऐसा भुलवीला ऋषीचा कुमार । जावया साचार पुसताती ॥ २२ ॥
व्रताचीये काज आम्हीं जातों आतां । म्हणोनि विश्रांता बोलती त्या॥२३॥
आश्रय तूमचा कोठें विचारित । दुरुनी दावित तयालागीं ॥ २४ ॥
स्थिर मन त्याचें चंचल बनलें । मतांत सांचलें लावण्य त्यांचें ॥ २५॥
दुजा दिन येतां पुन्हाः त्या पातल्या । मनांत हर्षल्या बहुतची ॥ २६ ॥
तया म्हणताती आमुच्या आश्रमा । पावतां आरामा पावशील ॥२७॥
बहु भुलवोनि तयालागीं नेलें । तंव मेघ वळले आकाशांत ॥ २८ ॥
रोमपाद जाय सामोरा तयासीं । करित लग्नासीं त्याच्या तदा ॥ २९ ॥
निजकन्या शांता ऋष्यशृंगालागीं । देवोनियां जगीं धन्य झाला ॥३०॥
विभांडक देखे स्नुषा आणि सुत । आनंद पावत बहूतची ॥ ३१ ॥
विनायक म्हणे अवर्षण गेलें । विभाण्डकें केलें प्रसादातें ॥ ३२ ॥

( २१५ )

# सूत निवेदन

सूत सांगे, राजा, ऐक, दशरथा । पुढिलिया अर्था सावधानें ॥ १ ॥
कुमार सांगताती मुनिश्रेष्ठालागीं । ऋष्यशृंग जगीं ख्यात होय ॥ २ ॥

अयोध्येचा राजा होईल पुत्रकाम । त्यासीं परंधाम-प्राप्ति होय ॥ ३ ॥
ऋष्यशृंगा राजा आणिल यज्ञासीं । त्या रोमपादासीं विनवोनी ॥ ४ ॥
शान्ता भार्येसह आणिल मुनीसीं । करिल यज्ञासीं त्याकरवीं ॥ ५ ॥
तेव्हां पुरुषोत्तम लाभेल वंशासीं । पावेल ख्यातीसीं सूर्यवंश ॥ ६ ॥
ऐसें आहे जाणा महिमान त्याचें । तया ऋष्यशृंगाचें विप्रवर ॥ ७ ॥
ऐसा कुमारानीं वृत्तान्त कथीला । तोंच निवेदिला, राजा तूज ॥ ८ ॥
विनायक म्हणे कथा राघवाची । अनुपम साची मधुर कीं ॥ ९ ॥

( २१६ )

## पायसप्राप्ति

शरयू नदीचे उत्तर तीरासीं । आरंभी यज्ञासीं दशरथ ॥ १ ॥
अश्व सोडियेला सोपाध्याय भला । मंडप घातला थोर तेथें ॥ २ ॥
वेदी रचियेल्या इष्टका मांडील्या । यथाशास्त्र भल्या तयाठायीं ॥ ३ ॥
सकळ नृपवर बोलाविले त्याहीं । करित तो पाहीं यज्ञालागीं ॥ ४ ॥
पंडित विद्वान कलावान कोणी । सकलही आणी बोलावोनी ॥ ५ ॥
आले तपोधन ब्रह्मनिष्ठ आले । सर्व गजबजलें यज्ञस्थान ॥ ६ ॥
वर्ष होतां आला घोडा परतोनी । द्रव्यातें घेवोनी अपार कीं ॥ ७ ॥
यज्ञ थोर झाला धन्यवाद गाती । देतां द्रव्य मिती नाहीं तेव्हां ॥ ८ ॥
हिरण्यवस्त्रांचा पूर कीं लोटला । समृद्ध जाहला भिक्षुक जन ॥ ९ ॥
मग ऋष्यशृंगाप्रति बोले राजा । आतां महाराजा कृपा करा ॥ १० ॥
पुत्रकामेष्टितें यजावें म्हणत । जेणें पुत्र होत मजलागीं ॥ ११ ॥
ऋष्यशृंगें अवश्य मग म्हणीतलें । विधान कीं केलें थोर तेव्हां ॥ १२ ॥
स्वयें प्राजापत्य पायस देतसे । नृपति होतसे कृतकृत्य ॥ १३ ॥
पायसार्ध देई प्रथम कौसल्येला । तदर्ध सुमित्रेला देत असे ॥ १४ ॥
अर्ध देत मग राजा कैकेयीला । तदर्ध सुमित्रेला देई पुन्हां ॥ १५ ॥
ऐसा झाला असे प्रसाद राजाला। आशीर्वादें भला ऋष्यशृंगाच्या ॥ १६ ॥
विनायक म्हणे धरी अवतार । स्वयें तो श्रीकर सूर्यवंशीं ॥ १७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय.


( २१७ )

# रामजन्म

ऋष्यशृंग पदीं ठेवोनियां माथा। म्हणे माझ्या अर्था पुरविलें॥ १॥
सभार्य येवोनी मज धन्य केलें। प्रसादातें भलें पावविलें॥ २॥
ऐशी करी स्तुति परम तुष्ट राजा। अयोध्येसीं वोजा परतला॥ ३॥
तीन्ही राण्या होती मग गरोदर। तेज तें प्रखर लोटतसे॥ ४॥
परब्रह्म आलें कौसल्येच्या पोटीं। शोभत गोमटी गर्भतेजें॥ ५॥
चैत्र नवमीसीं मध्याह्नीं येतां रवि। प्रभाते प्रगटवी तेव्हां मह॥ ६॥
सुर-वर पुष्पवृष्टि करिताती। दुंदुभि वाजती स्वर्गामाजी॥ ७॥
शुद्ध पक्षामाजी देव अवतरे। आनंद संचरे त्रैलोक्यांत॥ ८॥
अप्सरा नाचती गंधर्व आलपिती। उत्सव करिती त्रिभुवनीं॥ ९॥
कौसल्येसीं राम कैकेयीसीं भरत। दोन पुत्र होत सुमित्रेसीं॥ १०॥
लक्ष्मण शत्रुघ्न पुत्र तिला झाले। अभिधान केलें वसिष्ठानें॥ ११॥
रावणवधार्थ राघव पातला। विश्वास जाहला त्रिभुवना॥ १२॥
धन्य धन्य धन्य धन्य दिन आज। झाला अधोक्षज प्रगट कीं॥ १३॥
विनायक म्हणे प्रसाद करावा। आम्हांसीं बरवा दयाघन॥ १४॥

# हनुमान् जयंती.

# विषय


| | प्रबंध नं. |
|---|---|
| मारुती प्रशंसा | २१८ |
| मारुतीची राममयता | २१९ |
| मारुती चरित्रसार | २२० |
| मारुतीची रामनिष्ठा | २२१,२२२ |

अनुक्रम ......
क्रमांक ...... नों. दि. ......

# हनुमान-जयन्ती.

रविवार ता. १३।४।१९३०

( २१८ )

## मारुती प्रशंसा

अशक्य ऐसें कांहीं नाहीं मारुतीला । नित्य विजयाला संपादीत ॥ १ ॥
दुर्गमही स्थळीं तयासी प्रवेश । बळाचा हा ईश अनुपम ॥ २ ॥
अंजनीचा सुत पुत्र पवनाचा । सेवक रामाचा जगीं ख्यात ॥ ३ ॥
मंत्री सुग्रीवाचा मुख्य वानरांचा । काळ राक्षसांचा कपिवर ॥ ४ ॥
सदा राम गाई सदा राम सेवी । महती वदावी काय त्याची ॥ ५ ॥
विनायक म्हणे धन्य वज्रदेही । पावे लवलाही प्रार्थितांची ॥ ६ ॥

( २१९ )

## मारुतीची राममयता

जेथें रामकथा तेथें प्रगटत । साहाय्यासीं करित रामभक्तां ॥ १ ॥
गुरु, रामदासां, मार्गातें दावीत । कष्ट निवारित सदा त्यांचे ॥ २ ॥
शिरावरी भार घेत प्रापंचाचा । रामाच्या दासांचा पवनात्मज ॥ ३ ॥
जेथें रामनाम तेथें हा मारुती । ऐशी आहे ख्याती थोर जगीं ॥ ४ ॥
राम गुरु, राम प्राण, राम आत्मा । राम परमात्मा, तयालागीं ॥ ५ ॥
राम हें सर्वस्व, राम हें जीवन । राम समाधान, राम हर्ष ॥ ६ ॥
विनायक म्हणे सदा रामरूप । वानर-यूथप मारुती हा ॥ ७ ॥

( २२०.)

# मारुती-चरित्र-सार

मारोनियां वाली, सुग्रीवासीं राजा । करोनियां वोजा, सांधि केला ॥१॥
रामासीं सहाय्य सुग्रीवें करणे । भार्या सोडविणें राघवाची ॥ २ ॥
ऐसा समय झाला सुग्रीव रामाचा । कार्यभाग साचा मारुतीचा ॥ ३ ॥
सकळ कारणीं अंजनीचा सुत । रामाचें इंगित तोचि जाणे ॥ ४ ॥
सीतेतें शोधाया धाडिती वानर । कोणालागीं पार गवसेना ॥ ५ ॥
अंजनिच्या सुतें सीताशुद्धि केली । लंका ते जाळिली रावणाची ॥ ६ ॥
पराक्रम थोर अतुल शौर्य धैर्य । अवर्ण्यचि वीर्य त्याचें जाणा ॥ ७ ॥
एकला जाउनि रावणा भेडसावी । काय त्याची वर्णावी थोर सत्ता ॥८॥
सेतु बांधण्यासिं हाच मुख्य कपी । परम प्रतापी बळी हाच ॥ ९ ॥
राक्षसांसीं भीति याचीच दारुण । पुच्छातें वेष्टुन मारीतसे ॥ १० ॥
येणें कुंभकर्ण उचलोनि दाविला । उत्साह भरविला वानरांत ॥ ११ ॥
येणें लक्ष्मण स्कंधासीं वाहोनी । झुंजाविलें रणीं रावणिसीं ॥ १२ ॥
मारविला येणें अजिंक्य इंद्राजित । महिमा अतर्कित याचा असे ॥१३॥
राघव-शत्रुनें लक्ष्मण पाडीला । रामराया झाला महाशोक ॥ १४ ॥
सूर्योदयापूर्वीं उपाय लक्ष्मणा । नाहीं तरी मरणा ठेवियेलें ॥ १५ ॥
परी या वीरानें वल्ली आणियेल्या । वृत्ति हंसविल्या सकलांच्या ॥१६॥
उठविला लक्ष्मण रामपञ्चप्राण । ऐसा महाप्राण मारुती हा ॥ १७ ॥
धन्य धन्य धन्य धन्य त्याचें यश । जयासी सुरेश सेविताती ॥ १८ ॥
जेथें तेथें रामकार्यांत मारुती । त्याची काय निर्वृत्ति वदावी ती ॥ १९ ॥
अहिमाहि रावण,रामलक्ष्मणा, । घालोनि मायावरणा, नेती जेव्हां ॥२०॥
पाताळांत गेला दैत्य भैरव हा । दैत्यां भय महा सदा ज्याचें ॥ २१ ॥
मनुष्य-भक्षक तयांची जे देवी । तिजला कांपवी भयानक ॥ २२ ॥
घातलें देवीतें दहीं दूध सारें । खातसे निर्धारें आपणची ॥ २३ ॥
रामलक्ष्मण हातीं सांपडतां । तयांची सिद्धता सर्व केली ॥ २४ ॥

धनुष्य बाण तयां आणोनियां देत । संहार करित राक्षसांचा ॥ २५ ॥
रामें अहिमहि राक्षस मारिले । पाताळ शुद्ध केलें रामजीनें ॥ २६ ॥
परी त्यांत याचा थोर पराक्रम । वानी स्वयें राम, निजमुखीं ॥ २७ ॥
विनायक म्हणे मारुती रामाचा । राम मारुतीचा ऐसा योग ॥ २८ ॥

( २२१ )

## मारुतीची रामनिष्ठा

राम राज्यावरी बैसतां, हा दास । सदा सेवी त्यास, सोडीनाच ॥ १ ॥
जेथें राम तेथें मारुती हा उभा । सूर्याची ते प्रभा सूर्या जैशी ॥ २ ॥
सदा सर्वकाळ रामाचे संनिध । प्राण अनुबंध राघवाचा ॥ ३ ॥
कदाही तो रामा मुळीं विसंबेना । मुळींच चळेना रामापासून ॥ ४ ॥
विषय त्याचा राम, राम हे जीवन । राम अमृतपान तयालागीं ॥ ५ ॥
राम हे विश्रान्ति राम हे समाधि । सदा ऐक्य साधी रामाठायीं ॥ ६ ॥
रामाविण अन्य नाहींच प्रत्यय । बनला दुर्जय रामरूप ॥ ७ ॥
देह भिन्न जरी अवघाचि राम । सदा पूर्णकाम वसतसे ॥ ८ ॥
ब्रह्मचारी असे, असे योगनिष्ठ, । सकलां वरिष्ठ तोचि जाणा ॥ ९ ॥
विनायक म्हणे त्याचा जन्मदिन । कीर्तिते गाऊन साजरा करूं ॥ १० ॥

# नृसिंह-जयंती

# विषय.

प्रबंध नं.


| | |
|---|---|
| हिरण्यकश्यपुच्या चारित्रापासून बोध | २२२ |
| अदितीची गर्भधारणा | २२३ |
| हिरण्यकश्यपुची उन्मत्तता | २२४ |
| देवांची भगवंतास विनंति | २२५ |
| प्रल्हादजन्म व चरित | २२६ |
| प्रल्हादाचा पंथ | २२७ |
| बापाचा कोप | २२८ |
| हिरण्यकश्यपुचा वध | २२९ |

# नृसिंह—जयन्ती

रविवार ता० ११।५।१९३०

(२२२)

## हिरण्यकश्यपुच्या चरित्रापासून बोध

दुर्लभ हा जन्म, लाभुनि मानवाचा । संग्रह संसाराचा करीताती ॥१॥
संसारांत जाय गढून पामर । पडत विसर इतराचा ॥ २ ॥
होवोनियां गृही धर्म अर्थ काम । जोडी अनुपम किती तरी ॥ ३ ॥
परी मोक्षासाठीं कोणीही झटेना । स्वहित साधिना मानव हा ॥ ४ ॥
स्वार्थ-बुद्धि दृढ, त्यांत लिंपडतो । तेंच तेंच करितों पुन्हां पुन्हां ॥ ५ ॥
भोग-संग्रहाचा तयास हव्यास । पावत दुःखास जन्मोजन्मीं ॥ ६ ॥
निजपर ऐसा भेद धरी मनीं । भेदबुद्धीं जनीं वावरत ॥ ७ ॥
तेणें शांती ढळे मनःक्षोभ होय । घडत अपाय जीवालागीं ॥ ८ ॥
उत्कर्ष भोगाचा परम दावोनी । शांती नाहीं मनीं दावियेलें ॥ ९ ॥
हिरण्यकश्यपूच्या दृष्टान्तानें खूण । दावी नारायण सर्व जगा ॥ १० ॥
नर-हरि-रूपें स्वयें प्रगटला । मृत्यु यावयाला असुरासीं ॥ ११ ॥
जन्म मृत्यु कधीं न चुकत स्वार्थानें । दृढ तपस्येनें न चुकत ॥ १२ ॥
हरीभजनावीण फेरा न चुकत । जीवन्मुक्त होत दृढ बद्ध ॥ १३ ॥
पुन्हां पुन्हां जन्म पुनरपि मरण । ऐसें आवर्तन घडतसे ॥ १४ ॥
हाच अभिप्राय नरहरी देवें । आम्हां कृपाभावें दावियेला ॥ १५ ॥
विनायक म्हणे नृहरीजयन्ती । करणें आज स्मृति जन्मदिनीं ॥ १६ ॥

( २२३ )

## अदितीची गर्भधारणा

अदितीचे पुत्र स्वर्गातें भोगिती । म्हणुनी मानी खंती दैत्यमाता ॥ १ ॥
प्रार्थी कश्यपासीं आपुले मुलांस्तव । तयां राज्यवैभव प्राप्त व्हावें ॥२॥

मराठी ग्रंथ



...ळी पुत्र व्हावे म्हणे आपणासीं । म्हणोनि व्रतासीं योजीतसे ॥ ३ ॥
व्रतपूर्ण होतां कामोद्भव मनीं । होय जाणा झणीं दितीलागीं ॥ ४ ॥
कश्यपाचा धरी पदर लोभानें । विह्वळ कामानें होवोनियां ॥ ५ ॥
संध्यासमय तेव्हां घोर रौद्र वेळा । परी ती अबला न सोडीच ॥ ६ ॥
परोपरी केली तिची समजावणी । परी अंतःकरणीं उमगेना ॥ ७ ॥
विवेक न होय अधीर झाली नारी । भोग दिला तरी कश्यपानें ॥ ८ ॥
मग पश्चात्तापें शरण जहाली । चरणांसीं भली स्वभर्त्याच्या ॥ ९ ॥
घोर पुत्र तुझे होतील दयिते। ऐशिया वाणीतें पति सांगती ॥ १० ॥
हरिचीया हातीं त्यांसीं मृत्यु यावा । ऐसा वर यावा दिती म्हणे ॥११॥
कश्यपानीं दिला तिज आशीर्वाद । श्रीहरीवरद होतील कीं ॥ १२ ॥
विनायक म्हणे जावळेतनय । प्रसिद्ध दैतेय तीस झाले ॥ १३ ॥

(२२४)

## हिरण्यकश्यपुची उन्मत्तता

हिरण्यकशिपु, आणि हिरण्याक्ष, । झाले सर्वभक्ष, घोर दैत्य ॥ १ ॥
तपश्चर्याबळें अमित मातले । सर्व आक्रमिलें जगत्रय ॥ २ ॥
ब्रह्मदेववरें सामर्थ्य तयांसीं । त्यांच्या वैभवासी मिती नाहीं ॥ ३ ॥
सलिलांत शिरे जेव्हां हिरण्याक्ष । तेव्हां विरूपाक्ष प्रगटला ॥ ४ ॥
क्रोडरूपें आला हरी झुंजावया । युद्ध झालें तयां अपूर्व कीं ॥ ५ ॥
शेवटीं वराहानें मारिला राक्षस । तोच धरी द्वेष बंधु त्याचा ॥ ६ ॥
विष्णुद्वेषें मत्त गांजित अवनीं । धर्म बुडवोनी पायांखालीं ॥ ७ ॥
भृत्यां आज्ञापित निज तो राक्षस । पीडा, त्रिभुवनास घोररूपें ॥ ८ ॥
जेथें जेथें गाई श्रोत्रिय ब्राह्मण । वेदाचें पठण जेथें जेथें ॥ ९ ॥
जेथें जेथें वर्णाश्रम धर्म चाले । विष्णुभक्त भले जेथें जाणा ॥ १० ॥
जाळा तो मुलूख जाळा घरदारें । उठा एकसरें आज्ञापित ॥ ११ ॥
विनायक म्हणे ऐसा कहर केला । हाहाःकार झाला जगत्रयीं ॥ १२ ॥

( २२५ )

## देवांची भगवंतास विनंति

स्थानभ्रष्ट देव होवोनियां दीन । करिती स्तवन माधवाचें ॥ १ ॥
कोणी सोडविता आतां आम्हालागीं । आधार न जगीं उरलासे ॥ २ ॥
विधि-वर-बळें मत्त निशाचर । केलासे कहर त्रिभुवनीं ॥ ३ ॥
महा-विष्णु-द्वेष्टा प्रतापी अनंत । आम्ही झालों त्रस्त देवा धांवा ॥ ४ ॥
सांगितलें तेव्हां त्याचे पोटीं सुत । महाभागवत उपजेल ॥ ५ ॥
तयापाशीं द्वेष करील दुरात्मा । तेव्हां मी परमात्मा अवतरेन ॥ ६ ॥
नरहरिरूपें प्रगटेन जाणा । दैत्याच्या हनना साधीन मी ॥ ७ ॥
विनायक म्हणे देव आश्वासिले । भगवंतें भले कृपाळुत्वें ॥ ८ ॥

( २२६ )

## प्रल्हादजन्म व चरित

तया दैत्यालागीं होय तैसा सुत । महाभाग्यवंत विष्णुप्रिय ॥ १ ॥
गुरुगृहीं ठेवी, शास्त्रें पढवीत, । उपकारक होत, संसारा जीं ॥ २ ॥
प्रल्हाद हें नाम नामासम सुत । राहत डोलत विष्णुनामें ॥ ३ ॥
एके दिनीं पिता, घेवोनी अंकासीं, । विचारी तनयासीं, रुचे काय ॥४॥
तयें भगवद्भक्ति सांगतां कोपला । दूषण, उपाध्यायाला, देत असे ॥५॥
तुम्हीं शिकविलें तैसा हा बोलतो । याहुनी जाणतो बाल काय ॥ ६ ॥
विष्णुद्वेष यासीं शिकवा म्हणत । कुलधर्मरत करा यासीं ॥ ७ ॥
भौतिक शास्त्रांचा करवा अभ्यास । वृद्धी संसारास जेणें होय ॥ ८ ॥
गुरु विचारीती अरे बा प्रल्हादा । काय अनुवादा करितोसी ॥ ९ ॥
कोणी शिकविलें सांगरे तुजला । दूषण आम्हांला येवों नये ॥ १० ॥
प्रल्हाद म्हणत, मज शिकविता, । तया भगवंताविण, नाहीं ॥ ११ ॥
घेवोनियां वेत तयासि ताडिती । बळें शिकविती जडशास्त्रें ॥ १२ ॥

पुन्हां पिता घेई जवळि बालक । भीत अध्यापक परमची ॥ १३ ॥
काय तुज रुचे पृच्छा करी दैत्य । विष्णुभक्ती नित्य गोड वाटे ॥ १४ ॥
हेंच सार आहे सकळ जीवांसीं । तया माधवासीं नित्य गाणें ॥ १५ ॥
घेतला तो बहु दूर लोटी बाळ । म्हणे माझा काळ मूर्तिमंत ॥ १६ ॥
जेणें वधीयेला पितृव्य असे याचा । पक्ष घेत त्याचा मजपुढें ॥ १७ ॥
आमुचा जो वैरी तयासीं भजतो । लांछन लावीतो आम्हांलागीं ॥१८॥
अहो दैत्यवर, अग्निशस्त्रविष । घेवोनि, सरोष, मारा यासीं ॥ १९ ॥
अग्निमध्यें जाळा, शस्त्रानें हा तोडा। शरीर याचें फाडा निर्दयत्वें ॥२०॥
हालाहल विष यासीं तुम्हीं पाजा । अग्निमध्यें भाजा जिवंतची ॥२१॥
शिळादगडांनीं यासीं तुम्हीं ठेंचा । कृतान्त हा साचा मज वाटे ॥२२॥
मृत्यु असे माझा केवळ उदेला । मज खावयाला प्राप्त झाला ॥ २३ ॥
विनायक म्हणे दैत्य ते झटती । तया अमराप्रती मारावया ॥ २४ ॥

( २२७ )

## प्रल्हादाचा पंथ

चालेना उपाय बाळ तो मरेना । खिन्नत्व ये मना दैत्याचीया ॥ १ ॥
मग उपाध्याय दैत्यासीं प्रार्थिती । मानुं नये खंती बालकाची ॥ २ ॥
बालबुद्धि आहे शिकवूं पुन्हां त्यासीं । म्हणुनि आश्रमासीं नेती पुन्हां॥३॥
परोपरी तया द्विज शिकविती । भौतिकशास्त्ररीती निजबुद्धी ॥ ४ ॥
परी तयासि तें कांहींच रुचेना । करित भजना रात्रंदिन ॥ ५ ॥
दैत्यबाळांलागीं उपदेश करी । भजावा श्रीहरी सर्वांठायीं ॥ ६ ॥
विषय-भोग तुच्छ त्यांत नाहीं सुख । परिणामीं विख त्याच्यामधीं ॥७॥
आजवरी सांगा अमर कोण झाले । कोणा सुख झालें संसारांत ॥ ८ ॥
शिकवित पोरां नारायण म्हणा । नामसंकीर्तना करा म्हणे ॥ ९ ॥
चळवळ केली दैत्यांच्या पोरांत । तयां शिकवित हरिभक्ती ॥ १० ॥
बाप माय यांचें कोणी न ऐकावें । हरीसीं भजावें रात्रंदिन ॥ ११ ॥
भलतेंच गुरु तुम्हां शिकविती । तेणें निरय-गति प्राप्त होय ॥ १२ ॥

नका ऐकूं तुम्हीं गुरुवच कांहीं । हरिला लवलाहीं सेवा म्हणे ॥ १३ ॥
जन्म मरणाचा होय परिहार । सांगतसे सार भजनाचें ॥ १४ ॥
विनायक म्हणे पोरें फितविलीं । भजना लाविलीं श्रीहरीच्या ॥ १५ ॥

( २२८ )

## बापाचा कोप

भयभीत द्विज सांगती दैत्यासीं । आपुल्या पुत्रासीं सांभाळावें ॥ १ ॥
पोरें फितविलीं भक्ति शिकविली । तेणें बहु मांडिली आळी असे ॥२॥
कळेना कीं आम्हां कैसा हा शिकतो । कैसा हा बोलतो ब्रह्मज्ञान॥३॥
बाळा लागीं मति एवढी कुठली । आमुची खुंटली मति जाणा ॥ ४ ॥
ऐकतांच दैत्य खवळला फार । म्हणे हा कुमार मृत्यु माझा ॥ ५ ॥
मरण तुझें आतां खास जवळि आलें । कैसें तुज भरलें पिसें ऐसें ॥६॥
कोठ तुझा देव मज कां तो भीतो । सांग कां लपतो, सांग आतां ॥७॥
किती तरी त्याचा शोध मी करितों । मुख न दावितो मजलागीं ॥८॥
कोठें आहे तुझा देव प्रगटवीं । मजला झुंजवीं त्याजपाशीं ॥ ९ ॥
देवासह तुज आज मी वधितों । तुज मी दावितों पराक्रम ॥ १० ॥
विनायक म्हणे क्रोधानें बोलत । थरथर कांपत तनु त्याची ॥ ११ ॥

( २२९ )

## हिरण्यकश्यपूचा वध.

आहे का, या स्तंभीं, ऐसें विचारित । शिशु तो बोलत सर्वां ठायीं॥१॥
अणुरेणुमाजी असे तो भरला । रिता ठाव भला नाहीं कोठें ॥ २ ॥
परम कोपा चढे लत्ता हाणी स्तंभीं । आवाज तो नभीं थोर होय ॥३॥
कडाडिला स्तंभ प्रगटे पद्मनाभ । कोटी-सूर्यप्रतिभ तेजें जो का ॥ ४ ॥
विकराळ मुख कराळ त्या दाढा । करकरां गाढा खात असे ॥ ५ ॥
देह तो नराचा वदन सिंहाचें । ऐसें रूप साचें प्रगटलें ॥ ६ ॥

भयभीत झालें सारें त्रिभुवन । मिटुनि लोचन जग राहे ॥ ७ ॥
पृथिवी कांपली बहु आंदोळली । तेजें म्लान झालीं तारकांचीं ॥ ८ ॥
सूर्य चंद्र म्लान होवोनि राहिले । भान विसरलें सर्व जग ॥ ९ ॥
नाद थोर झाला ब्रह्माण्डीं भरला । सकळ कांपला भूगोल हा ॥ १० ॥
घेत निजअंकीं तया दैत्यालागीं । नखें रोंवी अंगीं देव कोपें ॥ ११ ॥
संध्यासमयासीं दैत्य तो मारीला । भयानक भला अत्युन्मत्त ॥ १२ ॥
देव स्वर्गांतूनी पुष्पें वर्षताती । गंधर्व ते गाती मधुर स्वरें ॥ १३ ॥
अप्सरा नाचती किन्नर आलापिती । घेवोनी आरती देवी येती ॥१४॥
सकळही विश्व दर्शना पातलें । शरणागत झालें नरहरीला ॥ १५ ॥
सांवरेना कोप, न होय शांत, देव । परम कोपभाव, चढलासे ॥ १६ ॥
प्रल्हादासीं मग पुढें करिती देव । त्याविण त्यां वाव उरला नाहीं ॥१७॥
भक्तराज धरी चरण देवाचे । म्हणे काय वाचे बोलावें म्यां ॥ १८ ॥
स्तावितां प्रल्हाद शांत झाले देव । परम कृपाभाव त्याचेवरी ॥ १९ ॥
वरमाग, ऐसें तयास म्हणती । पितया सद्गति मागतसे ॥ २० ॥
विनायक म्हणे ऐसें हें आख्यान । यांत रस गहन भक्तीचाच ॥ २१ ॥

# वासुदेव-जयंती

# विषय.

| | |
|---|---|
| | प्रबंध. नं. |
| वासुदेवमयतेची अपूर्वता व आनंद | २३० |
| विनायक वासुदव ऐक्यभाव | २३१ |

शुक्रवार ता० १५।८।१९३०

( २३० )

# वासुदेवमयतेचीअपूर्वता व आनंद

वासुदेव नाम ध्यावें । तेथें मन रमवावें ॥ १ ॥
तेथें जे कां सुख पावे । कोणी तैसें तें वर्णावें ॥ २ ॥
अनुपम तो हरीख । अननुभूत पावे सुख ॥ ३ ॥
वासुदेवस्मरणानें । वासुदेव चिंतनानें ॥ ४ ॥
वासुदेवस्तवनानें । वासुदेवसंकीर्तनें ॥ ५ ॥
देहभाव विसरत । आनंदचि उद्भवत ॥ ६ ॥
आनंदासीं सीमा नाहीं । ऐसें होत लवलाहीं ॥ ७ ॥
समाधि-निर्भर होतसे । रंगीं रंगोनी जातसे ॥ ८ ॥
काय सांगूं रंग तेथ । प्रगटोनी येत समर्थ ॥ ९ ॥
त्याच आनंदांत दंग । होवोनी जातें अंतरंग ॥ १० ॥
सुखभरें डोलतसे । विश्रांतिला चाखितसे ॥ ११ ॥
परम हा आराम कीं । अनुपमता विलोकीं ॥ १२ ॥
बोलणेंच खुंटुनि जात । शब्द कांहीं न निघत ॥ १३ ॥
वर्णनाची सीमा होत । अवघा गुरु अवधूत ॥ १४ ॥
वासुदेवमय होणें । देहभाव विसरणें ॥ १५ ॥
ज्योत पहा हे पेटली । धगधगीत असे भली ॥ १६ ॥
प्रकाशाची अपूर्वता । कोण होईल वर्णिता ॥ १७ ॥
शीतल आहे उष्ण आहे । दोहीं परी भासताहे ॥ १८ ॥
तेजोरूप होवोनी गेलों । वासुदेवीं मिसळलों ॥ १९ ॥
वासुदेव वासुदेव । मज वासुदेव-भाव ॥ २० ॥
विनायका लावी छंद । स्वामी वासुदेवानंद ॥ २१ ॥

( २३१ )

## विनायक-वासुदेव ऐक्यभाव

वासुदेव वासुदेव । माझ्या देहींचा हा जीव ॥ १ ॥
अंतरात्मा माझा हाच । सद्गुरु माझा एक हाच ॥ २ ॥
हाच गुरु परमात्मा । हाच मज आनंदात्मा ॥ ३ ॥
हाच जीवींचें जीवन । हाच माझें सर्व जाण ॥ ४ ॥
माझी आस वासुदेव । भूक तहान वासुदेव ॥ ५ ॥
वासुदेव प्रिय मज । वासुदेव माझें निज ॥ ६ ॥
प्रियरूप वासुदेव । प्रिय हाच त्याचा भाव ॥ ७ ॥
वासुदेवीं मिसळलों । दुःख सर्व विसरलों ॥ ८ ॥
सुखमय असें झालों । किती सांगूं सुखावलों ॥ ९ ॥
विश्रांतीचा माझा भाव । स्वामी एक वासुदेव ॥ १० ॥
माझ्याठायीं संचरला । हृदयांत तो भरला ॥ ११ ॥
माझे वाचेनें स्फुरत । तेणें प्रत्ययासीं येत ॥ १२ ॥
वासुदेव माझें रूप । वासुदेव हा उमोप ॥ १३ ॥
आदि-अंत त्यासीं नाहीं । अनाद्यंत असे पाहीं ॥ १४ ॥
अनंत प्रभु वासुदेव । सकळ विश्व हें वैभव ॥ १५ ॥
सगुणाचा हा विस्तार । वासुदेव रूपें साचार ॥ १६ ॥
वासुदेवमय झालों । वासुदेवीं मी विरालों ॥ १७ ॥
कोठें शोधूं मी आपणां । कोठें करूं अन्वेषणा ॥ १८ ॥
सकळ तेजाचि भरलें । तेजोमय सकळ झालें ॥ १९ ॥
अग्निमाजी अग्नि जैसा । दीपामाजी दीप जैसा ॥ २० ॥
तेजामाजी तेज तैसें । मिसळोनी गेलें कैसें ॥ २१ ॥
आतां गवस पडेना । गेली द्वैताची भावना ॥ २२ ॥
विनायक वासुदेव । झाला असे ऐक्य भाव ॥२३ ॥

# कृष्णजयंती

# विषय.

प्रबंध. नं.

| | |
|---|---|
| कृष्णजन्म कथा | २३२ |
| कथा आरंभिण्यास आज्ञायाचना | २३३ |
| कंसाचे अत्याचार | २३४ |
| पृथ्वीची देवांस प्रार्थना | २३५ |
| देवांची विष्णूस प्रार्थना | २३६ |
| विष्णूचें आश्वासन | २३७ |
| वसुदेव-देवकी विवाह व आकाशवाणी | २३८ |
| भ्रूणहत्या | २३९ |
| देवकीगर्भांत भगवत्संचार | २४० |
| कृष्णजन्म | २४१ |
| गोकुळांत आगमन | २४२ |

# कृष्ण जयन्ती



( २३२ )

## कृष्ण जन्मकथा

मंगळवार ता. २७।८।२९

आज्ञा द्यावी मज, कथा आरंभाया । जन्मवृत्त गाया तुझें ईश ॥ १ ॥
श्रावणांत झाला तुझा अवतार । कृष्णनामें थोर जगतीं या ॥ २ ॥
कृष्णाष्टमी दिन मध्यान्ह रात्रीसीं । तुवां प्रगटतेसीं धरियेलें ॥ ३ ॥
उद्धराया संत तारावया जन । पृथ्वी सोडवण करावया ॥ ४ ॥
भाराक्रान्त भूमी शरण देवांसीं । जाती ब्रह्मयासीं ते शरण ॥ ५ ॥
देव आणि भूमी ब्रम्हया स्तविती । अभय मागती विनयानें ॥ ६ ॥
ब्रम्हदेव तेव्हां जाय क्षीरसागरा । जावोनि उद्धारा प्रार्थितसे ॥ ७ ॥
क्षीरसागरीं श्रीविष्णुशेषशायी । तयाचे तो पायीं शरण होत ॥ ८ ॥
व्यापनें तुजला श्रीविष्णु बोलती । रक्षण मागती तुझे पायीं ॥ ९ ॥
सर्वांचा तूं एक संरक्षिता देव । तुजपाशीं भाव सकळांचा ॥ १० ॥
सकळ व्यापोनी नित्य तूं रहासी । म्हणती तुजसीं नारायण ॥ ११ ॥
जलामाजि तुवां कल्पियेलें शयन । हृदय व्यापोन जगताचें ॥ १२ ॥
दैत्यथोर जगीं माजले असती । उन्मत्त वागती पापवृत्ती ॥ १३ ॥
पापात्मे ते थोर तयां थोर बळ । किती खळबळ उडालीसे ॥ १४ ॥
भूमी देवराया जाई रसातळीं । दैत्य आतुर्बळी भार थोर ॥ १५ ॥
पापाचे ते राशी अधर्माच्या मूर्ती । संहार करिती गाईंचा ते ॥ १६ ॥

गाईब्राह्मणांसीं थोर पीडा देती । साधु कष्टविती अधर्मानें ॥ १७ ॥
मारहाण तयां विध्वंस करिती । द्विजांतें पळविती रानोरानीं ॥ १८ ॥
त्यांच्या धाकीं द्विज दडोनि बैसले । सकळ राहिलें यज्ञतप ॥ १९ ॥
हाहाःकार थोर पृथ्वीवरी झाला । हंबरडा भला फोडिती गाई ॥ २० ॥
एकसरें गाई ब्राह्मण मारिती । देवांसी घालिती बंदीमाजी ॥ २१ ॥
स्वर्ग मृत्यु आणि नागलोकांसींही। पादाक्रांत पाहीं त्याहीं केलें॥ २२ ॥
गेला गेला धर्म लोपला समुळीं । कली झाला बळी दैत्य बळें ॥ २३ ॥
जागा होईं आतां देवा आम्हांसाठीं । कोण जगजेठी संरक्षील ॥ २४॥
दीन देव आले तुजला शरण । तयांचें रक्षण कोण करी ॥ २५ ॥
येईं गाईसाठीं ब्राह्मणाचेसाठीं । देवांचीयेसाठीं विधि सांगे ॥ २६ ॥
प्रगट होंइ आतां हृदयस्थ देवा । निरोप ऐकवा आम्हांलागीं ॥ २७ ॥
तयां निरोप देत स्वयें भगवान । विवेक धरून वाट पहा ॥ २८ ॥
अशरीरिणी वाणी सहसा उद्भवली । तेव्हां स्पष्ट भली भिऊं नका ॥२९॥
वसुदेवापोटीं घेतों अवतार । तुम्हीं यादव वीर देव व्हावें ॥ ३० ॥
यदुवंशीं तुम्हीं आतां जन्मा यावें । मज साह्य व्हावें दैत्यनाशीं ॥ ३१ ॥
सहस्रमुखी माझा अनंत बळराम । रोहिणीचा परम गर्भ होई ॥ ३२ ॥
घेवोनि लक्ष्मी येतों लवकरी । स्वस्थ व्हा अंतरीं वाणी सांगे ॥ ३३ ॥
घेणें आहे मज अवतार जगीं । भाव अंतरंगीं दृढ धरा ॥ ३४ ॥
त्यांनीं यादवांत जन्मासीं घेतलें । अक्रूरादि झाले सुरवर ॥ ३५ ॥
सकळ सिद्धता होतां देवकाजीं । मथुरेच्यामाजी लग्न होई ॥ ३६ ॥
उग्रसेन कन्या कंसाची बहिण । महाथोर लग्न मथुरेसीं ॥ ३७ ॥
विवाह होय तेथें समारंभ झाला । कंसानें घेतला पुढाकार ॥ ३८ ॥
बहिणीचें लग्न भावास आनंद । परम सुखद मानीतसे ॥ ३९ ॥
वऱ्हाड तें झालें करी बोळवण । रथांत आपण कंस बैसे ॥ ४० ॥
देवकी वसुदेव रम्य वधुवरें । रथांत सत्वरें बैसवीत ॥ ४१ ॥
स्वयें रथ हांकी प्रेमानें बहुत । आकाश गर्जत तव मृत्यु ॥ ४२ ॥
झाली आकाशवाणी कंस जागा होई। आठवा गर्भ घेई तुझा जीव॥४३॥
अष्टम गर्भ हीचा करिल रे अंत । ऐकतां हें वृत्त खळबळे ॥ ४४ ॥
घेई शस्त्र हातीं तोडायासीं मान । वसुदेव नमन करी त्यासीं ॥ ४५ ॥

मग समेट करी वसुदेव त्यासीं । हीचीये गर्भासीं देईन मीं ॥ ४६ ॥
तंव प्रथम गर्भ देवकीचा भला । देत त्या दुष्टाला वसुदेव ॥ ४७ ॥
तंव दया आली तया राक्षसासीं । वैर अष्टमासीं भले माझें ॥ ४८ ॥
सुत परत केला तंव नारदानें । आपुल्या वचनें उपदेशीला ॥ ४९ ॥
कोणता आठवा काय याप्रमाण । देवां सत्यपण काय असे ॥ ५० ॥
मानलें तें नीचा गर्भ आपटीला । शिळेवरि भला मत्तानें त्या ॥ ५१ ॥
थरारलें जग पाहतां घोर कृत्य । निर्दया अकृत्य काय जगीं ॥ ५२ ॥
पिता बंदीमाजी दृढ तो ठेविला । दुष्टांसवें केला मंत्र जगीं ॥ ५३ ॥
उपद्रवा तुम्हीं साधुसंत द्विज । त्यागा आतां लाज अंतरींची ॥ ५४ ॥
जेथें जेथें तुम्हां यज्ञ आढळती । विध्वंस त्वरिती करा त्यांचा ॥ ५५ ॥
भंगा देवालयें मोडा यज्ञशाळा । ब्राह्मण आफळा शिळेवरी ॥ ५६ ॥
ब्राह्मणांचें बळ दुभत्या गाईंना । तयांसीं वधोनी टाका आधीं ॥ ५७ ॥
गाईब्राह्मणांचा करा तुम्हीं नाश । धर्म लवलेश नुरो भला ॥ ५८ ॥
ऐसा मंत्र झाला खळ समाजांत । दुर्वृत्त वर्तत तेव्हां खळ ॥ ५९ ॥
निगडित केलीं वसुदेव देवकी । हाहाःकार लोकीं थोर झाला ॥ ६० ॥
सहा गर्भ ऐसे मारिले दुष्टानें । नृशंस मनानें पापीयानें ॥ ६१ ॥
तेव्हां अनंतासीं म्हणती अनंत । देवकी गर्भांत प्रवेशावें ॥ ६२ ॥
सात महिन्यांचा गर्भ तो वाढतां । मायेसीं तत्वतां आज्ञापिलें ॥ ६३ ॥
वसुदेवजाया रोहिणी गोकुळीं । तिचे उदरीं बळीं गर्भ ने तो ॥ ६४ ॥
नासावला गर्भ मात बोभाटली । गर्भिणी जाहली रोहिणी ती ॥ ६५ ॥
अपवाद हातां बोले देववाणी । वसुदेवाचा झणीं गर्भ जाणा ॥ ६६ ॥
आटव्याचा आला समय जेधवां । प्रसन्न तेधवां जगत्रय ॥ ६७ ॥
वसुदेव मनीं प्रवेशला देव । मग आविर्भाव गर्भीं होई ॥ ६८ ॥
वाढला तो गर्भ तेज प्रगटलें । कंसमन भ्यालें आनिवार ॥ ६९ ॥
थरथरां कांपे, अंतक म्हणे आला । मज मारायाला माझा वैरी ॥ ७० ॥
अशनीं शयनीं पानांत भोजनीं । संशय तन्मनीं प्रवेशला ॥ ७१ ॥
संशयग्रस्त मन ओढवला नाश । येत जगदीश गर्भामध्यें ॥ ७२ ॥
नवमास होतां प्रगटलें बाळ । परम वेल्हाळ पांच वर्षी ॥ ७३ ॥
तेव्हां दोघें स्तोत्रें करिती देवाचीं । भिती मानसींची सांगताती ॥ ७४ ॥
मागिल जन्माची स्मृति तयां देत । गुज त्यां सांगत स्वयें देव ॥ ७५ ॥

मग बाळ झालें देवकीचे पुढें । यश जाण गाढें भक्तीचें हें ॥ ७६ ॥
उचलीत बाळ घेऊनि निघत । रक्षक घोरत पडीयेले ॥ ७७ ॥
तुटल्या त्या बिड्या अंधःकार होय । तशांतून जाय वसुदेव ॥ ७८ ॥
वर्षे थोर मेघ गर्जत आकाशीं । विजेच्या प्रकाशीं जात असे ॥ ७९ ॥
अथांग भरली असे ती यमुना । मार्गातें देईना चिंता झाली ॥ ८० ॥
मग कृष्णदेवें पायीं स्पर्शियेलें । दुभंग तें झालें जळ तात्काळ ॥ ८१ ॥
शेष करी फणा कृष्णजीचे शिरीं । तयानें निवारी पर्जन्यातें ॥ ८२ ॥
गोकुळांत सारे गवळी झोंपले । द्वार उघडिलें नंदजीचें ॥ ८३ ॥
सूतिकागृहांत यशोदा निजली । तीस कन्या झाली नकळत ॥ ८४ ॥
उचलिली कन्या ठेविला तो बाळ । तेथोनी तात्काळ निघाला तो ॥ ८५ ॥
पुन्हां बंदिवास पुन्हां बिड्या पायीं । दुःखित हृदयीं थोर झाला ॥ ८६ ॥
कन्या बोभाटली दैत्य जागे झाले । वृत्त कळविलें राक्षसासीं ॥ ८७ ॥
धांवतची आला काळांतक यम । उन्मत्त परम पापी दुष्ट ॥ ८८ ॥
वांचवी कन्येला बोलत देवकी । पुत्र हा विलोकीं नोहे जाण ॥ ८९ ॥
डर मना नाहीं घेत हिसकावूनी । शिळेसीं आपटोनी मारायाला ॥ ९० ॥
आपटितां कन्या वरचेवर गेली । तयासीं बोलिली घोर वाचा ॥ ९१ ॥
तुझा वैरी मूर्खा जन्मा आला असे । समज तूं खासें मारिल तुज ॥ ९२ ॥
इकडे यशोदा जंव जागी झाली । सुतमूख भली पाहतसे ॥ ९३ ॥
आनंदीआनंद गोकुळीं जाहला । नंदतनयाला पाहोनियां ॥ ९४ ॥
जातकर्म आणि उत्सवा करिती । सकळांस प्रीति बाळकाची ॥ ९५ ॥
भगवान आले स्वयें अवतरोनी । सकळांच्या मनीं महानंद ॥ ९६ ॥
विनायक म्हणे उल्हासलें मन । करावें कीर्तन कृष्णजीचें ॥ ९७ ॥

( २३३ )

# कथा आरंभिण्यास आज्ञायाचना

रविवार ता. १७।८।१९३०

चरित्र तुझें गाया आज्ञा मज देईं । सन्मुख तूं होईं गुरुनाथा ॥ १ ॥
चरण वंदणें हृदयीं धरोनी । तुजला सेवोनी दत्तात्रेया ॥ २ ॥

अवतारकथा वर्णाया कारण । स्थिर अंतःकरण करोनियां ॥ ३ ॥
आज्ञा मी मागतों तुझे चरणांपाशीं । सादर सेवेसीं होवोनियां ॥ ४ ॥
मजसीं आवड यशकीर्तनाची । पूर्ण करीं साची दत्तनाथा ॥ ५ ॥
आम्हांसाठीं स्थान तुवां हें निर्मिलें । भजन लाविलें करायासीं ॥ ६ ॥
भजन पूजन माझें नित्य करा । नामासी उच्चारा थोर भावें ॥ ७ ॥
ऐसा तुझा आम्हां निरोप प्रेमाचा । आचरणें साचा गुरुनाथा ॥ ८ ॥
जे जे अवतार पुराणीं वर्णिले । उत्सव ते केले पाहिजेत ॥ ९ ॥
भागवत धर्म ऐसा सांगितला । तोच चालविला पाहिजे कीं ॥ १० ॥
म्हणोनियां देईं आज्ञा आरंभाया । कीर्तन कराया तुझें दत्ता ॥ ११ ॥
आवडीनें गाऊं प्रेमभरें ध्याऊं । समरस होऊं कीर्तनांत ॥ १२ ॥
ऐसें करा नाथा द्यावा आशीर्वाद । व्हावें जी वरद मजलागीं ॥ १३ ॥
विनायक म्हणे पुरवा हा छंद । वासुदेवानंद गुरुनाथा ॥ १४ ॥

( २३४ )

# कंसाचे अत्याचार.

माथुर शूरसेन यांचें अधिराज्य । उग्रसेन राज्य करीतसे ॥ १ ॥
तयाचा तनय महासुर कंस । करित जगास त्रस्त जाणा ॥ २ ॥
उन्मत्त तो बळी त्यांत वरबळ । मातला तो खळ अनिवार ॥ ३ ॥
दैत्य जमविले आपुल्या भोंवतीं । मुष्टिक चाणूरांप्रति कंसराजें ॥ ४ ॥
महा बलाढ्य दैत्य, सदा अपराजित । स्वर्गठाव घेत देवांचे कीं ॥ ५ ॥
स्वर्गभ्रष्ट केले त्यानीं सुरवर । त्रासविली थोर पृथिवी कीं ॥ ६ ॥
वैष्णवांचा छळ तयांनीं मांडीला । हाहाःकार झाला जगतीं या ॥ ७ ॥
सनातन धर्म बुडवाया झटती । पाखंड प्रस्थापिती दैत्यराज ॥ ८ ॥
वेदमार्ग सर्व तयीं अडविला । अनर्थ तो झाला महीवर ॥ ९ ॥
सकळ पृथ्वीमाजी पाखंड विजय । तेणें त्रस्त होय धरा सारी ॥ १० ॥
विनायक म्हणे पुढील चमत्कार । विनोद साचार जाहलासे ॥ ११ ॥

## ( २३५ )

# पृथ्वीची देवांस प्रार्थना.

असुर त्रासें त्रस्त धरा विधिपाशीं । घेवोनी सुरांसीं जात असे ॥ १ ॥
दैत्य वृत्त कथी वहुत आक्रन्दे । स्फुदोनियां रडे विधिपाशीं ॥ २ ॥
दया आली मग विधि काय करी । तयांसीं साचारीं कैलासीं ने ॥ ३ ॥
शंकरासीं वृत्त कथी ब्रह्मा आपण । म्हणत रक्षण करा आतां ॥ ४ ॥
धूर्जटिसीं कोप अत्यंत पातला । म्हणे आतां चला विष्णूपाशीं ॥ ५ ॥
क्षीर सागरींचा जो शेषशयन । तया वर्तमान कळविति ॥ ६ ॥
विनायक म्हणे नारायणापाशीं । सकळ शीघ्रेंसीं पातले ते ॥ ७ ॥

## ( २३६ )

# देवाची विष्णूस प्रार्थना.

सकळांनीं स्तुति तेव्हां आरंभिली । दया येवो भली आमुची कीं ॥ १ ॥
सनातन धर्म दैत्यें बुडवीला । अनर्थ जाहला धरित्रीसीं ॥ २ ॥
गाईची कत्तल ब्राम्हणांचा छळ । करिती प्रबळ दैत्येश्वर ॥ ३ ॥
वेदमार्ग नाम-शेष त्यांहीं केला । धर्म बुडविला पायांतळीं ॥ ४ ॥
पाखंडाचा केला त्यानीं पुरस्कार । साधु-तिरस्कार करिताती ॥ ५ ॥
वैष्णव धर्म सारा नष्ट प्राय झाला । आतां प्रबुद्धतेला धरा नाथा ॥ ६ ॥
रसातळासींही पृथिवी चालली । पाहिजे सोडविली भगवंता ॥ ७ ॥
तैसेंच करी आतां अवतार घेई । धांवोनियां येई तारावया ॥ ८ ॥
विनायक म्हणे जागे झाले हरी । वाणी अशरीरी उद्भवली ॥ ९ ॥

(२३७)

## विष्णूचें आश्वासन.

वसुदेवाचा मीं तनय होवोनी । गोकुळीं प्रगटोनी येतों आतां ॥ १ ॥
तुम्हीं सकळ सुर व्हावें गोपवर । तैसें यादववीर व्हावें तुम्हीं ॥ २ ॥
तुम्हीं व्हावें गाई पशुपक्षी व्हावें । साहायार्थ यावें माझिया कीं ॥ ३ ॥
घेवोनी अवतार मारितों कंसाला । ऐशीया वाणीला प्रगटवी ॥ ४ ॥
शेष होईल तो माझा वडिल भाऊ । दोघे आम्हीं येऊं रक्षणार्थ ॥ ५ ॥
येईल लक्षुमी येतील आयुधें । चरित्र अगाधें करूं आम्हीं ॥ ६ ॥
भिऊं नका, सुर, मारितों दैत्यांसीं । माझ्या वचनासीं निर्धारावें ॥ ७ ॥
ऐशी विष्णुवाणी तेव्हां प्रगटली । सकळ आनंदली भुवनें कीं ॥ ८ ॥
विनायक म्हणे तोच अवतार । गावूं हो साचार आजदिनीं ॥ ९ ॥

(२३८)

## वसुदेव-देवकी विवाह व आकाशवाणी.

वऱ्हाड मांडियेलें थोर वसुदेवाचें । आणि देवकीचें मथुरेंत ॥ १ ॥
कंसाची बाहिण बहु प्रिय त्यासीं । करी आनंदेसीं समारंभ ॥ २ ॥
बोळवण करी रथांत घालोनी । आपण होवोनी साराथि तो ॥ ३ ॥
कलि माजावया देवांनीं उपाय । रचिला अपाय ऐका कैसा ॥ ४ ॥
अशरीरिणी वाणी तेव्हां उद्भवली । आनंदाचे काळीं अंतरिक्षीं ॥ ५ ॥
कैसा निजलासी कंसा दैत्येश्वरा । परम चतुरा बलवन्ता ॥ ६ ॥
जया भगिनीसीं प्रेमें बोळविसी । तिच्या भविष्यासी न जाणसी ॥ ७ ॥
अष्टम गर्भ इचा करिल तुझा घात । परम कृतांत निपजेल ॥ ८ ॥
ऐकतांच वाणी दैत्य खवळला । आसि काढी भला म्यानांतूनीं ॥ ९ ॥
सिद्ध झाला वसुदेवें प्रार्थियेला । समय त्यास केला समजाया ॥ १० ॥
इचा आठवा गर्भ देइन तुजला । सोड भगिनीला धर्म करी ॥ ११ ॥

इच्या पासोनियां तुज मृत्यु नाहीं । वधीसीं कां पाही भगिनीस ॥ १२ ॥
तेव्हां कंसा आला विचार मनांत । खड्ग आवरित आपुलें तो ॥ १३ ॥
परम त्रस्त झाला राज्यांत पातला । करी दवंडीला राज्यामाजी ॥ १४ ॥
जेथें जेथें साधु विप्र आणि गाई । कृतांत मी होईं तेथें तेथें ॥ १५ ॥
आजपासोनियां कंस वैरि त्यांचा । करावा कीं साचा घात जाणा ॥ १६ ॥
सकळ दैत्यांसीं सांगे बोलावोनि । गोब्राम्हण हननीं सिद्ध व्हावें ॥ १७ ॥
वेद बुडवावे पाखंड स्थापावें । अधर्माचें करावें अभ्युत्थान ॥ १८ ॥
त्यांत नारदमुनि येवोनि सांगती । तया कंसाप्रति हित त्याचें ॥ १९ ॥
आठवा म्हणिजे गणना कोठोनी । विचार तूं मनीं केला नाहीं ॥ २० ॥
समजला कंस म्हणे घात झाला । कैसें आठव्याला ओळखावें ॥ २१ ॥
देवकी वसुदेव परतोनि आणिली । दम्पती ठेविली कारागृहीं ॥ २२ ॥
विनायक म्हणे अधर्माचा ध्वज । उभारला माज येवोनियां ॥ २३ ॥

( २३९ )

## भ्रूणहत्या.

गर्भिणी राहिली देवकी कारागृहीं । कंस तो संदेहीं पडला कीं ॥ १ ॥
बिड्या ठोकी त्यांसीं ठेविला पाहारा । स्वस्थता अंतरा कैंची त्यासी ॥ २ ॥
प्रथम पुत्र झाला वसुदेवालागीं । अर्पी कंसालागीं सत्य शब्द ॥ ३ ॥
क्रूर अधर्मी तो चाण्डाल मनाचा । तया भ्रूणहत्येचा वीट नाहीं ॥ ४ ॥
अर्भक आपटीलें दुष्टें शिळेवरी । दया न अंतरीं त्याच्या मुळीं ॥ ५ ॥
धरा हे खचली पाहोनी कृत्य नीच । सैतानानें नाच आरंभिला ॥ ६ ॥
सज्जनांसीं दुःख दुर्जनां आनंद । देत तो दुर्मद नीच कंस ॥ ७ ॥
ऐसे सहा गर्भ मारिले दैत्यानें । थोर निष्ठुरपणें जाणावें कीं ॥ ८ ॥
विनायक म्हणे पुढील आख्यान । ऐका चित्त देऊन भाविक हो ॥ ९ ॥

(२४०)

# देवकी गर्भांत भगवत्संचार.

शेषासीं म्हणती स्वयें भगवान । पुढें त्वां जाऊन प्रकाशावें ॥ १ ॥
सातवा तो गर्भ अत्यंत तेजस्वी । प्रगटे मनस्वी अनंत जो ॥ २ ॥
तेज तें वाढलें कंस भयभीत । दक्षता ठेवित अत्यंत तो ॥ ३ ॥
सात मास होतां आज्ञापिली माया । गर्भांतें न्यावया माधवानें ॥ ४ ॥
वसुदेव जाया रोहिणी गोकुळीं । तेथें गर्भ बळी ठेवी माये ॥ ५ ॥
मायेनें तो गर्भ रोहिणीचे पोटीं । ठेवितां हाकाटी थोर झाली ॥ ६ ॥
गर्भवती कैशी रोहिणी जाहली । मात बोभाटली थोर तेव्हां ॥ ७ ॥
पुन्हां देववाणी सांगत सर्वांसीं । वसुदेव वीर्यासीं धरितसे ॥ ८ ॥
तिज नाहीं दोष निर्दोष हे सती । रोहिणी निश्चिती वाणी झाली ॥ ९ ॥
आपुलिया भेणें गर्भ नष्ट झाला । ह्याच आनंदाला कंस धरी ॥ १० ॥
मज भेणें पळाला गर्भ तो लोपला । आनंद कंसाला हाच झाला ॥ ११ ॥
किंचित्काळ जातां वसुदेव मनीं । येत संचरोनी रमाधव ॥ १२ ॥
वैष्णव धाम जे कां पूर्ण परब्रह्म । जो कां पूर्ण काम जगत्प्रभु ॥ १३ ॥
वसुदेव मनीं प्रवेशला देव । नारायण भाव झाला त्यासीं ॥ १४ ॥
अवघा नारायण वसुदेव झाला । समाधि सुख भला अनुभवी ॥ १५ ॥
नाहीं कंसभय नाहीं सुख दुःख । सकळ हरिख वसुदेव ॥ १६ ॥
नाहीं द्वंद्व भय तयासि उरलें । द्वैत मावळलें मुळींहुनी ॥ १७ ॥
ऐसा तदाकार बने वसुदेव । होतां भगवत्भाव प्राप्त त्यासीं ॥ १८ ॥
तेथोनियां मग देवकी गर्भांत । हरि प्रवेशत पूर्णपणें ॥ १९ ॥
परंधाम जेव्हां संचरोनी आलें । रूप पालटलें देवकीचें ॥ २० ॥
विलक्षण तेज विलक्षण प्रभा । दिसत प्रतिभा गर्भाची ती ॥ २१ ॥
कंस घाबरला चिंतातुर झाला । घेईना निद्रेला जागा सदा ॥ २२ ॥
कडेकोट केला तेव्हां बंदोबस्त । ठेवीयले मस्त दैत्य द्वारीं ॥ २३ ॥
कडक पाहारा बैसवीत कंस । देतसे सायास दंपतीला ॥ २४ ॥
विनायक म्हणे झाला चमत्कार । ऐकावा साचार सावधानें ॥ २५ ॥

( २४१ )

# कृष्णजन्म.

वसुदेवें तेव्हां गर्भ तो नमिला । बहुत जो भ्याला कंसराया ॥ १ ॥
निष्ठुर तो कंस करिल याचा घात । म्हणूनी विव्हळत वसुदेव ॥ २ ॥
तंव देवकी बोले माझें शस्त्र आण । कंसाचें हनन करितें मी ॥ ३ ॥
मजपुढें काय कंस हा मशक । होतें मी छेदक तयाची कीं ॥ ४ ॥
तंव अधिकचि वसुदेव घाबरे । तदंग थरारे कंसभयें ॥ ५ ॥
म्हणे हळू बोलें देवकीचा पति । तंव तो रमापति खवळला ॥ ६ ॥
कैंचा कंस कैचें भय त्याचें सांग । आतां मी अभग मारीतसें ॥ ७ ॥
म्हणे वसुदेव देवकी भ्रमली । शिरीं पाणी घाली शांतवाया ॥ ८ ॥
भय त्याचें कांहीं झाल्याहि जाईना । मग दयाघना दया येत ॥ ९ ॥
पांच वरुषाचें बाळ प्रगटलें । सौंदर्याचें भलें सार जैसें ॥ १० ॥
सजला घनःश्याम रूप अनुपम । धरी पूर्ण काम रमारंग ॥ ११ ॥
नेसला पीतांबर वनमाळा कंठीं । महानुभाव दिठीं प्रगटला ॥ १२ ॥
शंख चक्र गदा पद्म असे हातीं । ऐसा हा श्रीपति प्रगटला ॥ १३ ॥
मधुर हांसणें मधुर पहाणें । मधुर बोलणें त्याचें असे ॥ १४ ॥
ऐसा देव जेव्हां प्रगटोनी बोले । आण शस्त्र भलें माझ्या हातीं ॥ १५ ॥
कंसातें माराया आलों भगवान । स्वयें प्रगटोन बोले ऐसें ॥ १६ ॥
वसुदेवें मग धरिले चरण । देवासीं शरण जाहलासे ॥ १७ ॥
माझे पुत्र व्हावे ऐशी माझी आशा । तरी जगदीशा पूर्ण करीं ॥ १८ ॥
लहान होवोनी लौकिक आचर । अर्भक साचार बन देवा ॥ १९ ॥
परी कंसभयें असें भयभीत । म्हणोनि त्वरित उपाय करीं ॥ २० ॥
जरी कंसालागीं भीसी वसुदेवा । सांगतों त्या भावा आदरावें ॥ २१ ॥
घेवोनियां मज गोकुळासीं जावें । यशोदेस द्यावें मजलागीं ॥ २२ ॥
तेथें माझी माया असे जे जन्मली । घेवोनीयां भली आण येथें ॥ २३ ॥
माझीया कृपेनें निर्विघ्न घडेल । सकळ होईल कार्य सुखें ॥ २४ ॥
अदृश्य होवोनी मग तो मुरारी । मातृगर्भी करी प्रवेशातें ॥ २५ ॥

दिशा प्रसादल्या प्रसन्न वायु झाले । प्रसन्न तें भलें जगत्रय ॥ २६ ॥
समय मध्यान्हीचा मास श्रावणाचा । कृष्णपक्ष साचा जो कां असे२७
वर्षाऋतुघन वर्षत अपार । घेत अवतार तेव्हां प्रभु ॥ २८ ॥
श्रीहरी जन्मा आले विश्व आनंदलें। वसुदेवें केलें स्तोत्र तेव्हां ॥२९॥
स्वर्गामाजी सुर देवासी स्तविती । आनंदित मति बहु झाली ॥ ३० ॥
स्मरोनियां वाक्य मग भगवंताचें । काय करी साचें वसुदेव ॥ ३१ ॥
उचलोनी बाळ घेत स्कंधावरी । चालला झडकरीं वसुदेव ॥ ३२ ॥
विजा चमकती मार्ग त्या दाविती । जैसा जात पंथीं वसुदेव ॥ ३३ ॥
अथांग भरली यमुना तेवेळीं । स्पर्शाया वनमाळी तेव्हां पाहीं ॥ ३४ ॥
निर्भय वसुदेव उतरे नदींत । यमुना चढत पदस्पर्शा ॥ ३५ ॥
जाणोनी यमुना-हृद्गत श्रीहरी । पदस्पर्श करी तिचे ठायीं ॥ ३६ ॥
स्पर्श होतांचि ते दुभंग जाहली । वाट देत भली वसुदेवा ॥ ३७ ॥
गोकुळीं प्रगटला नंद मंदिरांत । यशोदा निद्रिस्थ पलंगावरी ॥ ३८ ॥
प्रसवली कन्या तिज ठावी नाहीं । उघडींच पाहीं द्वारें होती ॥ ३९ ॥
निर्भय प्रवेशे ठेवी तेथें हरी । घेवोनी सत्वरीं माया चाले ॥ ४० ॥
घेवोनियां आला आला कारागृहीं । तंव बिड्या देहीं जखडल्या॥ ४१ ॥
देवकीचेपाशीं कन्या ती ठेवितां । करित आकांता रडोनियां ॥ ४२ ॥
जागे झाले तेव्हां सर्व पहारेकरी । जातात सत्वरीं कंसाकडे ॥ ४३ ॥
कंसालागीं मात दुःखद सांगती । देवकी-प्रसूती दैत्य जाणा ॥ ४४ ॥
मदोन्मत्त कंस धांवत पातला । उचली कन्येला आपटाया ॥ ४५ ॥
पदर पसरिला देवकीनें त्यासीं । विनवी तयासीं नम्रपणें ॥ ४६ ॥
तया पाषाणासीं मुळीं दया नाहीं । सिद्ध आपटायासीं अधम तो ॥४७
आपटाया जाई तंव ती वरचेवरी । गेलीच निर्धारीं सांगे मग ॥ ४८ ॥
मूर्खा तुझा शत्रू जगीं जन्मलासे । मृत्यु भय कैसें चुकणार ॥ ४९ ॥
सकळांसीं मृत्युकाळ न चुके कोणा । कैसें अंतःकरणा कळेनाच ॥५०॥
अदृश्य जाहली प्रभुजीची माया । धडकी हृदयाला कंसाचीया ॥५१॥
विनाशकाल त्याचा जवळि पातला । धरी दुर्बुद्धिला हतभागी ॥ ५२ ॥
विनायक म्हणे कलीचें आख्यान । ऐका सावधान बोधासाठीं ॥ ५३ ॥

(२४२)

# गोकुळांत आगमन.

गोकुळांत आले प्रगटोनी देव । स्वामी रमाधव विश्वपती ॥ १ ॥
गोकुळीं आनंद स्वर्गांत आनंद । सकळ आनंद होत तेव्हां ॥ २ ॥
सकळ ऋषिनीं देवा स्तवियेलें । स्तुतिस्तोत्र केलें सुरवरीं ॥ ३ ॥
देवकार्यासाठीं जगन्नाथ आले । महीसीं पातले नररूपें ॥ ४ ॥
योग्य काळीं दैत्य, देवें, निवटीला । भूभार हरला जगताचा ॥ ५ ॥
धर्म संस्थापना करोनी जगतीं । अधर्मा उच्छेदिती भगवान ॥ ६ ॥
तोच पुण्य दिन आज कीं पातला । पाहिजे स्मरला मनोभावें ॥ ७ ॥
विनायक म्हणे आख्यान गोपाळाचें । वदवीलें साचें काय बोलूं ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....२८८०५.... वि: वा. शा.
क्रमांक ....२६८०.... नों: दि: १४।८।८६

# वराह जयंती

# विषय

| | |
|---|---|
| | प्रबंध नं० |
| वराहावतार-हिरण्याक्षवध | २४३ |

# वराह जयन्ती

## (२४३)

## वराहावतार–हिरण्याक्षवध

गुरुवार ता० ५।९।१९२९

वराहरूपें प्रगटला । उद्धरीता होय भला ॥ १ ॥
त्याचें यश चिंतितों मी । रूप त्याचें हृदयधामीं ॥ २ ॥
कूर्मदृष्टीनें पाहिलें । विष्णुराज-देवें वहिलें ॥ ३ ॥
अद्भुतरूप धरीयेलें । वराहरूपें प्रगटलें ॥ ४ ॥
उद्धार केला पृथ्वीचा । यशवानी काय वाचा ॥ ५ ॥
क्रोडरूपी जनार्दन । तया करितों नमन ॥ ६ ॥
जयन्तीचा दिन आज । प्रगटलें दिव्य तेज ॥ ७ ॥
आदिवराहाचा झाला । अवतार महा भला ॥ ८ ॥
तोच पुण्य दिन आज । विष्णु आले भक्त-काज ॥ ९ ॥
हिरण्याक्षा मारियेलें । वराहाचें चरित्र भलें ॥ १० ॥
अपत्य-कांक्षिणी दिती । प्रार्थितसे निजपती ॥ ११ ॥
कामातुर सती नारी । पतिचा ती पदर धरी ॥ १२ ॥
संध्यावेळा घोरा अती । होम देत तीचा पति ॥ १३ ॥
होमशाळेमाजी जाई । भोग म्हणे मज देई ॥ १४ ॥
निवारित तिचा पति । पति न ऐके महासती ॥ १५ ॥
परोपरी कश्यपानें । उपदेशीलें बोधवचनें ॥ १६ ॥
घोर वेळा ही वर्तत । परि ती दिती न ऐकत ॥ १७ ॥
भोग देतां सती नारी । पतिचे पाय मग धरी ॥ १८ ॥

गर्भ लक्षणातें सांगा । व्यर्थ केला म्हणे त्रागा ॥ १९ ॥
पश्चात्ताप मज झाला । अपराध थोर घडला ॥ २० ॥
क्षमा करा म्हणे मज । प्रार्थितें मी अपत्यकाज ॥ २१ ॥
लक्षण सांगा अपत्याचें । मजलागीं आतां साचें ॥ २२ ॥
कश्यप तिज सांगताती । दुष्ट पुत्र होय निश्चिती ॥ २३ ॥
दैत्य तुझ्या पोटीं येती । त्रिभुवनें उपद्रविती ॥ २४ ॥
घाबरली दिती माता । कृपा करा भगवंता ॥ २५ ॥
दिनवाणी परिसोनी । सांगताती तीस मुनि ॥ २६ ॥
भगवान अवतरे । पुत्रासाठीं जाणीं खरें ॥ २७ ॥
त्याचे हातीं मृत्यु असे । निश्चय वाचा सांगतसे ॥ २८ ॥
तेव्हां दिती शांत झाली । दोन पुत्र प्रसवली ॥ २९ ॥
हिरण्याक्ष हिरण्यकशिपु । पुत्र दोघे विश्वरिपु ॥ ३० ॥
ब्रह्मवरें मत्त झाला । हिरण्याक्ष जाणा भला ॥ ३१ ॥
जिंकितसे त्रिभुवन । झुंजार म्हणे मज कोण ॥ ३२ ॥
कोपला तो दैत्यराज । शोधी देव युद्धकाज ॥ ३३ ॥
रसातळीं जातां त्यासीं । भेट होई वराहासीं ॥ ३४ ॥
घन-घोर युद्ध झालें । हिरण्याक्षापाशीं भलें ॥ ३५ ॥
मुहूर्त होता अभिजीत । ब्रह्मदेव विनवीत ॥ ३६ ॥
समय हा मारण्याचा । योग्य असे देवा साचा ॥ ३७ ॥
मग दैत्य मारियेला । आदि वराहानें भला ॥ ३८ ॥
चरित्र ऐसें वराहाचें । वानील कोण जाणा वाचे ॥ ३९ ॥
विनायक पद नमी । म्हणे कृपा करा स्वामी ॥ ४० ॥

# वामन जयंती

# विषय


| | प्रबंध नं० |
|---|---|
| ज्ञानादेव तु कैवल्यम् | २४४ |
| हृदिस्थ वामन ( आध्यात्मिक ) | २४५ |
| वामनदर्शनानें बुद्धिमोचन | २४६ |
| वामन बुद्धिप्रवेश व उपनिषद् भाव | २४७ |

( २४४ )

## ज्ञानादेव तु कैवल्यम्

गुरुवार ता. ४।९।१९३०

ज्ञानाविण मुक्ति नसे लभ्य जाणा । श्रीगुरुचरणां आश्रयावें ॥ १ ॥
कर्माचियायोगें चित्तशुद्धी होत । ज्ञानायोग्य होत चित्त जाणा ॥२॥
हिरण्यगर्भाची करितां उपासना । सामर्थ्य ये मना अनिवार ॥ ३ ॥
वाणीमाजी सिद्धी सर्व प्राप्त होती। ज्ञान त्वरित गति साध्य होई ॥४॥
नोहे नोहे नोहे मोक्ष तो कर्मानें । हें त्रिविक्रमानें दावीयेलें ॥ ५ ॥
हृदाकाशीं आहे स्थित जो वामन । करितां त्याचें ध्यान ज्ञानसिद्धी ॥६॥
विनायक म्हणे तया वामनासीं । भजूं आनंदेंसीं सार्वकाळ ॥ ७ ॥

( २४५ )

## हृदिस्थ वामन ( आध्यात्मिक )

सर्व देवमयी प्रसिद्ध अदिती । जियेला सेविती सर्व देव ॥ १ ॥
जिचेसाठीं घडे विषयसेवन । । रससमर्पण इंद्रियांच ॥ २ ॥
हिरण्यगर्भरूपी जे का आदिशक्ती। जिची असे भक्ती सकळांसीं ॥ ३ ॥
विश्व हृदयांत भरोनी राहिली। भूतांसह उदेली प्रथम जे ॥ ४ ॥
तिची उपासना वामन दर्शन । देतसे करून निजभक्तां ॥ ५ ॥
संभजनीय हृदिस्थ प्रत्यगात्मा । जो का परमात्मा वामन तो ॥ ६ ॥
प्राणां, वरी सारी, अपान, खालीं करी । मध्यें स्थिती करी वामन तो॥७॥
पृथ्वी अन्तरिक्ष आणि स्वर्गामाजी । एकेक जो योजी निजपाद ॥ ८ ॥
ऐसा हृदयाकाशीं वामन बैसला । पाहिजे देखिला ध्यानामध्यें ॥ ९ ॥
कर्म उपासना यांचिया साधनीं । घडत वामनीं भेटी जाणा ॥ १० ॥
विनायक म्हणे सेवा अदितीला । भेटा वामनाला मग सुखें ॥ ११ ॥

( २४६ )

## वामनदर्शनानें बुद्धिमोचन

कर्म आणि फल, सातत्यें सेवितां । बुद्धिला जडता थोर येते ॥ १ ॥
तेणें अदितीला थोर चिंता पडे । घालिती, सांकडें वामनाला ॥ २ ॥
पयोव्रत करी अव्यक्त निरोपें । जेणें सर्व पापें दग्ध होतीं ॥ ३ ॥
इंद्रियांचा रस, तेंच जाणा पय, । तेणें हरि-पाय सेवितसे ॥ ४ ॥
फाल्गुनांत करी पयोव्रत सती । हरि-पद-रती धरोनीयां ॥ ५ ॥
जेव्हां शंकरांनीं काम हा जाळीला । त्याच समयाला व्रत करी ॥ ६ ॥
याचा अर्थ ऐसा, काम, सर्वेश्वरा । अदिती, उदारा अर्पितसे ॥ ७ ॥
तेणें सगुणाचा होय साक्षात्कार । वामन सुंदर प्रगटत ॥ ८ ॥
संस्कारानें त्यासीं करोनी संस्कृत । तया पाठवीत बुद्धीपाशीं ॥ ९ ॥
कर्म उपासना ह्याची जी का जोड । फळ तीचें गोड ऐसें आहे ॥१०॥
फलाभिसंधीनें बुद्धि झाली जड । तीच होय नड मोक्षालागीं ॥ ११ ॥
विनायक म्हणे वामनदर्शन । बुद्धिचें मोचन करिल कीं ॥ १२ ॥

( २४७ )

## वामनबुद्धिप्रवेश व उपनिषद्भाव

वामन जावोनी ठाके बुद्धिपाशीं । तया सुंदरासीं भुले मति ॥ १ ॥
म्हणे वामनासीं तुज काय देऊं । तुज कैसें सेवूं सुकुमारा ॥ २ ॥
वामन म्हणत, पद, मज देईं । भूमी पुरे होई त्रिपद·मित ॥ ३ ॥
बुद्धीमाजी मागे प्रवेश वामन । जडत्व हरण कर यासी ॥ ४ ॥
ठाव मिळतां त्यासीं सकळ बुद्धी व्यापी । त्रिजग हें मापी बुद्धिमाजी ॥५॥
सकळ विष्णुमय भरोनी रहात । बुद्धिप्रकाशत पररूपीं ॥ ६ ॥
सहजचि मग जडत्वगळत । अभिसंधा सुटत सकळची ॥ ७ ॥
उपनिषद्भाव मग प्रगटत । सकळ स्तब्ध होत विषयांतर ॥ ८ ॥
विनायक म्हणे सुतळ प्रापण । तेथें नारायण द्वार रक्षी ॥ ९ ॥

# दैवी चरित्र

# विषय


| | प्रबंध-नं० |
|---|---|
| सत्त्वप्रकाशानानें वासनादमन | २४८,२४९ |
| सुरथ राजाची कथा | २५० |
| ब्रह्मदेवाचें असत्य कथन | २५१,२५२ |
| मधुकैटभवध भगवतीप्रादुर्भाव | २५३ |
| रंभ वध | २५५ |
| महिषास वरप्राप्ति | २५६ |
| महिषाशीं युद्ध | २५७ |
| देवीचें सांगणें | २५८ |
| रंभकरंभ कथा | २५४,२५९,२६० |
| शुंभ-निशुंभ वध | २६१ |
| वैश्य नृपास देवीचा वर | २६१ |

## ( २४८ )

# सत्त्वप्रकाशनानें वासनादमन

गुरुवार ता. २५।९।१९३०

विरुद्धवासना मनीं उठवोनी । जिंकाव्या त्या क्षणीं दुर्वासना ॥ १ ॥
विषयवासना उठती जैशा जैशा । माराव्या त्या तैशा धैर्यबळें ॥ २ ॥
तेथें हटालागीं हटाचेंच काज । तेणेंच निर्बीज होतील त्या ॥ ३ ॥
विरुद्ध वासनेच्यायोगें जिंकायासीं । सुलभ मनासीं घडतसे ॥ ४ ॥
जी जी वृत्ती उठे मनांत तांतडी । दुजी तैशी उडी आदरावी ॥ ५ ॥
रोगें रोग जैसा मारिती कुशल । वासना प्रबळ शमवाव्या ॥ ६ ॥
हेंच गुह्य आहे देवीचरित्रांत । जाणिती पंडित रहस्यातें ॥ ७ ॥
विनायक म्हणे जोंवरीं होय ज्ञान । सत्त्वप्रकाशन मार्ग हाच ॥ ८ ॥

## ( २४९ )

# सत्त्वप्रकाशनानें वासनादमन

पाशवी वृत्तितें जिंकाया कारण । करणें धारण सात्त्विकीतें ॥ १ ॥
राजसी तामसी वृत्ति ज्या कामनीं । येताती उठोनी अंतरांत ॥ २ ॥
सात्वीकी वृत्तींसीं तयां झुंजवावें । तयांचें हरावें बळ जें कां ॥ ३ ॥
निर्बळ करुनी दोन्हींही वासना । त्यांचीया हनना साधावें कीं ॥ ४ ॥
सत्त्वापुढें बळ कोणाचें न चाले । सकळ मावळे अन्य तेज ॥ ५ ॥

रजस्तम जें का सत्त्वप्रकाशतां । त्यासी निस्तेजता प्राप्त होय ॥ ६ ॥
अमावास्या दिनीं, चंद्र तो लोपत । तैसी मात होत रजस्तमां ॥ ७ ॥
सत्त्वांत ते मग अंतर्भूत होती । सत्त्वचि बनती सत्त्वसंगें ॥ ८ ॥
हेंच रहस्य आहे देवीचरित्रांत । ज्ञाते उमजत इतर न ॥ ९ ॥
विनायक म्हणे सत्त्वप्रकाशन । हेंच कीं साधन ऐक्ययोगा ॥ १० ॥

( २५० )

## सुरथ राजाची कथा

सुरथ नामें राजा, राज्यभ्रष्ट झाला । परम खोंचला अंतरांत ॥ १ ॥
मृगयेचे मिषें जातसे वनांत । तेथें तया भेटत वैश्य एक ॥ २ ॥
समाधि नाम त्याचें दोघे समदुःखी । दोघे अविवेकी वासनाग्रस्त ॥ ३ ॥
राजया तळमळ वैश्या तळमळ । सांचलासे मळ वासनेचा ॥ ४ ॥
सुमेधस ऋषि तयाचा आश्रम । शांत कीं परम देखोनियां ॥ ५ ॥
आश्रमीं जाउनी मुनीसी वंदिती । उपाय पुसती दुःखमोक्षा ॥ ६ ॥
विनायक म्हणे माहात्म्य देवीचें । ऋषी सांगे साचें वैश्यनृपां ॥ ७ ॥

( २५१ )

## ब्रह्मदेवाचें असत्य कथन

महामाया आहे अजिंक्य जगांत । तेणें हें मोहित विश्व असे ॥ १ ॥
विष्णु ब्रह्मदेव तप आचरिती । महत्त्व इच्छिती आपुल्याला ॥ २ ॥
दोघां भेटी होय सहज एकदां । कलि होय तदा प्राप्त त्यांत ॥ ३ ॥
विष्णु ब्रह्मदेव दोघेही आपणा । म्हणती मोठेपणा जगामाजी ॥ ४ ॥
तंव तेथें लिंग अकस्मात उदेलें । शब्द कानीं झाले त्यांच्या ऐसे ॥ ५ ॥
तुम्हांपैकीं जो कां लाविल माझा अंत। तोच होय विख्यात श्रेष्ठ जाणा ॥६॥
विनायक म्हणे विधि वरी जाय। पाताळांत जाय विष्णु जाणा ॥ ७ ॥

## ( २५२ )

# ब्रह्मदेवाचें असत्य कथन

सत्त्वगुण विष्णु न सांपडे अंत । सत्यचि कथित आला तेथें ॥ १ ॥
परी ब्रह्मदेव रजोगुण मय । तया भ्रांति होय अभिमानाची ॥ २ ॥
शिवलिंगावरुनी दल केतकीचें । पडलें होतें साचें तेव्हां जाणा ॥ ३ ॥
घेवोनियां दल सांगत प्रशंसा । आपण मोठा, तैसा विष्णु नाहीं ॥ ४ ॥
शिवशिरावरिल पुष्प म्यां आणिलें। शोधातें लाविलें लिंगाच्या कीं ॥५॥
केतकीदलाची विधिसाक्ष देत । तेंही तैसें वदत विष्णुपाशीं ॥ ६ ॥
तेव्हां विष्णु बोले लिंगानें सांगावें। तरीच सत्य व्हावें जगामाजी ॥७॥
कोपलें तें लिंग ब्रह्मया शापित । भाषण वितथ केलेंस तूं ॥ ८ ॥
केतकी दलातें शिव शापितसे । वर्ज्य केलें असे तुजलागीं ॥ ९ ॥
माझिये पूजेंत तुझा बा निषेध । करोनीयां क्रोध शिव बोले ॥ १० ॥
ब्रह्मदेव खोटें बोलिला म्हणोनी । विष्णु त्रिभुवनीं पूज्य झाला ॥ ११ ॥
विनायक म्हणे मोह या मोठ्यांना । कैसा आवरेना महतीचा ॥ १२ ॥

## ( २५३ )

# मधुकैटभवध-भगवतीप्रादुर्भाव

ऋषि सांगे ऐसें आहे हें मोहन । प्राणिमात्र गुंतुन राहिलासे ॥ १ ॥
म्हणोनियां करा देवीचें पूजन । करा आराधन भक्तीयुक्त ॥ २ ॥
पूर्वीं प्रळयकाळीं जेव्हां आपोमय । वृत्त तेव्हां होय ऐकावें तें ॥ ३ ॥
तया जलामधीं विष्णुनीं शयन । केलें होतें गहन बहुकाळ ॥ ४ ॥
तेव्हां कर्णांतुनी मळ जो निघाला । दैत्यरूप बनला तदाकाळीं ॥ ५ ॥
मधुकैटभ दैत्य दोन ते मातले । ब्रह्मदेवा भले भेडसावीती ॥ ६ ॥
माराया विधीतें पातले ते खळ । तेव्हां खळबळ थोर झाली ॥ ७ ॥

योगनिद्रेलागीं ब्रह्मा प्रार्थितसे । तेव्हां सोडीतसे विष्णुलागीं ॥ ८ ॥
जागे झाले विष्णु दैत्यातें मारिती । ऐशी भगवती प्रगटली ॥ ९ ॥
विनायक म्हणे प्रादुर्भाव ऐसा । आदरें परीसा देवीचा हा ॥ १० ॥

( २५४ )

## रंभकरंभ कथा

पुत्रकामें दैत्य रंभ आणि करंभ । करिती आरंभ तपालागीं ॥ १ ॥
एकें जलामाजी एकें तीरावरी । तपश्चर्या तरी मांडियेली ॥ २ ॥
करंभ जलांत इंद्रें निवटीला । मकररूपें भला जाणावें कीं ॥ ३ ॥
तेव्हां अग्निसेवा रंभ करोनियां । आपणा जाळाया सिद्ध झाला ॥ ४ ॥
प्रसन्न झाला अग्नि, माग वर, म्हणे । पुत्रकाम, तेणें, सांगितला ॥ ५ ॥
जिच्चेवरी मन तुझें बा जाईल । तीच वरिशील जरी नारी ॥ ६ ॥
तुज पुत्र होय महाप्रतापवंत । अग्नी असें सांगत रंभालागीं ॥ ७ ॥
विनायक म्हणे महिषीसीं मन । रंभाचें मोहून गेलें जाणा ॥ ८ ॥

( २५५ )

## रंभवध

घेवोनी महिषीसीं, पाताळांत जाय । गर्भवती होय, महिषी ती ॥ १ ॥
दुजिया महिषानें तिज अडवितां । रंभ अवचितां युद्ध करी ॥ २ ॥
मारीला महिषें तेव्हां रंभासुर । महिषी तेव्हां वर, येत जाणा ॥ ३ ॥
यक्षानीं मारिला जाणतो महिष । तेणें होय तोष महिषीला ॥ ४ ॥
मग ती महिषी रंभासमवेत । आपणासीं घेत जाळोनियां ॥ ५ ॥
दहन होतां दोघां महिष निघाला । गर्भांतूनी भला महिषीच्या ॥ ६ ॥
रंभदेहांतुनी उद्भवे रक्तबीज । ज्याचें परम ओज असे जाणा ॥ ७ ॥
विनायक म्हणे महिष, तप, करी । मेरु गिरीवरी वरासाठीं ॥ ८ ॥

( २५६ )

## महिषास वरप्राप्ति

घोर तपश्चर्या करितां, ब्रह्मदेव । धरी प्रगटभाव, त्याच्या पुढें ॥ १ ॥
वर माग म्हणे मृत्यु मज नसो । अमरकाया असो सदा माझी ॥ २ ॥
अशक्य म्हणे विधि माग दुजा वर । करोनि विचार महिष तो ॥ ३ ॥
स्त्रियेपासोनियां मज मृत्यु असावा । पुरुष नसावा कोणी श्रेष्ठ ॥ ४ ॥
अजिंक्य मी व्हावें जगीं सकळांसीं । ऐशिया वरासीं मागतसें ॥ ५ ॥
तथास्तु म्हणोनि गेले ब्रह्मदेव । मग मत्तभाव प्राप्त झाला ॥ ६ ॥
विश्वही जिंकीलें देवही जिंकीले । तयानीं सेविलें ब्रह्मदेवा ॥ ७ ॥
ब्रह्मदेव आणि शंकरही तैसे । त्यांच्यासवें असे देवगण ॥ ८ ॥
विष्णुपाशीं गेले सकळ सांगितलें । सकळ वमले दिव्य तेज ॥ ९ ॥
सर्व देव-तेज जें कां एकवटलें । देवीरूप झालें तदाकार ॥ १० ॥
सकळ देवांनीं निजायुधें दिलीं । देवी सजाविली ऐशी जाणा ॥ ११ ॥
विनायक म्हणे माहिषासीं मात । महज कळत दूतमुखें ॥ १२ ॥

( २५७ )

## महिषाशीं युद्ध

वश करायासीं माहिष झटत । तंव युद्ध होत देवीपाशीं ॥ १ ॥
जे जे धाडीयेले महिषानें शूर । सकळ सत्त्वर मारीयेले ॥ २ ॥
तेव्हां महिषासीं दारुण युद्ध घडे । तयामध्यें पडे माहिष तो ॥ ३ ॥
मारोनी महिषासीं सुरां राज्य दिलें । सकळ जग केलें शुद्ध जाणा ॥४॥
मग सूर्यवंशी पुरुष पाहोनी । तयासीं देवांनीं राजा केलें ॥ ५ ॥
विनायक म्हणे शत्रुघ्न तो राजा । सुख झालें वाजा सकळांसीं ॥ ६ ॥

( २५८ )

## देवीचें सांगणें

देवीं स्तवीयेली तेव्हां भगवती । वरदान देती झाली त्यांना ॥ १ ॥
जेव्हां तुम्हां कधीं संकट येईल । जड भारी पडेल जेव्हां तुम्हां ॥ २ ॥
मज स्मरतांच संकट हरीन । तुम्हां सोडवीन देवी बोले ॥ ३ ॥
विनायक म्हणे देवी अंतर्धान । पावत बोलून ऐसें देवां ॥ ४ ॥

( २५९ )

## रंभकरंभ कथा

शुंभनिशुंभ हे जाणा दोन भ्राते । पाताळांत होते बुद्धिमंत ॥ १ ॥
दोघेही सुंदर तैसे सुलक्षण । करिती आक्रमण महीवरी ॥ २ ॥
पाताळांतुनी ते येती जाणा वर । तप ते दुष्कर करिताती ॥ ३ ॥
दुश्चर तप केलें विधि संतोषला । वर द्याया आला तयांलागीं ॥ ४ ॥
अमरत्व त्यानीं मागतां विधीसीं । अशक्य वाचेसीं बोलतसे ॥ ५ ॥
पुरुषापासोनी आम्हां वध नसो । बळीवंत असों आम्हीं सदा ॥ ६ ॥
ऐसा वर त्यानीं ब्रह्मयापासोनीं । घेतला मागोनी घोर तपें ॥ ७ ॥
त्यानीं स्वर्गठाव देवांचे घेतले । विश्व आक्रमीले समग्रत्वें ॥ ८ ॥
अधिकार जे जे होते कीं देवांचे । सकळ त्यांनीं साचे आक्रमिले ॥९॥
तेच वरुण झाले तेच इंद्र झाले । शशी सूर्य झाले आपणची ॥ १० ॥
तेव्हां सकळ देव प्रार्थिती गुरुसीं । सांगा उपायासीं म्हणताती ॥ ११ ॥
गुरु सांगे तुम्हां भगवतीविना । उपाय न जाणा कांहीं दुजा ॥ १२ ॥
विनायक म्हणे हिमालयावरी । तप सुर-वरीं आरंभीलें ॥ १३ ॥

( २६० )

## रंभकरंभ कथा

प्रार्थितां देवीसीं प्रगटे अंबिका । पुसत सेवित कां तयालागीं ॥ १ ॥
देवीं सांगितला वृत्तांत दैत्यांचा । अत्याचार साचा त्याचा जाणा ॥२॥
तेव्हां प्रगटली देवी देहांतुनी । काली जे भवानी कृष्णवर्णा ॥ ३ ॥
तिनें आश्वासन देवांसीं दिधलें । मारीन मी भले दैत्य थोर ॥ ४ ॥
दोन्हीं देवी मग प्रगट जाहल्या । हिमगिरीसीं भल्या सुंदर त्या ॥ ५ ॥
दूतीं सांगितला वृत्तांत शुंभासीं । आम्हां स्त्रीरत्नासीं देखीयेलें ॥ ६ ॥
तूंच योग्य पती तया सुंदरीसीं । तरी सत्वरेंसीं आणावी ती ॥ ७ ॥
विनायक म्हणे शुंभ थाडीतसे । द्रुत प्रेरीतसे दूतांप्रति ॥ ८ ॥

( २६१ )

## शुंभ-निशुंभ वध

तया दूतीं बहु देवीस बोधियेलें । युद्ध मागितलें देवीनें त्या ॥ १ ॥
तेव्हां धूम्रलोचन दैत्य पाठवीला । क्षणें निर्दाळिला देवीनें त्या ॥ २ ॥
चंड मुंड मग पाठवी असुर । तयांचा संहार करीतसे ॥ ३ ॥
मग रक्तबीज पाठवी दारुण । करी रक्तशोषण त्याचे देवी ॥ ४ ॥
तोही मारीयेला निशुंभ वधीला । शुंभ तो धांवला देवीवरी ॥ ५ ॥
त्याचा वध करी देवी भगवती । ऐसी हे महती चरित्राची ॥ ६ ॥
देवांलागीं जय ऐसा प्राप्त होय । तयां स्वर्गठाय लाभले ते ॥ ७ ॥
मग आराधन करिती देवीचें । वर्णिताती साचें यश तीचें ॥ ८ ॥
पावेन भक्तांसीं पुरवीन अर्थांसीं । ऐशिया वरासीं देई देवी ॥ ९ ॥
विनायक म्हणे माहात्म्य देवीचें । काय वदूं वाचे पामर मी ॥ १० ॥

( २६२ )

# वैश्यनृपास देवीचा वर

सुमेधस मुनि सांगे वैश्यनृपां । तुम्हीं करा तपा देवीसाठीं ॥ १ ॥
तोषवा देवीतें पुरवील अर्थ । देवी ती समर्थ एक जगीं ॥ २ ॥
तयां वैश्यनृपां दिधलासे मंत्र । जो का इहपरत्र तारक कीं ॥ ३ ॥
करिती आराधन हवन रक्ताचें । आपुलिया साचें वैश्यनृप ॥ ४ ॥
प्रसन्न ती देवी राज्य राजयासीं । ज्ञान त्या वैश्यासीं देत असे ॥ ५ ॥
पुढलिया युगीं राजासीं कथित । मनु तूं खचीत होशील कीं ॥ ६ ॥
ऐसें हें माहात्म्य परम देवीचें । पुराणांत साचें वर्णियेलें ॥ ७ ॥
तेणें भगवती होवो मज तुष्ट । पुरवो माझें इष्ट भगवती ॥ ८ ॥
विनायक म्हणे माझे सर्व काम । पूर्ण करो परम निजकृपें ॥ ९ ॥

# गुरुद्वादशी

# विषय


| | प्रबंध नं० |
|---|---|
| श्रीपादचरित्र सार | २६३ |
| प्रभुयशःश्रवण माहात्म्य | २६४ |
| आनंद निर्भरता | २६५ |
| श्रीपादाचें पूर्व चरित | २६७ |
| पतिव्रतेस दत्तदर्शन | २६८ |
| पतिव्रतेस वरप्रदान | २६९ |
| देवांचा विचार | २७० |
| श्रीपादांचा अवतार | २७१ |
| रजकाची कथा | २७२ |
| अवतार समाप्ति | २७३ |

( २६३ )

# श्रीपाद-चरित्र-सार

मंगळवार ता. २९।१०।२९ ( प्रातः काळ )

उत्सवाचा दिन आज हा तुमचा । आम्हां आनंदाचा गुरुराया ॥ १ ॥
अदृश्य जाहलां कुरुवपुरामाजी । दत्तजी हो आजी तुम्हीं नाथा ॥२॥
धन्य केली कृष्णा धन्य केलें स्थान । प्रगट महिमान थोर केलें ॥ ३ ॥
रजकावरी केला राज्ययोग मला । देईन दर्शनाला दिली भाक ॥ ४ ॥
विधवास्त्रीचें पोटीं पुत्र अज्ञ होता । तया सज्ञानता दिली नाथा ॥ ५ ॥
बंधु होते दोघे आंधळे पांगळे । तया योगबळें सुष्ठु केलें ॥ ६ ॥
काशी बदरी वना तैसें गोकर्णासीं । तैसें तीर्थयात्रेसीं गमन केलें ॥७॥
अपार महिमा कोण जाणे भला । कोणी न वर्णिला अशक्य तें ॥ ८ ॥
महिमा थोर झाला बहुजन येती । विपुल मागती योगक्षेम ॥ ९ ॥
उपाधि बहु होय, म्हणुनी समाधि । घेतली निरवधि तुम्हीं नाथा ॥१०॥
आश्विन वद्य तुम्हीं द्वादशी योजिली । अदृश्यता धरिली तुम्हीं नाथा॥११॥
पाहतां गंगेमाजी अदृश्य जाहलां । श्रीगुरुदयाळा श्रीपादजी ॥ १२ ॥
तोच दिन आजि परम मंगळाचा । श्रीगुरुराया साचा आम्हां व्हावा ॥१३॥
प्रदोषकाळीं करूं यशाचें वर्णन । माहात्म्य गायन करूं नाथा ॥ १४ ॥
करूं भजनातें करूं उत्सवातें । अशा चिन्तनातें करीतसें ॥ १५ ॥
संकल्प हा माझा नाथ पूर्ण करा । श्रीगुरु उद्धरा मजलागीं ॥ १६ ॥
साक्षात्कारीं येथें प्रगटा प्रदोषासीं । द्यावें निज सेवेसीं करवूनी ॥१७॥
तुमचा आनंद तुम्हींच करणार । तुम्हींच देणार सर्व आम्हां ॥ १८ ॥
विनायक म्हणे करुणासागरा । मनोरथ करा पूर्ण माझा ॥ १९ ॥

( २६४ )

# प्रभु यशः श्रवण माहात्म्य

सायंकाळ.

परम पावन यश तुझें नाथा । आम्रुचीया अर्था पुरवीसी ॥ १ ॥
श्रवणिं पडतां तुझें कीर्त्यमृत । शान्ति नव येत अनुपम ॥ २ ॥
शांत होय चित्त इंद्रियेंहीं शांत । मन सुखावत किती सांगुं ॥ ३ ॥
स्वस्थता ती येते अंतःकरणासी । शांतीचे रसासीं कोण वर्णी ॥ ४ ॥
विसरे संसार देहभान हरे । स्वर्गांत विहरे जैसा कांहीं ॥ ५ ॥
अमर ते काया सुखही अमर । स्वरूप अमर त्याचें जाणा ॥ ६ ॥
अजर अमर होवोनी विहरे । ब्रह्माण्डीं संसरे निर्मुक्त तो ॥ ७ ॥
गुरु भजनाचा मेवा अमृताचा । अनुपम साचा कीं तो असे ॥ ८ ॥
अमृताचा घोंट घटघट पितो । अमृतची देतो इतरां तो ॥ ९ ॥
अमृत भरलें त्याचे सर्वांगांत । स्पष्ट ओथंबत इंद्रियांत ॥ १० ॥
अमृतांत बुडी मनानें दिधली । अमृतरूप झाली बुद्धी त्याची ॥ ११ ॥
सकळ अमृत दुजें नाहीं कांहीं । अनुपम पाहीं सुखयोग ॥ १२ ॥
यश मुखीं गावें कानानें ऐकावें । हृदय भरावें गुरुयशीं ॥ १३ ॥
यशोरूप व्हावें यशांत डोलावें । उन्मत्त बनावें यशपानें ॥ १४ ॥
आनंदाचे भरें योग समाधिचा । लाभत सदांचा चित्तालागीं ॥ १५ ॥
सेवा गुरुयश होवोनी अवश । बनोनीयां ईश आपुले कीं ॥ १६ ॥
विनायक म्हणे आनंदाची सीमा । तया परंधामा प्रेमें गातां ॥ १७ ॥

( २६५ )

# आनंद निर्भरता

झोपलों कीं जागा होतों । काय पहात मी होतों ॥ १ ॥
सुख किंवा दुःख मज । कळेना हें मज चोज ॥ २ ॥

२११

आप्तकाम पूर्णशांत । होतों निज स्वरूपांत ॥ ३ ॥
निर्विकल्प निर्विकार । जैसा होतों मी सादर ॥ ४ ॥
ठाव माझा मज नाहीं । सांडलों मीं लवलाहीं ॥ ५ ॥
कोठें मन सांपडेना । मीपणा तो गवसेना ॥ ६ ॥
स्फूर्ती माझी हारपली । बुद्धी माझी स्थिरावली ॥ ७ ॥
मन माझें हारपलें । कोणत्या रूपांत राहिलें ॥ ८ ॥
गवस मजला पडेना । कांहीं मजला कळेना ॥ ९ ॥
आनन्दाचा परिभर । विनायका सविस्तरा ॥ १० ॥

( प्रवचनांत प्रसंग विशेषीं केलेला )

( २६६ )

कथा पडली अंगावरी । आतां करूं काय तरी ॥ १ ॥
कोठची झक मी मारिली । येथें येण्या मति झाली ॥ २ ॥
विनायक म्हणे देवा । काय म्हणूं या मानवा ॥ ३ ॥

( २६७ )

## श्रीपादांचें पूर्व चरित

करूंया स्मरण श्रीकृष्णातीराचें । कुरवपुराचें स्मरण करूं ॥ १ ॥
धन्य कूर्म गड्डी जेथें श्रीपादराव । प्रगटिती वैभव आपुलें कीं ॥ २ ॥
पिठापूरीं जन्म तीर्थासीं संचार । गोकर्णासीं थोर प्रीति जाणा ॥ ३ ॥
गोकर्ण क्षेत्रासीं केलें अनुष्ठान । पातले नेमून कुरवपूरा ॥ ४ ॥
पुण्य पावन क्षेत्र कृष्णातीर जाणा । प्रसिद्ध आपणां तेथें केलें ॥ ५ ॥
विनायक म्हणे करणें स्मरण । आज पुण्य-दिन पुण्यतिथीचा ॥ ६ ॥

( २६८ )

# पतिव्रतेस दत्तदर्शन

अवतार झाला प्रख्यात दत्ताचा। जगदुद्धारा साचा प्रसिद्ध जो ॥ १ ॥
कारण आणिलें ऐसें घडवोनी। अमवास्यादिनीं भिक्षा केली ॥ २ ॥
विप्रगृहीं गेले श्राद्ध समयासीं। भिक्षुक वेषासीं धरोनियां ॥ ३ ॥
अलख मंत्राचा उच्चार करीला। मागती भिक्षेला दत्तात्रेय ॥ ४ ॥
पतिव्रता नारी ऐकूनियां हांक। भिक्षा घाली निक अतिथिसीं ॥ ५ ॥
ब्राम्हण जेविले नव्हते तेधवां। विप्रासीं जेधवां भिक्षा घाली ॥ ६ ॥
पाहूनियां भाव सत्पतिव्रतेचा। प्रगट होय साचा दत्तदेव ॥ ७ ॥
माला कमंडलू डमरू त्रिशूल। परम दयाळ सुकुमार ॥ ८ ॥
शिरीं जटाभार पायांत खडावा। शोभतसे युवा रम्यकांति ॥ ९ ॥
सुहास्य वदन कृपापूर्ण नेत्र। गति इह परत्र दाता जो का ॥ १० ॥
खाकेमाजी झोळी पीवर असे तनु। माधुरी मी वानुं काय मुखीं ॥ ११ ॥
नेसला पीतांबर वरी व्याघ्रचर्म। वेल्हाळ परम मनोहर ॥ १२ ॥
शशिकांति जेविं तेविं आल्हादद। नयनां सौख्यद शांत तरी ॥ १३ ॥
वल्कल पांघुरला त्रिपुण्ड्रभाळासीं। अंगीं चंदनासीं लावीयेलें ॥ १४ ॥
गळां वनमाळा आपाद रुळत। कौस्तुभ झळकत कंठा माजी ॥ १५ ॥
रुद्राक्ष भूषणें मिरवी शरीरीं। ज्योत्सनाच कीं तरी प्रगटली ॥ १६ ॥
किंवा मूर्त सुधा बने पुरुषाकृती। रम्यहृद्याकृति नयनासीं ॥ १७ ॥
नोहे स्पष्ट दिसे ब्रह्मदेवकृती। ऐसी तेज-द्युति शरीरासीं ॥ १८ ॥
ऐसें परब्रह्म साकारोनी आलें। निजानंदें भलें निज तेनें ॥ १९ ॥
विस्मितते झाली बहु पतिव्रता। बघुनी अवधूता सुंदरा त्या ॥ २० ॥
विनायक म्हणे अभिनववृत्त। देवोनियां चित्त ऐका तुम्हीं ॥ २१ ॥

( २६९ )

## पतिव्रतेस वरदान

परम विस्मिता होय पतिव्रता । क्षणैक स्तब्धता पावली ते ॥ १ ॥
समजली मनीं अत्रिचे नंदन । घेतसे लोळण पायांवरी ॥ २ ॥
उठविती नारी बहु आश्वासिती । जाहलों म्हणती तुष्ट तुज ॥ ३ ॥
माग मातें कांहीं अभीष्ट तुजसीं । वर द्यावयासीं पावलों मी ॥ ४ ॥
तुझिया भक्तीनें व्रत-नियमानें । संतुष्ट मी मनें झालों असें ॥ ५ ॥
तरी माग माते अभीष्ट मनींचें । तुज जे का रुचे अत्यर्थकीं ॥ ६ ॥
क्षणभरी करी विचार अंतरीं । पतिव्रता नारी सुहासिनी ॥ ७ ॥
तुज सर्वज्ञासीं कायसें सांगावें । तुज सर्व ठावें अंतरींचें ॥ ८ ॥
विश्वाच्या मनींचें सकळ तुज ज्ञात । भूत-हृदयस्थ परमात्मा ॥ ९ ॥
तुज परमात्म्यासीं कायसें मागावें । कथन करावें काय तुज ॥ १० ॥
तरी विचारितां म्हणोनि सांगतें । सत्य वचनातें करा नाथा ॥ ११ ॥
माते ऐसें मज वदलांत देवा । तोच शब्द व्हावा खरा आतां ॥ १२ ॥
तुम्हांसम पुत्र व्हावा माझे कुशीं । वन्द्य ज्ञानराशि धर्मशील ॥ १३ ॥
विनायक म्हणे चरित्र देवाचें । अद्भुत रसाचें ऐका तुम्हीं ॥ १४ ॥

( २७० )

## देवांचा विचार

मागणी ऐकुनी प्रसन्न जाहले । आणिताती भले मनीं देव ॥ १ ॥
अवतार घ्यावा जगदुद्धारासाठीं । धर्महानि मोठी वांचवाया ॥ २ ॥
धर्मरक्षणासीं अवतार घेणें । धर्माची करणें प्रतिष्ठा कीं ॥ ३ ॥
सत्पात्र, हें आहे ओळखिलें मनीं । येथेंच जन्मोनी यावें आतां ॥ ४ ॥
करोनियां ऐसा विचार माधव । प्रगटीती भाव जगत्प्रभु ॥ ५ ॥
आश्वासिती तिज अर्थ सिद्ध होय । जगद्वन्द्य होय पुत्र तुम्हां ॥ ६ ॥

परी एक खूण सांगतों ऐकावी । अंतरीं धरावी निश्चयानें ॥ ७ ॥
होय जो का पुत्र त्याचिया बोलासीं । कधीं न विन्मासीं तुम्हीं कीजे॥८॥
त्याच्या वचनीं तुम्हीं रहावें चिकटून । होऊं द्यावें पूर्ण त्याच्या इच्छे॥९॥
ऐसें सांगोनियां अदृश्य जाहले । तेज संचरलें सतीमाजी ॥ १० ॥
आपुल्या पतिसीं सांगत वृत्तांत । होय आनंदित भर्ता तिचा ॥ ११ ॥
धन्य धन्य धन्य धन्य पतिव्रते । तुज उपमा ते नाहीं नाहीं ॥ १२ ॥
मध्यान्हासीं सूर्य येतां समयासीं । भिक्षुक वेषेंसीं दत्त येती ॥ १३ ॥
अनमान कांहीं मुळीं न करितां । भिक्षा अवधूता घालावी कीं ॥ १४ ॥
हाच नेम नित्य राखावा सज्जनीं । तेणें दत्तमुनी तुष्ट होत ॥ १५ ॥
पूर्ण झालें श्राद्ध पितर तृप्त झाले । मोक्षासीं ते गेले खचितचि ॥ १६ ॥
पतिव्रते तुझेयोगें घडला लाभ । जोडला पद्मनाभ आम्हां पाहे ॥ १७ ॥
आतां अवतरोनी येईल तो खास । आमुच्या वंशास उद्धरील ॥ १८ ॥
विनायक म्हणे अवतार कारण । ऐसें घडवून देव आणी ॥ १९ ॥

( २७१ )

## श्रीपादांचा अवतार

तोच अवतार झाला श्रीपादांचा । प्रत्यक्ष दत्ताचा ओळखावा ॥ १ ॥
धर्मपालनार्थ अवतरला देव । आला दीक्षेस्तव जगद्गुरु ॥ २ ॥
लोकोपकारासाठीं फिरे भूमंडळ । दयाच केवळ मूर्त जोका ॥ ३ ॥
फिरोनी अवनी कृष्णातीरीं आले । वास्तव्यासीं केलें तेथें प्रेमें ॥ ४ ॥
बहु उद्धरीले जन श्रीगुरुनी । धर्मप्रकाशोनि सकळांसी ॥ ५ ॥
पुत्रमाता दोघें होतीं जीव देत । देखती गंगेंत मुनीश्वर ॥ ६ ॥
करुणा ये थोर श्रीपादरायासीं । आणिती तयांसी बोलावूनी ॥ ७ ॥
काय कारणें तुम्ही प्राणातें त्यागितां । आत्महत्या करितां महादोष॥८॥
सांगे सती देवा मूर्ख माझा सुत । बुद्धी न उपजत कांहीं त्यासीं ॥ ९ ॥
माझा पति होता विद्वन्मान्य मोठा । विद्येचा कीं सांठा वाचस्पती॥१०॥
त्याच्या पोटीं आला जन्मा हा करंटा । विद्या ह्या मर्कटा कैंची असे ॥११॥
पूर्वदत्त विद्या पूर्वदत्त भार्या । तैशा धन राशि या पूर्वदत्त ॥ १२ ॥

पुर्वील पातक आमुचें बहुत । म्हणुनि निपजत पुत्र ऐसा ॥ १३ ॥
ऐसें हें कारण देवा आत्मघाता । आज्ञा अवधूता देईं आम्हां ॥ १४ ॥
कळवळला देव बोधित तिजसीं । प्राक्तन दोषासीं सांगतसे ॥ १५ ॥
प्रदोष-व्रतास करींवो तूं नारी । मुख्य मंदवारीं म्हणती गुरु ॥ १६ ॥
पुर्वील आख्यान तिजसीं कथिलें । व्रत सांगितलें काम्य ऐसें ॥ १७ ॥
ऐसें व्रत जरी करसील साति । तुझे वंशाप्रति देव येति ॥ १८ ॥
येरु म्हणे व्हावा तुम्हांसम सुत । पुढें अवधूत अपर जन्मीं ॥ १९ ॥
दया आलि देवा सुताचे मस्तकीं । कर ठेवितो कीं कृपासिंधू ॥ २० ॥
सकळ विद्या आली तया विप्रकुमरा । सद्गुरु दातारा उणें काय ॥ २१ ॥
शनि-प्रदोष-व्रत करींवो गे माये । जन्मीं पुढलीये सत्पुत्र घे ॥ २२ ॥
येईन तुझ्या पोटीं जन्मोनी मी जाण । आहे आम्हां कारण सांगताती ॥ २३ ॥
विनायक म्हणे गुरु महिमान । करील वर्णन कोण ऐसा ॥ २४ ॥

( २७२ )

# रजकाची कथा

रजक भक्त एक त्यासीं कृपा करी । श्रीपाद नरहरी पूर्ण काम ॥ १ ॥
भावें सेवा करी अंगण झाडीत । प्रभुसीं वंदित नित्य नेमें ॥ २ ॥
ऐसे किती दीन चालविला क्रम । भक्त तो परम श्रीपादांचा ॥ ३ ॥
कृष्णातीरीं आला एक यवन राजा । दळभार बोजा घेवोनियां ॥ ४ ॥
जल क्रीडनार्थ पातला भूपति । स्त्रियांतें सांगातीं घेवोनियां ॥ ५ ॥
पाहोनी वैभव कांक्षा झाली मना । कोणत्या साधना येणें केलें ॥ ६ ॥
म्हणोनि वैभव भोगितो हा राजा । मज कां गुरुराजा दे ना ऐसें ॥ ७ ॥
ऐसें मनीं आलें दुश्चित्त जाहला । भाव समजला श्रीपादांसीं ॥ ८ ॥
वंदितां म्हणती सुखें राज्य, भोग । जोंवरि विराग प्राप्त होय ॥ ९ ॥
इह कीं पुढती भोगसीं हें सांग । कैसें अंतरंग तुझें होय ॥ १० ॥
रजक बोलत वार्धक्य शरीरीं । तरी भवांतरीं भोगिन मी ॥ ११ ॥
बाळाभ्यासी भोग भोगीन मीं चांग । परी मज दंग करूं नये ॥ १२ ॥

शेवटीं दर्शन तुमचें मज व्हावें । मजला तारावें म्हणतसे ॥ १३ ॥
तथास्तु म्हणोनि देती आशीर्वाद । श्रीपाद वरद होवोनियां ॥ १४ ॥
राज्य तो पावला जन्मीं पुढलिया । अंतीं दर्शन तया देती गुरु ॥ १५ ॥
विनायक म्हणे अनंत महिमा । बोलण्याची सीमा होत असे ॥ १६ ॥

( २७३ )

## अवतार समाप्ति

वाढला लौकिक सर्व जन येती । प्रसाद मागती दुष्ट पापी ॥ १ ॥
म्हणोनि लौकिकार्थ अदृश्य होवोनी । रहावें हें मनीं आणियेलें ॥ २ ॥
आश्विन वद्यासि द्वादशी तिथीसीं । सूर्य मध्यन्हासीं येत जाणा ॥ ३ ॥
कृष्णेमाजी देव स्वरूप पावती । समाधि लाविती श्रीपाद ते ॥ ४ ॥
अदृश्यरूपानें कुरवपुरांत । अद्यापी वसत आहेत ते ॥ ५ ॥
अनेक दृष्टांत असती कथिले । अनुभव भले साधुसंतीं ॥ ६ ॥
कृष्णेवरि प्रीति बहु या दत्ताची । आवड तेथिची बहुतची ॥ ७ ॥
प्रिय ती नर्मदा दत्त-जन्म भूमि । तेथें आत्मकामीं वर्ते दत्त ॥ ८ ॥
वंदूं नर्मदेसीं वंदूं त्या कृष्णेसी । वंदूं त्या अत्रिसी विनयानें ॥ ९ ॥
वंदूं अनसूया माता ते दत्ताची । शुद्धी अंतराची साधूंया कीं ॥ १० ॥
गळेल असूया वंदितां मातेसीं । म्हणोनी प्रेमेंसीं स्मरूं तीसीं ॥ ११ ॥
ऐसा पुण्यदिन आजिचा साजरा । करूं गुरुवारा तुझ्या कृपें ॥ १२ ॥
आमुचें जें कार्य नाथ पूर्ण व्हावें । वैभव दावावें वात्सल्याचें ॥ १३ ॥
आम्हीं कामनीक भक्त तुझे देवा । आशिर्वाद द्यावा संप्राप्तिचा ॥ १४ ॥
पूर्ण काम आम्हां करीं गुरुनाथा । चरणांसीं माथा वाहिला मी ॥ १५ ॥
आजवरि घडलें मज जें सेवन । फळातें येऊन सिद्ध व्हावें ॥ १६ ॥
माझेठायीं दावा कृपेचा प्रभाव । गुरुदत्तदेव सेवा सिद्धी ॥ १७ ॥
सिद्ध मज करा अंतरीं संचरा । जयकरुणाकरा गुरुनाथा ॥ १८ ॥
विनायक घेतो पायीं लोटांगण । हेतु याचे पूर्ण करा दत्ता ॥ १९ ॥

# भाऊबीज

# विषय

प्रबंध नं०

| | |
|---|---|
| भाव व भक्तिची भाऊबीज | २७४ |
| भाऊबीजेची फलश्रुती | २७५ |

( २७४ )

## भाव व भक्तिची भाऊबीज

गुरुवार ता० २३।१०।१९३०

भावभक्ती नामें युग्म जें विख्यात । उपजे चित्तांत जनाचिया ॥ १ ॥
भ्रातृभगिनीचें नातें त्यांस होत । अपूर्व वर्तत प्रेमा त्यांचा ॥ २ ॥
बहु अलंकार मानें भूषवित । भगिनी तोषत भक्तीयोगें ॥ ३ ॥
जैसा जैसा भाव उद्भवे हृदयीं । रति ईश पायीं तैशी येतां ॥ ४ ॥
भावासम भक्ती हें अनुसंधान । ठेवा ओळखून जाणावया ॥ ५ ॥
भावाचीये पाठीं भक्ति उपजत । भावा अनुवर्तत भगिनी ती ॥ ६ ॥
भावाचिया तोषीं भक्ति तुष्ट होय । भावासह लय पावे भक्ती ॥ ७ ॥
क्षणभर तीस वियोग साहेना । भावास सोडिना सहोदरा ॥ ८ ॥
संबंध तयाचा ऐसा जाणोनियां । धरावेंच तयां संदेह, न ॥ ९ ॥
भाव भक्ती करा एकत्र अंतरीं । लोभ निरंतरीं त्यांचा ठेवा ॥ १० ॥
ऐशी भाऊबीज प्रयत्नें साधावी । नित्य आचरावी शाहाण्यानें ॥ ११ ॥
तेणें मृत्युबाधा निश्चयें चुकेल । यम, न पाहील तुम्हांकडे ॥ १२ ॥
ऐसा जन्ममृत्यु संसार नासावा । योग जमवावा सहोदरां ॥ १३ ॥
विनायक म्हणे माझा शुद्ध भाव । मजला सदैव भक्तीयोग ॥ १४ ॥

( २७५ )

## भाऊबीजेची फलश्रुती

सूर्यापोटीं जे का युग्म उपजलें । प्रगट जाहलें यमयमी ॥ १ ॥
अखंड प्रेमाचा रस तयांपाशीं । भ्रातृभगिनीसीं ओढा थोर ॥ २ ॥

म्हणोनि हे केली नेमस्त द्वितीया । कार्तिकमासिं या शुक्लपक्षीं ॥ ३ ॥
तया दिनीं यम यमीसीं भेटतो । नाना वस्तु देतो तिजलागीं ॥ ४ ॥
आज यमालय नाहींच उघडें । भगिनीचीं कोडें पुरवी तो ॥ ५ ॥
आज मृत्यु ज्यासीं त्या, न यमबाधा । ऐशी अनुसंधा केली असे ॥६॥
जो कां भ्राता निज भगिनीसी पूजी । बहुमानें आजी संतोषवी ॥ ७ ॥
तया अपमृत्यु मुळिं न बाधत । दारिद्य नासत तयाचें कीं ॥ ८ ॥
सकल संभार तया प्राप्त होत । भगिनीसी देत जो कां जाणा ॥ ९ ॥
ऐसा आहे दिन आज मंगलाचा । भावाबहिणींचा आनंदाचा ॥ १० ॥
म्हणोनियां भावभक्तीयांचा योग । तेणें अंतरंग खुलवावें ॥ ११ ॥
भाव भक्तीयोगें दर्शन देवासीं । घडे आपणांसीं निश्चय हा ॥ १२ ॥
मग मंगलचि सकल होणार । सर्व येरझार चुकणार ॥ १३ ॥
जन्ममृत्युचा तो चुके मग फेरा । भेट त्या ईश्वरा घडतांच ॥ १४ ॥
म्हणोनियां भेट भावाबहिणीची । जुळवावी साची हृदयांत ॥ १५ ॥
भावभक्तीयोगें ईश्वर प्रगटे । बळेंच लगटे आपणांसीं ॥ १६ ॥
पंचप्राण ज्योति भक्ती ओंवाळील । भावा सुखविल अनुरक्ति ॥ १७ ॥
कुंकुमतिलक भावासीं लाविल । उत्कर्ष होईल प्रेमरंगा ॥ १८ ॥
विनायक म्हणे महामृत्यु चुके । साधन हें निकें रामबाण ॥ १९ ॥

# सप्ताह-अनुष्ठान

# विषय


| | प्रबंध. नं० |
|---|---|
| जिव्हाळ्याचा देव | २७६ |
| भक्ताची लाज राखण्याबद्दल विनंती | २७९ |
| दक्ष मी राहिलों तुझीये कार्यांत | २८० |
| सप्ताहसिध्यर्थ याचना | २८१ |
| भक्तकीर्तिसाठीं याचना | २८३ |
| भक्तकीर्तिनें देवयशाचा विस्तार | २८४ |
| ‘ देव मज करा ’ | २८५,२८७ |
| अतुल्य सामर्थ्यासाठीं प्रार्थना | २८६ |
| संकटांचे नाशासाठीं प्रार्थना | २८८ |
| विनायकाठायीं दत्तसंचार | २८९,२९० |
| धर्मग्लानि | २९१ |
| धर्मविस्तारार्थ प्रार्थना | २९३ |
| व्हावें रामराज्य | २९४,२९५ |
| भक्तिभाव उपजविण्यासाठीं प्रार्थना | २९६ |
| निराशेचे बोल | २९७ |
| धांवा | २७७,२७८,२८२,२९२,२९८,३०९ ३२६,३२८,३२९,३३०,३३१,३४३ ३४४,३४५,३४६,३४७,३४८,३४९ |
| दत्ताधीनता | २९९,३०१ |
| भूत अंगीं संचरलें, दत्तरूप माझ्या भलें | ३००,३०२ |
| कृतज्ञता वचन | ३०३ |
| प्रसादग्रहणार्थ आज्ञायाचना | ३०४ |
| क्षमायाचना | ३०५ |
| पूर्वचरित कथन व क्षमायाचना | ३०६,३०७ |
| अहंताविष | ३०८ |

| | |
|---|---|
| अहितदलनासाठीं प्रार्थना | ३१० |
| अनुष्ठान पूर्तिसाठीं प्रार्थना | ३११ |
| देवाविण गति । नाहीं आम्हांप्रति | ३१२ |
| कधीं न सोडावें देवालागीं | ३१३,३१५,३१७,३१८,३१९ |
| कृपाळूपणें अल्पधारिष्ट पाहे | ३१४ |
| भोळया भावाचा भुकेला | ३१६ |
| ईश्वराच्या अतर्क्य लीला | ३२० |
| सुदाम कथा | ३२१ |
| भ्याडपण भरे अज्ञानानें | ३२२ |
| अज्ञानानें ईश्वरावर दोषारोप | ३२३,३२४ |
| प्रभुवात्सल्यवर्णन व क्षमायाचना | ३२५ |
| समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी | ३२७ |
| नाममंत्र व त्याचा प्रभाव | ३३२,३३३,३३४ |
| स्वभावास औषध नाममंत्र | ३३५,३३६ |
| वाल्मीकि चरित | ३३७,३३८,३३९,३४० |
| नाममंत्र व त्याचा प्रभाव | ३४१ |
| चित्तस्थैर्यासाठीं प्रार्थना | ३४२ |
| श्रीपाद पुण्यतिथी व सप्ताह समाप्ति | ३५० |

( २७६ )

## जिव्हाळ्याचा देव

शुक्रवार ता० ९।५।१९३०

तूजविण माझी कोणालागीं चिंता । दत्त भगवंता सांग मज ॥ १ ॥
कोण अभिमानी सांग माझा जगीं । प्रेम अंतरंगीं कवणाच्या ॥ २ ॥
कोण माझ्यासाठीं नाथ कळवळे । मेघ तैसा वळे कोण बरें ॥ ३ ॥
कोणाचें हृदय, प्रभुजी, द्रवत । कोण धांव घेत संकटांत ॥ ४ ॥
तुजवीण नाहीं कोणी जिव्हाळयाचा । माझा देवा साचा जगत्रयीं ॥ ५ ॥
वारंवार तूज हांका मी मारितों । तूजला प्रार्थितों परोपरी ॥ ६ ॥
परी त्याचा त्रास तूझ्या नये मना ! गुरु दयाघना दत्तात्रेया ॥ ७ ॥
कौतुक करिसी प्रेमाच धरिसी । मज सोडविसी वेळोवेळीं ॥ ८ ॥
म्हणुनियां दोन्ही हात मी जोडुनि । चरणीं ठेवुनि शिर नाथा ॥ ९ ॥
क्षमेतें याचितों मागतों दयेतें । तुम्हीं भगवन्तें कृपा कीजे ॥ १० ॥
विनायक म्हणे दास हा घाबरा । तुज अत्रिकुमरा विनवीतो ॥ ११ ॥

( २७७ )

## धांवा

तूजवांचोनियां मज गति नाहीं । धांव लवलाहीं कृपावंता ॥ १ ॥
अभिमान माझा तूज भगवंता । त्वरितची आतां धांव घेईं ॥ २ ॥
उडी घाल नाथा माझीये सखया । धीर माझ्या हृदया उरला न ॥ ३ ॥
लाज राख माझी यदुकुलवरा । झालों मी घाबरा अत्रिसुता ॥ ४ ॥
आलों काकुळती प्रगट तूं देवा । आतां रमाधवा दत्तनाथा ॥ ५ ॥
विनायक म्हणे धरवेना धीर । कांपतें अंतर पाव आतां ॥ ६ ॥

(२७८)

## धांवा

कैसें कठिण हृदय केलें दयावन्ता । आजि भगवंता काय सांग ॥ १ ॥
नाहीं कधीं ऐसें सत्त्व त्वां पाहिलें । माझे पुरविले अर्थ तुवां ॥ २ ॥
रात्रंदिन लाज आजवरि नाथा । कृपेनें समर्था राखीयेली ॥ ३ ॥
आतांच कैसें केलें निष्ठुर तें मन । तुवां दयाघन कळेना कीं ॥ ४ ॥
अपराध माझे नको मनीं आणूं । मी तरी अज्ञानू ज्ञानवंता ॥ ५ ॥
आपुला तूं मज आहे म्हणतिलें । पाहिजे त्वां केलें धावणें आतां ॥६॥
विनायक म्हणे करीं सोडवण । प्रसंग जाणून काठिण्याचा ॥ ७ ॥

( २७९ )

## भक्ताची लाज राखण्याबद्दल विनंती

राख लाज आतां आपुल्या भक्ताची। आपुल्या स्थानाची गुरुनाथा॥१॥
लाज उपासनेची लाज भजनाची । लाज प्रतिज्ञेची राख आतां॥ २ ॥
माझा भक्त कधीं नष्ट होत नाहीं । प्रतिज्ञाही पाहीं तूझी देवा ॥ ३ ॥
तरी ती राख आतां सत्यत्वासीं आणी । मज चक्रपाणी सोडवावें ॥४॥
प्रसंग हा ऐसा गति मज नाहीं । तरी लवलाहीं धांव आतां ॥ ५ ॥
विनायक म्हणे पाहुं नको अंत । येई अवधूत सोडवावा ॥ ६ ॥

( २८० )

## " दक्ष मी राहिलों तूझीये कार्यांत "

तूझ्या प्राप्तिस्तव तूझ्या प्रीतिस्तव । त्यागिलें मी सर्व कृपाळुवा ॥ १ ॥
संसाराची चिन्ता अणुही न केली । महती मानिली तूझीच कीं ॥२॥
तूझ्यासाठीं शत्रु मित्र मी जोडिले । संकटीं पाडिलें आपणांसीं ॥ ३ ॥

तुझ्यासाठीं नाहीं केला मीं विचार । दुःखाचा साचार प्रभु दत्ता ॥ ४ ॥
रोग भोग सारे साहिले अनंता । तुज भगवंता सेवियेलें ॥ ५ ॥
कांहीं तरी नाथा काढोनी कारण । सेवा समर्पण तुज केली ॥ ६ ॥
दक्ष मीं राहिलों तुझीये कार्यांत । म्हणोनि संसारांत नसे लक्ष ॥ ७ ॥
म्हणोनि आतां ऐसा प्रसंग पातला । घात होय भला सर्वस्वाचा ॥ ८ ॥
नाहीं परमार्थ न साधिला संसार । ऐसा हा प्रकार प्राप्त झाला ॥ ९ ॥
करुणाघन प्रभो वळसी करुणेनें । ऐसें मी वाचेनें वदतसें ॥ १० ॥
माझिया देहाचा नाहीं भरंवसा । हृदयनिवासा जाणतोसी ॥ ११ ॥
आपुल्या स्थानाचा न केला विचार । तुम्हीं गुरुवर अद्यापिही ॥ १२ ॥
नैराश्याचा मज झटका बसत । तेणें विह्वळत गुरुराया ॥ १३ ॥
माझें दैन्य दूर कोण तो करील । तुजवीण धांवेल कोण सांग ॥ १४ ॥
विनायक म्हणे जाणसीं अंतरींचें । सांगूं काय वाचे बोलोनियां ॥ १५ ॥

( २८१ )

## सप्ताहसिध्यर्थ याचना

सप्ताह पारायण तूझें आरंभिलें । चरित्राचें भलें तूझीया मी ॥ १ ॥
तरी मज होईं साह्य कृपाळू वा । आपुल्या वैभवा प्रगटवीं ॥ २ ॥
साक्षात्कार दावीं दावी चमत्कार । येथें श्री गुरुवर कृपाळूत्वें ॥ ३ ॥
याहुनि मीं काय तूज सांगणार । काय बोलणार सांग नाथा ॥ ४ ॥
आरंभिलें कार्य नाथ सिद्ध करीं । करोनियां दूरी विघ्नांलागीं ॥ ५ ॥
आनंदाचि करी आपुल्या भक्तांचा । निरंतर साचा गुरुराया ॥ ६ ॥
जरि न तूं आम्हां आपुलें म्हणणार । भजन करणार कशासाठीं ॥ ७ ॥
जरि तूं न आमुचा करिसी अंगिकार । काय वडिवार भजनाचा ॥ ८ ॥
विश्वासोनि आम्हीं तूजला सेवितों । प्रसाद इच्छितों घडो ऐसें ॥ ९ ॥
तरी वाली होईं कैवारी आमुचा । हाच प्रार्थनेचा हेतु दत्ता ॥ १० ॥
आम्हांसीं तूं घाली आपुल्या पाठीसीं । श्रीगुरुदयाराशि कृपामूर्ति ॥ ११ ॥
विनायक म्हणे प्रगटावें आतां । श्रीगुरुसमर्था साक्षात्कारें ॥ १२ ॥

## ( २८२ )

# धांवा

शनिवार ता० १०।५।१९३०

धांव घेईं आतां मजसाठीं दत्ता । प्रगटवीं सत्ता येथें नित्य ॥ १ ॥
होईं प्रगट तूं निजकार्यासाठीं । स्वामि जगजेठी अधोक्षज ॥ २ ॥
तूजवरि आहे सकल नाथा भार । आम्हांसीं आधार तूंच एक ॥ ३ ॥
धरोनियां श्रद्धा कार्य आरंभिलें । प्रिय व्हावें भलें तूजलागीं ॥ ४ ॥
करिं आतां चीज आमुच्या श्रद्धेचें । गुरुराया साचें दत्तनाथा ॥ ५ ॥
माझ्या हृदयांत दृढ हा विश्वास । पुरवावी आस माझी प्रेमें ॥ ६ ॥
प्रियपण तुझें मज आहे ठावें । सांगेन अनुभवें निर्भय मी ॥ ७ ॥
अनुभव त्याचा मज असे आला । भय सांगण्याला मज कैंचे ॥ ८ ॥
तुझा प्रियपणा नाथ अनेकवार । अनुभविला थोर किती सांगूं ॥ ९ ॥
तोच आतां पुढें येवो अनुभवा । हेंच दत्तदेवा मागतों मी ॥ १० ॥
मजसाठीं आतां घालोनियां उडी । येईं तूं तांतडीं जगन्नाथा ॥ ११ ॥
मज नको आतां लटिका तूं पाडूं । निज नको सांडूं स्वभावाला ॥१२॥
तूझा प्रियपणा येथें उभारावा । कार्यभाग व्हावा आम्हां दासांचा॥१३॥
विनायक म्हणे अत्रिच्या नन्दना । त्रैलोक्यवंदना धांव घेईं ॥ १४ ॥

## (२८३)

# भक्तकीर्तिसाठीं याचना

कृपाळूत्व तुझें तूजला साजत । उपमा गवसत नाहीं अन्य ॥ १ ॥
हृदयामाजी तव नाथ कृपाळूपण । तेंच अंतःकरण इच्छी माझें ॥ २ ॥
माझ्या अनुभवा येवो कृपाभाव । ऐसें दत्तदेव इच्छीतसें ॥ ३ ॥
तूझ्या चरित्राची कथा मी वाचितों । भरोनियां जातों विश्वासानें॥४॥

कथा मी वाचितों त्या सायंदेवाची । कैशी कृपा साची केली तुवां॥५॥
कथा ब्राह्मणाची वाचिली मी नाथा। हेमकुंभ समर्था त्यांसी दिला॥६॥
ऐसें मी न कधीं देखिलें वाचिलें । कृपाळुत्व भलें जेथें स्पष्ट ॥ ७ ॥
अनुभव देईं त्वदीय कृपेचा । हेंच माझी वाचा मागतसे ॥ ८ ॥
विनायक म्हणे कृपाच करावी । माझी थोर व्हावी कीर्ति जगीं ॥ ९ ॥

## ( २८४ )

# भक्तकीर्तिनें देवयशाचा विस्तार

माझी कीर्ति होतां यश विस्तारेल । चरित्र गातील तूझें संत ॥ १ ॥
कांचेचा तूं हिरा जरी बनविसी । तूझिया कीर्तिसीं वाढ होई ॥ २ ॥
दगडाचें सोनें करोनी दाविसी । जरी हृषिकेशी निजकृपें ॥ ३ ॥
तरिच साधुसंत गातील तुजला । लोक विश्वासाला धरितील ॥ ४ ॥
दिव्य घडावण ऐशी माझी देवा । जरी तूं माधवा करिशील ॥ ५ ॥
लोकांचिये नेत्रां चित्र हें दिसेल । तयां उपजेल दृढ श्रद्धा ॥ ६ ॥
तेणें तूझें कार्य सिद्धीसीं पावेल । जनसंघ लागेल भजनासीं ॥ ७ ॥
लोकसंग्रहार्थ साधीं भगवंता । मदीय सिद्धता साधीं आतां ॥ ८ ॥
मज सिद्ध करीं जगतासिं दावी । आपुली थोरवी कृपावंता ॥ ९ ॥
भजनमाहात्म्य जनीं प्रगट व्हावें । श्रीगुरुबरवें ऐशा योगें ॥ १० ॥
विनायक म्हणे मज गरिबाची । वाणी सत्य साची करावीच ॥ ११ ॥

## ( २८५ )

# ‘ देव मज करा ’

पहातां पहातां देव मज करा । मजला उद्धरा जनां समक्ष ॥ १ ॥
माझीये पापाचें घडतां दहन । त्वदीय भजन-महत्वानें ॥ २ ॥
उदाहरण होतां उघड दिसतां । विश्वास तत्वतां उपजेल ॥ ३ ॥
पापी मुक्त झाला तव नाम घेतां । ऐशी जनवार्ता पसरेल ॥ ४ ॥

तया योगें होय विश्वास बहूतां । तेणें तुज दत्ता सेविती जन ॥ ५ ॥
संकल्प त्वदीय भजन प्रसाराचा । धर्मसंस्थापनेचा सिद्ध होय ॥ ६ ॥
म्हणोनियां आधीं मज देव घडवीं । दगड बनवीं दिव्य नाथा ॥ ७ ॥
विनायक म्हणे धर्म स्थापनेसीं । याच उपायासीं अंगिकारीं ॥ ८ ॥

( २८६ )

## अतुल्य सामर्थ्यासाठीं प्रार्थना

भजनाचा दावीं माझे ठायीं प्रभाव । धरुनियां भाव प्रगटतेचा ॥ १ ॥
माझे ठायीं होईं प्रगट दत्तनाथा । श्रीगुरुसमर्था पूर्णत्वानें ॥ २ ॥
माझे ठायीं होवो संचार आपुला । प्रगटीं चैतन्याला माझे ठायीं ॥३॥
माझे ठायीं प्रेम वाढो अलौकिक । जेणें जनलोक विश्वासती ॥ ४ ॥
तुझीया नामाचा प्रताप दिसावा । माझा देह व्हावा तेजोमय ॥ ५ ॥
लोकांचीये दृष्टीं दत्त मी दिसावें । अनुभवा यावें दत्ता परि ॥ ६ ॥
माझी वाणी व्हावी सत्य वासुदेवा । भजन वैभवा वाढवाया ॥ ७ ॥
अतुल्य सामर्थ्य मज प्राप्त व्हावें । योगारूढ दिसावें सकळांसीं ॥ ८ ॥
जैसा त्यागि योगी भोगी दत्त देव । तैसेंच वैभव दिसो माझें ॥ ९ ॥
माझ्या ठायीं नाथा तूझा साक्षात्कार । दाखवी उदार जनलोकीं ॥१०॥
भक्ती भावनेनें धरिलें भजन । तरी दयाघन घडवी ऐसें ॥ ११ ॥
विनायक म्हणे माझीया बोलांसीं । आणी सत्यत्वासीं कार्यास्तव ॥१२॥

( २८७ )

## 'देव मज करा'

मज बनवावें देव । गुरुराय वासुदेव ॥ १ ॥
भजनाचा थोर महिमा । प्रगटवावा अनुपमा ॥ २ ॥
स्वीयरूप मज द्यावें । सामर्थ्यवन्त मज करावें ॥ ३ ॥
मज देव सिद्ध करावें । तेजस्वी मज बनवावें ॥ ४ ॥

नर-काया पालटावी । देवकळा मज द्यावी ॥ ५ ॥
ऐसा दावी निजप्रभाव । लोकां कळवाया भव ॥ ६ ॥
जेथें भजन सतत । तेथें वास मी करित ॥ ७ ॥
कधीं न जाईं तेथोनियां । भजनरंग टाकोनियां ॥ ८ ॥
आत्मभाव तेथें असे । भजन जेथें घडतसे ॥ ९ ॥
भजकांचा बंदा दास । आहें निश्चयें मी खास ॥ १० ॥
ऐशी ग्वाही देवा व्हावी । भजनाची तुझ्या बरवी ॥ ११ ॥
म्हणोनी देवकळा द्यावी । करोनियां मज तेजस्वी ॥ १२ ॥
दावा दावा चमत्कार । संपन्न करा हा पामर ॥ १३ ॥
थोरपण पामरासीं । येतां ऐसें अनुभवासीं ॥ १४ ॥
जनसारे विश्वासती । उपासना मार्ग धरिती ॥ १५ ॥
विनायक दत्त व्हावा । तुमच्या कृपें दत्तदेवा ॥ १६ ॥

( २८८ )

# संकटांचे नाशासाठीं प्रार्थना

सोमवार ता. १२।५।१९३०

माझी लाज कोणा सांग तूजविण । अभिमान कोण धरणार ॥ १ ॥
माझा कळवळा कोणाचे हृदया । स्वामि दत्तात्रेया तुजविण ॥ २ ॥
जेव्हां जेव्हां पाहीं प्रसंगातें भ्यालों । निराश मी झालों जेव्हां जेव्हां॥३॥
तेव्हां कोण मजसाठीं धाविन्नला । कोण प्रगटला माझेसाठीं ॥ ४ ॥
आजवरी मज ऐसा अनुभव । मज दुःखानुभव न शिवेच ॥ ५ ॥
दुःखातें हरिसी मज वांचविसी । माझे शिरीं धरिसी कृपाछत्र ॥ ६ ॥
सदा मजपाशीं वससी दयाघना । माझीया अवना साधितोसी ॥ ७ ॥
ऐसा तुझा आहे मज प्रेमभाव । नित्य अनुभव येत मज ॥ ८ ॥
तेंच तूझें व्रत अखंड चालवीं । मजला वांचवीं कृपादृष्टीं ॥ ९ ॥
ओढवलें आहे संकट मजसिं । देवा तूं जाणसीं सर्व कांहीं ॥ १० ॥
करितों भजन नमितों चरण । अंतरांत ध्यान तूझें सदा ॥ ११ ॥

ऐशा स्थितीमध्यें सदा मी बसतों । तुझी कृपा इच्छितों दत्तदेवा ॥१२॥
तरी आतां कृपा तुझी प्रगटावी । साक्षात्कारें यावी मूर्त येथें ॥ १३ ॥
विनायक म्हणे आतां कृपा करा । माझीये उद्धारा साधा झणीं ॥१४॥

( २८९ )

## विनायकाठायीं दत्तसंचार

माझे ठायीं आहे सदा तुमचा वास । माझे हृदयास जाणीव हे ॥ १ ॥
देह अनुभवी त्वदीय स्पर्शन । मन तव स्फुरण जाणतसे ॥ २ ॥
जीवासीं उमजे देवा तुझा भाव । भजन वैभव ऐसें असे ॥ ३ ॥
माझ्या ठायीं होय भजन साक्षात्कार । कळत उदार मजलागीं ॥ ४ ॥
म्हणोनि विश्वासोनी तुजसीं प्रार्थितों । मोचन मागतों निष्ठापूर्व ॥ ५ ॥
विनायक म्हणे संकल्प कीं असा । हृदयनिवासा दत्तदेवा ॥ ६ ॥

( २९० )

## विनायकाठायीं दत्तसंचार

माझे ठायीं तूझा वास म्हणोनियां । माझिये हृदया तेजस्विता ॥ १ ॥
देवा भावावरी मन माझें राहे । भूत भविष्य पाहे तव कृपें ॥ २ ॥
सर्वज्ञता मला तूझ्या संस्पर्शानें । भासतसे जाणें तुझ्यायोगें ॥ ३ ॥
जेव्हां योगारूढ मन तुझ्या स्पर्शें । संपन्न होतसे अपूर्व कीं ॥ ४ ॥
तुझीया योगाचा अमृतस्पर्शाचा । अनुभव साचा मना येतो ॥ ५ ॥
संकटांत हात मज देईं आतां । तारी भगवंता निजकृपें ॥ ६ ॥
निराश मी झालों असहाय बनलों । परम फसलों मनीं आहें ॥ ७ ॥
तरी धांव त्वरें उशीर नको लावूं । कोणासीं विनवूं तुजवीण ॥ ८ ॥
माझ्या अंतरींचें जाणसीं सर्वज्ञा । तारी मज अज्ञा कृपाळुत्वें ॥ ९ ॥
विनायक म्हणे माझिया आशेचा । भंग न करी साचा दयामूर्ते ॥१०॥

( २९१ )

# धांवा

आशाळसुत मी साहाय्य मागतों । पदर पसरितों तुझ्यापुढें ॥ १ ॥
क्षमा करीं माझे अपराध नाथा । स्वामिजी समर्था प्रगटोनी ॥ २ ॥
करीं अंगिकार नको लोटूं दूर । जाणसी निर्धार माझा सखया ॥ ३ ॥
प्राण-विसाविया माझ्या जिवलगा । आतां लगबगां येईं येथें ॥ ४ ॥
आजवरी कष्ट किती मीं साहिले । जाणितो भले सर्वज्ञा तूं ॥ ५ ॥
आतां तरी कांहीं मज सुख द्याया । हेतु पुरवाया येईं दत्ता ॥ ६ ॥
तुझ्या भजनाचा प्रभाव दावाया । मज फळ द्याया उपासनेचें ॥ ७ ॥
सिद्ध प्रतिज्ञेसीं येथ अविलंबेसीं । मज तारायासीं करीं दत्ता ॥ ८ ॥
वाट पहातसें चाहूल ऐकतसें । दृष्टी लाविलीसे तुझ्या मार्गा ॥ ९ ॥
तरी आतां येईं लवकरि नाथा । पुरवाया अर्था दत्ता माझ्या ॥ १० ॥
कल्पवृक्षा तूज सेविलें आजवरी । त्याचें फळ तरी देईं आतां ॥ ११ ॥
तुझ्या स्थानासाठीं तुझ्या सेवेसाठीं । उपासनेसाठीं प्रार्थितों मी ॥१२॥
भक्तिभावासाठीं लोक संग्रहासीं । मागतों विशेषीं हेंच नाथा ॥ १३ ॥
तरी यावें आतां नाथ प्रगटोनी । कृपेतें धरोनी अंतरांत ॥ १४ ॥
विनायक म्हणे पाहूं किती वाट । मुळचा मी धीट नाहीं नाहीं ॥ १५॥

( २९२ )

# धर्मग्लानि

मंगळवार ता. १३।५।१९३०

सिद्ध मज करीं अत्रिच्या तनया । वरद होवोनियां मजलागीं ॥ १ ॥
माझें जें का पुण्य फळासीं आणावें । नाथ प्रगटावें तुझे कार्यी ॥ २ ॥
पापपुण्य कोणा भेद न कळत । स्वैरचि वर्तत जन जाणा ॥ ३ ॥
नीतितत्त्वें सारीं हरपूनि गेलीं । दयामाया झाली नष्ट सारी ॥ ४ ॥

भूतदया जगीं पार मावळली । बंधुता लोपली जनांची कीं ॥ ५ ॥
धर्म नष्ट होतां ऐसी हे दुःस्थिती । पावली श्रीपति असे जाण ॥ ६ ॥
उपासनाबुद्धि प्रसृत व्हावया । भजना लावाया जन सारे ॥ ७ ॥
पुण्याई जागृत करीं दत्तनाथा । फलातें समर्था आणीं येथें ॥ ८ ॥
फलोन्मुख करीं झाली जे का सेवा । तुझी रमाधवा आजवरी ॥ ९ ॥
प्रगट करीं स्थान दावीं साक्षात्कार । प्रेमोद्गम थोर प्राप्त व्हावा ॥ १० ॥
प्रेममय व्हावें देवा सारें जग । भजनांत दंग व्हावें नाथा ॥ ११ ॥
तुझा अनुभव सकळांस यावा । प्रगटीं वैभवा आपुल्या तूं ॥ १२ ॥
बौद्धरूप आतां टाकोनि दयाळा । प्रगट स्नेहाळा होईं येथें ॥ १३ ॥
विनायक म्हणे करीं जयजयकार । धर्माचा विस्तार करीं दत्ता ॥ १४ ॥

( २९३ )

## धर्मविस्तारार्थ प्रार्थना

उदय धर्माचा तुझे कृपें व्हावा । अधर्म नासावा मुळींहुनीं ॥ १ ॥
संकटांचा नाश करीं भगवंता । आम्हांसीं स्वस्थता देईं जगीं ॥ २ ॥
स्वातंत्र्यानें आम्हीं तुजला भजावें । पारतन्त्र्य नसावें भजकांसीं ॥ ३ ॥
आम्हांलागीं चिंता कसली नसावी । हौस उपजावी मनालागीं ॥ ४ ॥
उल्हासानें व्हावें त्वदीय भजन । अंतर रंगोन जावें त्यांत ॥ ५ ॥
सकळ सिद्धीचें आम्हांसि साम्राज्य । यावें रामराज्य आम्हांलागीं ॥६॥
आमुचा तूं राजा आम्हीं तुझी प्रजा । भजनाचा गाजा करूं आम्हीं ॥७॥
आम्हालागीं शास्ता तूंच दंडधारी । दुजा नरहरी कोणी नसो ॥ ८ ॥
तुझीया आज्ञेंत देवा आम्हीं वागूं । तूझ्यासाठीं जागूं दृढ बुद्धी ॥ ९ ॥
तुझीया कृपेनें राज्य भजनाचें । प्राप्त व्हावें साचें आम्हांलागीं ॥ १० ॥
धरोनियां शिस्त राखूं तुझा दंड । इमानें उदंड जागूं आम्ही ॥ ११ ॥
तुझ्यासाठीं धन वेंच थोर करूं । तुझें वचन धरूं गुरुराया ॥ १२ ॥
जीविंचा तूं जीव प्राणाचा तूं प्राण । मूर्त प्रियपण तूंच भक्तां ॥ १३ ॥
आत्माराम तूंच आमुचा वाली तूंच । सकळ बा तूंच आम्हालागीं ॥१४॥
अंतर्बाह्य तुझा आम्हां सहवास । घडवावा खास कृपाळुत्वें ॥ १५ ॥

तुझ्या नामें आम्हीं दत्तचि बनावें । तुझिया वैभवें सुसंपन्न ॥ १६ ॥
सकल सत्ताधारी आम्हातें करावें । धर्मातें स्थापावें गुरुराया ॥ १७ ॥
विनायक म्हण रामराज्य करीं । भजाया श्रीहरी तूजलागीं ॥ १८ ॥

( २९४ )

## व्हावें रामराज्य

व्हावें रामराज्य भीति सर्व जावी । शांतता नांदावी आम्हां ठायीं ॥१॥
आम्हांसीं नसावें कसलें संकट । देवा तूं प्रगट आम्हासाठीं ॥ २ ॥
आपपर भाव आम्हांसीं नसावा । मुळीं न कोप यावा आम्हांलागीं॥३॥
आम्हीं सदा तूझे पायचि सेवावे । रात्रंदिन व्हावें सेवापर ॥ ४ ॥
चित्तासिं विक्षेप मुळींच नसावा । सदा साह्य व्हावा काळ आम्हां॥५॥
धर्मध्वज देवा अवनीं फडकवा । निजजय दावा आम्हांलागीं ॥ ६ ॥
विनायक म्हणे धर्मसंस्थापना । करी दयाघना आम्हासाठीं ॥ ७ ॥

( २९५ )

## व्हावें रामराज्य

ईश्वराचें राज्य व्हावें त्रिभुवनीं । आम्हीं सदा भजनी रत व्हावें ॥ १ ॥
जेव्हां जेव्हां इच्छा तेव्हां भजनामृत। आम्हांसीं त्वरित लाभावें कीं॥२॥
विनायक म्हणे माझ्या हृदयांत । दत्त अवधूत वसतसे ॥ ३ ॥

( २९६ )

## भक्तिभाव उपजविण्यासाठीं प्रार्थना

बुधवार ता० १४।५।१९३०

भक्ति मज कांहीं स्वामि उपजवा । भजन करवा प्रेमें येथ ॥ १ ॥
घडवावें ध्यान घडवा पूजन । घडवा गायन निजयशाचें ॥ २ ॥

धरीयेले मी कीं तुमचे चरण । दृढ अंतःकरण लावोनियां ॥ ३ ॥
कृपा करा आतां मज गुरुनाथा । चरणांवरी माथा ठेवियेला ॥ ४ ॥
विनायक म्हणे भजक मी व्हावें । नाथजी करवावें भजनातें ॥ ५ ॥

( २९७ )

## निराशेचे बोल

धैर्य नाहीं माझ्या मनीं अणुमात्र । कैसें सह्यागिरित्र करूं आतां ॥ १ ॥
नाहीं ओज नाहीं मजलागीं तेज । नाहीं महाराज औत्कण्ठ्यही ॥२॥
सर्वशून्य दिसे भोंवतीं गुरुनाथा । काय हें समर्था झालें असे ॥ ३ ॥
भजनमार्गें कांहीं मज गवसेना । काय मी वल्गना करूं तरी ॥ ४ ॥
माधव तूं माझा असोनि यजमान । मज रंकपण आलें असे ॥ ५ ॥
मानुं काय नाथ म्हणूं काय सुख । काहींच हरिख दिसेनाचि ॥ ६ ॥
अंधेरी हे आली माझीया नेत्रांसीं । सुचेना मजसीं दत्तनाथा ॥ ७ ॥
शांतिसुख कधिं देशील गोविंदा । ऐसें मी मुकुंदा प्रार्थितसें ॥ ८ ॥
सांग आतां मज काय करूं चांग । माझें अंतरंग कळवळे ॥ ९ ॥
विनायक म्हणे अत्रिच्या तनया । माझीये हृदया शांति देईं ॥ १० ॥

( २९८ )

## धांवा

पाहोनियां दुःख सकल जगतीं । आशेची निवृत्ति झाली असे ॥ १ ॥
अन्यायासीं तूंच दिसत सहाय । लोपलाचि न्याय मुळींहुनी ॥ २ ॥
जाणीव लोपली विचारशक्ति गेली । कोठें उडी भली घेऊं सांग ॥ ३ ॥
विनायक म्हणे करावें दयेतें । मज अवधूतें स्वीकारावें ॥ ४ ॥

(२९९)

# दत्ताधीनता

गुरुवार ता० १५।५।१९३०

दत्त बोलवीतो तैसा मी बोलतों । दत्त वागवीतो वागें तैसा ॥ १ ॥
दत्त करवीतो तैसें मी करितों । दत्त इच्छें होतों व्यवहारी ॥ २ ॥
दत्त मानवितो तैसें मी मानितों । सकल पहातों दत्तदृष्टीं ॥ ३ ॥
काम क्रोध माझे दत्ताचे आधीन । माझें अवलंबन दत्त जाणा ॥ ४ ॥
ज्ञान कीं अज्ञान सर्व माझें दत्त । झालों असे दत्त दत्तालागीं ॥ ५ ॥
आंत बाहेरी तो भरोनी रहातो । चेष्टा करवीतो निज इच्छे ॥ ६ ॥
हांसतों रडतों किंवा ओरडतों । चिह्नें मीं करितों त्याच्या इच्छे ॥ ७ ॥
इंद्रियांचें ज्ञान त्याचेच आधीन । मनाचें मनन तदधीन ॥ ८ ॥
बुद्धिचें स्फुरण चित्ताचें चेतन । सर्व दयाघन दत्त करी ॥ ९ ॥
हृदयस्पंदन अंतःकरणबोधन । जीविंचें जीवन दत्त जाणा ॥ १० ॥
दत्त ऐकवीतो दत्त पहावीतो । स्पर्श समजतो दत्तकृपें ॥ ११ ॥
विवेक जो माझा पूर्ण दत्तमय । सकल दत्त होय माझे ठायीं ॥ १२ ॥
शहाणपण किंवा माझा वेडेपणा । सकळ भावपणा दत्तापाशीं ॥ १३ ॥
विनायक म्हणे मज पछाडिलें । दत्तनाथें भलें करूं काय ॥ १४ ॥

( ३०० )

# ‘भूत अंगीं संचरलें । दत्तरूप माझ्या भलें’

भूत अंगीं संचरलें । दत्तरूप माझ्या भलें ॥ १ ॥
मज भान कांहीं नाहीं । त्याची इच्छा सर्व पाहीं ॥ २ ॥
इच्छेसम वागवीतो । हंसवीतो रडवीतो ॥ ३ ॥
शहाणपण करवीतो । वेडेपण दाखवीतो ॥ ४ ॥

सूज्ञ किंवा मीं अज्ञान । काय ठावें मज लागून ॥ ५ ॥
तेणें मज बहु भारीलें । माझें काहीं नाहीं उरलें ॥ ६ ॥
चमत्कार दाखवीतो । मजलागीं खेळवीतो ॥ ७ ॥
अकस्मात उपजवी । नवलाई नवीनवी ॥ ८ ॥
तेणें माझा रंग फिरतो । कोण इंगित जाणतो ॥ ९ ॥
मजठायीं भगवान । कवणा हें असे ज्ञान ॥ १० ॥
प्राकृत मज समजती । मी तो नाहीं देहावरतीं ॥ ११ ॥
हंसणें किंवा माझें रडणें । किंवा कोणासीं कोपणें ॥ १२ ॥
तैसा माझा स्पष्ट काम । किंवा लोभ जो परम ॥ १३ ॥
सकळ त्याचेंच विन्दान । राहिलों मीं ग्रस्त होऊन ॥ १४ ॥
जीव माझा त्याचे ठायीं । तो भरला माझ्या हृदयीं ॥ १५ ॥
मनबुद्धि अहंकार । ग्रस्त केलीं तेणें साचार ॥ १६ ॥
माझी सत्ता उरलि नाहीं । मज दत्तास्थिती पाहीं ॥ १७ ॥
जो का भक्त प्रिय त्यासीं । करी त्याची गति ऐशी ॥ १८ ॥
ग्रस्त करोनी ठेवितो । निज इच्छे वागवीतो ॥ १९ ॥
विनायक सत्य बोले । दत्तस्वरूपांत डोले ॥ २० ॥

( ३०१ )

## दत्ताधीनता

माझिया कर्माचा जेवढा कीं भोग । तेवढी तो जाग ठेवी माझी ॥ १ ॥
कर्म क्षयास्तव सुखदुःख देहा । म्हणोनि संदेहा पाडीयेलें ॥ २ ॥
क्षणभरी जागा सुखदुःख भोगीं । ठेवी मजलागीं देहावरी ॥ ३ ॥
क्षण एक जागा क्षण एक ग्रस्त । ऐसा तो ठेवीत मजलागीं ॥ ४ ॥
नूतन जें कर्म माझे हातीं घडे । त्याचें फळ जोडे त्याजलागीं ॥ ५ ॥
माझिया देहाची सत्ता हिरावोनी । राहिला बैसोनी माझ्या देहीं ॥ ६ ॥
म्हणोनि सर्व कर्म, तदर्पण होय । जाणा निःसंशय सत्य वच ॥ ७ ॥
पुर्वील भोगवीतो, पुढील स्वयें घेतो । मोकळा करितो मजलागीं ॥८॥

म्हणोनियां देहें जें जें काहीं घडत । घडोनि तें येत त्याच्या इच्छे ॥९॥
कामक्रोधादिक सकळ त्याचेच । माझें कांहीं साच उरों नेदी ॥ १० ॥
ऐसा माझे ठायीं भरोनि राहिला । जीव बद्ध केला निजठायीं ॥ ११ ॥
आतां सर्व सत्ता त्याचीच जाणावी। काय मी बोलावी स्थिती माझी१२
विनायक म्हणे सत्य मी बोलतों । देव बोलवीतो माझे वाचे ॥ १३ ॥

(३०२)

## भूत अंगी संचरलें। दत्तरूप माझ्या भलें

महद्भूतें मज जाणा झपाटिलें । व्यवधान सुटलें माझें जाणा ॥ १ ॥
सकळ व्यवहार दत्त संपादितो । सत्तेंत ठेवीतो अपुल्या मज ॥ २ ॥
जैसा झोंपसुरा अर्धवट जागा । करितसे त्रागा वेड्यासम ॥ ३ ॥
तैशी माझी स्थिति होत व्यवहारीं । मी तो भानावरी नाहीं नाहीं ॥४॥
पिशाचग्रस्त मी, माझी पिशाचवृत्ति । माझ्याठायीं सुस्ती थोर असे ॥५॥
पिशाचासारिखा माझा व्यवहार । आचारविचार पैशाच कीं ॥ ६ ॥
कधीं मज भान, दत्त मी निर्धार । कधीं मीं पामर नरदेही ॥ ७ ॥
कधीं बोलें ज्ञान कधीं दावीं अज्ञान। ज्ञान आणि अज्ञान दत्तइच्छा ॥८॥
जेथें नाहीं माझी काहीं उरलि सत्ता। तेथें अप्रमत्तता सर्वची कीं॥ ९ ॥
विनायक म्हणे मत्त अप्रमत्त । सकळ माझा दत्त जाणतसे ॥ १० ॥

सप्ताहसमाप्ति

(३०३)

## कृतज्ञतावचन

शुक्रवार ता. १६।५।१९३०

करवीलें तुवां निजकार्य दत्ता । सर्व तूझी सत्ता करीतसे ॥ १ ॥
जें जें कांहीं होतें सर्व तवाधीन । तेंच दयाघन घडतसे ॥ २ ॥

करोनियां सारें निर्लेप रहासी । निराळा दिससी सर्व कांहीं ॥ ३ ॥
निर्विकार सदा तूझी स्वरूपस्थिती । घडामोडी होती जरी कांहीं ॥ ४ ॥
सर्गस्थितिलय घडत विश्वासीं । सकळ जाणसी अभिज्ञ तूं ॥ ५ ॥
परि त्याचा तूज कांहीं बाध नाहीं । स्वच्छचि तूं पाहीं सदोदित ॥ ६ ॥
अग्नि जाळीतसे सकळ वस्तूंसीं । त्याच्या शुचित्वासीं बाध नाहीं ॥ ७ ॥
तैसें तूझें रूप सदाच निर्मळ । साक्षीभूत केवळ वर्ततसे ॥ ८ ॥
सकळ करोनि रहासि निराळा । योग हा आगळा तुझा जाण ॥ ९ ॥
ब्रह्माण्डरचना ब्रह्माण्ड धारण ।ब्रह्माण्ड जृंभण जे का चाले ॥ १० ॥
त्यांत तूझी सत्ता सकल वर्तत । कोणा न उमगत कदाकाळीं ॥ ११ ॥
जैसें कमळदळ राहोनी जलांत । निर्लेप वर्तत तैशी सत्ता ॥ १२ ॥
विशिष्टत्व ऐसें तूझिया सत्तेचें । जाणणार साचें कोण सांग ॥ १३ ॥
अगम्य हें आहे आम्हांसि विन्दान । कैसें तें कळोन येईल कीं ॥ १४ ॥
तुझ्याच इच्छेनें जीव हे वर्तत । सकळ आचरत तुझ्या ठायीं ॥ १५ ॥
न जाणोनी तूज, धरिती अहंकार । आपण करणार म्हणताती ॥ १६ ॥
हेंच कीं जीवाचें परम अज्ञान । समरस मन होय तेथें ॥ १७ ॥
कर्तृत्व देवाचें सकळ जाणोनी । स्वस्थ व्हावें मनीं हाच मार्ग ॥ १८ ॥
साधुमार्ग हाच तुझें तूज अर्पणें । स्वीय न सांगणें ममत्व तेथें ॥ १९ ॥
ज्याचें त्या अर्पितां दोष न लागे मुळीं । ममत्व कदाकाळीं ठेवूं नये ॥ २० ॥
जें का परक्याचें, लोभ न धरावा । अभिलाष व्हावा कधीं न कोणा ॥ २१ ॥
तैसें आम्हा हातीं जें जें करवीत । दत्त अवधूत कौतुकानें ॥ २२ ॥
तें तें सर्व तया प्रेमानें अर्पावें । आशाबद्ध व्हावें कधीं न तेथें ॥ २३ ॥
कल्याण करणारा धनी तो समर्थ । पुरवील अर्थ, चिंतीं त्यासीं ॥ २४ ॥
व्यर्थ अहंकारीं पडूं नको जीवा । तया दत्तदेवा ओळख रे ॥ २५ ॥
कर्ता करवीता भोक्ता भोगवीता । ज्ञाता जाणविता दत्तात्रेय ॥ २६ ॥
तेणें आहे शिरीं घेतला सर्व भार । कां तूं चिंतातुर रहातोसीं ॥ २७ ॥
त्यास आहे तुझी सकळ बा चिंता । तया भगवंता, भज तरी ॥ २८ ॥
आशाबद्ध कांहीं करूं नको कर्म । जाण बा हें वर्म जीवराया ॥ २९ ॥
विनायक म्हणे जें काय घडविलें । अर्पण मी केलें त्याचे पायीं ॥ ३० ॥

(३०४)

## प्रसादग्रहणार्थ आज्ञायाचना

अनुष्टान करवीलें । पूर्णत्वासीं तुवां नेलें ॥ १ ॥
सांगतेनें सिद्ध व्हाया । आम्हां प्रसाद मिळाया ॥ २ ॥
आज्ञा देईं आतां नाथा । नव प्रसाद ग्रहणार्था ॥ ३ ॥
प्रसाद ग्रहणासीं आज्ञा । देईं आतां तूं सर्वज्ञा ॥ ४ ॥
प्रसाद करीं आम्हांवरी । गुरुराज नरहरी ॥ ५ ॥
यज्ञशिष्टाचें सेवन । घडवीं आम्हां दयाघन ॥ ६ ॥
जो का यज्ञ करविला । सांग तुवां नाथा भला ॥ ७ ॥
त्यांतील शिष्ट प्रसाद जो । परम इष्ट आम्हांला जो ॥ ८ ॥
यज्ञ शिष्ट आम्हां देईं । वरद तूं आम्हां होईं ॥ ९ ॥
रोगराई सर्व जावी । अज्ञानें जीं तीं हरावी ॥ १० ॥
ज्ञानप्रकाश कीं व्हावा । बोध आम्हां प्रकाशावा ॥ ११ ॥
आम्हीं व्हावें पूर्ण ज्ञानी । मुक्त व्हावें फेऱ्यांतूनीं ॥ १२ ॥
जन्ममरणाचा फेरा । चुकवावा गुरु उदारा ॥ १३ ॥
म्हणुनि आतां आज्ञा व्हावी । प्रसाद ग्रहणार्थ बरवी ॥ १४ ॥
तूझे चरण वंदून । पदतीर्थ तूझें घेवोन ॥ १५ ॥
हृदयांत तुज स्मरोनी । तूजलागीं तेथें पूजोनी ॥ १६ ॥
तुझ्या ताटीचें उच्छिष्ट । जे का पूर्व यज्ञ शिष्ट ॥ १७ ॥
परमादरें आम्हीं सेवूं । तुझ्या कृपें तृप्त होऊं ॥ १८ ॥
तरी ह्या योगा साधवाया । आम्हांलागीं तारावया ॥ १९ ॥
आज्ञा देईं श्रीसमर्था । तव प्रसाद ग्रहणार्था ॥ २० ॥
सकळ हेतू पूर्ण व्हावे । तव कृपें नाथा बरवे ॥ २१ ॥
न्यून कांहींही नसावें । आम्ही समर्थची व्हावें ॥ २२ ॥
हीन दीन आम्हीं नसावें । वैभवेंसीं युक्त असावें ॥ २३ ॥
ऐसें करा दयाघना । करितों मी पदवंदना ॥ २४ ॥
विनायकाचा भावार्थ । पुरवावा मनिंचा अर्थ ॥ २५ ॥

( ३०५ )

## क्षमायाचना

रविवार ता. १२।१०।१९३०

क्षमा मी मागतों नाथ तुम्हांपाशीं । जोडोनी करांसीं नम्रपणें ॥ १ ॥
अपराधी असें अत्यंत मी नाथा । म्हणोनि समर्था विनवीतों ॥ २ ॥
माझ्या असहायते पाहोनियां देवा । कोपातें शमवा आपुलीया ॥ ३ ॥
माउली केवळ तुम्हीं आम्हालागीं । तुम्हींच कीं जगीं सदा माता ॥४॥
कृपाळूपणानें अपराध पोटीं । घाला जगजेठी माझे आतां ॥ ५ ॥
विनायक येत तुम्हां काकुळती । पावोनियां खंती अंतरांत ॥ ६ ॥

( ३०६ )

## पूर्वचरितकथन व क्षमायाचना

आठवितां पूर्वकालीन आचरण । खोंचे अंतःकरण माझें नाथा ॥ १ ॥
त्यांत मज किती अनंत अज्ञात । दोष अवधूत घडले कीं ॥ २ ॥
अंतर्बाह्य आहें देवा मी ओंगळ । पातकांचा मळ सांचलासे ॥ ३ ॥
किती केली आहे तुमची अवज्ञा । सकल सर्वज्ञा जाणतोसी ॥ ४ ॥
म्हणोनियां आहे शरण चरणीं । मज चक्रपाणी क्षमा करा ॥ ५ ॥
कृतघ्न मी आहें, तुमचें स्मरण । मज नारायण होत नाहीं ॥ ६ ॥
विसरोनी तुम्हां वागतों वेव्हारीं । तेणें मी विकारी होत सदा ॥ ७ ॥
अमंगळ देवा काया वाचा मनें । शरण लज्जेनें आलों असें ॥ ८ ॥
तरी आतां मज कृपाच करावी । अढी न धरावी कृपावंता ॥ ९ ॥
विनायक आहे जाहला घाबरा । श्रीगुरुउदारा तारा, यासीं ॥ १० ॥

## ( ३०७ )

# पूर्ववृत्तकथन व क्षमायाचना

पूर्ववृत्त माझें अत्यंत गहन । तयासीं तुळन नाहीं नाहीं ॥ १ ॥
पापात्मक माझें पूर्वील चरित । तेणें मी पावत संकटांसीं ॥ २ ॥
कितीतरी नाथा अरिष्टें माझेवरी । लोटलीं श्रीहरी असती कीं ॥ ३ ॥
सर्वज्ञ तूं देव सकल जाणसी । प्रार्थना ऐकसी तैसी माझी ॥ ४ ॥
तरी आतां यांत दयेचा विचार । करा गुरुवर माझेसाठीं ॥ ५ ॥
पापांच्या मी नादें संकटी पडलों । असहाय झालों असें देवा ॥ ६ ॥
तरी वांचवावें मज या दीनासी । पदसेवकासीं वांचवावें ॥ ७ ॥
होवोनियां दीन हीन लीन नाथा । तुम्हां मी समर्था प्रार्थितसें ॥ ८ ॥
तरी क्षमा करा अरिष्टें शमवा । श्रीगुरुमाधवा दत्तात्रेया ॥ ९ ॥
अरिष्टशमनार्थ केला मी आश्रय । असे दत्तात्रेय तुमचा कीं ॥ १० ॥
तरी वांचवावें तारावें या दीना । मज करुणाघना संरक्षावें ॥ ११ ॥
विनायक म्हणे तुम्हांवीण मज । त्राता गुरुराज कोणी नाहीं ॥ १२ ॥

## ( ३०८ )

# अहंताविष

अहंकार दोष माझे हृदयांत । प्रबळ वर्तत किती सांगूं ॥ १ ॥
त्याचीया संगानें पाऊलों पाऊलीं । दुष्टता ये भली मजलागीं ॥ २ ॥
किती चुकतों मी अंदाज करवेना । पश्चात्ताप मना झाला असे ॥ ३ ॥
नम्रभावें आतां तुम्हांसीं प्रार्थितों । पदर पसरितों कृपा करा ॥ ४ ॥
तुम्हांसम नाहीं कोणीही कृपाळू । माझा प्रतिपाळू करा, नाथा ॥ ५ ॥
सांपडलों आहें बहु अरिष्टांत । कांहीं न उमजत मजलागीं ॥ ६ ॥
गोंधळलें मन, मार्ग गवसेना । उपाय कळेना कांहीं मना ॥ ७ ॥

झालों आहें अंध नेत्र असोनियां । दिसेना गुरुराया मज मार्ग ॥ ८ ॥
कान असोनियां बहिरा बनलों । मूक असें झालों दोषांमुळें ॥ ९ ॥
जरि वाचा मज, कांहीं बोलवेना । ऐकाया येइना बोधवच ॥ १० ॥
आंधळा बहिरा मोना मी जाहलों । ठायींच बैसलों ठाकोनियां ॥ ११ ॥
अहंकारें मज अनाथ बनविलें । निःशक्त कीं केलें मजलागीं ॥ १२ ॥
अहंकार विष उग्र हें प्रखर । जाहला विस्तार शरीरांत ॥ १३ ॥
तेणें माझे दोन्ही डोळे हे फुटले । कानही फुटले देवा माझे ॥ १४ ॥
जीभ माझी नाथा लुली हे पडली । कोरड जाहली घशामाजी ॥ १५ ॥
अहंकार विष दाटलें कंठांत । तेणें गुदमरत जीव माझा ॥ १६ ॥
मरणकाळ ऐसा देवा हा पातला । शरण तुम्हांला म्हणोनियां ॥ १७ ॥
तुम्हीं पंचाक्षरी तुम्हीं धन्वंतरी । वांचवावें तरी मज आतां ॥ १८ ॥
विनायक घेतो चरणिं लोळण । विषाचें शोषण करा नाथा ॥ १९ ॥

## ( ३०९ )

# धांवा

संकटांत नाहीं कोणी वांचविता । होय उपहास्यता थोर माझी ॥ १ ॥
सोंगें ढोंगें कैसें नाम मीं गाइलें । पाहिजे आतां आलें कामालागीं ॥२॥
लाज राखा माझी पत राखा माझी । अब्रू राखा माझी कृपावंता ॥ ३॥
तुमच्या यशाची दिधली मी ग्वाही। सत्यता लवलाहीं घडो आतां ॥४॥
आजवरि केलें नामसंकीर्तन । गुणाचें गायन विनयानें ॥ ५ ॥
श्रद्धेच्या प्रसादें देवा मी जनांत । राहिलों वर्णीत यश तुझें ॥ ६ ॥
अल्प जी का सेवा मज घडविली । पाहिजे ती आली फळालागीं ॥७॥
संकटें हीं माझीं नाथ नष्ट करा । मजलागीं तारा कृपावंता ॥ ८ ॥
विनायक आहे तुम्हां प्रियदास । तरी आतां खास वांचवावा ॥ ९ ॥

( ३१० )

## अहित दलनासाठीं प्रार्थना

माझीया शत्रूंचा पूर्ण व्हावा नाश । मागत करुणेश तुम्हांपाशीं ॥ १ ॥
माझें चित्त स्वस्थ व्हावया कारण । शत्रू निर्दाळिण करावें कीं ॥ २ ॥
वैरियांचा मज किती आहे त्रास । किती अभिचारास केलें असे ॥३॥
अभिचार योगें मजसीं पीडिलें । वैरियानीं भलें दत्तात्रेया ॥ ४ ॥
आम्हीं केला आहे तुमचा आश्रय । सेवितसों पाय विनयानें ॥ ५ ॥
तरी अभिचार पूर्ण शमवावा । वैरीयांचा व्हावा पूर्ण घात ॥ ६ ॥
तुमचे हें कार्य सिद्ध कीं व्हावया । ऐसें गुरुराया करावेंच ॥ ७ ॥
उपासना कार्यासाठीं हें मागतों । बहु विनवितों तुम्हांलागीं ॥ ८ ॥
धर्मसंरक्षणा अधर्मतक्षणा । अहित दलना करा माझ्या ॥ ९ ॥
तुमच्या स्थानाचा व्हावया विजय । वैरियांचा क्षय करावा कीं ॥१०॥
तुमचीया दासां विजयी कराया । सकळ वैरियां मारावें कीं ॥ ११ ॥
जे का तुझे भक्त तयांचा उत्कर्ष । श्रीगुरु विशेष करावा कीं ॥ १२ ॥
विनायक प्रार्थी लडिवाळपणें । विजयी करणें मजलागीं ॥ १३ ॥

( ३११ )

## अनुष्ठानपूर्तिसाठीं प्रार्थना

अनुष्ठान पूर्ण व्हावें । मज सिद्धीलागीं यावें ॥ १ ॥
जयजयकार नामाचा । जयजयकार कीर्तनाचा ॥ २ ॥
जयजयकार उपासनेचा । तैसा भजन पूजनाचा ॥ ३ ॥
करवा येथें अहर्निश । श्रीगुरुराय जगदीश ॥ ४ ॥
आशीर्वाद विजयाचा द्यावा । मजलागीं साचा ॥ ५ ॥
विनायका अनुग्रह । करणें आतां निःसंदेह ॥ ६ ॥

(३१२)

# देवावीण गति। नाहीं आम्हां प्रति

सोमवार ता० १३।१०।१९३०

काांहीं झालें तरी देवावीणगति। नाहीं आम्हांप्रति अणुमात्र ॥ १ ॥
किती जरी झाली मनाची निराशा। तरी जगदीशा शरण जाणें ॥ २ ॥
म्हणोनियां जावें शरण पुरुषोत्तमा। गति अनुपमा हेचि एक ॥ ३ ॥
सर्व कार्य त्याचेवरी सोंपवावें। आपण असावें श्रद्धायुक्त ॥ ४ ॥
श्रद्धा कधीं ढळों मुळीं नच द्यावी। निश्चिती धरावी तोचि त्राता ॥५॥
हाच मार्ग आहे साधुसज्जनांचा। अवलंबावा साचा साधकानें ॥ ६ ॥
विनायक म्हणे धरि दृढ भाव। घट्ट गुरुदेव आश्रयावा ॥ ७ ॥

(३१३)

# कधीं न सोडावें देवालागीं

आम्हां पामरांची शक्ति असे किती। धरोनियां चित्तीं विचार हा ॥१॥
धैर्यवंत व्हावें देवा चिकटावें। कधीं न सोडावें देवालागीं ॥ २ ॥
किति भय उपजो आपण न भ्यावें। कधीं न दूर व्हावें देवापासोनी ॥३॥
मनाच्या यातना शरीर यातना। सोसाव्या त्या नाना धैर्यवंतें ॥ ४ ॥
परि नच त्यातें कधींही सोडावें। कांहीं झाल्या व्हावें सक्त घट्ट ॥५॥
जरि आला मृत्यु होवो देवापाशीं। कधीं न तयासीं सोडावें त्वां ॥६॥
विनायक म्हणे मनाचा निर्धार। कधीं न साचार ढळावा तो ॥ ७ ॥

## ( ३१४ )

# 'कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे'

अल्प पुण्य पाहे प्रभु देवराणा । परीक्षी अंतःकरणा साधकाच्या ॥ १ ॥
दयावंत आहे नित्यचि तो देव । त्याचा कृपाभाव अनुपम ॥ २ ॥
जरी शरण जासी तयासिं पामरा । दुःखमुक्त खरा होसील कीं ॥ ३ ॥
कल्याण कीं तुझें देवचि जाणतो । तैसेंच करितो सर्व पाहीं ॥ ४ ॥
अज्ञानासीं न कळे हा विचार । भयभीत फार होत नर ॥ ५ ॥
कासावीस होतो जीव घाबरतो । मध्येंच सोडितो देवपंथा ॥ ६ ॥
त्यासीं नाहीं गति कोठें मग उरे । हेंच तत्व खरें विवेचि तूं ॥ ७ ॥
विवेचन ऐसें करोनी मनांत । सेव अवधूत सर्वकाळ ॥ ८ ॥
निश्चयानें तुज करिल दुःखमुक्त । तोच सर्व शक्त जगत्प्रभु ॥ ९ ॥
विनायक म्हणे न हो दीनवाणा । गुरुच्या चरणां सोडूं नको ॥ १० ॥

## ( ३१५ )

# कधीं न सोडावें देवालागीं

काळापासोनियां जेणें मार्कंडेया । सोडविलें तया शरण जा ॥ १ ॥
जयें प्रल्हादासीं रक्षिलें परोपरी । तोच तूं श्रीहरी सेवित जा ॥ २ ॥
ज्याचिया कृपेनें शस्त्रें न रुतलीं । अग्निज्वाला झाली शीतल कीं ॥ ३ ॥
पर्वतें झेलिलें जळानें तारिलें । ऐसें जेणें केलें महिमान ॥ ४ ॥
नको सोडूं देव ऐसा जो कृपाळू । करी प्रतिपाळू अहर्निश ॥ ५ ॥
जननीगर्भांत जेणें संरक्षिलें । तुज सोडविलें गर्भांतूनी ॥ ६ ॥
आजवरी जेणें तुज बा राखिलें । अन्नपाणि दिलें जेणें तुज ॥ ७ ॥
नको सोडूं देव, ऐसें ब्रीद ज्याचें । कोण वर्णी वाचे अनुपम ॥ ८ ॥
विनायक म्हणे देवासीं सोयरा । करीं रे पामरा भक्तीबळें ॥ ९ ॥

( ३१६ )

## भोळ्या भावाचा भुकेला

सोंगें ढोंगें जरी भजसील त्यासीं । तरि तो तुजसीं मुक्त करी ॥ १ ॥
जिव्हाळ्याची भक्ती जरी तूं योजिसी । तरी नाचविसी परंधाम ॥ २ ॥
भोळ्या भावाचा तो भुकेला श्रीदत्त । भक्ती हेंच वित्त अर्पी त्यासीं॥३॥
तया योगें तुष्ट होईल तुजसीं । मग सर्वस्वासीं ओपील तो ॥ ४ ॥
म्हणोनियां सेव तया अवधूता । धरी तत्परता त्याच्याठायीं ॥ ५ ॥
नाम घेई नित्य नाचूनी प्रेमानें । भुलेल आनंदानें दत्तात्रेय ॥ ६ ॥
चरित्र त्याचें गाई गुण त्याचे वर्णी । तुझ्या अंतःकरणीं संचरेल ॥७॥
जैसे जैसे बोल बोलसी प्रेमाचे । गहिंवर साचे येतील त्या ॥ ८ ॥
गहिंवरोनियां तुज तो भेटेल । तुजला घेईल निजस्कंधीं ॥ ९ ॥
सकळ दुःख तुझें हरोनी जाईल । सुखाचा होशिल निधि मग ॥ १० ॥
म्हणोनियां भज भज त्या दत्ताला । मग बा तुजला उणें नाहीं ॥ ११ ॥
विनायक म्हणे सार हें जाणोनी । दत्ताचे भजनीं सादर हो ॥ १२ ॥

( ३१७ )

## कधीं न सोडावें देवालागीं

अशक्य तें शक्य करोनी दाविल । तुज वांचविल निर्धार हा ॥ १ ॥
अनुभव ऐसा कथिला पुराणीं । तोच अंतःकरणीं विचारी तूं ॥ २ ॥
आजवरी तुज आला अनुभव । त्याची घे जाणीव आनंदाची ॥ ३ ॥
तैशीं साधुवाक्यें संतांचीं वचनें । विवेचि चित्तानें आपुल्या तूं ॥ ४ ॥
सहाय करोनियां मनीं सुविचार । पाववीं निर्धार मनालागीं ॥ ५ ॥
मनाच्या निर्धारें होई सक्त पदीं । मग तूं विपदीं पडसी ना ॥ ६ ॥
तयालागीं आहे सर्व तूझी चिंता । होय सोडविता तूज तोच ॥ ७ ॥
विनायक म्हणे घ्यावें तुवां नाम । कधीं न पूर्ण काम सोडावा तो ॥८॥

## ( ३१८ )

# कधीं न सोडावें देवालागीं

सोडोनियां कोठें जाशील त्या सांग । पावसील भंग सोडितां त्या ॥१॥
त्याचे वीण गति अन्य तुज नाहीं । फसूं नको पाहीं मोहबळें ॥ २ ॥
त्यासीं आहे लाज आपुल्या भक्ताची । दृढता हे साची मनीं धरीं ॥३॥
राखील तो लाज अभिमानी देव । दयाळु स्वभाव त्याचा सदा ॥ ४ ॥
अभिमानी आहे आपुल्या दासांचा । निकट वसे साचा दयोदित ॥५॥
राखील भक्तांसीं भीड न धरील । उडी तो घालिल संकटांत ॥ ६ ॥
म्हणोनियां भज भजरे त्या देवा । जयाच्या वैभवा तोड नाहीं ॥ ७ ॥
विनायक म्हणे वळे कृपाघन । करितां भजन निश्चय हा ॥ ८ ॥

## ( ३१९ )

# कधीं न सोडावें देवालागीं

निर्वाणीचा सदा एक दत्तात्रेय । धरीं त्याचे पाय जीवें भावें ॥ १ ॥
कोणी भेडसावो कोणी मोह दावो । कोणी तुज खावो कांहीं होवो ॥२॥
सोडूं नको पाय साधन निर्वाणीचें । करूं नको काचें मन निज ॥ ३ ॥
धैर्याचा तूं मेरू होवोनियां राहीं । भय मनीं कांहीं आणूं नको ॥ ४ ॥
नको मनीं कांहीं भलतें तूं चिंतूं । नको तुज परंतु पण कांहीं ॥ ५ ॥
सकळ निश्चयांत एकचि तूं धरी । अवघा मुरारी सर्व कांहीं ॥ ६ ॥
गतिची हे गति प्राणाचा हा प्राण । येथें नाहीं वाण कसलीच ॥ ७ ॥
परिपूर्ण ऐसें स्वरूप दत्ताचें । निर्धारावें साचें मनामधीं ॥ ८ ॥
धांवेल तो देव सोडवील तुज । तुझी तरी लाज राखील तो ॥ ९ ॥
विनायक म्हणे निश्चयाचा भाव । धरितां दत्तदेव तारील कीं ॥ १० ॥

( ३२० )

## ईश्वराच्या अतर्क्य लीला

मंगळवार ता. १४।१०।१९३०

देवा तूझी लीला कैशी कळणार । आम्हां समजणार अज्ञानांना ॥ १ ॥
डोळे असुनी अंध, आम्हीं अज्ञानानें । ऐकूं ये ना कानें कांहीं आम्हां २
वाचा असोनियां मूक आम्हीं झालों । अबुद्ध बनलों अज्ञानानें ॥ ३ ॥
कांहीं न चालत वार्ता या बुद्धिची । येथें विचाराची उलट होत ॥ ४ ॥
कांहीं जरी केलें न कळे आम्हांसीं । तुझ्या संकल्पासी बोलतां नये ॥५॥
आम्हीं जें जें कांहीं ठरवावें भक्तीनें । तुझ्या संकल्पानें न तें होय ॥६॥
विनायक म्हणे आम्हां पामरांची । कैशी चाले मती तुझ्याठायीं ॥ ७॥

( ३२१ )

## सुदामकथा

तूंच एक ज्ञाता सकळ जाणसीं । मंगळ करिसी सकळांचें ॥ १ ॥
आमुच्या दृष्टीला विपरीत दिसे । दुःखयुक्त भासे आम्हांलागीं ॥ २ ॥
परी परिणामीं होत हितकर । अनुभव, श्रीकर, येतो ऐसा ॥ ३ ॥
ज्यानें त्यानें निज चरित्र पहावें । मर्म ओळखावें विवेकानें ॥ ४ ॥
घाबरटपणा आम्हां अज्ञानानें । स्वभाव-धर्मानें येत असे ॥ ५ ॥
श्रीकृष्णाचा सखा सुदामा ब्राह्मण । द्वारकीं प्रयाण करीतसे ॥ ६ ॥
ऐश्वर्याचा निधि श्रीकृष्ण परम । दारिद्र्याचें धाम सुदामा हा ॥ ७ ॥
ऐशा संकल्पानें भेटत कृष्णासीं । देईल भक्तासीं म्हणोनियां ॥ ८ ॥
बहुमान केला सुदाम देवाचा । देव न वदे वाचा दक्षिणेची ॥ ९ ॥
खिन्न झाला मग तो तेथोनि निघत । देव निरोपित सन्मानानें ॥ १० ॥
बालपणींचा मित्र मज उपेक्षितो । कांहीं न जाणतो पूर्ववृत्त ॥ ११
मित्र म्हणे मनीं कोणि न कोणाचा । खेळ हा दैवाचा म्हणतसे ॥ १२॥

भडभडोनियां त्यासीं फार आलें । जळानें भरले नेत्र त्याचे ॥ १३ ॥
क्षणभर कांहीं तयासिं दिसेना । कैसें मी वर्णना करूं त्याच्या ॥ १४ ॥
कांहीं पुढें जातां सुवर्ण नगरी । दिसतसे खरी तयालागीं ॥ १५ ॥
तया वाटे मार्ग माझा मी चुकलों । पुनः परतलों मानीतसे ॥ १६ ॥
तंव पुढें येती अमात्य तयाचे । म्हणती नगरीचे तुम्हीं राजे ॥ १७ ॥
तेव्हां कळोनियां आलें त्या विप्रासीं । देवें वैभवासीं चढविलें ॥ १८ ॥
ओशाळला मनीं, म्हणे मीं अज्ञान । चरित्र गहन तुझें देवा ॥ १९ ॥
विनायक म्हणे ईश्वर भजन । माहात्म्य कळे न अज्ञानानें ॥ २० ॥

## ( ३२२ )

## भ्याडपण भरे अज्ञानानें

सुखाठायीं दुःख दुःखाठायीं सुख । अमृतासीं विख जाणवीत ॥ १ ॥
बाधा कल्पनेची तळमळवी मना । विकृत गर्जना करोनीयां ॥ २ ॥
तेणें अज्ञ नर दूषितो देवासीं । व्यर्थ संशयासीं धरूं पाहे ॥ ३ ॥
परि हा सर्व आहे मायेचा बाजार । तो दयासागर कृपासिंधू ॥ ४ ॥
अहित आमुचें देव तो करिल । वांकडा होईल आम्हांसीं कीं ॥ ५ ॥
अहित आमुचें खचित साधणार । ऐसा कां निर्धार मनामध्यें ॥ ६ ॥
हेंच विलक्षण अगम्य हें सारें । भ्याडपण भरे अज्ञानानें ॥ ७ ॥
विनायक म्हणे आमुचें अज्ञान । आम्हां दयाघन सांभाळावें ॥ ८ ॥

## ( ३२३ )

## अज्ञानानें ईश्वरावर दोषारोप

आमुचें कल्याण नित्य तूं साधिसी । सदा तूं वससी हृदयामाजी ॥ १ ॥
प्रसन्न वरद सन्मुख असती । कृपेनें पाहसी सर्वांलागीं ॥ २ ॥
आमुचें जडभारी घेतोसीं तूं शिरीं । आम्हांसीं संसारीं रक्षितोसी ॥३॥

निष्ठुर म्हणतों तुज कृपाघना । दूषणातें नाना देतों तूज ॥ ४ ॥
आरोप करितों किती तुजवरी । अगणित श्रीहरी अज्ञानानें ॥ ५ ॥
विनायक म्हणे आम्हां निर्लज्जांसीं । क्षमाच करिसी दयाघना ॥ ६ ॥

(३२४)

## अज्ञानानें ईश्वरावर दोषारोप

जन्मोजन्मींचा तूं आमुचा सांगाती । आमुचें तुजप्रती सर्व ठावें ॥ १ ॥
जन्मकर्म आमुचें पापपुण्य तैसें । तुज ठावें असे सर्व कांहीं ॥ २ ॥
वर्तमान भूत भविष्य जें कांहीं । सकल तें पाहीं ठावें असे ॥ ३ ॥
सर्वज्ञ तूं देव पुढील जाणसी। तैसा घडविसी योग जाण ॥ ४ ॥
आम्हींच अज्ञानी काहीं न कळत । मुळीं न वळत कांहीं देवा ॥ ५ ॥
पुन्हां पुन्हां पुन्हां करितों आक्रोश । प्रभु जगदीश तुजवरी ॥ ६ ॥
क्षणोक्षणीं देवा तुजला गांजितों । तुजला करितों कटूत्तरें ॥ ७ ॥
चरणीं शरण शरण चरणां । तरी नारायणा कृपा करीं ॥ ८॥
विनायक म्हणे तुजसीं वर्णितों । तुजसीं दूषितों अज्ञानानें ॥ ९ ॥

(३२५)

## प्रभुवात्सल्यवर्णन व क्षमायाचना

परि तूं दयेचा पुतळा गमसी । निष्ठुर न बनसी कांहीं केल्या ॥ १ ॥
कृतघ्न जरी आम्हीं, मनीं न आणिसी। सर्वांतें करिसी कृपा आम्हां॥२॥
आमुचा कळवळा तुजला स्नेहाळा । उपमा प्रेमळा तुज नाहीं ॥ ३ ॥
पामागें उभा राहोनी सदया । करीतोसी छाया कृपेची तूं ॥ ४ ॥
अद्भुत हें आहे तुझें कृत्य देवा । दृष्टांत माधवा अन्य नाहीं ॥ ५ ॥
तुझें तुला साजे ऐसेंच गमत । दत्त भगवंत कृपावंत ॥ ६ ॥
तुझ्याठायीं सर्व केलें समरस । देवा मी भक्तिस धरोनियां ॥ ७ ॥

माझें हें हृदय तुज मिळविलें । संपन्न बनलें तुझ्याठायीं ॥ ८ ॥
क्षमा करीं आतां मज क्षमावंता । चुकलों मीं ताता बहुत कीं ॥ ९ ॥
नको आणूं मनीं माझे अपराध । शमवाया क्रोध दयावंता ॥ १० ॥
प्रसन्न होवोनी कृपेनें तूं पाहे । पाठीमागें राहे माझ्या ऊभा ॥ ११ ॥
जन्मोजन्मींची हे मैत्री देवा असे । कधीं न तुटतसे तुझ्या कृपें ॥ १२ ॥
विनायक म्हणे मज सुखमय । माझा गुरुराय करीतसे ॥ १३ ॥

( ३२६ )

## धांवा

बुधवार ता० १५।१०।१९३०

तुझिया पदांचा केला मी आश्रय । जाणोनि उपाय एवढाच ॥ १ ॥
फुकट गेले माझे अन्यत्रींचे श्रम । नाहीं माझा काम सिद्ध झाला ॥२॥
एकचि साधन दिसत चक्षूंपुढें । पायीं नत गाढें होणें तुझ्या ॥ ३ ॥
विनायक म्हणे येवढीच सोय । दत्ता तुझे पाय सेवितसें ॥ ४ ॥

( ३२७ )

## ‘ समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी ’

सकळ विश्वास अर्पणें तुजसीं । सेवणें तुजसीं दत्तात्रेय ॥ १ ॥
विनवणी तूज करित असणें । तुजला स्तविणें युक्त-मनें ॥ २ ॥
खातां पितां कांहीं उद्योग करितां । तुझे ठायीं चित्ता नियोजणें ॥ ३ ॥
जे का तूज प्रिय तेंच आचरणें । बोलणें चालणें तुझ्या इच्छे ॥ ४ ॥
आचार विचार उच्चार त्वन्मय । वासुदेव कार्य रात्रंदिस ॥ ५ ॥
विनायक म्हणे साधितां हा योग । होतसे वियोग मृत्यु जन्मां ॥ ६ ॥

## ( ३२८ )

# धांवा

बहु दुखावलों बहु निर्बुजलों । बहूत त्रासलों कृपावंता ॥ १ ॥
विश्रांति या जीवा कधीं न लाभली । हळहळ भली सदा वाही ॥ २ ॥
जे जें कांहीं केलें नाथा आजवरी । यशा नरहरी नाहीं आलें ॥ ३ ॥
सकळ व्यर्थ झालें माझें हें जीवित । पुढती दिसत गति न कांहीं ॥ ४ ॥
कोण माझा आतां सांग कैवारीया । उडी घालोनियां तारी जो का ॥ ५ ॥
आजवरी ज्यासीं सेविलें भक्तीनें । त्यानेंच धावणें केलें पाहिजे ॥ ६ ॥
घोर अंधःकार भविष्य काळाचा । उभा राहे साचा दृष्टिपुढें ॥ ७ ॥
आतां सांग कोणा विनवूं सद्गुरु । कैसें सांग धरूं चित्तासीं मी ॥ ८ ॥
विनायक येतो तुज काकुळती । धांव तूं श्रीपति लवलाहें ॥ ९ ॥

## ( ३२९ )

# धांवा

मजला आधार कांहीं न ऊरला । बहु काचावला दास तुझा ॥ १ ॥
कातर हृदय कांपे चळचळां । वांचावि स्नेहाळा निजदासा ॥ २ ॥
शुष्क झालीं गात्रें उत्साह भंगला । सदया तुजला दया येवो ॥ ३ ॥
शून्य झालें मज दृष्टीसीं आंधेरी । येतसे श्रीहरी धांव आतां ॥ ४ ॥
कोरड घशाशीं पडत चालली । सकळ आटली शक्ति माझी ॥ ५ ॥
धांव तरी आतां उडी घे प्रेमळा । मजसीं स्नेहाळा वांचवावें ॥ ६ ॥
कैसें हें हृदय तुझें न द्रवत । अजुनि कां स्वस्थ दत्तात्रेया ॥ ७ ॥
विनायक म्हणे झालों मी घाबरा । तरी आतां त्वरा करा दत्ता ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८०९ वि:


( ३३० )

## धांवा

होवोनियां भक्त तुझा पुरुषोत्तमा । विनष्टि परमा काय असे ॥ १ ॥
बुडालों बुडालों सर्वस्वीं बुडालों । फजित जाहलों अत्रिसुता ॥ २ ॥
नाहीं स्वार्थ नाहीं तैसा परमार्थ । दोन्हीं माझे अर्थ हरपले ॥ ३ ॥
वायां झालें सारें जें मी कांहीं केलें । फळासीं न आलें कृपावंता ॥ ४ ॥
तुझाही तो ठाव मज गवसेना । काय करुणाघना करूं आतां ॥ ५ ॥
नको दूर लोटूं करीं अंगिकार । दयेचा सागर एक तूंच ॥ ६ ॥
विनायक आहे जाहला निराश । तरी जगदीश कृपा करा ॥ ७ ॥

( ३३१ )

## धांवा

काय बोलणार अज्ञानी पामर । तूंच तारणार धांव घेई ॥ १ ॥
सकळ कळत तुज सर्वज्ञाना । माझी वृथा वल्गना मुळींहुनी ॥ २ ॥
धरोनियां आशा तुज मी सेविलें । विश्वासा धरिलें तुझ्याठायीं ॥ ३ ॥
तरी नको माझा आशाभंग करूं । अज्ञान लेंकरूं अंगिकारीं ॥ ४ ॥
सर्व अहंकार चित्ताचे गळाले । निर्वाणचि झालें असें मज ॥ ५ ॥
पुरवावी आशा माझी रमापति । आशाळु निश्चिती थोर आहें ॥ ६ ॥
नको कठोरता देवा चित्तीं धरूं । आशाभंग करूं नको नको ॥ ७ ॥
लोळतें हें बाळ तुझिये चरणीं । तरी चक्रपाणी नको वेळ ॥ ८ ॥
नोहे सवतीचा तुझाच मी बाळ । आहें लडिवाळ गुरुमाई ॥ ९ ॥
विनायक म्हणे काम माझा पूर्ण । अहो नारायण करा तुम्हीं ॥ १० ॥

( ३३२ )

## नाममंत्र व त्याचा प्रभाव

गुरुवार ता. १६।१०।१९३०

तूझें नाम हाचि श्रेष्ठमंत्र जगीं । साधन मुक्तिलागीं अलौकिक ॥ १ ॥
भवरोगाचें हें अद्भुत नाशन । दिव्य रसायण अनुपम ॥ २ ॥
कसलाही रोगी येणें साध्य होतो । प्रभाव चालतो औषधांचा ॥ ३ ॥
कफ पित्त वात त्रिदोष प्रख्यात । मंत्र शमवित निजबळें ॥ ४ ॥
सत्त्व रज तम दोष हा त्रिगुण । करी उच्चाटण औषध हें ॥ ५ ॥
यमाचाही येथें उपाय चालेना । मंत्राच्या साधना ज्यानें केलें ॥ ६ ॥
अजिंक्य हा होतो सकळां पामर । मंत्र ज्या साचार सिद्ध झाला ॥७॥
विनायक म्हणे बळ हें विशेष । रोगहरी निःशेष नाममंत्र ॥ ८ ॥

( ३३३ )

## नाममंत्र व त्याचा प्रभाव

नेत्ररोग झाला असे आम्हांलागीं । विपरीत जगीं दिसतसे ॥ १ ॥
सत्य तें असत्य, असत्य तें सत्य । दिसे सत्यासत्य व्युत्क्रमानें ॥ २ ॥
जेथें जळ तेथें भूमि दिसतसे । भूमि भासतसे जल जेंविं ॥ ३ ॥
विपरीत ऐसा दृष्टिचा प्रकार । दृष्टीदोष साचार असाध्यसा ॥ ४ ॥
कोणतीही येथें वनस्पति चालेना । अज्ञान जाईना निरसोनी ॥ ५ ॥
जों जों कांहीं द्यावें अगद कल्पोनी । सारा ये दाटोनी अधिकचि ॥६॥
परी नाममंत्र प्रभाव दुर्गम । होत उपशम सहजचि ॥ ७ ॥
दिव्य ज्ञान होत मंत्रजप त्यासीं । पाहे प्रकाशासीं निजठायीं ॥ ८ ॥
दृष्टि येत त्यासीं सत्य दिसों लागे । स्वरूपीं तो जागे मंत्रसिद्ध ॥ ९ ॥
विनायक म्हणे औषधि हे सेवा । रोगातें घालवा मुळींहूनि ॥ १० ॥

( ३३४ )

## नाममंत्र व त्याचा प्रभाव

नाना रोग जगीं विख्यात असती । देहासीं पीडिती परोपरीं ॥ १ ॥
देह मन बुद्धि तिघांसीं विकार । करिती साचार रोग बहु ॥ २ ॥
नाना रूपधारी एकचि हा रोग । देत असे भोग जीवालागीं ॥ ३ ॥
त्याच्चिया शमना नाममंत्र जपा । मग सर्व तापा परिहरा ॥ ४ ॥
नाममंत्र जरी सुखानें जपाल । आरोग्य होईल तुम्हांलागीं ॥ ५ ॥
मृत्युभय नाहीं नामधारकांसीं । तरी निश्चयेंसीं जप करा ॥ ६ ॥
अमर होवोनी विचाराल जगीं । भोग तुम्हांलागीं स्पर्शिनाच ॥ ७ ॥
विनायक म्हणे सर्व रोग भोग । नाममंत्रें भंग पावतील ॥ ८ ॥

(३३५)

## स्वभावास औषध नाममंत्र

स्वभावासीं नाहीं औषध म्हणती । पंडित सांगती अनुभव ॥ १ ॥
आजवरी ऐसा प्रवाद चालत । सत्यचि मानित जनलोक ॥ २ ॥
परि नाममंत्रधारक जो नर । अनुभव साचार त्या उलटा ॥ ३ ॥
नाममंत्राची हे दिव्य मात्रा घेतां । स्वभाव शुद्धता होत असे ॥ ४ ॥
शोधन करीत मात्रा स्वभावाचें । पालटत साचें रूप त्याचें ॥ ५ ॥
म्हणोनियां नाममंत्र हा सेवावा । देह न कष्टवावा इतरत्र ॥ ६ ॥
विनायक म्हणे दिव्य हे औषधि । सेवोनियां साधी निजहित ॥ ७ ॥

( ३३६ )

# स्वभावास औषध नाममंत्र

गूढ जरी आहे अंतर आपुलें । दृष्टिं न दिसे भलें जरी जाणा ॥ १ ॥
तया रोग होतां असाध्य वाटत । प्रत्यया न येत रोग त्याचा ॥ २ ॥
लक्षणावरोनी मति न चालत । आरोग्य भासत जैसें कांहीं ॥ ३ ॥
मोठे मोठे वैद्य येथें फसताती । निदान करिती भलतेंच ॥ ४ ॥
याही रोगावरी औषध हा मंत्र । प्रभाव विचित्र याचा आहे ॥ ५ ॥
रोगाचा प्रकाश करित सेवितां । दावि प्रत्यक्षता विशदत्वें ॥ ६ ॥
विशद करोनी रोग तो दाखवी । किरण प्रकाशवी स्वतेजाचा ॥ ७ ॥
भ्रांति भूल सारी टाकी दवडोनी । प्रत्ययास आणी रोग मंत्र ॥ ८ ॥
मग प्रभावातें आपुल्या दावित । रोगासीं नाशित एकसरें ॥ ९ ॥
शुद्ध करी मग अंतर प्रभावें । ऐसें हें जाणावें महिमान ॥ १० ॥
विनायक म्हणे असाध्य कांहीं नाहीं। नामालागीं पाहीं जगत्रयीं॥११॥

( ३३७ )

# वाल्मीकि चरित

दृष्टांतासीं घ्यावें वाल्मीकि चरित । दिसेल उद्धृत नामयश ॥ १ ॥
पहिला वाटमाऱ्या जाळपोळ करी । जीवातें संहारी द्रव्यासाठीं ॥ २ ॥
द्रव्य हा ईश्वर द्रव्य हाच मोक्ष । हाच श्रुति पक्ष मानी वाल्या ॥ ३ ॥
कांहींही करोनी धन मेळवावें । कांहीं न पहावें तारतम्य ॥ ४ ॥
पापपुण्य क्षिती मुळीं न बाळगावी । धनें सांठवावीं प्रयत्नानें ॥ ५ ॥
हाच रोग त्यासीं जडला दुर्धर । नयन विकार थोर झाला ॥ ६ ॥
देह मन बुद्धि रोगग्रस्त झालीं । अंतरीं जडली थोर व्याधि ॥ ७ ॥
ऐसा नासला तो रोगानें पामर । पाप अनिवार करीतसे ॥ ८ ॥

कितीं जीव हिंसा तयास घडली । मिती नाहीं भली म्हणताती ॥ ९ ॥
ऐसा रोग रूप होवो निवर्तत । अपथ्य सेवीत धन लोभ ॥ १० ॥
धनाचीच तृष्णा धनाचीच क्षुधा । त्यासीं होत बाधा धनाचीच ॥११॥
कांहीं केल्या तृप्ति पावेना अंतर । करिन संहार अधिकचि ॥ १२ ॥
विनायक म्हणे रोगरूप झाला । परि न कळे त्याला भ्रांति पडे ॥१३॥

( ३३८ )

## वाल्मीकिचरित

तयालागीं वैद्य भेटला अतुल । परम दयाळ कारुणिक ॥ १ ॥
नारद महर्षि तयामार्गें जाती । सांपडती हातीं वालियाच्या ॥ २ ॥
मारायासीं जातां नारद बोलती । कां तूं आम्हांप्रती मारितोसी ॥ ३ ॥
येरु म्हणे धन हेंच माझें काज । म्हणोनि महाराज मारितों मी ॥ ४ ॥
आजवरी केल्या अनंत मी हिंसा । परि धन पिपासा गेली नाहीं ॥ ५ ॥
नारद म्हणती कोणासाठीं धन । सांग सांठवून ठेवितोसी ॥ ६ ॥
येरु म्हणे भार्यापुत्रांसाठीं धन । करणें संपादन माझा धर्म ॥ ७ ॥
नारद विचारिती पाप जें घडलें । तुजलागीं भलें या दुर्मार्गें ॥ ८ ॥
त्याचा वांटेकरी आहे काय कोणी । शोधोनी हें जाणी सूज्ञ नरा ॥९॥
येरु म्हणे सर्व भार्यापुत्रांसाठीं । खटपट मोठी माझी सदा ॥ १० ॥
वांटेकरी तेव्हां होतील सर्वही । धनभोग पाहीं घडे त्यांसीं ॥ ११ ॥
नारद म्हणती चुकसी वालियारे । शोध तूं करीरें विचक्षणा ॥ १२ ॥
जेव्हां त्या कळलें पापालागीं धनी । नाहींतची कोणी उमगला ॥ १३ ॥
सकळीं सांगितलें ज्याचा तोच धनी । कर्तव्य पोषणीं आम्तुच्या तूझें॥१४॥
नाममंत्रकानीं नारद मुखांतुनी । राहिला शिरोनी संभाषणीं ॥ १५ ॥
तेणें दृष्टी त्याची क्षणें निवळली । भ्रांति सर्व गेली हरोनियां ॥ १६ ॥
मग नारदासी शरण जाहला । म्हणे उपायाला करा कांहीं ॥ १७ ॥
विनायक म्हणे पावतां सद्बोधा । त्याची रोगबाधा हरूं लागे ॥ १८ ॥

( ३३९ )

## वाल्मीकिचरित

मग नारदांनीं मंत्र पढविला । त्याचीया जिव्हेला उमेटना ॥ १ ॥
रोगाचें लक्षण परम जहर । इंद्रियां विकार थोर असे ॥ २ ॥
जिव्हेलागीं नाममंत्र तो येईना । बहु दुःख मना त्याच्या झालें ॥ ३ ॥
उलटीं अक्षरें ऋषि पढविती । त्यासिं बैसवीती जपालागीं ॥ ४ ॥
परतोनी मी जों येईन तोंवरी । बैस तूं निर्धारीं मंत्रजपीं ॥ ५ ॥
विनायक म्हणे स्वभाव पालटला । वाल्या स्थिर झाला मंत्रबळें ॥ ६ ॥

( ३४० )

## वाल्मीकिचरित

जपत राहिला देहा विसरला । न क्षुधा तृषेला गणी कांहीं ॥ १ ॥
मन बुद्धि सर्व एकचि बनलीं । तदाकार झाली वृत्ति त्याची ॥ २ ॥
वारुळ वाढलें तयाचे शरीरीं । नाहीं भानावरी वाल्मीकी तो ॥ ३ ॥
भूमिमय झाला जैसा कीं स्थावर । मंत्राचा प्रकार ऐसा असे ॥ ४ ॥
गेला रोग भोग शोधन जहालें । दिव्यत्व पावलें तयालागीं ॥ ५ ॥
तंव तेथें आले महर्षि नारद । पाहूनी वरद झाले त्यासीं ॥ ६ ॥
तेव्हां पासोनियां वाल्याकोळियाचा । सिद्ध पुरुषसाचा झाला जाणा॥७
वाल्मीकि महर्षि पदातें पावला । धन्य तो जाहला तिहीं लोकीं ॥ ८ ॥
तेणें रामायण जैसें रचीयेलें । रामें तैसें केलें आचरण ॥ ९ ॥
विनायक म्हणे उत्कर्ष नामाचा । ऐसा आहे साचा बोध घ्यावा ॥१०॥

## ( ३४१ )

# नाममंत्र व त्याचा प्रभाव

जपतां नाममंत्र देह मन बुद्धि । पावताती शुद्धि परमचि ॥ १ ॥
माया भ्रम जो का जडलासे रोग । भोगवीतो भोग दारुण जो ॥ २ ॥
तयाचा निरास नाममंत्र करी । औषधि हे तरी दिव्य जाणा ॥ ३ ॥
म्हणोनियां ध्यावें सदा हरिनाम । तेणें सर्वकाम पूर्ण होती ॥ ४ ॥
विनायक म्हणे ऐसा हा निष्कर्ष । नामाचा उत्कर्ष जाणावा हा ॥५॥

## ( ३४२ )

# चित्तस्थैर्यासाठीं प्रार्थना

शुक्रवार ता० १७।१०।१९३०

चित्त-निरोधासीं साधणें कठीण । म्हणोन चरण धरीयेले ॥ १ ॥
भजनपूजनीं होवोनी सादर । स्थिर हें अंतर करूं इच्छीं ॥ २ ॥
जितुकें होईल तितुकें मी स्थैर्य । आणाया गुरुराय झटतसें ॥ ३ ॥
साह्य करणार तुम्हींच मजला । बनाव माझा भला करणार ॥ ४ ॥
काम्य माझें नाथ त्वरित पुरवावें । निश्चल करावें मजलागीं ॥ ५ ॥
विनायक म्हणे माझी भयभीति । घालवा श्रीपति त्वरितची ॥ ६ ॥

## ( ३४३ )

# धांवा

माझें कर्तव्य मी आचरित आहें । तुज भजता हें प्रेमभरें ॥ १ ॥
धरोनी विश्वास तुजला सेवितों । गुह्य हें सांगतों तुजपाशीं ॥ २ ॥
जैसें हृदय तैसें तुज निवेदितों । ताप शमवितों तुजपाशीं ॥ ३ ॥

धरोनी कामना तुज मी सेवितों । अभय मागतों तुझ्यापाशीं ॥ ४ ॥
भयभीत नाथा लपाया पाठीसीं । मागें आश्रयासी तुझ्यापाशीं ॥ ५ ॥
कठिण प्रसंग संकट दुर्धर । बाधत साचार मजलागीं ॥ ६ ॥
तरि आतां मज पाठीसीं घालावें । संकटांत पावे मजलागीं ॥ ७ ॥
उपाय मजसीं दुजा नसे कांहीं । म्हणोनियां पाहीं शरणागत ॥ ८ ॥
दुर्धर प्रसंगा तोंड द्यावयासीं । दुजा न सजसीं कोणी त्राता ॥ ९ ॥
तूंच प्रतिभट शोभसी संकटा । योद्धा तूं गोमटा अग्नितुल्य ॥ १० ॥
विनायक म्हणे मज रक्षायासीं । घालावें पाठीसीं दत्तनाथा ॥ ११ ॥

## ( ३४४ )

## धांवा

माझ्या संकटांचा करावा विनाश । मुळीं अवकाश देऊं नका ॥ १ ॥
सत्त्वर प्रगटा वांचवाया दीना । कारण मन्मना धीर नाहीं ॥ २ ॥
नाहीं कोणी माझा लाज राखणारा । श्रीगुरु उदारा तुजवीण ॥ ३ ॥
नको पाहूं माझें कांहींच तूं आतां । कुलशील ताता जगन्नाथा ॥ ४ ॥
पूर्वींचें आतांचें नको पाहूं कर्म । पावोत विराम संकटेंहीं ॥ ५ ॥
चुकलोंच आहे आजवरी नाथा । मुकलोंसें अर्था बहूतचीं ॥ ६ ॥
परि तें कांहीं आतां नको मनीं आणूं । भक्तीचें प्रमाणू मोजुं नका ॥ ७ ॥
भक्त कीं अभक्त मी न कांहीं असें । उभय होतसें भक्ताभक्त ॥ ८ ॥
परीं त्याचा आतां न करिं विचार । सद्गुरु उदार कृपाघन ॥ ९ ॥
विनायक म्हणे करावें धांवणें । अनमान करणें युक्त नसें ॥ १० ॥

## ( ३४५ )

## धांवा

कांहीं झालें तरी शरण असे झालों । तुजपाशीं आलों असें आतां ॥ १ ॥
ढोंग सोंग किंवा कोणत्याही मिषें । तुज स्तवीतसें कृपावंता ॥ २ ॥

पापाचीया योगें संकटीं पडलों । परम असे भ्यालों अंतरांत ॥ ३ ॥
पडलों अग्नींत पडलों जळांत । पडत खोलांत तैसें झालें ॥ ४ ॥
झडकरीं धांव घेईं रे सखया । माझी या हृदया धीर द्याया ॥ ५ ॥
विनायक म्हणे अगा जगदाधारा । करा साक्षात्कारा सत्वरची ॥ ६ ॥

( ३४६ )

## धांवा

पळ पळ पळ जैसा काळ जातो । गळयासीं पडतो फांस माझ्या ॥ १ ॥
नको करूं आतां माझें तूं निर्वाण । कासावीस प्राण माझे आतां ॥२॥
मज मूर्खालागीं देवा कैंचें ज्ञान । सकळ अज्ञान माझे ठायीं ॥ ३ ॥
तेणें भयभीत शरण चरणीं । मज चक्रपाणी वांचवावें ॥ ४ ॥
विनायक म्हणे उडी घाली त्वरें । यालागीं सत्त्वरें तारीं आतां ॥ ५ ॥

( ३४७ )

## धांवा

पदर पसरीला नाथा तुझे पुढें । मज आतां गाढें वांचवावें ॥ १ ॥
निराशेचें मना झटकेच येती । ऐशी परिस्थीती झाली आहे ॥ २ ॥
डचमळोनियां रडें येत मज । माझी आतां लाज राखींराखीं ॥ ३ ॥
स्फुंदोनीस्फुंदोनी देवा मी रडतों । तुजसीं पाहतों केंविलवाणा ॥ ४ ॥
साहायार्थ नाथा मुखाअवलोकितों । भाव मी कथितों माझा स्पष्ट ॥५॥
माझें दैन्य हरा दोषां क्षमा करा । करा साक्षात्कारा लवलाहें ॥ ६ ॥
दीन गरीब हा विनायकदास । याजला प्रीतीस करावें कीं ॥ ७ ॥

( ३४८ )

## धांवा

जें जें कांहीं मनीं तें तें मी बोलिलों । शरण जाहलों तूझे पायीं ॥१॥
नाहीं धीर मज झालों उतावळा । मज आतां स्नेहाळा संवधावें ॥ २ ॥
संकटांचा व्हावा पूर्णाचि निरास । शुभाचि विशेष घडुनी यावें ॥ ३ ॥
विनायक म्हणे बोलायाचें जें का सद्गुरु तारका कळविलें ॥ ४ ॥

( ३४९ )

## धांवा

माझे बोलण्याचा हेतु समजोनी । उडी त्वां घेउनी प्रगटावें ॥ १ ॥
करावा दुःखाचा सकल परिहार । श्रीगुरु उदार कृपासिंधू ॥ २ ॥
साक्षात्कार करा येथें जगन्नाथा । पुरवावें अर्था मनींचिया ॥ ३ ॥
विनायक म्हणे कष्ट निवारण । करा नारायण सत्त्वरेंसीं ॥ ४ ॥

( ३५० )

## श्रीपाद पुण्यतिथी व सप्ताह समाप्ति

शनिवार ता. १८।१०।१९३०

नमूं श्रीपादांसीं नमूं नरहरींसीं । नमूं दत्तात्रेयासीं कुलेशासीं ॥ १ ॥
नमूं वासुदेवा नमूं गुरुदेवा । नमूं त्या माधवा कृपावंता ॥ २ ॥
हरिहर विरिंचीचा अवतार । तया नमस्कार करूं आतां ॥ ३ ॥
तोचि पूर्णानंद तोचि वासुदेव । ब्रह्माण्डांत भाव सर्व ज्याचा ॥ ४ ॥
तयासिं नमितां सकलां नमन । होतसे पावन निश्चयेंसीं ॥ ५ ॥

म्हणोनियां त्यासीं नमितों मी प्रेमें । अभ्युदय कामें विश्वंभरा ॥ ६ ॥
अभ्युदय माझा त्यांनीं साधवावा । माझा पुरवावा हेतू त्यांनीं ॥ ७ ॥
व्रत अनुष्ठान चालविलें असे । त्यांनीं भरंवसे पूर्ण कीजे ॥ ८ ॥
मागें आशीर्वाद आज्ञेतें मागत । होवोनी विनत चरणांसीं ॥ ९ ॥
आरंभ करितों मंगलाचरणें । सिद्ध हें करणें कार्य त्यांनीं ॥ १० ॥
पुण्यदिन आज श्रीपादरायांचा । केला स्वरूपाचा अंगिकार ॥ ११ ॥
निजरूपीं झाले लीन मुनिवर । तोच दिनवर आजिचा कीं ॥ १२ ॥
आश्विन मासाची कृष्ण जे द्वादशी। सूर्य मध्यान्हासीं येतां जाणा ॥१३॥
श्रीपादमुनीश निजरूपीं मग्न । स्वरूपीं संलग्न झाले जाणा ॥ १४ ॥
तोचि पुण्यदिन आज हा पातला । पाहिजे स्मरला कृतज्ञ ते ॥ १५ ॥
करूनियां ऐशी पुण्यादिन स्मृती । करितों प्रणती श्रीपादांसी ॥ १६ ॥
आरंभिलें कार्य सिद्ध करवावें । आशीर्वाद द्यावे मजलागीं ॥ १७ ॥
सप्ताह समाप्ति आजचीये दिनीं । मज वरदानी सिद्ध करा ॥ १८ ॥
कार्यसिद्ध व्हावें फलातें पावावें । मनोगत साधावें माझें दत्ता ॥ १९ ॥
पूर्ण काम व्हावें तुमच्या प्रसादें । ऐसें त्वां वरदें करणें कीं ॥ २० ॥
विनायक मागे विजयाचा वर । तरी श्री गुरुवर द्यावा मज ॥ २१ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ३८८०५ दि. ७।२।८।
१६८० क्रं. २ १४।८।६५

# उत्सवाची मागणी

# विषय


| | प्रबंध नं० |
|---|---|
| बळ समृद्धि व दुःसंग नाशाची मागणी | ३५९ |
| 'आमुच्या मनासम होय' | ३६३ |
| बालभावाची मागणी | ३६६ |
| विघ्ननाशाची मागणी | ३६८ |
| करुणदेवास विनंति | ३७० |
| आनुकूल्य मागणी | ३७९,३५६ |

# उत्सवाची मागणी

( ३५१ )

गुरुवार ता. २०।६।१९२९

उत्सव तुमचा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
स्वयें येथें प्रगटोनी । आम्हां लागीं बळ देवोनी ॥ २ ॥
निज कृपेतें करोनी । आनुकूल्यातें देवोनी ॥ ३ ॥
समर्थ आम्हांलागीं करा । श्रीगुरुराया अत्रिकुमरा ॥ ४ ॥
कृपादृष्टीं आम्हां पहावें । आम्हांठायीं संचरावें ॥ ५ ॥
बलवंत आम्हां करा । संपन्न आम्हांलागीं करा ॥ ६ ॥
कार्य तुमचें उत्सव तुमचा । दासही हा असे तुमचा ॥ ७ ॥
याच्यासाठीं कृपाकरा । प्रगट भाव येथें धरा ॥ ८ ॥
विनायक तुमचा दास । पुरवावी त्याची आस ॥ ९ ॥

( ३५२ )

गुरुवार ता. २७।६।१९२९

उत्सव तुमचा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
स्वयें नाथा प्रगटोनी । कार्य घ्यावें करवोनी ॥ २ ॥
आम्हांलागीं सिद्धी द्यावी । पूर्ण कृपा तुमची व्हावी ॥ ३ ॥
आपुलें कार्य असें म्हणा । प्रगट व्हावें नारायणा ॥ ४ ॥
सकळ येथें देव येतील । मज सहाय होतील ॥ ५ ॥
कार्य निज करवावें । दासा ठायीं प्रगटावें ॥ ६ ॥
विनायक विनवणी । करीतसे शूळपाणी ॥ ७ ॥

( ३५३ )

गुरुवार ता० ४।७।१९३०

उत्सव तुमचा जवळी आला । पाहिजे तो पूर्ण केला ॥ १ ॥
स्वामी येथें प्रगटावें । माझे ठायीं संचरावें ॥ २ ॥

सकळ ब्रम्हाण्डाचें साह्य । मज देई दत्तात्रेय ॥ ३ ॥
तेज येथें प्रगटवावें । भजनातें वाढवावें ॥ ४ ॥
व्हावी भजन समृद्धी । प्रगटवीं मूर्त सिद्धी ॥ ५ ॥
योगसिद्धीतें आणावें । स्वयें प्रगट असावें ॥ ६ ॥
विनायक म्हणे कृपा । करा माझे मायबापा ॥ ७ ॥

## ( ३५४ )

गुरुवार ता. २१।११।१९२९

उत्सवकार्य तुझें देवा जवळी आलें । आम्हां अनुग्रहीलें पाहिजे कीं ॥१॥
प्रगटपणीं येथें करणें साक्षात्कार । श्रीसद्गुरुवर आम्हांसाठीं ॥ २ ॥
आम्हां दासांसाठीं येथें प्रगटणें । आम्हां वागविणें निजकार्यी ॥ ३ ॥
तुम्हीं यजमान तुम्हांसी शोभेल । कार्य विस्तारेल ऐसें करा ॥ ४ ॥
पूर्ण वैभवेंसीं कार्य संपादावें । परिपूर्ण व्हावें सर्वत्वानें ॥ ५ ॥
न्यून कांहीं देवा नको ह्या कार्यांत । परिपूर्ण होत ऐसें करा ॥ ६ ॥
विनायक म्हणे निर्विघ्न करावें । आम्हां यश द्यावें निजकार्यी ॥ ७ ॥

## ( ३५५ )

गुरुवार ता. २८।११।१९२९

उत्सव तुझा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
भक्तांसाठीं अवतार । झाला तुझा अवनीवर ॥ २ ॥
अनसूया पोटीं बाळ । जन्मलासी तूं वेल्हाळ ॥ ३ ॥
तपश्चर्या त्या अत्रिची । साच केली देवा साची ॥ ४ ॥
पुत्रत्वानें लाभलासी । जाण तूं त्या दंपतींसीं ॥ ५ ॥
कौतुक तुझें करिताती । प्रेमभरीं तुज पाळिती ॥ ६ ॥
योग-सिद्ध व्हाया जन । आलासीं तूं दयाघन ॥ ७ ॥
भजन उपासना ज्ञान । कथिसी सविस्तारें पूर्ण ॥ ८ ॥
सकळां तुझा उपदेश । नित्य भजनाचा ईश ॥ ९ ॥
वेदांत गुरु आणि ईश्वर । सेवणें हें निरंतर ॥ १० ॥

उपदेश तुझा ऐसा । आम्हां असे देवा खासा ॥ ११ ॥
म्हणुनियां उत्सव कार्य । करणें आम्हां दत्तात्रेय ॥ १२ ॥
उपासनेसाठीं देवा । उत्सव आपुला हा करवा ॥ १३ ॥
सकळ साह्य आम्हां द्यावें । मनोरथ पूर्ण व्हावे ॥ १४ ॥
बळ द्यावें मनुष्याचें । बळ द्यावें आम्हां धनाचें ॥ १५ ॥
बळ द्यावें साधनांचें । बळ द्यावें कौशल्याचें ॥ १६ ॥
जें जें कांहीं इष्ट परम । तें तें द्यावें पुरुषोत्तम ॥ १७ ॥
अभिमान आमुचा धरा । श्रीगुरुराया अत्रिकुमरा ॥ १८ ॥
आम्हां ठायीं संचरावें । अमुच्या देहा वागवावें ॥ १९ ॥
निजहित चिंतवावें । ऐसें नाथजी करावें ॥ २० ॥
कर्तृत्वाचा अभिमान । तोच असे खरा शीण ॥ २१ ॥
क्षमा करा श्रीसमर्था । क्षमा करा दत्तनाथा ॥ २२ ॥
चैतन्यस्थानासीं आणावें । स्थानीं आपण राहावें ॥ २३ ॥
आम्हांकडुनी सेवा घ्यावी । परम कृपा आम्हां व्हावी ॥ २४ ॥
विनायक चरणिं दास । पुरवावी याची आस ॥ २५ ॥

( ३५६ )

# आनुकूल्य मागणी

गुरुवार ता० ५।१२।१९२९

उत्सव तुझा जवाळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
दृढपायांसीं शरण । घालितसें लोटांगण ॥ २ ॥
भाव तुज समर्पून । हृद्यांत तुज चिंतून ॥ ३ ॥
करितों मी तुझी प्रार्थना । श्रीगुरुराया दयाघना ॥ ४ ॥
कार्य तुझें उत्सव तुझा । पूर्ण व्हावा हेतु माझा ॥ ५ ॥
स्वयें यावें प्रगटोन । साक्षात्कारें द्यावें दर्शन ॥ ६ ॥
भजन पूजनाचा भर । कीर्तनाचा बडिवार ॥ ७ ॥
सकळ समृद्धीचा योग । खुलुनी यावा पूर्ण रंग ॥ ८ ॥

प्रसाद-अनुभव यावा । शुभयोग साधवावा ॥ ९ ॥
असो येथें अधिष्ठान । तुमचेंच भगवान ॥ १० ॥
सांप्रदाय तुमचाच । रूढ व्हावा येथें साच ॥ ११ ॥
स्थान तेजवंत व्हावें । प्रखर तेज तळपावें ॥ १२ ॥
जागरूक येथें दंड । असो तुमचा उदंड ॥ १३ ॥
अन्यायासी शिक्षा व्हावी । निज मर्यादा रक्षावी ॥ १४ ॥
पूर्ण ज्योत प्रगटावी । अखंड स्थानीं या असावी ॥ १५ ॥
सार्वभौम वैभवाला । प्रगटवी अवलीळा ॥ १६ ॥
न्यून येथें कांहीं नसावें । सर्व पूर्ण कार्य व्हावें ॥ १७ ॥
कलि दोष न बाधावा । इडा पीडा-योग टळावा ॥ १८ ॥
प्रतिबंध सर्व हरावे । कार्य निर्विघ्न करावें ॥ १९ ॥
वैरीयांचा व्हावा घात । जळुनि जावे ते समस्त ॥ २० ॥
पाखंडाचा व्हावा नाश । नास्तिक्याचा नसो लेश ॥ २१ ॥
अधर्माचा व्हावा ऱ्हास । विजय धर्माचाच खास ॥ २२ ॥
दुष्ट सकळ निवटावे । साधुपूजन घडावें ॥ २३ ॥
साधनाची परिपूर्णता । करि येथें भगवंता ॥ २४ ॥
आळस निद्रा नसो येथ । जावो येथोनियां स्वार्थ ॥ २५ ॥
रोगभय नसो कांहीं । आपत्ति दूर व्हावी पाहीं ॥ २६ ॥
चिंता रोग भय जावो । सकळ आनंद उद्भवो ॥ २७ ॥
निर्भयता वावरावी । निर्ममता सिद्ध व्हावी ॥ २८ ॥
विनायक म्हणे दत्ता । प्रगट करा निज सत्ता ॥ २९ ॥

## ( ३५७ )

शनिवार ता. ७।१२।१९२९

उत्सव तुझा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
दृढ आहें पायीं शरण । घालीतसें लोटांगण ॥ २ ॥
जन्मदिन तुझा आला । आनंदाचा आम्हां भला ॥ ३ ॥
सुकाळ होय आनंदाचा । तैसा जाण प्रेमरसाचा ॥ ४ ॥
समाधि सुख आम्हां लाभेल । देहभाव हारपेल ॥ ५ ॥

चुकेल तेव्हां सासुरवास । आम्हीं लाभुं माहेरास ॥ ६ ॥
म्हणुनी कार्य सिद्ध करीं । आम्हांसाठीं नरहरी ॥ ७ ॥
उपासना कार्यासाठीं । स्थान महात्म्याचे साठीं ॥ ८ ॥
सिद्ध करी तुझें कार्य । पापक्षय जेणें होय ॥ ९ ॥
विनायक तुझा दास । याची पुरवावी आस ॥ १० ॥

( ३५८ )

रविवार ता. ८।१२।१९२९

उत्सव तुझा जवळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
कार्य तुझें उत्सव तुझा । मींही जाण असें तुझा ॥ २ ॥
माझा एक निश्चय भाव । तुजवरी दत्तदेव ॥ ३ ॥
तुजविण भरंवसा । कोठें नाहीं जगन्निवासा ॥ ४ ॥
हृदयींचा प्राणेश्वर । जीवींचा तूं जीवेश्वर ॥ ५ ॥
आत्माराम माझा तूंच । मानितों मीं तुज साच ॥ ६ ॥
उभा माझ्या पाठींमागें । माझ्यासाठीं तोच जागे ॥ ७ ॥
निवारितो संकटातें । संपादितो मम शुभातें ॥ ८ ॥
तोच विघ्नांचा नायक । तोच सिद्धीचा दायक ॥ ९ ॥
तोच सकळ देव जाणा । म्हणुनि शरण त्याचे चरणा ॥ १० ॥
पाव आतां मजलागीं । ध्याईतों मी अंतरंगीं ॥ ११ ॥
कार्य निज सिद्ध करीं । माझा भाव तुजवरी ॥ १२ ॥
विनायकाचा हा काम । पुरवावा पुरुषोत्तम ॥ १३ ॥

( ३५९ )

## बलसमृद्धि व दुःसंगनाशाची मागणी

सोमवार ता. ९।१२।१९२९

उत्सव तुझा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
आम्हांसाठीं गुरुवरा । उत्सव कार्य सिद्ध करा ॥ २ ॥

कार्य आपुलें प्रगटावें । वैभवेंसीं उभारावें ॥ ३ ॥
सकळ बळाची समृद्धि । सकळाची असो वृद्धी ॥ ४ ॥
चमत्कार दाखवावा । अपूर्व योग घडवावा ॥ ५ ॥
साह्य नाहीं कोणी मम । तुजविण पुरुषोत्तम ॥ ६ ॥
वैरी थोर असती नाथा । त्यांची बाधा करि अनर्था ॥ ७ ॥
भलतेंच ऐकवती । भलतेंच प्रतिपादिती ॥ ८ ॥
भलतेंच उठविती । भलतेंच आरोपिती ॥ ९ ॥
अस्वस्थता तेणें होई । शांती मनाची ती जाई ॥ १० ॥
असंगाचा संग खोटा । विपत्तींसीं नाहीं तोटा ॥ ११ ॥
सहस्रवृश्चिकांचे दंश । त्याहुनी पीडा देई द्वेष ॥ १२ ॥
अकारण वैरी अमुचे । पुतळे जणुं मत्सराचे ॥ १३ ॥
दुःसंगाचा ऐसा योग । आम्हां नसो रमारंग ॥ १४ ॥
दुःसंगानें आम्हीं कष्टी । किती सांगुं परमेष्टी ॥ १५ ॥
दुःसंगाचें निवारण । करा करा नारायण ॥ १६ ॥
जेणें जाय भय मनिंचें । धैर्य होय सिद्ध साचें ॥ १७ ॥
धैर्य वृत्ति उपजेल । होईल दास तुझा अचळ ॥ १८ ॥
उत्सव कार्य तव रंगाया । आम्हांलागीं शिकवाया ॥ १९ ॥
दुःसंगातें टाकवावें । साधु संगतीतें द्यावें ॥ २० ॥
विनायक विनवितो । साधुसंगातें मागतों ॥ २१ ॥

## ( ३६० )

मंगळवार ता. १०।१२।१९२९

उत्सव तुमचा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
उल्हसलीं अमुचीं मनें । वाट पहात प्रेमानें ॥ २ ॥
कार्यासाठीं येईल देव । धरिल येथें प्रगट भाव ॥ ३ ॥
साक्षात्कारें तो भेटेल । आम्हां लागीं सुखवील ॥ ४ ॥
कधीं येई तो शुभदिन । करितों मी हें चिंतन ॥ ५ ॥
घडेल त्याचा सहवास । उतावीळ झालों खास ॥ ६ ॥
लेंकुरास जैसी आई । वांसरासी जैशी गाई ॥ ७ ॥

कधीं भेटे करुणा मूर्ति । कधीं होय इच्छापूर्ति ॥ ८ ॥
उत्कंठा हे बहु लागली । वृत्ति बहु उल्हसली ॥ ९ ॥
कधीं येई माझा पिता । माझे अर्थ पुरविता ॥ १० ॥
कधीं येतो उत्सवदिन । पाहिन कधीं भगवान ॥ ११ ॥
कधीं लोळेन चरणीं । कधिं धरिन त्याचा पाणि ॥ १२ ॥
पायीं शिर मी ठेवीन । त्याजपाशीं कधीं खेळेन ॥ १३ ।
ऐसें झालें मज देवा । हेतु माझा हा पुरवा ॥ १४ ॥
प्रगट व्हावें रमापती । संपादा या कार्याप्रती ॥ १५ ॥
वैभवेंसीं कार्य व्हावें । चित्त माझें तोषवावें ॥ १६ ॥
हेतु माझा पुरवावा । तुमच्या कृपेंसीं बरवा ॥ १७ ॥
विनायक तुमचा दास । अनुग्रह व्हावा यास ॥ १८ ॥

( ३६१ )

बुधवार ता. ११।१२।१९९

उत्सव तूझा जवळि आला। पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
आम्हीं तुझे पददास। आम्हांलागीं तुझी आस ॥ २ ॥
आम्हीं करूं भजनास। वानूं तुझीये यशास ॥ ३ ॥
उपचार अर्पूं तुज। अर्चूं तूज महाराज ॥ ४ ॥
आम्हां खेळवायालागीं। अवतरलासी जगीं ॥ ५ ॥
उत्सव तुझा सिद्ध व्हावा। चमत्कार आम्हां दावावा ॥ ६ ॥
साक्षात्कारें प्रगटावें। आम्हांलागीं अनुग्रहावें ॥ ७ ॥
विनायक तुमचा दास। पुरवावी याची आस ॥ ८ ॥

( ३६२ )

गुरुवार ता. १२।१२।१९२९

उत्सव तुझा जवळि आला। पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
आम्हीं पायासीं शरण। वाहियेलें अंतःकरण ॥ २ ॥
आमुचीया भावासाठीं। प्रगट आतां जगजेठी ॥ ३ ॥
मागतों मीं उत्सवाला। पुरवी आमुच्या कामाला ॥ ४ ॥

कामधेनू चिंतामणि । कल्पवृक्ष तूंच झणीं ॥ ५ ॥
आम्हां असे तुझी आस । धरिली भजनाची कांस ॥ ६ ॥
पाजी आम्हांतें अमृत । जेणें होऊं आम्ही पूर्त ॥ ७ ॥
याचसाठीं गुरुराया । प्रगटावें अत्रितनया ॥ ८ ॥
आपुलें कार्य करवावें । आम्हांलागीं आनंदवावें ॥ ९ ॥
विनायक म्हणे पुरवी । उत्सवाची आशा बरवी ॥ १० ॥

( ३६३ )

# आमुच्या मनासम होय

शुक्रवार ता. १३।१२।१९२९

उत्सव तुझा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
म्हणुनि आम्हीं शरण चरणां । घालितसों लोटांगणा ॥ २ ॥
आमुच्या मनासम होय । आम्हांसाठीं दत्तात्रेय ॥ ३ ॥
आमुची वृत्ति जेणं खुले । ऐसें रूप धरीं भलें ॥ ४ ॥
ज्या ज्या वेळीं कल्पना जी । तैसें रूप तेव्हां योजी ॥ ५ ॥
जैसी इच्छा तैसा मूर्त । होवोनि राहे भगवंत ॥ ६ ॥
भक्त-काम-कल्पद्रुम । सार्थ करी तव नाम ॥ ७ ॥
बाल युवा जरठ बन । खेळगडी येईं होवोन ॥ ८ ॥
तुझ्यासंगें आम्हीं खेळूं । तुजपाशीं काढूं वेळूं ॥ ९ ॥
सोंगडी तूं होवोनियां । येथें येईं दत्तात्रेया ॥ १० ॥
विनायक चरणीं शरण । वरद होय नारायण ॥ ११ ॥

( ३६४ )

शनिवार १४।१२।१९२९

उत्सव तुझा जवळी आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
उत्सव तुझा कार्य तुझें । तेथें आहे काय माझें ॥ २ ॥
होवो माझी पाप धूणी । प्रेम उपजो अंतःकरणीं ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ



मन माझें तेथें भुले । वृत्ति माझी तेथें खुले ॥ ४ ॥
बुद्धि माझी विकसत । रंगी रंग भरूनि जात ॥ ५ ॥
आनंदाचा भाव येतो । दुजेपण विसरतों ॥ ६ ॥
समरस होतो जीव । काय सांगुं तें वैभव ॥ ७ ॥
विकल्प सारे मावळती । पसरते मग शांति ॥ ८ ॥
शांतिचीये छायेखालीं । जीवा झोंप लागे भली ॥ ९ ॥
विश्रांतीतें जीव घेतो । जीवपण विसरतो ॥ १० ॥
आत्मस्वरूपांत लीन । रहातसे मग होऊन ॥ ११ ॥
म्हणुनि उत्सवाचा रंग । करिं येथें सर्व दंग ॥ १२ ॥
विनायक विनवीतो । कार्य-सिद्धीतें मागतो ॥ १३ ॥

## ( ३६५ )

रविवार ता. १५।१२।१९२९

उत्सव तुझा उदईक । प्राप्त झाला विश्वपालक ॥ १ ॥
आमुचा तो महासण । आनंदले अंतःकरण ॥ २ ॥
उजाडलें कधीं होय । पाहिन कधीं दत्तात्रेय ॥ ३ ॥
उतावीळ झालों देवा । हेतु माझा पूर्ण व्हावा ॥ ४ ॥
प्रेमें तूज मीं पूजीन । उपचार समर्पिन ॥ ५ ॥
तुझें यश मीं गाईन । तुजपुढें मीं नाचेन ॥ ६ ॥
सर्वदिन करिन सेवा । आवडीनें मी केशवा ॥ ७ ॥
केला ऐसा संकल्प मी । धरिला असे मनीं स्वामी ॥ ८ ॥
सांडोनियां सर्व लाज । गाईन मी देवा तुज ॥ ९ ॥
कोणासही न भीईन । निंदास्तुति अवगणीन ॥ १० ॥
सकळांत तूंच श्रेष्ठ । तूंच मज एक श्रेष्ठ ॥ ११ ॥
मग कोणासीं कां भ्यावें । कोणासीं कां म्यां लाजावें ॥ १२ ॥
कोणाचें मी काय खातों । काय कोणा लुबाडीतों ॥ १३ ॥
भजनें दुःख कोणा देतों । स्वार्थ कोणाचा हरितों ॥ १४ ॥
कोणाचें मीं काय करितों । आवडीनें तुज गातों ॥ १५ ॥
विनायकाचा अभिमान । तुज असो दयाघन ॥ १६ ॥

## ( ३६६ )

# बालभावाची मागणी

गुरुवार ता. ५।६।३०

उत्सवकार्य तूझें जवळि पातलें । तरी सिद्ध केलें पाहिजे कीं ॥ १ ॥
आम्हांसाठीं कार्य येथें सिद्ध करा । आम्हांतें उद्धरा वासुदेवा ॥ २ ॥
आमुचीया पायां व्हावया निष्कृती । बनवाया मति शुद्ध देवा ॥ ३ ॥
कार्य निमित्तानें भजन करवा । स्तवन वदवा निजकीर्ति ॥ ४ ॥
काव्यस्फूर्ति द्यावी यशें वर्णवावीं । कथा करवावी गुरुराया ॥ ५ ॥
गुण गाववावे आम्हां अनुग्रहावें । संपन्न करावें आम्हांलागीं ॥ ६ ॥
ज्योति प्रगटवावी आमुच्या चित्तांत । आम्हां अनुवृत्त करावें कीं ॥ ७ ॥
विषयाच्या छंदें आम्हीं तुज गावें । रंगोनियां जावें तूझ्याठायीं ॥ ८ ॥
वासना उठावी तूझीच आम्हांसीं । औत्कंठ्य मनासीं तूझें द्यावें ॥ ९ ॥
कार्यामाजी भर आम्हांलागीं यावा । उठाव बरवा व्हावा आम्हां ॥ १० ॥
लहानासम व्हावें छंदातें धरावें । तुज वागवावें हृदयांत ॥ ११ ॥
पुन्हां पुन्हां पुन्हां केलेंच करावें । नाचावें रंगावें उंडारावें ॥ १२ ॥
बालभाव आम्हां यावा उत्सवांत । रहावें क्रीडत तूझ्यापाशीं ॥ १३ ॥
निर्लज्ज बनावें जगा विसरावें । तूज न सोडावें कांहीं झाल्या ॥ १४ ॥
तुज बिलगावें लोटल्या न जावें । प्रमत्त बनावें तुझे ठायीं ॥ १५ ॥
विनायक प्रार्थी ऐसा रंग करा । रंगवा पामरां आम्हांलागीं ॥ १६ ॥

## ( ३६७ )

वासना कथिली आमुच्या मनिंची । कार्यसिद्धतेची दत्तात्रेया ॥ १ ॥
स्वयें प्रगटावें कार्य करवावें । यजमान व्हावें कार्यामाजी ॥ २ ॥
निज इच्छे आम्हां नाचवा खेळवा । स्तवन गाववा स्वीय देवा ॥ ३ ॥
साधनाचा करा सुकाळ कार्यांत । कार्य अभिमत बहु व्हावें ॥ ४ ॥
नाविन्य असावें भव्यत्व असावें । रमणीय व्हावें कार्य तूझें ॥ ५ ॥
जैसी जैसी इच्छा आमुच्या मनाची । ओढी हृदयाची तैसें व्हावें ॥ ६ ॥

साक्षात्कार तैसा असो चमत्कार । असो अवसर तेजालागीं ॥ ७ ॥
पुण्यें प्रगटावीं प्रगटावे देव । सर्व शुभ भाव प्रगटावे ॥ ८ ॥
प्रगटाव्या देवी ज्या कां आदिशक्ति । भक्ति ज्ञान विरक्ति प्रगटावीं ॥ ९ ॥
प्रगटावा येथें श्रीवेदपुरुष । तैसा सहस्रशीर्ष पुरुष देवा ॥ १० ॥
तैसा पुरुषोत्तम प्रगटोनी येवो । येथें प्रीति पावो तुझ्या कार्यीं ॥ ११ ॥
काव्य प्रगटावें विद्या प्रगटावी । सरस्वती देवी प्रगटावी ॥ १२ ॥
प्रगटावे तैसे ब्रम्हणस्पति देव । कार्याचें वैभव वाढवाया ॥ १३ ॥
प्रगटावे येथें गणांचे गणपति । तैसे बृहस्पति प्रगटावे ॥ १४ ॥
प्रगटावीं येथें तीर्थें क्षेत्रें सारीं । पुण्यस्थळ तरी प्रगटावीं ॥ १५ ॥
जीं जीं पुण्यें जाणा महात्म्यें जगतीं । तव कार्याप्रती यावीं सर्व ॥ १६ ॥
यावा सह्यगिरी पश्चिम सागर । वृक्ष औदुंबर प्रगटावा ॥ १७ ॥
नर्मदेचें तीर तैसें गरुडेश्वर । प्रगटो साचार तुझ्या कृपें ॥ १८ ॥
गंधर्व नगर नृसिंह वाटिका । तैसें क्षेत्र जें का औदुंबर ॥ १९ ॥
प्रगटवीं येथें तैसें कृष्णातीर । संगम प्रिय थोर तुज जो का ॥ २० ॥
सकळ प्रगटावें निजकार्यास्तव । गुरुदत्त देव प्रार्थना हे ॥ २१ ॥
न्यून येथें कांहीं मुळीं न पडों द्यावें । आम्हांतें करावें अधिकृत ॥ २२ ॥
अन्नपूर्णा येथें स्वयें प्रगटावी । अन्नपूर्ति व्हावी थोर नाथा ॥ २३ ॥
लक्ष्मी प्रगटावी निधि प्रगटावे । आनुकूल्य व्हावें सर्व कार्यीं ॥ २४ ॥
वित्त बळ यावें यावें मनुष्य बळ । आह्मांतें सबळ करावें कीं ॥ २५ ॥
विनायक म्हणे सर्व समृद्धता । करा भगवंता निजकार्यीं ॥ २६ ॥

( ३६८ )

## विघ्ननाशाची मागणी

रक्षाबंधनातें कराया कारण । स्वयें आवाहन करा देवा ॥ १ ॥
मंत्रोच्चार करुनी बोलवा गणांसिं । द्वारीं स्थापायासिं रक्षणार्थ ॥ २ ॥
आठी दिशाठायीं स्थापावे निजगण । व्हावें संरक्षण तव कार्यीं ॥ ३ ॥
वरी खालीं मध्यें गण प्रगटावे । तयानीं करावें संरक्षण ॥ ४ ॥

विघ्नातें नाशाया शत्रूंतें जाळाया । असुरां माराया रक्षा करा ॥ ५ ॥
उग्र रुद्रगण वेताळांचे गण । द्वार सरंक्षण करोत कीं ॥ ६ ॥
शत्रू सर्व व्हावे देवा पराभूत । त्यांचें कांहीं न येथ चालावें कीं ॥७॥
जळोनियां जावे जिवंतची खळ । विघ्नेंच केवळ मूर्त जे का ॥ ८ ॥
स्थान शुद्धि व्हावी मांगल्यें प्रगटावीं । पूर्णता असावी कल्याणांची॥९॥
विनायक म्हणे निजकार्य करा । वैभव उदारा आम्हांसाठीं ॥ १० ॥

( ३६९ )

कार्यासाठीं प्रगटावें । साहाय्यातें आम्हां द्यावें ॥ १ ॥
सकळ शुभ प्रगट व्हावें । आनंदाचें लेणें व्हावें ॥ २ ॥
विनायक म्हणे करा । निज उत्सव साजरा ॥ ३ ॥

( ३७० )

## करुणदेवास विनंति

गुरुवार ता. १२।६।१९३०

उत्सव तूझा जवळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
करुणेनें आळवीतों । उत्सव सिद्धी मी मागतों ॥ २ ॥
आम्हां लेंकरांचे साठीं । नट येथें जगजेठी ॥ ३ ॥
करुणामय प्रगटावें । कारुण्यानें अनुग्रहावें ॥ ४ ॥
कोण सांग वालि आम्हां । तुजविण परंधामा ॥ ५ ॥
करुणेची दे जाणीव । कारुण्याचा अनुभव ॥ ६ ॥
करुण तूज बोलताती । करुण तूज वर्णिताती ॥ ७ ॥
करुण मूर्ति येथें ठाक । आम्हां देई आतां भाक ॥ ८ ॥
देई आम्हां आशीर्वाद । होई नाथा तूं वरद ॥ ९ ॥
करुणेनें आम्हां पाहीं । करुणेनें ये लवलाहीं ॥ १० ॥
करुणेचें आश्वासन । द्यावें तुंवा करुणाघन ॥ ११ ॥
आम्हांवरी करुणा करीं । आम्हांठायीं तिच भरीं ॥ १२ ॥

करुणरस तव कार्यांत । होवो उत्कर्षें उद्भूत ॥ १३ ॥
तुजपाशीं करुणा आहे । म्हणुनि धांव लवलाहें ॥ १४ ॥
करुणेविण धांवण्यासीं । कोण करी लगबगेंसीं ॥ १५ ॥
जेथें आहे करुणा जाण । तेथेंच वसे प्रियपण ॥ १६ ॥
करुणेविण प्रियतमांही । प्रेमपान्हा नाहीं नाहीं ॥ १७ ॥
आई बाप तूज म्हणतों । करुणा लक्षण लक्षितों ॥ १८ ॥
करुणा हाच विशेष जाणा । म्हणुनी तुम्हां प्रियपणा ॥ १९ ॥
आमुचें ऋण असे करुणा । तुजपाशीं नारायणा ॥ २० ॥
करुणेनें लीन करीं । आमुचा तूं नरहरी ॥ २१ ॥
कारणें याच प्रार्थितसों । साक्षात्कारा मागतसों ॥ २२ ॥
तूझें कार्य सिद्ध व्हावें । यश जगीं प्रगटावें ॥ २३ ॥
बडिवार आमुचा व्हावा । तूजसाठीं रमाधवा ॥ २४ ॥
सकळ सिद्धता करावी । न्यूनता कांहींही नसावी ॥ २५ ॥
संपूर्ण व्हावें तुझें कार्य । व्हावें आम्हां पूर्ण साह्य ॥ २६ ॥
आपणाचि करोनियां । महत्व आम्हां देवोनियां ॥ २७ ॥
भक्तवात्सल्यातें दावीं । ऐशी थोर कृपा व्हावी ॥ २८ ॥
करुणा सिंधू तुझें नाम । सार्थ करीं परंधाम ॥ २९ ॥
विनायक पद दास । पुरवावि याची आस ॥ ३० ॥

## ( ३७१ )

गुरुवार ता० १९।६।१९३०

उत्सव कार्य तूझें जवळि पातलें । पाहिजे सिद्ध केल कृपावंता ॥ १ ॥
सामर्थ्य तूझेंच साधन तूझेंच । बळ बा तूझेंच सर्व कांहीं ॥ २ ॥
संपन्नता सारी नाथ बा तूझीच । येथें माझें साच काय आहे ॥ ३ ॥
संकल्प तूझाच घटना तूझीच । संपत्ति तूझीच रमाकांता ॥ ४ ॥
सकळ करणें सकळ साधणें । किंवा साधवणें तूझें दत्ता ॥ ५ ॥
तूच यजमान धनी तूं चाकर । तुझे शिरीं भार सर्व कांहीं ॥ ६ ॥
देवा आम्हालागीं तूंच नाचविसी । करवोनी घेसी तव इच्छे ॥ ७ ॥

येथें काय आहे आम्हां अभिमान। सकळ विंदान तूझें दत्ता ॥ ८ ॥
विनायक म्हणे एक तूं समर्थ। पुरवावा अर्थ उत्सवाचा ॥ ९ ॥

## ( ३७२ )

गुरुवार ता० १३।११।१९३०

उत्सव तुझा जवळि आला। पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
वाढवाया महिमान। तैसें नाम संकीर्तन ॥ २ ॥
साक्षात्कारें प्रगटोनी। कार्य दावीं हें करोनी ॥ ३ ॥
साहाय्य द्यावें निज कृपेचें। मजलागीं देवा साचें ॥ ४ ॥
सदोदित माझ्या पाठीं। उभा राहीं जगजेठी ॥ ५ ॥
निज कार्यास्तव देवा। प्रगटवीं निज वैभवा ॥ ६ ॥
साक्षात्कारें प्रगटावें। वैभव निज विस्तारावें ॥ ७ ॥
लक्ष्मी सहित प्रगटपणा। धरणें येथें नारायणा ॥ ८ ॥
विनायक हात जोडी। ह्याचे मन न तूं मोडीं ॥ ९ ॥

## ( ३७३ )

आजवरी निज कार्य। करविलें दत्तात्रेय ॥ १ ॥
निमित्त मात्र करुनी मजला। कार्य साधिसी दयाळा ॥ २ ॥
सकळ वैभवेंसीं कार्य। करिसी तूं अत्रितनय ॥ ३ ॥
अनुभव आजवरी। आम्हां आहे नरहरी ॥ ४ ॥
तोच आतां मी स्मरोनी। कृतज्ञ हृदयीं बनोनी ॥ ५ ॥
तुझे पाय धरूनीयां। शिर पायीं अर्पूनीयां ॥ ६ ॥
कार्य तुज निवेदितों। आशीर्वाद मी मागतों ॥ ७ ॥
कार्य तुझें जवळी आलें। हृदय माझें विकासलें ॥ ८ ॥
आनंदाचा भर येवो। भजन रंगातें कीं पावो ॥ ९ ॥
जयजयकार तव नामाचा। दुमदुमो येथें साचा ॥ १० ॥
विनायक प्रार्थनेसीं। करितो साधा निजकार्यासीं ॥ ११ ॥

## ( ३७४ )

गुरुवार ता. २०।११।३०

साक्षात्कारें येथें स्वामी प्रगटावें । कार्य करवावें आम्हां करवीं ॥ १ ॥
तुझाच संकल्प तुझीच योजना । गुरु दयाघना सिद्ध व्हावी ॥ २ ॥
अनुग्रह केला मज पामराला । यशस्वी जाहला पाहिजे कीं ॥ ३ ॥
थोरांनीं संग्रह जयाचा करिला । विफल तो भला कैसा होय ॥ ४ ॥
कैसा झालों तरी तुमचा मी आहें । नाम सांगताहें तुमचें मी ॥ ५ ॥
कैसा झालों तरी तुमचा माणूस । मजलायशास देणें तुम्हां ॥ ६ ॥
नामधारक मी तुमचा दयाघना । करित कीर्तना तुमच्याच ॥ ७ ॥
तरी मज यश देणें गुरुनाथा । श्रीगुरु समर्था वासुदेवा ॥ ८ ॥
विनायक आहे तुमचा अंगीकृत । तुम्हां अवधूत अभिमान ॥ ९ ॥

## ( ३७५ )

गुरुवार ता० २०।११।१९३०

तुमच्या घरचें कार्य दत्त देवा । विजयी करावा निजदास ॥ १ ॥
उद्धार कराया आपुल्या जनाचा । मार्ग भजनाचा प्रसारिला ॥ २ ॥
निमित्त मज केलें स्थान स्थापियेलें । यश विस्तारिलें जनोद्धारा ॥३॥
लोकसंग्रहाचेसाठीं वासुदेवा । मार्ग तुम्हीं नवा योजिला हा ॥ ४ ॥
माझ्याठायीं केला आपुला संसार । कराया विस्तार भजनाचा ॥ ५ ॥
उपासना मार्ग प्रसृत कराया । भजनीं लावाया जनलोक ॥ ६ ॥
स्थान हें निर्मिलें माझ्या हातीं दिलें । मज आज्ञापिलें भजनाला ॥७॥
मज पुढें केला सांगोनी मजला । करिन सिद्धतेला मींच जाण ॥ ८ ॥
निमित्त तुज उभा पुढती धरिला । जन नयनांला दिसावया ॥ ९ ॥
परी कार्यकर्ता मीच वासुदेव । माझा प्रगट भाव तुझ्यापाठीं ॥ १० ॥
करिन सिद्धता सकळ सामुग्रीची । भजन पूजनाची सांगे मज ॥११॥
गुह्य हेंच येथें आहे या स्थानासीं । देव उभा पाठिसीं सदा आहे॥१२॥
विनायक म्हणे अवघा वासुदेव । त्याचा कृपाभाव माझ्यापाठीं ॥१३॥

( ३७६ )

वार्षिक हें कार्य दत्तजयंतीचें । जवळिक साचें पातलेंसे ॥ १ ॥
सिद्ध करा नाथा स्वयें प्रगटोनी । समृद्धि देवोनी सर्व कांहीं ॥ २ ॥
सर्व आनुकूल्यें प्रगट करावीं । प्रसन्नता यावी थोर येथें ॥ ३ ॥
जयजयकार व्हावा तुझिये स्थानाचा । तुझीये नामाचा भजनाचा ॥४॥
तुझे कीर्तनाचा तुझे माहात्म्याचा । तुझीये यशाचा जयजयकार ॥५॥
जयजयकार व्हावा उत्सव कार्यांचा । तुझीये भक्तांचा सेवकांचा ॥६॥
जयजयकार व्हावा तव उपासनेचा । तैसा कार्यक्रमाचा जयजयकार ७
समृद्ध कार्य व्हावें परम सौभाग्याचें । परम भाग्याचें दत्तात्रेया ॥ ८ ॥
न्यून कांहीं येथें मुळिं न पडावें । सकळ संपादावें कार्य नाथा ॥ ९ ॥
सर्व देवमय सर्व शक्तिमय । सर्व सिद्धिमय प्रगटावें ॥ १० ॥
प्रगटोनि ऐसा दावीं चमत्कार । करीं साक्षात्कार दत्तनाथा ॥ ११ ॥
विनायक ठेवी माथा चरणावरी । कार्य अंगिकारीं दत्तनाथा ॥ १२ ॥

( ३७७ )

बुधवार ता. २६।११।१९३०

उत्सव तुझा जवळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
शरण आहें पायांतळीं । धनी माझा आतुर्बळी ॥ २ ॥
आजवरी करविलें । तुवांच हें संपादिलें ॥ ३ ॥
सकळ सिद्ध देवा केलें । आनुकुल्या मज दिलें ॥ ४ ॥
तैसेंच नाथ आतां करणें । कार्य निज संपादणें ॥ ५ ॥
स्वयें नाथा प्रगटणें । पदरांत मज घेणें ॥ ६ ॥
विनायक करी मागणी । पुरवावी चक्रपाणी ॥ ७ ॥

( ३७८ )

गुरुवार ता. २७।११।१९३०

उत्सव तुमचा जवळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
अभ्युदय कीं साधेल । माझ्या मनिंचें होईल ॥ २ ॥

जरी कृपा तुझी होय । अर्थ मज साध्य होय ॥ ३ ॥
म्हणुनि झटतों अर्थासाठीं । कृपा करा जगजेठी ॥ ४ ॥
तुजलागीं सर्व चिंता । करणारा तूं सिद्धता ॥ ५ ॥
पुरवावी माझी आळी । निजवचनासीं पाळीं ॥ ६ ॥
निजब्रीदासीं राखावें । वात्सल्यातें मिरवावें ॥ ७ ॥
विनायक म्हणे करा । हेतु माझा सिद्ध उदारा ॥ ८ ॥

( ३७९ )

# आनुकूल्य मागणी

शुक्रवार ता० २८।११।१९३०

वार्षिक जें तुझें कार्य । जवळी आलें दत्तात्रेय ॥ १ ॥
करवोनी घेणें नाथा । आमुच्या हातीं श्रीसमर्था ॥ २ ॥
भजन पूजनाचा रंग । करोनि त्यांत करीं दंग ॥ ३ ॥
भजनांत दंग रहावें । आम्हांमध्यें मिसळावें ॥ ४ ॥
आमुच्या देहीं प्रगटावें । अंतर्बाह्य आम्हां दिसावें ॥ ५ ॥
भाव तुमचा प्रगटावा । येवो आम्हां दत्त देवा ॥ ६ ॥
आमुचीया उद्धारासीं । पापक्षय व्हावयासीं ॥ ७ ॥
आम्हांलागीं वांचवावें । आम्हांलागीं खेळवावें ॥ ८ ॥
बहुतजन मिळवावे । आनुकूल्य वितरावें ॥ ९ ॥
साहित्य सर्व जमवावें । आनंदासीं भरतें यावें ॥ १० ॥
देहभान गळवावें । वृत्ति-शून्यत्व करावें ॥ ११ ॥
दत्तमय सर्व भासावें । तुमचें रूप आम्हां दिसावें ॥ १२ ॥
तुमच्या रूपीं आम्हीं लीन । देवा रहावें होऊन ॥ १३ ॥
करवा प्रेमाचें भजन । कीर्तनाचें अनुवादन ॥ १४ ॥
तारिं तारिं भगवंता । दत्तमय करीं समर्था ॥ १५ ॥
आम्हीं दत्तरूप व्हावें । आम्हीं दत्ता अनुभवावें ॥ १६ ॥
सकळ विघ्नें व्हावीं दूर । आरोग्य यावें कीं निर्धार ॥ १७ ॥

चिंता आम्हां मुळिं नसावी । निजकृपें निवारावी ॥ १८ ॥
समर्थ तुम्हीं अमुचे धनी । कार्य करा प्रगटोनी ॥ १९ ॥
सुरवर सकळ यावे । साहाय्य आम्हांलागीं द्यावें ॥ २० ॥
ऋषिसंघ येथें लोटावे । निजभक्त येथें आणावे ॥ २१ ॥
जें जें कांहीं सहाय्यक । तुझे कार्यसिद्धिदायक ॥ २२ ॥
तें तें सर्व दाखवावें । ऐसें नाथजी करावें ॥ २३ ॥
विनायकाची ही आशा । पुरवावी जगदीशा ॥ २४ ॥

## ( ३८० )

शनिवार ता० ३०।११।१९३०

उत्सवकार्य तुझें जवळी पातलें । शिर हें ठेविलें पायांवरी ॥ १ ॥
उत्सवाची सिद्धि देईं भगवंता । गुरुराया ताता निजकृपें ॥ २ ॥
सकळ विघ्नांतें करूनियां दूरी । कार्य निज करीं सिद्धनाथा ॥ ३ ॥
सर्व पुण्याईतें येथें वसवोनी । भाग्या प्रगटवोनी येथें दत्ता ॥ ४ ॥
कार्य येथें नाथा निज संपादावें । यशस्वी करावें आम्हां दासां ॥ ५ ॥
प्रारब्ध आमुचें सर्व फिरवोनी । अनुकुल करोनी दयावंता ॥ ६ ॥
सकळ साहाय्य देईं आम्हांलागीं । धैर्य अंतरंगीं देईं आम्हां ॥ ७ ॥
विजयी करावें आम्हां निजदासां । आम्हां भरंवसा तुझाच कीं ॥ ८ ॥
आम्हीं तुझे असों नामाचे धारक । यशाचे गायक दत्तात्रेया ॥ ९ ॥
आम्हीं तुझे असों चरणसेवक । आम्हांसीं कौतुक तुझेंच कीं ॥१०॥
तुझाच कीं आम्हां सर्वदाच छंद । आम्हांसीं आनंद तुझ्यामाजी ॥११॥
आमुचा बडिवार जगीं वाढावया । गौरव व्हावया आमुचा कीं ॥१२॥
सत्यत्व आणावया आमुच्या वाणीला । कार्य हें सिद्धीला नेईं दत्ता ॥१३॥
विनायक म्हणे करीं उपकार । कार्य सोपस्कार घडवावें ॥ १४ ॥

## ( ३८१ )

मंगळवार ता. २।१२।१९३०

उत्सव तुझा जवळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
वारुनियां संकटांला । निज करवीं कार्याला ॥ २ ॥

सहाय्य यावें मजलागीं । प्रेम यावें अंतरंगीं ॥ ३ ॥
बळ यावें संपत्तीचें । बळ यावें मनुष्यांचें ॥ ४ ॥
बळ यावें आनुकूल्याचें । बळ यावें ऋद्धिसिद्धिचें ॥ ५ ॥
बळ यावें समृद्धीचें । बळ यावें इच्छापूर्तीचें ॥ ६ ॥
बळ यावें साधनांचें । बळ यावें गौरवाचें ॥ ७ ॥
बळ यावें संकल्पाचें । बळ यावें कवित्वाचें ॥ ८ ॥
बळ यावें निजकृपेचें । बळ यावें दृढइच्छेचें ॥ ९ ॥
विनायक म्हणे बळ । मज यावें श्री स्नेहाळ ॥ १० ॥

( ३८२ )

गुरुवार ता. ४।१२।१९३०

उत्सव तुमचा जवळि आला । पाहिजे तो सिद्ध केला ॥ १ ॥
आमुचें प्रिय करण्यासीं । हित आमुचें साधण्यासीं ॥ २ ॥
स्वामिकार्य करवावें । आम्हांलागीं बळ यावें ॥ ३ ॥
समर्थाचे आम्हीं दास । तैसेंच व्हावें आम्हीं खास ॥ ४ ॥
आम्हांपाशीं दैन्य नाहीं । विपत्ति दुःख कांहीं नाहीं ॥ ५ ॥
आम्हां विघ्नें न बाधती । कोण कांही करुं न शकती ॥ ६ ॥
प्रतिबंध दूर होती । आनुकुल्यें प्रगटती ॥ ७ ॥
आम्हीं जेथें तेथें विजयी । प्रगट देव आमुच्या हृदयीं ॥ ८ ॥
आमुचा सदाच सन्मान । ठावा नाहीं अपमान ॥ ९ ॥
इंद्रचंद्र देव सारे । साहाय्य देती आम्हां त्वरें ॥ १० ॥
सकळ ब्रह्मांड सहाय । प्रसन्न आम्हां गुरुराय ॥ ११ ॥
आमुच्या वैभवासीं मिति । नाहीं कोठें या जगतीं ॥ १२ ॥
समर्थाचे समर्थदास । आमुची पुरतसे आस ॥ १३ ॥
विनायक म्हणे धरिला । निर्धार हा आम्हीं भला ॥ १४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ...३८८०५ वि: वा. वाँ.
क्रमांक ...२६८७... नों. दि: १४।९।६

# अंगाऱ्याचा–उत्सव

# विषय


| | प्रबंध नं० |
|---|---|
| वासुदेव चरित सार | ३८३,४०१ |
| आज्ञा मागणी | ३८४,३८७,३८९,३९१, ३९३-४-७-८,४०५ |
| भिक्षासमारंभ | ३८५ |
| वासुदेवांचा निरोप | ३८६ |
| वासुदेव समाधिस्थ झाले | ३८८ |
| प्रसादयाचना | ३९० |
| भास्कर ब्राह्मणाची कथा | ३९१ |
| कृतज्ञता वचन | ३९४,४०८ |
| गुरुःसाक्षात्परब्रह्म | ३९५,३९८ |
| वासुदेवपुण्यतिथीचे दिवशीं काय करणें तें | ३९९ |
| वासुदेवलीलास्मरण व भिक्षासमारंभ | ४०० |
| योगमाहात्म्य | ४०२ |
| ध्यानयोग | ४०३ |
| दत्तदासांची महती | ४०४ |
| आध्यात्मिक-कर्मयोग | ४०६ |
| विभूति पूजनासाठीं आज्ञामागणी | ४०७ |

( ३८३ )

# वासुदेव–चरित–सार

शनिवार ता० ६।७।१९२९

जयजयकार तुझा गाजत जगतीं । थोर थोर गाती तुझें यश ॥ १ ॥
आज आर्यावर्तीं त्वदीय उत्सव । करिती वासुदेव भक्तजन ॥ २ ॥
कोण पुण्यतिथी संकल्पें करिती । कोण आदरीती भक्तीभावें ॥ ३ ॥
भजन पूजन तुझें करिताती । यश वर्णिताती तुझें देवा ॥ ४ ॥
कोणत्याही मार्गें तुजला स्मरती । कृतज्ञ जाण होती तुझे दास ॥ ५ ॥
ब्रह्माण्डासिं केला तुवां उपकार । धर्मसंप्रसार केला तुवां ॥ ६ ॥
दत्त-भजन-मार्ग लोकांसि दाविला । जयजयकार केला दत्ताचाच ॥७॥
दत्त-उपासना जगा पढविली । आचरूनी दाविली स्वयें तुवां ॥ ८ ॥
वर्णाश्रम-धर्म सकळ पाळिले । व्रतादिक केलें सर्व कांहीं ॥ ९ ॥
प्रायश्चित्तें तुवां दुर्धट आचरिलीं । काया कष्टविली कितीतरी ॥ १० ॥
सकळ तीर्थें क्षेत्रें पार्यीं फिरलासी । विद्या संपादिलीसी पूर्णत्वानें ॥११॥
दत्तसाक्षात्कार करुनि घेतला । प्रत्यक्ष दिसला दत्तदेव ॥ १२ ॥
किती तरी ग्रंथ लिहिले वासुदेवा । महिमा वानावा तव कैसा ॥ १३ ॥
प्राकृत संस्कृत प्रबंध लिहीले । लोकां शिकविलें ब्रह्मज्ञान ॥ १४ ॥
भक्ति ज्ञान आणि विरक्ति परिपूर्ण । दिधली शिकवण जगतासीं ॥१५॥
जिकडे तिकडे केला नाम जयजयकार। वेदधर्माचार प्रस्थापिला ॥१६॥
आचार्य शंकराचा दुजा अवतार । म्हणती साचार तूजलागीं ॥ १७ ॥
कर्म कीं संन्यास कारण मोक्षाचें । रहस्य तूं साचें वदलासी ॥ १८ ॥
संन्यास घेवोनि लोकसंग्रह केला । शरणागतांला तारियेलें ॥ १९ ॥
व्याधिग्रस्त येवो येवो चिंतातुर । कल्याण साचार केलें त्यांचें ॥ २० ॥

ज्या ज्या अर्थासाठीं जो जो कोणी आला। त्याचा पुरविला कार्यभाग २१
धर्मानें चालावें देवासिं भजावें । हें त्वां वासुदेवें शिकविलें ॥ २२ ॥
असुनि संन्यासी मूर्तींचें पूजन । प्राकृत भजन केलें तुवां ॥ २३ ॥
नित्य भजनातें करुनि दाविसी । लोकालागीं देसी हेंचि सार ॥ २४ ॥
ऐशी तुझी नाथा नवी शिकवण । शास्त्राचें प्रमाण दावुनियां ॥२५॥
कर्म कीं संन्यास रहस्य यांतील । आचरूनी केवळ दावियेलें ॥ २६ ॥
जरी ज्ञान झालें सांडूं नये भक्ती । अशी तुझी उक्ती जेथें तेथें ॥ २७ ॥
इंद्र तरी तोही भजतो गुरुसीं । भजतो देवासीं सांगतोसी ॥ २८ ॥
जरि ज्ञानी झाला तरिही भजन । सोडिलें न जाण नित्यत्वेंसीं ॥ २९ ॥
कृतघ्न तो होतो जो न भजे देवा । तुवां ऐशा भावा शिकविलें ॥ ३० ॥
कुडीमध्यें प्राण तोंवर सेवावें । कधीं न सोडावें भजनासीं ॥ ३१ ॥
वेदांत गुरु आणि ईश्वर हे सेव्य । भजावें कर्तव्य तुझें त्यांसीं ॥ ३२ ॥
ऐशी शिकवण तुझी ज्ञानीयांसीं । सांगसी विप्रासीं वाक्यज्ञ तूं ॥ ३३ ॥
प्रथम ज्ञानप्राप्तिसाठीं त्यां भजावें । पुढें त्यां सेवावें कृतज्ञत्वें ॥ ३४ ॥
कृतघ्न जो त्यासीं दोष कीं अनंत । तयासिं प्रायश्चित्त नसे शास्त्रीं ॥३५॥
कृतघ्नता दोषपरिहारासाठीं । सोडावी न दिठी सेवावें त्या ॥ ३६ ॥
ऐसा उपदेश त्वदीय आम्हांसीं । करणें भजनासीं रात्रंदिन ॥ ३७ ॥
विनायक म्हणे तोच मार्ग मज । प्रिय गुरुराज अत्यंतची ॥ ३८ ॥

( ३८४ )

## आज्ञा मागणी

ता. ७।७।१९२९

आज्ञा द्यावी महाराज । आपुल्या पूजेचीये काज ॥ १ ॥
पादुकातें उचलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥
उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा द्यावी दत्तात्रेया । आज्ञा द्यावी अत्रितनया ॥ ४ ॥

आज्ञा यावी वासुदेवा । प्रगटवा प्रिया भावा ॥ ५ ॥
आम्हांसाठीं प्रगटावें । कृपावंत नाथ व्हावें ॥ ६ ॥
दोष मनीं न आणावे । कृपाछत्र शिरीं धरावें ॥ ७ ॥
तारून आम्हालागीं न्यावें । करुणाघन त्वां वळावें ॥ ८ ॥
आमुचे ठायीं संचरावें । निज सेवेसीं लावावें ॥ ९ ॥
यशामृत तुझें सेवावें । सेवेमाजी रंगुनि जावें ॥ १० ॥
भान सकळ विसरावें । देहावरी मी नसावें ॥ ११ ॥
तुझ्याठायीं ऐक्य व्हावें । तुझ्या रूपीं मिसळावें ॥ १२ ॥
प्रेमरूप आम्हीं व्हावें । प्रेमरसीं मिसळावें ॥ १३ ॥
भजनरूप आम्हीं व्हावें । तूझें नामचि सेवावें ॥ १४ ॥
आमुच्या जीवींचा हा छंद । तुझें भजन वरद ॥ १५ ॥
उपचार समर्पावे । तुझें पूजन करावें ॥ १६ ॥
तूझ्यासम विरक्त होणें । तूझ्यासम भाव दाविणें ॥ १७ ॥
बहुरूपी होवोनीयां । तूझीं सोंगें आणोनीयां ॥ १८ ॥
रामकृष्णादिक व्हावें । आम्हीं दत्तचि बनावें ॥ १९ ॥
अहोरात्र तूझें भजन । अहोरात्र तूझें स्मरण ॥ २० ॥
अहोरात्र तुझा छंद । आम्हां लागावा वरद ॥ २१ ॥
आमुच्यामध्यें मिसळावें । आम्हांमध्यें तुम्हीं नाचावें ॥ २२ ॥
आम्हांमध्यें तुम्हीं निजावें । आम्हांलागीं हंसवावें ॥ २३ ॥
खेळ आपुला करावा । आमुचा जीव रमवावा ॥ २४ ॥
तल्लीन आम्हांतें करावें । आम्हां निर्मळ बनवावें ॥ २५ ॥
वार्षिक उत्सवाचें कार्य । पूर्ण करा दत्तात्रेय ॥ २६ ॥
तेज आमुचें वाढवा । पुण्य आमुचें प्रगटवा ॥ २७ ॥
आम्हीं समर्थाचे दास । समजो हें या जगास ॥ २८ ॥
शत्रु आमुचे संहारावे । विजयी आम्हातें करावें ॥ २९ ॥
यशोध्वज फडकवावा । आमुचे हातामाजी यावा ॥ ३० ॥
जेथें जाऊं तेथें जय । असें करा दत्तात्रेय ॥ ३१ ॥
विनायक तुमचा दास । पुरवावी त्याची आस ॥ ३२ ॥

## (३८५)
# भिक्षा समारंभ

वार्षिक तुझें कार्य भिक्षा समारंभ । कराया आरंभ आज्ञा देईं ॥ १ ॥
जेथें तूझें स्थान तेथें अन्नपूर्णा । ठेविसी परिपूर्णा कृपेनें तूं ॥ २ ॥
तुझी झोळी सदा भरली वृद्धीनें । आम्हीं ती प्रेमानें घेऊं दत्ता ॥ ३ ॥
आमुचाच येथें पूर्ण अधिकार । घेवूंच साचार जवळी ती ॥ ४ ॥
झोळीसाठीं भांडूं प्रेमें आढि धरूं । जैसें वो लेकरूं मातेपाशीं ॥ ५ ॥
त्रैलोक्य फिरसी भिक्षा तूं मागसी । आम्हां पुरविसी सर्व कांहीं ॥ ६ ॥
भिक्षाद्रव्य थोर असे तुझेपाशीं । आम्हालागीं देसी कृपाळुवा ॥ ७ ॥
आमुच्याचसाठीं ब्रह्मांडांत फेरी । तुझी नरहरी कृपावंता ॥ ८ ॥
उलट असे तुझा भिक्षेचा प्रकार । देसी अनिवार भक्तांलागीं ॥ ९ ॥
ज्याचे घरीं जासी सर्वस्वातें देसी । त्याचाच तूं होसी दासापरी ॥१०॥
ऐसा तूझा आहे भिक्षेचा प्रकार । खराच ईश्वर शोभसी तूं ॥ ११ ॥
तोच खेळ आम्हीं येथें करणार । तुजला घेणार सांगातीं कीं ॥ १२ ॥
आमुचे प्रेमासाठीं आम्हांमध्यें येईं । कौतुकार्थ आई जैशापरी ॥१३॥
आम्हां खेळवाया आम्हां रमवाया । येईं दत्तात्रेया सत्त्वरीं तूं ॥ १४ ॥
तुजसंगें आम्हीं येथें खेळ करूं । आम्हीं फेर धरूं तुजभोंवतीं ॥ १५ ॥
तुझा दंड देईं आमुचे तूं हातीं । समारंभाप्रति करूं येथें ॥ १६ ॥
अन्नपूर्णा येथें तुझ्या स्थानापाशीं । प्रगट विशेषीं कृपावंता ॥ १७ ॥
तुझ्या कार्यासाठीं आमुच्या हौसेसाठीं । करणें जगजेठी समारंभ॥१८॥
करीं साक्षात्कार प्रगट तूं स्वयें । आम्हांपाशीं तूं ये आतां देवा ॥ १९॥
भूलोक वैकुंठ करूनीयां सोडूं । ऐसें भजन मांडूं प्रेमाचें कीं ॥ २० ॥
वैकुंठ तें तुच्छ भजनाचे पुढें । रंग असा गाढें प्रवेशवूं ॥ २१ ॥
तरी दंड आतां माझ्या हातीं देईं । स्वयें प्रगट होईं गुरुदत्ता ॥ २२ ॥

## ( ३८६ )

# वासुदेवांचा निरोप

आज प्रगट येथें स्वामी वासुदेव । परम कृपाभाव आज त्यांचा ॥ १ ॥
देती आशीर्वाद परम कल्याणाचा । त्यांची असे वाचा सत्य सदा ॥२॥
आजि आम्हांसाठीं वैकुंठ हें केलें । आम्हां विसरविलें मृत्युलोका ॥३॥
आम्हीं विसरलों घरदार सारें । प्रपंचाचें वारें दुरी झालें ॥ ४ ॥
क्षणभरी होतों आम्हीं वैकुंठांत । प्रभुसीं पहात होतों आम्हीं ॥ ५ ॥
होतों सुखीं मग्न अनुपम ऐशा । तया जगदीशा कृपा थोर ॥ ६ ॥
प्रसन्न ती मूर्ति देते आशीर्वाद । होवोनी वरद परमा जी ॥ ७ ॥
परम माझी भक्ती तुम्हांसीं लाधेल । वंशोवंशीं होईल माझी सेवा ॥८॥
दारिद्र्य दोष तुम्हां मुळीं न बाधेल । सातत्यें राहील लक्ष्मी जवळी॥९॥
भजन माझें करा भक्तिमाजी राहा । ध्यानीं मज पहा उपदेशी ॥ १०॥
ऐसा उपदेश देती वासुदेव । प्रसन्न तो भाव आम्हांवरी ॥ ११ ॥
वासुदेव नाम आम्हीं सदा घ्यावें । भजनीं जागावें सर्वकाळ ॥ १२ ॥
कुटाळ संगातें धरूं नये कधीं । सज्जनाचे मधीं असावें कीं ॥ १३ ॥
ऐसा निरोप देती स्वामि वासुदेव । जैसा ज्याचा भाव फळेल कीं॥१४॥
विनायक म्हणे तुझा मी लाडिवाळ । तूं माय कृपाळ मजवरी ॥ १५ ॥

## ( ३८७ )

# आज्ञा मागणी

आज्ञा यावी महाराज । आपुल्या पुजेच्चीये काज ॥ १ ॥
पादुकातें उच्चलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥
उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा यावी दत्तात्रेया । आज्ञा यावी अत्रितनया ॥ ४ ॥

वार्षिक हें तुझें कार्य । तूंच करीं दत्तात्रेय ॥ ५ ॥
पूजन भजन करणें । जयजयकार उच्चारणें ॥ ६ ॥
नामघोष येथें करणें । तुझी कीर्ति येथें गाणें ॥ ७ ॥
उत्सव कार्य तूझें ऐसें । करणें दत्तदेवा तैसें ॥ ८ ॥
कार्य तुझें उत्सव तुझा । अंगिकार करीं माझा ॥ ९ ॥
उत्कर्ष करा या स्थानाचा । उपासना सद्धर्माचा ॥ १० ॥
सदा विजय आम्हांसीं । असो नाम-धारकांसीं ॥ ११ ॥
आज्ञा द्यावी आरंभाया । सेवन तुझें करावया ॥ १२ ॥
विनायक म्हणे नाथा । आज्ञा द्यावी श्रीसमर्था ॥ १३ ॥

( ३८८ )

## वासुदेव समाधिस्थ झाले

वासुदेव दत्तरूप । आज झाले निजरूप ॥ १ ॥
आनंदनाम संवत्सर । ज्येष्ठ महिना होता थोर ॥ २ ॥
झाला होता अतिसार । मळ-प्रक्षालन थोर ॥ ३ ॥
सकळ धुवोनी काढिलें । शरीर स्वामिनीं आपुलें ॥ ४ ॥
शुद्ध केला निज देह । सांडीयेला सर्व संदेह ॥ ५ ॥
योग अवलंबोनीयां । शक्तिवंत केली काया ॥ ६ ॥
नर्मदेसीं गेले पायां । तीर्थीं धुविली निजकाया ॥ ७ ॥
पद्मासन घालोनीयां । एकाग्र दृष्टि करोनीयां ॥ ८ ॥
स्वामी निजानंदीं मग्न । निजस्वरूपीं झाले लग्न ॥ ९ ।
अमावास्या टाकीयेली । प्रतिपदा तिथी घेतली ॥ १० ॥
मध्यरात्र समयासीं । सोडियेलें निजकायेसीं ॥ ११ ॥
ब्रह्मार्पण तनू केली । दत्तरूप मूर्ति ठेली ॥ १२ ॥

## (३८९)

# आज्ञा मागणी

आज्ञा द्यावी महाराज । आपुल्या पुजेचीये काज ॥ १ ॥
पादुकांतें उचलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥
उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा द्यावी दत्तात्रेया । आज्ञा द्यावी अत्रितनया ॥ ४ ॥
आज्ञा द्यावी वासुदेवा । आज्ञा द्यावी दत्तदेवा ॥ ५ ॥
पूजनाचा आज दिन । करणें नाथ आज्ञापन ॥ ६ ॥
प्रथम पूजा करायासीं आज्ञा देईं तूं प्रेमेंसीं ॥ ७ ॥
कृपादृष्टीं मज पाहणें । मजलागीं शुद्ध करणें ॥ ८ ॥
मजठायीं संचरावें । मजलागीं बळ द्यावें ॥ ९ ॥
माझे हातीं करवा कार्य । श्रीगुरुराज दत्तात्रेय ॥ १० ॥
गरुडेश्वराहूनि विभूति । पाठविली त्वां श्रीपति ॥ ११ ॥
पूजन झालें तुमचें देवा । श्रीगुरुराजा वासुदेवा ॥ १२ ॥
विभूतिचें झालें पूजन । आम्हीं केली विभूतिग्रहण ॥ १३ ॥
तेव्हां पासुनियां देवा । करितसों या उत्सवा ॥ १४ ॥
वार्षिक दिन तोच आज । प्राप्त झाला महाराज ॥ १५ ॥
याच कार्यासाठीं देईं । आज्ञा मज गुरुमाई ॥ १६ ॥
प्रथम करणें पूजन । मग उच्छिष्ट भोजन ॥ १७ ॥
मग प्रदोष पूजन विभूतिचें मग पूजन ॥ १८ ॥
ऐसा तुमचा उत्सव दत्ता । पूर्ण करा प्रगट सत्ता ॥ १९ ॥
आज्ञा द्यावी आरंभाया । आतां मज श्रीगुरुराया ॥ २० ॥
आम्हां ठायीं संचरावें । सकळ बळ आम्हां द्यावें ॥ २१ ॥
नाथा येथें प्रगटावें । पूजन करवोनि घ्यावें ॥ २२ ॥
स्वयें घ्यावी सकळ पूजा । सोपस्कार महाराजा ॥ २३ ॥
उणें कांहीं येथें नसो । सकळ समृद्धता असो ॥ २४ ॥
आम्हांसाठीं दत्तात्रेय । करवीं आतां निजकार्य ॥ २५ ॥

केलें प्रथम मंगलाचरण । आतां धरिले तुझे चरण ॥ २६ ॥
तूज करितों नमन । केलें विश्वासीं वंदन ॥ २७ ॥
विश्वात्मक तूंच देव । सकळ तूझेंच वैभव ॥ २८ ॥
तव नमितों चरणांसीं । नमन घ्यावें दयाराशि ॥ २९ ॥
नमुनीयां तुजलागीं । ध्याउनियां अंतरंगीं ॥ ३० ॥
आशीर्वाद मी मागतों । चरणीं शिर हें ठेवितों ॥ ३१ ॥
अंगिकारा या दासाला । गुरुराया श्रीदयाळा ॥ ३२ ॥
विनायक तुमचा दास । आतां कराजी आज्ञेस ॥ ३३ ॥

## ( ३९० )

# प्रसाद याचना

आतां द्यावा नाथा प्रसाद ताटींचा । घास अमृताचा द्यावा स्वामी ॥१॥
अमृतमय आम्हीं बनुनी रहावें । तुझ्या कृपें व्हावें अमृतचि ॥ २ ॥
जन्ममरण जावें आमुचें हरुनि । आमुच्या वदनीं अमृत घाला ॥ ३ ॥
पुत्रवत्सल माता जेविं कीं बालका । घांस घाली मुखा वात्सल्यानें ४
क्षुधा आणि तृषा लया याची जावी । बाळकास द्यावी पुष्टी तुष्टी ॥५॥
प्रेमाचाची घांस मुखी त्या घालित । आरोग्य इच्छित बालकाचें ॥६॥
तैसें आमुच्या मुखीं अमृत घालावें । निरामय करावें आम्हांलागीं ॥७
आमुचे कृतदोष सकळ नष्ट व्हावे । आमुचे साधावें परम हित ॥ ८ ॥
अपेयांचें पान अभक्ष्य भक्षण । प्रायश्चित्त जाण होवो तया ॥ ९ ॥
याचसाठीं देईं आम्हातें उच्छिष्ट । जे का यज्ञ-शिष्ट सर्व असे ॥ १० ॥
सकळ यज्ञांचें जें का पुण्य जाण । त्याचेंच प्रापण व्हावें आम्हां॥११॥
यज्ञ-शिष्ट अन्न त्याची थोर थोरी । त्रैलोक्यामाझारीं दुर्मिळ तें ॥१२॥
याचसाठीं द्यावा आम्हातें प्रसाद । अमुचा विषाद लया जावो ॥ १३ ॥
शोक भय जावो मोह लय पावो । आमुचें परम होवो कल्याणचि १४
तुझीये झोळींतूनी काढूनीयां देईं । भक्ष्य जें का होई परमान्न ॥ १५ ॥
विनायक म्हणे प्रसाद घ्यावया । आज्ञा दत्तात्रेया आतां द्यावी ॥ १६ ॥

मराठा



३८००५ वि: २११ वा: ३ नों: दि: ५।८।६०

( ३११ )

# भास्कर ब्राह्मणाची कथा

तूज भिक्षा करण्याचा । काम विप्र भास्कराचा ॥ १ ॥
पुरविला तुवां साचा । उत्कर्ष तुझीये सिद्धीचा ॥ २ ॥
अन्नपूर थोर केलें । चार सहस्र जेविले ॥ ३ ॥
तेंच येथें महिमान । प्रगट करीं दयाघन ॥ ४ ॥
किर्ती ऐकिली देवाची । नृसिंह सरस्वतिची ॥ ५ ॥
गाणगापूरिचे मुनिदेव । ऐकीयेलें त्यांचें वैभव ॥ ६ ॥
इच्छा झाली त्याच्या मना । आपण जावें तेथ दर्शना ॥ ७ ॥
भिक्षा करावी स्वामिसीं । सेवावें कीं तदुच्छिष्टासीं ॥ ८ ॥
दरिद्री होता तो ब्राह्मण । तिघांपुरतें घे प्रमाण ॥ ९ ॥
तांदुळ डाळ वरकड । इतुकाच करी मांड ॥ १० ॥
गाठोडें त्यानें बांधियेलें । गाणगापुरीं येणें केलें ॥ ११ ॥
तंव तेथें समाराधना । करिती ब्राह्मण-भोजना ॥ १२ ॥
सहस्र संख्या होय मिति । प्रत्यहीं अशी असे रीति ॥ १३ ॥
परम लाजला ब्राह्मण । म्हणे अपुलें दरिद्रपण ॥ १४ ॥
ब्राह्मण भोजनीं जेवित । उशाशिं गाठोडें ठेवित ॥ १५ ॥
तीन मास क्रमीयेले । ऐसें झालें जाणा भलें ॥ १६ ॥
त्याची पाळी मुळिं येईना । खिन्न झाला बहु मना ॥ १७ ॥
उपहास करिती जन । घालि स्वामीसीं भोजन ॥ १८ ॥
कोणें परी त्या बोलती । जेवाया आला निश्चिती ॥ १९ ॥
भिक्षा करणें ढोंग याचें । जेवण मनीं साधायाचें ॥ २० ॥
येथें फुकाचें भोजन । म्हणुनि आला हा ब्राह्मण ॥ २१ ॥
ऐसें त्यासीं बोलताती । कुचेष्टा बहु करिती ॥ २२ ॥
खिन्न झाला तो ब्राह्मण । म्हणे माझें हीनपण ॥ २३ ॥
कळवळले गुरुनाथ । आतुर्बळी श्रीसमर्थ ॥ २४ ॥

भक्ताभिमानी देव असे । भक्तांसाठीं उडी घेतसे ॥ २५ ॥
भक्तांसाठीं कळवळे । त्याचें हृदय कोंवळें ॥ २६ ॥
बोलाविलें भास्करासीं । आज भिक्षा तुजपाशीं ॥ २७ ॥
सर्व द्विजांसवें आम्हां । जेउं घालिं द्विजोत्तमा ॥ २८ ॥
म्हणे सामर्थ्य देवाचें । सत्य करील अपुले वाचे ॥ २९ ॥
अंगिकारी तो शाहाणा । नमन करित चरणां ॥ ३० ॥
गुरु सांगती बोलवाया । सकळही द्विजरायां ॥ ३१ ॥
बोलावितां हांसताती । उपवास आज म्हणती ॥ ३२ ॥
कैंचा आला हा ब्राह्मण । दुर्दैव आमुचें हें पूर्ण ॥ ३३ ॥
लाज न कैसी वाटे तुज । बोलाविसी कां रे आज ॥ ३४ ॥
केला तुवां मूर्खपणा । उपवास आम्हां जाणा ॥ ३५ ॥
त्याचें कोणी न ऐकती । स्वामी स्वयें सांगताती ॥ ३६ ॥
आज येथेंच जेवावें । तुम्हीं घरीं नच जावें ॥ ३७ ॥
ब्राह्मण मनीं विचारिती । कैशी होणार ही स्थिती ॥ ३८ ॥
मठामाजी सिधा असे । शिजविती वाटतसे ॥ ३९ ॥
लोक ऐसा विचार करिती । स्वामि पुन्हा बोलाविति ॥ ४० ॥
स्त्रिया पुत्रासवें यावें । आज आकंठ जेवावें ॥ ४१ ॥
कोपा चढले ब्राह्मण । त्यासि देती कीं दूषण ॥ ४२ ॥
मग शिष्ट बोलताती । विचार करा निगुती ॥ ४३ ॥
गुरु-निरोप सांगतसे । याचा काय दोष असे ॥ ४४ ॥
आह्मी तथास्तु म्हणावें । गुरू आम्हां न कोपावे ॥ ४५ ॥
भास्करासीं आनंद झाला । स्वयंपाक करी भला ॥ ४६ ॥
आपुली छाटी तया देती । अन्नावरी घाल म्हणती ॥ ४७ ॥
करित प्रार्थना द्विजांची । ऊर्मि येत त्यां कोपाची ॥ ४८ ॥
स्वयें गुरू आज्ञापिती । हां हां मग सकळ म्हणती ॥ ४९ ॥
मग हर्षले ब्राह्मण । खुललें त्यांचें अंतःकरण ॥ ५० ॥
वाढा वाढा ऐसें म्हणती । आग्रह फार फार करिती ॥ ५१ ॥
सकळ ब्राह्मण जेविले । स्त्रीपुत्रां भोजन दिधलें ॥ ५२ ॥
अतिशूद्र बोलाविले । त्यांसी अन्न देवविलें ॥ ५३ ॥

कोणी असे उपवासी । यावें त्यांनीं भोजनासि ॥ ५४ ॥
ऐसे नवल चमत्कार । दावोनियां गुरू साचार ॥ ५५ ॥
भास्करासीं निरोप देती । भोजन करीं आतां म्हणती ॥ ५६ ॥
तोही आकंठ जेविला । मग गुरुसीं म्हणाला ॥ ५७ ॥
भीमेमाजी सकळ अन्न । सोडियेलें तेव्हां जाण ॥ ५८ ॥
चार सहस्र झाली मिती । ऐसी आहे प्रभूची कीर्ती ॥ ५९ ॥
तीच आतां मी गावोनि । चरणीं शिर ठेवोनी ॥ ६० ॥
साक्षात्कार तोच व्हावा । येथें प्रसाद करावा ॥ ६१ ॥
व्हावा येथें अन्नपूर । वहावी अमृताची धार ॥ ६२ ॥
भाविक सर्व तृप्त व्हावे । परम कल्याण साधावें ॥ ६३ ॥
विनायक म्हणे देवा । आपुल्या विस्तरा वैभवा ॥ ६४ ॥

( ३९२ )

## आज्ञा मागणी

सायंकाळ ( पुजे पूर्वीं )

आज्ञा यावी महाराज । आपुले पूजेचीये काज ॥ १ ॥
पादुकातें उचलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥
उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा यावी दत्तात्रेया । आज्ञा यावी अत्रितनया ॥ ४ ॥
आज्ञा यावी वासुदेवा । आज्ञा यावी दत्तदेवा ॥ ५ ॥
स्वयें येथें प्रगटोनि । आमुच्या ठायीं संचरोनी ॥ ६ ॥
कार्य करवोनि घ्यावें । आम्हालागीं यश यावें ॥ ७ ॥
कार्य तुमचें उत्सव तुमचा । मीहिपण असे तुमचा ॥ ८ ॥
म्हणोनियां दत्तात्रेया । माझे हातीं करवा कार्या ॥ ९ ॥
विजयध्वजा माझे हातीं । यावी तुम्हीं बा श्रीपति ॥ १० ॥
स्थानमहिमा जागवायासीं । स्थान प्रगट व्हावयासी ॥ ११ ॥
साक्षात्कारें प्रगटावें । निजकार्य करवावें ॥ १२ ॥

अधिकारी आम्हां करावें । कृपादृष्टी आम्हां पहावें ॥ १३ ॥
गुरुदोष नष्ट व्हावे । शुद्ध आम्हां बनवावें ॥ १४ ॥
शुचिर्भूत आम्हां कराया । सोंवळेंपण आम्हां आणाया ॥१५॥
निजदृष्टीं आम्हां पहावें । आमुच्या हृदयीं प्रगटावें ॥ १६ ॥
आपणासीं स्पर्शावया । आज्ञा द्यावी दत्तात्रेया ॥ १७ ॥
चरणपूजा करावया । उपचार समर्पाया ॥ १८ ॥
आज्ञा द्यावी दत्तात्रेया । आम्हांलागीं श्रीगुरुराया ॥ १९ ॥
स्थानकार्य साधायासीं । संकल्प शुद्ध करायासीं ॥ २० ॥
उत्सव यज्ञ हा करवा । आमुचेसाठीं दत्तदेवा ॥ २१ ॥
पूर्णानंद स्वरूपानें । येवोनीयां आनंदानें ॥ २२ ॥
यज्ञकंकण माझे हातीं । बांधिलेंत रमापति ॥ २३ ॥
भजन याग पूर्ण कराया । यज्ञ सिद्ध येथें व्हाया ॥ २४ ॥
करवावें निजकार्य । संकल्प जेणें सिद्ध होय ॥ २५ ॥
उपासना वाढवाया । तैशा तुझ्या सांप्रदाया ॥ २६ ॥
भजनयाग आवश्यक । करवावा तो नित्यक ॥ २७ ॥
भजनपूजनाचा रंग । येथें करा रमारंग ॥ २८ ॥
आम्हां करा भजनीं दंग । विकसावें अंतरंग ॥ २९ ॥
काया वाचा आणि मनें । भजन करणें आनंदानें ॥ ३० ॥
पुरेपुर रंग यावा । निजजन दंग व्हावा ॥ ३१ ॥
प्रसादवात येथें वहावा । प्रसादगंध दरवळावा ॥ ३२ ॥
प्रसादाचें अवभृथस्नान । यज्ञ याग जेणें पूर्ण ॥ ३३ ॥
भजन यज्ञीं आम्हां घालावें । आम्हालागीं प्रसादावें ॥ ३४ ॥
भजनामृतें पान भोजन । घडवा आम्हां दयाघन ॥ ३५ ॥
निजकृपामृत पायस । प्रसाद द्यावया आम्हांस ॥ ३६ ॥
यज्ञकर्म प्रसादाचें । नित्य करवा येथें साचें ॥ ३७ ॥
यागामध्यें दोन भेद । प्रकृति विकृति वरद ॥ ३८ ॥
प्रकृति याग नित्य भजन । विकृती विश्वीं जोपासना ॥ ३९ ॥
जीवितावाधं हा यागा । व्रतचर्या तूंच सांग ॥ ४० ॥
सत्य वदणे धर्म पाळणें । प्रत्यक्ष ईशालागीं स्मरणें ॥ ४१ ॥

व्रतचर्या या यागाची । असे जाणा त्याग साची ॥ ४२ ॥
व्रतचर्या करवावी । आम्हांकडूनी पाळवावी ॥ ४३ ॥
माझ्या करवी करवणें । भजन तुझें कीं प्रेमानें ॥ ४४ ॥
तेंच ब्राह्मणभोजन । दाक्षिणा कथेचें श्रवण ॥ ४५ ॥
अग्रहार प्रवचन । नाममंत्र हेंच दान ॥ ४६ ॥
येथें स्वार्थाचें हवन । नियम येथें जे जे ध्यान ॥ ४७ ॥
भजन हेंच श्रेष्ठ साधन । तेंच करवा येथें यजन ॥ ४८ ॥
याच साठीं आज्ञा यावी । आपुल्या या मंगलकार्यीं ॥ ४९ ॥
गरुडेश्वराहुनी विभूति । पाठविली कीं श्रीपती ॥ ५० ॥
अनुग्रह थोर केला । साक्षात्कार येथें दाविला ॥ ५१ ॥
क्षणभर दर्शनासी । दिधलें देवा तूं मजसी ॥ ५२ ॥
उत्सव तुम्हीं करविला । आम्हांकडुनी त्याचा भला ॥ ५३ ॥
सोळावा हा असे उत्सव । पूर्ण करा वासुदेव ॥ ५४ ॥
वार्षिक हें तुझें कार्य । सिद्ध करा दत्तात्रेय ॥ ५५ ॥
निरंतर आम्हीं भजनी । आळवूं तुज यश गावुनि ॥ ५६ ॥
यास्तव आतां आज्ञा देई । कृतार्थता जेणें होई ॥ ५७ ॥
विनायक तुजला शरण । यासी करी आज्ञापन ॥ ५८ ॥

( ३९३ )

# आज्ञा मागणी

( विभूती पूजनापूर्वीं )

विभूति पूजनासीं आतां आज्ञा देई । वासुदेव माई निजकृपें ॥ १ ॥
गरुडेश्वराहुनी प्रसाद पाठविला । निज हातीं भला परात्परा ॥ २ ॥
पूर्णानंदें केली त्वदीय स्थापना । तूझीये पूजना सांगितलें ॥ ३ ॥
तुझीया नांवें स्थान हें स्थापियेलें । अनुग्रहीत केलें मजलागीं ॥ ४ ॥
चंपाषष्ठी दिन पहांटेची वेळ । मुहूर्त प्रबळ पाहोनियां ॥ ५ ॥
संकल्प पूर्वक स्थापना करीयेली । मज सांगितली प्रसादखुण ॥ ६ ॥

तीन वर्षें ऐशी करीं उपासना । देईल दर्शना वासुदेव ॥ ७ ॥
आज अवतार प्रत्यक्ष दत्ताचा । वासुदेव साचा यती श्रेष्ठ ॥ ८ ॥
श्रीपादश्रियावल्लभ प्रथम अवतार । दुसरा साचार नरहरी ॥ ९ ॥
नृसिंह सरस्वती गाणगापूरींचा । तृतीय हो साचा वासुदेव ॥ १० ॥
पूर्णानंदें ऐसें मज सांगितलें । मस्तकीं ठेविलें स्वकराला ॥ ११ ॥
उपासना धर्म वाढवाया कारण । केलें संकल्पन भजनाचें ॥ १२ ॥
तीन वर्षें ऐशी करित मी पूजा । तुम्हां महाराजा कळविलें ॥ १३ ॥
गरुडेश्वरीं तेव्हां नर्मदेचे तीरीं । वास परिकरीं तुमचा होता ॥ १४ ॥
पाठविली तेव्हां प्रसादाची खूण । स्वयें तुम्हीं आपण वासुदेवा॥ १५॥
गुरुवार होता नक्षत्र पुनर्वसु । समय प्रदोषु पूजेसाठीं ॥ १६ ॥
ज्येष्ठ तृतीयेसीं पावली विभूति । आनंद आम्हांप्रती बहू झाला ॥१७॥
उत्सव करावा पूजन विभूतीचें । म्हणोनियां साचें कल्पियेलें ॥ १८ ॥
तुमची आज्ञा घ्यावी म्हणोनि लेखन । करणें संकल्पन बसलों मी॥१९॥
प्रथम भजन तुमचें करावें । म्हणोनि बरवें योजिलें मी ॥ २० ॥
मध्यान्हीचा होता तेव्हां शांत समय । जेव्हां गुरुराय प्रगटलां ॥ २१ ॥
एक क्षण मज साक्षात् दावीयेलें । निजरूप भलें या स्थानांत ॥ २२ ॥
दुजीयासी तेव्हां दाविला दृष्टान्त । कोणी यति येत शिष्यांसह ॥ २३॥
आम्हीं आदरोनी तयासि पूजिलें । स्वप्नांत पाहिलें जागा होई ॥ २४ ॥
दुसऱ्यासी तैसा दृष्टान्त दिधला । आपुल्या स्थापनेला स्वयें केलें ॥२५॥
तोच हा उत्सव वार्षिक तुमचा । पातलासे साचा दयानिधे ॥ २६ ॥
गुरुवार होता नक्षत्र पुष्य होतें । प्रदोषकाळातें धरोनियां ॥ २७ ॥
आषाढाचा होता द्वितीयेचा दिन । केलें कीं पूजन विभूतीचें ॥ २८ ॥
मोठा समारंभ तेव्हां तो जाहला। साक्षात्कार दाविला तेव्हां तुम्हीं॥२९॥
सोळावें हें वर्ष वाढविन आज । म्हणुनि महाराज आज्ञा द्यावी ॥३०॥
आज्ञा द्यावी मज प्रसाद पूजाया । वासुदेवराया दत्तमुनि ॥ ३१ ॥
तुझीया कृपेची आम्हीं गा माणसें । भयतें कायसें आम्हालागीं ॥ ३२ ॥
ढोंगी म्हणतील खरेंच हें ढोंग । शुद्ध अंतरंग ढोंगें होई ॥ ३३ ॥
इतर ढोंगाहुनी ढोंग हें विशेष । जिवितावधि यास आचरीन ॥ ३४ ॥
लोकांसवें काय माझें असे काज । पुरवित चोज देव माझें ॥ ३५ ॥

जैसा संकल्प मी करुनि ठेवितों । तैसा पुरवितो देव माझा ॥ ३६ ॥
देवावांचूनि मी ओशाळा कोणाचा । साह्य करी साचा देव माझा ॥३७॥
ऐसा अनुभव बहुतां दिसांचा । पाठिराखा साचा वासुदेव ॥ ३८ ॥
ऐसें महात्म्य तूझें गाउनि मी वाचे । मागणें आज्ञेचें करितों कीं ॥३९॥
आजवरि माझे लाड पुरविले । कौतुक माझें केलें कितीपरी ॥ ४० ॥
आकाश ठेंगणें माझेसाठीं तूज । माझे प्रेमकाज जननी तुज ॥ ४१ ॥
त्याच अनुभवें आज्ञा मी मागतों । चरणीं ठेवितों मस्तकाला ॥ ४२ ॥
विनायक म्हणे केली विनवणी । तेणें चक्रपाणी संतु ला ॥ ४३ ॥

( ३९४ )

## कृतज्ञता वचन

( पूजेनंतर )

आनंदाचा दिन देवें दाखविला । कृतकृत्य झाला भक्तजन ॥ १ ॥
वार्षिक निजकार्य देवें सिद्ध केलें । आम्हां आनंदविलें वासुदेवें ॥२॥
महायज्ञ झाला आज तीन दिस । देवें प्रसादास केलें आम्हां ॥ ३ ॥
दिला आशीर्वाद प्रसाद पायस । तेणें अंतरास सुखवीलें ॥ ४ ॥
कायसें बोलावें कितीसें वानावें । कृपा वासुदेवें थोर केली ॥ ५ ॥
उणे कांहीं नाहीं पडूं येथ दिलें । स्वयें सकळ केलें कार्य थोर ॥ ६ ॥
आपण संभार सकळ जमविला । आपणाचि केला सिद्ध यज्ञ ॥ ७ ॥
भजन रचविलें जैसें जैसें हवें । सदय वासुदेवें जाणावें कीं ॥ ८ ॥
प्रथमपासूनि कार्य शिरीं घेतलें । वासुदेवें केलें सिद्ध थोर ॥ ९ ॥
रचना प्रसादाची करोनि ठेविली । तैशी जमविली सामुग्रीही ॥ १० ॥
आपणचि स्वयें रचिलें नाटक । गोड संविधानक रचियेलें ॥ ११ ॥
आपणची तैसे नटोनियां आले । येथें संचरले आपणची ॥ १२ ॥
आपणचि केला सकळ जयजयकार । आशिर्वाद थोर आम्हां दिला १३
आमुच्या कल्याणाचा दिला आशीर्वाद । आपण वरद झालों म्हणती १४
आम्हीं तुम्हांवरी प्रसन्न म्हणाति । कल्याणाचे प्रति सांगताती ॥ १५ ॥

आपण आम्हां देती स्वयें मोठेपण । ऐसें वात्सल्यपण प्रकाशिती ॥१६॥
आमुची करिती मुखानें वाहवा । वत्सल स्वभावा प्रगटिती ॥ १७ ॥
धन्य तुम्हीं आम्हां म्हणती वासुदेव । म्हणोनि माझा भाव तुम्हांपाशीं१८
आज प्रिय भाव आम्हां जननीचा । काय माझी वाचा बोलेल कीं १९
प्रियपण आज दिसोनियां आलें । काय वदु भलें बोलवेना ॥ २० ॥
कार्य त्वांच केलें आम्हां गौरवीलें । काय सांगु भलें तुझें प्रेम ॥ २१ ॥
याहुनि आणिक बोलतां येइना । उगीच वल्गना काय करूं ॥ २२ ॥
अधिकचि आम्हीं धरावा भक्तिभाव । तुज वासुदेव सेवावें कीं ॥ २३ ॥
तेथें भवसागर तरोनियां जावा । आम्हीं रंगवावा निज आत्मा ॥२४॥
तल्लीन होवोनियां रहावें अंतरीं । सेवावें नरहरी तारकाला ॥ २५ ॥
हाच तुझा आहे उपदेश देवा । याच आम्हीं भावा ओळखावें ॥ २६ ॥
शरण चरणासीं तुझ्या प्रिय भावेंसीं । घेईं पदरासीं वासुदेव ॥ २७ ॥
हेंच माझें ज्ञान भक्ती वैराग्य पूर्ण । तरी नारायण पदरीं घ्या ॥ २८ ॥
जैसा आहें तैसा मज पदरांत । घ्यावा कीं त्वरित वासुदेवा ॥ २९ ॥
याहुनि काय बोलुं तुज काय सांगूं । याहुनि काय मागूं तुजपाशीं ॥३०॥
मागण्याचें नाहीं मजसीं उरलें । सर्वस्व मी केलें त्वदर्पणा ॥ ३१ ॥
आतां मागण्याचें नसेच कीं कांहीं । कृपा मज पाहीं नित्य करा ॥३२॥
तुझाच मी असें नसें कवणाचा । गुरुराया साचा भाव माझा ॥ ३३ ॥
विनायक म्हणे अनन्य शरण । माझें तूं अरण करावें कीं ॥ ३४ ॥

( ३९५ )

# गुरुः साक्षात्परब्रह्म

तारीख २६।६।१९३०

गुरुविण नाहीं कोणालागीं गति । देवही सेविती गुरु तरी ॥ १ ॥
इंद्राला जें मोठेपण प्राप्त झालें । सेवनेंच भलें गुरुजीच्या ॥ २ ॥
ज्ञानें श्रेष्ठपण ज्ञान गुरुपाशीं । म्हणोनी तयासीं नत होईं ॥ ३ ॥
मोठेमोठे झाले आजवरी विख्यात । कृपेनें समस्त गुरुजींच्या ॥ ४ ॥

गुरुविण नाहीं अन्य तरणोपाय । म्हणोनियां पाय धरा त्याचे ॥ ५ ॥
किती झाला भक्त वाचाळ पंडीत । वेदांत बोलत किती जरी ॥ ६ ॥
गुरुविण नाहीं तया पक्केपण । गुरुविण शीण व्यर्थ जाणा ॥ ७ ॥
विधि हरिहर गुरुसीं सेविती । आम्हां काय गति पामरांना ॥ ८ ॥
ठेवोनियां श्रेष्ठ-जन-विहित मार्ग । पुढती तूं वाग माझ्या मना ॥ ९ ॥
ऐसा मनामाजी धरूनीयां बोध । चालवावा शोध गुरुजीचा ॥ १० ॥
खरी तळमळ जेव्हां लागे चित्ता । तेव्हांच तो सत्ता गुरु स्थापी ॥११॥
आपण प्रगटे स्वयें त्याच्यापुढें । प्रेम असे गाढें गुरुपाशीं ॥ १२ ॥
आपणाचि बळें देतों अनुग्रह । फेडितो संदेह अंतरीचे ॥ १३ ॥
न कळत त्याला उपदेश देतो । बोध प्रकाशीतो हृदयांत ॥ १४ ॥
सहज नाशी तम प्रकाश पडत । तेजास चढत चित्त भारी ॥ १५ ॥
तेजोमय चित्त तयाचें करीत । सूर्य प्रकाशत जैसा कांहीं ॥ १६ ॥
धगधगति अग्नि जैसा प्रज्वाळीत । तेजोमय होत गुरुभक्त ॥ १७ ॥
निजकृपेची तो मग पाडी छाया । प्रगटि तो काया निजगुरू ॥ १८ ॥
दाटे चित्तामाजी शीतळ ती छाया । ज्योत्स्ना उपमाया योग्य नाहीं॥१९॥
जैसी मेघामधिं चमके विद्युल्लता । तैशी तया चित्ता अनुग्रही ॥ २० ॥
पेटत रहात ज्वाला-माला कुला । उपमा ज्योतिला जगीं नसे ॥ २१ ॥
तेजोवंत परी बहुत शीतल । अत्यंत मृदुल वर्ततसे ॥ २२ ॥
भरोनि अमृत जाणाती राहिली । ऐशी प्रकाशली ज्योत चित्तीं ॥२३॥
तया ज्योतीमध्यें हंसत मुख दावी । रूप प्रगटवी सगुण तो ॥ २४ ॥
सगुणाची छाया आनंदाची सीमा । स्वयें पूर्ण कामा असे सदा ॥२५॥
न कळतची ऐसा प्रगट तो होतो । शीतल उभारीतो निजच्छाया ॥२६॥
अग्नि सूर्य चंद्र यांचीच बनविली । अमृतें निर्मिली जशी कांहीं ॥२७॥
मूस सुगंधाची मूर्ति माधुर्याची । समाप्ति सुखाची जिचे ठायीं ॥२८॥
पराकाष्टा जणुं असे सार्थकतेची । प्रगटतसे साची गुरुमूर्ति ॥ २९ ॥
इतरांस काय त्याचा अनुभव । ज्याचा शुद्ध भाव नाहीं झाला ॥३०॥
गुरुदर्शनाचें सुख अनुपम । दुःखासि विराम सहजचि ॥ ३१ ॥
मग उपदेश स्वामी चित्तीं देतो । तेथें परिस्फुरतो ज्ञानमूर्ति ॥ ३२ ॥
तेथें मंत्र देतो भविष्य सांगतो । समाधि लावीतो निजठायीं ॥ ३३ ॥

ज्याचा त्यासीं असे हा सुखानुभव । याचा कोणा भाव सांगू येना ॥३४॥
जनीं करिती वेडा गुरुमहाराज । करिती निर्लज्ज भक्तालागीं ॥ ३५ ॥
लौकिकांतुनी त्या बाहेर काढिती । स्वयें रमविती निजठायीं ॥ ३६ ॥
अत्यंत शांतीचा समय प्राप्त होतो । कोणा वर्णवतो निजवाचे ॥ ३७ ॥
म्हणुनि करणें गुरुचें भजन । गुरुचें पूजन सर्वकाळीं ॥ ३८ ॥
अहोरात्र तया नित्यची सेवणें । त्याची कीर्ति गाणें सदोदित ॥ ३९ ॥
त्याच्याठायीं होणें मग्न आम्हीं सदा । थांबणें न कदा जाणावें कीं ॥४०॥
जीवितावधि हा योग भजनाचा । साधायाचा साचा आम्हालागीं ॥४१॥
यास्तव समारंभ करणें आम्हांसीं । करणें उत्सवासीं गुरुजीच्या ॥४२॥
भजन पूजन प्रेमें आदरणें । सावधान होणें गुरुठायीं ॥ ४३ ॥
लौकिकाची सांड करणें आम्हांसीं । सांडणें लज्जेसीं मुळींहुनी ॥ ४४ ॥
पतिसुख कैसें मिळेल नारीला । धरीत लज्जेला भोगकाळीं ॥ ४५ ॥
नरदेह जाणा भोगाचा समय । सेवूं गुरुराय निर्लज्जत्वें ॥ ४६ ॥
करोनियां ऐसा आम्हीं सुविचार । भजूं रमावर सदाकाळ ॥ ४७ ॥
कोणी ढोंगी म्हणो आम्हांसी नाटकी । आम्हां अटक कीं मुळीं नाहीं॥४८॥
एकची अटक गुरुसेवकासीं । कधीं न भजनासीं सोडावें कीं ॥ ४९ ॥
काया वाचा मन त्रिकरण अर्पून । चित्तांत रंगून भजणें कीं ॥ ५० ॥
आम्हीं वेडे असों आम्हीं खुळे असों। अज्ञानी कीं असों आम्हीं जाणा॥५१॥
लौकिकाच्या गोष्टी वेड्याच्या समान । कृपा-विलोकन दत्तजीचें ॥५२॥
आम्हीं त्या प्रभुच्या कृपेचीं लेंकरें । प्रेमाच्या निकरें भजतों कीं ॥५३॥
प्रेम हें आंधळें प्रेम असे खुळें । किती उचंबळे आम्हाठायीं ॥ ५४ ॥
विनायक झाला बहु सद्गदित । प्रेमची लोटत अपरंपार ॥ ५५ ॥

( ३९६ )

## आज्ञा मागणी

आज्ञा द्यावी महाराज । आपुल्या पुजेचीये काज ॥ १ ॥
पादुकातें उचलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥

उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा यावी गुरुराया । आज्ञा यावी दत्तात्रेया ॥ ४ ॥
आज्ञा यावी वासुदेवा । पाहुनी आमुच्या भावा ॥ ५ ॥
आज उत्सवाचा दिन । वार्षिक हा दयाघन ॥ ६ ॥
तुझ्या कृपें आनंदाचा । प्राप्त झाला असे साचा ॥ ७ ॥
म्हणोनियां तुज पूजूं । प्रेमभरें आम्हीं सजूं ॥ ८ ॥
कार्य सोपस्कर व्हावें । आशीर्वचनातें यावें ॥ ९ ॥
अनुग्रह आम्हां व्हावा । गुरुराया दत्त देवा ॥ १० ॥
गरुडेश्वर माणगांव । येथें आणावे ते गांव ॥ ११ ॥
आणा येथें नर्मदेसी । नाथा आपुल्या कार्यासीं ॥ १२ ॥
स्वयें येथें प्रगटावें । पूजन करवोनी घ्यावें ॥ १३ ॥
न्यून कांहीं न पडावें । कार्य सोपस्कर व्हावें ॥ १४ ॥
आमुचें हित कीं साधावें । कल्याणची सदा व्हावें ॥ १५ ॥
विनायकाचा तूं गुरू । वासुदेव कल्पतरू ॥ १६ ॥

( ३९७ )

## आज्ञा मागणी

तरी आतां आज्ञा यावी । मजवरी कृपा व्हावी ॥ १ ॥
आहे चरणीं शरण । आहे घेतलें दासपण ॥ २ ॥
तरी आतां कृपा करीं । प्रगटावें साक्षात्कारीं ॥ ३ ॥
विनायक तुज शरण । करी यास आज्ञापन ॥ ४ ॥

( ३९८ )

## गुरुः साक्षात्परब्रह्म

मार्गदर्शक तो गुरुविण नाहीं । जावें लवलाहीं शरण त्या ॥ १ ॥
गुरुपाशीं विद्या गुरुपाशीं कला । गुरु सामर्थ्याला देत असे ॥ २ ॥

गुरुपाशीं सिद्धि ऐश्वर्य त्याचेनी । गुरु मोक्षदानी सर्व दाता ॥ ३ ॥
इह परत्रासीं सद्गतिचा दाता । गुरु भयत्राता विघ्नहर्ता ॥ ४ ॥
गुरु कल्पतरु गुरु सुरेश्वर । गुरु हा आधार ब्रह्मांडाचा ॥ ५ ॥
स्वर्ग मृत्यु आणि पाताळींचा राजा । गुरु महाराजा विश्वपति ॥ ६ ॥
कैलासींचा शिव वैकुंठाधिपति । सत्य लोक पति गुरुदेव ॥ ७ ॥
विधि हरिहर एकवटली मूर्ति । तीच गुरुमूर्ति जाणावी कीं ॥ ८ ॥
त्रिगुणात्मक देव शुद्ध सत्व भाव । त्याचें मीं वैभव बोलूं काय ॥ ९ ॥
जगताचा पति प्राणांचा तो प्राण । आत्माराम पूर्ण ब्रह्मांडाचा ॥१०॥
गुरु हें साधन गुरु हेंच साध्य । गुरु हे आराध्य सकलांचें ॥ ११ ॥
गुरु हा सोबती गुरु प्राणसखा । गुरु पाठिराखा सकलांचा ॥ १२ ॥
गुरु हें चेतन गुरु हें प्राणन । गुरु हें जीवन त्रैलोक्याचें ॥ १३ ॥
गुरु हेंच अन्न गुरु हाच अत्ता । गुरुचीच सत्ता अत्तृत्वानें ॥ १४ ॥
गुरु प्रजापति गुरु हें अव्यक्त । ब्रह्म व्यक्ताव्यक्त गुरु एक ॥ १५ ॥
गुरु सूर्य चंद्र नक्षत्र आणि तारा । सकळ पसारा गुरु एक ॥ १६ ॥
बुद्धिचा जो बोध बुद्धिचें विज्ञान । जे का वियोतन गुरु जाणा ॥१७॥
गुरु परमार्थ गुरुच कीं स्वार्थ । गुरु अर्थानर्थ जगामाजी ॥ १८ ॥
गुरु हा संसार गुरु हेंचि सार । गुरु जें असार तेंही तोच ॥ १९ ॥
गुरु हा विचार गुरु अविचार । विचारा विचार गुरु सर्व ॥ २० ॥
गुरु हा विवेक गुरु अविवेक । गुरु जाणा निक सर्व कांहीं ॥ २१ ॥
गुरु परब्रह्म गुरु हाच मोक्ष । गुरु सर्वसाक्ष सर्वदृष्टी ॥ २२ ॥
जन्म मृत्यु गुरु रोग भोग गुरु । द्वन्द्व प्रतिकारु गुरु जाणा ॥ २३ ॥
गुरुविण कायसें या जगतांत । सर्व परिस्फुरत गुरु एक ॥ २४ ॥
जें जें कांहीं जाणा विश्वांत भरलें । ज्ञान देत भलें गुरुसम ॥ २५ ॥
ज्याचा ज्याचा घडे आम्हांसी आश्रय । ज्ञानद तें होय अनुभवीं ॥२६॥
वस्तुज्ञान देती विषयां बोधिती । भोग शिकविती ज्ञानाचि कीं ॥ २७ ॥
इंद्रियांचे स्पर्श जे कां विषयांसीं । विषय ज्ञानासीं प्रगटीती ॥ २८ ॥
भोक्तृत्वकर्तृत्व सकळ ज्ञानमय । ज्ञानानेंच होय अनुभव ॥ २९ ॥
सुखदुःख जाणे तोच अनुभव । ज्ञानाचाच भाव सर्व कांहीं ॥ ३० ॥
विश्वज्ञानात्मक गुरु ज्ञानमय । म्हणोनियां होय गुरुमय ॥ ३१ ॥

ब्रह्मांड हें गुरु याचीया कारण । जेथें तेथें जाण असे गुरु ॥ ३२ ॥
विचारवंतालागीं भेटतसे गुरु । भवांबुधि पारु करी त्यासीं ॥ ३३ ॥
ज्यासीं लागे जाणा श्रीगुरुची आस । भेटतसे खास त्यास गुरु ॥ ३४ ॥
विनायक म्हणे हेंच उपनिषद । यांत तें विशद गुरुज्ञान ॥ ३५ ॥

(३९९)

## वासुदेव पुण्यतिथीचे दिवशीं काय करणे तें

शुक्रवार ता० २७।६।१९३० ( सकाळीं पूजेपूर्वीं )

आज दिन तुझ्या जाण पुण्यतिथिचा । आम्हां पुण्याईचा थोर असे ॥ १ ॥
आनंदाचा दिन दिन पर्वणीचा । दिन प्रसादाचा थोर आज ॥ २ ॥
वैकुंठ भूवरी आज तें येतसे । देव प्रगटतसे साक्षात्कारें ॥ ३ ॥
आज दर्शनाचा दिन हा भेटीचा । आज मंगलाचा वासर कीं ॥ ४ ॥
आजचा दिवस जाणा तीर्थरूप । जळतसे पाप भोळे लोकां ॥ ५ ॥
चित्त मळ होत आज प्रक्षाळित । चित्त प्रकाशत शुद्धरूप ॥ ६ ॥
चित्त शोधनाचा दिवस अपूर्व । उठे भक्तिभाव आज दिनीं ॥ ७ ॥
आज हृदयांत होत आविर्भूत । दत्त आम्हां होत वासुदेव ॥ ८ ॥
आज या स्थानाचा प्रबोध दिवस । महिमा विशेष जागे आज ॥ ९ ॥
आज वासुदेव स्वयें प्रगटत । आशिर्वाद देत भजकाला ॥ १० ॥
आज दिन आहे वासुदेव स्मृतिचा । आठव तयाचा करणें कीं ॥ ११ ॥
आज करणें आम्हां अल्प अनुकरण । भजन पूजन उपासना ॥ १२ ॥
त्यानीं जें जें केलें आम्हांसाठीं भलें । थोडें अनुकारिलें पाहिजे कीं ॥ १३ ॥
भजन पूजन भिक्षा समारंभ । अमृताचा लाभ जयालागीं ॥ १४ ॥
त्याचा अनुकार अल्पसा करणें । प्रसाद वाटणें भाविकांस ॥ १५ ॥
उपहाराचा कीं प्रसाद वाटणें । गरुडेश्वर स्मरणें आज दिनीं ॥ १६ ॥
स्मरण नर्मदेचें स्मरण गरुडाचें । स्मरण दैत्याचें करणें आज ॥ १७ ॥
स्मरण शंकराचें तैसें माणगांवाचें । टेंभे सत्कुलाचें स्मरण कीं ॥ १८ ॥
स्मरण करणें गुरुसेवकांचें । स्वामि वासुदेवाचें स्मरण करणें ॥ १९ ॥
ज्याचा ज्याचा केला संबंध वासुदेवें । त्यांचें प्रेमभावें स्मरण कीं ॥ २० ॥

स्मरणाचा दिन धन्य पुण्य आज । गुरु महाराज तुमचा कीं ॥ २१ ॥
सिद्ध हा करावा संकल्पित योग । शुद्ध अंतरंग बनायासीं ॥ २२ ॥
झळमटें जीं का चित्तासीं जडलीं । पाहिजे प्रक्षाळिलीं कुंचल्यानें ॥२३॥
स्मरण कुंचला घेवोनियां करूं । शुद्ध हें अंतरूं आजदिनीं ॥ २४ ॥
गुरुजीच्या कृपें आम्हीं शुद्ध होऊं । पदवीला जाऊं गुरुजीच्या ॥२५॥
ऐसा हा सुयोग घडवोनी आणाया । आम्हीं गुरुपायां शरण कीं ॥२६॥
धरोनी चरण मस्तक अर्पोन । नम्रता धरून आज्ञा मागूं ॥ २७ ॥
आज्ञा दयाघन देईल आम्हांसीं । संतोष चित्तासीं होय त्याच्या ॥२८॥
आम्हीं हीं माणसें त्याचींच म्हणोनी । हृद्गत स्वमनीं जाणूं त्याचें ॥२९॥
आमुच्या गुरुला काय गा रुचेल । प्रियचि वाटेल काय त्याला ॥३०॥
आम्हीं जाणतसों त्याचें मनोगत । म्हणोनी प्रार्थित धीट आम्हीं ॥३१॥
संकल्प चरणीं केला निवेदन । द्या आशीर्वचन सिद्धीचें कीं ॥ ३२ ॥
ऐशीं नम्र वाचा बोलुनी मागतों । शिर हें ठेवितों त्याच्या पदीं ॥३३॥
आशीर्वाद आणि आज्ञा आतां देई । वरद तू होई वासुदेवा ॥ ३४ ॥
विनायकें ऐसा संकल्प कथिला । गुरुचरणाला सिद्ध व्हावा ॥ ३५ ॥

( ४०० )

# वासुदेव लीला स्मरण

### भिक्षासमारंभ ( पूजेनंतर )

स्मरण कराया तुझिया लीलांचें । अवलंबूं साचें तुझें कर्म ॥ १ ॥
घेवोनी संन्यास भिक्षा मागितली । सशास्त्र ती भली कृपावंता ॥ २ ॥
भिक्षेचें कीं व्रत तुम्हीं आचरिलें । नियम पाळिले भिक्षेचे कीं ॥ ३ ॥
व्रतमाहात्म्य हें तुमचें सगुण । म्हणोनियां पूर्ण गौरवाच ॥ ४ ॥
तयाचा गौरव कराया कारण । तें पुण्यस्मरण साधावया ॥ ५ ॥
दिन हा आजचा पुण्यस्मरणाचा । तुमचे गौरवाचा वासुदेवा ॥ ६ ॥
म्हणोनियां करूं गौरव झोळीचा । संन्यास-दंडाचा स्मरणार्थ ॥ ७ ॥
तुम्हीं अवतार दत्त भगवंताचे । त्यासहि भिक्षेचें नित्यव्रत ॥ ८ ॥

अवधूतरूप त्रैलोक्यांत फेरी । सदा पादचारी भगवान ॥ ९ ॥
एकाठायीं नाहीं वस्ती त्या देवाची। त्या सिद्ध पुरुषाची कोठेंच कीं॥१०॥
कधीं काशीमध्यें कधीं पाताळांत । अवनीसीं फिरत सर्वकाळ ॥ ११ ॥
नाहीं मठ त्यासीं नाहींच आश्रम । नाहीं कोठें धाम कल्पियेलें ॥१२॥
झाडाखालीं वस्ती प्रिय औदुंबर । फिरे वनांतर एकलाचि ॥ १३ ॥
अरण्यवासासीं सह्यागिरीवरी । परमात्मा करी दत्तात्रेय ॥ १४ ॥
तेंच तुम्हां व्रत गुरु वासुदेवा । भिक्षेच्या वैभवा गौरवीलें ॥ १५ ॥
नाहीं केलें कांहीं तुम्हीं मठ धाम । चवथा आश्रम स्वीकारीला ॥१६॥
विश्वधाम तुम्हीं विश्वपरिवार । केलात संचार आर्यावर्ती ॥ १७ ॥
हिमालयापासोनी कुमारीपर्यंत । तुम्हीं फिरलेत योगनिष्ठ ॥ १८ ॥
मुखानें भजन भिक्षेचें अशन । देवळीं स्वपन क्रम ऐसा ॥ १९ ॥
त्याचेंच आम्हांला स्मरण करणें । भजन गर्जणें देवनामीं ॥ २० ॥
उपासना-व्रत तुम्हीं पढविलें । तुम्हीं चालविलें वासुदेवा ॥ २१ ॥
त्याचाच अनुवाद करणें आम्हांसीं । त्या अनुकारासीं अनुसरणें॥२२॥
याचसाठीं आतां आज्ञा मागतों मी । द्यावी मज स्वामी वासुदेवा॥२३॥
समारंभासाठीं मज आज्ञा द्यावी । आपुली प्रगटावी मूर्ति येथें॥ २४ ॥
माझे हातीं द्यावा आपुला श्रीदंड । प्रसाद उदंड व्हावा मज ॥ २५ ॥
म्हणुनि प्रार्थितों चरण धरीतों । मस्तक ठेवितों पदांवरी ॥ २६ ॥
प्रगटोनी येथें, आम्हांसंगें ध्यावें । नाथ करवावें समारंभा ॥ २७ ॥
आम्हीं फेर धरूं आम्हीं भजन करूं। आनंद कीं थोरूआम्हालागीं ॥२८॥
तरी प्रगटावें तुम्हीं योगी मुनी । आम्हांते देवोनी आशीर्वाद ॥ २९ ॥
तुम्हीं दत्तदेव तुम्हीं वासुदेव । एकचि कीं भाव तुमचा हा ॥ ३० ॥
आम्हांसाठीं केला समारंभ थोर । होउनि उदार परमात्मया ॥ ३१ ॥
प्रगटलां येथें आनंदचि केला । आम्हां स्मरणाला देवोनियां ॥ ३२ ॥
दंडाचा गौरव गौरव भिक्षेचा । गौरव नामाचा केला येथें ॥ ३३ ॥
केला जयजयकार अपुले यशाचा । गुण वर्णनाचा समारंभ ॥ ३४ ॥
वार्षिक हें कार्य तुझें भगवंता । गुरु अवधूता दत्तात्रेया ॥ ३५ ॥
उरलें पुढील कार्य करवावें । आम्हां गौरवावें कृपाळुवा ॥ ३६ ॥
विनायक आहे चरणीं शरण । गुरु नारायण तुमच्या कीं ॥ ३७ ॥

(४०१)

# वासुदेव-चरित्र-सार

( पूजेपूर्वी सायंकाळीं )

दिवस आज नाथा पुण्यस्मरणाचा । भजन पूजनाचा दिन आज ॥१॥
अहोरात्र तुझ्या चिंतनीं रहाणें । चरित स्मरणें तुझें आज ॥ २ ॥
ज्या ज्या कांहीं गोष्टी चरित्रीं घडल्या । आठवणें भल्या आज आम्हां॥३॥
विचार करणें यथानुक्रमानें । रहस्य जाणणें त्यांतील कीं ॥ ४ ॥
सार काय आम्हां त्यांतील सेवणें । बोध काय घेणें आपुल्याला ॥ ५ ॥
मार्मिक विचार हृदयीं करणें । त्यापासोनी घेणें धडा आम्हां ॥ ६ ॥
चुकतें आमुचें आचरणांत काय । फलप्रद होय काय आम्हां ॥ ७ ॥
याचीच करणें मीमांसा आम्हांला । शिकवण मनाला काय असे॥८॥
कैसें बालपण कैसें तरुणपण । कैसें वार्धक्यपण गुरुजींचें ॥ ९ ॥
काय काय केले आचार गुरुनीं । दाविले वर्तुनी आम्हालागीं ॥ १० ॥
त्याचीच करणें मनापाशीं फोड । संशयाची फेड करायासीं ॥ ११ ॥
आदर्श ठेवणें गुरुचरित्राचा । बनाया साचा निजाचार ॥ १२ ॥
उत्तम कुलांत वरिष्ठ वर्गांत । झाले प्रादुर्भूत वासुदेव ॥ १३ ॥
घराणें वैदिक पूर्ण शुभाचार । अतिथि-सत्कार जया घरीं ॥ १४ ॥
ब्रह्मचर्य बारा वरुषें पाळिलें । मौंजी होतां भले गुरुजींनीं ॥ १५ ॥
यथाशास्त्र केलें श्रुतीचें अध्ययन । नियम पाळुन आश्रमाचे ॥ १६ ॥
वेदमंत्र सिद्ध शुभाचारें झाले । अनुभवा आले तेव्हां लोकां ॥ १७ ॥
पुढें केलें शास्त्र अधिगत देवें । सांगचि बरवें अध्ययन ॥ १८ ॥
ज्योतिष वैद्यक केलें अध्ययन । केलें आचरण चांद्रायण ॥ १९ ॥
व्रत उपवास प्रायश्चित्तादिक । आचरिलीं निक गुरुरायें ॥ २० ॥
ऐशी मनःशुद्धी साधोनी आचारें । काळ शुभाचारें युक्त केला ॥२१॥
ब्रह्मचर्य जाणा पूर्ण अविप्लुत । तेज झळकत सूर्यासम ॥ २२ ॥
ऐशीयाच योगीं केला सुविचार । गुरुमानि साचार मानिं आणिती ॥२३॥

उपासनेविण नोहे साक्षात्कार । नोहे अधिकार परमार्थी ॥ २४ ॥
नृसिंहवाटिका देवें आदरिली । दत्तसेवा भली करायासीं ॥ २५ ॥
गुरुविण नोहे सिद्ध उपासना । म्हणोनी दयाघना प्रार्थिताती ॥ २६ ॥
उपासना मंत्र स्वप्नांत मिळाला । दत्तजींनीं केला अनुग्रह ॥ २७ ॥
तेव्हांपासोनिया उपासना भली । गुरुंनीं चालविली अत्यादरें ॥ २८ ॥
श्रुति शास्त्र आणि व्रत प्रायश्चित्त । संस्कृत यानीं चित्त प्रथमची ॥२९॥
त्यावरी मिळाली शुभ उपासना । देवांनीं दर्शना लाभविलें ॥ ३० ॥
मंत्र पुरश्चरण यथाशास्त्र केलें । सिद्धपण आलें तेणें आंगीं ॥ ३१ ॥
उपासना मंत्र ऐसा सिद्ध होतां । योग पढविता होय दत्त ॥ ३२ ॥
योगसिद्धी झाली देवाच्या कृपेनें । मग झालें सांगणें लग्न करीं ॥ ३३ ॥
विवाहासीं योग्य आतां तूं झालासीं । गृहस्थाश्रमासीं आचरावें ॥३४॥
नये तें कीं मना देवाचें सांगणें । वादास करणें झालें तेव्हां ॥ ३५ ॥
समजूत दत्तदेवांनीं घातली । विवाहासीं केली मति सिद्ध ॥ ३६ ॥
अनुकूल भार्या प्राप्त तेव्हां झाली । दत्तकृपें भली सद्गृहिणी ॥ ३७ ॥
गृहस्थाश्रम प्राप्त देवें करविला । योग साधविला अग्निसेवा ॥ ३८ ॥
यथाशास्त्र आश्रम पालन करवीलें । संतान जाहलें वासुदेवा ॥ ३९ ॥
तीर्थाटनमिषें दांपत्य बाहेर । काढी देववर निजकृपें ॥ ४० ॥
मार्गीं मग झालें दत्ताचें विचारणें । आतां काय येणें मजपाशीं ॥ ४१॥
वासुदेवें मग कथियेली आस । घेणें मज संन्यास देवराया ॥ ४२ ॥
मग भार्या नेली, नेलें तें संतान । तोडीलें बंधन दत्तरायें ॥ ४३ ॥
वर्ष छत्तिसावें गृहस्थाश्रम पूर्ण । घडलें आचरण शोभन कीं ॥ ४४ ॥
मग दत्तदेव स्वयें संन्यासातें । देती वासुदेवातें कृष्णेमाजी ॥ ४५ ॥
प्रेषोच्चार दिला स्वयें दत्तजींनी । गुरु दाखवोनी दिधला त्यां ॥ ४६ ॥
दंड कोणापासोनि घ्यावयाचा त्यांनीं । प्रेमें दत्तजीनीं कथियेलें ॥४७॥
आजपासोनियां करा जगदुद्धार । फिरा अवनीवर लोकांसाठीं ॥४८॥
पावन कराया जन लोक आतां । उपासना वर्ता संन्यासानें ॥ ४९ ॥
अनुग्रह करा शरणागतांसीं । या उपासनेसी केली आज्ञा ॥ ५० ॥
दत्ताज्ञेन मग दंड संपादिला । सकळां दाविला भजनमार्ग ॥ ५१ ॥
नाहीं मठ धाम एके ठायीं वास । विना चातुर्मास कोठेंही तो ॥ ५२ ॥

चातुर्मासापुरतें एके ठायीं राहणें । इतर फिरणें जगत्सारें ॥ ५३ ॥
दंड कमंडलु नेसाया लंगोटी । अंगीं भगवी छाटी सामुग्री ही ॥ ५४ ॥
खाकेमाजी झोळी त्यांत दत्तमूर्ति । जवाळि संपत्ति ऐसी जाणा ॥५५॥
ग्रंथलेखन केलें शास्त्र प्रकाशिलें । याग करवीले अध्यक्षत्वें ॥ ५६ ॥
षट्कर्माचा केला उपदेश जनां । मार्ग उपासना पढविला ॥ ५७ ॥
जो जो कोणी कांहीं पढायासीं येई । गुरु मूर्ति देई शिक्षण त्या ॥५८॥
शिकवी योग कोणा कोणा श्रुतिशास्त्र । कोणालागीं शस्त्र शिकविती॥५९॥
जेथें जाती तेथें मार्ग भजनाचा । सुविरूढ साचा करिताती ॥ ६० ॥
दत्तउपासना विशेष विस्तारिली । जगतीं प्रसारिली वासुदेवें ॥ ६१ ॥
ज्याचे ज्याचे मनीं जो जो कांहीं काम । तो तो पूर्णकाम पुरविती ॥६२॥
कोणासीं औषध कोणासीं ज्योतिष । जैसा ज्या विश्वास तैसें योजिती॥६३॥
कोणा मंत्र देती भाष्यार्थ सांगती । कोणा पढविती वेदांताला ॥ ६४ ॥
कोणासीं उपाय शास्त्रीय लौकीक । देती गुरु निक वर्तन हें ॥ ६५ ॥
ऐसी उपासना प्रसिद्ध करुनी । लोकां अनुग्रहोनी सिद्ध-कार्थ ॥ ६६ ॥
सिद्धार्थी ते होती आनंद संवत्सरीं । नर्मदेच्या तीरीं वासुदेव ॥ ६७ ॥
गरुडेश्वरीं काया अर्पिती नर्मदेसीं । आपण स्वरूपासीं मिसळले॥६८॥
दत्तरूप झाले चरित्र हें भलें । पाहिजे ठेविलें दृष्टीपुढें ॥ ६९ ॥
यांतोनियां सार काढोनियां घेणें । अधिकाराप्रमाणें आचरणें ॥ ७० ॥
विनायक म्हणे ऐसें पुण्यस्मरण । चरित्र वर्णन केलें कांहीं ॥ ७१ ॥

( ४०२ )

## योगमाहात्म्य

पूजेनंतर

योग हाचि दंड इंद्रियदमना । योजिती साधना गुरुराज ॥ १ ॥
शत्रूंच्या कंदना योग हें हत्यार । षडरि-संहार साधावया ॥ २ ॥
दैव फिरवाया मृत्यु चुकवाया । देति योगाश्रया गुरुराय ॥ ३ ॥
अंतरींची वृत्ति शमन कराया । घालीति योगीं या गुरुराज ॥ ४ ॥

बलहीना लागीं परमात्मप्राप्ती । नाहींच संप्राप्ति नियम हा ॥ ५ ॥
' नाहि बलहीने न आत्मा'लभ्यते । ऐसेंच सांगतो वेदपुरुष ॥ ६ ॥
योगें प्राप्तबल होतसे मनुजा । त्याचियाच काजा योगाभ्यास ॥ ७ ॥
अष्टांगयोग हा शस्त्र अनुपम । तेजाचें कीं धाम अपूर्वची ॥ ८ ॥
इंद्रियें वश होती वश होतें जग । जडतांचि योग बलवान ॥ ९ ॥
बलाचिया योगें ज्ञान निर्धारत । कैवल्य प्राप्त होत ज्ञानयोगें ॥ १० ॥
योगाविण ज्ञान पंगूच म्हणती । म्हणोनी साधिती योगसंत ॥ ११ ॥
ज्ञान निर्धारत विश्वचि हा जीव । नाहीं दुजाभाव वास्तविक ॥ १२ ॥
आद्वितीय ब्रह्म एकचि हा आत्मा । जीव परमात्मा ज्ञान बोले ॥ १३ ॥
परि बलावीण बाध पंगू होत । राहे भयभीत जीव मनीं ॥ १४ ॥
भय निवाराया शत्रूंतें नासाया । मृत्यु चुकवाया योगशस्त्र ॥ १५ ॥
हत्यार अपूर्व गुरु आम्हां देती । मग खंड पाडिती कामादिकां ॥ १६ ॥
यम भीत सदा या योग दंडासीं । योग्याच्या इच्छेसीं मान देई ॥ १७ ॥
योगसिद्ध नर प्रेत उठवीतो । यमा ठकवितो निजबळें ॥ १८ ॥
यमपाश फोल होती योग्यापुढें । माहात्म्य हें गाढें योगीयाचें ॥ १९ ॥
योगी पुत्र देतो ज्याच्या दैवीं नाहीं । सकलही पाहीं देतो योगी ॥ २० ॥
पर्जन्यातें पाडी चुकवी अवर्षणा । ग्रहांसही जाणा सत्ता त्याची ॥ २१ ॥
सकळ दैवतें तयाच्या स्वाधीन । योग अभ्यसन ऐसें असे ॥ २२ ॥
सकलही सत्ता योग्या प्राप्त होत । त्रिभुवन होत मत्ता त्याची ॥ २३ ॥
जेथें जेथें योग दंडधारी फिरतो । विजय पावतो तेथें तेथें ॥ २४ ॥
आशीर्वाद त्याचा होत सामर्थ्याचा । सिद्ध त्याची वाचा सर्वकाळ ॥ २५ ॥
चिंतिलें तें होय कल्पिलें साकार । ऐसें सर्व सार योगाचें कीं ॥ २६ ॥
योग ईश्वरासीं साधला जयासी । त्याच्या महात्म्यासीं कोण जाणे ॥ २७ ॥
तोच दत्तगुरू तोच अवधूत । वासुदेव होत तोच जाणा ॥ २८ ॥
किमया ही आहे जो का योगदंड । सामर्थ्य उदंड तयाचें कीं ॥ २९ ॥
विनायका झाला अनुग्रह गुरुचा । प्रादुर्भवे साचा वासुदेव ॥ ३० ॥

( ४०३ )

# ध्यानयोग

शनिवार सकाळ ता. २८।६।१९३०

पूजेपूर्वीं

पुन्हां पुन्हां जेव्हां ईश्वरासीं गावें । तन्मय करावें मन जेव्हां ॥ १ ॥
डोळे मिटुनियां त्रिकरणांसहित । जेव्हां हृदयांत प्रवेशावें ॥ २ ॥
हृदयकमळ जेव्हां विकासवावें । ज्योतितें लक्षावें कमलस्थित ॥ ३ ॥
ब्रम्हरंध्रापर्यंत ज्वाला-मालाकुला । ऐशा या ज्योतिला देखावें कीं ॥४॥
सुषुम्नेतुनीं गेली ब्रह्मरंध्रीं लेखा । अंतरींची रेखा पाहावी ती ॥ ५ ॥
पीत आहे तिची कांति मनोहर । तेजस्वी ती थोर जळतसे ॥ ६ ॥
पहातां पहातां दिसे हरिमुख । चित्तासीं हरिख थोर होय ॥ ७ ॥
सुहास्यवदन सुरुचि मधुर । चमक सुंदर मन वेधी ॥ ८ ॥
पाहतां पाहतां ज्योती साकारत । देवरूप होत लक्षितां ती ॥ ९ ॥
पाहतां पाहतां दिसती तीन शिरें । सहा भुजा निकरें मूर्ति शोभे ॥१०॥
लक्षित जों जावें आयुधें दिसती । परम शोभती देवकरीं ॥ ११ ॥
कमलांत ऊभा पीत वसनधारी । नाना अलंकारीं नटला जो ॥ १२ ॥
सुवासाचा जणुं बनला देवदेह । सुधाच निःसंदेह मूर्त झाली ॥ १३ ॥
जणुं जाणा ज्योत्स्ना परम विकासली । छाया पसरली आल्हादाची १४
प्रखर तेजाचें कडें मूर्तिभोंवतीं । त्यांत प्रकाशेती ज्योत्स्नामय ॥ १५ ॥
सौंदर्याचें सार सौकुमार्य मूर्त । ऐशी प्रगटत मूर्ति तेथें ॥ १६ ॥
किरीट कुंडलें मधुर शोभती । चंद्रमाची दीप्ती उदेली कीं ॥ १७ ॥
हिरे चमकती पाचू रत्न खडे । आसक्तीच जडे शोभे वरी ॥ १८ ॥
मृदुल कपोल ओष्ट ते सुरक्त । पाहतां होत सक्त दृष्टी तेथें ॥ १९ ॥
नयनांत तेज भरलें अमृताचें । भाजन कृपेचें जे का सदा ॥ २० ॥

कृपापूर्ण दृष्टि हृदय विकासवी । मनासी रमवी निजठायीं ॥ २१ ॥
वनमाळा गळां आपाद शोभत । सुगंध सुटत अमोलीक ॥ २२ ॥
मृदुल पदाब्जें रत्नें कोंदणीचीं । हृदयांत साचीं दिसती कीं ॥ २३ ॥
अत्यंत वेल्हाळ अत्यंतचि शांत । प्रसन्न शोभत गोड छाया ॥ २४ ॥
ज्योतिमध्यें छाया ऐशी प्रकाशली । दत्तरूप भली शोभतसे ॥ २५ ॥
तेथच नयन गुंतोनी राहती । परम चिकटती मूर्तिलागीं ॥ २६ ॥
सोडितां सुटेना संबंध तुटेना । दृष्टी परतेना ऐसें होई ॥ २७ ॥
मधुर तें रूप मधुर तें तेज । ज्योतींत सहज प्रगटत ॥ २८ ॥
तेथें मन मुरे तदाकार होत । दत्ताचि बनत दत्ताकारें ॥ २९ ॥
क्षिरसागरांत जणूं हा प्रवेश । मन हें विशेष तेज लभे ॥ ३० ॥
ईश्वरसंबंधें रूप पालटत । मन जाणा होत तेजवंत ॥ ३१ ॥
संप्रसाद येथें अनुभवा येत । चित्त हें बुडत ईश्वरांत ॥ ३२ ॥
सर्वैश्वर्ययुत चित्त हें बनत । समाधि मिळत निर्भरचि ॥ ३३ ॥
समाधिचें सुख कोणा वर्णवेना । निर्विकारता मना येत असे ॥ ३४ ॥
समाहित चित्तें देवासीं प्रार्थितों । आज्ञा मीं मागतों सेवायासीं॥ ३५ ॥
विभूति पूजनाचा दिवस हा आज । गुरु महाराज प्राप्त झाला ॥ ३६ ॥
वार्षिक हें कार्य तुमचें गुरुदेवा । प्रकाशा वैभवा येथें आज ॥ ३७ ॥
लक्ष्मीसहित प्रगट येथें व्हावें । अनुभवा यावें आमुचीया ॥ ३८ ॥
साक्षात्कार येथें आज दाखवावा । चमत्कार व्हावा अपूर्व कीं॥ ३९ ॥
तेजस्वी हें स्थान असे शस्त्रधारी । दुष्टां शिक्षा करी ऐसे व्हावें ॥ ४० ॥
भक्तां कल्पद्रुम स्थान हें सुखाचें । परम कल्याणाचें प्रीति केल्या ॥४१॥
इष्ट वरप्राप्ति येथें घडतसे । अनिष्ट नासतसे येथें ऐसें ॥ ४२ ॥
दावा प्रभुजी हो आजच्या या दिनीं। आम्हांत भरोनी यावें तुम्हीं ॥४३॥
आम्हाठायीं व्हावा संचार तुमचा । प्रगटवा साचा मूर्त येथें ॥ ४४ ॥
आजचें महिमान अपूर्व करावें । आम्हां अनुग्रहावें करुणेसीं॥ ४५ ॥
विनायक झाला शरण चरणीं । तरी चक्रपाणी आज्ञा यावी ॥ ४६ ॥

( ४०४ )

## दत्तदासांची महती

( पूजेनंतर )

समर्थ आम्हीं दास सदा श्रीगुरुचे। आम्हां ऋद्धिसिद्धिंचें सहाय कीं ॥१॥
लक्ष्मी ही होय आम्हां सहायकर्त्री। आम्हां तो श्रीपती सहाय सदा ॥२॥
आम्हापाशीं वसे नित्य अन्नपूर्णा । तृप्ती अंतःकरणा आमुचीया ॥ ३ ॥
आम्हीं सदा धन्य पुण्यचि जाणावें । आम्हां सिद्धी पावे जेथें तेथें॥४॥
विजया लक्षुमी सदा आम्हांपाशीं । सेविती आम्हांसीं सर्व देव ॥ ५ ॥
जेथें जेथें जातो भक्त श्रीगुरुचा । जयजयकार साचा तेथें त्याचा ॥६॥
इंद्रहि पूजितो शेषहीं पूजितो । सकळां पूज्य होतो गुरुभक्त ॥ ७ ॥
जेथें गुरुभक्त तेथें धर्मजय । अधर्मा प्रलय तेथें जाणा ॥ ८ ॥
जेथें गुरुभक्त विजय सत्याचा । प्रसार भजनाचा तेथें जाणा ॥ ९ ॥
ऐशी आहे प्रौढी गुरुसेवकाची । तेथें उपमेची वस्तु नाहीं ॥ १० ॥
जेथें गुरुभक्त सर्वचि आनंद । तोच सुखकंद जाणावा कीं ॥ ११ ॥
भाग्य हें भक्ताचें मग त्या गुरुचें । वानी कोण वाचे सांगावें कीं॥१२॥
आम्हां भय मृत्यु मुळींच बाधेना। दैन्य तें पीडिना आम्हांलागीं ॥१३॥
आमुच्या पुढें पाप उभेंच राहिना । कर्म तें बांधीना आम्हांलागीं ॥१४॥
आम्ही बद्ध नोहे सदा विनिर्मुक्त । आमुचें असक्त मन सदा ॥ १५ ॥
देह वाणी मन पुण्यचि आमुचीं । तुलना आमुची नाहीं कोणा ॥१६॥
ऐशी ये योग्यता आम्हां गुरुभक्तां । गुरुपादसक्तां सर्वदाच ॥ १७ ॥
परि आम्हीं मनें उगीच दुःखी होतों । यश विसरतों गुरुजींचें ॥ १८ ॥
असुनि श्रीमंताचे करितों जीकिर । दीनपण थोर दावितसों ॥ १९ ॥
दीन हीन आम्हीं विकल्पें अध्यासितों । तेणें गमावितों भाग्य सारें॥२०॥
थोरामोठ्यांचीं कीं आम्ही हो माणसें। उणें कांहीं नसे आम्हांलागीं॥२१॥
तरी उगीच आम्हीं दरिद्र सांगतसों । इतरां आर्जवीतसों भलतेपरी॥२२॥
असुनी श्रीमंत बनतों चाकर । मिळवितों भाकर सायासानें ॥ २३ ॥

देवाचीये घरीं उणें काय असे । अन्नपूर असे मूर्तिमंत ॥ २४ ॥
परिपूर्ण भोग सकळ ऐश्वर्य । असूनी अनार्य आम्हीं होतों ॥ २५ ॥
धर्मासीं सांडितों सत्यासीं त्यागितों । भलता धरीतों संग आम्हीं ॥२६॥
भलता पोषाख आम्हीं चढवितों । भलत्यां वश होतों अकारण ॥२७॥
असुनीयां भाग्य अभाग्य जोडीतों । परिपाक होतो ऐसा उलटा ॥२८॥
म्हणोनी शरण होवोनी देवासीं । नित्य तत्स्मृतासीं जागवावें ॥ २९ ॥
आपुला अधिकार दर्जा कीं आपुला । विसर मनाला न पडो यावा॥३०॥
आमुचें खुळेपण देवासीं बाधतें । हीनत्व आणितें समर्थासीं ॥ ३१ ॥
आम्हीं नोहें रंक न बोलों दीनवाणी । आम्हां चक्रपाणी यजमान॥३२॥
सकळही देता आम्हां भगवान । इतर धनवान कां सेवावे ॥ ३३ ॥
विनायक म्हणे जातीचे श्रीमंत । आम्हीं भाग्यवंत गुरुभक्त ॥ ३४ ॥

( ४०५ )

## आज्ञा मागणी

प्रसादातें सेवावया । आज्ञा यावी गुरुराया ॥ १ ॥
तुमच्या ताटींचें उच्छिष्ट । संत म्हणती यज्ञशिष्ट ॥ २ ॥
त्याचें ग्रहण करावया । दुरितातें हरावया ॥ ३ ॥
रोग भोग हरावया । थोर पुण्य प्राप्त व्हाया ॥ ४ ॥
देई महा-प्रसादातें । करोनीयां सत्कृपेतें ॥ ५ ॥
भाग्य आमुचें वाढवाया । यशप्राप्ती आम्हां व्हाया ॥ ६ ॥
अज्ञान आमुचें जावया । ज्ञान आम्हां प्राप्त व्हाया ॥ ७ ॥
तेज आमुचें वाढवाया । हीनपण सर्व जावया ॥ ८ ॥
श्रेष्ठपण यावयासीं । आम्हां यावें जी आज्ञेसीं ॥ ९ ॥
आनंदानें बहुमानें । करूं ग्रहण भक्तीनें ॥ १० ॥
देवांसींही हें दुर्लभ । ऐसा याचा असे लाभ ॥ ११ ॥
अन्न आहे परमोत्कृष्ट । ब्रह्मचि तें जाणा इष्ट ॥ १२ ॥

३५९०५ वि. आ: २११ नों. वि. ७४१८१८९

विशेष तुमचा प्रसाद । म्हणोनि श्रेष्ठ तें वरद ॥ १३ ॥
श्रेष्ठ धन्य पुण्य ऐसें । प्राप्त होय भाग्यासरिसें ॥ १४ ॥
ज्याचेपाशीं भाग्य थोर । त्यासीं लाभ हा निर्धार ॥ १५ ॥
अभाग्य येथें तों बघेना । अमृत हें तो जाणेना ॥ १६ ॥
त्यासीं न वाटे हें परमान्न । करितसे उपेक्षण ॥ १७ ॥
आम्हां काय त्यासीं करणें । आम्हां प्रसादास घेणें ॥ १८ ॥
म्हणोनि आम्हां द्यावा । कृपायोग आम्हां व्हावा ॥ १९ ॥
अमृताचें पान भोजन । आम्हां द्यावें दयाघन ॥ २० ॥
विनायक म्हणे नाथ । कृपा करावी समर्थ ॥ २१ ॥

( ४०६ )

## आध्यात्मिक-कर्मयोग

पूजेपूर्वी ( सायंकाळीं )

प्रसादाचा दिन आज हा भाग्याचा । उत्सव देवाचा करूं तेणें ॥ १ ॥
भजन पूजन करूं भक्तीभावें । जेणें संतोषावे गुरुमुनि ॥ २ ॥
हेतु हाच मनीं तया प्रिय व्हावें । तयें अंगिकारावें आम्हांलागीं ॥ ३ ॥
करुणा त्यास यावी ऐसेंच सेवन । करूंया भजन मनोभावें ॥ ४ ॥
विसरोनी जाऊं क्षण देहभाव । होऊं वासुदेव एक क्षण ॥ ५ ॥
समरस होऊं विसरूं घरदार । बनूं यतीश्वर वासुदेव ॥ ६ ॥
एक भाव करूं स्वामी वासुदेवासीं । ऐक्य अंतरासीं घडवूं कीं ॥ ७ ॥
क्षणभरी नामरूप तैसा गांव । सोडूं सर्व भाव ममत्वाचा ॥ ८ ॥
हृदयें एक करूं एकचि रस धरूं । भावना आकारूं ऐक्यत्वाची ॥ ९ ॥
ऐक्य भावनेसीं मूर्त उपजवूं । द्वैतातें घालवूं क्षणभरी ॥ १० ॥
हेंच गंगास्नान करोनी पावन । विभूति धारण सत्वें करूं ॥ ११ ॥
सात्त्विकाचा भाव बाहेर प्रगटवूं । अंतर मिळवूं वासुदेवीं ॥ १२ ॥
उर्मि न उठती सकळाचि शांती । ऐशी संध्योपास्ती करूं आम्हीं ॥१३॥

संदेह मनाचा क्षणभरी दूर। गायत्री उच्चार करूं ऐसा ॥ १४ ॥
संदेह फेडणें देवा ओळखणें। ध्यानांत धरणें तयालागीं ॥ १५ ॥
ऐसें करूं तरी जपन गायत्रीचें। आराधन सूर्याचें परमात्म्याचें ॥१६॥
सूर्य आत्मा आहे सकळ जगताचा। प्रत्यगात्मा साचा आमुचा तो॥१७॥
सकळ चित्तवृत्ति ज्या रसभरित। तया सूर्या समस्त अर्पूं आम्हीं ॥१८॥
अर्घ्यप्रदान हें साधूं परमात्म्याचें। करूं वासनेचें निर्मूलन ॥ १९ ॥
वासना राक्षसी अर्घ्य प्रदानानें। मारूं या साधनें दुःखदाई ॥ २० ॥
हत्या घडे म्हणुनी करूं प्रदक्षिणा। उठवूं सद्वासना अंतरांत ॥ २१ ॥
बुद्धिची धारणा करूं देवमय। तल्लीन हृदय करूं देवीं ॥ २२ ॥
हेंच नमन कीं समर्पूं शेवटीं। संध्या हे गोमटी सारूं आम्हीं ॥ २३ ॥
नमः शब्द आहे प्रतीक ब्रह्माचा। प्रकार नमनाचा ऐसा आहे ॥ २४ ॥
विनम्र होउनी घेणें ब्रह्मभाव। सर्व दुजाभाव विसरणें ॥ २५ ॥
तयासीं नमन म्हणती वाक्यज्ञ। संध्योपास्ति यज्ञ ऐसा करूं ॥ २६ ॥
मग करूं आम्हीं पूजा श्रीगुरुची। स्थिति अंतरींची साधावया ॥ २७ ॥
हृदयकमळांत कल्पोनी आसन। करूं या पूजन तेथें प्रेमें ॥ २८ ॥
अंतरींचे जे का असती सद्भाव। करूं या उठाव तयाचें कीं ॥ २९ ॥
तेच उपचार देवपूजेसाठीं। तेणें जगजेठी संतोषेल ॥ ३० ॥
करूं आवाहन वृत्तीच्या लयानें। सुमन अर्पणें हेंचि जाणा ॥ ३१ ॥
शुद्ध भक्तीजलें पाद प्रक्षाळण। प्रेमें समर्पून अर्घ्य देऊं ॥ ३२ ॥
जो का शुद्ध भाव आमुच्या मनिंचा। तीर्थराज साचा तोचि जाणा॥३३॥
तेणें स्नान घालूं देवासीं प्रेमानें। पंचामृतें स्नपणें आतां देवा ॥ ३४ ॥
शृंगार करुणादि जे का काव्यरस। तयीं चरित्रास गाऊं प्रेमें ॥ ३५ ॥
हेंच पंचामृतस्नान त्या देवासीं। घालूं गंधोदकेंसीं विश्वासानें ॥ ३६ ॥
सुमनानें पूजा करूं अंतरात्म्याची। गंधमाल्यें साचीं अर्पूं त्यासीं ॥३७॥
रमणीय कर्म आम्हां जें घडत। गंधमाल्यें होत तींच जाणा ॥ ३८ ॥
तयांनीं पूजुं या श्रीगुरुदेवासीं। त्या अंतरात्म्यासीं ऐसें सेवूं ॥ ३९ ॥
जी का विषय-रुचि आमुच्या मनींची। तीच नैवेद्याची योजना कीं॥४०॥
विषय-रुचि देवा अर्पूं या मनाची। ऐशी पूर्वपूजेची सिद्धता कीं ॥४१॥
ब्रह्माण्डांत रस जो असे वाहत। आमुच्या हृदयांत जो का असे ॥४२॥

तेणें घालूं देवा अभिषेकस्नान । मंत्राचें जपन करित कीं ॥ ४३ ॥
पुन्हां पुन्हां जन्ममृत्युलागीं द्यावें । विषय भोगावे बहुत कीं ॥ ४४ ॥
ऐसा जो का रस अखिल ब्रह्मांडांत । तोच येथें होत जळधारा ॥४५॥
सोहं सोहं ऐसा ब्रह्मांडीं संचरत । आमुच्या हृदयांत जो का असे ॥४६॥
तोच मंत्र जपूं येथें अभिषेकीं । वेदोक्त मंत्र कीं तोच जाणा ॥ ४७ ॥
जो कां सोहं शब्द तोच खरा वेद । तयानें वरद संतोषवूं ॥ ४८ ॥
ऐशी पूजा करूं त्या वासुदेवाची । सोपस्कार साची येथें आज ॥४९॥
पूजारतीचें कीं आचमन देवूं । देवासीं सजवूं पोषाखानें ॥ ५० ॥
ज्या ज्या आम्हांलागीं आवडी मनांत । तेणें अवधूत नटवूं हा ॥५१॥
तेच अलंकार तींच वस्त्रोपवस्त्रें । देवासीं अजस्त्रें समर्पूं कीं ॥ ५२ ॥
नैवेद्य भावाचा दीप प्रज्ञानाचा । छंद जो का साचा तोच धूप ॥ ५३ ॥
छंदाचा सुगंध करोनियां देवा । पूजूं वासुदेवा धूपादिकीं ॥ ५४ ॥
भावाचा कीं भात भक्तीचें कीं घृत । प्रेम अत्युत्कट वरण तें ॥ ५५ ॥
सात्त्विक भाव जे आम्हां उद्गमती । देवा पक्वान्नें तीं समर्पूं कीं ॥ ५६ ॥
दधिभात देवा भक्ती भावनेचा । अर्पण करूं साचा देवालागीं ॥ ५७ ॥
अहंकारादिक जे का आम्हांपाशीं । करूनी चूर्ण त्यांसीं अर्पूं देवा॥५८॥
तयांचें तांबूल आम्हीं बनवुनी । देवा मुख-शोधनीं अर्पूंया कीं ॥ ५९ ॥
कृतकृत्यतेची दक्षिणा देवासीं । समर्पूं प्रेमेसीं पूजेसाठीं ॥ ६० ॥
महावाक्याचें जें करूं विवरण । तेंच प्रदक्षिण फिरणें कीं ॥ ६१ ॥
ऐशीया प्रकारें पुजूं या देवासीं । करूं आरतीसीं मनोभावें ॥ ६२ ॥
प्रज्ञानाचे दीप थोर प्रज्वाळोनी । समर्पूं या क्षणीं आरातिक्य ॥ ६३ ॥
जे का अनुभव तेंच कीं गायन । करूं या स्तवन आरतिकाळीं॥ ६४ ॥
ऐसा प्रेमानें कीं करूं समारंभ । तोषवूं पद्मनाभ आत्माराम ॥ ६५ ॥
पराकाष्टा पावो आम्हां आनंदाची । हेच प्रसादाची योजना कीं ॥६६॥
ऐसा आत्माराम पुजूं हृदयांत । गुरु अवधूत वासुदेव ॥ ६७ ॥
संकल्प करोनी मनीं पूजनाचा । तैसा योजनेचा कथूं त्यासीं ॥ ६८ ॥
सिद्ध करणारा धनी तो समर्थ । पुरवील अर्थ निश्चय हा ॥ ६९ ॥
विनायक म्हणे देव मज तुष्ट । पुरवीतो इष्ट माझें सारें ॥ ७० ॥

( ४०७ )

# विभूतिपूजनासाठीं आज्ञा मागणी

पूजेनंतर

आज्ञा यावी आतां विभूतिपूजना । गुरु दयाघना स्वामिराया ॥ १ ॥
वार्षिक हें कार्य तुवां चालविलें । करवोनी घेतलें आम्हां हातीं ॥ २ ॥
अनुग्रहाची जे प्रसादाची खूण । तुम्हीं नारायण पाठविली ॥ ३ ॥
गरुडेश्वराहुनी मज जी धाडिली । तुम्हीं पूजविली जी का नाथा॥ ४ ॥
दृष्टांत देवोनी समारंभ करोनी । पुजविली झणीं जी का तुम्हीं ॥ ५ ॥
स्वयें प्रगटलां चमत्कार दावीला । श्रीगुरुदयाळा तुम्हीं आम्हां ॥ ६ ॥
आणिक स्थानाच्या विभूति आणोनी । तुम्हीं गुरु-मुनि मज दिल्या ॥७॥
मिळवुनी भस्म पवित्र आणिक । पूजियेलें निक विभूतिसीं ॥ ८ ॥
प्रसाद समृद्धि तुम्हीं जी दाविली । अपूर्व ती भली त्या समयीं ॥ ९ ॥
ज्याला त्याला झाला थोर चमत्कार। विस्मयही फार नास्तिकांही॥१०॥
फळाची समृद्धी समृद्धी अन्नाची । समृद्धि पुष्पांची दिली आम्हां॥११॥
गायनवादनाची तैंवि अत्तराची । वैदिकमंत्राची समृद्धि जी ॥ १२ ॥
एकाएकीं तुम्हीं तेव्हां उपजवीली । चमत्कृती केली थोर तेव्हां ॥१३॥
ब्राह्मणभोजन जाहलें अपार । समारंभ थोर घडविला ॥ १४ ॥
तेव्हां पासोनियां स्थानासी जागृती । आणिली महती तुम्हीं दत्ता ॥१५॥
तुम्हीं वाढविला सर्व बडिवार । आजवरि उदार गुरुनाथा ॥ १६ ॥
ऋद्धिसिद्धी तुम्हीं क्रीडत ठेविल्या । अनुभवा भल्या येताती कीं ॥१७॥
स्थान हें जागृत अनुभवा येत । सफळ कीं होत मनःकामना ॥ १८ ॥
ऐसा जो सुयोग तुम्हीं घडवीला । आजवरी आणिला घडवित ॥१९॥
त्याचसाठीं आतां आज्ञा मी मागतों । मस्तक ठेवितों चरणावरी॥२०॥
वैदिक मंत्रानीं पुराण मंत्रानीं । संस्कृत करोनी विभूति ही ॥ २१ ॥
ठेवा तेजवंत, यांत तुम्हीं मूर्त । श्रीगुरु भगवंत जाणतों मी ॥ २२ ॥
विनायक नमी तुमच्यापदांनां । गुरु दयाघना आज्ञा यावी ॥ २३ ॥

( ४०८ )

## कृतज्ञतावचन

पूजनानंतर

कृपा केली थोर कार्य करविलें । आम्हासाठीं भलें वासुदेवा ॥ १ ॥
आपण प्रगटलां साक्षात्कार केला । श्रीगुरुदयाळा कृपाळुवा ॥ २ ॥
म्हणोनियां आम्हीं चरणीं शरण । कृतज्ञ होऊन कृपामूर्ति ॥ ३ ॥
विनायक म्हणे माझ्या गुरुनाथा । थोरपण समर्था तुज साजे ॥ ४ ॥

# चंपाषष्ठी

# विषय


| | प्रबंध नं० |
|---|---|
| स्थान स्थापनेचा इतिहास | ४०९ |
| अनन्य भक्ती हीच खरी भक्ती–तुळसीदास चरित | ४१० |
| ईशचरित सुधा | ४११ |
| भजन छंद | ४१२,४५५ |
| संसारांत पारमार्थिक दृष्टीचें महत्त्व | ४१३ |
| दत्तभजनामृत | ४१४ |
| अवतार भक्तांसाठीं | ४१५ |
| भजन माहात्म्य | ४१६, ४३४, ४४२, ४४३, ४४४, ४४५, ४५४ |
| दत्तचरणांस शरण गेल्यानें काय होतें | ४१७ |
| ' बुद्धेरात्मा महान्परः ' | ४१८ |
| भक्तिप्रेमाचा परिपाक | ४१९ |
| सद्गुरूंची विनायकास आज्ञा | ४२०, ४२१, ४२२, ४२३ |
| धांवा | ४२४, ४३६, ४३७, ४३८. |
| आशीर्वचन मागणी | ४२५, ४५३. |
| विनायकाचा निर्धार | ४२६ |
| मनोदय कथन | ४२७ |
| दुःख हरण्यासाठीं प्रार्थना | ४२८ |
| बाल असलेमुळें अपराध पोटीं घालण्याबद्दल प्रार्थना | ४२९,४३० |
| देवास शरण जाण्याची महती | ४३१, ४३३ |
| ईशसेवन माहात्म्य | ४३२ |
| ईशकृपेसाठीं प्रार्थना | ४३४ |
| उत्सवाची मागणी | ४३० |

| | |
|---|---|
| धांवा | ४४० |
| दत्तनामें भूतें भीति | ४४१ |
| विधिरहो बलवान् | ४४६ |
| भक्तिभावाचा भुकेला | ४४७, ४५१ |
| भक्ति माहात्म्य | ४४८, ४५१ |
| दत्तछंद कां घ्यावा | ४४९, ४६० |


---

( ४०९ )

# स्थान स्थापनेचा इतिहास

शनिवार ता० ७।१२।१९२९

स्थापनेचा दिन आजिचा मंगल । कृपेनें दयाळ आला तुमच्या ॥ १ ॥
आज पहांटेला अनुग्रह केला । आम्हांवरी भला तुम्हीं स्वामि ॥ २ ॥
पूर्णानंद यति स्वयें येथ पातलां । मज करायाला अनुग्रह ॥ ३ ॥
द्यावयासी दीक्षा मजलागीं दत्ता । येथें निजसत्ता स्थापियेली ॥ ४ ॥
अमुच्या कुलांत दत्त उपासना । तीच दयाघना अनुग्रहीली ॥ ५ ॥
केली उपासना जी कां वर्षे आठ । तिचाच हा थाट वाढविला ॥ ६ ॥
सिद्ध करावया माझी उपासना । केली हे स्थापना निजकरीं ॥ ७ ॥
करित जें होतों तेंच अभिमत केलें । पुढें आज्ञापिलें चालवावया ॥८॥
ऐसाच हा क्रम पुढें चालवावा । खंड न पडावा सांगितलें ॥ ९ ॥
शिरीं कर माझ्या ठेविला गुरुनीं । मज आशिर्वचनीं अनुग्रहीलें॥१०॥
उपासना सिद्ध खचित होईल । तुजला भेटेल दत्तनाथ ॥ ११ ॥
प्रिय तूं दत्ताला येथें आणशील । वैकुंठ करशील तूं हें स्थान ॥ १२ ॥
भजन पूजन सिद्धीसी पावेल । जयजयकार होईल पूर्ण तुझा ॥ १३ ॥
उपासना धर्म वाढवाया जनीं । नियुक्त या स्थानीं तूज केलें ॥ १४ ॥
ऐसा आशीर्वाद श्रीनीं मज दिला । माझा थोर केला बढिवार ॥१५॥
गौरवीलें मज अधिकृत केलें । स्वयें संकल्पीलें संकल्पातें ॥ १६ ॥
संकल्प करोनी स्थानाची स्थापना । तुम्हीं करुणाघना येथें केली॥१७॥
काय वानूं नाथा वात्सल्य तुमचें । काम हें वाचेचें नव्हे जाणा ॥१८॥
वाणीचा विषय नव्हे गुरुराया । तुम्हां वर्णावया शक्ती कोणा ॥ १९ ॥
तुमचें सर्वज्ञत्व तुम्हांसींच साजे । त्रिभुवनीं गाजे महिमान ॥ २० ॥

आज अठरा झालीं वर्षें परिपूर्ण । तुम्हीं नारायण अनुग्रहीलें ॥ २१ ॥
आजवरी माझे करवीं कार्यातें । निर्विघ्नपणातें देवोनियां ॥ २२ ॥
करवोनि नाथा स्वयें त्वां घेतलें । महिमान भलें अपूर्व तें ॥ २३ ॥
वाचाळ ते मूक अंध ते पाहाती । बहिरे ऐकती तुझ्या कृपें ॥ २४ ॥
पांगळे चढती मोठं गिरिवर । काय न होणार तुझ्या कृपें ॥ २५ ॥
मज पामरास अमृत पाजीलें । मज भूषविलें कनकानें ॥ २६ ॥
कुरूपासी दिलें स्वरूप सुंदर । सकळ वियासार अज्ञानासीं ॥ २७ ॥
आंधळ्यासीं डोळे बहिऱ्यासीं कान । तुवां दयाघन दिधलें कीं ॥ २८ ॥
वामनाचा हात स्वर्गासीं लाविला । पांगळा चढविला हिमगिरी ॥२९॥
मेलीयासीं केलें जणूं त्वां सजीव । अभावासीं भाव दिधला त्वां ॥३०॥
काय उपमा देऊं तव या कृत्यासी । टिटवी सागरासि प्राशितसे ॥३१॥
खद्योतासीं दिलें भास्कराचें तेज । नपुंसका ओज पुरुषत्वाचें ॥ ३२ ॥
काय बोलूं अधिक वाचा हे खुंटली । मतिस्तब्ध झाली सुचेनाच ॥३३॥
कल्पवृक्ष केला साधारण वृक्ष । चंचलासी दक्ष बनविलें ॥ ३४ ॥
पतंगानें उल्लंघिला कीं सागर । काय बडिवार बोलूं सांग ॥ ३५ ॥
मातीचें त्वां सोनें नाथा बनवीलें । पाषाणासीं केलें परिस तुवां ॥३६॥
नरकाचा स्वर्ग ओहोळाची गंगा । तुवां रमारंगा जणूं केली ॥ ३७ ॥
विषाचें अमृत तुवां बनविलें । ऐसें जणूं केलें गुरुनाथा ॥ ३८ ॥
जिह्वेवरी नाम हृदयीं स्वरूप । अंतरीं उमोप प्रेमभाव ॥ ३९ ॥
दिली उपासना दिलें कवित्वासीं । काय न मजसीं तुवां दिलें ॥ ४० ॥
तुझेंच तुजला सर्व हें अर्पण । साजे परिपूर्ण तुझेठायीं ॥ ४१ ॥
तन मन धन सर्वस्व हें तुझें । येथें काय माझें आहे सांग ॥ ४२ ॥
फाटिंग मी आहें पायांचा किंकर । तुझाच साचार बनलोंसें ॥ ४३ ॥
दोन कर तुझे पुढती जोडणें । मस्तक ठेवणें तुझे पायीं ॥ ४४ ॥
येवढेंच कृत्य आम्हां जीवांकडे । मग न वांकडें कधीं होय ॥ ४५ ॥
विनायक म्हणे अनन्य शरण । तुज नारायण दत्तनाथ ॥ ४६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. ग्रंथालय.

अनुक्रम
(अंक१० )

# अनन्य भक्ति हीच खरी भक्ती–तुळसीदास चरित

रविवार ता. ८।१२।१९२९

अनिष्ट तें इष्ट इष्ट तें अनिष्ट । दोन्हीं इष्टानिष्ट ऐशीं जया ॥ १ ॥
तोच येथें टिके दत्ताचीये पाशीं । जयें शुभाशुभांसीं दूर केलें ॥ २ ॥
अनन्य जो भक्त कांहीं न चिंतीत । दत्तपदीं ठेवित शुद्ध भाव ॥ ३ ॥
आचार अनाचार कांहीं न पाहत । विकल्प न येत मनामध्यें ॥ ४ ॥
तोच येथें टिके दत्त कृपा पावे । इतरां काय व्हावें साध्य येथें ॥ ५ ॥
प्रेम हें आंधळें ऐसा हा सिद्धान्त । जगतीं बोलत सुज्ञ जन ॥ ६ ॥
विषय परमार्थ दोन्हीं पाशीं प्रेम । लागतसे सम वृत्ति जाणा ॥ ७ ॥
प्रियपण झाला स्वभाव जयाचा । तोच कीं दत्ताचा सत्यभक्त ॥ ८ ॥
परमार्थासीं जो प्रेमानें जडला । अनर्थ तयाला बाधती ना ॥ ९ ॥
देह सुख मुळीं मानिना तो नर । अशुभ करणार त्यांचें कोण ॥ १० ॥
अशुभ तें शुभ नरासीं गमत । ज्याचें लांचावत चित्त कामें ॥ ११ ॥
विषय प्रेमानें विद्ध तुळशीदास । कथा ते सुरस दृष्टांतासीं ॥ १२ ॥
बायकोच्या प्रेमें मूढ तिचा दास । धरितां सर्पास रज्जु मानी ॥ १३ ॥
भयानक सर्प तया न उमगला । जाहला आंधळा काम मदें ॥ १४ ॥
तैसें दत्त प्रेमें आंधळें होवोनी । सादर भजनीं असावें कीं ॥ १५ ॥
तोच दत्तलागीं प्रिय होत फार । अपमान थोर साहत जो ॥ १६ ॥
ज्याचें मन कांहीं झाल्या न चळत । स्थिराचि राहत दत्ताठायीं ॥ १७ ॥
मग देहा सुख होवो किंवा दुःख । विषाद हरिख मानीनाच ॥ १८ ॥
शर्करेसीं जैसीं पिप्पीलिका जडे । तुटल्या न मुरडे वृत्तिभाव ॥ १९ ॥
तैसें दत्त पदीं मन हें जोडावें । कधीं न परतावें कांहीं झाल्या ॥ २० ॥
नपुंसक पति पतिव्रता मनीं । देवासम मानी भजे त्यासीं ॥ २१ ॥
तैसें दत्तपदीं मन समर्पावें । वंचित न व्हावें स्वार्थ प्रेमें ॥ २२ ॥
स्वार्थी नरा कधीं दत्त न पावत । रहावें भजत निर्धारानें ॥ २३ ॥

जयाचा निर्धार अचळ गिरीसम । तोच जाणा परम भक्तप्रिय॥ २४ ॥
सर्वस्वाचें त्यासीं करावें अर्पण । विषय चिंतन करूं नये ॥ २५ ॥
तुझें शुभाशुभ सकळ जाणतो । सर्वज्ञ प्रभु तो शुभ दाता ॥ २६ ॥
एकदा तूं त्याचा बन भृत्य खरा । मग भार सारा तोच वाहे ॥ २७ ॥
तुज न समजतां तुज सांभाळील । उडी तो घालील दयासिंधू ॥ २८ ॥
घाबरा नको होऊं पळून न जाईं । तोच सुखदायी संरक्षील ॥ २९ ॥
भय उभारतां भय नको धरूं । तो जगदाधारू भय वारी ॥ ३० ॥
हर्षामर्ष सारें सांडीं हृदयांतूनी । दृढभाव मनीं ठेवीं भला ॥ ३१ ॥
परम भाग्य ज्याचें त्यासीच हा योग । लाभत अभंग दत्तकृपें ॥ ३२ ॥
विनायक म्हणे मी श्रीदत्ताचा । माझे रक्षणाचा भार त्यासीं ॥ ३३ ॥

( ४११ )

## ईशचरित सुधा

सोमवार ता. ९।१२।१९२९

चरित्र तुझें गोड सुधेहुनी थोर । माधुर्याचें सार अनुपम ॥ १ ॥
किती प्राशितां हें पुरेसें होईना । वीट तो येईना कधीं त्याचा ॥ २ ॥
अधिकाधिक गोडी उपजे सेवितां । गोडीस दृष्टांता थार नाहीं ॥ ३ ॥
सकळ इंद्रियांसीं उल्हास होय फार । उत्साहाचा भर मना आणी ॥४॥
अपूर्व हें आहे दिव्य रसायण । प्रेमें अंतःकरण सुखावत ॥ ५ ॥
उमज पडत अज्ञान नासत । शहाणपण येत जीवालागीं ॥ ६ ॥
संशय ते सारे फिटोनियां जाती । प्रकाशे ज्ञानज्योती हृदयांत ॥ ७ ॥
वैराग्याचा अग्नि प्रदीप्त होतसे । भक्ति दुणावतसे सेवनानें ॥ ८ ॥
मन आनंदत चित्त विकासंत । अंतर खुलत रंगोनियां ॥ ९ ॥
पान अमृताचें स्नान तें गंगेचें । काय वर्णूं वाचे अनुपम ॥ १० ॥
तेंच नाथा निज चरित्र गाववीं । आम्हांसी रंगवीं रसभरें ॥ ११ ॥
विनायक म्हणे यशामृत धारा । आम्हांसीं उदारा पाजवीं कीं ॥ १२ ॥

( ४१२ )

## भजनछंद

देवा तुझें यश गाऊं । तुझी मूर्ति हृदयीं ध्याऊं ॥ १ ॥
तुझ्या चरणातें सेवूं । तुजलागीं बहु विनवूं ॥ २ ॥
लोटांगणें घालूं पुढती । पायांवरी लोळूं निश्चिती ॥ ३ ॥
तुझा घेऊं सदा छंद । जेणें जोडे परमानंद ॥ ४ ॥
तल्लीन होऊं तुझ्या नामीं । होऊं आम्हीं भजन कामी ॥ ५ ॥
आलस्यातें त्यागोनियां । तत्पर होऊं तुझे पायां ॥ ६ ॥
इंद्रियांसीं तेथें लावूं । मनालागीं दृढ जडवूं ॥ ७ ॥
बुद्धि समरस करूं । समाधी हे साक्षात्कारू ॥ ८ ॥
ऐशी आमुची वासना । सिद्ध करा दयाघना ॥ ९ ॥
तूंच सिद्ध करणार । तूंच आम्हां तारणार ॥ १० ॥
जैसें असे तूझ्या मनीं । तैसें येतसे घडोनी ॥ ११ ॥
तूंच एक सिद्ध नाथा । तुजसम तूंच नाथा ॥ १२ ॥
आशाळभूत गुरुराया । शरण आलों तूझे पायां ॥ १३ ॥
विनायक कृपा करणें । उपासना सिद्धी देणें ॥ १४ ॥

(४१३)

## संसारांत पारमार्थिक दृष्टीचें महत्त्व

मंगळवार ता० १०।१२।१९२९

दृष्टि परमार्थाची ठेवोनि संसारीं । वागे जरी तरी सर्व सुख ॥ १ ॥
अपुलें ममत्व अर्पित देवासीं । देई धनीपणासीं दत्तात्रेया ॥ २ ॥
संसार दत्ताचा सर्व घरदार । आपण चाकर मानी जरी ॥ ३ ॥
तरी इहपर लाभेल तो सुख । मग तया दुःख शिवेनाच ॥ ४ ॥

प्रियाप्रिय सारें देव इच्छेवरी । ठेवील हा जरी निर्धारूनी ॥ ५ ॥
मग नाहीं तया कसलीच चिंता । सकळ सुख सत्ता प्राप्त होय ॥ ६ ॥
देह हा देवाचा परिवार त्याचा । संबंध तयाचा सर्व पाहीं ॥ ७ ॥
गृह मित्र धन पशु सुत दारा । सकळ पसारा दत्तजीचा ॥ ८ ॥
भोग आणि भोग्य वस्तुही देवाच्या । अभिलाष ज्याच्या मनीं नसे॥९॥
देवासाठीं जेवी निजे देवासाठीं । विहार देवासाठीं करीत जो ॥ १० ॥
देवासाठीं देह संग्रह वस्तूंचा । भाव हा जयाचा असे जाणा ॥ ११ ॥
भोग भोगूनीही सूज्ञ जो निर्लेप । तोच खरा निष्पाप ज्ञानवंत ॥ १२ ॥
म्हणोनि ममत्व सांडोनि वर्तावें । आसक्त न व्हावें कशांतही ॥ १३ ॥
येतां जातां खातां कांहींही करितां । स्मरे भगवंता जो का सदा ॥१४॥
भगवत्स्मृति ज्यासीं बाणली अखंड । परिणाम गोड त्याचा होई ॥१५॥
याचसाठीं साधा सुलभ हा योग । सौख्य भंग मग नाहीं होत ॥ १६ ॥
चळूं न यावें मन स्थिर तें ठेवावें । प्रभुसीं स्मरावें ठायीं ठायीं ॥ १७ ॥
स्मरण भक्तीयोगें प्रभुचें जयास । चुकती सायास संसृतीचे ॥ १८ ॥
संसरण तुझें मग न होणार । स्वरुपीं मिळणार स्मृतीयोगें ॥ १९ ॥
कार्तवीर्य राजा तरला या पंथें । तयासीं समर्थें धन्य केलें ॥ २० ॥
विनायक म्हणे त्याच तूं मार्गानें । जाई विश्वासानें तरशील ॥ २१ ॥

( ४१४ )

# दत्त भजनामृत

बुधवार ता० ११।१२।१९२९

भजन दत्ताचें अमृत हें इह । यांत न संदेह मुळीं कांहीं ॥ १ ॥
स्वर्गींचें अमृत मरण निवारी । किंचित्काल तरी गौण तें कीं ॥ २ ॥
दत्त भजनामृत जन्म मृत्यु हरी । मुळीहुनी तरी अनुपम ॥ ३ ॥
म्हणुनी श्रेष्ठ तें तया न उपमा । सकळांची सीमा तेंच जाणा ॥ ४ ॥
सर्वांचियां शिरीं तयालागीं स्थान । तया उपमान जगीं नाहीं ॥ ५ ॥
पुष्टि तुष्टि आणी विरक्ति ते जाणा । करितां भोजना प्राप्त होत ॥ ६ ॥

जितुकें अन्न सेवी पुष्टि तुष्टी विरक्ती । जेवणाऱ्याप्रति तितुकी होय॥७॥
तेंवि भजनातें सेवीतां प्रेमेंसीं । भक्ती विरक्तिसीं पावतसे ॥ ८ ॥
जितुकें भजन करी तितुका घडे लाभ । जोडी पद्मनाभ तितुक्यानें ॥९॥
भक्ति ज्ञान आणि वैराग्य तें तैसें । प्राप्त भरंवसें होय तया ॥ १० ॥
म्हणूनियां सेवा भजन सुधेतें । तोषातें पावतें मन तेणें ॥ ११ ॥
स्मरण त्याचें होत स्वरूप आठवत । हृदयीं प्रादुर्भूत होई दत्त ॥ १२ ॥
म्हणोनि भजावें नित्य त्या दत्तासीं । गावें त्या प्रेमेंसीं अत्यानंदें ॥१३॥
अखंड सेवावें तद्भजनामृत । रहावें घोट घेत अविरत ॥ १४ ॥
आठवोनि यश रचना करावी । चरित्रें वदावीं रसभरें ॥ १५ ॥
जैसें येई तैसें कवित्व करावें । प्रबंधातें गावें रचोनियां ॥ १६ ॥
डुलत रहावें प्रेमानें भरावें । वर्णन करावें रसाळ कीं ॥ १७ ॥
तरी शुद्ध प्रेमा उचंबळोनी येई । वृत्ति लीन होई दत्ताठायीं ॥ १८ ॥
लाजूं नको भिऊं नको तूं कोणाला । कर भजनाला अखंड तूं ॥ १९ ॥
हाच सदुपाय तारक जगासीं । अन्य साधनांसी सेवूं नको ॥ २० ॥
मोठ्यामोठ्यानींही याच वा मार्गानें । सेविलें प्रेमातें धरोनियां ॥२१॥
चतुर्वर्ग सिद्धी तयांसीं घडली । वासना पुरली याच योगें ॥ २२ ॥
विनायक म्हणे भज त्या दत्ताला । लाभसी मुक्तीला खचित तूं ॥२३॥

( ४१५ )

# अवतार भक्तांसाठीं

( प्रवचनांत केलेला )

अवतार भक्तांसाठीं । असे तुझा जगजेठी ॥ १ ॥
ऐसा तूझा अवतार । करितोसी जनोद्धार ॥ २ ॥
ब्रह्मांडाचा अधिपती । सर्वात्मा तूं रमापती ॥ ३ ॥
सूर्य चन्द्र इंद्र कुबेर । ब्रह्मदेव जो का थोर ॥ ४ ॥
ब्रह्माण्डांचा तूं देव । सर्वांठायीं तूझा भाव ॥ ५ ॥

ऐसा जो तूं भगवान । काय करूं तव वर्णन ॥ ६ ॥
आम्हांलागीं तारावया । आलासीं तूं दत्तात्रेया ॥ ७ ॥
आलों तुजला शरण । तुझे धरिले चरण ॥ ८ ॥
तारीं आतां मजलागीं । धन्य करीं मज जगीं ॥ ९ ॥
विनायकाचा उद्धार । करीं आतां अत्रिकुमार ॥ १० ॥

( ४१६ )

## भजन माहात्म्य

गुरुवार ता. १२।१२।१९२९

देवाचें भजन देई सर्व कांहीं । जें जें इच्छी पाहीं भजक हा ॥ १ ॥
भजनानें राज्य भजनें देवपण । स्वर्गांत गमन भजनानें ॥ २ ॥
भजनें इंद्र होसी बृहस्पती होसी । प्रजापति होसी भजनानें ॥ ३ ॥
कोणता लोक तूज दुर्लभ तो नाहीं । मिळेल तो पाहीं इच्छितांच ॥४॥
भजनानें होसी गगनीं सविता । विश्व प्रकाशिता होसी तरी ॥ ५ ॥
भजनें रोग हरे भजनें ताप शमे । भजनें विश्राम जीव तुझा ॥ ६ ॥
भजनें करिसी वैकुंठ तुझा गांव । येईल माधव भजनासीं ॥ ७ ॥
भजनाच्या काजें येईल तो देव । परि शुद्धभाव पाहिजे तो ॥ ८ ॥
भजन कल्पवृक्ष भजन चिंतामणि । भजन रत्नखाणी अतुल्य ते ॥ ९ ॥
भजनीं सुधारस भजनीं आनंद । भजनें तृप्तिमद प्राप्त होतो ॥ १० ॥
भजनें जीवनमुक्त पावे ब्रह्मात्मभाव । स्वयेंच तो देव होत असे॥ ११ ॥
भजनानें होतो परब्रह्ममूर्ति । भजनें सद्गती मूर्तिमंत ॥ १२ ॥
म्हणूनीयां करा सर्वदा भजन । दत्ताचें गायन करा प्रेमें ॥ १३ ॥
अखंड चिंतन गुणांचें गायन । धरावें तें ध्यान दत्तजीचें ॥ १४ ॥
सदा दत्तपर होवोनि रहावें । दत्तरूप व्हावें भजनानें ॥ १५ ॥
विनायक म्हणे भजन कामधेनू । यश काय वानू भजनाचें ॥ १६ ॥

## ( ४१७ )

# दत्तचरणांस शरण गेल्यानें काय होतें

शुक्रवार ता० १३।१२।१९२९

दत्तचरणांसीं शरण रिघतां । काय अपूर्वता घडतसे ॥ १ ॥
पुरती सर्व काम धाया येत मना । गळोनि कामना जाती साऱ्या ॥ २ ॥
शुद्ध होय मन विरक्ती बाणत । ज्ञान प्रकाशत आपोआप ॥ ३ ॥
क्रममुक्तीलागीं सुंदर साधन । करणें सेवन उपासना ॥ ४ ॥
म्हणूनीयां जावें शरण देवाला । करावें भजनाला अहर्निश ॥ ५ ॥
तेणें होत तुज देव प्रसन्नता । मग तुझे हाता सर्व कांहीं ॥ ६ ॥
देवालागीं गावें प्रेम समर्पावें । सकळ चिंतावें देवाचेंच ॥ ७ ॥
वेड लावोनीयां घ्यावें आपणासीं । सर्व चिंतनासीं विषय तो ॥ ८ ॥
देवा खेळवावें देवासीं बोलावें । देवासीं करावें सर्व सख्य ॥ ९ ॥
थट्टा विनोदातें देवासीं करावें । जेवाया घालावें देवालागीं ॥ १० ॥
देवासीं निजवावें प्रेमें गीत गावें । देवासीं बोलावें सर्व गुज ॥ ११ ॥
देवासीं सांगावें निज सुखदुःख । विषाद हरिख निवेदावे ॥ १२ ॥
द्वन्द्वज विकार देवासीं कथावे । कांहीं न ठेवावें चोरुनीयां ॥ १३ ॥
जो जो काम मनीं उठोनीयां येत । रहावे सांगत देवापाशीं ॥ १४ ॥
सकळ सुखाचें देव हें साधन । बनावें तल्लीन देवरूपीं ॥ १५ ॥
आपण वसतां देवा बसवावें । उठतां उठवावें देवालागीं ॥ १६ ॥
केव्हां न परता देव हा करावा । सर्वदा ठेवावा जवळी तो ॥ १७ ॥
जिकडे जावें तिकडे देवालागीं न्यावें । न विसंबावें कधीं त्यासीं ॥ १८ ॥
अपुला सांगाती देव हा करावा । उरीं पोटीं घ्यावा सर्वकाळ ॥ १९ ॥
तयाच्या छंदानें सर्वदा वागावें । प्रिय आचरावें सदा त्याचें ॥ २० ॥
अप्रिय न कधीं मेल्याही करावें । सदा सांभाळावें देवालागीं ॥ २१ ॥
लहानाहुनी सान मोठ्याहुनी मोठा । सर्व पराकाष्ठा त्याजपाशीं ॥ २२ ॥
मनाचिया इच्छे देवा बनवावें । इष्ट रूपें ध्यावें तयालागीं ॥ २३ ॥

सुकुमार किंवा मध्यम वयाचा । जरठ कीं साचा जैसा भाव ॥ २४ ॥
जैसी मनोवृत्ती तदाकार देव । चिंतुनीयां सेव मनासम ॥ २५ ॥

## ( ४१८ )

# बुद्धेरात्मा महान्परः

शनिवार ता. १४।१२।१९२९

विषयाची तृप्ति मनीं विवेचावी । पुन्हां पुन्हां ध्यावी विरक्तता ॥ १ ॥
इंद्रियांचा विषयां स्पर्श जो घडत । अनुभव येत तेथ जो कां ॥ २ ॥
तया अनुभवीं शोधोनि पहावें । रहस्य जाणावें सकारण ॥ ३ ॥
तृप्तिचा उगम कोठोनियां होतो । प्रत्यय स्फुरतो कोणता तें ॥ ४ ॥
तया प्रत्ययाचें करा विवरण । तयें अंतःकरण दृढ करा ॥ ५ ॥
विषय इंद्रियें भिन्नत्वें शोधावीं । काढोनियां ध्यावीं इंद्रियें तीं ॥ ६ ॥
स्वतंत्र करोनि विषय शोधावे । तयांत पहावें प्रत्ययांतर ॥ ७ ॥
मनाचा प्रत्यय भासे भिन्न होतां । मनासीं तत्वतां दूर काढा ॥ ८ ॥
मन इंद्रियांसीं भिन्नत्वें पहावें । प्रत्ययांसीं ध्यावें भिन्नपणें ॥ ९ ॥
मनोरूप दिसे दुजें सर्व हरे । मन प्रत्ययांतरें मग शोधा ॥ १० ॥
मनाचे प्रत्यय शोधितां शोधितां । बुद्धी प्रकाशता पावे मग ॥ ११ ॥
मन बुद्धि यांसीं भिन्नत्वें पहावें । स्वरूप ओळखावें भिन्न भिन्न ॥१२॥
स्वभाव ओळखोनी बुद्धितें शोधावें।प्रत्ययांतर ध्यावें बुद्धिमाजी॥१३॥
व्यापकत्व तेथें तुज आढळेल । निराळी लागेल दिशा तुज ॥ १४ ॥
विश्वमय होसी विश्रांत मीळसी । व्यापकत्वें घेसी अनुभव ॥ १५ ॥
समष्टिस्वरूप तेथें तूं पावसी । समष्टित्वें घेसी अनुभव ॥ १६ ॥
व्यापकपणातें भिन्न करोनियां । लाग तूं शोधाया प्रत्ययांतर ॥ १७ ॥
शोधितां शोधितां गवस न पडे । तत्व न सांपडे एकाएकीं ॥ १८ ॥
तेथें भूल पडे म्हणोनि सांभाळी । जागा अंतराळीं राहे जीवा ॥ १९ ॥
तया अव्यक्ताचा भिन्नपणें शोध । उपजेल बोध तुजलागीं ॥ २० ॥
मोहपटल तुझें उघडें होईल । भ्रांति पहासील निजदृष्टीं ॥ २१ ॥

टाकोनियां देहीं मग म्या भ्रांतितें । भेट परमात्म्यातें घडे तुज ॥ २२ ॥
तेथें परमात्मा प्रत्यक्ष भेटेल । बोध प्रगटेल तुज ठायीं ॥ २३ ॥
बोधांतें शोधितां होसी बोधरूप । आनंद स्वरूप पावसी तूं ॥ २४ ॥
ब्रह्मानंदीं तुज होईल मीलन । ठायींच राहून सर्व कांहीं ॥ २५ ॥
परमात्मा मीच मजहुनी पर । नाहींच इतर ऐसें घडे ॥ २६ ॥
म्हणोनि या मार्गें शोधन करावें । संशोधितां व्हावें दत्तरूप ॥ २७ ॥
अन्याचा अभाव एकला रमसी । पूर्णत्वानें होसी परिपूर्ण ॥ २८ ॥
विनायक म्हणे विचाराची दिशा । आणी जगदीशा तुजकडे ॥ २९ ॥

## ( ४१९ )

# भक्तीप्रेमाचा परिपाक

रविवार ता० १५।१२।१९२९

भक्तिप्रेमा धरा शुद्ध हृदयांत । अखंड भजत रहावें दत्ता ॥ १ ॥
नाम त्याचें घ्यावें यशातें वर्णावें । कीर्तन करावें चरित्राचें ॥ २ ॥
सतत त्याची स्मृति मनीं बाळगावी । वृत्ती रंगवावी त्याचे ठायीं ॥३॥
प्रिय त्यासीं व्हावें प्रिय त्या लेखावें । प्रियपण व्हावें प्राप्त तुज ॥ ४ ॥
जें जें मनोभावें देवासीं अर्पावें । शतगुण घ्यावें त्यापासोनि ॥ ५ ॥
जरी प्रियपण तुजला घडावें । मन त्या अर्पावें समग्रची ॥ ६ ॥
प्रेमाचा विषय दत्तासीं करावा । दत्तची पहावा विषयांत ॥ ७ ॥
कानानीं ऐकावा जिह्वेनें बोलावा । डोळयांनीं रेखावा दत्तात्रेय ॥ ८ ॥
नाकानें हुंगावा हस्तानें धरावा । पायीं अनुसरावा दत्तमुनि ॥ ९ ॥
देहे आलिंगावा हृदयीं धरावा । कधीं न विसंबावा छंद घ्यावा ॥ १० ॥
देशकाल आणि निमित्त साधोनि । तयासीं भजनीं आळवावा ॥ ११ ॥
सर्वदा कौतुक त्याचेंच करावें । चोज वाढवावें दत्तजीचें ॥ १२ ॥
कुतूहलें दत्त सदा आश्रयावा । जीविंचा करावा सखा तोच ॥ १३ ॥
परम अंतिम दत्तचि करावा । अट्टाहास व्हावा त्याचेसाठीं ॥ १४ ॥
ऐसा जरी जीवा आचरसी योग । घडोनि संयोग येई दत्ता ॥ १५ ॥

दत्तचि होशिल दत्ताच्या छंदानें । मग तूं आनंदानें क्रीडशील ॥ १६ ॥
परमेष्ठीपद तूज प्राप्त होय । जरी तूं हृदय दत्त करिसी ॥ १७ ॥
हृदय दत्त करीं मग दत्त होईं । अंतासीं तूं जाईं संसाराच्या ॥ १८ ॥
जन्ममरणाचा चुकेल बा फांसा । जरी जगन्निवासा भजशील ॥ १९ ॥
विनायक म्हणे करावा जागर । भजन गजर करावा कीं ॥ २० ॥

( ४२० )

## सद्गुरुंची विनायकास आज्ञा

बुधवार ता. २६।११।१९३१

दिन आनंदाचा दिन स्थापनेचा । आज या स्थानाचा वार्षिक हा ॥१॥
स्थान स्थापोनियां मज नियोजिलें । मज सांगितलें निजकार्य ॥ २ ॥
भजन पूजन येथें अवलंबिणें । नामाचा करणें जयजयकार ॥ ३ ॥
उत्सव करणें चरित वर्णणें । दत्तकथा गाणें स्थानापाशीं ॥ ४ ॥
लोकसंग्रहार्सीं येथें आदरणें । भजन करविणें जनांकरवीं ॥ ५ ॥
बोलवितो देव तैसें अनुवादणें । तत्पर राहणें देवकार्यीं ॥ ६ ॥
उपासना धर्म स्वयें आचरणें । जनां दाखविणें स्वामिकार्य ॥ ७ ॥
विनायक म्हणे मज आज्ञापिलें । स्वयें चालविलें देवाजींनीं ॥ ८ ॥

(४२१)

## सद्गुरुंची विनायकास आज्ञा

आज्ञा मज केली सद्गुरुरायांनीं । तत्पर सेवनीं राहीं सदा ॥ १ ॥
मठधामासाठीं प्रयत्न करावे । मठातें स्थापावें जागोजागीं ॥ २ ॥
आलिप्त राहुनी आपण वर्तावें । कोठें न गुंतावें आज्ञापन ॥ ३ ॥
भजन चालवावें भजन करवावें । भजनीं लावावें भक्तजन ॥ ४ ॥

परि कोठें स्वयें मुळीं न गुंतावें । ममत्व जडवावें कोठेंही न ॥ ५ ॥
देवकार्य ऐसें समजोनी मनीं । ममत्व त्यजोनि वर्तावें त्वां ॥ ६ ॥
कामिजन जे जे येतिल स्थानासीं । त्यांचिया काम्यासीं जाणोनियां ॥ ७ ॥
देवा आळवावें प्रसन्न करावें । काम्य पूर्ण व्हावें म्हणोनियां ॥ ८ ॥
त्यांची परिसतां काम्य संपादनी । शुद्ध अंतःकरणीं राहोनियां ॥ ९ ॥
प्रभाव देवाचा सिद्धि त्या देवाची । अखंडित साची ठेवीं स्मृति ॥ १० ॥
अभिमान वृथा कधीं न धरावा । देवाच्या वैभवा ओळखावें ॥ ११ ॥
विनायक म्हणे मज आज्ञापिलें । केलें मज भलें गुरुरायें ॥ १२ ॥

( ४२२ )

## सद्गुरुंची विनायकास आज्ञा

धर्म सोडूं नये धर्मचि वर्तावा । धर्माचा करावा जयजयकार ॥ १ ॥
धर्म प्रतिष्ठेसीं कराया झटावें । तेंच प्रतिपादावें प्रवचनीं ॥ २ ॥
आपण वागावें इतरां वागवावें । धर्मा न सांडावें प्राण गेल्या ॥ ३ ॥
करित राहावें धर्म-विवरण । ऐशी शिकवण मजलागीं ॥ ४ ॥
धर्म्यचि बोलावें अधर्मा निंदावें । कधीं न सेवावें अधर्मासीं ॥ ५ ॥
भलताच हट्ट भलतें मोठेपण । तैसें दांभिकपण धरूं नये ॥ ६ ॥
हटीं तटीं कधीं मुळीं न पडावें । धरोनी रहावें परंपरा ॥ ७ ॥
सांप्रदाया लागीं मुळीं न त्यागावें । आपुलें न स्थापावें मत कांहीं ॥ ८ ॥
पूर्वाचार्यानीं जें असे निरूपिलें । तेंच अनुवादिलें पाहिजे कीं ॥ ९ ॥
श्रुतिशुद्ध तर्क नित्य आदरावा । श्रुतिपक्ष स्थापावा सर्व कार्यीं ॥ १० ॥
बंड कधीं न कांहीं मुळीं उठवावें । न प्रतिपादावें भलतें कांहीं ॥ ११ ॥
स्वकीय महती वाढवायासाठीं । किंवा स्वार्थासाठीं झटूं नये ॥ १२ ॥
श्रुतिमत पक्ष स्थापन करावा । देवाचा करावा जयघोष ॥ १३ ॥
विनायक म्हणे आज्ञा सद्गुरुची । मजलागीं साची ऐशी असे ॥ १४ ॥

मराठा ग्रंथ
२४४ ३८८०५ 
अनुक्रम


( ४२३ )

## सद्गुरुंची विनायकास आज्ञा

पूर्वपरंपरा कधीं न सांडावी । आपुली न दावावी बुद्धिमत्ता ॥ १ ॥
वाद न करावा जुळतेंच घ्यावें । सत्यचि बोलावें सदाकाळीं ॥ २ ॥
शास्त्रपुनीत वाक्य बोलत राहावें । तैसेंच वर्तावें बोलापरी ॥ ३ ॥
उक्ती कृती यांत भेद न ठेवावा । ऐसा प्रतिष्ठावा धर्म सदा ॥ ४ ॥
रुचतें लोकांसीं म्हणोनी भलतें । प्रतिपादन निगुतें योग्य नसे ॥ ५ ॥
लोकरुचि कांहीं असो तरी तुवां । धर्मचि वदावा निश्चयानें ॥ ६ ॥
प्रामाणिकपणा धरोनी बोलावें । तैसेंच वर्तावें सदोदित ॥ ७ ॥
आपुल्या मनास जितुकें समजेल । जितुकें घडेल सत्य जाण ॥ ८ ॥
तितुकेंच सदा बोलत रहावें । ऐसें त्वां सेवावें दत्तनाथा ॥ ९ ॥
ऐसी मजलागीं आज्ञा करोनियां । योजिलें स्थानिं या मजलागीं ॥१०॥
वार्षिक दिन आज म्हणुनि अनुवाद । करितों सुखद जो का मज॥११॥
मज गतिप्रद तैसा बोधप्रद । असे स्मृतिप्रद अनुवाद ॥ १२ ॥
म्हणोनि बोलतों देवा तुझेपाशीं । तुझें मन संतोषी रहावया ॥ १३ ॥
तरी होई आतां मजसीं कृपाळु । करी तूं सांभाळु माझा दत्ता ॥ १४ ॥
विनायक म्हणे व्रत चालवावें । अखंड करवावें माझ्या हस्तें ॥ १५ ॥

( ४२४ )

## धांवा

हेतु धरुनि शरण आलों । तुजवरी विश्वासलों ॥ १ ॥
अनुभव आजवरी । तव कृपेचाच तरी ॥ २ ॥
कधीं न केली अवकृपा । मजवरी मायबापा ॥ ३ ॥
मागें पुढें उभें राहोनी । मज साहाय्यातें करोनी ॥ ४ ॥

माझा देह वागविला । निजकार्यीं तुवां भला ॥ ५ ॥
केलें छत्र तव कृपेचें । शिरीं माझ्या धरिलें साचें ॥ ६ ॥
प्रसंग नाहीं येऊं दीला । दुरच्या दूर निवारीला ॥ ७ ॥
मजलागीं कळला नाहीं । ऐसी करणी तुझी पाहीं ॥ ८ ॥
आजवरी ऐसें केलें । मजलागीं अनुग्रहीलें ॥ ९ ॥
तेंच तुझें यश स्मरतों । फळालागीं येवो म्हणतों ॥ १० ॥
तेंच तुझें यश जागो । बाधा माझ्या देहा न लागो ॥ ११ ॥
राख राख माझी लाज । शरणागत आहें तुज ॥ १२ ॥
विनायक विनवणी । करितसे चक्रपाणी ॥ १३ ॥

( ४२५ )

## आशीर्वचन मागणी

संकटातें निवारावें । प्रसंगांत न पाडावें ॥ १ ॥
कार्य निज करवावें । स्थैर्य धैर्य मज द्यावें ॥ २ ॥
अभय मजलागीं द्यावें । भय माझें परिहरावें ॥ ३ ॥
निर्भय मजला करोनी । हृदय माझें अनुग्रहोनी ॥ ४ ॥
कार्यीं मज प्रवर्तवावें । सेवन निज करवावें ॥ ५ ॥
भजन पूजनाचा भर । व्हावा येथें अत्रिकुमार ॥ ६ ॥
विनायक चरणां नमन । करुनी मागे आशीर्वचन ॥ ७ ॥

( ४२६ )

## विनायकाचा निर्धार

देवा तुम्हां ओळखिलें । अत्रिनंदन तुम्हीं भले ॥ १ ॥
आतां न पाय सोडणार । पायीं देह ठेवणार ॥ २ ॥

करा किंवा नका करूं । देवा माझा अंगिकारू ॥ ३ ॥
स्पष्टभाव कळविला । देवा तुम्हां माझा भला ॥ ४ ॥
करूं नका आतां निर्वाण । तुम्हांलागीं मी शरण ॥ ५ ॥
सोडिन हे कधिं न चरण । चरणासाठीं त्यागिन प्राण ॥ ६ ॥
निर्धार माझा तुमच्या चरणीं । आज धन्य झालों धरणीं ॥ ७ ॥
देखियेले तुझे पाय । श्रीगुरुराय दत्तात्रेय ॥ ८ ॥
करूं नका माझा त्याग । तुम्हीं माझे जिवलग ॥ ९ ॥
तुमच्यासाठीं मी दिवाणा । झालों असें नारायणा ॥ १० ॥
किती अंत माझा पहाणें । आतां अंगिकार करणें ॥ ११ ॥
विनायक म्हणे द्रवला । देव प्रगटी रूपाळा ॥ १२ ॥

( ४२७ )

## मनोदय कथन

गुरुवार ता. २७।११।१९३०

आम्हां अज्ञानांना कायसें समजे । कायसें उमजे दत्तनाथा ॥ १ ॥
खाउसाठीं जैशीं बालकें तत्पर । होताती अधीर अज्ञानानें ॥ २ ॥
तैसे देवा आम्हीं अभ्युदयासाठीं । सिद्ध जगजेठी सदा असों ॥ ३ ॥
मोक्षवस्तु काय आम्हांसीं न कळे । आम्हांसीं न वळे देवराया ॥ ४ ॥
आम्हीं जे का भजतों तुज गुरुराया । इच्छा अभ्युदया धरोनीयां ॥ ५ ॥
संसार आमुचा उत्तम चालावा । त्रिवर्ग साधावा आम्हालागीं ॥ ६ ॥
धर्म अर्थ काम समृद्ध बनावीं । वृद्धिच असावी त्रिवर्गांत ॥ ७ ॥
ऐसा मनोदय नाथा हृदयींचा । आमुचा असे साचा स्पष्टवाणी ॥ ८ ॥
मोक्ष म्हणजे काय, काय सुख आहे । कैसा जाणताहे, कोण, सांग ॥ ९ ॥
विनायक म्हणे मी तरि अज्ञान । मज समजोन येना कांहीं ॥ १० ॥

( ४२८ )

# दुःख हरण्यासाठीं प्रार्थना

निरंतर आम्हां सुखचि असावें । कधीं न असावें दुःख आम्हां ॥ १ ॥
इह किंवा पर आम्हां फलश्रुति । सुखाचीच प्राप्ती इच्छितसों ॥ २ ॥
परि सुखासीहि आम्हीं न जाणत । दुःखचि पावत सदोदित ॥ ३ ॥
एवढेंच आम्हां देवा समजतें । दुःखचि निश्चितें भोगितसों ॥ ४ ॥
आम्हीं दुःखी असों ऐसेंचि वाटतें । दुःखाच्या नाशातें झटतसों ॥ ५ ॥
दुःख हरायासीं तुजला शरण । धरितों चरण गुरुनाथा ॥ ६ ॥
परि दुःखाचीही व्याख्या समजेना । सुख दुःख मना कळेनाच ॥ ७ ॥
सुख तें कशांत दुःख तें कशानें । जाणतां, हें मनें, जाणवेना ॥ ८ ॥
जाणीवेची गति खुंटोनियां जात । दुःखचिं समस्त वाटे मना ॥ ९ ॥
परी काय दुःख काय स्वरूपाचें । कळेनाच साचें दत्तात्रेया ॥ १० ॥
दुःख मुक्तीसाठीं तुजला शरण । धरितों चरण भगवंता ॥ ११ ॥
आमुचें अज्ञान देखोनियां नाथा । आम्हांसीं समर्था व्हावी कृपा ॥१२॥
विनायक म्हणे माझे मनोरथ । पुरवावे नाथ कृपाळुत्वें ॥ १३ ॥

( ४२९ )

# बालक असलेमुळें अपराध पोटीं घालण्याबद्दल प्रार्थना

जैसें प्रबुद्धपण येईल मजला । तैसें मी तुजला ओळखीन ॥ १ ॥
तोंवरी नाथा करीं माझें तूं लालन । मजसीं ताडन करूं नको ॥ २ ॥
जगीं व्यवहार ऐसाच कीं आहे । लालनची पाहे बाळालागीं ॥ ३ ॥
बाळाचें कौतुक जग हें करितें । त्याचें न आणितें मना कांहीं ॥ ४ ॥
कांहींही बोललें कांहींही घडलें । कोपती न भले त्याचेवरी ॥ ५ ॥

अज्ञानाचा भाव त्याचा जाणोनियां । कोप न हृदया येतो कोणा ॥६॥
तैसा देवराया जरी मी चुकलों । दुर्वृत्त वागलों भलत्यापरी ॥ ७ ॥
मना नको आणूं माझ्या आईबापा । मजवरी कृपा करीं सदा ॥ ८ ॥
अजाणत घडे मजसीं अन्याय । तरी गुरुराय क्षमा करीं ॥ ९ ॥
जरी कोपसील तरी बुझावेन । भय मी घेईन थोर दत्ता ॥ १० ॥
म्हणोनियां योजूं नको ताडनातें । मजला बाळातें अज्ञानातें ॥ ११ ॥
समजवी मज माझी या भाषेंत । कौतुक करीत दत्ता माझें ॥ १२ ॥
जरि माझें नाथा कौतुक करिसी । प्रोत्साहन देसी मजलागीं ॥ १३ ॥
जरी मजलागीं सहाय तूं होसी । बाहूंत तूं घेसी मजलागीं ॥ १४ ॥
जरी कुरवाळीसी मधुर बोलसी । तरीच मजसीं समजेल ॥ १५ ॥
जरी मज नाथा शिक्षा योजसील । नाशचि होईल दत्ता माझा ॥१६॥
काय तुझें बाळ पावावें विनष्टी । ऐसीच बा दृष्टी तुझी काय ॥ १७ ॥
ऐसें म्हणवेना कैसें म्यां म्हणावें । कैसें समजावें दत्तात्रेया ॥ १८ ॥
सकळ निर्धार अर्पिला तुजसीं । विश्वास तुजसीं ठेवियेला ॥ १९ ॥
बरवेंच माझें नाथा करसील । मज न सांडसील कांहीं झाल्या ॥ २०॥
ऐशा विश्वासानें ऐशा मी श्रद्धेनें । शरण मनानें तुज झालों ॥ २१ ॥
काय बाळकासीं शंका ये मातेची । किंवा पितयाची सांग नाथा॥२२॥
आईबाप काय अनिष्ट सांगतील । अनिष्ट इच्छितील बाळकाचें॥२३॥
हातीं घेवोनियां जरी शस्त्र माता । धरोनी कठोरता सिद्ध झाली ॥२४॥
तरी बाळ तीजकडेच जाईल । सोडितां न सोडिल मातेलागीं ॥ २५ ॥
जरी रागावली जरी शिक्षा झाली । उडी घेत भली बाळकातें ॥ २६ ॥
देखोनियां माता उडीच तें घेत । शंका न वर्तत कांहीं त्याला ॥ २७ ॥
तैसा तूजलागीं देवा विश्वासानें । समजतों मनें कृपावंता ॥ २८ ॥
जरी मजवरी त्रैलोक्य कोपलें । तुझें चित्त भलें न कोपेल ॥ २९ ॥
कितीही अपराधी जरी मी बनलों । शिक्षार्ह ठरलों जनदृष्टीं ॥ ३० ॥
तरी तूं न मज शिक्षा करणार । मज कुरवळणार वात्सल्यानें ॥ ३१ ॥
ऐसा आहे माझा मनिंचा निश्चय । म्हणोनियां पाय धरिले मी ॥ ३२॥
तरी बाळकाची समजूत काढीं । माझी असे ओढी विषयांसीं ॥ ३३ ॥
विनायक म्हणे माझा अभ्युदय । साधावा सदय प्रथम कीं ॥ ३४ ॥

( ४३० )

## बाल असलेमुळें अपराध पोटीं घालण्याबद्दल प्रार्थना

जेव्हां माझें मन प्रौढता वरील । तेव्हांच सोडील अधीरता ॥ १ ॥
तोंवरि माझी नाथा आशा पुरवावी । मजवरी व्हावी दया थोर ॥ २ ॥
कृपेनें तारावें लाड पुरवावे । चोजचि करावें दत्ता माझें ॥ ३ ॥
लालनासी योग्य अजुनि मीं आहें । कृपेनें तूं पाहे दत्तमाय ॥ ४ ॥
याहुनियां काय देवा मी सांगावें । कायसें बोलावें अज्ञानानें ॥ ५ ॥
एवढीच असे मज जाणगती । तुझ्या पायांप्रती शरण होणें ॥ ६ ॥
तुजपाशीं निज दुःखास सांगणें । प्रिय तें मागणें तुझ्यापाशीं ॥ ७ ॥
जिकडे माझी रुचि तेंचि मीं मागतों । मस्तक ठेवितों पायांवरी ॥ ८ ॥
तरी अभ्युदय देवा माझा साधीं । सकळांच्या आधीं दत्तात्रेया ॥ ९ ॥
मग तुझा मोक्ष काय तो दाखीव । मज समजाव मग देवा ॥ १० ॥
मग कांहीं तरीं मज समजेल । मन उमजेल कांहीं माझें ॥ ११ ॥
विनायक दृढ शरणीं चरण । कृपेचें वीक्षण करीं नाथा ॥ १२ ॥

( ४३१ )

## देवास शरण जाण्याची महती

शुक्रवार ता. २८।११।१९३०

सार्थक जन्माचें कराया कारण । धरणें चरण आवश्यक ॥ १ ॥
मनुष्ययोनितें लाभोनियां जीवें । सार्थक करावें हेतू ऐसा ॥ २ ॥
देवोनी ठेविली बुद्धि भगवंतें । हेतू ज्ञान व्हावें तें मनुष्याला ॥ ३ ॥
मोक्ष, ज्ञानी यासीं सहज प्राप्त होत । ज्ञान अपेक्षित भगवंतें ॥ ४ ॥
परि ज्ञान नोहे सर्वां साधारण । तैसीच घडण लागते कीं ॥ ५ ॥

बहुत जन्मांचे प्रयत्न फळती । तेव्हां ज्ञान प्राप्ती होत असे ॥ ६ ॥
सर्व साधारण नोहे ज्ञान मार्ग । सर्वां न विराग प्राप्त होय ॥ ७ ॥
विरक्त मन व्हाया चित्तशुद्धि कारण । शुद्ध अंतःकरण लागतसे ॥ ८ ॥
चित्तातें शोधाया कर्म उपासना । करणें अनुष्ठाना लागतसे ॥ ९ ॥
कर्म आणि ज्ञान ह्यांचा समुच्चय । शोधित हृदय प्राणीयांचें ॥ १० ॥
सदाचार आणि ईश्वरसेवना । करणें अनुदिन लागे जीवा ॥ ११ ॥
उपासनाबळें सगुण साक्षात्कार । होतसे उद्धार वेद सांगे ॥ १२ ॥
म्हणोनियां नित्य देवाचें भजन । हेंच कीं साधन सकळांसीं ॥ १३ ॥
विनायक म्हणे धरा दत्तपाय । सुंदर उपाय अनुपम ॥ १४ ॥

( ४३२ )

# ईशसेवन माहात्म्य

ईश्वरा भजतां विघ्नें न बाधती । प्रत्यवाय होती दूर सारे ॥ १ ॥
दृढ निश्चयानें भजतां देवासीं । तारक जीवासीं होत सदा ॥ २ ॥
जैसी रुचि तैसा देहाचा आकार । कल्पावा कीं थोर भगवंता ॥ ३ ॥
प्रथम हें ऐसें साधन योजावें । जवळी करावें देवालागीं ॥ ४ ॥
सकळ विश्वमय जो का भगवान । दावील सगुण विश्वरूप ॥ ५ ॥
विश्वाकार प्रभू समष्टि रूपांत । राहावें भजत प्रेमभरें ॥ ६ ॥
भजतां तयाला दुःखें दूर होती । साहाय्य करिती लोककार्यीं ॥ ७ ॥
देवासीं पूजावें स्तुति स्तोत्र गावें । कीर्तन करावें तद्गुणांचें ॥ ८ ॥
यश परिसावें सेवक बनावें । दास्यातें करावें श्रीहरीच्या ॥ ९ ॥
हरिचा भजक होवोनी रहावें । सख्यत्वें पहावें देवालागीं ॥ १० ॥
वंदन करावें अखंड स्मरावें । देवासीं सेवावें रात्रंदिन ॥ ११ ॥
जें जें कांहीं असे आपुलीयापाशीं । सकळ देवासीं निवेदावें ॥ १२ ॥
सकळ देवाचें आपुलें न कांहीं । ऐसें लक्ष पाहीं ठेवावें कीं ॥ १३ ॥
सदा देवमय होऊनी राहावें । इतर विसरावें सर्व कांहीं ॥ १४ ॥

संसार देवाचा देह हा देवाचा । येथें या जीवाचा संबंध न ॥ १५ ॥
ऐसें देवात्मक करितां सेवन । पावे तो भगवान लवलाहीं ॥ १६ ॥
विनायक म्हणे धरूनी नम्रता । तया अवधूता आश्रयावें ॥ १७ ॥

( ४३३ )

## देवास शरण जाण्याची महती

सुलभ हा मार्ग सुलभ उपाय । चुकती अपाय देवकृपें ॥ १ ॥
काहीं जडभारी पडल्या आपणा । तया नारायणा शरण जावें ॥ २ ॥
भव–पार जीव करिल तो देव । त्याचा कृपा भाव आम्हांवरी ॥ ३ ॥
त्यागोनी आलस्य तत्पर रहावें । देवासीं सेवावें मनोभावें ॥ ४ ॥
सकळ जगाची जया असे चिंता । तया भगवंता आळवावें ॥ ५ ॥
इहपर जीवा सद्गति देईल । सुखांत ठेविल निजकृपें ॥ ६ ॥
विनायक कथी सुंदर भावार्थ । पुरतील अर्थ देवकृपें ॥ ७ ॥

( ४३४ )

## भजन–माहात्म्य

कोणताही अर्थ धरोनी भजतां । करिल सिद्धता त्या अर्थाची ॥ १ ॥
अर्थ सिद्ध करी, वरी मुक्ती देई । आनुकुल्य देई निजभक्तां ॥ २ ॥
म्हणोनि तात्पर्य एकचि समजावें । देवासीं भजावें निश्चयानें ॥ ३ ॥
आपुल्या प्रेमाचा ओढा देवाकडे । ठेवितां मति जडे त्याचे पायीं ॥४॥
मति पेशी जडतां कार्यचि साधलें । उमजावें भलें मनामध्यें ॥ ५ ॥
म्हणोनियां करा प्रेमानें भजन । करा आराधन अभिमत ॥ ६ ॥
विनायक म्हणे माझा एक भाव । गुरुदत्त देव सर्व कांहीं ॥ ७ ॥

## ( ४३५ )

# ईशकृपेसाठीं प्रार्थना

शनिवार ता० २९।११।१९३०

तुझ्या कृपेवीण सर्व व्यर्थ आहे । म्हणोनियां पाहें कृपादृष्टिं ॥ १ ॥
धरितों चरण हात मी जोडितों । कृपेतें याचितों तुझ्यापाशीं ॥ २ ॥
भयानक सौम्य दोन्ही स्वरूपाचा । अससी तूं साचा दत्तनाथा ॥ ३ ॥
भयंकररूपें भिवविसी जना । परीक्षिसी मना सेवकांच्या ॥ ४ ॥
निर्धार पाहुनि पुन्हां सौम्य होसी । मग अनुग्रहीसी निजजन ॥ ५ ॥
ऐसा आहे तुझा सदा व्यवहार । आम्हां अत्रिकुमार ठावा असे ॥ ६ ॥
भयभीति सारी सांडोनि भजतां । दृढ निश्चयता धरोनियां ॥ ७ ॥
मग सर्वस्वातें ओपिसी दयाळा । श्रीदत्त प्रेमळा ऐसें असे ॥ ८ ॥
म्हणोनि विनायक होतसे शरण । तरी नारायण अंगिकारा ॥ ९ ॥

## ( ४३६ )

# धांवा

भय मोठें आहे देवा उभारलें । हृदय खचलें माझें असे ॥ १ ॥
तळमळ जीव माझा हा करित । कांहीं न सुचत मजलागीं ॥ २ ॥
बावरली मति चंचळ हें मन । झालें घाबरून गुरुराया ॥ ३ ॥
तुजविण त्राता न दिसे कोणीही । तरी लवलाही देवा धांव ॥ ४ ॥
उडी घाल आतां माझ्यासाठीं ताता । गुरु भगवंता अत्रिकुमरा ॥ ५ ॥
मज सोडवाया नाथ धांव घ्यावी । क्षमा मज व्हावी गुरुनाथा ॥ ६ ॥
तळमळतें हृदय, कासावीस जीव । माझा सत्वभाव पाहूं नको ॥ ७ ॥
कृपाळुपणानें नाथ धांव घेईं । बाळा जैसी आई स्नेहभरीं ॥ ८ ॥
काकुळती येतों पदर पसरितों । करुणा मागतों करुणेशा ॥ ९ ॥
लाज या स्थानाची लाज या दासाची । लाज उपासनेची राख आतां ॥ १० ॥

३५०५ दि: ३५३

आजवरी जे का पुण्य घडविलें । स्थानापाशीं भलें दयावंता ॥ ११ ॥
त्याची लाज राख राख भजनाची । आपुल्या कृपेची लाज राख ॥१२॥
लाज सांप्रदायाची तुझिया भक्तीची । शुद्ध भावनेची लाज राख ॥१३॥
लाज राख आतां निज थोरवीची । नामगायकाची लाज राख ॥१४॥
लाज राख आतां आपुल्या जनाची । आपुल्या भृत्यांची लाज राख ॥१५॥
विनायक म्हणे स्वामी तूं समर्थ । पुरवितां अर्थ श्रम नोहे ॥ १६ ॥

( ४३७ )

## धांवा

तुज समर्थाला कायसें कठीण । द्रवो अंतःकरण माझ्यासाठीं ॥ १ ॥
माझ्यासाठीं आतां अवघड कार्य । करीं गुरुराय दत्तात्रेय ॥ २ ॥
तुज कांहीं नाहीं अवघड जगतीं । म्हणोनी त्वरिती उडी घाल ॥ ३ ॥
माझें पुण्य येवो नाथजी फलासीं । माझ्या आपदेसीं दूर करीं ॥ ४ ॥
कठीण प्रसंग दिसत पुढतीं । तुजविण गति नाहीं अन्य ॥ ५ ॥
नको लावूं आतां विलंब माधवा । निज कृपाभावा प्रगटवीं ॥ ६ ॥
आम्हीं कोणापाशीं जावें तुजवीणें । देवा हें सांगणें मजलागीं ॥ ७ ॥
आजवरी ज्याचेवरी विश्वासाला । ठेवोनि वाढविला देह माझा ॥८॥
ज्याचिया नामाची आजवरी ग्वाही । देवा दिली पाहीं निश्चयानें ॥९॥
धरोनियां आशा ज्यासीं मीं सेविलें । जयालागीं केलें निजार्पण ॥१०॥
तया देवाविण आतां कोण जगतीं । सांगणें श्रीपती मजलागीं ॥ ११ ॥
सकळ दुःखाघात जे कां मज होत । देवा हानि येत तुझ्या यशा ॥१२॥
उपासनाधर्म वाढवायासाठीं । तुवां जगजेठी स्थान निर्मिलें ॥ १३ ॥
आजवरी केला तुवां जयजयकार । तैसा बडिवार वाढविला ॥ १४ ॥
पाहिजे तो आतां पुढें चालविला । तुज सर्वज्ञाला काय सांगूं ॥ १५ ॥
तरी आतां नाथा कार्य शिरीं घ्यावें । प्रसंगा निवारावें माझ्या आतां ॥१६॥
भयभीत शरण तुझीये चरणा । माझिया रक्षणा आतां करीं ॥ १७ ॥
विनायकें किती तुज विनवावें । कायसें बोलावें सांग नाथा ॥ १८ ॥

## ( ४३८ )

# धांवा

देवाविण नाहीं अन्य मज गति । हेंच माझी मति सांगतसे ॥ १ ॥
सकळ उपाय व्यर्थचि असती । फळा नच येती कोणीही ते ॥ २ ॥
ईतर साधनें अनर्थकारक । श्रमाचि होत निक दयावंता ॥ ३ ॥
म्हणोनियां तुम्हां प्रार्थितों श्रीधरा । आतां कृपा करा दीनावरी ॥ ४ ॥
दीनमुख किती देवा तुम्हांपुढें । करावें मीं गाढें सांगा आतां ॥ ५ ॥
द्रवो अंतःकरण नवनीतासम । तव पुरुषोत्तम प्रार्थना ही ॥ ६ ॥
कठिणता आतां नका मुळिं धरूं । माझा अंगिकारू देवा करा ॥ ७ ॥
नका दूर लोटूं अनाथ मी दीन । कोणासीं जाऊन सांगूं आतां ॥ ८ ॥
कोण मज तारी कोण उडी घाली । दया येत भली कोणालागीं ॥ ९ ॥
कोण वांचविता तुम्हांविण नाथा । अनाथाच्या नाथा दत्तात्रेया ॥१०॥
अपराध माझे सर्व क्षमा करीं । गुरु नरहरी वासुदेवा ॥ ११ ॥
तूंच माझा वाली माझा तूं आधार । माझा सर्वेश्वर तूंच नाथा ॥ १२॥
तुझाच आश्रय मजलागीं असे । दुजा कोणी नसे कृपावंता ॥ १३ ॥
म्हणोनियां तुज मारितों मी हांका । तरी गुरुनायका धांव घेईं ॥१४ ॥
माझिया धांव्यासी धांवरे दयाळा । धांवरे कृपाळा धांव धांव ॥ १५ ॥
गडबडां तुझे पुढती लोळतों । रुदन करितों तुझे पुढें ॥ १६ ॥
हानि येत असे तुझिये स्थानाला । तैशी उपासनेला दत्तनाथा ॥ १७ ॥
हानि येत असे तव प्रतिज्ञेला । तुझ्या वचनाला हानि येत ॥ १८ ॥
हानि येत असे देवा पुण्याईला । हानि सद्धर्माला येत असे ॥ १९ ॥
हानि येत असे तुझ्या संकल्पाला । श्रीगुरुदयाळा किती बोलूं ॥ २० ॥
भडभडोनियां हृदय हें येत । तुजसीं सांगत गुह्य सारें ॥ २१ ॥
काय माझे मनीं तेंच मी बोलत । कांहीं न ठेवित झांकोनियां ॥ २२ ॥
तरी आतां मज कृपेनें तूं पाहे । धांव लवलाहें धांव दत्ता ॥ २३ ॥
विनायक म्हणे प्रसंग टळावा । देवा तुझा व्हावा जयजयकार ॥ २४ ॥

(४३९)

## उत्सवाची मागणी

तुझ्या उत्सवाचें कार्य जवळि आलें। देवा सिद्ध केलें पाहिजे कीं॥१॥
आजवरी तुवां कृपाळूपणानें। तैसें अनुकूल्यानें सिद्ध केलें ॥ २ ॥
आजवरी केला मजसीं प्रसाद। कधीं न विषाद प्राप्त झाला ॥ ३ ॥
न्यून कांहीं आजवरी न पडलें। जैसें संकल्पिलें तैसें झालें ॥ ४ ॥
वाण नाहीं कधीं पडली द्रव्याची। किंवा साधनांची मजलागीं ॥ ५ ॥
वाण नाहीं कधीं मनुष्यबळाची। पडली मज साची तुझ्या कृपें ॥ ६ ॥
वाण नाहीं कधीं तुझ्या प्रसादाची। तुझ्या साक्षात्काराची पडली देवा ॥७॥
वाण नाहीं देवा कधीं चमत्कारांची। पडली येथें साची प्रसादानें ॥८॥
आजवरी थोर प्रसाद करीला। देवा साधविला कार्यभाग ॥ ९ ॥
तैसें नाथा आतां पुढतीं चालावें। सर्वकार्य व्हावें सिद्ध तूझें ॥ १० ॥
तच तेंच तेंच देवा मी बोलतों। तुज विनवितों पुन्हां पुन्हां ॥ ११ ॥
तरी मजवरी कोप न करावा। अज्ञानी जाणावा निजदास ॥ १२ ॥
विनायक म्हणे सर्व सोपस्कार। कार्य हें उदार संपादावें ॥ १३ ॥

( ४४० )

## धांवा

पुन्हां पुन्हां तुज प्रार्थावें। तुझ्या पदीं लीन व्हावें ॥ १ ॥
तुजलागीं कळवावें। हितगुज प्रेमभावें ॥ २ ॥
तेंच तेंच पुन्हां सांगावें। तैसें तैसें विनवावें ॥ ३ ॥
नम्र माथा हा करावा। लीन भाव चित्तीं धरावा ॥ ४ ॥
लोटांगणें नाथा घालावीं। स्तुतिस्तोत्रें तुझीं गावीं ॥ ५ ॥
पुन्हां पुन्हां तुज प्रार्थावें। दीन मुख पुढें करावें ॥ ६ ॥

आशाळभूत होवोनियां । तुज पाहीं दत्तात्रेया ॥ ७ ॥
निज हेतु कळवावा । पुन्हां पुन्हां उच्चारावा ॥ ८ ॥
याहुनी काय करणार । कैसा तुज आळविणार ॥ ९ ॥
कैसा तुज प्रिय होणार । कृपा तुझी संपादणार ॥ १० ॥
कैसा सिद्ध कार्यभाग । होय माझा जिवलग ॥ ११ ॥
म्हणोनियां लोळण घेतों । विनवणी तुझी करितों ॥ १२ ॥
प्रश्न आहे जगण्याचा । देवा तुझ्या उपासनेचा ॥ १३ ॥
उपासक मीं राहावें । व्रत माझें न भंगावें ॥ १४ ॥
आशय हाच माझ्या मनींचा । सांगतसें तुज साचा ॥ १५ ॥
विश्वासाचें तूं भाजन । तूंच खरा दयाघन ॥ १६ ॥
माझ्या तूंच कळवळ्याचा । तूंच माझ्या जिव्हाळ्याचा ॥ १७ ॥
तूंच माझिया जिवाचा । तूंच धनी सर्वस्वाचा ॥ १८ ॥
म्हणोनि तुज मी सांगतों । हेतु माझा स्पष्ट करितों ॥ १९ ॥
अभय द्यावें मजलागीं । धन्य करा मज जगीं ॥ २० ॥
विनायक म्हणे देवा । निजकार्यातें साधवा ॥ २१ ॥

## ( ४४१ )

# दत्तनामें भूतें भीति

( प्रवचनांत केलेले )

तुझी भक्ती देवा, करितां । विघ्न उदेलें तत्त्वतां ॥ १ ॥
कैसी झाली हे करणी । समजेना चक्रपाणी ॥ २ ॥
जेथें भक्ती श्रीदत्ताची । जेथें क्रिया शुद्ध साची ॥ ३ ॥
तेथें भूतां शिरकाव । होईनाच त्यासीं वाव ॥ ४ ॥
दत्तनामें भूतें भीति । पलायन तीं करितीं ॥ ५ ॥
ऐसें असतां कैशी करणी । केली देवा तुम्हीं क्षणीं ॥ ६ ॥
म्हणोनियां ऐसें मनीं । देवा आणितसें क्षणीं ॥ ७ ॥
भयभीत पद धरी । मूर्ति आठवी अंतरीं ॥ ८ ॥

पाहोनीयां त्याची स्थिती । भूता दया ये निश्चिती ॥ ९ ॥
भिऊं नको म्हणे द्विजा । आलों असें तुझ्या काजा ॥ १० ॥
तुझें अन्न म्यां सेविलें । द्वादशाब्द जाण भलें ॥ ११ ॥
म्हणोनि कृतज्ञ होवोनी । आलों येथें प्रगटोनी ॥ १२ ॥
मजपाशीं कांहीं माग । इच्छि तुझें अंतरंग ॥ १३ ॥
ऐसी देवाची करणी । भूतें येती लोटांगणीं ॥ १४ ॥
विनायक म्हणे कौतुक । देव भक्तीचें हें निक ॥ १५ ॥

( ४४२ )

## भजन माहात्म्य

रविवार ता. ३०।११।१९३०

भजन हेंचि सार भजन अमृत । तेंच अवधूत आम्हां देई ॥ १ ॥
सकळ विषयांची असे परिपूर्णता । भजनीं तत्वतां गुरुनाथा ॥ २ ॥
सुखमय असे तुझें हें भजन । मना समाधान थोर होई ॥ ३ ॥
मिष्टान्न भोजन अमृतांचें पान । त्वदीय भजन गुरुराया ॥ ४ ॥
दिव्यौषधि असे भजन गुरुनाथा । भजनाच्या अर्था पुरवावें ॥ ५ ॥
अर्थमत्त्व असे जे का भजनांत । तयासीं दृष्टांत नाहीं जगीं ॥ ६ ॥
भजनें समाधि भजनानें शांति । भजनें बोधस्थिति प्राप्त होय ॥ ७ ॥
त्वदीय भजन स्नान हें सुधेचें । काय भजनाचें यश बोलूं ॥ ८ ॥
विनायक म्हणे भजन करवा । गुरु वासुदेवा माझेकडुनी ॥ ९ ॥

( ४४३ )

## भजन माहात्म्य

भजन मागतों मागतों मी प्रेम । तुझें पुरुषोत्तम तुझ्यापाशीं ॥ १ ॥
भजन कल्पतरु किंवा कामधेनू । भजना उपमानूं नाहीं नाहीं ॥ २ ॥

जे कां प्रेममय भजन घडतें । ब्रह्मांत ठेवितें भजकाला ॥ ३ ॥
प्रेमाचें भजन हरवित स्मृति । नर देहावरतीं नसे तेव्हां ॥ ४ ॥
देहभावनेसीं विसरोनी जातो । तुज अनुभवितो स्वदेहानें ॥ ५ ॥
भजन इंद्रियां तुझ्यांत मिळवी । मना मिसळवी तुझेमाजी ॥ ६ ॥
भजनें सकळ अहंता गळत । ममत्व हरपत संसारींचें ॥ ७ ॥
विश्व ब्रह्ममय भजन दाखवी । वृत्ति तैसी उठवी अंतरांत ॥ ८ ॥
क्षणभरी सर्व विश्व ब्रह्ममय । भजकासीं होय अनुभवीं ॥ ९ ॥
स्वर्ग मृत्यु आणि पाताळ लोकींचें । एकवटे साचे सुख वाटे ॥ १० ॥
आपणाचि देव आपण परंधाम । आपणाचि ब्रह्म ऐसें होई ॥ ११ ॥
ब्रह्ममय सारें होवोनी रहात । ब्रह्माचि स्फुरत भजनानें ॥ १२ ॥
विनायक म्हणे तुझ्या भजनाला । मज वानायाला शक्ती कैंची ॥१३॥

( ४४४ )

# भजन माहात्म्य

भजन हा मंत्र भजन हें तंत्र । सद्गति परत्र भजनचि ॥ १ ॥
अभ्युदय जो का भजनची मूर्त । मोक्षोपाय खचित भजनचि ॥ २ ॥
भजनानें मोक्ष, सिद्धी भजनानें । काय न भजनानें साधणार ॥ ३ ॥
म्हणोनी भजन गमतें भाग्याचें । गुरुराया साचें मागतों मी ॥ ४ ॥
पुण्याईचें फळ त्वदीय भजन । सुकृताधिष्टान तव भजन ॥ ५ ॥
भजनें दुर्दैव हरोनियां जाई । दुःख लया जाई भजनानें ॥ ६ ॥
सकळ अशुभाचा परिहार करी । विघ्नातें निवारी त्वद्भजन ॥ ७ ॥
संकटांचा नाश चिंतेचें दहन । साधवी भजन तुझें दत्ता ॥ ८ ॥
तुझ्या भजनानें सर्व तीर्थस्नान सर्व व्रताचरण भजनानें ॥ ९ ॥
वर्णाश्रम-धर्म भजनानें संचित । सकळ सुकृत जोडतसे ॥ १० ॥
वासनांची सिद्धी संप्राप्ती भोगांची । सर्व होत साची भजकाला ॥११॥
विनायक म्हणे भजन सर्व सार । भजन आधार कल्याणाचा ॥ १२ ॥

( ४४५ )

## भजनमाहात्म्य

रुचीस मधुर ग्रहणा मधुर । स्पर्शासीं मधुर भजन तुझें ॥ १ ॥
अवलंबायासीं सुलभ भजन । मधुर अनुष्ठान भजनाचें ॥ २ ॥
तर्पण इंद्रियांचें तर्पण मनाचें । तर्पण बुद्धिचें भजनचि ॥ ३ ॥
भजनानें देव होताती सुवश । नाकेश लोकेश वश होती ॥ ४ ॥
भजनें त्रिभुवन स्वाधीन होतसे । भजनें येत असे दिव्य शक्ति ॥ ५ ॥
भजन पाहिजे शुद्ध जिव्हाळयाचें । सात्विक प्रेमाचें पाहिजे कीं ॥६॥
एकचि विकार पाहिजे प्रेमाचा । अन्य विकारांचा अत्यंताभाव ॥ ७ ॥
निर्लेप पाहिजे स्वच्छ सुभजन । मना आल्हादन घडविणें ॥ ८ ॥
सर्व विकसन करिल भजन । आत्रिचा नंदन भेटाविल ॥ ९ ॥
अगाध ती शक्ति असे भजनाची । कल्पवितां साची कल्पवेना ॥ १० ॥
विनायक म्हणे मजवरी कृपा । दत्ता तव उमोपा भजन हें ॥ ११ ॥

( ४४६ )

## विधि रहो बलवान्

सोमवार ता. १।१२।१९३०

पूर्वकृत आहे दुर्घट जीवाला । अनंत उपायांला करितांही ॥ १ ॥
कितीही साधनें जरी आदरिलीं । थोटकींच भलीं होत जाणा ॥ २ ॥
आटापीट केला जरी या जीवाचा । तरी दुर्दैवाचा फेरा न चुके ॥ ३ ॥
सर्वांच्या पाठीसीं दैव हें लागलें । कोणा न सोडी भलें मोठ्यांनाही ॥४॥
ब्रह्मा विष्णु शिव यांसही बाधत । आधिक्यें वर्तत त्रिभुवनीं ॥ ५ ॥
किती पुण्यें करा व्रतेंही आचरा । तपश्चर्या सारा किती तरी ॥ ६ ॥
परि न प्रारब्धा जिंकवत कोणा । अभेद्य तें जाणा जैसें कांहीं ॥ ७ ॥

कोणा न चुकत जें जें आचरित । जीव होतो भ्रांत तेथें तरी ॥ ८ ॥
तापवी क्षोभवी प्राण्यांचें हृदय । कधीं न तें जाय शमोनीयां ॥ ९ ॥
ऐशीया उपाय एकचि दिसत । अनुभवा येत आचारिल्या ॥ १० ॥
तयाकडे लक्ष मुळिं न पुरवावें । भजत राहावें ईश्वराला ॥ ११ ॥
भजन करावें सोशीत राहावें । चित्त न क्षोभवावें कांहीं झाल्या ॥१२॥
भजनाचा रंग करिल तुज दंग । समर्थ अंतरंग बनविल ॥ १३ ॥
आघात सोशितां स्मरण राहिल । बनविल रंगेल हरि भजन ॥ १४ ॥
विनायक म्हणे श्रीहरितें गावें । चित्त रंगवावें भजनांत ॥ १५ ॥

( ४४७ )

## भक्तीभावाचा भुकेला

भक्तीपाशीं आहे देव । तेथें त्याचा प्रगट भाव ॥ १ ॥
भक्ती तेथें भगवद्भाव । तेथें आहे ब्रह्मानुभाव ॥ २ ॥
भक्ती सुख अनुपम । दिव्यरसाचें भाजन ॥ ३ ॥
रामकृष्ण हरी बोला । नाम घेत प्रेमें डोला ॥ ४ ॥
नामीं नाम घेत रहावें । नामामाजीच बसावें ॥ ५ ॥
नाम हेंचि सार कांहीं । अवलंबा लवलाहीं ॥ ६ ॥
बुद्धि प्रकाशित होईल । देवमूर्ति आविर्भवेल ॥ ७ ॥
विनायक म्हणे भजा । सर्वदा तो गुरु राजा ॥ ८ ॥

( ४४८ )

## भक्तीमाहात्म्य

भक्तीपाशीं सुधा आहे । दिव्य रसायण आहे ॥ १ ॥
भक्तीपाशीं ऋद्धि सिद्धि । भक्तीपाशीं असे समृद्धि ॥ २ ॥

म्हणोनि भजावें ईश्वरा । देईल कृपेचा आसरा ॥ ३ ॥
कांहीं झाल्या भजन सेवा । अमृताचा पूर्ण ठेवा ॥ ४ ॥
विनायक मागे भजन । यावें देवा अनुदिन ॥ ५ ॥

( ४४९ )

## दत्तछंद कां घ्यावा

दत्त दत्त ऐसा छंद लागो मना । करिल शोधना हृदयाच्या ॥ १ ॥
दत्तनामीं आहे सामर्थ्य अगाध । देईल नानाविध फळ तुज ॥ २ ॥
दत्तनाम आहे औषध रोगाला । नाशिल चिंतेला दत्तनाम ॥ ३ ॥
मति प्रकाशिल बोध उपजवील । भरोनी येईल हृदय तुझें ॥ ४ ॥
गाढ प्रेमा तुज देईल तें नाम । कल्याणाचें धाम नाम जाणा ॥ ५ ॥
नाम हा उपाय सुलभ मुक्तिचा । परम मंगलाचा मार्ग जाणा ॥ ६ ॥
इहपर तुज सद्गति देईल । नाम हें करिल तुज दत्त ॥ ७ ॥
दत्तमय होसी प्रत्यक्ष तूं दत्त । होईल जरी दत्तनाम ग्रहण ॥ ८ ॥
विनायक म्हणे दत्तनामामृत । राहावें सेवित परमादरें ॥ ९ ॥

( ४५० )

## दत्त छंद कां घ्यावा

स्तुति स्तोत्र गावें नामातें वंदावें । कीर्तन करावें दत्तजीचें ॥ १ ॥
दत्तगुण सदा गावत रहावें । दत्तचि करावें निजलक्ष ॥ २ ॥
सगुण रूप त्याचें हृदयांत ध्यावें । यश परिसावें बहुगुण ॥ ३ ॥
दत्तमय सदा होवोनी रहावें । दत्तचि पाहावें जग सारें ॥ ४ ॥

चित्ताचें स्फुरण दत्त बनवावें । प्रत्यय उठावे दत्तजीचे ॥ ५ ॥
ध्यान धारणादि सकळ योगसेवा । तया दत्तदेवा तोषवावा ॥ ६ ॥
दत्त परब्रह्म दत्त आत्माराम । दत्त पूर्णकाम कल्पतरू ॥ ७ ॥
विनायक म्हणे दत्त उपासना । पुरविल कामना तुझी सारी ॥ ८ ॥

( ४५१ )

## भक्तीमाहात्म्य

बुधवार ता० ३।१२।३०

अल्प जरी भक्ती असे मानवासीं । सहाय तूं होसी तरी दत्ता ॥ १ ॥
भजन वाढविसी आनुकूल्यें देसी । पुण्य जोडविसी निजभक्तां ॥ २ ॥
खंड न पडों देसी भय निवारिसी । विघ्नें तूं नासिसी गुरुराया ॥ ३ ॥
कृपेनें पाहसी कृपेनें रक्षिसी । क्षण न विसंबिसी निजदासां ॥ ४ ॥
प्रेमाचा भुकेला सदा तूं असती । भाव परीक्षिसी शुद्धाशुद्ध ॥ ५ ॥
तुझिया प्रेमाचें वेड ज्या लागलें । प्रेमांतचि भले रहाती ते ॥ ६ ॥
पानही प्रेमाचें भोजन प्रेमाच । सर्वचि प्रेमाचे विषय त्यां ॥ ७ ॥
ऐसीया भक्तांसीं घेवोनी नाचसी । कौतुक करिसी दत्तनाथा ॥ ८ ॥
निजभक्त कोठें ठेवूं ऐसें होई । कैसें उतराई व्हावें म्हणसी ॥ ९ ॥
निजभक्तांचा तूं ऋणिक होवोनी । भार निजमनीं वाहतोसी ॥ १० ॥
कैसें फेडूं ऋण याचें ऐसें होई । व्याज भरपाई साधेनाच ॥ ११ ॥
व्याजांतचि म्हणसी बुडोनि राहिलों । दिवाणा बनलों भजनानें ॥१२॥
एकमुष्टि पोहे सुदामा ब्राम्हणाचे । सेवितां प्रेमाचे तुज तृप्तता ॥ १३ ॥
मुद्दल ठेवोनी व्याजार्थ दिधली । सुवर्णाची भली नगरी त्या ॥ १४ ॥
ऐसें आहे तुझें कोवळें बा मन । जातोसी भुलोन उपकारें ॥ १५ ॥
विनायक म्हणे अणुहि भक्तीसीं । अनंत मानिसी दत्तात्रेया ॥ १६ ॥

( ४५२ )

# भक्ती भावाचा भुकेला

शुद्ध प्रेम तुज अर्पितां जीवानें । दास तूं तृप्तिनें त्याचा होसि ॥ १॥
परोपरी तया सेविसी अनंता । तुझी सहृदयता अनुपम ॥ २ ॥
पत्र पुष्पफळ कांहींही तुजला । धरोनि प्रेमाला अर्पितांच ॥ ३ ॥
सलगी घडते जीवा तुझेपाशीं । उशीर लाविसी मुळीं नच ॥ ४ ॥
भक्तीभावें तुज अर्पितां कांहींही । ढेंकर लवलाहीं देतोसी तूं ॥ ५ ॥
तृप्त झालों म्हणसी अपार त्या देसी। कैसें मी ऋणासी फेडूं म्हणसी॥६॥
ऐसा तूं कोमल सदय कृतज्ञ । तुजलागीं अज्ञ जाणतीना ॥ ७ ॥
खरा जिवलग खरा जिव्हाळ्याचा । खरा तूं प्रेमाचा एकजगीं ॥ ८ ॥
हांक देणारा तूं संकट काळांत । तुजला दृष्टांत दुजा नाहीं ॥ ९ ॥
वाटेल त्या स्थानीं वाटेल त्या काळीं । होसी वनमाळी प्रगट तूं ॥१०॥
जेथें तुझें नाम तेथें तुझें धाम । पावसी विश्राम भक्तांपाशीं॥ ११ ॥
भक्त तुझे देव तयां तूं पूजिसी । सेवक मान्सिी आपणांसीं ॥ १२ ॥
प्रिय नोहे रमा नोहे तें वैकुंठ । प्रिय मुक्त कंठ गाती तुज ॥ १३ ॥
अभिमान लाज सांडोनी भजती । तुझें यश गाती जे का संत ॥ १४ ॥
श्रवण करिती कथा कीर्तनाचें । चिंतन गुणांचें करिती जे ॥ १५ ॥
जयजयकार तुझा करित रहाती । तुझेंच वर्णिती महिमान॥ १६ ॥
तुझ्याठायीं रत वास तुझ्याठायीं। मिलिंद जे पायीं तुझ्या सदा॥ १७ ॥
त्याचेपाशीं नित्य वसतोसी देवा । रंग नवा नवा करितोसी ॥ १८ ॥
जें जें तुज देती तें तें प्रेमें खासी । उष्टेंही भाक्षिसी स्वभक्तांचें ॥ १९ ॥
देतील वसन शय्या जे देतील । भोग समर्पितील तुज जे का ॥ २० ॥
त्यांत सुखावसी बहुत मानिसी । कौतुक करिसी कितीतरी ॥ २१ ॥
आशाळभूत तूं सदा वर्ततोसी । निजभक्तांपाशीं दत्तराया ॥ २२ ॥
भक्त तुझे प्राण जीवनही भक्त । सदा अनुरक्त त्यांच्यापाशीं ॥ २३ ॥
जैसा कीं एखादा विषयी ।विषयासीं । धरि लंपटतेसी अनुबंध ॥ २४ ॥

तैसा देवा भक्ती लंपट वागसी । भक्तां न सांडिसी कांहीं झाल्या ॥२५॥
करोत ते स्तुति देवोत शिवीला । तुज अतृप्ताला मधुरचि ॥ २६ ॥
विनायक म्हणे भक्तानुरक्तदेव । त्याचा भक्तीभाव भक्तापाशीं ॥ २७ ॥

( ४५३ )

## आशीर्वचन मागणी

कार्य तुझें दत्ता जवळि पातलें । जयंतीचें भलें देवराया ॥ १ ॥
वार्षिक हें कार्य तुझिया प्रेमाचें । तुझ्या आवडिचें दत्तनाथा ॥ २ ॥
आम्हांकडोनियां करवोनी घेसी । आम्हां चोजवीसी बहुपरी ॥ ३ ॥
आम्हांसी पुढती करोनी तूं स्वयें । करिसी उपायें निजकार्य ॥ ४ ॥
निजकार्य भक्तां करवीं करवावें । चोज तें पहावें निजदृष्टी ॥ ५ ॥
ऐसें आहे तुझ्या मनिंचे हृद्गत । अनुभवा येत आम्हांलागीं ॥ ६ ॥
तोचि अनुभव देवा सिद्ध व्हावा । आम्हांसीं करावा प्रसाद त्वां ॥७॥
आशीर्वाद द्यावा कृपेचें वीचण । करा नारायण आम्हांवरी ॥ ८ ॥
सिद्ध करा कार्य आम्हां यश द्यावें । इष्ट पुरवावें आमुचें हें ॥ ९ ॥
विनायक म्हणे कार्यसिद्धि द्यावी । आम्हांला बरवी निजकार्यीं ॥१०॥

( ४५४ )

गुरुवार ता० ४।१२।३०

बळकट कांस घालोनी झटावें । देवकार्यीं व्हावे धीरवर ॥ १ ॥
किती विघ्नें आलीं प्रसंग लोटले । डगमगणें भलें योग्य नोहे ॥ २ ॥
धैर्य हृदयांत धरोनी वागावें । भजन साधावें देवाजीचें ॥ ३ ॥
भजनाचे साठीं तुजवर देह । यांत न संदेह निश्चयानें ॥ ४ ॥
जोंवरी आयुष्य तोंवरि भजावें । सेवित असावें देवपदां ॥ ५ ॥
उठतां बसतां कांहींही करितां । देवासीं भजतां न विरमावें ॥ ६ ॥
अखंड चालावें व्रत भजनाचें । यश सदा वाचे गावें प्रेमें ॥ ७ ॥
विनायक म्हणे दृढ हा निर्धार । ठेवावा साचार सुजन हो ॥ ८ ॥

( ४५५ )

भजन करितां देहा विसरावें । सकळ सांडावें इतर ध्यान ॥ १ ॥
संसार चिंतन मुळिंच त्यजावें । देवा आठवावें हृदयांत ॥ २ ॥
भजनासीं गातां रंगोनियां जावें । देवीं मिसळावें आपणांसीं ॥ ३ ॥
देवमय व्हावें देवासीं पहावें । देहावरी नसावें अणुमात्र ॥ ४ ॥
भरून हृदय आपुलें आणावें । दाटोनियां यावें प्रेमरसें ॥ ५ ॥
प्रेमसागरांत डुबकत रहावें । बाहेर न पडावें कांहीं झाल्या ॥ ६ ॥
विनायक म्हणे प्रेमचि बनावें । देवा सांठवावें आपणांत ॥ ७ ॥

# दत्त-जयंती

# विषय

| | प्रबंध-नं० |
|---|---|
| आज्ञा मागणी | ४५६,४५७,४६०,४६८,४७१ |
| देवाकडे मागणें | ४५८ |
| कथा आरंभिण्यास आज्ञा मागणी | ४५९ |
| अनसूयेचा पाळणा | ४६१,४७५,४७६ |
| गणेशस्तवन | ४६२ |
| शारदा ,, | ४६३ |
| कुलेश ,, | ४६४ |
| सुरेश ,, | ४६५ |
| गुरुजन ,, | ४६६ |
| आशीर्वाद मागणी | ४६७ |
| विजय याचना | ४६९ |
| प्रसादग्रहणार्थ आज्ञा मागंणी | ४७० |
| दत्तजन्म | ४७२ |
| अनसूयेचा आनंद | ४७३ |
| बाल दत्ताचे विलास | ४७४ |
| कृतज्ञता वचन | ४७७ |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि ...

# दत्तजयंती

## ( ४५६ )

## आज्ञा मागणी

सोमवार ता. १६।१२।२९ (पहांटेस पूजेपूर्वीं)

आज्ञा द्यावी महाराज । आपुल्या पुजेचीये काज ॥ १ ॥
पादुकांतें उचलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥
उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा द्यावी दत्तात्रेया । आज्ञा द्यावी अत्रितनया ॥ ४ ॥
जन्मदिन आज तुमचा । आम्हां दासांसीं सणाचा ॥ ५ ॥
आम्हीं बहु आनंदलों । तुजपाशीं देवा आलों ॥ ६ ॥
उत्कर्ष करा निजभक्तीचा । हेतु पुरवावा आमुचा ॥ ७ ॥
आम्हीं तुझे पददास । आसक्त बहु भजनास ॥ ८ ॥
भजनरंग येथें करवा । श्रीगुरुराया दत्त देवा ॥ ९ ॥
संसाराचा क्षण विसर । पडूं दे आम्हां गुरुवर ॥ १० ॥
पुण्यदिन हा आजचा । आमुचा तो जिव्हाळ्याचा ॥ ११ ॥
आज कृतकृत्य होणें । भवांबुधि तरुनी जाणें ॥ १२ ॥
दिवस आज हा दैवाचा । देवा आमुच्या भाग्याचा ॥ १३ ॥
तुझ्या कृपें पातलासे । म्हणुनि तूज प्रार्थितसें ॥ १४ ॥
साक्षात्कारें प्रगट होईं । माझ्या हातीं पूजा घेईं ॥ १५ ॥
भजनाचा करी सुकाळ । भजन व्हावें बहु प्रेमळ ॥ १६ ॥
आनंदोनि वृत्ति जावी । अपुल्या ठायीं ती रमावी ॥ १७ ॥

समरस चित्त व्हावें । इतर आम्हां नावडावें ॥ १८ ॥
आज मुक्ततेचा दिन । प्रकाम करूं आज भजन ॥ १९ ॥
देवा नाचूं तुजपुढतीं । पालटेल अंतर स्थिती ॥ २० ॥
पाहतां पाहतां दत्त बनूं । काय करूं मी वर्णनू ॥ २१ ॥
दिसतसे मजला रंग । आज कृपेचा कीं योग ॥ २२ ॥
वैकुंठ येथें गमणार । देव आम्हां भेटणार ॥ २३ ॥
अपूर्व आज दिसणार । भाग्य येथें लोटणार ॥ २४ ॥
विजयश्रीची माळ गळां । घालसील माझ्या स्नेहाळा ॥ २५ ॥
माझे ठायीं संचरणार । वैभवाचा होय विस्तार ॥ २६ ॥
स्थान जागृत होणार । स्वामि येथें प्रगटणार ॥ २७ ॥
पुण्याईचा आज दिन । अपूर्व ज्याचें महिमान ॥ २८ ॥
देवभेटीं झुलणार । देव भक्ता भेटणार ॥ २९ ॥
अपूर्व हा समारंभ । होणार आहे पद्मनाभ ॥ ३० ॥
दिन आज विजयाचा । दिन आज प्रसादाचा ॥ ३१ ॥
दिन आज महासिद्धीचा । दिन आज उद्धाराचा ॥ ३२ ॥
परब्रह्म प्रकाशेल । आमुच्या अंतरीं भरेल ॥ ३३ ॥
आज रंग आहे प्रेमाचा । आज रंग आहे कृपेचा ॥ ३४ ॥
आज रंग मान्यतेचा । आज रंग अनुग्रहाचा ॥ ३५ ॥
आज रंग संचाराचा । आज रंग मीलनाचा ॥ ३६ ॥
अपूर्व सिद्धीचा हा दिन । आज असे दयाघन ॥ ३७ ॥
केलें पुण्याहवाचन । दावा प्रत्यक्ष करून ॥ ३८ ॥
सत्यतेसीं माझी बोली । आणा तुम्हीं दत्ता भली ॥ ३९ ॥
प्रेरणेनें मी बोललों । तुम्हांठायीं विश्वासलों ॥ ४० ॥
माझी वाणी सत्य करा । तुमचीच ती उदारा ॥ ४१ ॥
पुरवावी माझी आळी । प्रत्यक्ष आज वनमाळी ॥ ४२ ॥
विनायका आज्ञा व्हावी । आतां तुमची बरवी ॥ ४३ ॥

( ४५७ )

## आज्ञा मागणी

प्रथम पूजन हें देवा । याचा आरंभ करवा ॥ १ ॥
प्रत्यक्ष प्रगटोनि घेणें । उपचार, वर देणें ॥ २ ॥
देणें मज आशीर्वचन । श्रीगुरुराज दयाघन ॥ ३ ॥
तुमच्या चरणींचा दास । धरिली असे तुझी कांस ॥ ४ ॥
तरी आज्ञा आतां द्यावी । मज अनुज्ञा मिळावी ॥ ५ ॥
पूजेलागिं आरंभितों । कृपाप्रसाद मागतों ॥ ६ ॥
तरी नाथा कृपा करा । मजवरी परमोदारा ॥ ७ ॥
मज आज्ञापन करा । मजलागीं पात्र करा ॥ ८ ॥
कृपादृष्टीं मज पाहोनी । मज पावन करोनी ॥ ९ ॥
पूजेसाठीं घ्यावा दास । अधिकृत करा यास ॥ १० ॥
विनायक शरण चरणीं । आज्ञा द्यावी चक्रपाणी ॥ ११ ॥

( ४५८ )

## देवाकडे मागणें

पुजेनंतर

जन्मदिन तुझा आम्हां आनंदाचा । पुढती न वाचा बोलूं शके ॥ १ ॥
काय बोलणार वर्णन करणार । तुज जाणणार सर्वज्ञाला ॥ २ ॥
हृदय भावना तुजला कळती । अंतरांत स्मृति तुझी असें ॥ ३ ॥
सर्व अंतराचा तूंच धनी स्वामी । तुजला काय मी सांगूं देवा ॥ ४ ॥
हृदय आनंदलें मन विकासलें । काय सांगूं भलें तुज आतां ॥ ५ ॥
आनंदाचा धनी मूर्ति आनंदाची । स्थिति हृदयाची जाणसीं तूं ॥ ६ ॥
हृदयींचा काम तूज असे ठावा । माझा तो पुरवा मागणें हें ॥ ७ ॥

आनंदाचा दिन दिन हा सणाचा । आनंदची साचा आम्हांलागीं॥८॥
आनंद प्रसंगीं धरोनियां पाय । तुज गुरुराय मागतों मी ॥ ९ ॥
यावें वरदान उत्कर्ष स्थानाचा । विजय भक्तीचा सर्वकाळ ॥ १० ॥
आम्हीं तुझे नर अमुचा अभिमान । तुज दयाघन धरणें आहे ॥ ११ ॥
आम्हां विजयी करीं सर्वत्र तूं नाथा । श्रीगुरुसमर्था दत्तात्रेया ॥ १२ ॥
धर्माचा विजय विजय भक्तीचा । तैसा उपासनेचा विजय गा ॥ १३ ॥
विजय कीर्तनाचा विजय पूजनाचा । विजय भजनाचा नित्य असो १४
दुष्टांचें दलन अधर्माचा नाश । व्हावा जगदीश कृपेनें कीं ॥ १५ ॥
साधु संरक्षण तुमच्या कृपेनें । सदा होत जाणें मागणें हें ॥ १६ ॥
जागृत हें स्थान नित्यची ठेवावें । आम्हांसीं लावावें सन्मार्गाला॥१७॥
प्रत्यय नित्य यावा नाथ जागृतिचा । आम्हांसीं सुखाचा अनुभव॥१८॥
सदा तुझी कृपा असो आम्हांवरी । सार्थक हो तरी देहाचें कीं ॥ १९ ॥
नित्य प्रसन्न तूं आम्हांसीं वरद । असावें सौख्यद निजकृपें ॥ २० ॥
विनायक म्हणे माझा भरंवसा । तुज जगन्निवासावरी आहे ॥ २१ ॥

( ४५९ )

# कथा आरंभिण्यास आज्ञा याचना

सायंकाळ; जन्मकथेपूर्वीं.

आज्ञा यावी मज कथा आरंभाया । तुमच्या मी पायां शरण आहें॥१॥
लोटांगण घेतों पदातें वंदितों । प्रसाद मागतों आशिर्वाद ॥ २ ॥
प्रथम चरित्र तुमचें बोलावें । प्रेमानें तें गावें इच्छा ऐसी ॥ ३ ॥
याचसाठीं नाथा अनुज्ञा मज देणें । अधिकृत करणें मजलागीं ॥ ४ ॥
देवा माझे ठायीं करणें संचार । मज गुरुवर तारणें कीं ॥ ५ ॥
करुनि संचार वदवा चारित्र । गुरु अवधूत अद्भुत जें ॥ ६ ॥
तुझी जन्मकथा वर्णूनीयां धन्य । सज्जनास मान्य होईन मीं ॥ ७ ॥
वदवावें निज चरित्र माझे वाचे । अमृत-रसाचें भाजन जें ॥ ८ ॥
विनायक आहे आपुला म्हणिवला । श्रीगुरुदयाळा दत्तात्रेया ॥ ९ ॥

( ४६० )

## आज्ञा मागणी

आज्ञा द्यावी महाराज । आपुल्या पूजेचीये काज ॥ १ ॥
पादुकांतें उचलावया । स्नानादिक त्यां घालाया ॥ २ ॥
उपचार समर्पाया । सकळ सोपस्कार व्हाया ॥ ३ ॥
आज्ञा द्यावी दत्तात्रेया । आज्ञा द्यावी अत्रितनया ॥ ४ ॥
सेवा घडवा मजलागीं । धन्य करायासीं जगीं ॥ ५ ॥
माझ्या हातीं सेवा घ्यावी । माझ्यावरी कृपा करावी ॥ ६ ॥
आशीर्वाद मज द्यावा । जयजयकार माझा व्हावा ॥ ७ ॥
विनायक तुझा दास । यास द्यावें कीं आज्ञेस ॥ ८ ॥

( ४६१ )

## अनसूयेचा पाळणा

पूजेनंतर

पुत्रवती झाली अनसूयामाता । हर्ष तिच्या चित्ता किती सांगूं ॥ १ ॥
खेळविते बाळ चुंबन बहु घेते । काळ घालविते बाळापाशीं ॥ २ ॥
छंद कुमाराचा तिजला लागला । अनुपम भला वानूं किती ॥ ३ ॥
क्षण विसंबेना निज बाळकाला । तिचीये प्रेमाला तोड नाहीं ॥ ४ ॥
योगीश्वर बाळ योग-चेष्टा करी । नाना खेळ करी माते पुढें ॥ ५ ॥
माता न्हावूं घाली परम प्रेमानें । तेणें चिखलानें मळावें कीं ॥ ६ ॥
मातींत कीं जावें निजांग भरावें । पुन्हां प्रक्षाळावें मातेनें कीं ॥ ७ ॥
पुन्हां पुन्हां पुन्हां त्याच चेष्टाकरी । पुरवाया तरी हौस तिची ॥ ८ ॥
बाळ खेळवीन कडेसीं घेईन । लाड पुरविन ऐशी आशा ॥ ९ ॥
लेंकुरवाळी म्हणूनी मिरवीन जगीं । हेतु अंतरंगीं धरिला जो ॥ १० ॥

हेतु तिचा तैसा पुरवाया कारण। घेई बाळपण कौतुकानें ॥ ११ ॥
योगेश्वर प्रभु त्यासी जन्म कैंचा। भाव वत्सलतेचा दाखवीत ॥ १२ ॥
मातेपुढें झाला असे स्वयें बाळ। पाडितसे हाल तिचे जाणा ॥ १३ ॥
रड घ्यावी बहु मुळीं न थांबावें। स्तना न लावावें मुळीं मुख ॥ १४ ॥
स्तन घालीतां मुखीं मुळीं न लुचावें। रडत सुटावें ऐसें करी ॥ १५ ॥
माता औषधातें योजी बाळाप्रती। रडणें निश्चिती थांबेनाच ॥ १६ ॥
अधिकचि चळे कांहीं केल्या न वळे। उपाय न चाले मातेचा कीं ॥ १७ ॥
घेत कडेवरी घेत खांद्यावरी। हातामध्यें धरी हंसवित ॥ १८ ॥
कांहीं केल्या बाळ उगी तें राहिना। चुटपुट मना तिच्या लागे ॥ १९ ॥
मग दृष्ट काढी त्या जीवन्मुक्ताची। हौस अनसूयेची पुरवीत ॥ २० ॥
दावीत बाळपण बाळ लीला करी। स्वामि नरहरी दत्तनाथ ॥ २१ ॥
कांही केल्या जेव्हां मुळींच राहीना। मांडीतसे गाना अनसूया ॥ २२ ॥
कौतुक देवासीं तेंच थोर झालें। जरा उगी राहिले नरहरी ॥ २३ ॥
तों तों अधिक ताना माता छेडूं लागे। भक्तानुवर्ति वागे जनार्दन ॥ २४ ॥
गीत गातां गातां डोळे मिटूं लागे। झोंपेचीया संगें नटे देव ॥ २५ ॥
मग झटदिशीं पाळण्यांत घाली। माता ते रंगली शुश्रूषेंत ॥ २६ ॥
निज निज बाळा श्रमलास फार। सकळांचा भार तुझे शिरीं ॥ २७ ॥
त्रिभुवनपति तुज न विश्रांति। हांक तुज मारिती भक्तलोक ॥ २८ ॥
भक्तांचें कौतुक पुरवाया कारण। तुज होतो शिण माधवातें ॥ २९ ॥
निज निज आतां बाळा निज निज। तुज नाहीं निज-पर कांहीं ॥ ३० ॥
सकळाचा तूंच तुझेंच सकळ। निज घननीळ निज आतां ॥ ३१ ॥
मन कामधंदा करूं दे आतां कांहीं। निजपुत्रा पाहीं निज आतां ॥ ३२ ॥
प्रेमें आलापित मधुर गीत गात। जो जो रे म्हणत जो जो जो जो ॥ ३३ ॥
माझ्या बाळासम दुजा नाहीं कोणी। बोलतसे वाणी कोमल ती ॥ ३४ ॥
माझा बाळ असे बहुत शहाणा। मोत्यांचा कीं दाणा म्हणतसे ॥ ३५ ॥
कधीं प्राकृत म्हणे कधीं ईश म्हणे। ऐसें गाई गाणें अनसूया ॥ ३६ ॥
लाडक्या रे माझ्या निज आतां बाळा। तुज लडिवाळा अंगाई रे ॥ ३७ ॥
निज निज बाळा मजसीं सुखाचा। एकला तूं साचा असशीं कीं ॥ ३८ ॥
बहिश्चर प्राण लाडक्यारे मज। तुझे काय चोज सांगुं बाळा ॥ ३९ ॥

माझ्या हृदयाची मूर्त तूं विश्रांति । काय तूज प्रती वानुं सांग ॥ ४० ॥
गुणाचें माझें बाळ किती वानुं गुण । भरुनी अंतःकरण येत असे ॥४१॥
बाळ माझें रत्न मजला पाहिजे । कधीं न देईजे इतरांसीं ॥ ४२ ॥
सोन्या माझ्या बाळा रुप्या माझ्या बाळा। निज लाडिवाळा निज निज४३
आळवित ऐसी परोपरी माता । पाळणा हालवितां सुखावली ॥ ४४ ॥
जो जोरे बाळा जोजो जोजो जोजो जोजो । तुझें तुज साजो बाळपण ४५
ऐसी निजवित अनसूया माता । कौतुक भगवंता तेंच थोर ॥ ४६ ॥
डुलक्या देई पुन्हां पुन्हां जागा होई। थांवतां जागा होई बाळक तो ॥४७॥
पुन्हां थांबोनियां पाळणा हालवी । बहु समजावी परोपरी ॥ ४८ ॥
वत्सल ती माता सुत भगवान । काय मी वर्णन करूं त्यांचें ॥ ४९ ॥
धन्य भगवान प्रेमाचा सागर । अर्थ पुरविणार तोच धन्य ॥ ५० ॥
मातेचें कौतुक पुरवाया कारण । घेतो अज्ञानपण दत्तात्रेय ॥ ५१ ॥
अंतरीं शाहणा बाहेर अज्ञान । मातेस गोवून ठेवीयेलें ॥ ५२ ॥
हाल पाडी तिचे हट्ट घेवोनियां । तया देवराया काय वानूं ॥ ५३ ॥
धन्य अनसूया धन्य तिचें प्रेम । बाळ पुरुषोत्तम जाहला तो ॥ ५४ ॥
भगवान स्वयें झाला असे बाळ । दैत्यांचा तो काळ कृतान्तचि ॥५५॥
तोच बाळपणें होतसे भुकेला । आईच्या मुखाला पाही दीन ॥ ५६ ॥
दीनवाणा पाही मुद्रा केंवीलवाणी । नाटकी चक्रपाणि किती सांगुं ५७
माझें लाडकें हें भुकावलें फार । कळवळे अंतर मातेचें कीं ॥ ५८ ॥
कळवळुनी येई मुखीं घाली स्तन । पदरीं झांकून बाळा घेई ॥ ५९ ॥
काय प्रेमा आतां वर्णावा येथिंचा। थोकडी हे वाचा माझी होत॥६०॥
भगवंताची क्षुधा मातेचीये स्तनें । शमे दुग्धपानें कौतुक हें ॥ ६१ ॥
धन्य धन्य धन्य धन्य माता लेकुरें । शब्द न दुसरे फुटती मज ॥ ६२ ॥
याहुनी काय म्हणुं काय उपमा देऊं । कैसें तरी गाऊं दत्तयश ॥ ६३ ॥
प्रेमाची हे मूर्ति सिंधु हा दयेचा । सुरतरु कामाचा दत्तात्रेय ॥ ६४ ॥
इच्छीलें पूर्ण होय त्याची थोर कृपा । हरितसे तापा भक्ताचीया ॥६५॥
आम्हीं धन्य होऊं गाउनी बाळलीला । म्हणुनी वर्णनाला करितसें॥६६
विनायक म्हणे प्रेमाचा सुकाळ । अनसूया बाळ सेवितां हा ॥ ६७ ॥

( ४६२ )

## गणेशस्तवन

शुक्रवार ता० ५।१२।१९३०

करुनी तुजला नमन । करितों मी आवाहन ॥ १ ॥
गुरुकार्यालागीं यावें । कार्य सिद्ध हें करावें ॥ २ ॥
तुमच्यिया प्रसादानें । तैसें कृपेच्या दृष्टिनें ॥ ३ ॥
सकळ विघ्नें निवारावीं । आम्हांलागीं सिद्धी यावी ॥ ४ ॥
प्रथम तुमचें स्मरण । ऐसें आहे शास्त्रप्रमाण ॥ ५ ॥
तैशाच रीति तुम्हां स्मरतों । चरणीं मस्तक ठेवितों ॥ ६ ॥
ऋद्धि सिद्धि सर्व याव्या । वियेसह प्रगटाव्या ॥ ७ ॥
मयूरासह देवी यावी । कार्य महत्वासीं चढवी ॥ ८ ॥
सांग करावें हें कार्य । तुम्हीं येथें गणराय ॥ ९ ॥
म्हणोनि विडा समर्पितों । निर्विघ्नता मी मागतों ॥ १० ॥
कृपा प्रसाद करावा । निजदास अनुग्रहावा ॥ ११ ॥
विनायकाची प्रणति । सदा आहे चरणांप्रति ॥ १२ ॥

( ४६३ )

## शारदास्तवन

नमन माझें शारदेला । मूर्त देवी विया तिजला ॥ १ ॥
दत्त यश गात सदा । दत्तभक्तां जी वरदा ॥ २ ॥
दत्ता पुढें नाचतसे । चरित्र जी का वर्णीतसे ॥ ३ ॥
मयूरासना नमितों देवी । येथें प्रगटोनि यावी ॥ ४ ॥
करावा येथें जयजयकार । कीर्तनाचा पुरस्कार ॥ ५ ॥
भजनरंग येथें यावा । दत्त देव संतोषावा ॥ ६ ॥

ऐसें व्हावें महिमान। म्हणोनि करितों नमन ॥ ७ ॥
तरी माये वरद होई। आशिर्वाद मज देई ॥ ८ ॥
विनायक पददास। याची पुरवावी आस ॥ ९ ॥

( ४६४ )

## कुलेशस्तवन

नमितों मी कुलदेवांसीं। सिद्धी मागतों कार्यासीं ॥ १ ॥
मज प्रसन्न होवोनी। स्वयें येथें प्रगटोनी ॥ २ ॥
दह्य-कार्य संपादावें। साहाय्य मजलागीं द्यावें ॥ ३ ॥
विनायक धरितो चरण। मागतसें आशीर्वचन ॥ ४ ॥

( ४६५ )

## सुरेशस्तवन

नमन माझें सुरवरा। जे का आले देवागारा ॥ १ ॥
गुरुकार्यासाठीं आले। जे का देव येथें भले ॥ २ ॥
तयांसीं मी नमितसें। साहाय्य त्यांचें मागतसें ॥ ३ ॥
सकाळांनीं साहाय व्हावें। दत्तकार्य संपादावें ॥ ४ ॥
म्हणोनि नमितों प्रेमेंसीं। सकळही देवतांसीं ॥ ५ ॥
विनायकासीं वरद। देवोत कीं आशीर्वाद ॥ ६ ॥

( ४६६ )

## गुरुजनस्तवन

नमन माझें मान्यवंतां। जे का वन्द्य मज तत्वतां ॥ १ ॥
गुरुजन जे का मज। राखोत ते माझी लाज ॥ २ ॥

देवोत मज आशीर्वाद । होवोनियां मज वरद ॥ ३ ॥
म्हणोनि नमित पदांसीं । धरोनियां शुद्ध प्रेमासी ॥ ४ ॥
सर्व भावें आहे शरण । करा माझें संरक्षण ॥ ५ ॥
विनायकाची ही आस । कार्य न्यावें हें सिद्धीस ॥ ६ ॥

( ४६७ )

# आशीर्वाद मागणी

नमन माझें वासुदेवा । माझ्या जींवींचीया जीवा ॥ १ ॥
नमन माझें गुरुदेवा । प्रगटवा कृपाभावा ॥ २ ॥
नमन माझें पूर्णानंदा । सद्गुरु पूर्ण श्रीवरदा ॥ ३ ॥
नमन माझें दत्तात्रेया । नमन माझें गुरुराया ॥ ४ ॥
त्रयमूर्ति गुरुनाथ । स्वामि जो का असे समर्थ ॥ ५ ॥
त्याचें कार्य आज असे । त्यानें आज्ञा केली असे ॥ ६ ॥
म्हणोनि स्मरोनियां पाय । मागतसें मी साहाय्य ॥ ७ ॥
प्रगट व्हावें गुरुदयाळा । प्रगट व्हावें श्री स्नेहाळा ॥ ८ ॥
आशीर्वाद मज द्यावा । निजदास अंगिकारावा ॥ ९ ॥
साहाय्य मजलागीं व्हावें । देवमय प्रगटावें ॥ १० ॥
सकळ पूर्णता साधावी । अपूर्णता मुळिं नसावी ॥ ११ ॥
व्हावा भक्ति-परिपोष । जेणें तुम्हांसीं संतोष ॥ १२ ॥
विघ्नें सर्व दूर व्हावीं । कल्याणेंच उभारावीं ॥ १३ ॥
तुमच्या कृपें वासुदेवा । रंग चढो या उत्सवा ॥ १४ ॥
कार्य तुमचें मीहि तुमचा । शुभाचार व्हावा साचा ॥ १५ ॥
सकळ शुभचि घडावें । अशुभ सर्व तें टळावें ॥ १६ ॥
सहजीं घडेल जें कांहीं । शुभचि व्हावें देवा पाहीं ॥ १७ ॥
अनुकूल देव जरी । शुभचि होतसे तरी ॥ १८ ॥
म्हणोनी मज अनुकुल । तुम्हीं व्हावें गुरुदयाळ ॥ १९ ॥
साहाय्य सकळ मज द्यावें । आपण स्वयें प्रगटावें ॥ २० ॥

प्रगटपणें सेवा घ्यावी । कृपादृष्टीं अनुग्रहावी ॥ २१ ॥
न्यून कांहीं न पडावें । सर्व सोपस्कार व्हावें ॥ २२ ॥
प्रेम झगटावें अंगीं । दंग आम्हीं व्हावें रंगीं ॥ २३ ॥
प्रेमरूप आम्हीं व्हावें । प्रेमचि बनोनी वागावें ॥ २४ ॥
शुद्धान्तःकरणानें सेवा । तुझी घडो दत्तदेवा ॥ २५ ॥
कामक्रोध अभिमान । षड्रिपु जावोत लोपुन ॥ २६ ॥
सकळ वृत्ती शांत व्हाव्या । मुळीं न केव्हां त्या उठाव्या ॥ २७ ॥
जेथें जेथें वृत्ति उठे । अनुग्रहण करा मोठें ॥ २८ ॥
वृत्ति सकळ शुद्ध व्हावी । निश्चळताचि साधावी ॥ २९ ॥
चंचळ मुळिं न व्हावें मन । सदा असो स्थिरासन ॥ ३० ॥
कार्य करा विजयाचें । कार्य करा मंगलाचें ॥ ३१ ॥
कार्य करावें प्रेमाचें । तैसें शुद्धभाव भक्तीचें ॥ ३२ ॥
सत्वभाव सर्व उठावे । चित्तपूर्ण विकासावें ॥ ३३ ॥
आनंदाचा भर यावा । आनंदरूप उत्सव व्हावा ॥ ३४ ॥
ऐसी करावी योजना । श्रीगुरुराया दयाघना ॥ ३५ ॥
यावा मज आशीर्वाद । होवोनियां मज वरद ॥ ३६ ॥
मजलागीं यावा धीर । म्हणोनि करा साक्षात्कार ॥ ३७ ॥
आपण स्वयें प्रगटावें । मज दर्शनातें यावें ॥ ३८ ॥
अपराध क्षमा व्हावे । माझे दोष मनीं नाणावे ॥ ३९ ॥
दोष माझे परिहरावे । निर्दोष मज करावें ॥ ४० ॥
माझ्या ठायीं संचरावें । परमहित माझें साधावें ॥ ४१ ॥
तुम्हांविण मज आश्रय । नाहीं नाहीं गुरुराय ॥ ४२ ॥
माझा सकळ आधार । तुम्हीं एक जगदीश्वर ॥ ४३ ॥
सकळ माझी जी पुण्याई । करा ऐसें उदया येई ॥ ४४ ॥
आनंदांत मज ठेवा । प्रगटवोनी निज वैभवा ॥ ४५ ॥
नाम वासुदेवानंद । नाम तुमचें पूर्णानंद ॥ ४६ ॥
हेचि माझी कीं प्रार्थना । तुम्हांपाशीं दयाघना ॥ ४७ ॥
नाम तुमचें योगानंद । तरी करा माझा आनंद ॥ ४८ ॥
लोटांगण मी घालितों । काकुळती बहु येतों ॥ ४९ ॥

दीन अज्ञान मी प्राणी । क्षमा करा मज जाणोनी ॥ ५० ॥
मायबाप माझा तूंच । म्हणोनि मज कृपा कराच ॥ ५१ ॥
कोण असे माझा आधार । जगतांत विश्वेश्वर ॥ ५२ ॥
मजसाठीं कळवळणारा । तुजविण कोण दातारा ॥ ५३ ॥
मजसाठीं पाझरणारा । कोण सांग तूं उदारा ॥ ५४ ॥
तुझे ठायीं मी रंगावें । तुझे ठायीं लीन व्हावें ॥ ५५ ॥
तुझे ठायीं सुखावतों । विश्रांतितें मी चाखितों ॥ ५६ ॥
माझ्या जीवासीं विश्वास । तुझाच असे एक खास ॥ ५७ ॥
कृपा करा करा दयाळा । कृपा करा करा स्नेहाळा ॥ ५८ ॥
तुज सर्व ठावें आहे । तरी पाव लवलाहें ॥ ५९ ॥
येईं येईं येईं दत्ता । प्रगट करीं येथें सत्ता ॥ ६० ॥
बोलणें माझें फोल न व्हावें । सत्यत्वासीं तें आणावें ॥ ६१ ॥
करा येथें साक्षात्कार । लोळतों मी चरणांवर ॥ ६२ ॥
मृदुल चरण तुमचे । धरिले मी देवा साचे ॥ ६३ ॥
भजेन पुजीन तयांसीं । श्रीगुरुराया मी विशेषीं ॥ ६४ ॥
चटक मज लावियेली । व्यसनें मज जडविलीं ॥ ६५ ॥
तुझ्या भजनाचीं देवा । तींच आतां पुढें चालवा ॥ ६६ ॥
मुक्त कंठ मी बोलतों । हृदयींचें मी सांगतों ॥ ६७ ॥
प्रगट तरी दत्तनाथा । प्रगट तरी श्री समर्था ॥ ६८ ॥
प्रगट तरी वासुदेवा । प्रगट तरी गुरु देवा ॥ ६९ ॥
प्रगट तरी पूर्णानंदा । प्रगट तरी गुरुवरदा ॥ ७० ॥
सांग कार्य हें करवा । देवा माझा हेतु पुरवा ॥ ७१ ॥
विनायक पदादास । याच्या पुरवा आशेस ॥ ७२ ॥

( ४६८ )

## आज्ञा मागणी

आज्ञा द्यावी मज आतां महाराज । पूजेचिया काज कृपावंता ॥ १ ॥
जयंतीचा दिन आज प्राप्त झाला । आनंदाचा भला गुरुनाथा ॥ २ ॥

प्रथम पूजेसीं आरंभ कराया । मज गुरुराया आज्ञा यावी ॥ ३ ॥
सकळ हें कार्य निर्विघ्न साधाया । माझा पूर्ण व्हाया विजयचि ॥ ४ ॥
जयजयकार व्हाया देवा या स्थानाचा । तैसा उपासनेचा दत्तात्रेया॥५॥
प्रगटपणा येथें नाथजी धरावा । कार्यभाग व्हावा पूर्णसिद्ध ॥ ६ ॥
कार्य साधवावें आपण तोषावें । आपण प्रगटावें याच साठीं ॥ ७ ॥
हीन दीन आहें तुम्हांसीं शरण । कृपेचें वीक्षण करा नाथा ॥ ८ ॥
परिपूर्ण कृपा मजवरी व्हावी । अलक्ष्मी नासावी माझी दत्ता ॥ ९ ॥
सर्व बळ यावें देवा मजलागीं । धन्य मज जगीं करा दत्ता ॥ १० ॥
प्रथम हे पूजा करवोनी घ्यावी । मजवरी व्हावी कृपादृष्टी ॥ ११ ॥
कार्य करवावें पूजेतें साधावें । सोपस्कार व्हावें दयासिंधु ॥ १२ ॥
तुम्हांसम तुम्हीं उपमा तुम्हां नाहीं । पावा लवलाहीं कृपानिधे ॥ १३ ॥
सकळ क्षमा व्हावी माझे अपराधां । आवरावें क्रोधा दत्त नाथा ॥१४॥
दत्त दिगंबर सांवळें स्वरूप । हृदयींचा ताप परिहारी ॥ १५ ॥
विनायक म्हणे करवोनी घ्यावी । पूजा आदरावी कृपावंता ॥ १६ ॥

( ४६९ )

## विजययाचना

### प्रथम पूजेनंतर

विजय भजनाचा विजय स्थानाचा। तैसा उपासनेचा विजय व्हावा ॥१॥
विजय व्हावा तुझ्या नामधारकाचा । विजय भक्तांचा व्हावा सदा ॥ २ ॥
विजय भक्तीचा विजय भावाचा । विजय धर्माचा होत राहो ॥ ३ ॥
विजय साधूंचा विजय संतांचा । विजय मुनिंचा सदा होवो ॥ ४ ॥
यति तापसी जे किंवा जे संन्यासी। त्यांच्या विजयासीं साधीं नित्य॥५॥
सत्कर्मशील जे का तयांचा विजय। सत्कुलाचा विजय होवो नाथा॥६॥
कुलशीलादिकां विजय असावा । विजय चांगल्याचा सदा असो ॥ ७ ॥
भल्या माणसांचा विजय असावा। विजय ब्राह्मणांचा सदा असो ॥८॥

विजय गाईंचा विजय वेदांचा । विजय शास्त्रांचा सदा असो ॥ ९ ॥
विजय स्मृतींचा श्रौत स्मार्ताचारांचा। विजय भागवतांचा सदा असो १०
विजय वैष्णवांचा हरिच्या भक्तांचा। तैसा देवभक्तांचा विजय होवो११
कथापुराणांसीं वाचिती पढती । विजय तयांप्रति सदा यावा ॥ १२ ॥
जीं जीं स्थानें असती द्विजादि देवांचीं। स्थानें जीं भक्तिचीं असती जगीं१३
विजय तयांचा होवोनी राहूं दे। जय दुमदुमुंदे सद्धर्माचा ॥ १४ ॥
तुझीया स्तुतींचा तुझिया स्तोत्रांचा। विजय असो साचा सर्वत्रचि ॥१५॥
तुझिये दासांचा तुझे सेवकांचा । विजय असो साचा सर्वत्रचि ॥ १६ ॥
विनायक म्हणे मजला विजय । यावा दत्तात्रेय अद्भुतचि ॥ १७ ॥

( ४७० )

# प्रसादग्रहणार्थ आज्ञा मागणी

प्रसादग्रहणा आतां आज्ञा यावी । आमुचीं निरसावीं रोगभयें ॥ १ ॥
उच्छिष्ट भोजन आम्हां प्राप्त व्हावें। यज्ञशिष्टबरवें जें का नाथा ॥ २ ॥
तरी आज्ञा यावी प्रसाद सेवाया । जगीं धन्य व्हाया दत्तात्रेया ॥ ३ ॥
प्रसाद देवोनी लावावें सेवेला । पुढील कार्याला गुरुनाथा ॥ ४ ॥
विनायक म्हणे उच्छिष्ट अशन । उच्छिष्टाचें पान मज यावें ॥ ५ ॥

( ४७१ )

# आज्ञा मागणी

जन्म चरित्रातें वर्णायाचे साठीं । आज्ञा जगजेठी मागतों मी ॥ १ ॥
यथामति जन्म-चरित तुझें गावें । तुजला सेवावें प्रेमभरें ॥ २ ॥
जन्म कर्मे तुझीं वर्णावीं म्हणोनी । साधुसंतजीनीं कथियेलें ॥ ३ ॥
पुराणें हीं तेच शिकवण करिती । उपजाविती प्रीति त्वच्चरित्रीं ॥ ४ ॥

जैसी ज्याची मति तैसें त्यानें गावें । तुजला सेवावें परि सदा ॥ ५ ॥
शुद्ध प्रेमाचा तूं अससी भुकेला । पाहसी कीं भला सत्यनिष्ठेला ॥ ६ ॥
म्हणोनीयां आज्ञा मागतों नमोनी । शिर हें अर्पूनी तुझ्यापायीं ॥ ७ ॥
पदकमळांसीं धरोनी विनवितों । आज्ञा मी मागतों गुरुदत्ता ॥ ८ ॥
विनायकाची वांच्छा पुरवावी नाथा । श्रीगुरुसमर्था दत्तात्रेया ॥ ९ ॥

( ४७२ )

## दत्तजन्म

हेतु पुरवाया माय अनसूयेचा । बालक होय साचा दत्तात्रेय ॥ १ ॥
घेत गर्भवास अनसूयेसाठीं । जन्मा जगजेठी येत असे ॥ २ ॥
नवमास पूर्ण गर्भीं न राहिला । सत्वर प्रगटला दत्तात्रेय ॥ ३ ॥
अनसूया झाली गर्भिणी हे मात । प्रगट लोकांत होत मग ॥ ४ ॥
महिने न भरतां दत्त जन्म घेत । सकळ अद्भुत दत्तजीचें ॥ ५ ॥
विनायक म्हणे जगद्गुरु बाळ । झालासे वेल्हाळ अनुसूयेसीं ॥ ६ ॥

( ४७३ )

## अनसूयेचा आनंद

अनसूया झाली देवाची जननी । केवढी शिराणी तिची जाणा ॥ १ ॥
पातिव्रत्य बळें देवा जन्मा आणिलें । माहात्म्य हें भलें अद्भुतचि ॥ २ ॥
पतिची सेवा केली तेणें ब्रह्म पावलें । अनुसूयेसीं भले पुत्ररिती ॥ ३ ॥
केवढा आनंद केवढें कौतुक । खेळवी बालक अनसूया ॥ ४ ॥
विनायक म्हणे हौस पुरवाया । अज्ञत्व देवराया घेणें झालें ॥ ५ ॥

( ४७४ )

## बालराजाचे विलास

बालकाचे परी वागे ज्ञानमूर्ति । श्रीगुरुपर ज्योति दत्तात्रेय ॥ १ ॥
रडणें कधीं हास्य कधीं छंद घेई । जपतसे आई बालकासीं ॥ २ ॥
न्हाऊं घालितांहि बालक रडत । बहु पिसाळत अनसूयेचें ॥ ३ ॥
मृदु मृदु बोले मंजुळ भाषण । करूं नको रुदन म्हणे माता ॥ ४ ॥
न्हाऊं घातल्यानें तुज झोंप येईल । सुखें निजशील सोनियारे ॥ ५ ॥
लाडक्यारे नको रडूं आतां फार । शीणचि साचार तुज होतो ॥ ६ ॥
तुला जैसें हवें तैसें पाणी घालितें । अंग मी चोळितें हळुहळु ॥ ७ ॥
अत्तरानें न्हाऊं तुजसीं घालितें । सुगंधित होतें तुझें अंग ॥ ८ ॥
बाळा जागलासीं आतां झोपीं जाईं । म्हणत अंगाई बाळा करीं ॥ ९ ॥
घालोनियां न्हाऊं बालक लावी स्तनीं । परी तें दुग्धपानीं लुचेनाच॥१०॥
काय झालें माझ्या या लहानग्याला । समजेना मला म्हणे माता॥११॥
घाली बाळकडूं घेतसे खांद्यासीं । मधुर शब्देंसीं रिझवित ॥ १२ ॥
जगन्नाथ ऐसा करुनी घेई सोहळा । निजमाता प्रेमळा जाणोनियां॥१३॥
मग हळूच हंसे मातेस पाहोनी । दृष्टी भिडवोनी मातामुखीं ॥ १४ ॥
खुदकन हांसे कौतुक मातेला । तिचे आनंदाला सीमा नाहीं ॥ १५ ॥
बाळक राहिलें म्हणोनि आनंद । गातसे स्वच्छंद ओंव्या बाळा॥१६॥
विनायक म्हणे पाळण्यांत बाळ । घालीतो स्नेहाळ अनसूया ॥ १७ ॥

( ४७५ )

## अनसूयेचा पाळणा

जो जो बाळा जो जो आतां निद्रा घेईं । म्हणत अंगाई करीं बाळा॥१॥
किती व्याप तुझा सृष्टी उपजविसी । रक्षण करिसी तिचें तूंच ॥ २ ॥

जो जो बाळा जो जो श्रम फार तुजला। आतां विश्रांतिला घेईं बाळा॥३॥
दैत्यांसीं भीडतां तुज श्रम झाले। माझ कळवळलें अंतरंग ॥ ४ ॥
लोकांसाठीं तुज श्रम फार पडती। तरी आतां विश्रांति घेईं बाळा ॥५॥
जोजो जोजो जोजो जोजोरे वेल्हाळा। जोजोरे स्नेहाळा लडिवाळा॥६॥
माझ्या लाडक्यारे नको जागूं आतां। विश्रांति तत्वतां घेईं घेईं ॥ ७ ॥
हिमालयावरी तपश्चर्या करिसी। बाळा, श्रमलासी निज आतां ॥ ८ ॥
सृष्टि स्थिति आणि संहार करिसी। एकला राहसी बाळ रूपें ॥ ९ ॥
तुझा कोणी नाहीं अखिल त्रिभुवनीं। एकटाच झणीं असती तूं ॥१०॥
जगद् व्यापारातें सकळ साधिसी। साहाय्य तुजसीं दुजा नाहीं ॥११॥
एकलाच बाळा पहिल्यापासोनि। दुजा नाहीं कोणी तुजलागीं ॥ १२ ॥
याच साठीं सर्व व्याप तुज होतो। बाळ माझा जागतो लोकांसाठीं॥१३॥
निज निज बाळा निजरे स्नेहाळा। निज लडिवाळा निज आतां॥१४॥
भक्तीचें पांघरूण तुजसीं घालितें। भावाचें पाजितें दूध तूज ॥ १५ ॥
दुधाचाच असती केवळ भुकेला। म्हणोनी दुग्धाला पाजीतसे ॥ १६ ॥
भावामृत तुज अर्पितें रे बाळा। तरी लडिवाळा निद्रा घेईं ॥ १७ ॥
विनायक म्हणे परोपरी गाई। म्हणत अंगाई अनसूया ॥ १८ ॥

( ४७६ )

## अनसूयेचा पाळणा

जेव्हां सर्व जग लय ह पावतें। वटपत्रीं होतें शयन तुझें ॥ १ ॥
जलमय सृष्टि त्यांत तूं एकला। करित बाळलीला राहतोसी ॥ २ ॥
वटपत्रीं शयन प्रसिद्ध तुझ लोकीं। राहसी एकाकी त्रैलोक्यांत ॥ ३ ॥
पायाचा आंगठा तोंडांत घालोनी। एकला आनंदेनी असतोसी ॥ ४ ॥
म्हणोनियां आत तुज निजवित। ओंव्या तुज गातें प्रेमळात ॥ ५ ॥
तेव्हां कोणी गीत तुजला न गात। एकलाच क्रीडत राहतोसी ॥ ६ ॥
परि आज माझ्या पोटीं जन्मलासीं। म्हणोनि गीतासीं गात असें ॥७॥
निज निज आतां माझ्या छबुकल्या। माझ्या चिमुकल्या निज आतां॥८॥

तुझा व्याप मोठा तया मिती नाहीं । ब्रह्मांडांत पाहीं भरलासी ॥ ९ ॥
स्वर्ग मृत्यु आणि पाताळ व्यापोनी । सकळांच्या अवनीं सिद्ध असशी १०
संरक्षण सकळ जगाचें करिसी । पाहतां पावसी तात्काळचि ॥ ११ ॥
ऐसे तुझे श्रम किती म्यां बोलावे । किती कळवळावें तुझ्या साठीं ॥१२॥
मातेचें हृदय लोण्याचाच गोळा । तयासीं उमाळा फार येतो ॥ १३ ॥
जैसें लोणी द्रवा पावत तात्काळ । हृदय केवळ मातेचें कीं ॥ १४ ॥
उपमाच नाहीं तया हृदयासीं । किती मी बोलासीं बोलूं आतां ॥ १५॥
ऐसें परोपरी गीत गाई माता । बालका निजवितां प्रेमळ ती ॥ १६ ॥
विनायक म्हणे अवधूत निजले । घोराया लागले मातृगानें ॥ १७ ॥

( ४७७ )

## कृतज्ञता वचन

केवढें वात्सल्य वर्णावें प्रभुचें । कैसें माझ्या वाचे सिद्ध होय ॥ १ ॥
वाणी मनासीही अगोचर असे । मात्रा न चालतसे कांहीं तेथें ॥ २ ॥

समाप्त.

श्रीदत्त.

# प्रबंधांची-सूचि


| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| | अ | |
| २२३ | अदितीचे पुत्र स्वर्गांत भोगिती। | १६५ |
| १३५ | अनंत तूझ्या मूर्ति जगांत वसाति। | ९९ |
| ४१० | अनिष्ट तें इष्ट इष्ट तें अनिष्ट। | ३३२ |
| ३०४ | अनुष्टान करवीलें। | २४१ |
| ३११ | अनुष्टान पूर्ण व्हावें। | २४५ |
| ४७३ | अनुसूया झाली देवाची जननी। | ३८३ |
| १४१ | अन्न अन्नादासी विचारें जाणावें। | १०२ |
| १४० | अन्नदानें तुज सर्व कामसिद्धि। | १०१ |
| १३७ | अन्न हाचि देव अन्न हेंच ब्रम्ह। | १०० |
| ५८ | अभिमान कोणा तुजविण दत्ता। | ४६ |
| १६२ | अभिमान कोणा माझा तूजवीण। | ११३ |
| २१२ | अयोध्येसीं राजा दशरथ ख्यात। | १५१ |
| ४५१ | अल्प जरी भक्ती असे मानवासी। | ३६२ |
| ११८ | अल्प धैर्य पाहे सत्वर धांवताहे। | ९० |
| ३१४ | अल्प पुण्य पाहे प्रभु देवराणा। | २४७ |
| २६८ | अवतार झाला प्रख्यात दत्ताचा। | २१२ |
| ४१५ | अवतार भक्तांसाठीं। | ३३७ |
| १२३ | अवतार होतो जगाच्या कारण। | ९२ |
| २१८ | अशक्य ऐसें कांहीं नाहीं मारुतीला। | १५९ |
| ३१७ | अशक्य तें शक्य करोनी दाविल। | २४८ |
| २३५ | असुर त्रासें त्रस्त धरा विधिपाशीं। | १८२ |
| ३०८ | अहंकार दोष माझे हृदयांत। | |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| | **आ** | |
| १०२ | आईबाप भाऊ बहीण सर्व नातें। | ७८ |
| ११२ | आँच लागत दुःखाची। | ८६ |
| ३९९ | आज दिन तुझ्या जाण पुण्यातिथिचा। | ३११ |
| ३८६ | आज प्रगट येथें स्वामि वासुदेवा। | २९५ |
| ३७३ | आजवरी निजकार्य। | २८२ |
| ३०६ | आठवितां पूर्वकालीन आचरण। | २४२ |
| १२० | आतां कृपा करीं संकट निवारी | ३१ |
| ३९० | आतां यावा नाथा प्रसाद् ताटींचा। | २९८ |
| ३४ | आतां मज तारी करुणा तुज यावी। | २८ |
| २९ | आतां माझी हे प्रार्थना। | २४ |
| १८४ | आतां लोभ ठेवा। | १२४ |
| ३९४ | आनंदाचा दिन देवें दाखविला। | ३०५ |
| ३२३ | आमुचें कल्याण नित्य तूं साधिसी। | २५१ |
| ४२७ | आम्हां अज्ञानांना कायसें समजे। | ३४६ |
| ३१३ | आम्हां पामराशीं शक्ति असे किती। | २४६ |
| ५६ | आम्हापाशीं देव आम्ही देवापाशीं। | ४५ |
| १० | आम्ही तृप्त सदा दत्तजीचे दास। | ७ |
| ८७ | आम्ही दोघे रंग करूं। | ६६ |
| २०१ | आयुर्वर्धनार्थ करिती शिवसेवा। | १४० |
| ९६ | आली आली गंगा आली। | ७२ |
| २० | आवरावी सदा ऊर्मि हृदयाची। | १७ |
| २९१ | आशाळभूत मी साहाय्य मागतों। | २३३ |
| २२९ | आहे का या स्तंभीं ऐसें विचारित। | १६९ |
| ४०७ | आज्ञा यावी आतां विभूति पूजना। | ३२५ |
| ४६८ | आज्ञा यावी मज आतां महाराज। | ३८० |
| २३२ | आज्ञा यावी मज कथा आरंभाया। | १७७ |
| ४५९ | आज्ञा यावी मज कथा आरंभाया। | ३७२ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ३८४ | आज्ञा द्यावी महाराज। | २९२ |
| ३८७ | आज्ञा द्यावी महाराज। | २९५ |
| ३८९ | आज्ञा द्यावी महाराज। | २९७ |
| ३९२ | आज्ञा द्यावी महाराज। | ३०१ |
| ४५६ | आज्ञा द्यावी महाराज। | ३६९ |
| ४६० | आज्ञा द्यावी महाराज। | ३७३ |
| ३९६ | आज्ञा द्यावी महाराज। | ३०८ |
| १८० | आज्ञापिती देव आयिती करावी। | १२१ |
| ४२१ | आज्ञा मज केली सद्गुरुरायांनीं। | ३४२ |
| | ई | |
| २९५ | ईश्वराचें राज्य व्हावें त्रिभुवनीं। | २३५ |
| ४३२ | ईश्वरा भजतां विघ्नें न बाधती। | ३५० |
| | उ | |
| १६८ | उत्पत्ति स्थितिलय जे कां जगताचे। | ११६ |
| ३७१ | उत्सव कार्य तूझें जवळि पातलें। | २८१ |
| ३६६ | उत्सव कार्य तूझें जवळि पातलें। | २७८ |
| ३८० | उत्सव कार्य तूझें जवळि पातलें। | २८६ |
| ३५४ | उत्सव कार्य तूझें देवा जवळि आलें। | २७० |
| ३८१ | उत्सव तुझा जवळि आला। | २८६ |
| ३५५ | उत्सव तुझा जवळि आला। | २७० |
| ३५६ | उत्सव तुझा जवळि आला। | २७१ |
| ३५७ | उत्सव तुझा जवळि आला। | २७२ |
| ३५८ | उत्सव तुझा जवळि आला। | २७३ |
| ३५९ | उत्सव तुझा जवळि आला। | २७३ |
| ३६० | उत्सव तुझा जवळि आला। | २७४ |
| ३६१ | उत्सव तुझा जवळि आला। | २७५ |
| ३६२ | उत्सव तुझा जवळि आला। | २७५ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ३६३ | उत्सव तुझा जवळि आला। | २७६ |
| ३६४ | उत्सव तुझा जवळि आला। | २७६ |
| ३६५ | उत्सव तुझा जवळि आला। | २७७ |
| ३७० | उत्सव तूझा जवळिआला। | २८० |
| ३७२ | उत्सव तूझा जवळिआला। | २८२ |
| ३७७ | उत्सव तूझा जवळिआला। | २८४ |
| ३७८ | उत्सव तूझा जवळिआला। | २८४ |
| ३८२ | उत्सव तुमचा जवळिआला। | २८७ |
| ३५१ | उत्सव तुमचा जवळिआला। | २६९ |
| ३५२ | उत्सव तुमचा जवळिआला। | २६९ |
| ३५३ | उत्सव तुमचा जवळिआला। | २६९ |
| २६३ | उत्सवाचा दिन आज हा तुमचा। | २०९ |
| १ | उत्सवाचे साठीं मार्गे साक्षात्कार | १ |
| २९३ | उदय धर्माचा तुझे कृपें व्हावा। | २३४ |
| १४३ | उपासनेविण समर्थ साधन। | १०२ |
| | ऋ | |
| २५३ | ऋषि सांगे ऐसें आहे हें मोहन। | २०१ |
| २१७ | ऋष्यशृंगे पदीं ठेवोनियां माथा। | १५५ |
| | ए | |
| १७० | एवढेंच मज करितां येईल। | ११७ |
| | ऐ | |
| १९ | ऐरावत स्थित इन्द्र कृष्णापाशीं। | १५ |
| २०८ | ऐसा भर आला आनंदीं बहुत। | १४४ |
| २०७ | ऐसें हें भजन रंगात कीं आलें। | १४३ |
| | क | |
| १२९ | कठोर नको होऊं मायाळू स्वभाव। | ९५ |
| २६६ | कथा पडली आंगावरी। | २११ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ८८ | कधीं तरी देह असे पडणार । | ६७ |
| २४६ | कर्म आणि फल सातत्यें सेवितां । | १९६ |
| ३०३ | करवीलें तुवां निजकार्य दत्ता | २३९ |
| ९७ | करुणरस श्रेष्ठ सर्व रसांमाजी । | ७३ |
| ९८ | करुणेनें बोला करुणेनें चाला। | ७४ |
| ४६२ | करुनी तुजला नमन । | ३७६ |
| १६७ | करूं नका आतां देवा फजितीला । | ११५ |
| २६७ | करूंया स्मरण श्रीकृष्णातीराचें । | २११ |
| १५९ | काकुळती बहु येतों । | ११० |
| ३३१ | काय बोलणार अज्ञानी पामर । | २५५ |
| १६१ | काय विटंबना व्हावी माझी जगीं । | ११२ |
| १५३ | काया वाचा मन यांचें निगडन । | १०७ |
| ९५ | काया वाचा मनें परार्थ साधितो । | ७१ |
| १६६ | काया वाचा मनें शरण तुज आलों । | ११४ |
| ४५३ | कार्य तुझें दत्ता जवळि पातलें । | ३६४ |
| २८ | कार्य निज तुवां करवोनि घेतलें । | २३ |
| ३६९ | कार्यासाठीं प्रगटावें । | २८० |
| ३१२ | कांहीं झालें तरी देवावीण गती । | २४६ |
| ३४५ | कांहीं झालें तरी शरण असे झालों । | २६२ |
| ३१५ | काळापासोनियां जेणें मार्कंडेया । | २४७ |
| १५४ | किती जरी देह आम्ही आराधिला । | १०७ |
| ११७ | किती तरी प्रेम भरिलें हृदयांत । | ८९ |
| १७२ | किती तुझी कृपा असे मजवरी । | ११७ |
| ३ | किती शांति माझ्या जीवा । | ३ |
| १५८ | किती साहूं कष्ट देवा । | १०९ |
| २११ | कृतकृत्यता कीं आसुची त्वां केली । | १४६ |
| १९५ | कृपा कधीं करणार । | १३३ |
| ४०८ | कृपा केली थोर कार्य करविलें । | ३२६ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| २८३ | कृपाळूत्व तुझ तूजला साजत। | २२८ |
| ४७७ | केवढें वात्सल्य वर्णावें प्रभूचें। | ३८६ |
| २०३ | कलासासी शिव उमेसह बैसले। | १४१ |
| २७८ | कैसें कठिण हृदय केलें दयावन्ता। | २२६ |
| १०१ | कैसें माझ्या देहीं पातक राहिलें। | ७६ |
| ४३४ | कोणताही अर्थ धरोनी भजतां | ३५१ |
| ४३ | कोण वा वाच बोलेल वर्णन। | ३८ |
| १३९ | कोणासीही अन्न कधीं न नाकारावें। | १०१ |
| ८६ | कौतुक मुलाचें कोण करणार। | ६५ |
| १७ | कौमुदी हे आज पौर्णिमा लक्ष्मीची। | १३ |
| १७८ | क्रीडा करण्यासी प्रगटे दत्तदेव | १२० |
| | **ख** | |
| ५३ | खेळ शिमग्याचा पहा। | ४३ |
| ११९ | खोटाच कीं कापे दावी क्षणभरी। | ९० |
| | **ग** | |
| २३९ | गर्भिणी राहिली देवकी कारागृहीं। | १८४ |
| १८९ | गिरिजा प्रार्थितसे जय मधुसूदना। | १२९ |
| २०६ | गिरिजेचें नांव जोडुनी शंकरा। | १४३ |
| १०६ | गुरुपूजनाचा दिवस मंगल। | ८१ |
| ४९ | गुरुमय संसार हा। | ४० |
| १०७ | गुरु माझे यतिवर। | ८२ |
| ११६ | गुरुवांचोनियां कोठें नाहीं थारा। | ८८ |
| ३९५ | गुरुविण नाहीं कोणालागीं गति। | ३०६ |
| १८२ | गुरुसंगें आम्हां जाणें। | १२२ |
| ३३६ | गूढ जरी आहे अंतर आपुलें। | २५८ |
| ४८ | गृहसुतदारा पशुधन यांची। | ४० |
| २४२ | गोकुळांत आलें प्रगटोनी देव। | १८८ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| | घ | |
| १२८ | घेवोनियां सेवा नाथ आजवरी। | ९५ |
| २५५ | घेवोनी महिषीसी पाताळांत जाय। | २०२ |
| २५६ | घोर तपश्चर्या करितां ब्रह्मदेव। | २०३ |
| | च | |
| २३३ | चरित्र तुझें गाया आज्ञा मज देईं। | १८० |
| ४११ | चरित्र तुझें गोड सुधेहुनी थोर। | ३३४ |
| १७४ | चालतां मी चालतोसी। | ११८ |
| २२७ | चालेना उपाय बाळ तो मरेना। | १६८ |
| ३४२ | चित्त निरोधासीं साधणें कठीण। | २६१ |
| १५१ | चुकतों आम्हीं किती नाहीं तया मिती। | १०६ |
| | छ | |
| ३३ | छंद मज लागलासे। | २७ |
| | ज | |
| १३३ | जगाचा तूं बाप परम स्नेहाळ। | ९८ |
| ७७ | जगामाजी जे कां प्रेम। | ६० |
| ४७१ | जन्म चरित्रातें वर्णायाचे साठीं। | ३८२ |
| ४५८ | जन्मदिन तुझा अम्हां आनंदाचा। | ३७१ |
| ३२४ | जन्मोजन्मीचा तूं आमुचा सांगाती। | २५२ |
| ३४० | जपत राहिला देहा विसरला। | २६० |
| ३४१ | जपतां नाममंत्र देहमनबुद्धि। | २६१ |
| ३८३ | जयजयकार तुझा गाजत जगतीं। | २९१ |
| १४५ | जरि कर्में मोक्ष म्हणाल प्राप्त होत। | १०३ |
| २५ | जागें व्हावें आतां श्रीगुरुमाधवा। | १९ |
| १६९ | जें जें कांहीं असे उपजलें येथ। | ११६ |
| ३४८ | जें जें कांहीं मनीं तें तें मी भोगिलों। | २६४ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| १३८ | जें जें कांहीं मूर्त अमूर्त जगांत। | १०० |
| २१९ | जेथें रामकथा तेथें प्रगटत। | १५९ |
| ४३० | जेव्हां माझें मन प्रौढता वरील। | ३४९ |
| ४७६ | जेव्हां सर्व जग लय हें पावतें। | ३८५ |
| ४२९ | जैसें प्रबुद्धपण येईल मजला। | ३४७ |
| ४७५ | जो जो बाळा जो जो आतां निद्रा घेई। | ३८४ |
| ७३ | जोडोनियां दोन्ही हात | ५७ |
| ३६ | ज्याचेपाशीं प्रेमा भेटे त्यासीं देव। | ३१ |
| | झ | |
| २६५ | झोंपलों कीं जागा होतों। | २१० |
| | त | |
| ५२ | तमाशा हा आहे मांडिला वैऱ्यांनीं। | ४२ |
| २६१ | तया दूतें बहु देवीस बोधियेलें। | २०५ |
| २२६ | तया दैत्यालागीं होय तैसा सुत। | १६७ |
| ३३८ | तयालागीं वध भेटला अतुल। | २५९ |
| ३९७ | तरी आतां आज्ञा द्यावी। | ३०९ |
| १०५ | तरी आतां सांग गुह्य तुझें तूंच। | ८१ |
| १५७ | तळमळ दूर करीं। | १०९ |
| ६१ | तळमळ माझी कोण बा हरील। | ४८ |
| २०० | तिसरे प्रहरींची पूजा त्वां घेतली। | १४० |
| ३९१ | तुज भिक्षा करण्याचा। | २९९ |
| १२५ | तुजविण कोण तारील मजसीं। | ९३ |
| ४३७ | तुज समर्थाला कायसें कठीण। | ३५३ |
| ४५३ | तुझिया पदांचा केला मी आश्रय। | २५३ |
| ४४१ | तुझी भक्ती देवा करितां। | ३५६ |
| १२६ | तुझीये पाडसासी पडतां जडभारी। | ९४ |
| ४३९ | तुझ्या उत्सवाचें कार्य जवळि आलें। | ३५५ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ४३५ | तुझ्या कृपेवीण सर्व व्यर्थ आहे। | ३५२ |
| १३१ | तुझ्या सहवासें पूर्ण मी जाणतों। | ९७ |
| ३७५ | तुमच्या घरचें कार्य दत्तदेवा। | २८३ |
| १८५ | तुम्हां सकळांसी माझा नमस्कार। | १२४ |
| १०० | तुवांच मज नाथ सेवेंत गोंविलें। | ७६ |
| ३२१ | तूंच एक ज्ञाता सकळ जागसी। | २५० |
| २७७ | तूज वांचोनियां मज गति नाहीं। | २२५ |
| २७६ | तूजविण माझी कोणालागीं चिंता। | २२५ |
| ७६ | तूझी कृपा वर्णायासीं। | ५९ |
| २८० | तूझ्या प्राप्तिस्तव तूझ्या प्रीतिस्तव। | २२६ |
| ३३२ | तूझें नाम हाचि श्रेष्ठ मंत्र जगीं। | २५६ |
| २७१ | तोच अवतार झाला श्रीपादांचा। | २१४ |

द

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ८५ | दत्त आहे माझ्या ठायीं। | ६५ |
| ४१७ | दत्तचरणांसीं शरण रिघतां। | ३३९ |
| ४४९ | दत्त दत्त ऐसा छंद लागो मना। | ३६१ |
| ५१ | दत्त दत्त ऐसें बोला। | ४१ |
| २९९ | दत्त बोलवीतो तैसा मी बोलतों। | २३७ |
| १९६ | दत्त माझा गणपती। | १३३ |
| ७ | दंड कमंडलु शूळ करीं शोभे। | ५ |
| ७२ | दया कधीं करणार। | ५६ |
| ९९ | दया मजवरी व्हावी भगवंता। | ७५ |
| ३८ | दर्शनाचा योग कधीं घडणार। | ३२ |
| ३२ | दांभिकपण ऐसें मजठायीं वसो। | २६ |
| ४२० | दिन आनंदाचा दिन स्थापनेचा। | ३४२ |
| ४०१ | दिवस आज नाथा पुण्य स्मरणाचा। | ३१४ |
| १११ | दुःख हे अमृत दुःख हाचि स्वर्ग। | ८५ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| १९९ | दुर्लभ पूजन शिवरात्र दिनीं । | १३९ |
| २२२ | दुर्लभ हा जन्म लाभुनि मानवाचा । | १६५ |
| १३० | दुष्टासीही दया आणि करुणावाणी । | ९६ |
| ३३७ | दृष्टांतासी घ्यावें वाल्मीकि चरित । | २५८ |
| ४१३ | दृष्टि परमार्थाची ठेवोनि संसारीं । | ३३५ |
| ४१ | देणें शंकराचें त्यासीं न उपमा । | ३६ |
| ४६ | देव कार्य ज्यासी करणें नेटानें । | ५३ |
| ४७ | देवकार्यासाठीं तन मन धन । | ३९ |
| १२२ | देव माझा वासुदेव । | ९२ |
| ४१६ | देवाचें भजन देई सर्व कांहीं । | ३३८ |
| ४१२ | देवा तुझें यश गाऊं । | ३३५ |
| ४२६ | देवा तुम्हां ओळखिलें । | ३४५ |
| ३२० | देवा तूझी लीला कैशी कळणार । | २५० |
| ४३८ | देवाविण नाहीं अन्य मज गति । | ३५४ |
| १२४ | देवा सेवूं देवा भजूं । | ९३ |
| १६ | देह त्यागितां जें पुढील गमन । | १२ |
| १५ | देहे प्रेत होतां पुढें काय होत । | ११ |
| २५८ | देवी स्तवीयेली तेव्हां भगवती । | २०४ |
| १९१ | दैत्यें पीडितां ती गिरिजा भवानी । | १३१ |
| | **ध** | |
| ४२२ | धर्म सोडूं नये धर्मची वर्तावा । | ३४३ |
| १०९ | धरियेला विश्वास बांधियेली गांठ । | ८४ |
| २८२ | धांव घेई आतां मजसाठीं दत्ता । | २२८ |
| १३२ | धांव धांव आतां देवा । | ९७ |
| २९७ | धैर्य नाहीं माझ्या मनीं अणुमात्र । | २३६ |
| | **न** | |
| ४६६ | नमन माझें मान्यवंता । | ३७७ |
| ४६७ | नमन माझें वासुदेवा । | ३७८ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ४६३ | नमन माझें शारदेला । | ३७६ |
| ४६५ | नमन माझें सुरवरां । | ३७७ |
| ४६४ | नमितों मी कुलदेवासी । | ३७७ |
| ३५० | नमूं श्रीपदांसीं नमूं नरहरीसीं । | २६४ |
| २०५ | नाचतां नाचतां वसनें गळालीं । | १४२ |
| ३३४ | नाना रोग जगीं विख्यात असती । | २५७ |
| ८० | नामें रूपें वीण गमती । | ६१ |
| ६९ | नाहींच का दया येणार तुम्हांला । | ५४ |
| १८१ | निघताती गुरु घेवोनी सांगाती । | १२२ |
| २३ | नित्य आनंदाचा साधावा हा योग । | १८ |
| ४२८ | निरंतर आम्हां सुखचि असावें । | ३४७ |
| ३१९ | निर्वाणीचा सदा एक दत्तात्रेय । | २४९ |
| १९२ | नृप एक होता नामें अभिनंदन । | १३१ |
| ३३३ | नेत्ररोग झाला असे आम्हांलागीं । | २५६ |
| ११३ | नेमुनियां दिली जीविका सर्वांसीं । | ८७ |

प

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| | पदर पसरीला नाथा तूझे पुढें | |
| २६४ | परम पावन यश तुझें नाथा । | २१० |
| २६९ | परम विस्मिता होय पतिव्रता । | २१३ |
| ११४ | परमार्थ हेंच मनुजासीं ध्येय । | ८७ |
| १९७ | पर्वणीचा दिन आज प्राप्त झाला । | १३७ |
| ३२५ | परि तूं दयेचा पुतळा गमसी । | २५२ |
| २८५ | पहातां पहातां देव मज करा । | २२९ |
| ३४६ | पळ पळ पळ जैसा काळ जातो । | २६३ |
| ५ | पातक कैसें माझें नाथा । | ४ |
| २४ | पान भोजन हें जाणा अमृताचें । | १९ |
| २४९ | पाशवी वृत्तितें जिंकाया कारण । | १९९ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ९४ | पाहुनीयां ताप सकल जगाचा। | ७१ |
| २९८ | पाहोनियां दुःख सकल जगतीं। | २३६ |
| १४ | पितर तूं जाण सर्व जगताचा। | १० |
| १४२ | पितरांच्या नांवें करा अन्न त्याग। | १०२ |
| २५४ | पुत्रकामें दैत्य रंभ आणि करंभ। | २०२ |
| ४६१ | पुत्रवती झाली अनसूयामाता। | ३७३ |
| ४५ | पुन्हां पुन्हां किती बोलें अनुभव। | ३८ |
| ४०३ | पुन्हा पुन्हा जेव्हां ईश्वरासी.गाव। | ३१८ |
| ४४० | पुन्हा पुन्हा तुज प्राथाव। | ३५५ |
| ४४६ | पूर्वकृत आहे दुर्घट जीवाला। | ३५९ |
| ४२३ | पूर्वपरंपरा कधीं न सांडावी। | ३४४ |
| ३०७ | पूर्ववृत्त माझें अत्यंत गहन। | २४३ |
| १४९ | पूर्वीं तुम्हां होती प्रसन्न जे झाली। | १०५ |
| ६५ | प्रगटता येथें धरा। | ५२ |
| ४५७ | प्रथम पूजन ह देवा | ३७१ |
| १९८ | प्रथम प्रहरींची पूजा हे घेतली। | १३८ |
| ४७० | प्रसाद ग्रहणा आतां आज्ञा द्यावी। | ३८२ |
| ४०६ | प्रसादाचा दिन आज हा भाग्याचा। | ३२२ |
| ६ | प्रसादाचें असे लक्षण बरवें। | ५ |
| ४०५ | प्रसादातें सेवावया। | ३२१ |
| ५४ | प्राणाहुनी प्रिय भक्त ईश्वरासीं। | ४४ |
| १५२ | प्रांजळपणानें विचार करावा। | १०६ |
| २६० | प्रार्थितां देवीसी प्रगटे अंबिका। | २०५ |
| १२७ | प्रेम भजनाचा कथा कीर्तनाचा। | ९४ |
| ७८ | प्रेम माउलीचें प्रेम पितयाचें। | ६० |
| ९ | प्रेमरंग खेळूंया कीं। | ६ |
| ७९ | प्रेमासम दत्त नटोनी येईल। | ६१ |
| ५० | प्रेमें करी कीर्तनाला। | ४१ |

३८००५ ३९९


| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| | **ब** | |
| ३२८ | बहु दुखावलों बहु निर्बुजलों । | २६४ |
| २०९ | बहु पुण्याईचा योग हा आजिचा । | १४४ |
| ४५४ | बळकट कांस घालोनी झटावें । | ३६४ |
| ४७४ | बालकाचे परी वागे ज्ञानमूर्ति । | ३८४ |
| ६८ | बुद्धिबल तैसा थोर पराक्रम । | ५४ |
| १३६ | ब्रह्मदेवा ज्ञान प्रथम तुवां दिलें । | ९९ |
| २०२ | ब्रह्महत्यादि दोष जातीं शिवार्चनं । | १४१ |
| | **भ** | |
| १७९ | भक्त आणि देव यांत भेद नाहीं । | १२१ |
| ५५ | भक्त पूजा करीत या ईश्वराची । | ४४ |
| २९६ | भक्ति मज कांहीं स्वामि उपजवा । | २३५ |
| ४४७ | भक्तिपाशीं आहे देव । | ३६० |
| ४४८ | भक्तीपाशीं सुधा आहे । | ३६० |
| ४१९ | भक्ती प्रेमाधरा शुद्ध हृदयांत । | ३४१ |
| २०४ | भजतां भजतां बेभान ते झाले । | १४२ |
| ४५५ | भजन करितां देहा विसरावें । | ३६५ |
| ४१४ | भजन दत्ताचें अमृत हें इह । | ३३६ |
| ४४३ | भजन मागतों मागतों मी प्रेम । | ३५७ |
| ४४४ | भजन हा मंत्र भजन हें तंत्र । | ३५८ |
| ४४२ | भजन हेंचि सार भजन अमृत । | ३५७ |
| २८६ | भजनाचा दावीं माझे ठायीं प्रभाव । | २३० |
| २१० | भट ऐसा नाहीं दुजा या जगतीं । | १४५ |
| २२८ | भयभीत द्विज सांगती दैत्यासी । | १६९ |
| १६४ | भयभीत झालों असें अंतरांत । | ११३ |
| ४३६ | भय मोठें आहे देवा उभारलें । | ३५२ |
| ९३ | भागीरथी माता जगातें ताराया । | ७० |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ५९ | भारती युद्धांत भीष्म प्रतिज्ञा करी। | ४७ |
| ८१ | भावनेचा देव तैसा प्रगटतो। | ६२ |
| २७४ | भाव भक्तीनामें युग्म जे विख्यात। | २१९ |
| ८२ | भिल्लिणीचा भाव पाहिला रामांनीं। | ६२ |
| ३०० | भूत अंगीं संचरलें। | २३७ |

म

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ६४ | मख रक्षणासी गाधिचा तनय। | ५१ |
| ३३९ | मग नारदांनीं मंत्र पटविला। | २६० |
| २८७ | मज बनवावें देव। | २३० |
| ३२९ | मजला आधार कांहीं न ऊरला। | २५४ |
| १७६ | मजलागीं तुझें साहाय्य दत्तदेवा। | १२० |
| १७५ | मजसंगें जेवितोसी। | ११९ |
| ३० | मधुर किती हांसे वृत्तीतें मोहवी। | २५ |
| ७५ | मंत्र मज दिला व्याधि निरसना। | ५८ |
| १४७ | मर्त्यलोकीं शुभ कर्मातें करिती। | १०४ |
| ३०२ | महद्भुतें मज जाणा झपाटिलें। | २३९ |
| २५१ | महामाया आहे अजिंक्य जगांत। | २०० |
| २७० | मागणी ऐकूनी प्रसन्न जाहले। | २१३ |
| ३०१ | मांझिया कर्माचा जेवढा कीं भोग। | २३८ |
| २८४ | माझी कीर्ति होतां यश विस्तारेल। | २२९ |
| ३१० | माझीया शत्रूंचा पूर्ण व्हावा नाश। | २४५ |
| २८८ | माझी लाज कोणा सांग तूजविण। | २३१ |
| १६० | माझी लाज राखणारा। | १११ |
| २ | माझी वस्तु मज सांपडेना कैशी। | २ |
| १७७ | माझ्या मुखें बोले माझ्या दृष्टि पाहे। | १२० |
| ३४४ | माझ्या संकटांचा करावा विनाश। | २६२ |
| ३४३ | माझें कर्तव्य मी आचरित आहें। | २६१ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| २८९ | माझे ठायीं आहे सदा तुमचा वास । | २३२ |
| २९० | माझें ठायीं तूझा वास म्हणोनियां । | २३२ |
| ३४९ | माझे बोलण्याचा हेतु समजोनी । | २६४ |
| ४ | माझेवरी करी अमृत सिंचन । | ३ |
| १७३ | मातेहुनि तुझें कोमल हृदय । | ११८ |
| २३४ | माथुर शूरसेन यांचें अधिराज्य । | १८१ |
| १९४ | मायाधर देव सगुण जाणावा । | १३२ |
| २९८ | मार्गदर्शक तो गुरुविण नाहीं । | ३०९ |
| ७१ | मारीयेलें दृत्य वैकुण्ठ स्थापिलें । | ५५ |
| २२० | मारोनियां वाळी सुग्रीवासी राजा । | १६० |
| ६० | म्हणतोसी सदा भक्त मज प्रिय । | ४७ |
| १५५ | म्हणोनियां देवा शरण पायांसीं । | १०८ |
| १५० | म्हणोनी निष्कर्ष ऐसाच निघतो । | १०६ |

य

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ११० | येईं येईं आतां लवकर येईं । | ८४ |
| ३१ | येईं येईं माझ्या दत्ता । | २६ |
| ८ | ये ये ये ये माझ्या स्वामी दत्तात्रेया । | ६ |
| १४६ | योगसिद्ध झाला जया दैत्यालागीं । | १०४ |
| ४०२ | योग हाचि दंड इंद्रिय दमना । | ३१६ |
| १४४ | योगाचिया योगें बळ इंद्रियाचें । | १९३ |

र

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ५७ | रंग द्वा भरवावा । | ४६ |
| २७२ | रजक भक्त एक त्यासी कृपा करी । | २१५ |
| ९१ | रतिसह येत मदन सेवेसीं । | ६९ |
| ३६७ | रक्षाबंधनातें कराया कारण । | २७९ |
| २७९ | राख लाज आतां आपुल्या भक्ताची । | २२६ |
| २१४ | राजा हात जोडी कोठें ऋष्यशृंग । | १५२ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| ३७ | रात्रंदिन देव सेवा। | ३१ |
| २२१ | रामराज्याठरी बैसतां हा दास। | १६१ |
| ४४५ | रुचीस मधुर ग्रहणा मधुर। | ३५९ |
| ८४ | रेणुकेनें नेलें जधीं भार्गवरामा। | ६४ |
| | ल | |
| ४४ | लडिवाळपणें देवा मी बोलतों। | ३८ |
| ६२ | लाज राख या स्थानाची। | ४९ |
| १०३ | लीला तुझी देवा आम्हां न समजे। | ७९ |
| ४० | लोकसंग्रह कीं झालासे बहुत। | ३४ |
| | व | |
| २४३ | वराहरूपें प्रगटला। | १९१ |
| ११५ | वरिष्ठ कनिष्ठां वृत्ति योजियेली। | ८८ |
| २३८ | वऱ्हाड मांडियेलें थोर वासुदेवाचें। | १८३ |
| २५७ | वश करायासीं महिष झटत। | २०३ |
| २३७ | वसुदेवाचा मीं तनय होवोनी। | १८३ |
| २४१ | वसुदेवें तव्हां गर्भ तो नमिला। | १८६ |
| १०४ | वाचीयेले ग्रंथ संताचीया वाणी। | ८० |
| २७३ | वाढला लौकिक सर्व जन येती। | २१६ |
| २४७ | वामन जावोनी ठाके बुद्धिपाशीं। | १९६ |
| ३७९ | वार्षिक जें तुझें कार्य। | २८५ |
| ३८५ | वार्षिक तुझें कार्य भिक्षा समारंभ। | २९४ |
| ३७६ | वार्षिक हें कार्य दत्तजयंतीचें। | २८४ |
| ३६७ | वासना कथिली आमुच्या मनिंची। | २७८ |
| ३८८ | वासुदेव दत्तरूप। | २९६ |
| २३० | वासुदेव नाम घ्यावें। | १७३ |
| २३१ | वासुदेव वासुदेव। | १७४ |
| १३ | वासुदेवा येईं येईं। | ९ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| १२१ | वासुदेवावरी माझा पूर्ण भाव । | ९२ |
| ४६९ | विजय भजनाचा विजय स्थानाचा । | ३८१ |
| ३९३ | विभूति पूजनासीं आतां आज्ञा देई । | ३०३ |
| २७ | विरक्त असावें नित्य या संसारीं । | २२ |
| २४८ | विरुद्ध वासना मनीं उठवोनी । | १९१ |
| ४१८ | विषयाची तृप्ति मनीं विवेचावी । | ३४० |
| १२ | वैराग्याचा निधि स्वामि वासुदेव । | ८ |
| ७४ | व्यर्थ माझा देवा जन्म । | ५८ |
| २९४ | व्हावें रामराज्य भीति सर्व जावी । | २३५ |
| | **श** | |
| २१६ | शरयू नदीचे उत्तर तीरासीं । | १५४ |
| ११ | शांति सुखें अनुभवी । | ८ |
| ९० | शिखी केका गाती पिसारा करिती । | ६८ |
| १६५ | शिक्षेला ते युक्त तुझें न ऐकती । | ११४ |
| ४५२ | शुद्ध प्रेम तुज अर्पितां जीवानें । | ३६२ |
| १८३ | शुभ आशिर्वाद सकळां सेवकां । | १२३ |
| २५९ | शुंभनिशुंभ हे जाणा दोन भ्राते । | २०४ |
| १४८ | शुंभनिशुंभांनीं देवां पराभवीतां । | १०५ |
| २४० | शेषासी म्हणती स्वयें भगवान । | १८५ |
| | **स** | |
| ३२७ | सकळ विश्वास अर्पण तुजसी । | २५३ |
| १९३ | सकळांचा गुरु प्रत्यक्ष परब्रह्म । | १३२ |
| २३६ | सकळांनीं स्तुति तेव्हां आरंभिली । | १८२ |
| ३०९ | संकटांत नाहीं कोणी वांचविता । | २४४ |
| ४२५ | संकटातें निवारावें । | ३४५ |
| ३९ | सत्यासाठीं प्राण त्यागावा हें व्रत । | ३३ |
| २५२ | सत्त्वगुण विष्णु न सांपडे अंत । | २०१ |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| २२ | सदा वस देवा ठायीं । | १८ |
| २८१ | सप्ताह पारायण तूझें आरंभिलें । | २२७ |
| ४०४ | समर्थ आम्ही दास सदा श्रीगुरुचे । | ३२० |
| १९० | समाधि निर्भर असतां शिवासी । | १३० |
| १८ | समाहित चित्त तोचि जाणा योगी । | १५ |
| २४५ | सर्व देवमयी प्रसिद्ध अदिती । | १९५ |
| ८९ | सह्यागिरीवरी रम्य शिळेवरी । | ६८ |
| २६ | सह्यगिरी वास तुजलागीं रुचे । | २१ |
| १६२ | सांग सांग आतां काय मनीं आणिलें । | ११२ |
| ४६ | सांगावें हें नाथा कोणीकृत्य केलें । | ३९ |
| ४३१ | सार्थक जन्माचें कराया कारण । | ३४९ |
| ४७४ | साक्षात्कारें येथें स्वामि प्रगटावें । | २८३ |
| २९२ | सिद्धमजकरीं अत्रिच्या तनया । | २३३ |
| ६३ | सिद्धाश्रमपद वैभवासी देवा । | ५० |
| ३२२ | सुखाठायीं दुःख दुःखाठायीं सुख । | २५१ |
| २६२ | सुमेधस मुनि सांगे वैश्य नृपां । | २०६ |
| २५० | सुरथ नामें राजा राज्यभ्रष्ट झाला । | २०० |
| ४३३ | सुलभ हा मार्ग सुलभ उपाय । | ३५१ |
| २१ | सुहास्य वदन चतुर्भुज देव । | १७ |
| २१५ | सूत सांगे राजा ऐक दशरथा । | १५३ |
| २१३ | सूत सांगे राजा मुनींनीं ऐकिले । | १५१ |
| १३४ | सूर्य किरणांत बसोनी रक्षिसी । | ९८ |
| २७५ | सूर्यापोटीं जे कां युग्म उपजलें । | २१९ |
| १०८ | सोवियेला जरी गुरु कल्पतरु । | ८३ |
| ३१६ | सोंगें ढोंगें जरी भजसील त्यासी । | २४८ |
| ३१८ | सोडोनियां कोठें जाशील त्यां सांग । | २४९ |
| ९२ | सोळा वरुषाचें वय । | ६९ |
| ४५० | स्तुतिस्तोत्र गावें नामातें वदावें । | |

| अ. नं. | वर्णानुक्रम | पान |
|---|---|---|
| २२५ | स्थानभ्रष्ट देव होवोनियां दीन । | १६७ |
| ४०९ | स्थापनेचा दिन आजिचा मंगल । | ३३१ |
| ४०० | स्मरण कराया तुमच्या लीलांचें । | ३१२ |
| ३३५ | स्वभावासी नाहीं औषध म्हणती । | २६७ |
| ६७ | स्वामिकार्यासाठीं प्राणही अर्पण । | ५३ |
| | ह | |
| ३५ | हांक कानीं ऐशी देवाच्या पडतां । | ३० |
| २२४ | हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष । | १६६ |
| ७० | हृदय तूझें देवा जैसें नवनीत । | ५५ |
| १७१ | हृदयांत ठाव तुजला दिधला । | ११७ |
| ४२४ | हेतु धरुनि शरण आलों । | ३४४ |
| ४७२ | हेतू पुरवाया माय अनुसूयेचा । | ३८३ |
| ८३ | हेतु विशद केला निजमंत्राचा त्वां । | ६३ |
| ३३० | होवोनियां भक्त तुझा पुरुषोत्तमा । | २५५ |
| | क्ष | |
| १५६ | क्षमस्व म्हणतों नाथ मी वाणीनें । | १०९ |
| ३०५ | क्षमा मी मागतों नाथ तुम्हापाशीं । | २४२ |
| ४२ | क्षमा व्हावी नाथा माझे अपराधां । | ३७ |
| | ज्ञ | |
| २४४ | ज्ञानाविण मुक्ति नसे लभ्य जाणा । | १९५ |

REFBK-0004724

REFBK-0004724

# शुद्धिपत्र.

| पान | प्रबंध | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ११ | १५ | ४ | काव्य | कव्य |
| १७ | २० | ८ | वेगळं | वेगळें |
| २१ | २६ | ५ | संग | संगें |
| ३८ | ४३ | १ | बावाचे | बा वाचे |
| ३८ | ४३ | ५ | अनुभावें | अनुभवें |
| ४२ | ५२ | १९ | नारीनो हे | नारी नोहे |
| ४३ | ५२ | ३६ | पळोनी | पोळोनी |
| ४४ | ५५ | १ | करीत या | करी तया |
| ४७ | ५८ | ४ | पाठीसीं | पाठीसीं घालील |
| ४७ | ५९ | ८ | कोण | कोणा |
| ५२ | ६५ | १५ | विनायक | विनायका |
| ५६ | ७१ | १५ | उपमा न | उपमान |
| ७६ | १०० | ७ | कली | केली |
| ७७ | १०१ | १३ | कायेनं | कायेनें |
| ७७ | १०१ | २५ | मज | मळ |
| ९१ | ११९ | ९ | कोपसीं | कोपेंसीं |
| ९३ | १२३ | ४ | आपुल्यासीं | आपुल्यांसीं |
| ९५ | १२८ | ९ | द्वंदालागीं | द्वंद्वालागीं |
| ९८ | १३२ | १३ | विनायकं | विनायकें |
| १०० | १३८ | २ | शरीरं | शरीरें |
| १०१ | १३९ | ४ | अतिथ | अतिथी |
| १०३ | १४४ | ६ | भोग | योग |
| १०३ | १४५ | ३ | हो | हा |
| ११६ | १६८ | ६ | अविदीत | अविदित |
| ११८ | १७२ | ४ | कोठें | कोठें |

| पान | प्रबंध | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १३९ | १९९ | १२ | मारलें | मारिलें |
| १३९ | १९९ | २१ | किर्ति | कीर्ति |
| १४१ | २०२ | ६ | पडतां | घडतां |
| १४४ | २०९ | ३ | वा | वा |
| १४५ | २१० | ५ | एकची | एकचि |
| १४६ | २११ | ३ | साधनात | साधनातें |
| १५५ | २१७ | ६ | प्रभाते | प्रभा ते |
| १५५ | २१७ | ६ | मह | महा |
| १५५ | २१७ | ९ | आलपिती | आलापिती |
| १६० | २२० | १० | पुच्छातें | पुच्छानें |
| १६० | २२० | २१ | जाचें | ज्याचें |
| १६९ | २२८ | ७ | कोठ | कोठें |
| १७८ | २३२ | ४३ | कंस | कंसा |
| १७९ | २३२ | ५७ | गाईना | गाईनीं |
| १९१ | २४३ | १५ | पति न ऐके | परि न ऐके |
| १९५ | २४५ | २ | इंद्रियांच | इंद्रियांचें |
| १९६ | २४७ | ४ | कर यासी | करायासी |
| १९९ | २४९ | १ | सात्त्विकीतं | सात्त्विकीतें |
| २०२ | २५५ | ४ | जाणतो | जाणा तो |
| २०३ | २५६ | १२ | महज | सहज |
| २०३ | २५७ | ६ | शत्रुघ्ने | शत्रुघ्न |
| २०३ | २५७ | ६ | वाजा | वोजा |
| २०४ | २५९ | हेडिंग | रंभकरंभ | शुंभनिशुंभ |
| २०५ | २६० | हेडिंग | रंभकरंभ | शुंभनिशुंभ |
| २०५ | २६० | १ | तयालागी | तयांलागीं |
| २०५ | २६० | ६ | आम्हां | आम्हीं |
| २०५ | ६० | ८ | थाडीतसे | धाडीतसे |
| २०९ | २६३ | ४ | मला | भला |

| पान | प्रबंध | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| २१० | २६४ | ६ | ते काया | तत्काया |
| २१० | २६४ | ७ | संसरे | संचरे |
| २११ | २६५ | १० | सविस्तरा | सविस्तर |
| २११ | २६७ | ० | सदहू प्रबंधाचे वर तारिख २८-१०-३० समजावी. | |
| २११ | २६७ | ४ | नेमून | तेथून |
| २१२ | २६८ | १९ | तेनें | तेजें |
| २१४ | २७१ | १२ | या | त्या |
| २१५ | २७२ | ३ | दीन | दिन |
| २२६ | २७९ | ६ | सोडवात्रा | सोडवाया |
| २२९ | २८४ | ८ | साधीं आतां | आधीं आतां |
| २३१ | २८७ | ६ | भव | भाव |
| २३२ | २८८ | १२ | बसतों | वसतों |
| २३२ | २८९ | ६ | कीं असा | हा असा |
| २३२ | २९० | २ | देवा | देव |
| २३२ | २९० | ७ | मनीं | जनीं |
| २३३ | २९१ | १ | आशाळसूत | आशाळभूत |
| २३३ | २९१ | ५ | जाणितो | जाणितोसी |
| २३५ | २९३ | १८ | म्हण | म्हणे |
| २४१ | ३०४ | १७ | पूर्व | पूर्ण |
| २४५ | ३११ | ५ | आशिर्वाद विजयाचा द्यावा। | आशिर्वाद विजयाचा। द्यावा |
| २४९ | ३१८ | ५ | दयोदित | सदोदित |
| २५१ | ३२२ | ६ | कां | कीं |
| २५३ | ३२५ | ११ | ऊभा | उभा |
| २५६ | ३३२ | ३ | औषधांचा | औषधाचा |
| २५६ | ३३३ | ८ | मंत्रजप त्यासीं | मंत्रजपत्यासीं |
| २५७ | ३३४ | ७ | विचाराल | विचराल |

| पान | प्रबंध | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| २५८ | ३३६ | ४ | येथं | येथें |
| २५८ | ३३६ | १० | युद्ध | शुद्ध |
| २५९ | ३३७ | १२ | करिन | करित |
| २६२ | ३४४ | ७ | नका | नको |
| २६४ | ३४८ | २ | संवधावें | संवर्धावें |
| २६५ | ३५० | १५ | कृतज्ञ ते | कृतज्ञत्वें |
| २७२ | ३५६ | १० | येथं | येथें |
| २७६ | ३६३ | ४ | जेणं | जेणें |
| २७९ | ३६७ | १५ | पुण्यस्थळ | पुण्यस्थळें |
| २८० | ३६८ | १० | वैभव | वैभवें |
| २८१ | ३७१ | १ | केल | केलें |
| २८६ | ३७९ | २३ | दाखवावें | प्रगटावें |
| २९२ | ३८३ | २२ | वासुदेवं | वासुदेवें |
| २९३ | ३८४ | ५ | प्रिया भावा | प्रिय भावा |
| ३०२ | ३९२ | ३९ | विश्रीं जोपासना | विश्रीं जोपासन |
| ३०२ | ३९२ | ४० | जीविताविर्ध | जीविताविधि |
| ३०४ | ३९३ | १९ | संकल्पन | संकल्पून |
| ३०४ | ३९३ | ३० | वाढविंन | वाढदिन |
| २९७ | ३८९ | हेडिंगाचेखालीं तारिख नाहीं ती | | -७-१९२९ घालावी |
| ३०५ | ३९३ | ४३ | संतु ला | संतुष्टला |
| ३०६ | ३९४ | ३१ | त्वदर्पणा | त्वदर्पण |
| ३०७ | ३९५ | १७ | धगधगति | धगधगीत |
| ३०८ | ३९५ | ४५ | धरीत | धरी जी |
| ३१० | ३९८ | २० | विचारा विचार | विचाराविचार |
| ३१० | ३९८ | २८ | विषय ज्ञानासीं | विषय-ज्ञानासीं |
| ३१२ | ३९९ | २४ | अंतरूं | अंतरू |
| ३१२ | ४०० | ४ | गौरवाच | गौरवाचें |
| ३१४ | ४०१ | १२ | बनाया | बनवाया |

| पान | प्रबंध | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ३१५ | ४०१ | २४ | नोह | नोहे |
| ३१५ | ४०१ | ५१ | दत्ताज्ञेन | दत्ताज्ञेनें |
| ३१७ | ४०२ | ६ | 'नहि बलहीने न आत्मा' लभ्यते। | 'नहि बलहीनेन आत्मा लभ्य,' तो |
| ३१७ | ४०२ | १४ | बाध | बोध |
| ३१७ | ४०२ | २७ | महात्म्य सीं | माहात्म्यासीं |
| ३१७ | ४०२ | ३० | प्रादुभवे | प्रादुर्भवे |
| ३१९ | ४०३ | २६ | तेथच | तेथेंच |
| ३२० | ४०४ | ५ | विजया | विजय |
| ३२१ | ४०४ | २९ | तत्स्मृतासीं | तत्स्मृतीसीं |
| ३३५ | ४१२ | १४ | विनायक | विनायका |
| ३३८ | ४१६ | ६ | विश्राम | विश्रामे |
| ३३८ | ४१६ | ११ | जीवनमुक्त | जीवन्मुक्त |
| ३४१ | ४१८ | २२ | म्या | त्या |
| ३४२ | ४२० | तारिख | १९३१ | १९३० |
| ३४३ | ४२१ | ९ | संपादनी | संपादणी |
| ३४३ | ४२१ | ९ | युद्ध | शुद्ध |
| ३४८ | ४२९ | २६ | बालकातें | बालक तें |
| ३५० | ४३१ | ११ | ईश्वरसेवना | ईश्वरसेवन |
| ५ | ६ | ५ | पहाणे पण | पहाणेपण |
| १० | १४ | १४ | देवतमाय | देवतामय |
| १७२ | विषय | दुसरा | वासुदव | वासुदेव |
| १९८ | विषय | ओळ ९ वी | रंभकरंभकथा २५४, २५९, २६० | रंभकरंभकथा २५४ शुंभनिशुंभकथा २५९, २६० |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५९०७ विः भाषा
क्रमांक ४१२ नों. दि.

# श्रीदत्त-भजन-गाथा.

| पान | प्रबंध | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ३५५ | ४३९ | ११ | तच | तेंच |
| ३६१ | ४५० | १ | वंदावें | वदावें |
| ३६४ | ४५३ | ८ | वीचण | वीक्षण |
| ३६४ | ४५४ | ४ | तुजवर देह | तुज नरदेह |
| ३६४ | ४५४ | ७ | चालावें | चालवावें |
| ३७४ | ४६१ | ३२ | मन | मज |
| ३७७ | ४६४ | ३ | दह्य-कार्य | दत्त-कार्य |
| ३८४ | ४७४ | १ | श्रीगुरुपर ज्योति | श्रीगुरुपरंज्योति |
| ३८६ | ४७६ | ११ | पाहतां | बाहतां |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळप्रत)